# छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेनापतींचे स्वराज्यातील कार्य – एक चिकित्सक अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीकरीता सादर केलेला
संशोधन–प्रबंध

संशोधक

**प्रा. सौ. उज्वला विजय नलावडे**

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय,
सातारा

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. श्रद्धा कुंभोजकर**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

मार्च २०१६

# प्रतिज्ञापत्र

मी **प्रा. सौ. उज्वला विजय नलावडे** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, **''छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेनापतींचे स्वराज्यातील कार्य – एक चिकित्सक अभ्यास''** हा संशोधन प्रबंध स्वत: लिहिलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर केलेला आहे.

हा संशोधन प्रबंध यापूर्वी कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

**संशोधक**
**प्रा. सौ. उज्वला विजय नलावडे**

स्थळ : सातारा

दिनांक : /०३/२०१६

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **प्रा. सौ. उज्वला विजय नलावडे** यांनी **''छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेनापतींचे स्वराज्यातील कार्य – एक चिकित्सक अभ्यास''** या विषयावर संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर केला आहे.

प्रस्तुत संशोधन प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वत: लिहिला असून तो इतर कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही. संशोधकाच्या संशोधन कार्याबाबत मी समाधानी आहे.

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. श्रद्धा कुंभोजकर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,**
**पुणे.**

स्थळ : सातारा

दिनांक : /०३/२०१६

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled ''छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेनापतींचे स्वराज्यातील कार्य – एक चिकित्सक अभ्यास'' submitted by प्रा. सौ. उज्वला विजय नलावडे to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph. D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have notbeen submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009 that govern the Ph. D. students, the students has completed the due process that includes Interview and pre-submission Viva.

Place : Pune Signature of Research Guide

Date : /03/2016 Signature of Head of the Department

Office seal

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत इतिहास विभागात विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी **''छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेनापतींचे स्वराज्यातील कार्य – एक चिकित्सक अभ्यास''** याविषयावरील शोधप्रबंध सादर करताना ज्यांनी मला प्रोत्साहन दिले, मार्गदर्शन व सहकार्य केले त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे.

सर्वप्रथम प्रस्तुत शोधप्रबंधाच्या विषय निवडीपासून ते प्रबंधाच्या लिखाणाचे काम पूर्ण होईपर्यंत ज्यांची प्रेरणा व अनमोल असे मार्गदर्शन लाभले त्या माझ्या मार्गदर्शक मा. डॉ. श्रद्धा कुंभोजकर यांची मी मनापासून ऋणी आहे. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना, केलेले मार्गदर्शन यामुळेच हा शोधप्रबंध मी पूर्ण करू शकले.

माझे संशोधनाचे कार्य चालू असताना इतिहास संशोधक ग. भा. मेहेंदळे यांची घेतलेली मुलाखत, त्यांच्याशी झालेली चर्चा व त्यांनी केलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या संशोधन कार्याची दिशा निश्चित होण्यास व लेखन सखोल होण्यास खूपच मदत झाली. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

प्रबंध लेखनाचे काम करीत असताना माझे पती प्राचार्य डॉ. विजयराव नलावडे, तसेच प्रा. डॉ. सुमित यादव, प्रा. डॉ. अजितकुमार जाधव व प्रा. जयपाल सावंत यांनी खूपच मदत केली. त्यांच्याशी वेळोवेळी केलेल्या चर्चेमुळे शोधप्रबंधाचे लिखाण शास्त्रशुद्ध होण्यास मदत झाली. सर्वांचे सहकार्य अतिशय मोलाचे होते.

या संशोधन कार्यासाठी मला यु. जी. सी. कडून अभ्यास रजा व ग्रँट मंजूर झाली होती. याकामी मला सहकार्य व मार्गदर्शन करणारे सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (उच्च शिक्षण) मा. डॉ. डी. डी. पाटील, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, कार्यालयीन कर्मचारी वर्ग व यु. जी. सी. ऑफीसचे संबंधित कर्मचारी या सर्वांची मी आभारी आहे.

शोधप्रबंधासाठी उपयुक्त ठरणारी कागदपत्रे व संदर्भ साधने मिळविताना विविध संस्था व त्यांची ग्रंथालये यांचा मला उपयोग झाला. त्यामध्ये पुणे पुराभिलेखागार, पुणे, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय पुणे, श्री. छ. प्रतापसिंह महाराज नगर वाचनालय सातारा, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय व दुर्मिळ विभाग, छत्रपती शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, जयकर ग्रंथालय पुणे, रयत शिक्षण संस्थेचे छ. शिवाजी कॉलेज, सातारा, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा इत्यादी शाखातील ग्रंथालयांचे ग्रंथपाल व कर्मचारी वर्ग या सर्वांची मी ऋणी आहे. त्याचबरोबर पुणे पुराभिलेखागारातील श्रीयुत गुजले, छ. शिवाजी कॉलेज येथील ग्रंथपाल प्रा. शिवाजी लोखंडे व सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. सौ. आशा जिरगे यांच्या सहकार्यामुळे अनेक कागदपत्रे व ग्रंथ उपलब्ध झाले. याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

संशोधनाचे काम करीत असताना सतत विविध महनीय व्यक्तींचे व सहकाऱ्यांचे मला मार्गदर्शन लाभले त्यात शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अरूण भोसले, डॉ. एम. ए. लोहार, छ. शिवाजी कॉलेजचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. गणेश ठाकूर तसेच प्रा. डॉ. व्ही. पी. पवार, प्रा. डॉ. एस. पी. शिंदे, डॉ. विनायक जाधव, प्रा. डॉ. भास्कर कदम, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. नलिनी वाघमारे, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयातील माझे सहकारी प्रा. मनोहर निकम, प्रा. डॉ. प्रभा कदम, प्रा. सुरेखा शिंदे, प्रा. सौ. मंदाकिनी वर्णेकर, इत्यादींची मी आभारी आहे.

लेखन करीत असताना तपासणी, मांडणी इत्यादीबद्दल मला मदत करणाऱ्या मैत्रिणी प्रा. डॉ. कांचन नलवडे, प्रा. शामला माने, प्रा. डॉ. उज्वला पाटील, प्रा. सौ. सविता मेनकुदळे इत्यादींबद्दल मला कृतज्ञता वाटते.

माझे पीएच. डी. चे कामाबद्दल सतत चौकशी करणारे माझे जामात डॉ. प्रशांत पवार, कन्या डॉ. प्रियांका पवार, माझी दोन्ही मुले श्री. सुभाष नलावडे व ॲड. उदय नलावडे, दोन्ही

स्नुषा सौ. स्नेहा व सौ. सुप्रिया, बहिणी सौ. सुरेखा मोहिते व सौ. सुनिता पवार, बंधू श्री. कालेश्वर व श्री. राजेश जाधव या सर्वांच्या सदिच्छा मी जपून ठेवेन. संशोधन करीत असताना ते काम चांगले व्हावे, लवकर व्हावे म्हणून कळत नकळत येणारे 'टेन्शन' घालविण्याचे काम माझा नातू चि. आदित्य व नात कु. मुग्धा यांनी केले.

वरील सर्वांचे आभार मानत असता एक खंत मनात राहून जाते ती म्हणजे माझे वडील कै. पी. डी. जाधव यांच्या हयातीत मी माझे काम पूर्ण करू शकले असते तर खूपच चांगले झाले असते. हा आनंद आणखी द्विगुणीत झाला असता.

सदर संशोधन प्रबंधाचे कॉम्प्युटर टायपिंग व आकर्षक बांधणी करून देणारे मे. रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, साताराचे श्री. मुकुंद ढवळे व त्यांचे सहकारी श्री. कुलकर्णी यांचे आभार. पुन्हा एकदा संशोधनाकामी सहकार्य करणाऱ्या ज्ञात–अज्ञात सर्व हितचिंतकांचे मन:पूर्वक आभार.

**संशोधक**

**प्रा. सौ. उज्वला विजय नलावडे**

# अनुक्रमणिका


| प्र. क्र. | नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | II |
| | प्रमाणपत्र | III |
| | **Certificate** | IV |
| | ऋणनिर्देश | V |
| १ | संशोधन पद्धती | १ – १० |
| २ | स्वराज्याची स्थापना आणि शिवरायांचे प्रारंभीचे सहकारी | ११ – ५७ |
| ३ | अष्टप्रधान मंडळातील सेनापतींचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान व भूमिका | ५८ – ७४ |
| ४ | स्वराज्याचे प्रारंभीचे सेनापती | ७५ – ९२ |
| ५ | सेनापती नेताजी पालकर | ९३ – १६८ |
| ६ | सेनापती प्रतापराव गुजर | १६९ – २३८ |
| ७ | सेनापती हंबीरराव मोहिते | २३९ – ३०४ |
| ८ | मूल्यमापन | ३०५ – ३२३ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३२४ – ३३० |
| | परिशिष्टे | ३३१ – ३४६ |

## प्रकरण पहिले

# संशोधन पद्धती

| | |
|---|---|
| १:१ | संशोधन विषयाची निवड |
| १:२ | विषयाचा कालखंड |
| १:३ | संशोधनाची गरज |
| १:४ | विषयाचे महत्त्व, स्वरूप व व्याप्ती |
| १:५ | संशोधन विषयाची मर्यादा |
| १:६ | संशोधनाची उद्दिष्टे |
| १:७ | परिकल्पना |
| १:८ | संशोधन पद्धती |
| १:९ | प्रकरण रचना |
| १:१० | तथ्ये (साधने) गोळा करण्याचे तंत्र |
| १.११ | उपलब्ध तथ्ये / संदर्भ साधने |
| १.१२ | उपलब्ध संशोधनाचा आढावा |

## प्रकरण पहिले

# संशोधन पद्धती

### १:१ संशोधन विषयाची निवड :

छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन महाराष्ट्रात स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य ही एक अलौकिक व अद्वितीय अशी घटना होती. संपूर्ण हिंदुस्थान परकिय सत्तेच्या वर्चस्वाखाली गेलेला असताना आपल्या अंगभूत गुणांच्या जोरावर महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा शुभारंभ केला. या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात त्यांनी सर्वसामान्य जनतेलाही सहभागी करवून घेतले होते. त्यांच्यात स्वराज्याबद्दल आपुलकी, स्वातंत्र्यासाठी लढा देण्याची उर्मी आणि प्रसंगी प्राण देण्याची जिद्दही निर्माण केली. स्वराज्य स्थापना व स्वराज्य उभारणी होत असताना अनेक सेनानी महाराजांच्या तालमीत तयार झाले. सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तींमधूनच महापराक्रमी योद्धे निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी या सहकाऱ्यांमधील जाणकार, शूर व पराक्रमी व्यक्तीची सेनापतीपदी निवड करून आपल्या सैन्याचे आधिपत्य त्याच्या हाती दिले. महाराजांच्या ३५ वर्षांच्या कारकिर्दीत ५ सेनानींनी सेनापतीपद भूषविले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दिच्या प्रारंभीच्या कालखंडापासूनच सेनापती पदाला महत्त्वपूर्ण स्थान होते. महाराजांना लाभलेले सेनापती एकापेक्षा एक सरस होते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सेनापती पदाला झळाळी व वलय प्राप्त करवून दिले.

शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य होते. अनियंत्रित राजेशाही हे वैशिष्ट्य असणाऱ्या मध्ययुगात लोककल्याणकारी व जनतेला आपलेसे वाटणारे राज्य त्यांनी निर्माण केले. आदिलशाही व मोगल या समकालीन बलाढ्य अशा सत्तांना नामोहरम करून महाराजांनी आपले स्वराज्य निर्माण केले. या कार्यात महाराजांना त्यांच्या सेनापतींनी केलेले सहकार्य अतिशय मौल्यवान होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दित झालेल्या सेनापतींच्या कार्यावर सलगपणे प्रकाश टाकणे गरजेचे आहे असे वाटू लागले व यातूनच प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड केली.

## १:२ विषयाचा कालखंड :

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० ला शिवनेरी किल्ल्यावर झाला होता. त्यांचे बालपण शिवनेरी किल्ला, सिंदखेडराजा व बंगळूर अशा ठिकाणी गेले होते. वयाच्या १२ व्या वर्षी शहाजी राजांनी त्यांची रवानगी जिजाबाईसोबत पुण्याच्या जहागिरीचा कारभार करण्यासाठी बंगळूरहून महाराष्ट्रात केली. तसेच त्यांच्याबरोबर मदतीसाठी काही निवडक माणसांची मंत्री म्हणून रवानगीही केली होती. यामध्ये सेनापती म्हणून माणकोजी दहातोंडे यांचा समावेश होता. शिवाजी महाराज पुण्याला स्थिरस्थावर होताच स्वतंत्र स्वराज्य स्थापनेच्या उद्योगाला लागले. अनेक संकटांना तोंड देवून महाराजांनी स्वतंत्र 'हिंदवी स्वराज्याची' स्थापना केली. त्यांच्या या कार्यात त्यांच्या मंत्रीमंडळातील सेनापतींनी मोलाचे सहकार्य केले होते. तसेच शिवाजी महाराजांच्या नंतरही गादीवर येणाऱ्या पुढील छत्रपतींनाही सेनापतींनी मोलाची मदत केली आहे.

महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचा साधारणत: इसवी सन १६४५ ते १६८० हा महत्त्वाचा कालखंड आहे. परंतु महाराजांच्या मृत्यूवेळी सेनापती पदावर असलेले हंबीरराव मोहिते हे पुढे सन १६८७ पर्यंत या पदावर होते. त्यांनी शिवाजी महाराजांच्या पश्चात स्वराज्य रक्षणासाठी बहुमोल कार्य केले आहे. त्यामुळे हंबीररावांच्या पुढील काळातील या कार्याचा थोडक्यात आढावाही शोध प्रबंधात घेण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत विषयाचा कालखंड साधारणत: सन १६३० ते १६८७ असा आहे.

## १:३ संशोधनाची गरज :

शिवाजी महाराजांचे स्वराज्य ही इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाची अशी घटना आहे. महाराजांनी प्रथमपासूनच आपल्या स्वराज्याकडे एक स्वतंत्र व सार्वभौम सत्ता या दृष्टीनेच पाहिले. म्हणूनच त्यांनी इतर राज्यकर्त्याप्रमाणे निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. महाराजांच्या राज्याभिषेकापर्यंत मंत्र्यामध्ये व त्यांच्या पदामध्ये अनेक बदल झाले. कमकुवत व्यक्तींना त्यांनी आपल्या मंत्रीमंडळात ठेवले नाही. जे कर्तबगार व पराक्रमी होते तेच टिकले. राज्याभिषेकाच्यावेळी महाराजांचे मंत्रीमंडळ मंत्र्यांच्या संख्येच्या दृष्टीने व योग्य

व्यक्तींच्या निवडीने परिपूर्ण बनले. या अष्टप्रधान मंडळातील सेनापतींनी स्वराज्य विस्तार व स्वराज्य रक्षणाकामी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. संपूर्ण सैन्यावर आधिपत्य असणाऱ्या या व्यक्तींनी महाराजांना अनेक कठीण प्रसंगी मदत केली आहे. सह्याद्रीच्या डोंगराळ भागातील सर्वसामान्य जनतेतून महाराजांनी असामान्य लष्करी योग्यतेचे सेनापती निर्माण केले. सेनापतीचे प्रमुख काम म्हणजे लढाया करणे हे होते. शिवाजी महाराज स्वत: एक असामान्य योद्धे होते. अनेक महत्त्वाच्या लढायांचे नेतृत्त्व त्यांनी स्वत: केलेले होते. त्यामुळे सेनापतींचे कार्य तसे दुर्लक्षितच राहिले आहे. महाराजांना सर्वोतोपरी मदत करणाऱ्या आणि महाराष्ट्रापासून जिंजीपर्यंत पसरलेल्या स्वराज्याचे संवर्धन करताना सेनापतींनी केलेल्या कार्याचा इतिहास लोकांना ज्ञात असणे आवश्यक आहे. यासाठी संशोधन करणे महत्त्वाचे वाटते.

## १:४ विषयाचे महत्त्व, स्वरूप व व्याप्ती :

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेले स्वराज्य हे खऱ्या अर्थाने रयतेचे कल्याणकारी असे राज्य होते. हे राज्य माझे आहे असे येथील प्रत्येकाला वाटत होते. शिवाजी महाराजांनी सन १६७४ ला स्वत:ला विधीवत राज्याभिषेक करवून घेवून स्वराज्याचे सार्वभौम राज्यात रूपांतर केले. तसेच आपल्या मृत्यूपर्यंत म्हणजे १६८० पर्यंत एका प्रबळ व विशाल राज्याची निर्मिती केली. तत्त्कालिन इतर सत्तांप्रमाणेच छत्रपतींचे हे स्वराज्य लष्करी ताकदीवरच उभारलेले होते. आपल्या स्वराज्याचे रक्षण व विस्तार करण्यासाठी महाराजांना अनेक मोहिमा काढाव्या लागल्या होत्या. तसेच अनेक शत्रूंच्या आक्रमणालाही तोंड द्यावे लागले होते. प्रारंभी स्वराज्य लहान होते, सैन्यसंख्याही मर्यादित होती, प्रशासनाचा व्यापही कमी होता. तेव्हा शिवाजी महाराजांचे सैन्यावर प्रत्यक्ष अधिपत्य होते. परंतु उत्तरोत्तर स्वराज्याचा विस्तार वाढत गेल्यानंतर महाराजांनी स्वराज्याच्या सैन्याचे आधिपत्य / नेतृत्त्व सेनापतींच्या ताब्यात देवून स्वराज्य रक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली. सेनापतींनीही ही जबाबदारी प्राणपणाने जपून प्रत्येक मोहिमेत

महाराजांना सक्रिय पाठींबा दिला. तसेच अनेक मोहिमा स्वत:च्या नेतृत्त्वाखाली यशस्वीपणे पार पाडल्या.

महाराजांनी सेनापतींवर पूर्ण विश्वास ठेवला होता. तरीही सेनापतींना त्यांनी कधीही वरचढ किंवा अनियंत्रीत होवू दिले नाही. नेताजी पालकरांनी पन्हाळगडच्या सन १६६६ सालच्या स्वारीत केलेल्या दिरंगाईमुळे मराठ्यांना गड घेण्यात अपयश आले. त्यामुळे महाराजांनी नेताजींना सेनापतीपदावरून दूर केले तर प्रतापराव गुजरांना बहलोलखानाचा पूर्णपणे बंदोबस्त न केल्यामुळे महाराजांनी कडक शब्दात समज दिली. यावरून महाराजांचा सेनापतींवर असणारा वचक व दरारा दिसून येतो. महाराजांचे सगळे सेनापती हे मराठ्यांच्या स्वभावधर्माप्रमाणे शूर, धाडसी, लढाऊ व स्वाभिमानी होते. काही वेळेला ते जबाबदारीने न वागता शिपाईगिरीने वागत याचे महाराजांना वाईट वाटे. म्हणून त्यांनी पुढील काळात सेनापती निवडताना शूरवीर परंतु धीरगंभरी, राजकारणपटू, संयमी अशा हंबीररावांची नेमणूक सेनापती पदावर केली.

छत्रपती शिवाजी महाराज हे स्वत: एक राजकारणकुशल व रणधुरंधर सेनानी होते. तरीही जेव्हा संधी मिळेल तेव्हा महाराजांच्या सेनापतींनी आपले कौशल्य सिद्ध करून स्वराज्यनिर्मितीत अतूल्य योगदान दिलेले आहे. महाराजांचे सेनापती हे मराठ्यांच्या पराक्रमी, धाडसी व लढवय्या प्रतिमेचे मूर्तिमंत प्रतिक आहेत. त्यामुळे या सर्व सेनापतींचा उपलब्ध पुराव्यांच्या आधारे अभ्यास झाल्यास इतिहासात मोलाची भर पडेल व इतिहास संशोधकांसाठी उपयुक्तही ठरेल असे वाटते.

## १:५ संशोधन विषयाची मर्यादा :

सदर संशोधनासाठी घेतलेल्या विषयाला निश्चितपणे काही मर्यादा आहे. हे संशोधन आज उपलब्ध असणाऱ्या साधनांच्या आधारे करणे क्रमप्राप्त आहे. मराठ्यांच्या स्वराज्यावर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मोगल बादशहा औरंगजेब याने सर्वंकष आक्रमण केले होते. तेव्हा मराठ्यांनी प्राणपणाने प्रतिकार करून आपले स्वातंत्र्य टिकविले. २७ वर्षाच्या या प्रदिर्घ लढ्याला मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध असे म्हटले जाते. या लढ्यात औरंगजेबाने मराठ्यांची

राजधानी रायगड ताब्यात घेवून मराठ्यांचा संपूर्ण दफ्तरखाना कागदपत्रांसहित जाळून टाकला होता. मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी अनेक साधने त्यात नष्ट झाली. जी प्राथमिक साधने उपलब्ध आहेत त्यातील मराठी, संस्कृत साधनांचा मी वापर केला आहे. परंतु फारसी भाषेतील साधनेही बहुतांशपणे मोगलांच्या हिताची माहिती देण्यासाठी लिहिलेली आहेत. तसेच दुय्यम साधने त्रोटक माहिती पुरवितात. त्यामुळे माझ्या संशोधनाला निश्चित काही मर्यादा आहेत. तसेच संशोधनाचा कालखंड असणारे सतरावे शतक हे राजकीय व सामाजिक अस्थिरतेचे होते. त्यामुळे वास्तवतेचे विश्लेषण करणे थोडे कठीण आहे. तरीही या मर्यादांचा विचार करून संशोधन जास्तीत जास्त अचूक करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १:६ संशोधनाची उद्दिष्टे :

सदरचे संशोधन कार्य करत असताना खालील उद्दिष्टे समोर ठेवून विषयाची मांडणी केलेली आहे.

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील सेनापतींचे स्थान अभ्यासणे.

२. सेनापतींची स्वराज्य संवर्धनातील भूमिका अभ्यासणे.

३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व सेनापतींविषयीची सर्व माहिती एकत्रित करणे.

४. शिवाजी महाराज व त्यांचे सेनापती यांच्या संबंधाचे विश्लेषण करणे.

५. सेनापती नेताजी पालकर यांचे कार्य अभ्यासणे.

६. सेनापती प्रतापराव गुजर यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

७. सेनापती हंबीरराव मोहिते यांचे कार्य अभ्यासणे.

८. तत्कालिन काळातील राजकीय व लष्करी क्षेत्रातील महाराजांच्या सेनापतींचा प्रभाव तपासणे.

९. सेनापतींच्या युद्ध पद्धतीचा अभ्यास करणे व महत्त्व सांगणे.

## १:७ परिकल्पना :

संशोधन कार्य करत असताना उद्दिष्टांबरोबरच परिकल्पनाही महत्त्वाच्या असतात. संशोधन कार्य पूर्णत्वास येते त्यावेळी त्यातील काही परिकल्पना सबळ पुराव्याअभावी चुकीच्याही निघू शकतात. प्रस्तुत संशोधन करत असताना खालील परिकल्पना ठरविण्यात आलेल्या आहेत.

१. छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्व सेनापती हे ग्रामीण भागातून आलेले लढवय्ये वीर / सेनानी होते.

२. स्वराज्य उभारणीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याच्या खालोखाल सेनापतींचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

३. छत्रपती शिवाजी महाराज व्यक्तीची कर्तबगारी पाहूनच त्याची सेनापतीपदी नियुक्ती करत.

४. शिवाजी महाराज व त्यांचे सेनापती यांच्यातील संबंध अनेकवेळा ताणले गेले होते.

५. स्वराज्य उभारणीत सेनापती नेताजी पालकर व सेनापती प्रतापराव गुजर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

६. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य विस्ताराच्या कार्यात सेनापती हंबीरराव मोहिते यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## १:८ संशोधन पद्धती :

प्रस्तूत विषयाचा अभ्यास करत असताना प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. अप्रकाशित व प्रकाशित प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ साधनांचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करून त्याआधारे प्रकरणांची मांडणी करण्यात आली आहे. तसेच संशोधनाच्या पाठीशी असलेल्या सैद्धांतिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वर्णनात्मक पद्धती व विश्लेषणात्मक पद्धतीचाही वापर केलेला आहे. विविध समस्यांचे अन्वयार्थ सांगण्यासाठी गरजेच्या ठिकाणी तळटीपा दिलेल्या आहेत. संशोधनकामी पुणे पुराभिलेखागार पुणे येथील

सातारा जमावमधील कागदपत्रे, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे येथील दुर्मिळ ग्रंथ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणेचे ग्रंथालय, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय व दुर्मिळ विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, छत्रपती शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डेक्कन कॉलेज ग्रंथालय पुणे, नगरपालिका ग्रंथालय सातारा, छत्रपती शिवाजी कॉलेज साताराचे ग्रंथालय, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय साताराचे ग्रंथालय इत्यादी ठिकाणाहून उपलब्ध झालेल्या प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर केलेला आहे. कागदपत्रांचा अभ्यास करत असताना पूर्वग्रहदूषित न होता तटस्थपणे विषयाची मांडणी केलेली आहे.

## १:९ प्रकरण रचना :

सदर संशोधन कार्य करत असताना एकूण आठ प्रकरणामध्ये त्यांची विभागणी केलेली आहे.

**प्रकरण पहिले : संशोधन पद्धती.**

या प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधन विषयाची निवड, विषयाचा कालखंड, संशोधनाची गरज, विषयाचे स्वरूप व व्याप्ती, संशोधन विषयाची मर्यादा, अभ्यासाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, उपलब्ध संदर्भ साधने याचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे : स्वराज्याची स्थापना आणि शिवरायांचे प्रारंभीचे सहकारी.**

प्रस्तुत प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म, बालपण, स्वराज्य स्थापनेची पूर्वतयारी, स्वराज्याची स्थापना, शहाजीराजांची कैद, फत्तेखानाची स्वारी, जावळी मोहिम, शिवाजी महाराजांच्या निवडक प्रारंभीच्या सहकाऱ्यांची थोडक्यात माहिती अभ्यासण्यात आली आहे.

**प्रकरण तिसरे : अष्टप्रधान मंडळातील सेनापतींचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान व भूमिका.**

सदर प्रकरणामध्ये अष्टप्रधान मंडळाची निर्मिती, छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्याभिषेकावेळचे अष्टप्रधान मंडळ, अष्टप्रधानांची कामे व कर्तव्ये, अष्टप्रधान मंडळातील

सेनापतींचे स्थान, मराठ्यांचा गनिमी कावा, महाराजांची लष्करी व्यवस्था व सेनापती, सेनापतीची जबाबदारी याची थोडक्यात चर्चा केलेली आहे.

**प्रकरण चौथे : स्वराज्याचे प्रारंभीचे सेनापती.**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्याला सुरूवात केल्यानंतर फत्तेखानाच्या स्वारीच्या रूपाने स्वराज्यावर मोठे संकट आले. या स्वारीत महाराजांच्या लष्कराचे नेतृत्व करणारे कावजी, पहिले सरनौबत माणकोजी दहातोंडे, अल्पकाळ सेनापती पदावर आलेले तुकोजी चोर, पायदळाचे सेनापती नूरबेग व येसाजी कंक या प्रारंभीच्या सेनानींच्या कार्याचा अल्प परिचय सदर प्रकरणामध्ये दिलेला आहे.

**प्रकरण पाचवे : सेनापती नेताजी पालकर.**

सदर प्रकरणामध्ये नेताजी पालकरांचे पूर्ववृत्त, छत्रपती शिवाजी महाराज व नेताजी नातेसंबंध, नेताजींना सरनौबतपदाची प्राप्ती, नेताजींची आदिलशाही प्रदेशावरील स्वारी, नेताजींचा शहापूरवरील हल्ला, पन्हाळ्याच्या वेढ्यातून महाराजांना सोडविण्याचा प्रयत्न, शाहिस्तेखानावरील छाप्यातील सहभाग, सूरत लुटीतील सहभाग, मिर्झाराजे जयसिंहाचा प्रतिकार करताना नेताजींची भूमिका, पुरंदरचा तह, मोगल व मराठे यांच्या विजापूरवरील संयुक्त स्वारीतील सहभाग, नेताजी स्वराज्याकडून आदिलशाहीकडे, आदिलशाहीकडून मुघलांकडे, नेताजींची कैद, नेताजींचे धर्मांतर, स्वराज्यात पुनरागमन, स्वराज्याच्या सेवेतील नेताजी, नेताजींचा मृत्यू इत्यादी गोष्टींचा ऊहापोह केलेला आहे.

**प्रकरण सहावे : सेनापती प्रतापराव गुजर.**

प्रस्तूत प्रकरणामध्ये प्रतापराव गुजरांचे पूर्ववृत्त, सेनापतीपदी येण्यापूर्वीचे गुजरांचे कार्य, सेनापतीपदाची प्राप्ती, मराठे–मुघल शांततेचा तह आणि प्रतापराव गुजर, तह समाप्तीनंतर मुघलांच्या विरोधातील लढा आणि प्रतापराव गुजर, दुसऱ्या सूरत लुटीतील सहभाग, कांचनबारीची लढाई, खानदेश व वऱ्हाडात लुटालुट, कारंजा शहराची लूट, मुघल मुलूखात चौथाईची अंमलबजावणी, साल्हेरीचा रणसंग्राम, प्रतापरावांची आदिलशाही प्रदेशावरील स्वारी, उमराणीचे युद्ध, बहलोलखानास अभयदान व महाराजांची नाराजी, हुबळी

लूट, कर्नाटक स्वारी, नेसरीचे युद्ध व प्रतापरावांचा मृत्यू, इत्यादी गोष्टींचा समावेश करण्यात आलेला आहे.

**प्रकरण सातवे : सेनापती हंबीरराव मोहिते.**

या प्रकरणात हंबीरराव मोहिते यांचे पूर्ववृत्त, हंबीररावांची सेनापतीपदी नियुक्ती, शिवराज्याभिषेकप्रसंगीचे कार्य, राज्याभिषेकानंतरील मुघल प्रदेशातील हालचाली, लासूर लूट, महाराजांच्या कर्नाटक मोहिमेतील हंबीररावांचे योगदान, हुसेनखान मियाणाचा पाडाव, कुतुबशहाशी भेट, व्यंकोजीराजांवरील विजय, वेलोरचा विजय, जालना मोहिमेतील सहभाग, संभाजीराजांच्या राज्यारोहणातील हंबीररावांची भूमिका, छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दितील योगदान, संभाजीकालीन मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील हंबीररावांची कामगिरी, आदिलशहाला मदत, आदिलशाहीच्या नाशानंतर मुघल सैन्याला प्रतिकार, वाईची लढाई व हंबीरराव धारातीर्थी, इत्यादी गोष्टींची चर्चा केलेली आहे.

**प्रकरण आठवे : मूल्यमापन.**

सदर प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनापती माणकोजी दहातोंडे, नेताजी पालकर, प्रतापराव गुजर व हंबीरराव मोहिते यांचे स्वराज्याच्या उभारणीतील योगदानाबाबत गुण व दोषांसह मूल्यमापन करण्यात आले आहे.

## १:१० तथ्ये (साधने) गोळा करण्याचे तंत्र :

सदरचे संशोधन हे वस्तूनिष्ठ व्हावे यासाठी जास्तीत जास्त अचूक माहिती मिळावी या उद्देशाने पुढील साधनांच्या मदतीने तथ्ये (साधने) गोळा केलेली आहेत. यामध्ये अस्सल कागदपत्रांच्या झेरॉक्स कॉपी, मूळ कागदपत्रांचे फोटो, स्कॅनिंग कॉपी व विविध ग्रंथालयातून उपलब्ध झालेली दुर्मिळ ग्रंथसंपदा याचा समावेश आहे.

संशोधन करीत असताना विषयासंदर्भात व उपलब्ध संदर्भ साधनांवर इतर अनेक अभ्यासकांबरोबर केलेली चर्चा यांच्या मदतीने संदर्भ साधनांचे संकलन केले आहे.

## १:११ उपलब्ध तथ्ये / संदर्भ साधने :

उपलब्ध झालेल्या प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांची यादी प्रबंधाच्या शेवटी संदर्भ साधने या विभागामध्ये दिलेली आहे.

## १.१२ उपलब्ध संशोधनाचा आढावा :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर व कार्यावर आतापर्यंत अनेक संशोधकांनी संशोधन केलेले आहे. ग्रँट डफने लिहिलेल्या 'मराठ्यांच्या इतिहासा'पासून ते अलीकडच्या काळातील गजानन मेहेंदळे, वि. गो. खोबरेकर यांच्यापर्यंत अनेक इतिहास संशोधकांनी शिवचरित्रावर संशोधनात्मक ग्रंथ लिहिले आहेत. यामध्ये प्रामुख्याने कृष्णराव केळूस्कर यांचे 'क्षत्रिय कुलावंतस छत्रपती शिवाजी महाराज', गो. स. सरदेसाई यांचे 'शककर्ता शिवाजी', जदुनाथ सरकार यांचे 'Shivaji and his times' , दि. वि. काळे यांचे 'छत्रपती शिवाजी महाराज', बाळशास्त्री हरदास यांचे 'पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी', बेंद्रे वा. सी. यांचे 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र', विजय देशमुख यांचे 'शककर्ते शिवराय', गजानन मेहेंदळे यांचे 'श्री राजा शिवछत्रपती', डॉ. वि. गो. खोबरेकर यांचे 'शिवकाल' इत्यादी ग्रंथ प्रमुख आहेत. या ग्रंथामधून शिवचरित्राच्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेनापतींच्या कार्यावरही तुटक प्रकाश टाकला गेला आहे. परंतु सेनापतींच्या जीवनकार्याचा सलग इतिहास अजूनपर्यंत लिहिला गेलेला नाही.

अलिकडच्या काळात सेनापती हंबीररव मोहिते यांच्या जीवनावर काही इतिहास संशोधकांनी संशोधन केलेले दिसते. डॉ. सदाशिव शिवदे यांनी 'सेनापती हंबीरराव मोहिते' हे पुस्तक लिहिलेले आहे. सन २०१३ मध्ये संतोष पाटील यांनी 'मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती हंबीरराव मोहिते यांचे योगदान' हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे सादर केलेला आहे. या प्रबंधात केवळ सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यावर संशोधन केले गेले आहे. परंतु सर्व सेनापतींच्या जीवनकार्यावर अजूनही संशोधन झालेले नाही. इतिहास संशोधनातील ही उणिव दूर करण्यासाठी या विषयावरील संशोधन उपयुक्त ठरेल.

## प्रकरण दुसरे

# स्वराज्याची स्थापना आणि शिवरायांचे प्रारंभीचे सहकारी

| | |
|---|---|
| **२:१** | **प्रस्तावना** |
| **२:२** | **छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म** |
| २:२:१ | शिवजन्मानंतरच्या शहाजी राजांच्या हालचाली |
| २:२:२ | शिवाजीराजांचे बालपण व शिक्षण |
| २:२:३ | जिजाबाई |
| २:२:४ | पुण्याची जहागीर |
| २:२:५ | दादाजी कोंडदेव यांचे कार्य |
| २:२:६ | स्वराज्य स्थापनेची पूर्वतयारी |
| २:२:७ | खंडोजी व बाजी घोरपडे यांची स्वारी |
| **२:३** | **स्वराज्य स्थापना** |
| २:३:१ | राजगड व तोरणा काबीज |
| २:३:२ | कोंढाणा किल्ला ताब्यात |
| २:३:३ | शहाजी राजेंची कैद |
| २:३:४ | फत्तेखानाची स्वारी |
| २:३:५ | शहाजी राजांची सुटका |
| २:३:६ | पुरंदर किल्ला ताब्यात |
| २:३:७ | जावळी मोहीम |
| **२:४** | **शिवरायांचे प्रारंभीचे सहकारी** |
| २:४:१ | कान्होजी जेधे |
| २:४:२ | बाजी तथा सर्जेराव जेधे |
| २:४:३ | सुर्यराव काकडे |
| २:४:४ | बाजी पासलकर |
| २:४:५ | नरसप्रभू व दादाजी नरसप्रभू गुप्ते |
| २:४:६ | दादाजी कृष्ण लोहकरे |
| २:४:७ | बाजी व दिपाई बांदल |
| २:४:८ | बाजीप्रभू देशपांडे |
| २:४:९ | बापूजी मुदगल नन्हेकर व त्यांची मुले |
| २:४:१० | हैबतराव सिलिंबकर |
| २:४:११ | कावजी मल्हार |
| २:४:१२ | कावजी कोंढाळकर |
| २:४:१३ | संभाजी कावजी |
| २:४:१४ | रघुनाथ बल्लाळ सबनीस |
| २:४:१५ | बाळाजी हरी मजालसी |
| २:४:१६ | सामराज निळकंठ रोंझेकर – पेशवे |
| २:४:१७ | जीवा महाले |
| २:४:१८ | तानाजी मालुसरे |
| २:४:१९ | बाळकृष्णपंत हणमंते |
| **२:५** | **समारोप** |

## प्रकरण दुसरे

# स्वराज्याची स्थापना आणि शिवरायांचे प्रारंभीचे सहकारी

### २:१ प्रस्तावना :

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांची भारताच्या श्रेष्ठ राष्ट्रपुरुषात गणना केली जाते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या असामान्य कर्तबगारीने शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हे त्यांचे कार्य अलौकिकच म्हटले पाहिजे. मध्ययुगीन काळात पाच–सहाशे वर्षे सतत चालू राहिलेल्या इस्लामी आक्रमणामुळे येथील जनता स्वातंत्र्याला पारखी झाली होती. महाराष्ट्रात १४ व्या शतकात यादवांचे राज्य नष्ट झाल्यापासून जवळजवळ तीनशे वर्षे स्वातंत्र्यसुर्य उगवलाच नव्हता. उत्तर महाराष्ट्रावर निजामशाहीचे तर दक्षिण महाराष्ट्रावर आदिलशाहीचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. उत्तर हिंदुस्थानावर बलाढ्य मुघल सत्ता प्रस्थापित झाली होती. अशा या बलाढ्य इस्लामी सत्तांना आपल्या अल्प ताकदीने प्रतिकार करून छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.

आदिलशाही राज्यातील एका सरंजामी सरदाराच्या मुलाने प्रथम आदिलशाहीला आणि नंतर बलाढ्य मुघल सत्तेला आव्हान देवून स्वराज्य स्थापना करणे, ही तत्कालीन काळातील असामान्य अशीच घटना होती. ही कामगिरी पार पाडत असताना शिवाजी राजांना अनेक घटकांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहाय्य झाले. पिता शहाजी राजांकडून त्यांना भोसले घराण्याची प्रतिष्ठा, पुण्याची जहागिरी व लष्करी सामर्थ्य मिळाले. या जहागिरीतच त्यांनी स्वराज्य स्थापनेचा श्रीगणेशा केला. याबरोबरच जन्मजात शौर्य, धाडस इत्यादी गुणांचा वारसाही शहाजी राजांकडून मिळाला होता. निजामशाहीचे पुनरुज्जीवन करण्याचा शहाजी राजांनी केलेल्या प्रयत्नांचा धडा त्यांच्यापुढे होता. त्याचाही प्रभाव शिवाजी राजांवर निश्चितपणे पडला असावा. शिवाजी महाराजांचे आदर्श व्यक्तिमत्त्व घडविण्यात माता

जिजाबाईचे योगदानही अत्यंत मोलाचे होते. बालशिवाजीला योग्य शिक्षण व मार्गदर्शन देवून त्यांच्याकडून स्वराज्य स्थापनेची सिद्धता जिजाबाईने करवून घेतली.

स्वराज्यस्थापनेच्या या महान कार्यात मावळातील अनेक सहकाऱ्यांची महाराजांना साथ मिळाली. आपल्या या कार्यात महाराजांनी सामान्यातील सामान्य माणसालाही सहभागी करून घेतले. त्यांच्यामध्ये स्वराज्यप्रेम निर्माण करून स्वातंत्र्यासाठी लढा देण्याची, प्रसंग पडलाच तर प्राण देण्याची जिद्दही निर्माण केली. आपसात झगडणाऱ्या, वतनासाठी खून, मारामाऱ्या करणाऱ्या आणि मुसलमान पादशहाची सेवाचाकरी करण्यातच धन्यता मानणाऱ्या मावळातील वतनदारांना त्यांनी एकत्र आणले. अशा देशमुख, देशपांडे, कुळकर्णी इत्यादी वतनदारांमधील अनेकजण महाराजांच्या स्वराज्यकार्यात सामील झाले. ज्या सरदार–वतनदारांनी या स्वराज्य कार्यास विरोध केला, त्यांचा सामोपचाराने किंवा बळाचा वापर करून शिवाजी राजांनी मोड केला.

या स्वराज्य उभारणीच्या कामी शिवाजी राजांनी वतनदार देशमुखाप्रमाणेच, सर्व जातीधर्माच्या व सामान्य कुटुंबातील धाडसी व कर्तबगार व्यक्तींनाही सामील करून घेतले. त्यांच्या या कार्यात जीवावर उदार होवून अनेकजणांनी प्रारंभापासून त्यांना साथ दिली. बाजी पासलकर, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे यासारख्या सहकाऱ्यांनी आत्मबलिदान केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्यस्थापना व स्वराज्य उभारणीसाठी प्रारंभीच्या काळात ज्या काही सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले त्यांच्या कार्याचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

## २:२ छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म :

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शालिवाहन शके १५५१ फाल्गुन वद्य तृतीयेला म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. शहाजीराजे भोसले व जिजाबाई या दांपत्याला एकूण ६ अपत्ये झाली. त्यापैकी संभाजी व शिवाजी ही दोनच मुले जगली. संभाजीराजांचा जन्म इ. स. १६१९ मध्ये झाला. त्यांचा विवाह निजामशाही सरदार व शिवनेरीचे किल्लेदार विजयराव विश्वासराव यांची मुलगी जयंती हिच्याशी नोव्हेंबर १६२९ मध्ये

शिवनेरी किल्ल्यावर संपन्न झाला. यावेळी जिजाबाई गरोदर होत्या. विवाहानंतर व्याह्यांच्या संमतीने जिजाबाईं व इतरांना शिवनेरी किल्ल्यावर ठेवून शहाजीराजे मोहिमेवर निघून गेले.[१] त्यानंतर शिवनेरीवर शिवाजी राजांचा जन्म झाला.

**२:२:१ शिवजन्मानंतरच्या शहाजी राजांच्या हालचाली :**

शिवजन्मापूर्वी काही दिवस अगोदर (२५ जुलै १६२९) जिजाबाईचे पिता लखुजी जाधवराव यांचा निजामशहाने भर दरबारात खून करविला. यावेळी झालेल्या झटापटीत लखुजींची राघव, अचलोजी व यशवंत ही तीन मुलेही मारली गेली. सासऱ्याचा खून झाल्याचे समजल्यावर शहाजी राजांनी निजामशाहीचा त्याग केला व ते त्यांच्याकडे मुकासा म्हणून असलेल्या पुणे व चाकण या परगण्यामध्ये येवून राहिले.[२] त्यानंतर त्यांनी मुघलांची चाकरी स्वीकारली. मुघलांकडून त्यांना पाच हजारी जात / ५००० स्वार तर पुत्र संभाजी महाराजांना दोन हजारी जात / १००० स्वार अशा मनसबी देण्यात आल्या. याबरोबरच संगमनेर व जुन्नर हे निजामशाही इलाखे जहागिर म्हणून देण्यात आले.[३] परंतु शहाजी राजे जास्त काळ मुघलांकडे रहिले नाहीत. मुघलांनी शहाजी राजांच्या जहागिरीचा काही भाग काढून घेतला या कारणावरून त्यांनी मुघलशाहीचाही त्याग केला.

दरम्यान इकडे निजामशाही वजीर फत्तेखानाने निजामशाही मुघलांच्या घशात घालवण्याचे कारस्थान चालविले होते. मुघलांची मनसब सोडलेल्या शहाजी राजांनी आता निजामशाही वाचविण्याचा निर्णय घेतला व निजामशाहीच्या वंशातील एक मुलगा शोधून त्यास इ. स. १६३२ मध्ये जुन्नरजवळच्या पेमगिरी किल्ल्यावर नवा निजामशहा म्हणून घोषित केले. या निजामशहाच्या संरक्षणार्थ शहाजीराजांनी मोगलांशी संघर्ष सुरू केला. हा संघर्ष सतत ३ वर्षे सुरू होता. पुढे मोगलांनी आदिलशहालाही आपल्या बाजूला वळविले. या दोन्ही बलाढ्य सत्तांपुढे टिकाव न लागून शेवटी इ. स. १६३६ मध्ये शहाजी राजांनी शरणागती स्वीकारली. शरणागतीनंतर त्यांनी आदिलशाहीत नोकरी पत्करली. यावेळी आदिलशहाने त्यांना भीमा नदी व नीरा नदी या दरम्यान असलेली त्यांची पूर्वापार जहागिरी बहाल केली व रनदौलतखानाच्या हाताखाली कर्नाटक जिंकण्याच्या मोहिमेवर त्यांची रवानगी केली.

### २:२:२ शिवाजी राजांचे बालपण व शिक्षण :

शहाजी राजांचा मुघलांशी संघर्ष सुरू असतानाच्या काळात जिजाबाई व बालशिवाजी यांचे वास्तव्य कोठे होते याविषयी विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. बहुधा ते दोघे इ. स. १६३० ते १६३३ या काळात शिवनेरी किल्ल्यावर व इ. स. १६३३ ते १६३५ याकाळात जिजाबाईंच्या माहेरी सिंदखेडराजा येथे व इ. स. १६३५ ते १६३६ या काळात पुन्हा शिवनेरी किल्ल्यावर रहात असावेत.[४] जिजाबाईंचे ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे याकाळात मुघलांबरोबरच्या संघर्षात आपल्या पित्याला मदत करत होते.[५]

इ. स. १६३६ मध्ये कर्नाटकात गेल्यानंतर तेथील मोहिमामध्ये शहाजीराजांनी दाखविलेल्या पराक्रमामुळे रनदौलतखानाने त्यांना बंगळूर शहर बक्षीस दिले. यावेळी बंगळूर येथेच वास्तव्य करण्याचा शहाजीराजांनी निर्णय घेतला व आपल्या कुटुंबियांसह ते बंगळूरला राहू लागले. शहाजीराजांच्या जिजाबाई व तुकाबाई या दोन्ही पत्नी तसेच जिजाबाईंची दोन्ही मुले संभाजीराजे व शिवाजीराजे व तुकाबाईचा मुलगा व्यंकोजीराजे ही सर्व मंडळी बंगळूरमध्ये रहात होती.[६] कर्नाटकात जाताना शहाजीराजांनी जिजाबाई व बालशिवाजी यांना पुण्याच्या जहागिरीत ठेवले असे आतापर्यंत समजले जात होते. परंतु समकालीन कवी परमानंदाने आपल्या 'शिवभारत' या ग्रंथात केलेल्या वर्णनावरून बालशिवाजी व जिजाबाई बंगळूरला रहात होते. कर्नाटकात जाताना किंवा त्यानंतर लवकरच शहाजी राजांनी जिजाबाई व बाल शिवाजी यांना तिकडे नेले होते. त्यानंतर शिवाजीराजांना १२ वे वर्ष लागल्यानंतर शहाजीराजांनी त्यांची व जिजाबाईची रवानगी पुण्याला केली ही गोष्ट स्पष्ट होते. शहाजीराजे बंगळूरला राहू लागले हे सांगितल्यानंतर परमानंदाने बंगळूर शहर व शहाजीराजांचा तेथील जीवनक्रम याचे वर्णन केले आहे. ते पुढे म्हणतात, ''या काळात जिजाबाईने पतीचे हृदय जिंकले होते आणि शिवाजीवर शहाजीराजांचे अतिशय प्रेम होते. शिवाजी सात वर्षाचा झाला तेव्हा आपल्या अधिकाऱ्यांच्या समवयस्क असलेल्या मुलांसह शहाजीने त्याला गुरूच्या हवाली केले.'' यानंतर परमानंदाने शिवाजीराजांच्या तल्लख बुद्धिमत्तेचे व त्यांच्या शिक्षणातील प्रगतीचे वर्णन केले आहे व पुढे शिवाजीराजांना १२ वे वर्ष लागल्यानंतर त्यांची पुण्यास रवानगी केली

असे म्हटले आहे.[७] शिवभारतातील या वर्णनावरून कर्नाटकात जाताना किंवा त्यानंतर लवकरच शहाजीराजांनी जिजाबाई व बाल शिवाजी यांना तिकडे नेले व शिवाजीराजे १२ वर्षांचे होईपर्यंत ते दोघेही तिकडेच होते असे दिसते. शिवाय शिवाजीराजांचे सुरूवातीचे शिक्षणही शहाजीराजांच्या देखरेखेखालीच झाले. ही गोष्टही स्पष्ट होते.

शिवाजीराजे १२ वर्षाचे झाल्यानंतर इ. स. १६४१–४२ मध्ये शहाजी राजांनी पुण्याच्या जहागिरीचा कारभार पाहण्यासाठी त्यांची पुण्यास रवानगी केली. शिवभारतात म्हटले आहे की, ''..... काही हत्ती, घोडे व पायदळ, पिढीजात व विश्वासू अमात्य, त्याचप्रमाणे विख्यात अध्यापक, बिरूदे, उंच ध्वज, विपुल द्रव्य व अद्वितीय कर्मे करणारे दुसरे परिजन यासमवेत त्या पुण्यशील पुत्रास शहाजीराजाने शुभदिनी पुणे प्रांती पाठविले.''[८]

शहाजीराजांनी यावेळी त्यांच्याबरोबर निवडक व विश्वासू अधिकारी दिले होते. परमानंदाने शिवभारतात त्यांची नावे सांगितली नाहीत. परंतु सभासद बखर व जेधे करीन्यात त्यांची नावे दिली आहेत. सभासदाने शामराव निळकंठ पेशवे, बाळकृष्णपंत दिक्षित मुजुमदार, सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ सबनीस यांना तर जेधे करीन्यात शामराजपंत पेशवे, माणकोजी दहातोंडे सरनौबत व बाळाजी हरि मजालसी यांना शिवाजी राजांबरोबर पुण्यास पाठविले असे म्हटले आहे. या दोन्हीही साधनात दिलेल्या अधिकाऱ्यांच्या नावात काही फरक असला तरी ही सर्वच मंडळी पुढील काळात महाराजांच्या स्वराज्यकार्यात सहभागी झाल्याचे दिसून येते.[९]

### २:२:३ जिजाबाई :

इ. स. १६४१–४२ मध्ये शिवाजीराजे जिजाबाईसह पुणे जहागिरीत आल्यानंतर पुढील काळात आपल्या पित्याचा सहवास त्यांना लाभला नाही. त्यामुळे शिवाजीराजांची इथून पुढील जडणघडण जिजाबाईंच्या तालमीतच झाली. याकाळात माता जिजाबाई याच शिवाजी राजांचे प्रेरणास्त्रोत होत्या. स्वराज्यस्थापनेच्या प्रारंभीच्या काळात जिचा आशिर्वाद व मार्गदर्शन घ्यावे अशी जिजाबाई ही एकच व्यक्ती शिवाजी राजांच्या आयुष्यात होती.[१०]

शिवाजीराजांना सुसंस्कारीत करण्याबरोबरच परकीय आक्रमणाचे खरे स्वरूप बालवयातच समजावून सांगण्याचे महत्त्वाचे कार्य जिजाबाईंनी केले. ज्याची आयुष्यभर चाकरी केली त्या निजामशहानेच भरदरबारात जिजाबाईंचे पिता लखुजी जाधवराव, बंधू अचलोजी व रघुजी व भाचा यशवंतराव यांचे खून केले. ही घटना घडली त्यावेळी जिजाबाई गरोदर होत्या. अशा अवस्थेतच वडीलांच्या खूनाचे मोठे दु:ख त्यांना सहन करावे लागले होते. इस्लामी सत्तांची चाकरी करणाऱ्या आपल्या पतीची दरबाराकडून केली जाणारी ससेहोलपट त्या आपल्या डोळ्यांनी पहात होत्या. या पार्श्वभूमीवर इस्लामी राजवटीचे खरे स्वरूप बालशिवाजीला समजावून देवून स्वातंत्र्याचे बीज त्याच्या मनात रूजविण्याचे मौलिक कार्य जिजाबाईंनी केले. याबरोबरच स्वराज्यस्थापनेच्या कठीण वाटचालीत त्या आपल्या पुत्राच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिल्या.

**२:२:४ पुण्याची जहागीर :**

शहाजीराजे इ. स. १६३६ मध्ये जेव्हा कर्नाटकात गेले, तेव्हा मागे महाराष्ट्रात आपल्या जहागिरीची व्यवस्था करण्याची जबाबदारी त्यांनी दादाजी कोंडदेव यांच्यावर सोपविली होती. दादाजी मलठणचे कुळकर्णी असून शहाजी राजांच्या खास विश्वासातील खाजगी नोकर होते. तत्कालीन कागदपत्रामध्ये दादाजींचा उल्लेख अनेकवेळा ''मसुरल हजरती राजश्री दादाजी कोंडदेऊ, सुभेदार नामजाद व कारकून, किले कोंढाणा व महालनिहाय'' असा केला गेला आहे. कोंढाण्याच्या परिसरात शहाजीराजाकडे मुकासा (जहागीर) म्हणून असलेल्या मुलखाचा कारभार पाहण्याकरीता शहाजीराजांनी स्वत:च्या वतीने सुभेदार म्हणून दादाजी कोंडदेवची नेमणूक केली होती. याचा अर्थ दादाजी आदिलशाहीतील सरकारी अधिकारी नव्हते. ते शहाजी राजांचे खाजगी नोकर होते. कोंढाणा किल्ल्यावर शहाजीराजांचा प्रतिनिधी म्हणून दादाजींचा अधिकार चालत होता.[११]

शहाजी राजांच्या पुणे जहागिरीत प्रामुख्याने पुणे परगणा, सुपे परगण्यातील बारामती तरफ, इंदापूर कसबा, शिरवळ परगणा व मावळ प्रांत यांचा समावेश होता. मावळ प्रांतातील सर्वच म्हणजे १२ मावळांचा समावेश या जहागिरीत नव्हता. रोहिडखोरे, नाणेमावळ व

पवनमावळ हे तीन मावळं या कालखंडात शहाजीराजांकडे मुकासा म्हणून नव्हती. या मावळांपैकी कर्यात मावळ हे शहाजीराजांनी पोटमुकासा म्हणून शिवाजीराजांकडे सोपविले होते.[१२]

### २:२:५ दादाजी कोंडदेव यांचे कार्य :

शहाजीराजांनी पुण्याच्या जहागिरीचा कारभार दादाजीकडे सोपविला होता. इ. स. १६३०–३२ याकाळातील भीषण दुष्काळ व नंतर इ. स. १६३४–३६ याकाळातील मोगली आक्रमण यामुळे हा प्रदेश भरडून निघाला होता. मैलोनमैल प्रदेश उजाड झाला होता. याकाळात शहाजीराजे सतत लढायात गुंतलेले असल्यामुळे जहागिरीकडे त्यांचे दुर्लक्ष झाले होते. परिणामी एकच बेबंदशाही तेथे माजली होती. अशा या जहागिरीला व्यवस्थित करण्याचे काम दादाजींनी केले. उजाड झालेला मुलूख लागवडीखाली आणण्यासाठी बाहेर गेलेल्या रयतेला माघारी आणून त्यांना कौल देवून, त्यांची वस्ती करण्याचे काम दादाजींने केले.[१३] जहागिरीत पुंडावे करणाऱ्या कृष्णाजी बांदलसारख्या पुंडाचा बंदोबस्त केला.[१४] पिण्याच्या पाण्यासाठी पुण्यापासून जवळच असलेल्या बाणेर या गावी पाट आणला.[१५] शिवापूर येथे पेठ वसविली. आंबराई लावली. अशा प्रकारे पुण्याची जहागीर समृद्ध करण्याबरोबरच शिवाजीराजांना राज्यकारभाराचे धडे देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दादाजींने केल्याचे दिसते.

### २:२:६ स्वराज्य स्थापनेची पूर्वतयारी :

इ. स. १६४१–४२ मध्ये पुणे जहागिरीत आल्यानंतर शिवाजी राजांनी प्रथम मावळ प्रांताकडे आपले लक्ष वळविले. सभासद म्हणतात, ''येताच बारा मावळे काबीज केली. मावळे देशमुख बांधून, दस्त करून, पुंड होते त्यास मारिले.'' वास्तविक पाहता हा मावळ प्रांत शहाजी राजांच्या जहागिरीतच मोडत होता. परंतु येथील देशमुख मंडळी बेगुमानपणे वागत असत. मावळ खोऱ्यातील ही देशमुख घराणी घरंदाज मराठ्यांची असून शेकडो वर्षांपासून आपली वतने सांभाळून होती. प्रचंड पाऊस, निबिड अरण्ये, डोंगराळ प्रदेश व दळणवळणाची अव्यवस्था यामुळे परकीय सत्ता या प्रदेशावर कायम वर्चस्व कधीच मिळवू शकल्या नाहीत. या खोऱ्यातील देशमुखांनी त्यांचे नामधारी वर्चस्व मान्य केले तरी ते खूष असत. त्यामुळे इथे

खरी सत्ता चाले ती त्या खोऱ्यातील देशमुखांची. आपले वतन सुरक्षित ठेवण्यासाठी ही देशमुख मंडळी स्वत:चे सैन्य ठेवीत व गढ्या बांधून रहात असत. गावच्या पाटलाकडून वसूल गोळा करावयाचा व त्याचा ठराविक भाग सरकारात भरला की, ते आपल्या वतनात पाहिजे तसे वागण्यास मोकळे असत. आपल्या वतनाचा विस्तार करण्यासाठी ते खून, मारामाऱ्या, छुपे हल्ले असे प्रकार करावयासही मागेपुढे पहात नसत.

अशा या देशमुखांना आपल्या वर्चस्वाखाली आणण्यासाठी शिवाजीराजांनी प्रयत्न सुरू केले. यावेळी रोहिड खोऱ्यातील भोर तरफेची देशमुखी जेधे घराण्याकडे, तर उत्रवळी तरफेची देशमुखी खोपडे घराण्याकडे होती.[१६] याशिवाय मोसे खोऱ्यात पासलकर देशमुख, हिरडस मावळात बांदल देशमुख, खेडेबारे येथे कोंडे देशमुख, गुंजणमावळ येथे सिलिंबकर, वेळवंड खोऱ्यात डोहर, कर्यात मावळात पायगुडे, मुठे खोरे येथे मारणे, पौंड खोरे येथे राऊतराव, कानदखोऱ्यात झुंजारराव मरळ देशमुख इत्यादी देशमुख घराणी मावळात नांदत होती.[१७]

मावळातील या देशमुखांना कधी गोडीगुलाबीने तर कधी दहशतीने शिवाजीराजांनी आपल्या वर्चस्वाखाली आणले. ज्यांनी विरोध केला त्यांना शस्त्रबळाने वठणीवर आणले गेले. ज्यांनी सहकार्य केले त्यांना अधिकाराच्या जागा देवून त्यांच्याकडून स्वराज्यसाधनेचे कार्य करवून घेतले. मावळातील देशमुखांप्रमाणेच येथील देशपांडे, देशकुळकर्णी, इत्यादी वतनदारांनीही हळूहळू राजांना मदत करण्यास सुरूवात केली. याहीपेक्षा सामान्य मावळ्यांचा शिवाजी राजांना मोठा उपयोग झाला. आपल्या जहागिरीतील अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करून महाराजांनी त्यांच्यात स्वराज्यप्रेम जागृत केले व परकीय आक्रमकाविरूद्ध लढण्याची जिद्द निर्माण केली. याच सामान्य मावळ्यामधून असामान्य योद्धे निर्माण झाले. अशा प्रकारे महाराजांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रीय समाज एकदिलाने स्वराज्यस्थापनेच्या कार्यात महाराजांना मदत करू लागला.

### २:२:७ खंडोजी व बाजी घोरपडे यांची स्वारी (इ. स. १६४४) :

कर्नाटक मोहिमेतील शहाजी राजांचा सहकारी रणदौलतखान इ. स. १६४३–४४ च्या दरम्यान मृत्यू पावल्यानंतर त्याच्या जागी मुस्ताफाखान या सेनानीची नियुक्ती झाली. परंतु लवकरच मुस्तफाखान व शहाजीराजे यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. आदिलशहाने सुरूवातीला सामोपचाराची भूमिका घेवून दोघांमधील संघर्ष मिटवण्याचा प्रयत्न केला. परंतु नंतर मात्र आदिलशहाने मुस्तफाखानाची बाजू घेवून तडजोड करावयास गेलेल्या शहाजीराजांच्या वकीलाचा हात तोडण्याचा आदेश दिला. त्यामुळे शहाजीराजांनी आदिलशाही नोकरीचा त्याग केला. आदिलशहाने पुणे परगण्याची जहागीर शहाजीराजांकडून काढून घेतली व तो मुलुख ताब्यात घेण्याकरीता खंडोजी व बाजी घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली फौज रवाना केली. या फौजेला सामील होण्याविषयी आदिलशहाने कान्होजी जेधे यांना पाठविलेले फर्मान उपलब्ध असून त्यावर १ ऑगस्ट १६४४ अशी तारीख आहे.[१८] याचा अर्थ ही स्वारी ऑगस्ट १६४४ च्या दरम्यान झाली असावी.

आदिलशहाने पुण्यावर पाठविलेल्या या मोहिमेविषयी माहिती देणारी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. परंतु शिवभारतामध्ये यासंबंधी एक उल्लेख आढळतो. परमानंदाने शिवाजी महाराजांच्या तोंडी, ''संतापलेल्या नागाप्रमाणे भयंकर घोरपडे मला गारूड्याला पाहून अत्यंत शांत झाले'' असे वाक्य घातले आहे.[१९] यावरून या स्वारीला शिवाजीराजांनी तोंड दिले व घोरपड्यांना माघार घेण्यास भाग पाडले असे दिसते. दरम्यान आदिलशहा व शहाजीराजे यांच्यातील भांडण संपुष्टात येवून इ. स. १६४६ च्या प्रारंभी शहाजीराजांना आदिलशाहीतील त्यांचे पूर्वीचे स्थान प्राप्त झाले होते.

## २:३ स्वराज्य स्थापना :

पुणे प्रांताच्या जहागिरीचा कारभार शिवाजी राजाकडे असला तरी या विभागातील किल्ले आदिलशाही अधिकाऱ्यांच्या ताब्यात होते. हे किल्ले जोपर्यंत ताब्यात येत नाही तोपर्यंत या प्रदेशात पूर्ण सत्ता प्रस्थापित होणे अवघड आहे हे शिवाजी राजांनी ओळखले.

परंतु किल्ले ताब्यात घेणे म्हणजे आदिलशाही सत्तेला आव्हान देण्यासारखे होते. शिवाजी राजांनी ते साहस करून स्वराज्याच्या संकल्पनेला आकार देण्यास प्रारंभ केला.

### २:३:१ राजगड आणि तोरणा काबीज :

गुंजणमावळमध्ये मुरूबंदेव हा किल्ला होता. निजामशाही व आदिलशाही राजवटीत या किल्ल्यावर शिबंदी ठेवलेली असे. गुंजणमावळ शहाजीराजांना मुकासा म्हणून मिळाल्यानंतर या किल्ल्याचाही ताबा त्यांच्याकडे आला. शिवाजी राजांनी हा किल्ला ताब्यात घेवून किल्ल्याला तीन माच्या बांधल्या आणि त्याचे नाव राजगड असे ठेवले.[२०] राजगडप्रमाणेच शिवाजी महाराजांनी कानद खोऱ्यातील तोरणा किल्ल्याचाही ताबा घेतला. कानद खोरे हे शहाजीराजांना मुकासा म्हणून मिळाले होते. या खोऱ्यातील तोरणा किल्ला ओसाड पडलेला होता.[२१] शिवाजीराजांनी त्याचा ताबा घेवून किल्ल्याची दुरूस्ती केली. तेथे काही इमारती बांधल्या. या किल्ल्याला महाराजांनी प्रचंडगड असे नाव दिले. राजगड व तोरणा हे किल्ले महाराजांनी कधी ताब्यात घेतले याविषयी निश्चितपणे सांगता येत नाही. मात्र हे दोन्हीही किल्ले महाराजांनी इ. स. १६४८ च्या फत्तेखानाच्या स्वारीपूर्वी घेतले. जेधे करीन्यात म्हटले आहे की, ''राजश्री स्वामींनी किले राजगड तोरणा या किलियास इमारतीचे काम लाविले. किले तयार करविले त्यावरी फत्तेखानाची फौज विजापूरीहून पुणे देशात आली.''[२२]

### २:३:२ कोंढाणा किल्ला ताब्यात :

शहाराजीराजांचा प्रतिनिधी या नात्याने दादाजी कोंडदेवाचा कोंढाणा किल्ल्यावर अधिकार चालत असे. मार्च १६४७ मध्ये दादाजींच्या मृत्यूनंतर आदिलशहाने कोंढाणा किल्ला व शिरवळ परगणा शहाजीराजांच्या जहागिरीतून काढून घेवून त्यावर मिया रहिम मुहम्मदाची नेमणूक केली.[२३] परंतु कोंढाणा किल्ला जास्त काळ त्याच्याकडे राहिला नाही. इ. स. १६४७–४८ च्या दरम्यान शिवाजीराजांनी हा किल्ला ताब्यात घेतला. शिवापूरकर देशपांडे शकावलीत नोंद आहे की, ''शके १५६९ राजश्री बापूजी पंतांनी किले सिव्हगड घेवून दिले..''[२४] बापूजीपंत म्हणजे खेडेबारे तप्याचे देशपांडे बापूजी मुदगल नऱ्हेकर हे होत. त्यांच्यामार्फत

राजकारण करून शिवाजी महाराजांनी हा किल्ला हस्तगत केला. अशा प्रकारे इ. स. १६४८ पर्यंत राजगड, तोरणा व कोंढाणा हे किल्ले महाराजांच्या ताब्यात आले होते. पुरंदर किल्ल्यावर महादजी निळकंठराव हा किल्लेदार होता. परंतु त्याच्यावर शहाजीराजांचा आणि त्यांचा प्रतिनिधी या नात्याने शिवाजीराजांचा अधिकार चालत होता.

### २:३:३ शहाजीराजांची कैद (२५ जुलै १६४८) :

इ. स. १६४८ मध्ये शिवाजीराजांच्या महाराष्ट्रातील हालचालीमुळे व मुस्तफाखानाने दरबाराकडे केलेल्या कागाळ्यामुळे राजगड, तोरणा व कोंढाणा हे किल्ले घेतल्यानंतर त्यांची बंडखोरी आदिलशाही दरबाराला असह्य झाली.[२५] शिवाजीराजांच्या या हालचालींना शहाजीराजांची फूस असावी असाही संशय आदिलशहाला वाटू लागला. याशिवाय इकडे कर्नाटकातील हिंदू राजामध्ये शहाजीराजांचा प्रभाव खूपच वाढला होता. आदिलशाहीशी बोलणी करण्याकरीता हे राजे शहाजीराजांची मध्यस्थी पसंत करीत असत.[२६] या दोन्हीही कारणांनी अस्वस्थ झालेल्या आदिलशहाने शहाजीराजांना कैद करण्याची मुस्तफाखानास आज्ञा केली. त्यानुसार २५ जुलै १६४८ रोजी मुस्तफाखानाने शहाजीराजांना कैद केले. त्यांच्याबरोबर कान्होजी जेधे व त्यांचे कारभारी दादाजी कृष्ण लोहकरे यांनाही कैद करण्यात आले.

### २:३:४ फत्तेखानाची स्वारी (१६४८) :

शहाजीराजांना कैद करताच मुस्तफाखानाने बंगळूर येथे असलेले शहाजीराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे यांच्याविरूद्ध तानाजी डुरे, विठ्ठल गोपाळ व फरादखान यांची रवानगी केली. त्याचवेळी आदिलशहानेही पुणे जहागिरीत असलेल्या शिवाजीराजांवर फत्तेखानास पाठविले. फत्तेखानाबरोबर मिनाद शेख, रतन शेख, दुसरा एक फत्तेखान, अश्रफशहा, मताजी घाटगे, बजाजी निंबाळकर, बाळाजी हैबतराव, मुसेखान इत्यादी सरदार होते.[२७]

फत्तेखानाच्या स्वारीची बातमी समजताच शिवाजी महाराजांनी प्रथम शिरवळची गढी ताब्यात घेतली. त्यानंतर पुरंदर किल्ल्यावर येवून त्यांनी सैन्याची जमवाजमवी सुरू केली.

यावेळी महाराजांचे सैन्य थोडेच असावे. परंतु मावळातील काही देशमुख आपापल्या जमावानिशी महाराजांना सामील झाले. कान्होजी जेध्यांचे पुत्र बाजी जेधे, हिरडस मावळचा देशमुख बाजी बांदल, गुंजणमावळचे देशमुख बापूजी हैबतराव, हाबाजी हैबतराव, बाळाजी नाईक सिलिंबकर, कानदखोऱ्याचा देशमुख बाबाजी झुंजारराव, मोसे खोऱ्यातील बाजी पासलकर, कावजी मल्हार इत्यादी मंडळी आपले जमाव (सैन्य) घेवून सामील झाल्याने सैन्य संख्या वाढली. यावेळी महाराजांजवळ ३ हजार सैन्याचा जमाव होता असा उल्लेख जेध्यांच्या एका करीन्यात आला आहे.[२८]

फत्तेखानाने पुरंदरच्या पूर्वेस १५ कि. मी. वर असलेल्या बेलसर या गावी तळ दिला व शिरवळची गढी घेण्याकरता बाळाजी हैबतरावला पाठविले. यावेळी शिरवळच्या गढीत असलेल्या महाराजांच्या सैन्याने कोणताही प्रतिकार न करता गढीतून माघार घेतली. त्यामुळे गढी बाळाजी हैबतरावाच्या ताब्यात गेली.[२९] ही गढी शत्रूच्या ताब्यातून सोडविण्यासाठी महाराजांनी सैन्य रवाना केले. या सैन्याचे नेतृत्व कावजीकडे (बहुधा कावजी कोंढाळकर असावा) सोपविले. (शिवभारतात त्याचा 'कावुक' असा उल्लेख केला आहे, परंतु त्याचे आडनाव दिलेले नाही.) कावजीच्या नेतृत्वाखाली गोदाजी जगताप, भीमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भीकाजी चोर, भैरव चोर, तुकाजी, सदाजी, इत्यादींनी शिरवळच्या गढीत असलेल्या बाळाजी हैबतरावावर हल्ला चढविला[३०] व शिरवळ काबीज केले. या युद्धात बाळाजी हैबतराव ठार झाला.

दरम्यान शिवाजीराजांनी बाजी पासलकर, कावजी मल्हार इत्यादींना फत्तेखानाच्या बेलसर येथील छावणीवर हल्ला करण्यासाठी रवाना केले. बेलसरवरील या स्वारी प्रसंगी महाराजांचे निष्ठावान सहकारी बाजी पासलकर ठार झाले. बाजीच्या मृत्यूचे महाराजांना अतिशय दु:ख झाले. या युद्धाचेवेळी कान्होजी जेधेंचे पुत्र बाजी याने मोठा पराक्रम गाजविला. लढाईच्या धुमश्चक्रीत संकटात सापडलेले मराठ्यांचे निशाण बाजीने मोठ्या शौर्याने सुरक्षित राखले व गडावर आणले.[३१]

कावजीने शिरवळ काबीज केल्यानंतर दुसऱ्या दिवशी फत्तेखान शिवाजी महाराज होते त्या पुरंदरवर चालून आला. डोंगर चढण्याचा प्रयत्न करीत असलेल्या फत्तेखानाच्या सैन्यावर कावजी व इतर सेनानायकांनी असा काही हल्ला चढविला की, फत्तेखानाच्या लष्कराची दाणादाण उडाली. या हल्ल्यात गोदाजी जगतापने मुसेखानास ठार केले.[३२] इतरही अनेकजण ठार झाले. मुसेखान पडताच आदिलशाही सैन्याचा धीर खचला आणि अशरफशहा, मताजी घाटगे, मिनाद शेख, रतन शेख असे सारेच माघारी पळत सुटले. फत्तेखान त्यांना रोखू शकला नाही. तोही पराभूत होवून परतला. महाराजांचा जय झाला.

पुरंदरचे युद्ध हे महाराजांच्या जीवनातील स्वराज्यरक्षणासाठी लढले गेलेले पहिले युद्ध होते. यावेळी महाराजांचे वय केवळ १९ वर्षाचे होते. या लहान वयात त्यांनी मिळविलेला विजय अभिमानास्पद होता. या युद्धानंतर मदत करणाऱ्या मावळातील देशमुखांना महाराजांनी बक्षिसे दिली. बाजी जेधेचा त्याच्या पराक्रमाबद्दल गौरव करून त्यास 'सर्जेराव' हा किताब बहाल केला.[३३] मोसे खोऱ्यातील देशमुखीविषयी पासलकर घराण्यात तंटा सुरू होता. हा वाद शिवाजीराजांनी सोडवावा अशी विनंती बाजी पासलकर यांनी युद्धावर जाण्यापूर्वी केली होती. परंतु बेलसरच्या मोहिमेत बाजी पासलकर ठार झाले. बाजीच्या मृत्युनंतर महाराजांनी त्यांचे लहान बंधू कृष्णाजी याला 'सवाई बाजी' असे नाव देवून देशमुखी वतन त्याच्याकडे सोपविले व मृत्युनंतर बाजीची इच्छा पूर्ण केली.[३४] युद्धात आपल्या जमावानिशी येवून पराक्रम गाजविणारे गुंजणमावळचे देशमुख बापूजी हैबतराव व त्यांचे दोन्ही बंधू हाबाजी हैबतराव व बाळाजी नाईक सिलिंबकर यांना चिंचले बुद्रुक हे गाव इनाम दिले. याप्रमाणेच हिरडस मावळचा देशमुख बाजी बांदल याला भाणसदरे हे गाव तर कानदखोऱ्याचा देशमुख बाबाजी झुंझारराव याला कोंढावले बुद्रुक हे गाव वंशपरंपरागत इनाम दिले.[३५]

### २:३:५ शहाजी राजांची सुटका :

शिवाजी महाराजांनी फत्तेखानाला पराभूत केले. दरम्यान बंगळूरवर चालून गेलेल्या आदिलशाही फौजेस शिवाजीराजांचे ज्येष्ठ बंधू संभाजीराजे यांनी मोठ्या शौर्याने तोंड देवून पराभूत केले होते. याचकाळात शिवाजीराजांनी दक्षिणेचा मोगल सुभेदार शहजादा मुरादबक्ष

याच्याकडे आपण व आपले वडील मुघलांच्या चाकरीत येण्यास तयार आहोत अशा स्वरूपाचा पत्रव्यवहार सुरू केला होता. महाराजांच्या या राजकारणाचाही आदिलशहावर काही अंशी परिणाम झाला. शेवटी आदिलशहाने सुज्ञपणे शहाजीराजांना क्षमा करून मुक्त करण्याचे ठरविले. त्यानुसार कर्नाटकातील बंगळूर व कदंर्पि ही ठिकाणे व महाराष्ट्रातील कोंढाणा किल्ला, शिरवळ परगणा व खेडेबारे तरफ हा मुलुख[३६] आदिलशहाला दिल्यानंतर १६ मे १६४९ रोजी शहाजीराजांची सुटका झाली. यावेळी पुरंदर किल्ला शिवाजीराजांकडे राहू देण्यास आदिलशहाने मान्यता दिली.[३७]

शहाजीराजांची सुटका झाली त्याचवेळी कान्होजी जेधे यांचीही कैदेतून मुक्तता करण्यात आली. सुटका होताच ते शहाजीराजांना भेटावयास गेले. यावेळी शहाजीराजांनी त्यांना मावळात राहून शिवाजीराजांना मदत करण्यास सांगितले. कान्होजींना मावळात पाठविण्यामागे शहाजीराजांचा नेमका कोणता हेतू होता हे जेधे शकावलीतील पुढील उताऱ्यावरून लक्षात येते. शहाजीराजे कान्होजींना म्हणतात, ''..... तुमचे वतन मावळात आहे. चिरंजीव राजश्री सिऊबा खेडेबारीयात व पुणा येथे आहेत. त्याजवळ तुम्ही जमावानिशी रहावे. तुमची जबरदस्त (ताकद) त्या प्रांते आहे. अवघे मावळचे देशमुख देखील त्यासी रूजू होवून त्यांचे आज्ञेत वर्तेत यैसा विचार करून जबरदस्तीने राहावे. येखादी मोगलाकडील फौज व ईदलशाहीकडील फौज आली तरी आपण ईमान राखा व त्यासी लढाई करावी.''[३८]

कान्होजींनी मावळात राहून सर्व देशमुखांचे संघटन करण्याच्या कामी शिवाजीराजांना मदत करावी व कदाचित परकीय आक्रमण झाल्यास त्याला समर्थपणे तोंड द्यावे या दूरदृष्टीने शहाजीराजांनी कान्होजींना शिवाजीराजाकडे जाण्यास सांगितले होते. शहाजीराजांच्या या दूरदृष्टी विचारांचा पुढील काळात शिवाजीराजांना निश्चितच उपयोग झाला. अफजलखान स्वारीप्रसंगी खानास सामील होण्याविषयी आदिलशाही फर्मान येवूनही कान्होजी ठामपणे महाराजांच्या पाठीशी उभे राहिल्याने मावळातील इतर देशमुख मंडळींनीही महाराजांना साथ दिली. त्यामुळे या संकटावर मात करणे शिवाजीराजांना शक्य झाले. यानंतर इ. स. १६५० ते ५४ याकाळात महाराजांनी आदिलशाही दरबाराविरूद्ध फारशा हालचाली केल्या नाहीत.

### २:३:६ पुरंदर किल्ला ताब्यात :

पुरंदर किल्ला शहाजीराजांच्या जहागिरीतील पुणे परगण्याच्या कऱ्हेपठार तरफेत होता. या किल्ल्यावर महादजी निळकंठराव हा किल्लेदार होता. त्याचे पूर्वज पुरंदरचे पिढीजात नाइकवाडी होते. पुरंदरची किल्लेदारी ही जरी महादजीची मिरास असली तरी मुकासदार या नात्याने शहाजीराजांचा आणि त्यांचा प्रतिनिधी या नात्याने शिवाजीराजांचा महादजीवर अधिकार चालत असे. हा महादजी मे १६५४ मध्ये मृत्यु पावल्यानंतर त्याच्या निळोपंत, शंकराजी, विसाजी व त्र्यंबक या चार पुत्रात किल्लेदारीवरून भांडणे सुरू झाली. त्याचा फायदा घेवून शिवाजीराजांनी किल्ला आपल्या ताब्यात घेतला व तेथे नेताजी पालकरांची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली.[३९] पुरंदर किल्ला नेमका कधी ताब्यात घेतला याविषयी निश्चितपणे सांगता येत नाही. मात्र महादजीच्या मे १६५४ मधील मृत्यूनंतर व मे १६५७ च्या पूर्वी हा किल्ला महाराजांच्या ताब्यात आला.

### २:३:७ जावळी मोहीम (इ. स. १६५६) :

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे स्वप्न बऱ्याच अंशी साकार करणारी घटना म्हणजे महाराजांचा जावळी विजय ही होय. जावळीचे राज्य हे महाराजांचे शेजारी राज्य होते. येथील चंद्रराव मोरे हे आदिलशाही सरदार होते. चंद्रराव हा मोऱ्यांचा किताब होता. ज्याला जावळीची जहागीर प्राप्त होई त्याला 'चंद्रराव' हा किताब मिळत असे. इ. स. १६४७–४८ च्या सुमारास जावळीचा दौलतराव चंद्रराव निपुत्रिक मरण पावला. त्यामुळे त्याची आई माणकाई हिने येसाजी[४०] यास दत्तक घेवून चंद्रराव पदावर बसविले. येसाजीची चंद्रराव पदावर स्थापना करण्यात शिवाजीराजांनी मदत केली होती. त्यामुळे त्याने आपल्या अंकित रहावे अशी शिवाजीराजांची अपेक्षा होती. परंतु येसाजी चंद्रराव शिवाजीराजांचे वर्चस्व मान्य करण्यास तयार नसल्यामुळे दोघांच्यात वितुष्ट निर्माण झाले. परिणामी शिवाजीराजांनी जावळीवर स्वारी करून ती काबीज केली.

प्रत्यक्ष जावळीवर स्वारी करण्यापूर्वी महाराजांनी प्रथम जावळी राज्यात समाविष्ट असलेले जोर खोरे ताब्यात घेतले. जेधे करीन्यात या स्वारीविषयी म्हटले आहे की, ''त्यावरी जाऊलीवरी मोहीम केली कान्होजी नाईक यास व अवघ्या देशमुखास जमावनसी बोलाविले त्यास जांबळीस मोरे होते जे जेध्यांनी (आधीच) पिटळून लाविले होते (त्यामुळे) जांबळीस मोरे कोण्ही नव्हते. जोरामध्ये हणमंतराव मोरे होते. त्यावरील राजश्री स्वामींनी (शिवाजी महाराज) रघुनाथ बल्हाळ सबनीस पुण्याहून स्वाराच्या जमावानीसी पाठविले. त्यांनी हणमंतराव यास मारून जोर घेतले. जाऊली मात्र राहिली होती.''

जेधे करीन्यात हणमंतराव मोरे यास रघुनाथ बल्लाळ सबनीस याने मारून जोर काबीज केले असे म्हटले आहे. परंतु सभासद बखरीत मात्र हणमंतरावास संभाजी कावजीने ठार केल्याचे सांगितले आहे. यानंतर १५ जानेवारी १६५६ रोजी महाराजांनी जावळीवर स्वारी केली. यावेळी त्यांच्या लष्कराबरोबरच जेधे, बांदल, सिलिंबकर व मावळातील इतर देशमुखांचे जमावही सामील झाले होते. महाराजांनी सैन्याचे दोन भाग करून एका तुकडीला रडतोंडी घाटाच्या मार्गाने पाठविले. तिला चंद्ररावाच्या सैन्याने रोखून धरले. दुसरी तुकडी घेवून स्वत: महाराज निसणीच्या घाटातून जावळीच्या खोऱ्यात उतरले. त्यांना कुठेही प्रतिकार झाला नाही. दुपारपर्यंत रडतोंडीच्या घाटातला प्रतिकारही संपला आणि महाराजांनी जावळीत प्रवेश केला.[४१]

चंद्ररावाने पळून जावून रायरीच्या किल्ल्यात आश्रय घेतला. परंतु त्याच्या लोकांनी महाराजांना प्रतिकार करणे चालूच ठेवले होते. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी महाराजांनी जावळी येथे दोन अडीच महिने मुक्काम केला. चंद्ररावाच्या लोकांचा प्रतिकार मोडून काढल्यानंतर ३० मार्च १६५६ रोजी जावळीहून निघून महाराज रायरीला पोहोचले. त्याअगोदरच सैन्याने रायरीला वेढा घातला होता. त्यानंतर लवकच चंद्रराव शरण आला. रायरीचा किल्ला महाराजांच्या ताब्यात आला. जेधे शकावलीत नोंद आहे की, ''शके १५७८ वैशाख मासी (१५ एप्रिल ते १४ मे १६५६) राजश्री सिवाजी राजे यांनी रायरी घेतली. समागमे कान्होजी जेधे, देशमुख तर्फ भोर, बांदल, सिलिंबकर देशमुख व मावळचा जमाव

होता. हैबतराऊ व बाळाजी नाईक सिलिंबकर यांनी मध्यस्थी करून चंदरराऊ किलियाखाली उतरले.'' सिलिंबकरांच्या मध्यस्थीने चंद्रराव शरण आला होता. चंद्ररावाला व त्याच्या कृष्णाजी व बाजी या मुलांना महाराजांनी कैदेत ठेवले. कैदेत असताना चंद्ररावाने पळून जाण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्याला व कृष्णाजीला ठार करण्यात आले. बाजी मात्र पळून जाण्यात यशस्वी झाला.

जावळी मोहीम ही शिवाजी महाराजांच्या आत्तापर्यंतच्या जीवनातील सर्वात मोठी व सर्वात फलदायी अशी मोहीम होती. या मोहिमेतील विजयामुळे महाराजांच्या पूवीच्या जहागिरी एवढाच मोठा प्रदेश त्यांना प्राप्त झाला. रायगड, प्रतापगड, चंद्रगड, मकरंदगड, सोनगड इत्यादी किल्ल्यांची प्राप्ती झाली. खजिन्यात भर पडली. सैन्यसंख्याही दुप्पटीने वाढली. त्यामुळे महाराजांच्या जहागिरीचे स्वरूप पालटून आता त्यास राज्याचे स्वरूप प्राप्त झाले. जावळी काबीज केली त्याच वर्षी २४ सप्टेंबर १६५६ रोजी महाराजांनी सुपे परगणा आपल्या ताब्यात घेतला. वास्तविक सुपे परगणा शहाजीराजांकडेच मुकासा म्हणून होता. त्याचा कारभार पाहण्याकरिता शहाजीराजांनी आपली द्वितीय पत्नी तुकाबाई यांचे बंधू संभाजी मोहिते यांना सरहवालदार म्हणून नेमले होते. हा परगणा ताब्यात घेवून महाराजांनी मोहिते मामांची रवानगी कर्नाटकात केली व सुप्याचा कारभार आपल्या माणसांकडे सोपविला.

## २:४ शिवरायांचे प्रारंभीचे सहकारी :

छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्यस्थापनेच्या प्रारंभीच्या काळात मावळातील देशमुख व त्यांच्या सैन्याची खूपच मदत झाल्याचे दिसते. या मंडळींना आपलेसे करण्यासाठी महाराजांना रोहिड खोऱ्याच्या भोर तरफेचे देशमुख कान्होजी जेधे यांचे सहकार्य लाभले. कान्होजी जेधे हे शहाजी राजांच्या सेवेत होते. मावळातील ते एक मातब्बर देशमुख होते. त्यांनी मावळातील देशमुखांचा व रयतेचा विश्वास संपादन करून त्यांचे नेतृत्व मिळविलेले होते. त्यामुळे मावळातील अनेकजण कान्होजींबरोबरच महाराजांच्या कार्यात सहभागी झाले. कान्होजी जेधे यांच्याप्रमाणेच बाजी सर्जेराव जेधे, बाजी पासलकर, बापूजी मुदगल, बाजी बांदल, बाजीप्रभू देशपांडे, येसाजी कंक, तानाजी मालूसरे व सुर्याजी मालूसरे, कावजी

कोंढाळकर, कावजी मल्हार, दादाजी नरसप्रभू, नारो बापूजी, बाळाजी बापूजी, चिमणाजी बापूजी, जिवा महाले, संभाजी कावजी, हैबतराव सिलिंबकर, बाबाजी झुंजारराव मरळ देशमुख, इत्यादी मंडळींचे बहुमोल सहकार्य महाराजांना मिळाले.

शहाजीराजांनी महाराजांबरोबर पाठविलेले सामराजपंत मतिमंत पेशवे, सोनोपंत डबीर, रघुनाथ बल्लाळ, माणकोजी दहातोंडे, बाळकृष्णपंत दिक्षित, बाळाजी हरी मजालसी, नूर बेग इत्यादी मंडळींचीही स्वराज्यस्थापनेच्या कार्यात महाराजांना मदत झाली. याशिवाय मावळ खोऱ्यातील काटक, चलाख व निष्ठावंत मावळे हेच राजांच्या लष्करातील पायदळाचे व घोडदळाचे आधारस्तंभ बनले. नेताजी पालकर, सुर्यराव काकडे, वाघोजी तुपे, गोदाजी जगताप, भीमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर, भैरव चोर, सिदोजी पवार, हिराजी इंगळे, तुकाजी पोळ, सदाजी घाटगे, रामाजी पांगारे, तुकोजी चोर, काताजी इंगळे, कोंडाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सुरजी कांटके, विसाजी मुरूंबक, संभाजी करवर, इब्राईम सिद्दी, इत्यादी सामान्य मावळ्यातील सेनानींनी प्रारंभीच्या युद्धप्रसंगात महाराजांना मोलाची साथ दिली. छत्रपती शिवाजी महाराजांना मोलाची साथ देणाऱ्या या अनेक सहकाऱ्यांपैकी काही उल्लेखनीय सहकाऱ्यांच्या कार्याचा परामर्श येथे घेण्यात आलेला आहे.

**२:४:१ कान्होजी जेधे :**

शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात मावळातील ज्या देशमुखांचा सक्रिय सहभाग होता, त्यात कारी (ता. भोर, जि. पुणे) येथील जेधे देशमुखांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. कान्होजी जेधे आणि त्यांचे पुत्र बाजी तथा सर्जेराव जेधे हे शिवकाळातील जेधे घराण्यातील दोन कर्ते पुरुष होते. या दोघांनीही स्वराज्य निर्मितीच्या प्रारंभीच्या काळात शिवरायांना मौलिक मदत केली.

जेधे घराण्यातील खेळोजी आणि बाजी नाईक यांनी प्रामाणिकपणे केलेल्या सेवेबद्दल खूष होवून बिदरच्या पातशहाने त्यांना कारीचे वतन बहाल केले होते. या घराण्यातील कान्होजी यांनी आपल्या पराक्रमाने वतनी गावांची संख्या वीसवर आणली. कान्होजींना सात पुत्र होते. त्यातील सर्वात लहान पुत्र नाईकजी नाईक यांचे पुत्र कान्होजी हेच शिवकाळातील

इतिहासप्रसिद्ध कान्होजी जेधे हे होत. कान्होजींच्या आजोबांनी आपले पुत्र नाईकजी नाईक यांना आपले वारसदार करून देशमुखी वतन त्यांच्या हवाली केले. त्यांच्या खूनानंतर कान्होजी जेधे कारीचे देशमुख बनले.[४२] त्यांनी स्वपराक्रमाने मावळच्या देशमुखांचा आणि लोकांचा विश्वास संपादन करून त्यांचे नेतृत्व मिळविले.

रोहिड खोऱ्याच्या भोर आणि उत्रवळी अशा दोन तर्फा होत्या. त्यातील भोर तर्फेत २२ गावे असून तिची देशमुखी कान्होजी जेधे यांच्याकडे होती.[४३] कान्होजी प्रारंभी निजामशाहीत चाकरीत होते. १६२६ मध्ये मलिक अंबरच्या मृत्युनंतर जवळजवळ सारा मावळ प्रांत आदिलशाहीच्या अधिपत्याखाली आला. दरम्यानच्या काळात शहाजीराजे काही काळ आदिलशाहीत रूजू झाले होते. त्यावेळी आदिलशाही सेनापती रनदौलतखान याने कान्होजीचा शहाजीराजांना परिचय करून दिला. पुढे इ. स. १६३६ मध्ये निजामशाहीच्या नाशानंतर शहाजीराजे कायमचे आदिलशाहीत नोकरीत आले. तेव्हा त्यांनी कान्होजीस आपणाकडे मागून घेतले. इ. स. १६४८ मध्ये आदिलशहाने जेव्हा शहाजीराजांना अटक केली तेव्हा कान्होजी जेध्यांनाही अटक झाली. पुढे आदिलशहाने शहाजीराजांची मुक्तता करून बंगळूरास त्यांची रवानगी केली. याचवेळी कान्होजींचीही सुटका झाली. शहाजी राजांनी कान्होजींना मावळात परत जावून शिवाजीराजांना मदत करण्याविषयी वचन घेतले आणि त्यांना व त्यांचे कारभारी दादाजी कृष्ण लोहकरे यांना शिवाजीराजाकडे पाठवून दिले.[४४]

कान्होजी जेधे शहाजीराजांचा निरोप घेवून मावळात येतात, तोच २५ जून १६४९ रोजी वाईचा सुभेदार अफजलखानाचे पत्र त्यांना आले. अफजलखानाने जावळीवर स्वारी करण्याचे नियोजित केले होते. या स्वारीत कान्होजींनी सैन्यासह सामील व्हावे असा आदेश त्याने या पत्राद्वारे दिला होता. परंतु कान्होजींनी काहीच हालचाल न करता चालढकल सुरू केली. आपल्याला २०० लोकांची नायकी द्यावी किंवा जोहर खोरे मुकासा म्हणून द्यावे अशी नवीनच मागणी त्यांनी पुढे केली. अफजलखानाने ती मागणी मान्य करून जोहर खोऱ्याची सनद कान्होजीकडे पाठवून दिली. तरीही कान्होजी जागचे हालले नाहीत. या काळात त्यांचा शिवाजीराजांशीही पत्रव्यवहार सुरू होता.[४५] नुकतेच शहाजीराजांना वचन देवून आलेल्या

कान्होजींनी अफजलखानाच्या या नियोजित स्वारीत सहभागी होण्याचे जाणीवपूर्वक टाळले. पुढे ही स्वारीच स्थगित झाली.

कान्होजी जेध्यांनी येथून पुढील काळात शिवाजी महाराजांना सर्वोतोपरी सहाय्य केले. जेध्यांसारखे मातब्बर देशमुख महाराजांना सामील झाल्यामुळे मावळातील इतर मंडळीही महाराजांकडे हळूहळू रूजू होवू लागली. इ. स. १६५६ मध्ये महाराजांनी केलेल्या जावळीवरील स्वारीत कान्होजी आपल्या सैन्यासह सामील झाले होते.[४६] परंतु कान्होजींचा खरा कस लागला तो अफजलखान स्वारीच्या वेळी. कान्होजी आदिलशहाच्या सेवेत होते. आदिलशहाने शिवाजीराजांच्या बंदोबस्तासाठी अफजलखानास मदत करण्याचे फर्मान जारी केले. ते १६ जून १६५९ रोजी कान्होंजींना मिळाले.[४७]

कान्होजींच्या जीवनातील हा सत्वपरीक्षेचा प्रसंग होता. कान्होजींनी शिवाजीराजांशी 'इमाने वर्तु' अशी शपथ शहाजीराजांसमोर घेतली होती. तर इकडे खानाच्या मदतीला न गेल्यास वतन जाण्याचा धोका निर्माण झाला होता. शेवटी कान्होजी आपल्या ५ पुत्रासह रायगडी शिवाजी महाराजांकडे आले व बादशहाकडून आलेला फर्मानाचा कागद दाखविला. महाराजांनी तो पाहिला व म्हटले, ''तुमचे सेजारी केदारजी व खंडोजी खोपडे देशमुख ता उत्रोली हे अफजलखानाकडे गेले. तुम्ही पातशहाई हुकूम मोडून राहिले म्हणजे वतनास अपाये होईल. जिवावरी गोष्ट येवून संकट पडले याकरिता तुम्हीही जाणे.'' पण निष्ठावान कान्होजी उद्‌गारले, ''महाराजांनी (शहाजीराजांनी) आपली क्रिया (शपथ) घेवून तुमचे हाती दिली तेच क्रिया व इनाम आपला (माझा) शाबूत आहे. वतन साहेबांच्या (शिवाजी महाराजांच्या) पायावरी ठेविले. आपण व आपले लेक साहेबापुढे खस्त होवून (मरून जाऊ). तेव्हा जे होणे ते होईल. कान्होजी नाईक ऐसे बोलून शफत केली. त्यावरी राजश्री स्वामी बोलिले की, 'हातावरी पाणी घेवून वतनास घालणे.' कान्होजींनी खरोखरच हातावर पाणी घेवून वतनावर सोडले.''[४८] कान्होजींच्या निर्धाराची परीक्षा महाराजांनी पुरेपूर घेतली. कान्होजीही कसोटीस पूर्ण उतरले.

कान्होजींना विश्वासात घेतल्यावर महाराजांनी त्यांच्यावर एक महत्त्वाची कामगिरी सोपविली. मावळातील सर्वच वतनदार देशमुखांना आदिलशाही फर्माने आली होती. अशा वेळी त्या सर्वांच्या मनात काय आहे याचा शोध घेण्याची व त्यांना स्वराज्याच्या झेंड्याखाली एकत्र आणण्याची अवघड कामगिरी महाराजांनी कान्होजींना सांगितली. त्यानुसार कान्होजींनी मावळ खोऱ्यातील देशमुख मंडळींना एकत्र जमवून आपला विचार सर्वांना सांगितला. 'आम्ही राजश्री स्वामीच्या पायाशी इनाम धरून वतनास देखील पाणी सोडिले. आम्ही व आपले लेक देखील राजश्री स्वामी पुढे खस्त होते. यैसा आमचा दृढ विश्वास आहे. तुमचा मुदा काये तो बोलणे. मुसलमान बेईमान आहे. कार्य जालियावरी नस्ते निमित्य ठेवून नाश करील. हे मऱ्हाष्ट राज्य आहे. अवघियानी हिंमत धरून जमाव घेवून राजश्री स्वामी संनिध राहोन येकनिष्ठेने शेवा करावी.' कान्होजींचे हे हिमतीचे बोलणे ऐकल्यानंतर मावळातील बांदल, सिलिंबकर, ढमाले, मरळ, डोहार इत्यादी अनेक देशमुखांनी महाराजांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला.[४९] अशा प्रकारे कान्होजीच्या प्रयत्नामुळे मावळातील वतनदार महाराजांना सामील झाले.

अफजलखान वधानंतर इशारा मिळताच कान्होजी जेधे मावळच्या देशमुखांसमवेत खानाच्या पार मुक्कामी असलेल्या सैन्यावर तुटून पडले. या युद्धात कान्होजींनी केलेल्या सेवेबद्दल शिवाजी महाराजांनी त्यांना मानाचे प्रथम पान देण्याचा बहुमान दिला. फितुर खंडोजी खोपडे या युद्धात मराठ्यांच्या ताब्यात सापडला. आपला जीव वाचविण्यासाठी खंडोजीने आपला जावई हैबतराव सिलिंबकर यांना गळ घातली. सिलिंबकरांनी मातब्बर कान्होजींना याबाबतीत विनंती केली. कान्होजींनी खोपड्याविषयी महाराजांकडे रदबदली केली. महाराज खोपड्यांना अभय देण्यास तयार नव्हते. परंतु कान्होजींनी कसेही करून त्यास अभय द्याच. अशी गळ महाराजांना घातली. निष्ठावंत व वयोवृद्ध कान्होजींची भीड महाराजांना मोडवली नाही. काहीशा अनिच्छेनेच महाराजांनी खंडोजीला अभय दिले. परंतु खंडोजीवरील महाराजांचा राग शांत झाला नाही. एक दिवस खंडोजीला समोर पाहताच महाराजांचा राग अनावर होवून राजांनी खंडोजीचा डावा पाय व उजवा हात कापण्याची आज्ञा

केली. या घटनेमुळे कान्होजी नाराज झाले. कान्होजींनी राजांना यासंबंधी विचारले तेव्हा राजे म्हणाले की, ''तुम्ही भीड घातली म्हणून त्याला जीवे मारले नाही आणि त्याचे वतनही जप्त केले नाही.''[५०] एकूणच या प्रकरणात महाराजांनी स्वराज्यनिष्ठ जेधे व सिलिंबकर यांच्या शब्दाचा मान तर राखला त्याबरोबरच आपल्या न्यायनिष्ठूर या प्रतिमेलाही तडे पडू दिले नाहीत.

सप्टेंबर १६६० मध्ये कान्होजी जेधे आजारी पडले. आपण या आजारातून वाचणार नाही असे त्यांना वाटू लागले. याचवेळी शिवाजी महाराजांना पत्र पाठवून आपली सहा मुले व वतन तुमच्या पायापाशी आहे त्याचा सांभाळ करणे अशी विनंती कान्होजींनी केलेली दिसते. महाराजांनी २ सप्टेंबर १६६० रोजी कान्होजींना पाठविलेल्या पत्रात त्यांना 'तुमचा आमचा पहिल्यापासूनच घरोबा आहे; सांभाळ करू' असे अश्वस्त केले व तब्येतीची काळजी घ्या. ईश्वरकृपेने बरेच होईल असा धीरही दिला.[५१] परंतु यानंतर लवकरच कान्होजींचा मृत्यु झाला असावा. २५ ऑक्टोबर १६६१ रोजी बाजी सर्जेराव याने आपला भाऊ शिवबा जेधे याला पाठविलेल्या पत्रात कान्होजीचा मृत्यु झाल्याचा उल्लेख सापडतो.[५२] मृत्युपूर्वी ४ सप्टेंबर १६६० रोजी कान्होजींनी भोर तरफेच्या देशमुखीची वाटणी केलेली दिसते. या वाटणीचा महजर करताना कान्होजी उपस्थित असल्याचे दिसतात.[५३] कान्होजींना ४ पत्नी व सहा मुले होती. कान्होजींची प्रथम पत्नी सावित्रीबाई पासून बाजी (सर्जाराव), येसूबाई नावाच्या पत्नीपासून संभाजी तर कृष्णाबाई या भोगपत्नीपासून शिवाजी, सुभानजी (चांदजी), नाईकजी व रायाजी ही चार मुले होती.[५४] कान्होजींची ही मुलेही स्वराज्य कार्यात महाराजांना सहाय्य करताना दिसतात.

### २:४:२ बाजी तथा सर्जाराव जेधे :

कान्होजी जेध्यांप्रमाणेच त्यांचे पुत्र बाजी तथा सर्जाराव जेधे यांनीही स्वराज्यकार्यात शिवाजी महाराजांना मोलाची साथ दिल्याचे दिसते. कान्होजींची प्रथम पत्नी सावित्रीबाई ही मावळातील मातब्बर देशमुख बाजी पासलकरांची कन्या होय. तिच्याच पोटी इ. स. १६२८ मध्ये बाजीचा जन्म झाला.[५५] स्वराज्य उभारणीच्या अगदी सुरूवातीच्या काळात वडीलांप्रमाणे

बाजीनेही भाग घेतलेला दिसतो. इ.स. १६४८ च्या फत्तेखानाच्या स्वारीत बाजीने अतुल पराक्रम दाखविला. यावेळी कान्होजी जेधे शहाजीराजाबरोबर आदिलशहाच्या कैदेत होते. फत्तेखानाच्या स्वारीत बाजीने केलेल्या पराक्रमाचे वर्णन जेधे करिन्यात पुढीलप्रमाणे केले आहे.

''फत्तेखानाची फौज विजापूरीहून पुणे देशात आली ..... ते समई लोकांची निवड करून बरोबर स्वार व निशाण देवून मावळचे लोक जुंझत जुंझत बेलसर पावेतो आले. युद्धाची शर्त करून बेलसरी खस्त (ठार) झाले. स्वार जागा जागा फुटोन पळोन गेले. निशाणाबरोबर चाळीस पन्नास स्वार राहिले. ते समई कान्होजी नाईक यांचे पुत्र बाजी नाईक जेधे बापास न पुसता घोडियावरी बैसोन स्वाराबरोबर गेले होते. तेव्हा गनिमाने निशाणावरी बहुत दाटी केली. तेव्हा बाजी नाईक जेधे यांनी (उलट) फिरोन गनिमांच्या स्वारांसी युद्ध केले. गनिमांचे पाच सात स्वार ठार केले. गनिमाची फौज थोपून (थोपवून) निघाले. तो ज्या फर्जदाजवळ निशाण होते तो घोड्याखाले आला. त्यास (आपल्या घोड्यावर) बैसवून निशाणाचा भाला आपल्याजवळ घेऊन पुरंधरास आले.''

बाजीने युद्धाच्या ऐन धुमश्चक्रीत मराठ्यांचे निशाण सुरक्षितपणे माघारी आणले. त्यांच्या या पराक्रमाबद्दल खुष होवून महाराजांनी त्यांना 'सर्जाराई' (सर्जाराव) असा किताब, वस्त्रे व तेजी आणि तुर्की या जातीचे दोन घोडे देवून सन्मान केला. यानंतर महाराजांनी त्यांना आपल्याजवळ ठेवून घेतले.[५६] कान्होजींचे हे पुत्र बाजी या नावापेक्षा पुढील काळात 'सर्जाराव' या नावानेच विशेष ओळखले जावू लागले. अफजलखान वधाच्या वेळी बाजी सर्जाराव महाराजांबरोबर होते. शाहिस्तेखानावरील छाप्याच्या वेळी बाहेर ठेवलेल्या सैन्यात बाजी होते. आदिलशाही सरदार खवासखानाबरोबर इ. स. १६६४ मध्ये झालेल्या युद्धात बाजीने पराक्रम गाजविल्याचे जेधे शकावलीत म्हटले आहे. कान्होजींच्या मृत्युनंतर बाजी देशमुखीचा कारभार करू लागले. कान्होजीच्या मृत्युनंतर जेधे घराण्यात गृहकलहाला सुरूवात झाली. परंतु बाजीने शेवटपर्यंत आपल्या वडीलांच्या इच्छेप्रमाणे शिवाजी महाराजांना

सहकार्य केले. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर छत्रपती संभाजी व छत्रपती राजाराम महाराजांच्या काळातही बाजींनी स्वराज्यकार्याला मोलाचे सहकार्य केलेले दिसते.[५७]

बाजी सर्जाराव प्रमाणेच या घराण्यातील इतर अनेक पुरुषांनी पुढील काळात स्वराज्य सेवा केलेली दिसते. बाजीचे सावत्र बंधू चांदजी शाहिस्तेखानाच्या छाप्याच्या प्रसंगी शिवाजीराजांबरोबर होते. तसेच बाजींचे पुत्र नागोजी यांनी कर्नाटक मोहिमेच्या वेळी हुसेनखान मियाणा याच्याबरोबर झालेल्या युद्धात मोठाच पराक्रम गाजविला. या युद्धात नागोजी ठार झाला.[५८] अशा प्रकारे अगदी प्रारंभीच्या काळात स्वराज्यकार्यात सहभागी झालेले हे जेधे घराणे मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळातही स्वराज्याची निष्ठेने सेवा करताना दिसते.

### २:४:३ सुर्यराव काकडे :

सुर्यराव काकडे हे स्वराज्य स्थापनेच्या सुरूवातीच्या काळात स्वराज्यकार्यात सहभागी झालेले महाराजांचे शूर सहकारी होते. त्यांच्या घराण्याविषयी कागदापत्राअभावी निश्चितपणे काही सांगता येत नसले तरी 'शिवभारत', 'सभासद बखर', 'मोऱ्यांची बखर' इत्यादी ऐतिहासिक साधनात त्यांच्या पराक्रमाचे उल्लेख सापडतात.

सुर्यराव काकडे हे कान्होजी जेधे यांचे नातलग होते.[५९] त्यामुळे जेध्यांप्रमाणेच तेही स्वराज्यकार्यात सामील झाले. इ. स. १६५५-५६ च्या जावळीवरील मोहिमेच्या वेळी महाराजांनी दोन हजार पायदळासह त्यांना जावळीवर पाठविले. त्यांनी महबळेश्वरचा निसणीचा घाट उतरून जावळीस वेढा घातला.[६०] पुढे महाराजांनी हल्ला करून जावळी घेतली. यावेळी सुर्यराव काकडे यांनी मोठा पराक्रम गाजविला होता. पुढे अफजलखानाच्या भेटीस जाताना शिवाजी महाराजांनी जे १० योद्धे आपल्याबरोबर घेतले, त्यात त्यांनाही घेतले होते. अफजलखान वधानंतर त्याच्याबरोबरच्या इतरांना ठार करण्याचे काम महाराजांच्या या सहकाऱ्यांनी केले. पुढील काळात सुर्यराव काकडे महाराजांच्या लष्करात पंचहजारी सरदार बनले. इ. स. १६७२ च्या साल्हेरीच्या युद्धात त्यांनी मोठाच पराक्रम गाजविला. याच युद्धात तोफेचा गोळा लागून त्यांचा मृत्यु झाला. त्यांच्या पराक्रमाचे वर्णन करताना सभासदाने म्हटले आहे की, '' सुर्यराव काकडे पंचहजारी मोठा लष्करी धारकरी, याने युद्ध थोर केले. ते समयी

जांबुरियाचा गोळा लागून पडला. सुर्यराव म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारती (महाभारतात) जैसा कर्ण योद्धा. त्याच प्रतिभेचा असा शूर पडला.''

**२:४:४ बाजी पासलकर :**

आपल्या स्वराज्यस्थापनेच्या ध्येयपूर्तीसाठी शिवाजी महाराजांनी जी मित्रमंडळी अगदी सुरूवातीला जमविली त्यात मोसे खोऱ्याचे देशमुख बाजी पासलकर हे एक होत. बाजी पासलकर हे कान्होजी जेधे यांचे सासरे होय. बाजींची सावित्रीबाई ही मुलगी कान्होजींची पत्नी होती. जेध्यांप्रमाणेच बाजी पासलकरही स्वराज्यकार्यात सामील झाले होते. बाजी शिवाजीराजांपेक्षा वयाने बरेच मोठे होते. बाजी यशवंतराव साठीमध्ये महाराजांजवळ सेवा करीत होते असा उल्लेख प्रभू घराण्याच्या एका करीन्यामध्ये केलेला आहे. 'यशवंतराव' हा पासलकर देशमुखांचा किताब होता. मोसे खोऱ्याची देशमुखी पासलकर घराण्यात होती आणि त्याचे पिढीजात कारभारीपण एका प्रभू घराण्याकडे होते. त्या प्रभू घराण्याचा उत्तरकाळात लिहिलेला एक करीना उपलब्ध आहे. या करीन्यावरून बाजी पासलकरांविषयी माहिती मिळते.[६१] पासलकर घराण्यात देशमुखीवरून तंटा सुरू होता. यावेळी बाळाजी यशवंतराव हा देशमुखीचा कारभार करत होता. त्याच्याशी बाजीचा वाद सुरू होता. हा वाद शिवाजीराजांनी सोडवावा अशी विनंती बाजींनी केली होती. एवढ्यात बेलसरची मोहिम (इ. स. १६४८ ची फत्तेखानाची स्वारी) सुरू झाली. शिवाजी राजांनी बाजींना या मोहिमेवर जाण्याचा आदेश दिला व मोहिम फत्ते करून आल्यानंतर तुमचे देशमुखीची वतन बाळाजीपासून घेवून तुम्हाला दिले जाईल असे आश्वासन दिले. पासलकरांचे कारभारी कावजी मल्हार यांनाही बाजींबरोबर जाण्याचा आदेश दिला. बाजी पासलकर बेलसरच्या स्वारीस गेले परंतु या युद्धातच ते ठार झाले. बाजींच्या मृत्युनंतर महाराजांनी त्यांचे लहान बंधू कृष्णाजी याला सवाई बाजी असे नाव ठेवून देशमुखीचा शिक्का बाळाजीकडून काढून घेवून त्याच्याकडे सोपविला.[६२] अशा प्रकारे बाजी पासलकरांची इच्छा महाराजांनी त्यांच्या मृत्युनंतर पूर्ण करून बाजींना दिलेले आश्वासन पूर्ण केले.

### २:४:५ नरसप्रभू व दादाजी नरसप्रभू गुप्ते :

रोहिड खोऱ्याचे देशपांडे (देसकुळकर्णी) नरसप्रभू व त्यांचे पुत्र दादाजी नरसप्रभू हे दोघेही प्रारंभीच्या काळापासून शिवाजी महाराजांचे अनुयायी होते. कान्होजी जेधे रोहिड खोऱ्याचे देशमुख होते व याच खोऱ्याचे देशपांडेपण नरसप्रभू गुप्ते यांच्याकडे होते.[६३] कान्होजी जेध्यांप्रमाणेच नरसप्रभू गुप्ते हे प्रारंभापासून शहाजी राजांना सामील होते. ते शहाजी राजांचे कारभारी होते. नरसप्रभूंना मुलगा नसल्यामुळे त्यांनी दादाजीला दत्तक घेतले होते. नरसप्रभूच्या हयातीतच दादाजी नरसप्रभू वतनाचे काम पाहू लागले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यात दादाजी नरसप्रभू उघडपणे सामील झाले. रोहिड खोऱ्यात जमा झालेला सरकारी वसूल दरवर्षी शिरवळ ठाण्यात जमा करण्याचे काम यापूर्वी त्यांना करावे लागे. परंतु शिवाजी महाराजांनी स्वराज्यकार्याला सुरूवात करताच त्यात सहभागी होवून दादाजी नरसप्रभूंनी सरकारी वसूलाचा भरणा विजापूरकरांकडे न करता निर्भयपणे महाराजांकडे करण्यास सुरूवात केली.[६४]

### २:४:६ दादाजी कृष्ण लोहकरे :

दादाजी कृष्ण लोहकरे हे कान्होजी जेधे यांचे कारभारी होते. तसेच भोरचे कुळकर्णी होते. कान्होजी जेधे शहाजीराजांबरोबर कर्नाटकात असताना दादाजीही त्यांच्याबरोबर होते. इ. स. १६४८ मध्ये आदिलशहाने शहाजीराजांना कैद केले. त्यावेळी कान्होजी जेधे व दादाजी कृष्ण यांनाही पकडून कनकगिरी येथे अटकेत ठेवले. शहाजीराजांबरोबरच त्यांची सुटका झाली. सुटकेनंतर कान्होजी व दादाजींना शहाजीराजांनी शिवाजीराजांकडे महाराष्ट्रात पाठविले. पुढे इ. स. १६५७ मध्ये महाराजांनी आदिलशहाच्या ताब्यातील कल्याण व भिवंडी ही नगरे जिंकली. तेव्हा महाराजांनी दादाजी कृष्ण यांच्याकडे कल्याणचा तर त्यांचे बंधू सखो कृष्ण यांच्याकडे भिवंडीचा कारभार सोपविला व त्या दोघांचीही हवालदार पदी नियुक्ती केली. पुढे पोर्तुगीजांबरोबर झालेल्या युद्धात सखो कृष्ण ठार झाले.[६५]

### २:४:७ बाजी व दिपाई बांदल :

हिरडस मावळची देशमुखी असलेल्या बांदल घराण्यानेही प्रारंभीच्या काळात शिवाजी महाराजांना सहकार्य केले. या घराण्यातील कृष्णाजी बांदलने मात्र सुरूवातीला दादाजी कोंडदेवना विरोध केल्याचे दिसते. कृष्णाजी बांदल हा मलिक अंबरच्या काळापासून मावळ प्रांतात पुंडावा करीत होता. तो बारा मावळामध्ये जबरदस्तीने वसुली करत असे. हिरडस मावळ रोहिड खोऱ्याच्या भोर तरफेला लागून असल्यामुळे भोर तर्फेचे देशमुख कान्होजी जेधे व कृष्णाजी बांदल यांच्यात तंटा आणि काही वेळा झटापटीही झाल्या होत्या.[६६] शहाजी राजांनी कान्होजी जेधे यांना आपल्या बाजूला वळविल्यामुळे मावळातील इतरही देशमुख मंडळी हळूहळू महाराजांकडे रूजू होवू लागली. परंतु कृष्णाजी बांदल महाराजांना मानावयास तयार नव्हता. तेव्हा दादाजी कोंडदेवांनी याबाबतीत शहाजी राजांचा सल्ला घेतला. शहाजी राजांनी हुकूम पाठविला की, 'हातात येईल असे करावे.' दादाजी हे कृष्णाजीवर हिरडस मावळात चालून गेले. पण या मोहिमेत त्यांना पराभव पत्करावा लागला. कृष्णाजीने दादाजीचे स्वार पिटून काढले. त्यांच्या घोड्याच्या दांड्या (शेपूट) तोडून त्यांना पिटाळून लावले. मग दादाजीनी शपथपूर्वक बेलभंडार पाठवून कृष्णाजीला भेटीला बोलाविले व तो भेटीला आल्यावर कोंढाणा किल्ल्यावर धरून नेवून चौरंग केले. (हातपाय तोडले)[६७] अशा प्रकारे दादाजीनी कृष्णाजी बांदलाचा बंदोबस्त केला.

कृष्णाजीला शिक्षा झाल्यानंतर त्याची पत्नी दिपाई आपला मुलगा बाजी याला घेवून परागंदा झाली. पुढे तिने बाजीला आपला नातेवाईक साबाजी निंबाळकर याच्याकडे पाठविले. तिथे त्याने युद्धात पराक्रम केला. हे समजल्यावर शहाजी राजांनी त्याला भेटीला बोलाविले व अभय देवून देशमुखी करण्यास पाठविले. येथून पुढील काळात बाजी बांदल व त्याची आई दिपाई यांनी स्वराज्य कार्यात महाराजांना पूर्ण सहकार्य केले. इ. स. १६४८ च्या फत्तेखानाच्या स्वारीत बाजीने मोठाच पराक्रम गाजविला. या त्याच्या कामगिरीबद्दल शिवाजी महाराजांनी मौजे भाणसदरे हे गाव इनाम देवून ते त्यांच्याकडे वंशपरंपरेने चालवावे असा हुकूम दिला.[६८]

बाजी बांदलची आई दिपाई (कृष्णाजी बांदलची पत्नी) ही मोठी कर्तृत्ववान स्त्री होती. कृष्णाजीच्या मृत्युनंतर तीच हिरडस मावळच्या देशमुखीचा कारभार चालवीत होती. फत्तेखानावरील स्वारीत बाजीप्रमाणेच जमावानिशी मातुश्री दिपाईआवा गेली व या युद्धात बांदलाचे २५० लोक ठार झाले असे बांदलाच्या एका तकरीरीत म्हटले आहे. याशिवाय दिपाई व बांदलाच्या जमावाचा सरनौबत बाजी प्रभू देशपांडे यांना शिवाजी महाराजांनी जावळीवर रवाना केले. या युद्धात त्यांनी मोठा पराक्रम केला. असेही या तकरीरीत म्हटले आहे. या घटनेविषयी इतर काही पुरावा नाही. यामुळे दिपाई प्रत्यक्ष रणांगणावर पराक्रम गाजवत होती ही तकरीरीतील माहिती कितपत विश्वसनीय आहे हे सांगता येत नाही. मात्र दिपाई देशमुखीचा कारभार पहात होती हे इ. स. १६६९–७० च्या एका महजरावरून स्पष्ट होते. वेळवंड खोऱ्याच्या देशमुखीच्या वडीलपणासंबंधीच्या तंट्याचा निवाडा शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत झाला. या निवाड्याच्या हाजिर मजालसीत दिपाई हजर असल्याचे दिसते. या महजरात तिचा 'दीपाई आवा देशमुखीन ताा हिर्डस मावळ' असा उल्लेख आढळतो.[६९] अशा प्रकारे कृष्णाजी बांदल देशमुखाने जरी सुरूवातीला दादाजी कोंडदेवांना विरोध केला असला तरी पुढील काळात त्यांचा मुलगा व पत्नी दोघेही स्वराज्यकार्यात सहभागी झालेले दिसतात.

### २:४:८ बाजी प्रभू देशपांडे :

हिरडस मावळचे देशपांडे बाजीप्रभू यांनीही स्वराज्यस्थापनेच्या सुरूवातीच्या कालखंडात शिवाजी महाराजांना सहाय्य केले. बाजीप्रभू देशपांडे हे बांदलाचे कारभारी होते. बांदलाच्या एका तकरीरीत त्यांचा उल्लेख बांदलाच्या जमावाचे सरनौबत असा केलेला आहे. बाजीप्रभूंचे पणजोबा वैजप्रभू यांनी बहामनी कालखंडात मावळातील देशपांडेपणाचे वतन संपादन केले होते. पुढे आदिलशाही कालखंडात मावळात अंदाधुंदी माजली. या काळात हिरडस मावळचा देशमुख कृष्णाजी नाईक बांदल हा शिरजोर होता. तो इतर देशमुखांकडून व वतनदाराकडून कर वसुल करीत असे. बाजीचे आजे पिलाजी प्रभू यांनी खंड देण्यास नकार दिल्यामुळे दोघात धुसफूस सुरू झाली. बांदल व देशपांडे यांच्यात १६४० पर्यंत सतत कटकटी सुरू होत्या. परंतु नंतर मात्र दोघात दिलजमाई होवून बाजीप्रभू बांदलांचे एकनिष्ठ

सेवक बनले. जेध्यांबरोबर झालेल्या एका युद्धात कृष्णाजीस बाजीप्रभूने सहाय्य केले. या युद्धातील त्यांच्या पराक्रमावर खूष होवून कृष्णाजीने बाजीस आपले दिवाण (कारभारी) नेमले.[७०]

कृष्णाजी बांदलच्या मृत्युनंतर त्याची पत्नी दिपाई हिरडस मावळच्या देशमुखीचा कारभार करू लागली. याकाळात बाजीप्रभू देशपांडे बांदलाच्या जमावाचे सरनौबत म्हणून काम पहात होते. इ. स. १६५६ च्या जावळीवरील स्वारीत दिपाई व सरनौबत बाजीप्रभू सहभागी झाले होते व त्याबद्दल त्यांना महाराजांनी इनाम दिले असे बांदलाच्या एका तकरीरीत म्हटले आहे.[७१]

पुढील काळात बांदलाप्रमाणेच बाजीप्रभूंनीही महाराजांना मदत करून त्यांचा विश्वास संपादन केल्याचे दिसते. १३ मे १६५९ रोजीचे खुद्द शिवाजी महाराजांनी बाजीप्रभूंना पाठविलेले पत्र उपलब्ध आहे. हिरडस मावळात असलेल्या मोहनगडावरील (पूर्वीचे नाव जासलोडगड) हवालदारास व इतर लोकांना घर व अलंगा (संरक्षक भिंत) मजबूत करून देवून त्यांची राहण्याची व्यवस्था करून देण्याचे काम महाराजांनी बाजीप्रभूवर सोपविले होते. एवढेच नव्हे तर हे काम तुम्ही व्यवस्थित कराल असा विश्वासही या पत्रात व्यक्त केला होता.[७२]

सन १६६० मध्ये शिवाजी महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकून पडले होते. १३ जुलै १६६० रोजी पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुटून महाराज विशाळगडाकडे निघाले. त्यावेळी बाजीप्रभूही बांदलाच्या जमावासह त्यांच्याबरोबर होते. महाराज निसटल्याचे समजताच सिधी मसूद व फाजलखानाने त्यांचा पाठलाग सुरू केला. महाराज गजापूरच्या खिंडीत प्रवेश करतात न करताच तोच शत्रू वेगाने पिछाडीवर येत असल्याचे त्यांचे निदर्शनास आले. महाराजांनी बाजीप्रभूस खिंडीत उभे राहून शत्रूस थोपविण्याची कामगिरी सांगितली व ते पुढे मार्गक्रमित झाले. बाजीप्रभू व मावळे यांनी ही कामगिरी आनंदाने स्वीकारली. एवढ्यात शत्रूची फौज जवळ येवून पोहोचली. बाजीप्रभू व त्याच्या मावळ्यांनी पराक्रमाने खिंड लढविली प्रहर दीड प्रहरपर्यंत शत्रूला खिंड चढू दिली नाही. शत्रूचे हल्ले परतवून लावता लावता

बाजीप्रभू रणांगणी ठार झाले. अनेक मावळेही मारले गेले. बाजीप्रभू पडताच राहिलेले लोक माघार घेवून विशाळगडावर पळून गेले.[७३]

शिवाजी महाराजांच्या जीवनातील अत्यंत कठीण प्रसंगापैकी पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुटका हा एक प्रसंग आहे. या कठीण प्रसंगी बाजींनी तलवारीची शर्थ करून शत्रूस थोपवून धरले. त्यामुळे शिवाजी राजे सुखरूप राहिले. बाजी व त्यांच्या या सहकाऱ्यांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराजांनी तरवारेचे मानाचे पान सर्वप्रथम बांदलांना देण्याचा मान दिला. हा मान पूर्वी जेध्यांकडे होता. बाजीच्या पराक्रमामुळे तो बांदलांना मिळाला. बाजीप्रभूच्या मृत्युनंतर महाराजांनी त्यांचा पुत्र बाबाजी बाजी याचा सन्मान करून वडीलांचा सरंजाम त्याला दिला. त्याने पुढे राजाराम महाराजांच्या काळापर्यंत स्वराज्याची सेवा केली.

### २:४:९ बापूजी मुदगल नऱ्हेकर व त्यांची मुले :

छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य उभारणीच्या कार्यात मदत करणाऱ्या लोकांमध्ये बापूजी मुदगल यांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. बापूजी मुदगल मावळातील खेडेबारे तर्फेचे देशकुळकर्णी होते. त्यांच्या घराण्याला नऱ्हेकर असे म्हणत असत. नऱ्हे हे पुणे परगण्यातील एक गाव असून ते या घराण्याचे मूळ गाव असावे. दादाजी कोंडदेव मावळामध्ये शांतता निर्माण करत असतानाच्या काळात बापूजी त्यांना मदत करत असावेत. खेडेबारे तर्फेतील मौजे रहाटवडे येथील मोकदम चिटोजी चोरघा हा गाव सोडून परागंदा झाला होता. बापूजीने दादाजी पंतांना सांगून त्याची पाटीलकी त्यास मिळवून दिली. या संबंधीचे २ डिसेंबर १६३८ चे पत्र उपलब्ध आहे.[७४] यानंतर लवकरच बापूजींना पुण्याचे हवालदार पद प्राप्त झाले. इ. स. १६३८ ते इ. स. १६४५ पर्यंत ते पुण्याचे हवालदार होते.[७५]

दादाजी कोंडदेवच्या मृत्युनंतर बापूजी मुदगलने एक अत्यंत महत्त्वाची अशी कामगिरी पार पाडली. ती म्हणजे बापूजींच्या मध्यस्थीने राजकारण करून शिवाजी महाराजांनी कोंढाणा किल्ल्याचा हवालदार मिया रहीम मुहम्मद याच्या ताब्यातून कोंढाणा किल्ला घेतला.[७६] जेधे करिन्यात म्हटले आहे की, ''बापूजी मुदगल नऱ्हेकर, देशपांडे, तरफ खेडेबारे, याच्या हाते राजकारण करून (शिवाजी महाराजांनी) दग्याने किल्ला कोंढाणा घेतला.''[७७]

बापूजी मुदगलप्रमाणे त्यांची चिमणाजी बापूजी, बाळाजी बापूजी आणि नारो बापूजी ही तिन्ही मुले स्वराज्यकार्यात सहभागी झाली होती. शिवाजी महाराजांचे व जिजाबाईंचे वास्तव्य मौजे खेड येथे असताना ते नारो बापूजीच्या शेजारी रहात होते असा उल्लेख खेडेबाऱ्याच्या देशकुळण्यर्याच्या करिन्यात आला आहे. नारो बापूजी हा महाराजांच्या चाकरीत असून अफजलवधप्रसंगी त्याच्याकडे पायदळाचे एक पथक होते. २३ सप्टेंबर १६६३ रोजी जावळीतील पार येथे निवाड्याकरीता नेताजी पालकरांच्या नेतृत्वाखाली भरलेल्या सभेत नारो बापूजी हजर असल्याचा उल्लेख निवाडापत्रात आढळतो. पहिल्या सुरत लुटीत नारो बापूजीचा सहभाग होता. सुरतेवरून माघारी येताना शत्रूबरोबर झालेल्या चकमकीत नारो बापूजी ठार झाला.[७८] बापूजी मुदगलचे दुसरे दोन पुत्र चिमणाजी बापूजी व बाळाजी उर्फ बाबाजी बापूजी हे शाहिस्तेखानावरील छाप्याच्या प्रसंगी शिवाजी महाराजांबरोबर होते. शाहिस्तेखानाच्या छावणीत शिरताना महाराजांनी आपल्याबरोबर घेतलेल्या निवडक लोकात हे दोघे असून त्यांच्याच नेतृत्वाखाली ही सर्व मंडळी छावणीत घुसली असे वर्णन सभासदाने केले आहे.[७९]

**२:४:१० हैबतराव सिलिंबकर :**

भोरजवळच्या गुंजणमावळचे सिलिंबकर हे देशमुख घराणे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यकार्यात प्रथमपासून सहभागी झाले होते. गुंजणमावळच्या देशमुखांना 'हैबतराव' हा किताब होता. शिवाजी महाराजांच्या अगोदरपासूनच सिलिंबकर घराण्यात देशमुख वतनावरून वाद सुरू होता. इ. स. १६३८ मध्ये दादोजी कोंडदेव यानी या वतनाचे ४ भाग करून त्यापैकी २ भाग बापूजी सिलिंबकर याला, एक भाग हाबाजी सिलिंबकर यांना देवून या दोघांनाही देशमुखीच्या कारभाराचा अधिकार दिला होता. त्यामुळे या दोघांनाही 'हैबतराव' हा किताब प्राप्त झाला होता. चौथा भाग बाळाजी सिलिंबकर याला दिला होता. परंतु देशमुखीच्या कारभाराचा हक्क त्याला दिला नव्हता. त्यामुळे कागदोपत्री 'बाळाजी नाईक सिलिंबकर' असा त्याचा उल्लेख आढळतो. दादाजीनी हा वाद सोडविला असला तरी तो कायमचा मिटला नाही.[८०]

शिवाजी महाराजांनी स्वराज्यस्थापनेच्या कार्याला सुरूवात केल्यानंतर कान्होजी जेध्यांबरोबर सिलिंबकरही या कार्यात सहभागी झाले. इ. स. १६४८ च्या फत्तेखानाच्या स्वारीच्या वेळी झालेल्या युद्धात सिलिंबकर देशमुखांनी मोठाच पराक्रम गाजविला. या युद्धातील त्याच्या पराक्रमाचे पारितोषिक म्हणून शिवाजी महाराजांनी बापूजी हैबतराव, हाबाजी हैबतराव व बाळाजी नाईक या तिघांना चिंचले बुद्रुक हे गाव इनाम म्हणून दिले. सुहूर सन १०६१ (२४ मे १६५० ते २३ मे १६५१) मध्ये दिलेल्या या इनामपत्रात म्हटले आहे की, ''बापूजी हैबतराव, हाबाजी हैबतराव व बाळाजी नाईक सिलिंबकर या गुंजणमावळच्या देशमुखांनी गलबल्यामध्ये आपले जमेतीनसी साहेबांचे (शिवाजी महाराजांचे) मसलतीस येवून एक तारी केली (पराक्रम दाखविला). त्यामुळे त्यांच्यावर कृपा करून चिंचले बुद्रुक हे गाव त्यांना इनाम दिले आहे.''[८१]

सन १६५६ च्या जावळी मोहीमेत सिलिंबकर सहभागी झाले होते. महाराजांनी जावळी जिंकल्यानंतर चंद्ररावाने रायरी किल्ल्यावर आश्रय घेतला होता. शिवाजी महाराजांनी रायरीला वेढा दिला व हल्ले करून चंद्ररावाला जेर केला. शेवटी हैबतराव व बाळाजी नाईक सिलिंबकर यांच्या मध्यस्थीने चंद्रराव शरण आला.[८२] जावळी विजयानंतर हाबाजी हैबतरावाने आपल्या देशमुखीच्या वाटणीसंबंधीची तक्रार महाराजांकडे केली. तेव्हा महाराजांनी स्वत: गोतसभेत बसून २१ मार्च १६५७ रोजी या प्रकरणाचा निवाडा केला.[८३]

पुढे अफजलखान स्वारीच्या प्रसंगी महाराजांनी हैबतराव व बाळाजी नाईक सिलिंबकर यांच्यावर बोचेघोळीचा घाट अडवून धरण्याची कामगिरी सोपविली होती. अफजलखान वधानंतर हैबतराव सिलिंबकराचा सासरा रोहिड खोऱ्याचा देशमुख खंडोजी खोपडे हा पळून गेला होता. त्याने आपला जावई हैबतरावांना महाराजांचे अभय मिळवून देण्याची विनंती केली. हैबतराव सिलिंबकरांनी कान्होजी जेध्यांच्या मध्यस्थीने खंडोजी खोपडे याला महाराजांचे अभय मिळवून दिले. परंतु खंडोजी अफजलखानाला सामील झाल्याचा राग महाराजांच्या मनातून गेला नव्हता. त्यामुळे नंतरच्या काळात महाराजांनी खंडोजीचा उजवा हात व डावा पाय कापून फितुरीबद्दल शिक्षा दिली.[८४] परंतु त्याचे वतन मात्र त्याच्याकडेच

ठेवले. अशा प्रकारे शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभीच्या काळात जेधे बांदल यांच्याप्रमाणेच सिलिंबकरांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

**२:४:११ कावजी मल्हार :**

मोसे खोऱ्याची देशमुखी पासलकर घराण्याकडे होती आणि त्यांचे पिढीजात कारभारीपद खासनीस या प्रभू घराण्याकडे होते. याच प्रभू घराण्यातील कावजी मल्हार खासनीस हे शिवकाळात पासलकर देशमुखाचे कारभारीपद सांभाळत होते. यावेळी विठोजी पासलकर देशमुखीचा कारभार पहात होते. पुढे या देशमुखी वतनावरून पासलकर घराण्यात वाद निर्माण झाला. तेव्हा दादाजी कोंडदेव यांनी हा वाद सोडवून बाळाजी पासलकर यास देशमुखी दिली. परंतु एवढ्यानेही हे भांडण संपले नाही. बाजी पासलकर यांनी देशमुखीवर हक्का सांगून हा वाद सोडविण्याची शिवाजी महाराजांना विनंती केली. पासलकर घराण्यात हा वाद निर्माण झाल्यानंतर त्यांचे कारभारी कावजी मल्हार शिवाजी महाराजांच्या सेवेत आले. यावेळी बाजी पासलकरही महाराजांच्या सेवेत होते.

कावजी मल्हार महाराजांच्या सेवेत दाखल झाल्यानंतर लवकरच स्वराज्यावर फत्तेखानाच्या स्वारीचे संकट आले. फत्तेखानाला अडविण्यासाठी महाराजांनी कावजीच्या (कावूक) नेतृत्वाखाली आपले सैन्य रवाना केले. याचवेळी बाजी पासलकर व कावजी मल्हार यांनाही बेलसरच्या मोहिमेवर जाण्याची आज्ञा दिली. त्या आज्ञेप्रमाणे बाजी पासलकरांसोबत कावजी मल्हारही मोहिमेवर गेले. या मोहिमेत बाजी पासलकर ठार झाले. तेव्हा महाराजांनी त्यांच्या इच्छेप्रमाणे देशमुखीच्या वादाचा निवाडा करून त्यांचा लहान बंधू कृष्णाजीला देशमुखीचा हक्का दिला व त्यांचे कारभारीपदाची (खासनीसी) सनद कावजी मल्हार यांचे नावे करून दिली.[८५]

**२:४:१२ कावजी कोंढाळकर :**

कावजी कोंढाळकर हे आपल्या अंगच्या पराक्रमाने शिवाजी महाराजांच्या काळात उदयास आलेले एक शूर योद्धे होते. कावजीचे घराणे कान्होजी जेध्यांशी ऋणानुबंधी आणि जीवास जीव देणार होते. कावजी कान्होजीच्या सेवेत असावेत असे वाटते. शिवपूर्वकाळात

जेधे व बांदल यांच्यात झालेल्या संघर्षात कावजीचे थोरले बंधू पोसजी ठार झाले होते. तेव्हापासून कान्होर्जीनी त्यांना सांभाळले.[८६] कान्होजी जेधे बरोबरच स्वराज्यस्थापनेच्या सुरूवातीच्या संघर्षात कावजीही सहभागी झाले होते. सन १६४८ मध्ये फत्तेखानाच्या स्वारीच्या वेळी शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याचे नेतृत्व 'कावुका' कडे सोपविले असे शिवभारतात म्हटले आहे. परंतु शिवभारतात त्याचे आडनाव दिलेले नाही. इतिहासकार गजानन मेहेंदळे यांच्या मते शिवभारतातील कावुक म्हणजे कावजी कोंढाळकर असावेत.[८७] शिवभारतात परमानंदाने त्यांच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे.

कावजी कोंढाळकराच्या या पराक्रमामुळेच पुढे शिवाजी महाराजांनी त्यांना जेध्यांकडून मागून आपल्या सेवेत घेतले व पायदळातील हजारी म्हणून त्यांची नेमणूक केली. शाहिस्तेखानाच्या स्वारीच्या वेळी खानाचा सरदार बुलाखी याने देइरी गडास वेढा घातला. हा वेढा मोडून काढण्यासाठी कावजीने हल्ला चढविला व मुघलांचे ४०० लोक कापून वेढा उठविला.[८८]

**२:४:१३ संभाजी कावजी :**

संभाजी कावजीच्या घराण्याविषयी ऐतिहासिक साधनांमधून विशेष माहिती मिळत नाही परंतु त्याच्या स्वराज्यकार्यातील सहभागाविषयी शिवभारत, सभासद बखर, इत्यादी ऐतिहासिक साधनांमधून उल्लेख सापडतात. जावळी मोहिमेत त्याने महत्त्वाची कामगिरी बजावलेली दिसते. सभासद बखरीत म्हटले आहे की, ''संभाजी कावजी म्हणून महालदार राजियाचा होता. त्यास हणमंतराव याजकडे राजकारणास पाठवून, सोइरिकीचे नाते लावून, एकांती बोलीचालीस जावून, संभाजी कावजी याने हणमंतरायासि कटारीचे वार चालवून जिवे मारिले.''

यावरून जावळीच्या चंद्रराव मोरेचा भाऊ हणमंतराव मोरे याला ठार मारण्याची कामगिरी संभाजी कावजीने केलेली दिसते.[८९] अफजलखानाच्या भेटीस जाताना अंगरक्षक म्हणून महाराजांनी संभाजी कावजीला आपल्याबरोबर घेतले होते. महाराजांनी अफजलखानाला मारल्याबरोबर त्याच्या इतर सहकाऱ्यांना मारण्याची कामगिरी संभाजी

कावजी व इतर सहकाऱ्यांनी केली.[९०] जखमी अफजलखानाला पालखीत घालून पळून जाणाऱ्या भोयांचे पाय छाटून टाकून संभाजी कावजीने खानाचे मुंडके कापून आणले.

स्वराज्याच्या प्रारंभिक काळात महाराजांची एकनिष्ठ सेवा करणारा संभाजी कावजी हा पुढील काळात शत्रूला सामील झाल्याचे दिसते. संभाजीचा मित्र बाबाजीराम हा शाहिस्तेखानाला मिळाला हे समजल्यावर महाराजांनी संभाजीची कानउघाडणी केली. ती सहन न झाल्याने संभाजीही खानाला जावून मिळाला. संभाजी कावजी हा अत्यंत बलवान होता. 'घोडा चहू पाई धरून उचलिला' म्हणजे घोड्याचे चारी पाय धरून तो उचलित असे, असे त्याच्या ताकदीचे वर्णन एक्क्यानव कलमी बखरीत केलेले आढळते. खानाने संभाजीस आपल्या सेवेत घेवून ५०० स्वारासह मौजे मलकरे येथील ठाण्यावर नेमले. संभाजी कावजीची ही फितुरी सहन न होवून महाराजांनी प्रतापराव गुजर यांना त्याच्यावर पाठविले. प्रतापरावांनी त्याच्यावर हल्ला करून त्यास ठार केले.[९१]

**२:४:१४ रघुनाथ बल्लाळ सबनीस :**

छत्रपती शिवाजी महाराजांची बंगळूरहून पुण्यास पाठवणी करताना शहाजी राजांनी जी मुलकी अधिकारी मंडळी पाठविली होती त्यात रघुनाथ बल्लाळ सबनीस हे एक होते, असे सभासद बखरीत म्हटले आहे. तर जेधे करीन्यात बाळाजी हरी मजालसी यांना शहाजी राजांनी शिवाजीराजांबरोबर पाठविले असे म्हटले आहे. हे दोघेही पितापुत्र असावेत. त्यांचे आडनाव मेंडजोशी असे असून रघुनाथ बल्लाळ हे बाळाजी हरी यांचे पुत्र होते.[९२]

शिवाजी महाराजांनी रघुनाथ बल्लाळ यांना पायदळाची सबनीसी दिली. इ. स. १६५६ च्या जावळी मोहिमेत रघुनाथ बल्लाळ यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली दिसते. जेधे करीन्यात म्हटले आहे की, ''जोरा मध्ये (जोर खोरे) हाणमंतराऊ मोरे होते. त्यावरी राजश्री स्वामींनी (शिवाजी महाराजांनी) रघुनाथ बल्लाळ सबनीस पुण्याहून स्वाराच्या जमावानिशी पाठविले. त्याणी हणमंतराऊ यास मारून जोर घेतले. जाउली (जावली) मात्र राहिली होती.[९३] हणमंतराव मोऱ्याला रघुनाथ बल्लाळनी मारल्यानंतर खुद्द शिवाजी महाराजांनी जेधे, बांदल, सिलिंबकर व इतर देशमुखांच्या मदतीने जावळीवर स्वारी केली व ती काबीज केली. चंद्रराव

मोरे रायरीला पळाला. पुढे तो सिलिंबकराच्या मध्यस्थीने महाराजांना शरण आला. या घटनेविषयी सभासद बखरीमध्ये चुकीची माहिती दिलेली दिसते. शिवाजी राजांनी आपल्यातर्फे वकील म्हणून रघुनाथ बल्लाळला चंद्ररावांकडे पाठविले व त्यानी चंद्रराव व सुर्याजीराव या दोघा बंधूंना एकांती कटारीचे वार करून मारीले आणि याच पद्धतीने संभाजी कावजीने हणमंतरावाला ठार केले. असेही वर्णन सभासदाने केले आहे. परंतु चंद्रराव हा जिवंत महाराजांच्या हाती लागला होता. ही गोष्ट 'शिवभारत' या विश्वसनीय साधनामधून सिद्ध झाली आहे. त्यामुळे सभासद बखरीतील ही हकीकत चुकीची आहे. मात्र जेधे करीन्यात म्हटल्याप्रमाणे रघुनाथ बल्लाळने हणमंतराव मोरे यांना ठार केले असावे.

२१ मार्च १६५७ च्या एका महजरात रघुनाथ बल्लाळचा 'राजश्री रघुनाथ बल्हाळ सरसबनिवीस रा। ई।' असा उल्लेख आढळतो. यावरून या काळात त्यांना लष्कराचे सरसबनीस हे पद मिळालेले दिसते.[९४] जावळी मोहिमेनंतर जुलै १६५७ मध्ये महाराजांनी रघुनाथ बल्लाळ यांना सिद्दीवर पाठविले. रघुनाथ बल्लाळने ५-६ हजार मावळे पायदळ बरोबर घेवून सिद्दीवर स्वारी केली व दंडा राजापुरीपर्यंतचा तळे, घोसळे, इत्यादी मुलूख घेतला.[९५] अशा प्रकारे रघुनाथ बल्लाळ यांनी स्वराज्यस्थापनेच्या सुरूवातीच्या काळापासून त्याच्या मृत्युपर्यंत स्वराज्यसेवा केलेली दिसते.

**२:४:१५ बाळाजी हरी मजालसी :**

शहाजीराजांनी शिवाजीराजांबरोबर पाठविलेल्या विश्वासू माणसांपैकी हे एक होत. नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथील चिटणीशी वतन त्यांचेकडे होते. तेथे आपला प्रतिनिधी ठेवून ते शहाजीराजांबरोबर कर्नाटकात गेले होते. कर्नाटकात असताना त्यांनी शहाजीराजांचा विश्वास संपादन केला. त्यामुळे शहाजीराजांनी त्यांना पुण्याला पाठविले. स्वराज्यस्थापनेच्या सुरूवातीच्या कालखंडात त्यांनी शिवाजीराजांचे वकील म्हणून काम पाहिले. याकाळात त्यांनी वडगाव, नेबरज, चांदखेड, पिरगुड इत्यादी ११ गावांचे कुळकर्णी वतन मिळविले होते.[९६] १२ मार्च १६५७ च्या एक तंट्याच्या निवाड्याच्या हाजीर मजालसीत ते हजर असल्याचे दिसतात.

**२:४:१६ सामराज नीळकंठ रोंझेकर – पेशवे :**

सामराज नीळकंट रोंझेकर हे शिवाजी महाराजांचे पहिले पेशवे होत. त्यांचे पूर्वज दौलताबादजवळील रोंझेगावचे कुळकर्णी होते. म्हणून त्यांना रोंझेकर असे संबोधले जात असे. परंतु त्यांचे आडनाव मतिमंत असे होते. शिवकालीन अनेक कागदपत्रावर त्यांचा 'श्रीशिवनरपति हर्ष निदान सामराज मतिमंत प्रधान' असा शिक्का आढळतो. तसेच काही कागदपत्रात त्यांचा रोंझेकर असाही उल्लेख आढळतो.[९७] शिवाजी महाराजांच्या भोसले घराण्याशी या दौलताबादजवळील मतिमंत घराण्याचा परिचय होता. त्यामुळे सामराज नीळकंठ शहाजी राजांच्या सेवेत होते. शिवाजीराजांची बंगळूरहून पाठवणी करताना शहाजीराजांनी जी विश्वासू माणसे त्यांच्याबरोबर दिली होती. त्यापैकी सामराज नीळकंठ यांना पेशवे म्हणून त्यांच्याबरोबर पाठविले होते. अर्थात यावेळी ते शहाजी राजांच्या जहागिरीचा कारभार पाहणारे अधिकारी म्हणून पुण्याला पाठविले गेले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्याला सुरूवात केल्यानंतर आपल्या स्वराज्याचे पहिले पेशवे म्हणून त्यांची नियुक्ती केली. ही नियुक्ती इ.स.१६४९–५० च्या दरम्यान झाली असावी. याकळातील एका पत्रावर सामराज नीळकंठ पेशवे असा उल्लेख आढळतो.[९८] पेशवेपदाच्या कालखंडात इ. स. १६५२ मध्ये त्यांनी मोसे खोऱ्यातील सात गावचे कुळकर्णी वतन खरेदी केले.

अशा प्रकारे स्वराज्याचे पहिले पेशवे म्हणून सामराज नीळकंठ यांनी कारभार पाहिला. इ. स. १६६२ मध्ये महाराजांनी त्यांना सिद्दीवरील मोहिमेवर पाठविले. परंतु या मोहिमेत त्यांचा पराभव झाला.[९९] यानंतर महाराजांनी त्यांच्याकडून पेशवेपद काढून महादेव मतिमंत यांची पेशवेपदी नियुक्ती केली.

**२:४:१७ जीवा महाले :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे एकनिष्ठ शूर पराक्रमी सेवक म्हणून जीवा महाले याचे नाव घेतले जाते. जीवा महाले याचे आडनाव संकपाळ असून, जावळी प्रांतातील महाबळेश्वरपासून जवळ असलेले कोंडवली हे त्यांचे मूळ गाव आहे. जातीने न्हावी असलेल्या

जीवा महाले यांनी आपल्या पराक्रमाने शिवाजी राजांच्या खास सेवकात स्थान मिळविले होते.[१००] अफजलखान वधाच्यावेळी जीवा महाले महाराजांचे अंगरक्षक होते. अफजलखानाच्या भेटीस जाताना महाराजांनी ज्या १० विश्वासू सेवकांना आपल्याबरोबर घेतले होते, त्यापैकी जीवा महाले हे एक होते. कवींद्र परमानंदाने त्याच्या पराक्रमाचे वर्णन करताना 'शिवभारत' या ग्रंथात म्हटले आहे की, ''हे राजा, तुझ्यावर हा तरवारीचा वार करतो. तो माझा वार संभाळ' असे वारंवार म्हणत त्यावेळी बडा सय्यद (सय्यद बंडा) सिंहाप्रमाणे गर्जना करणाऱ्या व अफजलखानास ठार मारणाऱ्या शिवाजीवर पुन: धावून गेला. वेगवान जीवा महालेने नको म्हटले असताहि ''ह्याला मीच ठार करतो, हा माझ्या जवळ येवू दे' असे महाराजांचे म्हणणे न ऐकलेसे करून सय्यदाने उगारलेली ती तलवार आपल्या अंगावर घेतली आणि त्या वीराने आपल्या तलवारीने सय्यदाचे दोन तुकडे केले.[१०१] जीवा महाले व त्यांचा भाऊ तान महाले यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत स्वराज्याची सेवा केली. त्यांच्या एकनिष्ठ सेवेबद्दल पुढे छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना खेडेबारे तरफेतील निगडे हे गाव इनाम दिले.[१०२] स्वत:च्या प्राणाचीही पर्वा न करणारी जीवा महालेसारखी माणसे महाराजांना लाभली म्हणूनच स्वराज्यस्थापनेचे ध्येय गाठणे सुकर झाले. जीवा महालेच्या पराक्रमामुळेच 'होता जीवा म्हणून वाचला शिवा' ही उक्ती इतिहासात रूढ झाली.

**२:४:१८ तानाजी मालुसरे :**

तानाजी मालुसरे हे अत्यंत पराक्रमी आणि निष्ठावंत स्वराज्यसेवक होते. शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक बिकट प्रसंगी ते महाराजांच्याबरोबर होते. सातारा जिल्ह्यातील पाचगणीच्या जवळ असलेले गोडवली हे त्यांचे मूळ गाव होय. पुढे महाड तालुक्यातील उमराठे येथे त्यांचे वास्तव्य होते. स्वराज्य स्थापनेच्या सुरूवातीच्या कालखंडात ते स्वराज्याच्या लष्करात दाखल झाले आणि लवकरच पायदळातील एक मातब्बर सरदार बनले.[१०३] अफजलखानाच्या वधानंतर त्याच्या सैन्यावर जे अनेक मराठा सरदार चालून गेले त्यापैकी तानाजी मालुसरे हे एक होते. सन १६६१ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण–कोकणवर स्वारी केली. या मोहिमेत तानाजी मालुसरे महाराजांसोबत होते.

या मोहिमेत महाराजांनी संगमेश्वर जिंकून घेतले. संगमेश्वरहून महाराज पुढे गेले. यावेळी त्यांनी संगमेश्वराच्या बंदोबस्तासाठी पिलाजी निळकंठराव व तानाजी मालुसरे या पायदळाच्या सेनापतींना ठेवले. या सैन्यावर सुर्याजीराव सुर्वेने एका काळोख्या मध्यरात्री अकस्मात हल्ला चढविला. या हल्ल्याने घाबरून पिलाजी निळकंठराव पळू लागला. परंतु तानाजी मालुसरेने त्याला अडविले व शत्रूशी दोन हात करून हल्ला परतवून लावला. या युद्धातील तानाजीच्या पराक्रमाची बातमी ऐकून महाराजांनी त्यांचा विरोचित सन्मान केला.[१०४] शाहिस्तेखानावरील छाप्याच्या प्रसंगी तानाजी मालुसरे महाराजांसोबत होते. इ. स. १६७० मध्ये पुरंदर तहाने गमावलेला पुण्याजवळील अत्यंत मोक्याचा सिंहगड किल्ला जिंकण्याची अवघड कामगिरी महाराजांनी तानाजीवर सोपविली. ४ फेब्रुवारी १६७० रोजीच्या रात्री निवडक लोकांसह डोणगिरीचा कडा चढून जावून, त्यांनी उदयभान राठोडच्या सैन्यावर अचानक छापा टाकला. यावेळी झालेल्या संघर्षात उदयभान आणि तानाजी दोघेही ठार झाले. तानाजीचा भाऊ सुर्याजीने हिंमत धरून आपल्या लोकांना स्फूर्ती देवून अखेर विजयश्री मिळविली. तानाजी मालुसरे याच्या वीरमरणाने महाराज दु:खी झाले. त्यांची नेमणूक पुढे सुर्याची मालुसरे यांना चालू करण्यात आली.[१०५] आरंभापासून स्वराज्यकार्यात सहभागी असलेल्या तानाजी मालुसरे यांनी अनेक युद्धात पराक्रम गाजविला. म्हणूनच परमानंदाने शिवभारतात 'निरनिराळ्या युद्धात प्रसिद्धीस आलेला पायदळाचा अधिपती योद्धा' असे त्यांचे वर्णन केले आहे.

### २:४:१९ बाळकृष्णपंत हणमंते :

बाळकृष्णपंत हणमंते हे शिवाजी महाराजांचे पहिले अमात्य (मुजूमदार) होत. हणमंते हे इंदापूरचे वतनदार जोशी घराणे होते. इंदापूर परगण्याशी भोसले घराण्याचा जुना संबंध होता. त्यामुळे भोसले व हणमंते यांच्यात घरोबा निर्माण झाला. त्यातूनच नारोपंत हणमंते शहाजी महाराजांच्या पदरी होते. बाळकृष्णपंत हे नारोपंताचे बंधू होत. शहाजीराजांनी शिवाजीराजांची पुण्यास पाठवणी करताना मुजूमदार म्हणून बाळकृष्णपंतास बरोबर पाठविले होते. राज्याचा हिशोब ठेवणे व स्वराज्यात आलेल्या प्रदेशाची मुलकी व्यवस्था लावणे ही मुजूमदारीची कामे बाळकृष्णपंतांनी स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभीच्या काळात पार पाडली. या

पदावर त्यांनी १६५६ पर्यंत काम पाहिले. त्यानंतर त्यांचे पुत्र वासुदेव बाळकृष्ण यांनीही काही काळ या पदावर कार्य केले. हणमंते घराण्यातील नारोपंताचे जनार्दनपंत, रघुनाथपंत व त्रिबकपंत हे तिघेही पुत्र शहाजी राजांच्या पदरी काम करत होते.[१०६]

## २:५ समारोप :

छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्यस्थापना ही १७ व्या शतकातील एक अपूर्व व अलौकिक घटना आहे. मराठा सरदार कितीही पराक्रमी असला तरी आपल्या वतनात वाढ करणे किंवा पराक्रम गाजवून मुघल, निजामशाही अगर आदिलशाहीत अडीच हजारी, पंचहजारी सरदार बनणे व आयुष्यभर त्या सत्तांच्या सेवेत रहाणे एवढीच महत्त्वकांक्षा बाळगून अनेकजण आपले आयुष्य घालवीत होते. आपापसात सत्तास्पर्धा करून एकमेकांना संपवीत होते. परंतु निजामशाही–आदिलशाहीसारख्या परकीय सत्ता संपविण्याची व स्वराज्य स्थापन करण्याची महत्त्वकांक्षा कुणापाशीही नव्हती. ती महत्वकांक्षा शिवाजी महाराजांच्या रूपाने महाराष्ट्रात उदयास आली. शिवाजीराजांनी स्वराज्यस्थापनेच्या कार्यास सुरूवात केल्यानंतर मावळ भागातील सर्वच वतनदार देशमुख या कार्यात साथ देणे शक्य नव्हते. कारण शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य उभारणीला साथ देणे म्हणजे त्यांचे वर्चस्व मान्य करून त्यांच्या आज्ञेत राहून कार्य करावे लागणार होते. शिवाय बलाढ्य आदिलशाहीला आव्हान देणाऱ्या शिवाजीराजांच्या कार्यात सहभागी होण्यात कदाचित सर्वस्व गमावण्याची वेळ येण्याचाही धोका होता. त्यामुळे ही वतनदार मंडळी सहजासहजी साथ देण्यास तयार नव्हती. परंतु शिवाजी राजांनी कधी गोडीगुलाबीने तर कधी दहशतीने त्यांना आपल्याकडे वळविण्यात यश मिळविले. विरोध करणाऱ्या मुजोर वतनदारांचा त्यांनी मोड केला. शिवाजीराजांना सहकार्य करण्याच्या कामी कारीच्या कान्होजी जेधे यांनी पहिले पाऊल उचलले आणि त्यापाठोपाठ सिलिंबकर, बांदल इत्यादी देशमुख व इतर वतनदार मंडळीही महाराजांना सामील झाली.

परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराजांनी मावळ खोऱ्यातील शेतीवाडी करणाऱ्या सामान्य व गरीब कुटुंबातील शेकडो युवकांच्यात स्वाभिमान जागृत करून त्यांच्यात स्वराज्याबद्दल आत्मीयता निर्माण केली व या सैनिकी प्रशिक्षण नसलेल्या मावळे युवकांमधूनच धाडसी, पराक्रमी व जीवाला जीव देणारी मावळ्यांची फौज उभी केली. सर्व

जातीधर्माच्या युवकांना महाराजांनी आपल्या सैन्यात सहभागी करून घेतले. महाराजांच्या या फौजेची संख्या मुघल–आदिलशाही फौजेच्या तुलनेने अगदीच अल्प होती म्हणून महाराजांनी गनिमी कावा युद्ध पद्धती स्वीकारून या विरोधी सत्तांना तोंड दिले. याबरोबरच स्वराज्य स्थापनेच्या सुरूवातीच्या संघर्षात मावळातील देशमुखांच्या सैन्याचाही महाराजांना भरपूर उपयोग झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य स्थापनेचे कार्य किती मोलाचे आहे याची जाणीव असल्यामुळे मावळातील सहकाऱ्यांनी शिवाजी राजांना आयुष्यभर साथ दिली. या मावळ्यांच्या मनात शिवाजीराजांबद्दल व स्वराज्याबद्दल अलौकिक एकनिष्ठा होती. बाजी पासलकर, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे, येसाजी कंक इत्यादी मावळे सहकाऱ्यांनी स्वराज्य कार्यापुढे आपल्या प्राणांचीही पर्वा केली नाही. अशा शूर, पराक्रमी, स्वामिनिष्ठ सहकाऱ्यांमुळेच शिवाजी महाराजांचे स्वराज्यस्थापनेचे कार्य सुकर झाले.

**संदर्भ :**


१. दिवेकर स. म. (संपा.), कवींद्र परमानंदकृत शिवभारत, स. म. दिवेकर, मुंबई, १९२७, अ. ८. श्लोक १० ते १८, पृ. ६६–६७.

२. तत्रैव, श्लोक ३३. पृ. ६९.

३. मेहेंदळे गजानन भास्कर, श्रीराजा शिवछत्रपती, खंड १, भाग १, प्रकाशक ग. भा. मेहेंदळे, पुणे, १९९६, पृ. ४९१.

४. देशमुख विजय, शककर्ते शिवराय (पूर्वार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर, १९८०, पृ. १६८.

५. मेहेंदळे गजाजन भास्कर, उपरोक्त, पृ.५६०.

६. पगडी सेतुमाधवराव, (दिक्षित राजा : संपा.), समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड २, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०, पृ. ४३७.

७. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अध्याय ९, श्लोक ६० ते ७४, पृ. ८२, ८३.

८. तत्रैव, अ. १०, श्लो. १, २, पृ. ८५.

९. कुलकर्णी अनुराधा गोविंद (संपा.), शिवछत्रपतींची पत्रे – खंड २, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०११, पत्र क्र. ६९, पृ. २१३.

१०. पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन्स, कोल्हापूर, २००३, पृ.

११. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त, पृ. ६०८.

१२. तत्रैव, पृ. ७७९.

१३. द. वा. पोतदार, ग. ना. मुजुमदार, (संपा.) शिवचरित्र साहित्य खंड २, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३०, ले. १०४, पृ. १३७.

१४. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. २०२.

१५. मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, पृ. ६१५.

१६. तत्रैव, पृ. ७२९.

१७. राजवाडे वि. का. (संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २ (सुधारीत आवृत्ती, देशपांडे प्र. न. : संपा.), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, २००३, ले. १०.

१८. मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, पृ. ६२७.

१९. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. १३, श्लो. ४४, पृ. ११९.

२०. मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, पृ. ६४२.

२१. राजवाडे वि. का. (संपा.), खंड ३, उपरोक्त, ले. ७८.

२२. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली – करीना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ. १८१.

२३. मेहेंदळे ग. भा. उपरोक्त, पृ. ६६५.

२४. आपटे द. वि., स. म. दिवेकर, (संपा.), शिवचरित्रप्रदीप, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९२५, पृ.५५.

२५. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. १७७.

२६. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. ११, श्लो. ४ ते ८, पृ. ९२.

२७. तत्रैव, अ. १३, श्लो. ८ ते १२, पृ. ११५.

२८. राजवाडे वि. का. (संपा.), मराठ्याच्या इतिहासाची साधने – खंड २, (सुधारित आवृत्ती), उपरोक्त, ले. ३०२.

२९. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. १३, श्लो. १२ ते १४, पृ. ११५.

३०. तत्रैव, अ. १३, श्लो. ५१ ते ५६, पृ. १२१.

३१. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. १८३.

३२. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. १४, श्लो. ९४, पृ. १४४.

३३. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. १८५.

३४. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. २४०

३५. मेहेंदळे ग. भा., खंड १, भाग १, उपरोक्त, पृ. ६८५.

३६. तत्रैव, पृ. ६९४.

३७. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. १५, श्लो. ३८, पृ. १५२.

३८. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. १५.

३९. पुरंदरे कृष्णाजी वासुदेव (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड १, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९२६, लेखांक ९२.

४०. जोशी श. ना., ग. ह. खरे (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड ३, श. न. जोशी, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३०, लेखांक ६३९.

४१. मेहेंदळे ग. भा., खंड १, भाग १, उपरोक्त, पृ. ७७०.

४२. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. १६, १७.

४३. मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, पृ. ७२९.

४४. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, पृ. १७.

४५. मेहेंदळे ग. भा., खंड १, उपरोक्त, पृ. ७०५.

४६. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, पृ. २१.

४७. मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, पृ. ९१३.

४८. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, पृ. ३१.

४९. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ३३२.

५०. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, पृ. २१५.

५१. कुलकर्णी अनुराधा (संपा.), शिवछत्रपतींची पत्रे खंड १, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०११, पृ. ७७.

५२. मेहेंदळे ग. भा., भाग २, उपरोक्त, पृ. १२८७.

५३. पोतदार द. वा. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड २, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे. १९३०, ले. २१७, पृ. २१४.

५४. तत्रैव, ले. २३९, पृ. २३१.

५५. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, पृ. ७.

५६. तत्रैव, पृ. १८५.

५७. पोतदार द. वा., शिवचरित्र साहित्य खंड २, उपरोक्त, ले. २२५, पृ. २२२.

५८. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ८३.

५९. चित्राव सिद्धेश्वरशास्त्री, भारतवर्षी मध्ययुगीन चरित्रकोष, प्रकाशक, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पुणे, १९३७, पृ. ८१४.

६०. मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, पृ. १०५८.

६१. मेहेंदळे ग. भा., खंड १, भाग १, उपरोक्त, पृ. ६८२.

६२. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. २३९.

६३. जोशी श. ना., ग. ह. खरे (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड ३, उपरोक्त, ले. ५८०, पृ. १८२.

६४. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. २०७.

६५. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. १७, २५, १८३.

६६. पोतदार दत्तो वामन, ग. ना. मुजुमदार (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड २, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३०, ले. २३८, पृ. २२९.

६७. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. २०२

व

मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, पृ. ६१२.

६८. कुलकर्णी अनुराधा गोविंद, उपरोक्त, पत्र क्रमांक ११, पृ. ३५.

६९. कुलकर्णी अनुराधा गोविंद, पटवर्धन (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड १५, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१२, ले. १००, पृ. १४९.

७०. सासवडकर प्र. ल., छत्रपती शिवाजी महाराज (लेखसंग्रह), सेवा प्रकाशन, अमरावती, १९८१, पृ. ५०.

७१. मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, खंड १, भाग २, पृ. ८९१.

७२. बेंद्रे वा. सी., महाराष्ट्रेतिहासाची साधने, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६६, ले. ९४, पृ. ९६.

७३. राजवाडे वि. का., समग्र राजवाडे साहित्य खंड ११, (शिवछत्रपतीची बखर), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, पृ. २६२.

७४. जोशी श. ना., ग. ह. खरे, (संपा.) शिवचरित्र साहित्य, खंड ३, उपरोक्त, लेखांक ६३३, पृ. २१४.

७५. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, ले. ५१७, पृ. १३९.

७६. मेहेंदळे ग. भा., खंड १, भाग १, उपरोक्त, पृ. ६६८.

७७. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, पृ. १७.

७८. मेहेंदळे ग. भा., उपरोक्त, पृ. ९५१.

७९. हेरवाडकर र. वि., सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. ४१.

८०. राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ३, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, २००२, ले. ७.

८१. तत्रैव, ले. ९.

८२. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. २१.

८३. कुलकर्णी अनुराधा गोविंद, शिवछत्रपतींची पत्रे, ले. ६२, पृ. २१३.

८४. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. २११.

८५. मुजुमदार ग. ना. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड ५, (कावजी मल्हार प्रभू याच्या घराण्याचा करिना), भा. इ. स. मंडळ, पुणे, १९४२, ले. ७७३, पृ. १७.

८६. कुलकर्णी म.रा., महाराष्ट्रातील प्रसिद्ध सरदार घराणी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९, पृ. ५.

८७. मेहेंदळे ग. भा., खंड १, भाग १, उपरोक्त, पृ. ६७८.

८८. कुलकर्णी अ. रा., (संपा.), उपरोक्त, पृ. ४१.

८९. हेरवाडकर र. वि., उपरोक्त, पृ. ८.

९०. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २१, श्लो. ७९, पृ. २१०.

९१. राजवाडे वि. का., समग्र राजवाडे साहित्य खंड ११, उपरोक्त, पृ. २६३.

९२. चित्राव सिद्धेश्वरशास्त्री, उपरोक्त, पृ. ५६५.

९३. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. १८५.

९४. कुलकर्णी अनुराधा (संपा.), उपरोक्त, पृ. ६९.

९५. हेरवाडकर र. वि. (संपा.) , उपरोक्त, पृ. ८३.

९६. चित्राव सिद्धेश्वरशास्त्री, उपरोक्त, पृ. ५६५.

९७. कुलकर्णी अनुराधा (संपा.), उपरोक्त, लेखांक १३ व १५, पृ. ४१ व ५५.

९८. तत्रैव, पृ. २८२.

९९. चित्राव सिद्धेश्वरशास्त्री, उपरोक्त, पृ. ७६३.

१००. शेजवलकर त्र्यं. शं., श्री शिवछत्रपति, संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९६४, पृ.३६९.

१०१. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २१, श्लो. ७५ ते ७८, पृ. २०९.

१०२. मेहेंदळे ग. भा., खंड १, भाग २, उपरोक्त, पृ. १२८०.

१०३. देशमुख विजय, शककर्ते शिवराय, (उत्तरार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर, १९८६, पृ. ७४१.

१०४. शिवभारत, उपरोक्त, अ. ३०, श्लो. ४० ते ५१, पृ. ३१०.

१०५. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ६७.

१०६. भावे वा. कृ., शिवकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, १९९८, द्वितीय आवृत्ती, पृ.१३०.

---

## प्रकरण तिसरे

# अष्टप्रधान मंडळातील सेनापतींचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान व भूमिका


| | |
|---|---|
| ३:१ | प्रस्तावना |
| ३:२ | अष्टप्रधान मंडळाची निर्मिती |
| ३:३ | अष्टप्रधानांची कामे व कर्तव्ये |
| ३:४ | अष्टप्रधान मंडळातील सेनापतीचे स्थान |
| ३:५ | छत्रपती शिवाजी महाराजांची लष्करी व्यवस्था व सेनापती |
| ३:६ | सेनापतीची जबाबदारी |
| ३.७ | समारोप |

## प्रकरण तिसरे

# अष्टप्रधान मंडळातील सेनापतींचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान व भूमिका

## ३:१ प्रस्तावना :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले 'स्वराज्य' ही घटना भारताच्या इतिहासातील अभूतपूर्व अशी घटना आहे. पुणे प्रांती असलेल्या आपल्या छोट्या जहागिरीचे त्यांनी मोठ्या राज्यात रूपांतर केले. सर्व देशभर मुघल, आदिलशाही, निजामशाही, कुतूबशाही इत्यादी राजवटी पसरल्या होत्या. यादव घराण्याच्या अस्तानंतर जवळजवळ ३०० वर्षे महाराष्ट्र परतंत्र होता. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी येथील मुस्लीम सत्तांच्या विरोधाला न जुमानता साम, दाम, दंड, भेद इत्यादी विविध मार्गांचा अवलंब करून या सत्तांना यशस्वीपणे तोंड दिले व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करीत असताना सर्व जाती–जमातींच्या लोकांना एकत्र आणून त्यांच्याकडून स्वराज्य उभारणीचे कार्य घडवून आणले. सर्व जातीच्या लोकांना त्यांच्या आवडी–निवडीप्रमाणे कामे दिली. खेड्यापाड्यातील या अडाणी जनतेत त्यांनी राष्ट्रप्रेम निर्माण केले. स्वराज्यासाठी लढणाऱ्या शूर विरांची मालिकाच त्यांनी उभी केली. म्हणून या वीरांनी छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्यासाठी वेळप्रसंगी आत्मबलिदान करण्यासही मागेपुढे पाहिले नाही. तसेच महाराजांनीही हे राज्य जनतेसाठी कल्याणकारी व्हावे याची काळजी घेतली. त्यादृष्टीने आपल्या स्वराज्याचे मुलकी व लष्करी प्रशासन उभे केले. त्यांनी स्वराज्याचे सुराज्य करण्याचा प्रयत्न केला. हे राज्य जगद्‌न्मान्य व्हावे व आपणास राजा म्हणून मान्यता मिळावी म्हणून त्यांनी स्वत:स राज्याभिषेक करून घेतला. अष्टप्रधान नेमले, कायदे केले, नाणी पाडली व धर्माप्रमाणे म्हणजे कायद्यावर अधिष्ठीत राज्य करीन असे देव, गुरू व अग्नी यास साक्ष ठेवून वचन दिले. राजकिय स्वातंत्र्याबरोबरच त्यांनी जनतेस सुराज्याचे अभिवचन दिले.[१]

'प्रजेचे सुख तेच राजाचे सुख, प्रजेचे हित तेच राजाचे हित' या प्राचीन विचारसरणीला अनुसरून महाराज वागलेले दिसतात. एखादा मुलूख ताब्यात आला कि तेथे संरक्षण (लष्करी व्यवस्था) व सुव्यवस्था निर्माण केली जात असे. राजा किंवा राजाचे अधिकारी यांच्याकडून जनतेवर कसल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही यासाठी महाराज सदैव दक्ष असत. एका ध्येयाने प्रेरित झालेला समाज महाराजांनी निर्माण केला. त्यांच्या काळात समाजात जातीभेद, पंथभेद, आर्थिक विषमता नव्हती असे नाही. पण राष्ट्र कार्य हे या सर्वाहून श्रेष्ठ आहे आणि आपले सामाजिक, आर्थिक, धार्मिक भेद हे राष्ट्र कार्याच्या आड येवू नयेत अशी शिकवण त्यांनी लोकांना दिली. कर्तव्यातील ढिलाई, लाचखाऊपणा त्यांना अजिबात आवडत नसे. प्रभावळीच्या एका ब्राह्मण सुभेदाराने आपल्या कामात कुसूर केला. तसेच तो आपल्या शत्रूला सामील झाला असावा अशी शंका महाराजांना आली. त्यावेळी (१६७५) त्यास महाराज लिहितात, ''हबशियांनी कांही देऊन आपले चाकर तुम्हाला केले असतील, त्याकरीता ऐसी बुद्धी केली असेल, तरी ऐशा चाकरास ठीकेठीक केले पाहिजे. ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो.''[२] खंडोजी खोपडे हे महाराजांचे आश्रीत, पण आयत्यावेळी तो अफजलखानाला जावून मिळाला. त्याला महाराजांनी जबर शिक्षा केली. थोडक्यात म्हणजे स्वराज्याच्या विरुद्ध कारवाई करणाऱ्यांना महाराजांनी कडक शासन केले. वरिल एक उदाहरण मुलकी प्रशासनातील तर दुसरे लष्करी प्रशासनात येवू शकते. मुलकी व लष्करी या दोन्हीही क्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी कडवी शिस्त निर्माण केली होती. ही प्रशासन व्यवस्था कार्यक्षम व गतिमान चालावी म्हणूनच महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी लष्करी प्रशासनाइतकेच मुलकी प्रशासनालाही तेवढेच महत्त्व दिले होते. एवढेच नव्हे तर अनेकवेळा त्यांनी मुलकी प्रशासनातील अधिकाऱ्यांना लष्करी मोहिमांच्या कामकाजाची जबाबदारी सोपविलेली दिसते. मुलकी प्रशासन व लष्करी प्रशासनाची सुरेख गुंफण त्यांनी घातलेली दिसते. अष्टप्रधान मंडळ हे त्यांच्या राज्यकारभाराचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते. राज्यातील मुलकी, लष्करी, धार्मिक,

न्यायालयीन, परराष्ट्र निती, आर्थिक इत्यादी अनेक विभागातील कामकाजाची जबाबदारी या अष्टप्रधान मंडळातील सदस्यांवर सोपविलेली होती. मंडळातील सदस्य त्या निरनिराळ्या खात्याचे प्रमुख होते. या सर्वांच्यावर नियंत्रण छत्रपतींचे रहात असे. अष्टप्रधान मंडळातील सेनापतीचे स्थान पहात असताना अष्टप्रधान मंडळ व त्यांच्या कामाचे स्वरूप यांची आपणास थोडक्यात माहिती घ्यावी लागेल.

## ३:२ अष्टप्रधान मंडळाची निर्मिती :

अष्टप्रधान मंडळ हा महाराजांच्या मुलकी कारभार–व्यवस्थेचा महत्त्वाचा पैलू होता. महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती आपला राज्यकारभार कार्यक्षमतेने चालावा या हेतुने केली होती. हे अष्टप्रधान मंडळ शिवराज्याभिषेकाच्यावेळी पुर्णत्वास गेल्याचे दिसते. परंतु त्याची सुरूवात सन १६४१ पासून सुरू झालेली दिसते. इ. स. १६४१ मध्ये शहाजी राजांनी बंगलोरहून शिवाजी राजांबरोबर शामराव निळकंठ यांची पेशवा म्हणून, बाळकृष्णपंत हणमंते यांची अमात्य म्हणून, सोनोपंत यांची डबीर म्हणून व रघुनाथ बल्लाळ यांची सबनीस म्हणून, माणकोजी दहातोंडी यांची सरनौबत म्हणून नेमणूक करून हे अधिकारी पाठवले होते. हे सर्व अधिकारी बाल शिवाजीला राज्यकारभारात सहाय्य करीत होते.[३]

छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ एकदम नेमणूका करून अस्तित्वात आलेले नाही किंवा चला आता स्वराज्य स्थापनेबरोबर आता प्रशासन पाहण्यासाठी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती करूया अशा प्रकारे अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात आलेले नाही. महाराजांचे स्वराज्य आकारास येवू लागल्यानंतर त्यांनी राज्याच्या गरजेनुसार निरनिराळ्या अधिकाऱ्यांची नेमणूक केल्याचे दिसते. स्वराज्याचा विस्तार होवू लागल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा मुघल, आदिलशाही, सिद्दी इत्यादी अनेक सत्तांशी लष्करी संघर्ष होवू लागला. तेव्हा त्यांना लष्करावर नियंत्रण ठेवण्यासाठी सेनापतीची गरज भासू लागली. दादोजी कोंडदेव हे सन १६४७ मध्ये वारल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात सेनापतीपद निर्माण केले व त्यावर माणकोजी दहातोंडे यांची नियुक्ती केली. याचदरम्यान सामराज नीळकंठ यांची पेशवेपदी नेमणूक झाली.

जावळीचा विजय मिळविल्यानंतर स्वराज्याच्या सीमा अरबी समुद्रापर्यंत जावून पोहचल्या. त्यानंतर काही दिवसातच महाराजांनी काही पदाधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. ते म्हणजे निळो सोनदेवास सुरनीस पदावर, गंगाजी मंगाजीस वाकनिस पदावर, येसाजी कंकास पायदळाचा सेनापती व नेताजी पालकर यांना सर्व सैन्याचा सेनापती म्हणून नियुक्त केले. यापैकी येसाजी कंक हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्ण काळात अखेरपर्यंत त्या पदावर होते. बाकीच्या पदाधिकाऱ्यात मात्र बदल झालेला दिसून येतो. पुढील काळात महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाचा इतिहास सविस्तर आढळत नाही.

सामराज नीळकंठ हे मृत्यू कधी पावले यांची निश्चित तारीख समजत नाही. परंतु कर्तबगारीत ते कमी पडले म्हणून त्यांना पेशवेपदावरून कमी केले. पुढे त्या पदावर काही काळ नरहरपंत व महादेव मतिमंत हे होते. इ. स. १६६३ मध्ये महाराजांनी महादेव मतिमंत यांनाही पेशवे पदावरून काढून टाकले व त्या जागी मोरो त्रिंबक (मोरोपंत) यांना नेमले. मोरोपंत हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंत पेशवे पदावर होते.[४]

बाळकृष्ण त्रिमल हणमंते हे छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले मुजूमदार (अमात्य) होते. शहाजी महाराजांच्या काळापासून सेवेत असणारे हणमंते १६५६ पर्यंत मुजूमदार होते. इ. स. १६५६ मध्ये त्यांचे पुत्र वासुदेव बाळकृष्ण यांची नेमणूक अमात्य पदावर झाली. त्यानंतर इ. स. १६६२ मध्ये निळो सोनदेव हे त्या पदावर आले. ते त्या पदावर २१/३/१६६२ पासून इ. स. १६७४ पर्यंत होते. राज्याभिषेकाच्या वेळी निळो सोनदेवचे पुत्र नारो नीळकंठ व रामचंद्र नीळकंठ हे अमात्य पदावर आलेले दिसतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६६८ मध्ये अण्णाजी दत्तो यांना सुरनीस म्हणून नेमले. याच काळात वाकनीस पदावर असलेले गंगाजी मंगाजी यांचा मृत्यू झाल्यानंतर वाकनिस पदावर दत्ताजी त्रिबंक यांची नेमणूक करण्यात आली.[५]

शहाजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांची कार्यक्षेत्रे वेगवेगळ्या ठिकाणी असली तरी शहाजी राजांनी आपल्या पदरी असलेली अनेक लायक माणसे छत्रपती शिवाजी राजांकडे पाठवलेली दिसतात. कांहीजण आपण होवून छत्रपती शिवाजी महाराजांकडे येत

असत. रघुनाथ उर्फ रघुनाथ पंडीत चाऊरकर उर्फ चावरे हे त्यापैकी होत. ते शहाजींपाशी बंगलोरास पंडितराव पदावर होते. तेथून ते छत्रपती शिवाजी महाराजांकडे आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांची इ. स. १६६१ मध्ये पंडितराव पदावर नेमणूक केली. ते त्या पदावर १६७३ पर्यंत होते. सन १६७२ नंतर त्यांचे नाव पंडितराव म्हणून राज्याभिषेकावेळी घेतले असले तरी त्यांच्या वार्धक्यामुळे त्यांचे चिरंजीव मोरेश्वर पंडीत हे पंडीतराव म्हणून कामकाज पहात होते. ते त्या पदावर १३ वर्ष म्हणजे १६८५ पर्यंत होते. रघुनाथ पंडीत हे महाराजांच्या मृत्यूपूर्वी इ. स. १६८० मध्ये मरण पावले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रधान मंडळात न्यायाधीश हे पद निर्माण करून इ. स. १६६८ च्या  दरम्यान त्या पदावर निराजी रावजी यांची नेमणूक केल्याचे दिसते. ते अतिशय हुशार व बुद्धीमान होते. छत्रपती शिवाजी महाराज व इंग्रज संबंधात त्यांनी चांगली भूमिका बजावलेली दिसते. इंग्रज वकिल ऑक्झिंडेन याचा त्यांच्यावर फार विश्वास होता. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रभाकरभट्ट राजोपाध्ये यांना आपल्या दरबारी पुरोहित (उपाध्याय) म्हणून इ. स. १६५३ च्या दरम्यान सेवेत घेतले होते. ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वीच दिवंगत झाले.[६]

प्रधान मंडळाच्या इतिहासावरून लक्षात येते कि, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीच्या प्रारंभापासूनच प्रधान मंडळाची निर्मिती होण्यास सुरूवात झाली व त्यात वेळोवेळी वाढ होत जावून राज्याभिषेकाच्या वेळी ते अष्टप्रधान मंडळ पूर्ण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी अष्टप्रधान मंडळ होते ते पुढीलप्रमाणे –

**छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्याभिषेकावेळचे अष्टप्रधान मंडळ**

| क्र. | **पद** | **प्रधानाचे नांव** |
|---|---|---|
| १. | मुख्य प्रधान (पेशवे) | मोरो त्रिंबक (मोरोपंत) |
| २. | अमात्य (मुजूमदार) | नारो निळकंठ, रामचंद्र नीळकंठ |
| ३. | सेनापती (सरनौबत) | हंबीरराव मोहिते |
| ४. | सचिव (सुरनीस) | अण्णाजी दत्तो |
| ५. | मंत्री (वाकनीस) | दत्ताजी त्रिंबक |
| ६. | पंडीतराव | रघुनाथपंत |
| ७. | सुमंत (डबीर) | रामचंद्र त्रिंबक |
| ८. | न्यायाधीश | निराजी रावजी |

## ३:३ अष्टप्रधानांची कामे व कर्तव्ये :

मल्हार रामराव चिटणीस यांच्या 'शककर्ते श्री शिवछत्रपती महाराज' या बखरीत अष्टप्रधानांची कामे व कर्तव्ये सांगितली आहेत. तसेच इतिहास संशोधक का. ना. साने यांना अष्टप्रधानाबद्दलची माहिती सांगणारा एक कागद सातारच्या छत्रपतींच्या दप्तरखान्यात सापडला तो त्यांनी 'सनदापत्रे' या पुस्तकात प्रकाशित केलेला आहे.

१. **मुख्य प्रधान (पेशवे)** :

मुख्य प्रधानाने सर्व राज्यकारभार पहावा, राजपत्रावर शिक्का करावा. सेना घेऊन युद्धे करावीत. नवीन मुलूख ताब्यात येईल तो रक्षून व त्याचा बंदोबस्त करून आज्ञेत रहावे. नेमून दिलेल्या प्रदेशाचा राज्यकारभार करावा. इतर प्रधानाशी समान बुद्धीने वागावे. राजहित सर्वात महत्त्वाचे समजावे. नि:स्वार्थी वृत्ती ठेवून राज्याची व महाराजांची सेवा करावी. सर्व सरदारांनी त्याजबरोबर जावे.

२. **अमात्य** :

यांनी राज्याच्या उत्पन्नाचा व खर्चाचा जमाखर्च पहावा. दप्तरदार व फडणवीस यांच्याकडून तपासून घेवून छत्रपतींना सादर करावा. छत्रपती जो प्रदेश नेमून देतील त्या

प्रदेशाचा राज्यकारभार पहावा. छत्रपतींच्या आज्ञापत्रावर राज्याच्या व महालाच्या हिशेबी कागदपत्रांवर आपली मुद्रा करावी. वेळ प्रसंगी लष्कराचे अधिपत्य करून युद्धावर जावे.

३. **सेनापती** :

सर्व सेनेचे रक्षण करावे. सेनेचे अधिपत्य करून लष्करी मोहिमेवर जावे. शत्रुचा पराभव करावा व नवीन प्रदेश जिंकावा. नव्याने जिंकलेल्या प्रदेशाचे संरक्षण करावे. सेनेत जे पराक्रम गाजवतील त्यांची नांवे छत्रपतींना सांगून पराक्रमी लोकांचा गौरव करावा. त्यांना बक्षिसे द्यावीत. मानसन्मान करावा. फौजेच्या अडिअडचणी छत्रपतींच्या कानावर घालाव्यात. युद्धातील लुटीचा हिशेब द्यावा. सर्व सेनाधिकाऱ्यांनी सेनापतीच्या आज्ञा पाळाव्यात.

४. **सचिव** :

छत्रपतीचा सर्व पत्रव्यवहार सचिवाने पहावा. त्यांनी राजपत्रातील मजकूर तपासून अधिक उणे अक्षर शोधून मजकूर शुद्ध करावा. राजपत्रावर संमत असे लिहावे. युद्धात सेनेचे नेतृत्त्व करावे. नव्याने जिंकलेल्या मुलूखाचा कारभार पहावा. महाल–परगण्याचा हिशेब तपासून त्यावर संमत असे लिहावे.

५. **मंत्री (वाकनीस)** :

याने राज्याच्या राजकिय व राजनैतिक बाबी सांभाळाव्या. राज्याच्या हेरव्यवस्थेवर देखरेख ठेवावी. परदरबारच्या पाहुण्यांचे आगत स्वागत करावे. छत्रपतींची दिनचर्या लिहावी. त्यांनी केलेल्या कार्याची नोंद ठेवावी. महाराजांच्या भोजनातील पदार्थांची तपासणी करावी. त्याविषयी दक्ष असावे. राजपत्रावर 'संमत' असे चिन्ह लिहावे. वेळप्रसंगी लष्कराचे अधिपत्य करावे व नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार करावा.

६. **पंडीतराव** :

सर्व धार्मिक अधिकार यांच्या संमतीने चालावेत. पुढे आलेल्या खटल्यात धर्म व अधर्म पाहून अपराध्यास शिक्षा करावी. समाजातील परंपरा, आचार–विचार, प्रायश्चित्त या संबंधीच्या राजपत्रावर त्याने संमतिदर्शक मुद्रा करावी. पंडीत, विद्वान, ब्राह्मण यांचा सन्मान

करावा. यज्ञ, शांती, होमहवन, अनुष्ठान यासारख्या गोष्टी करणे आवश्यक असल्यास छत्रपतींना सुचवून त्याप्रमाणे नियोजन करून त्या पार पाडाव्यात.

७. **सुमंत (डबीर)** :

सुमंत याने राज्याचा परराष्ट्र व्यवहार पहावा. परराज्यातील राजकारणावर लक्ष ठेवावे. परदरबाराचे वकिल आपल्या दरबारी आल्यावर त्यांचे आगत–स्वागत करावे. त्यांच्याशी छत्रपतींच्या सल्ल्याने बोलणी करावीत. पर–राज्यातील राजकारण छत्रपतींना निवेदन करावे. त्यांच्या विचाराने डावपेच आखावेत. वेळप्रसंगी सैन्याचे नेतृत्त्व करून मोहिमावर जावे. राजपत्रावर संमती चिन्ह करावे.

८. **न्यायाधीश** :

राज्यातील सर्व प्रकारच्या खटल्यावर न्यायाधीशाचा अधिकार चालावा. खटल्यातील न्याय व अन्यायाची बाजू पाहून न्यायदान करावे. न्यायदान करताना छत्रपतींच्या चारित्र्याला दोष न लागेल असे निष्पक्षपातीपणे न्यायदान करावे. ब्रह्मसभेकडून दिल्या जाणाऱ्या न्यायदानावर लक्ष ठेवावे. राज्यातील प्रमुख खटल्यांच्या निकालपत्रावर 'संमत' असे चिन्ह करावे.[७]

राज्याभिषेकानंतर मृत्यूपर्यंत महाराजांनी आपल्या प्रधान मंडळात फारसा बदल केलेला दिसत नाही. परंतु याचा अर्थ त्यांनी अकार्यक्षम प्रधानांना ठेवले असा नाही. राज्याभिषेकाप्रसंगी निवडलेले सर्व प्रधान महाराजांच्या परिक्षेस उतरले होते ते त्यांना कार्यक्षम वाटत होते. अकार्यक्षम प्रधानास काढून टाकल्याची अनेक उदाहरणे राज्याभिषेकापूर्वी घडून गेलेली आहेत. थोडक्यात म्हणजे जे प्रधान कर्तबगार होते, त्यांना महाराजांनी मुद्दाम दूर केले नाही. परंतु जे अकार्यक्षम होते, त्यांना दूर करण्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी कसूर केली नाही.

## ३:४ अष्टप्रधान मंडळातील सेनापतीचे स्थान :

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलले अष्टप्रधान मंडळ हे त्यांच्या स्वराज्याचे एक आगळे वेगळे वैशिष्ट्य मानावे लागेल. नूतन निर्माण झालेल्या स्वराज्यातील चांगल्या

प्रशासनाची ती एक सुरूवात होती. छत्रपती शिवाजी महाराजांना जनकल्याणकारी राज्य हवे होते. सामान्य माणूस, आपल्या राज्यातील शेतकरी–कष्टकरी यांच्यावर आपल्या अधिकाऱ्याकडून अन्याय व अत्याचार होवू नये अशी भूमिका महाराजांनी सदैव घेतलेली दिसते. तसेच राज्यात स्त्री जातीचा सन्मान राखला जावा, कोणत्याही स्त्रीवर कसल्याही प्रकारचा अत्याचार होवू नये याची दक्षता छत्रपती शिवाजी महाराजांनी सदैव घेतलेली आहे. हे सर्व चांगल्या प्रशासनामुळेच शक्य होत असते व राज्याचे प्रशासन चांगले चालावे म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केलेली होती.

अष्टप्रधान मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे महाराजांनी ही पदे वंशपरंपरागत पद्धतीने कधी भरली नाहीत. त्यांनी लायक व्यक्तीलाच त्या त्या पदावर नेमले. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या प्रधानांना महाराजांनी रोख पगार दिले. कोणासही जहागिरी दिली नाही. तसेच पंडीतराव व न्यायाधिश हे दोन प्रधान सोडल्यास बाकीच्या सर्व प्रधानांना प्रसंग पडेल तेव्हा लष्करी मोहिमांवर जावे लागत असे. अष्टप्रधान मंडळाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्याकडे राज्यकारभाराची संयुक्त जबाबदारी सोपविण्यात आली होती. मुलकी व लष्करी एकात्मता साधण्याचा प्रयत्न महाराजांनी या ठिकाणी केलेला दिसतो.[८]

अष्टप्रधान मंडळातील सर्व सदस्यांना समान महत्त्व होते, असे अनेक इतिहासकार म्हणतात किंवा घटनात्मकदृष्ट्या त्यात तथ्य मान्य केले तरी व्यवहारात मुलकीदृष्ट्या पेशवे यांना व लष्करीदृष्ट्या सेनापतीला जास्तीचे महत्त्व असल्याचेच दिसून येते. महाराजांच्या राज्याभिषेकप्रसंगी अष्टप्रधानांना दिलेल्या मानपानात सोन्याच्या दांडीच्या चवरींचा मान पेशवा व सेनापती या दोघांनाच दिलेला दिसतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेस सुरूवात केल्यानंतर अनेक शत्रुंनी त्यांच्या विरुद्ध आक्रमक भूमिका घेतलेली दिसते. मुघल, विजापूरचे आदिलशहा व इतर अनेक सत्तांनी छत्रपतीशिवाजी महाराजांची सत्ता वाढूच द्यावयाची नाही. असे ठरवून महाराजांवर हल्ले करण्यास सुरूवात केली. अशा वेळी राज्य टिकविणे, वाढविणे व त्या राज्याला स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी प्रारंभीच्या काळात महाराजांना शत्रुवर विजय

मिळविणे गरजेचे होते. छत्रपती शिवाजी महाराज हे स्वत: उत्कृष्ट सेनापती होते. परंतु एकाच वेळी ते अनेक मोहिमांवर जावू शकत नव्हते किंवा एकाच वेळी ते अनेक शत्रुशी लढू शकत नव्हते. म्हणून त्यांनी सेनापतीचे पद निर्माण कले. आपल्या सैन्यातील पराक्रमी, शूर व धाडसी माणसांची सेनापतीपदावर नियुक्ती केली. पायदळ प्रमुख म्हणून येसाजी कंकांची नियुक्ती केली. तर घोडदळाचे लष्करप्रमुख म्हणून माणकोजी दहातोंडेनंतर नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते यासारखे पराक्रमी सेनानी पुढे आले. तसेच तानाजी मालुसरे, बाजीप्रभु, कान्होजी व सर्जेराव जेधे हे पितापुत्र, बाजी पासलकर, मोरोपंत इत्यादी सेनापतीच्या तोडीची अनेक माणसे छत्रपती शिवाजी महाराजांनी पुढे आणली.[९]

राज्य असेल तरच मुलकी प्रशासनाचा प्रश्न येतो. म्हणूनच नूतन स्वराज्य निर्माण केल्यानंतर त्या राज्याचा विस्तार होणे छत्रपती शिवाजी महाराजांना अतिशय महत्त्वाचे वाटत होते. म्हणूनच त्यांचा बराचसा वेळ शत्रुपक्षाशी लढाया, त्यांचे गड जिंकणे, पैसा उभा करण्यासाठी शत्रूपक्षाची शहरे लुटणे व लष्करी मोहिमा यशस्वी करून राज्य विस्तार करणे यातच गेला. त्यासाठी त्यांना निष्ठावान प्रबळ अशा लष्कराची व सेनापतीची साथ लाभली. यादृष्टीने नेताजी पालकर, प्रतापराव गुजर व हंबीरराव मोहिते यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य उभारणीसाठी बहुमोल साथ दिली. तसेच पुढील काळात औरंगजेबाच्या स्वराज्यावरील स्वारीच्या वेळी सेनापती हंबीरराव मोहिते, सेनापती संताजी घोरपडे, सेनापती धनाजी जाधव यांनी २५ वर्षे झुंज देवून मराठ्यांचे राज्य औरंगजेबाला जिंकू दिले नाही. यावरून सेनापती या पदाचे महत्त्व आणि अधिकार लक्षात येतात.

इतिहासकार वासुदेव कृष्ण भावे आपल्या शिवराज्य व शिवकाळ या ग्रंथात म्हणतात, ''शिवाजीपेक्षा त्यांच्या सेनापतींनीच अधिक युद्धप्रसंग केले. मोठमोठाल्या लढाया त्यांनीच मारल्या आणि ते स्वाभाविक होय. पुढाऱ्यांचा मुख्य गुण हाच आहे. जो सेनापती आपल्या–सारखे नवे सेनापती निर्माण करतो तोच खरा सेनानी होय. या दृष्टीने नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते, आनंदराव यादव, तानाजी मालुसरे, मोरोपंत पिंगळे, इत्यादींसारखे अनेक सेनापती छत्रपती शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झाले व त्यामुळे

स्वराज्य संपादनाचा त्याजवरील भार पुष्कळ हलका झाला. .... त्यांनीही (शिवाजीने) अनेक लढाया मारल्या. त्याला धाडसाची फार हौस होती. त्याकामी तो स्वत:चा जीव आनंदाने धोक्यात घालीत असे. अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावरील हल्ला व आग्रा भेट ही धाडसी कृत्ये दुसऱ्या कोणावर न सोपवता त्याने स्वत: मोठ्या शिताफीने पार पाडली.''[१०]

काही वेळा एकाच वेळी अनेक शत्रुंनी स्वराज्यावर चाल केली तर त्यावेळी या अनेकांशी स्वत: छत्रपती शिवाजी महाराज व सेनापतींना तोंड देणे अवघड होत असे. म्हणून अशा वेळी शिवाजी महाराजांनी पंडीतराव व न्यायाधिश हे दोन प्रधान सोडल्यास राहिलेल्या सर्व प्रधानावर लष्करी मोहिमांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी टाकलेली दिसून येते. प्रसंग पडल्यास त्यांना सैन्य घेवून शत्रुशी लढावयास जावे लागत असे. त्यामुळे मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो इत्यादी प्रधानांनी अनेकवेळा लष्करी मोहिमाचे नेतृत्व केल्याचे दिसते. म्हणजे त्या मोहिमाचे सेनापतीपदच स्विकारले होते असे म्हणावे लागेल.

### ३:४:१ मराठ्यांचा गनिमी कावा :

मराठ्यांच्या विशिष्ट युद्ध पद्धतीस गनिमी कावा म्हणतात. गनिम म्हणजे शत्रु – त्याच्याशी करावयाचा कावा – धुर्तपणा म्हणजे गनिमी कावा होय. या युद्धपद्धतीत छत्रपती शिवाजी महाराज अगदी तरबेज होते. किंबहुना त्या पद्धतीचा ते गुरू होते, असे म्हटल्यास चूक होणार नाही. या पद्धतीत प्रबळ अशा शत्रुपक्षांशी तोंड देवून लढण्यापेक्षा त्याच्याभोवती घिरट्या घालून त्याच्यावर अधूनमधून हल्ले करणे, त्याची रसद तोडणे, त्याच्या सभोवतालचा प्रदेश लुटून बेचिराख करणे व त्याला रसद मिळू न देणे, त्याच्या छावणीवर छापे घालून त्यास त्रस्त करणे कि ज्यायोगे शत्रूने हताश होवून आपल्या स्वराज्यातून निघून जावे. गनिमी काव्यासाठी डोंगराळ व झाडीचा प्रदेश उपयुक्त ठरत असे. छत्रपती शिवाजी महाराज, त्यांचे सेनापती व सैन्य गनिमी कावा युद्धपद्धतीत तरबेत होते. फत्तेखान, अफजलखान, रूस्तुमजमा, सिद्दी जोहर, शाहिस्तेखान, जयसिंग इत्यादी अनेक सरदार त्यांच्यावर चाल करून आले त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सेनापतींनी हेच डावपेच लढवून आपला बचाव केला. या युद्धतंत्राने शत्रूचा पूर्ण मोड झाला नाही तरी बलाढ्य

व सैन्यसंख्या मोठी असलेल्या शत्रुपासून मराठ्यांच्या स्वराज्याचा व फौजेचा बचाव झाला. नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, येसाजी कंक, आनंदराव यादव, हंबीरराव मोहिते इत्यादी सेनानींनी शत्रुपक्षास सळो कि पळो करून सोडले होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे सैनिक छापा घालण्यास आले कि मोगलांच्या छावणीत 'शिवाजी आले, शिवाजी आले' असा ओरडा उठे. सारांश शिवाजी हे सामान्य नाम होवून मराठे म्हणजेच शिवाजी असा समानार्थी शब्द बनला होता.''[११]

नेताजी पालकरने तर वेगवान हालचाली करून शत्रुपक्षावर अनेक विजय मिळवून स्वराज्यास बळकटी आणली होती. म्हणून अनेकवेळा काही इतिहासकार या सेनापतीला 'प्रती शिवाजी' म्हणत असत. पराक्रमाबाबत तीच भूमिका प्रतापराव गुजर व हंबीररराव मोहित्यांची होती.

## ३:५ छत्रपती शिवाजी महाराजांची लष्करी व्यवस्था व सेनापती :

राज्यरूपी रथाची मुलकी शासन व्यवस्था व लष्करी शासन व्यवस्था ही चाके आहेत. त्यापैकी एक जरी नसेल, तर तो रथ निकामी होईल. मुलकी शासनाइतकेच लष्करी प्रशासनाला महत्त्व असते. आर्य ऋषी शुक्राचार्यांनी लष्कराचे महत्त्व सांगताना म्हटले आहे कि, ''सैन्याद्विना नैव राज्यं। न धनं न पराक्रम:।।३।।'' अर्थ :– सैन्यावाचून राज्य, धन व पराक्रम यांना काही अर्थ उरत नाही. कोणत्याही राष्ट्राचे (राज्याचे) अस्तित्व व सामर्थ्य मुख्यत्वेकरून सैन्यावर अवलंबून असते. व सैन्याचा प्रमुख सेनापती असतो. तोही तेवढाच साहसी, पराक्रमी व शूर वीर असावा लागतो. सेनापती व सर्व सैन्य, शिस्तबद्ध, धाडसी व पराक्रमी असेल आणि राजाच्या पुर्ण नियंत्रणात असेल तर राज्याचा विस्तार होण्यास वेळ लागत नाही.[१२]

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभारातील हे मूलभूत सूत्र जाणले होते. महाराजांची स्वराज्य स्थापना, मराठ्यांनी करून दाखविलेला पराक्रम व त्यांनी संपादित केलेली विविध प्रकारची संपत्ती ही त्यांच्या कार्यक्षम लष्करी व्यवस्था शासन व्यवस्थेमुळेच अस्तित्वात येवू शकली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करात कमालीची शिस्त होती.

साधेपणा व शिस्त ही महाराजांच्या लष्कराची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्यासाठी अनेक नियम तयार केले होते. ते नियम म्हणजे –

१) लष्करात बायका, दासी, कलावंतीणी, वेश्या आणू नयेत.

२) स्व: प्रदेशाप्रमाणेच शत्रू प्रदेशातील स्त्रियांना हात लावू नये. त्यांची विटंबना करू नये. उलट त्यांचा आदर करावा.

३) मोहिमेवर असताना मुस्लीम अगर इतर कोणत्याही धर्मियांच्या धर्मस्थानाचा व धर्मग्रंथाचा आदर करावा.

४) गाई पकडून मारू नयेत. ओझ्यासाठी बैलाचा वापर करावा.

५) लुटीतील कोणताही माल सैनिकांनी आपल्याजवळ ठेवू नये. तो सरकारात जमा करावा.

६) सेनाधिकाऱ्यांनी मोहिमाचा सर्व जमाखर्च, लुटीतील प्राप्तीचा हिशेब मोहिमेवरून परत आल्यावर लगेच सरकार दरबारी सादर करावा.

असे अनेक नियम छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार केले होते. सैनिकांनी जनतेवर अत्याचार करू नये. तसेच तंबुतील दिवाबत्तीपासून घोड्याची काळजी घेण्यापर्यंत अनेक वेळा आपल्या सेनापतीला व भागाधिकाऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज स्वत: सूचना देत असत. त्या सूचना, ते नियम, सेनाधिकाऱ्यापासून सामान्य सैनिकांपर्यंत पाळल्या जातात कि नाही, हे पहाणे लष्कराचा प्रमुख या नात्याने सेनापतीचे काम असे. महाराजांच्या अपेक्षेप्रमाणे या सेनापतींनी सर्व सैन्यामध्ये शिस्त ठेवली होती. त्यांना गनिमा कावा युद्धपद्धती शिकवली. अनेक पराक्रम केले व स्वत:च्या जीवावर उदार होवून शिवाजी महाराजांना स्वराज्य उभारणीत साथ दिली.[१३]

प्रारंभीच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांची सैन्य संख्या काही हजारात होती. त्यावेळी महाराजांच्या फौजेची जी शिस्त, साधेपणा व पराक्रम होता. तीच शिस्त, साधेपणा पुढील काळात घोडेस्वार व पायदळ मिळून दोन लाखाच्या घरात गेली तरी चालू होती. हे

विशेष म्हणावे लागेल. अर्थात छत्रपती शिवाजी महाराजांची ही परंपरा तंतोतंत राबवण्याचे काम पायदळ प्रमुख येसाजी कंक व घोडेस्वार लष्कर प्रमुख नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते यांनी केले. फंदफितुरी महाराजांना अजिबात आवडत नसे. नियम मोडणाऱ्या सैनिकाला व अधिकाऱ्याला कडक शासन केले जाई. ज्या योगे दुसऱ्या सैनिकांना त्याची जरब बसत असे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या लहानशा पुण्याच्या जहागिरीतून स्वराज्य स्थापनेचा उद्योग केला. भोवताली मोगल व आदिलशहासारख्या प्रबळ राजांचे प्रदेश होते. काल परिस्थितीला अनुरूप व  साधन सुलभतेप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले युद्धतंत्र निर्माण केले. मावळांतील डोंगर दऱ्याखोऱ्यातील काटक मावळ्यांना आपले सैनिक म्हणून गोळा केले. हे सर्व मावळे युद्धकला शिकलेले होते असे नव्हे. ज्यांना युद्धकलेचे ज्ञान नव्हते अशा सर्वांना ठिकठिकाणी छावण्या पडल्यानंतर तलवार, भाला चालविण्याचे शिक्षण दिले जाई. सैन्याच्या निवडीपासून प्रशिक्षणापर्यंतचे सर्व कामकाज छत्रपतींच्या मार्गदर्शनाखाली सेनापतीमार्फतच पार पाडले जात असे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांकडून जशी पराक्रमाची, विजयाची अपेक्षा बाळगली तद्वत महाराज आपल्या सैनिकांच्या प्राणास फार जपत असत. 'होता होईतो सैनिकांचे बळी कमी कसे पडतील' याविषयी ते दक्ष असल्याने सैनिक त्यांच्यावर खूष असत. महाराज आपल्या सैनिकांना रोख पगार देत असत. विशेष पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकांची माहिती मागवून त्यांचा गौरव करून त्यांना बक्षिस दिले जाई. त्यांना बढती दिली जाई. लढाईत जखमी झालेल्यांना किंवा अपंग झालेल्यांना त्यांच्या जखमांचे स्वरूप बघून दुसऱ्या नेमणुका दिल्या जात. लढाईत जे सैनिक ठार झाले त्यांच्या बायका मुलांना तैनात असे. उदा. अफजलखानाशी झालेल्या युद्धात जे पडले त्यांच्या पुत्रहीन विधवांना नवऱ्याच्या पगाराच्या निम्मे तैनात त्यांनी मंजूर केली. तसेच ज्यांचे मुलगे कामावर घेण्यासारखे होते त्यांना बापाच्या कामावर नेमण्यात आले. जखमींना २५ ते २०० होन अशी योग्यतेप्रमाणे बक्षिसे देण्यात आली. सेनापती व बडे योद्धे यांना हत्ती, घोडे मिळाले, काहींना कडी, तोडे,

हार, तुरे, चौकडे, कंठे मिळाले. (सभासद) या सर्व प्रक्रियेत पारदर्शकता होती. अगदी घोडेस्वारातील हवालदार व पायदळातील नाईकापासून सरसुभेदारापर्यंत सर्वांच्या पराक्रमाची माहिती गोळा करून ती माहिती महाराजांपर्यंत सेनापतींना सादर करावी लागे.[१४]

## ३:६ सेनापतीची जबाबदारी :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सेनापती हे पद अतिशय संवेदनाक्षम होते. 'महाराज हे स्वत: महान सेनानी होते.' असे सर्व इतिहासकार मान्य करतात. सन १६४५ ते १६८० या ३५ वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी प्रचंड लष्कर उभारले व एकामागून एक असे विजय मिळविले. या लष्करी मोहिमामध्ये सेनापतीवर फार मोठी जबाबदारी असे. महाराज पन्हाळगडावर सिद्दी जोहारच्या वेढ्यात अडकून पडले त्यावेळी शाहिस्तेखानाने पुण्यात तळ ठोकला होता. त्यावेळी नेताजी पालकरने शत्रुच्या प्रदेशात लुटालूट करून उच्छाद मांडला होता. शत्रुचे लक्ष विचलित केले होते. असे अनेक पराक्रम नेताजी पालकर, प्रतापराव गुजर व हंबीरराव मोहित्यांनी केले होते. या लष्करी यशापयशास हे सेनापतीच जबाबदार असत. लष्करीदृष्ट्या एक चूक सुद्धा स्वराज्याच्या दृष्टीने फार महागात पडत असे. हे सेनापती प्रतापराव गुजर यांच्या उदाहरणावरून दिसुन येते. उमराणीच्या लढाईत प्रतापरावांनी बहलोलखानाचा पराभव केला व त्यास पकडणे शक्य असतानाही त्याच्या दया–याचनेवरून महाराजांच्या सल्ल्याविना त्यास सोडून दिले हि गोष्ट महाराजांना आवडली नाही व त्यांनी प्रतापरावांना जाब विचारला. त्याच बहलोलखानाने पुढे स्वराज्याला किती उपद्रव दिला व त्याच्यापायीच प्रतापरावांनीही स्वत:चा शेवट करून घेतला हे आपण इतिहासात पाहतोच. थोडक्यात म्हणजे लष्करी मोहिमात सेनापतीला सतर्क राहून योग्य निर्णय घेणे गरजेचे असे.

लष्करी मोहिमावर असताना कुणीही कामात कुचराई, दिरंगाई केलेली महाराजांना आवडत नसे. अशा व्यक्तीला ते तत्काळ शिक्षा करीत किंवा जाब विचारत असत. यातून वरिष्ठ अधिकारीही सुटले नाहीत. खुद्द नेताजी पालकांवरही एका मोहिमेत दिरंगाई झाल्याने महाराजांचा रोष ओढवला होता. त्यावेळी नेताजींनाही तो अपमान वाटून ते छत्रपती शिवाजी महाराजांचा पक्ष सोडून प्रथम आदिलशहाकडे व नंतर मुघलाकडे गेले. परंतु महाराजांनी

चुकीबद्दल क्षमा केली नाही. पुन्हा कालांतराने आपल्या चुका लक्षात येवून नेताजी पालकर ९ वर्षानंतर महाराजांकडे परत आले. त्यावेळी महाराजांनी त्याचे स्वागतच केले. थोडक्यात म्हणजे महाराजांच्या काळात हे सेनापतीपद म्हणजे अतिशय जबाबदारीचे पद होते. छत्रपती शिवाजी महाराजांशी मोहिमानिमित्त सदैव सेनापतींचा संबंध येत असल्याने सेनापतीला नेहमी तत्पर व जागृत रहावे लागत असे.

अष्टप्रधान मंडळातील काही प्रधानांना ज्याप्रमाणे आवश्यकता भासेल त्यानुसार लष्करी मोहिमावर जावे लागे. त्याप्रमाणे सेनापतींनाही स्वराज्यातील काही इतर कामे करावी लागत असत. सेनापतीला फौजेच्या अडिअडचणी छत्रपतींच्या कानावर घालाव्या लागत असत. नवीन जिंकलेल्या प्रदेशाचे संरक्षण करावे लागत असे. महाराजांनी सोपविल्यास काही प्रदेशाचा कारभारही खालच्या महसूल अधिकाऱ्यामार्फत पहावा लागत असे. काही वेळा सेनापतीने न्यायनिवाडा केल्याचीही उदाहरणे आहेत. उदा. नेताजी पालकर हे सेनापती होते. तेव्हा अनेकवेळा त्यांचा मुक्काम ज्या ठिकाणी असे त्या भागात त्यांनी रयतेच्या न्याय–निवाड्याची कामे केलेली दिसतात.

## ३:७ समारोप :

थोडक्यात म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हळूहळू गरजेप्रमाणे विकसीत होत गेले असले तरी महाराजांना सेनापतीपदाची गरज प्रारंभापासूनच होती. अगदी सरनौबत म्हणून नसले तरी एखाद्या मोहिमेची जबाबदारी एखाद्यावर सोपविणे, त्याच्याकडून सैन्यावर नियंत्रण ठेवणे हे कार्य सेनापतीप्रमाणेच आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे स्वत: सर्वश्रेष्ठ सेनानी असल्याने या महानायकाच्या हाताखाली एकापेक्षा एक वरचढ सेनापती तयार झाले. महाराजांच्या ३५ वर्षाच्या कालखंडात अनेक लढाया झाल्या. काही प्रसंग त्यांच्या जीवावर बेतणारे होते. या सर्वांना तोंड देताना महाराजांना थोडीसुद्धा उसंत मिळाली नाही. तीच अवस्था त्यांच्या सेनाधिकाऱ्यांची होती. छत्रपती शिवाजी महाराजाच्या काळात लष्कर व त्याचा प्रमुख सेनापती यांना खूपच महत्त्व होते. महाराजांनी जिथे घाम गाळला तिथे त्यांच्या सैन्याने रक्त सांडले. त्यामुळेच इतक्या अडीअडचणीतून हे स्वराज्य उभे राहिले.

**संदर्भ :**


१. कुलकर्णी अ. रा. व खरे ग. ह. (संपा.), 'मराठ्यांचा इतिहास' खंड १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ३६६–३६७.

२. तत्रैव, पृ. ३६९.

३. भट वामन भास्कर, 'शिवाजीची राजनीती', राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९४१, पृ. १८.

४. भावे वा. कृ., 'शिवराज्य व शिवकाल', प्रकाशक नारायण वासुदेव भावे, पुणे, १९५७, पृ. १५८.

५. तत्रैव, पृ. १६१.

६. तत्रैव, पृ. १६४ – १६६.

७. भट वामन भास्कर, उपरोक्त, पृ. ११३ – ११४.

८. कुलकर्णी अ. रा. व खरे ग. ह. (संपा.), उपरोक्त, पृ. २८० – २८१.

९. तत्रैव, पृ. ३६८.

१०. भावे वा. कृ., उपरोक्त, पृ. १३८

११. तत्रैव, पृ. १३३.

१२. भट वामन भास्कर, उपरोक्त, पृ. २०६.

१३. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, पृ. ३७०.

१४. तत्रैव, पृ. २९२.

## प्रकरण चौथे

# स्वराज्याचे प्रारंभीचे सेनापती


| | |
|---|---|
| ४:१ | प्रास्ताविक |
| ४:२ | छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्करी धोरण |
| ४:३ | छत्रपती शिवाजी महाराज स्वत:च एक सेनानी |
| ४:४ | स्वराज्याची सैन्य उभारणी |
| ४:५ | स्वराज्याच्या प्रारंभीच्या लढ्याचे सेनापती |
| ४:६ | तुकोजी चोर |
| ४:७ | माणकोजी दहातोंडे |
| ४:८ | नूरबेग |
| ४:९ | येसाजी कंक |
| ४:१० | समारोप |

## प्रकरण चौथे

# स्वराज्याचे प्रारंभीचे सेनापती

## ४:१ प्रास्ताविक :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यस्थापनेच्या कार्याला सुरूवात केल्यानंतर मराठ्यांच्या इतिहासातील लष्करी युगाचा प्रारंभ झाला. शिवाजीराजांना एक प्रबळ राजसत्ता निर्माण करून येथील अराजकता मोडून काढावयाची होती. त्यासाठी त्यांनी आपल्या वडीलांच्या लहानशा जहागिरीत स्वत:चे स्वराज्य स्थापन करून सैन्य उभारण्यास सुरूवात केली. स्वराज्याची लष्कर उभारणी प्रारंभी पायदळापासून सुरू झाली. सह्याद्रीच्या डोंगराळ भागात लढाईसाठी किंवा स्वराज्य संरक्षणासाठी आदर्श सैन्य म्हणजे बलशाली पायदळ हवे होते. स्वराज्याच्या प्रारंभी महाराजांच्या पायदळाची संख्या पाच हजार होती. ती हळूहळू वाढत जावून अखेरीस एक लाखांपर्यंत पोहोचली. पायदळाच्या सहाय्याने स्वराज्य स्थापनेचा उपक्रम सुरू केल्यानंतर त्याचे संरक्षण आणि विस्तारासाठी घोडदळ उभारले गेले.

स्वराज्याच्या लष्करात पायदळ व घोडदळ या दोन स्वतंत्र शाखा असून त्याचे प्रमुखास 'सरनौबत' असे म्हटले जात असे. सरनौबत हा शब्द सेनापती या अर्थाने वापरला जात असे. पायदळ व घोडदळ या दोन्हीवर स्वतंत्र सरनौबत नेमले जात. पायदळापेक्षा घोडदळ किंवा पागा यांचा उपयोग लढाईच्या प्रसंगी वेगवान हालचाली करण्यासाठी जास्त होत असे. त्यामुळे लष्करात पायदळापेक्षा घोडदळाचे महत्त्व थोडेसे जास्त होते. साहजिकच घोडदळाचा सरनौबत ही जास्त मानाची जागा होती व संपूर्ण लष्कराचा सरनौबत (सरसेनापती) म्हणून घोडदळाचा सरनौबत यासच ओळखले जात असे.

प्रस्तुत प्रकरणात छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्करी धोरण, एक सेनानी म्हणून त्यांचे कार्य, त्यांनी केलेली सैन्य उभारणी, स्वराज्याच्या प्रारंभीच्या लढ्याचे नेतृत्व करणारे कावजी, प्रारंभीचे सरनौबत माणकोजी दहातोंडे, तुकोजी चोर, नूरबेग व येसाजी कंक यांचे कार्य याविषयी थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

## ४:२ छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्करी धोरण :

छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्य स्थापना म्हणजे दक्षिणेमधील एक क्रांतीच होती. हे क्रांतिरूपी स्वराज्य कोणालाही चिरडता आले नाही. आदिलशहाला चिरडून टाकता आले नाही. एवढेच नव्हे तर हिंदुस्थानातील प्रबळ सत्ता मुघल सत्तेलाही हे स्वराज्य चिरडता आले नाही. काबूलपासून बंगालपर्यंत व काश्मीरपासून कावेरीपर्यंत ज्याचे साम्राज्य पसरले होते व जो २२ सुभ्यांचा व ५० कोटी महसूलांचा धनी होता अशा आलमगीर औरंगजेब बादशहालाही जंगजंग पछाडूनही हे मराठ्यांचे राज्य नष्ट करता आले नाही. कारण या मराठी स्वराज्याचे निर्माते हेच एक महान सेनानी व कुशल प्रशासक होते.

पुणे प्रांती चार परगण्यांच्या छोट्या जहागिरीचे महाराजांनी मोठ्या राज्यात रूपांतर केले नव्हे नवीन राज्याचीच स्थापना केली. त्यांनी मोठे लष्कर उभारले. प्रारंभी त्यांची सैन्य संख्या पाच हजार होती. ती सैन्य संख्या राज्याभिषेकाच्या वेळी दोन ते तीन लाखाच्या घरात गेली होती. मोठमोठ्या लढाया खेळून त्यांनी नेत्रदीपक विजय मिळविले. साम, दाम, दंड, भेद या चतुरस्त्र नितीचा वापर करून आपले राज्य वाढविले.[१] शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना, घटना व वृद्धी ज्या राजनितीच्या आश्रयाने केली तिचे स्थूलमानाने दिग्दर्शन मोठ्या मार्मिकपणे रामचंद्रपंत अमात्यांच्या आज्ञापत्रात दिलेल्या खालील उताऱ्यांवरून दिसून येते.

''दक्षिण प्रांती इदिलशाही, कुतूबशाही व निजामशाही, ही पराक्रमी महान सकलार्थे समृद्धीमंत संस्थाने, तसेच मोंगल एक एक सुभा लक्ष लक्ष स्वारांचा, या विरहित शामल, फिरंगी, इंग्रज, वलंदेज, रामनगरकर, पाळेगार, सौंदे, बिदनूर, म्हैसूरवाले, त्रिचनापल्ली, आदिकरून संस्थानिक तसेच जागजागी पुंड, चंदरराव, शिरके, सावंत, दळवी, वरघांटे निंबाळकर, घाटगे आदिकरून देशमुख व कटक सकळ ही पराक्रमी सज्ज, ते सामान पुरें असतांही बुध्दी वैभव पराक्रमे कोणाची गणना न करिता, कोणावर चालुन जावून कोणाशी तुंबळ युध्द करून, रणाशी आणले, कोणावर छापे घातले, कोणास परस्पर कलह लावून दिले, कोणाचे मित्रभेद केले, कोणाचे डेऱ्यात शिरोन मारामारी केली; कोणाशी एकांगी करून

पराभविले, कोणाशी स्नेह केले, कोणाच्या दर्शनास आपण होवून गेले, कोणास दर्शनास आणले, कोणास परस्पर दुगे करविले कोणी इतर प्रयत्ने न कळत त्यांच्या देशात जबरदस्तीने स्थळे बांधून अनुक्रमे आकळीले, जलदुर्गसहित होते त्यास नूतनच जलदुर्ग निर्माण करून पराभविले, दुर्घट स्थळे नौकामार्गे प्रवेशिली, असे ज्या ज्या उपाये जो जो शत्रू आकळावा त्या त्या उपाये तो शत्रू पादाक्रांत करून सालेरी अहिवंतापासून चंजी कावेरी पर्यंत निष्कंटक राज्य, शतावधी किल्ले तसेच जलदुर्ग, किती एक विशाल स्थळे, चाळीस हजार पागा, साठ सत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाती, कोट्यावधी खजिना, तसेच उत्तम जडजवाहिर सकळ वस्तुजात संपादिले.''[२] या उताऱ्यामध्ये अमात्यांनी शिवाजी महाराजांच्या लष्करी धोरणाचे, त्यांनी शत्रूंना कोणकोणत्या मार्गानी नामोहरम केले, येणाऱ्या सर्व संकटांना यशस्वीपणे तोंड देत स्वराज्य स्थापनेचे व विस्ताराचे कार्य कसे पार पाडले, याचे समर्पक वर्णन केलेले आहे.

## ४:३ छत्रपती शिवाजी महाराज स्वत:च एक सर्वोत्तम सेनानी :

शिवाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास करणारा कोणीही इतिहासप्रेमी त्यांचे जगातील 'एक महान सेनानी' असे वर्णन केल्याशिवाय राहणार नाही. इ. स. १६४५ ते १६८० या ३५ वर्षांच्या त्यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी प्रचंड लष्कर उभारले. एका मागून एक असे मोठमोठे विजय मिळविले. त्यांची कारकिर्द अभ्यासणारे अनेक लेखक, त्यांच्या काळातील इतिहासकार, व्यापारी, कवींनी त्यांच्या रणकौशल्याबद्दल मोठी स्तुती केली आहे. कृष्णाजी अनंत सभासदासारखा तत्कालीन बखरकार त्यांच्या अफजलखानावरील विजयाचे वर्णन करताना म्हणतो 'शिवाजी राजा भिमच त्यांनीच अफजल मारीला. हे कर्म मनुष्याचे नव्हे. तो अवतारीच होता तरिही हे कर्म केले.' या विधानातील अवतार कल्पना बाजूला केली तरी शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे महत्त्व कमी होत नाही. इतर अनेक स्वकीय लेखकांनी महाराजांना परशुराम, रामचंद्र, कृष्ण, बलराम इत्यादी पौराणिक सेनापतींच्या पंगतीस बसविले आहे. तर इंग्रजासारख्या पाश्चात्य व्यापाऱ्यांनी महाराजांना अलेक्झांडर, हॉनिबल, सीझर यांच्या पंगतीस नेवून बसविले आहे. अशा या थोर सेनापतींच्या कर्तबगारीचे अनेक पैलू दिसून येतात.

शिवाजी महाराजांच्या एकूण कारकिर्दीत विजापूरच्या आदिलशहाने व उत्तरेतील मुघल बादशहाने एका मागून एक असे अनेक शूर सेनानी शिवाजी राजाचा मोड करण्यासाठी पाठवले. परंतु एकही सेनानी विजयी होवू शकला नाही. आदिलशाही सरदार अफझलखान याची वाताहत कशी झाली हे इतिहासप्रसिद्ध आहे. शाहिस्तेखानावर छापा घालून त्याची फजिती शिवाजी राजांनी केली. हे अति धाडसाचे काम होते. शहाजादा मुरादबक्ष, मुअज्जम, जसवंतसिंग इत्यादी नामांकित सेनानींशी शिवाजी राजांनी यशस्वीपणे तोंड दिले. जयसिंगाने महाराजांना दबविले परंतु त्याला त्यांचा मोड करता आला नाही. उलट महाराजांनी मुघलांवर अशी बाजू उलटविली की जयसिंगाला परतीच्या वाटेवर असताना विष घेवून आत्महत्या करावी लागली. थोडक्यात म्हणजे मुघल किंवा आदिलशाही पैकी कोणताच सेनानी शिवाजी महाराजांच्या रणकौशल्यापुढे टिकला नाही.

शिवाजी महाराजांनी ज्या ज्या वेळी स्वराज्यावर मोठी संकटे आली, धोकादायक प्रसंग निर्माण झाले त्यावेळी त्यांनी स्वत:च जीव धोक्यात घालून विजय मिळविले. आपल्या सरदारांच्यावर कामगिऱ्या सोपवून ते स्वस्थ बसले नाहीत. अफजलखान वध, शाहिस्तेखानावरील छापा, पन्हाळ्याला सिद्दी जोहारने दिलेला वेढा हे सर्व प्रसंग जीवावर बेतणारे होते. पण ही कामगिरी त्यांनी स्वत: पार पाडली. स्वराज्य स्थापनेच्या सुरवातीच्या काळात अनेक मोहिमांचे त्यांनी स्वत: नेतृत्व केले. तसेच अनेक मोठ्या लष्करी मोहिमा त्यांनी स्वत: पार पाडल्या. उंबर खिंडीची लढाई, वणी दिंडोरीची लढाई, कर्नाटकातील शेरखान लोदीची लढाई इत्यादी अनेक लढायात महाराजांनी स्वत: तलवार हाती घेवून मोठे पराक्रम केले. 'लढे सिपाई नाम सरदार का' अशा वृत्तीने महाराज कधीच वागले नाहीत.

नेपोलियनच्या पराक्रमाविषयी त्यांच्या काळात असे म्हटले जात असे कि, रणांगणातील नेपोलियनची उपस्थिती म्हणजे ४० हजार सैन्याची उपस्थिती होय. महाराजांचा लौकिक ही असाच होता. त्यांचे नुसते नांव ऐकताच शत्रूची घाबरगुंडी उडून जाई. लष्करीदृष्ट्या वेगवान हालचाली करण्यात त्यांच्याइतकी चपळता त्या काळात अन्य व्यक्तीत आढळत नाही. आज येथे तर उद्या शे–पन्नास मैलावर अशा त्यांच्या हालचाली असत.

त्यामुळे त्या काळात त्यांच्याबद्दल अनेक दंतकथा निर्माण झाल्या होत्या. गनिमी कावा युद्ध पद्धतीत त्यांचा हात धरणारा दुसरा सेनानी आढळत नाही. महाराजांनी आपल्या आयुष्यात शेकडो लढाया गनिमी कावा युद्ध पद्धतीने केल्या व स्वत:चे राज्य वाढविले. प्रारंभीच्या काळात त्यांनी सेनापतीपद निर्माण केले नव्हते. स्वत:च ती भूमिका त्यांनी पार पाडली. दादोजी कोंडदेवांच्या निधनानंतर त्यांनी आपल्या सैन्यात पायदळ व घोडदळ असे दोन वेगवेगळे सेनापती नेमले. या सेनापतींना लष्करी मोहिमांबरोबरच सैन्यात देखरेख ठेवणे, त्यांच्यात शिस्त राखणे इत्यादी कामे करावी लागत होती.

## ४:४ स्वराज्याची सैन्य उभारणी :

शिवाजी राजांची पुण्यास पाठवणी करताना शहाजी राजांनी त्यांच्याबरोबर हत्ती, घोडे व पायदळ दिल्याचा उल्लेख शिवभारतात आहे.[३] शिवाय पुणे जहागिरीचा कारभार पाहणाऱ्या दादाजी कोंडदेवाजवळ काही सैन्य होते. परंतु ही सैन्यसंख्या अपूरी होती. त्यामुळे युद्धप्रसंगी शिवाजी राजांना मावळातील देशमुख व इतर वतनदार यांच्याकडून सैन्यपुरवठा होत असे. सन १६४८ च्या फत्तेखानाच्या स्वारीच्या वेळी शिवाजी राजांकडे २-३ हजारापर्यंत सैन्य असावे. परंतु यावेळी मावळातील अनेक देशमुख फौजेनिशी महाराजांना सामील झाले होते. फत्तेखानाच्या स्वारीत पराक्रम गाजविणाऱ्या बांदल, सिलिंबकर, झुंजारराव या मावळातील देशमुखांना शिवाजी महाराजांनी इनामे दिली होती. या इनामाविषयीच्या सन १६५०-५१ च्या पत्रामध्ये, ''गलबलियामध्ये आपल्या जमेतीनिसी साहेबाचे मसलतीस येवून येकतारी केली.'' (युद्धाच्या कठीण प्रसंगी सैन्यानिशी शिवाजी महाराजांच्या मदतीस येवून पराक्रम केला) असा उल्लेख आढळतो.[४] याचा अर्थ मावळातील हे देशमुख आपापल्या सैन्यानिशी युद्धात सहभागी झाले होते.

मावळातील देशमुखाप्रमाणे कोकणातील देशमुखांचे तात्पुरते सैन्य शिवाजी महाराजांनी पुढील काळात उभे केल्याचे दिसते. सन १६५१-५२ च्या दरम्यान शिवाजी महाराजांनी रायगडाजवळील बीरवाडी तप्याचे अधिकारी (देशमुख) माल पाटील व बाजी पाटील यांना दिलेला कौल नामा (अभयपत्र) उपलब्ध असून या पत्रात शिवाजी महाराज

म्हणतात, ''जे वख्ती साहेबास मसलतीचे काम पडेल ते वख्ती जैसे मावळे देशमुख आपले लोक घेउनु मसलतीस साहेबापासी येताहेती तेच हर निसबतीन जे वख्ती मसलतीचे काम साहेबास पडेल ते वख्ती आपण दाहा १० लोक बराबरी घेऊन साहेबांचे सेवेसी येउनू दररोज रोजमुराबदल अडसेरी रूके ६ सा दर नफरे घेउनू मसलती जोवरी असेली तोवरी साहेब काम करूनू मसलतीचे काम जालियावरी साहेब रजा देतील तेधवा गावास जाउनू म्हणौउनू मालूम केले.''[५]

माल पाटील व बाजी पाटील हे बीरवाडी तप्याचे देशमुख होते. हा तपा पूर्वी आदिलशहाच्या ताब्यात होता. नंतर तो प्रदेश जावळीच्या चंद्रराव मोरे याच्या वर्चस्वाखाली गेला. चंद्ररावाशी माल पाटील व बाजी पाटील यांचे संबंध चांगले नसल्यामुळे ते शिवाजी महाराजांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांच्याकडे आले होते. तेव्हा महाराजांनी त्यांना अभयपत्र देवून आपल्या सेवेत दाखल करून घेतले व गरज पडेल तेव्हा युद्धप्रसंगी सैन्यानिशी आपल्या मदतीस येण्यास सांगितले. मदतीस येणाऱ्या प्रत्येक सैनिकाला दैनंदिन भत्ता म्हणून ६ रूके दिले जाणार होते व काम संपल्यावर त्यांना घरी जाण्याची परवानगी दिली जाणार होती. रूका हे पावतोळे वजनाचे तांब्याचे नाणे त्याकाळी प्रचलित होते. ६ रूके म्हणजे साधारणपणे २ पैसे या दराने महिन्याचा पगार १/४ होन एवढा होतो.[६] सन १६६६ च्या बाजारभावानुसार १ पायली गव्हाची किंवा ज्वारीची किंमत ११ रूके होती.[७] सन १६५१ मध्ये रूक्याची किंमत यापेक्षा निश्चितच जास्त असावी. स्वराज्य स्थापनेच्या सुरूवातीच्या काळात खडे सैन्य उभारून त्याचा मोठा खर्च भागविणे शिवाजी महाराजांना शक्य नसल्यामुळे त्यांनी गरज पडेल तेव्हा मदतीस येणाऱ्या या तात्पुरत्या सैन्याचा पर्याय स्वीकारला असावा.

इ. स. १६५६ च्या जावळी मोहिमेच्यावेळी शिवाजी महाराजांची सैन्यसंख्या बरीच वाढलेली दिसते. शिवाजी राजे पुरंदरहून जावळीवर आक्रमण करण्याकरिता १० हजार सैनिकांसह निघाले असा उल्लेख शिवकाव्यात आढळतो.[८] अर्थात हे सर्व पायदळातील सैनिक होते. याशिवाय घोडदळ सैन्य वेगळे होते. माणकोजी दहातोंडे सरनौबत असताना त्यांच्या नेतृत्वाखाली पागा बाराशे (बारगीर) व दोन हजार शिलेदार एवढे घोडदळ सैन्य होते.

असे सभासदाने म्हटले आहे.[९] जावळी मोहिमेच्या वेळी माणकोजी दहातोंडे सरनौबत होते. यावरून जावळी मोहिमेच्यावेळी महाराजांची सैन्यसंख्या १२–१३ हजार असावी. जावळी विजयानंतर स्वराज्याच्या सैन्यसंख्येत भरीव वाढ झालेली दिसते. चंद्ररावाकडे १०–१२ हजाराचे सैन्य होते. जावळी विजयानंतर शिवाजी महाराजांनी तेथील मावळे सैनिकांना अभय देवून आपल्या लष्करात भरती करून घेतले.[१०] त्यामुळे महाराजांनी सैन्यसंख्या एकदम दुपटीने वाढली.

स्वराज्याची लष्कर उभारणी प्रारंभी पायदळापासून सुरू झाली होती. नंतरच्या काळात घोडदळाकडे लक्ष दिले गेले. कारण स्वराज्याचे संरक्षण व विस्तार करण्यासाठी घोडदळ उभारणे आवश्यक होते. हे घोडदळ दोन प्रकारचे असे. पहिला प्रकार बारगीरांचा तर दुसरा प्रकार शिलेदारांचा होता. बारगीर म्हणजे धन्याचा घोडा व धन्याची शस्त्रे वापरणारा घोडदळ सैनिक होय. शिलेदार म्हणजे स्वत:चा घोडा व शस्त्र वापरणारा घोडदळ सैनिक होय. घोड्याच्या खर्चाबद्दल त्याला काही रक्कम सरकारातून मिळत असे. परंतु महाराजांचा कटाक्ष स्वत:ची पागा (बारगीर घोडदळ) वाढविण्याकडे जास्त होता. माणकोजी दहातोंडे सेनापती असतानाच्या काळात घोडदळात २००० शिलेदार व १२०० बारगीर होते. म्हणजे घोडदळाच्या एकूण संख्येत शिलेदारांचे प्रमाण जास्त होते. परंतु १६५९ साली पागेची संख्या ७००० पर्यंत वाढली. पण त्यात ३००० च शिलेदार होते.[११] सन १६५६ ते १६५७ या काळात केलेल्या स्वाऱ्यात महाराजांना अनेक ठिकाणी घोड्यांची प्राप्ती झाली होती. संभाजी मोहित्यांकडून सुपे काबीज केले तेव्हा ३०० घोडे, मुघलांच्या जुन्नरवरील स्वारीत २०० घोडे तर अहमदनगरवरील स्वारीत ७०० घोडे महाराजांना लुटीत मिळाले होते.[१२] अफजलखान वधानंतर त्यांची ४००० उत्तम घोडी महाराजांना मिळाली. त्यामुळे बारगीर घोडदळ उभारण्याला मदत झाली. महाराजांच्या सैन्यात पागेच्या घोडेस्वारांची (बारगीर) संख्या शिलेदारांपेक्षा जास्त असे. असे सभासदाने म्हटले आहे. शिलेदार पागेच्या अधिपत्याखाली असले तरी त्यांच्यापेक्षा बारगीर घोडेस्वारामध्येच अधिक शिस्त असे. शिस्तप्रिय शिवाजी महाराजांचा बारगीर घोडदळावरच जास्त भरवसा असे. मुघल इतिहासकार खाफीखान

म्हणतो, ''शिवाजीकडे १० ते १२ हजार कच्छी आणि अरबी घोडे आहेत. म्हणून तो जेव्हा आपले सैन्य बाहेर पाठवितो त्यात बहुसंख्य घोडेस्वार बारगीत असतात.'' तर भीमसेन सक्सेना म्हणतो, ''शिवाजी राजांनी शिलेदार नेमले. परंतु मराठ्यांच्या बारगीराला जास्त वेतन मिळत असे.''[१३] एकूणच बारगीर सैन्य वाढवण्याकडेच महाराजांचा कटाक्ष होता. महाराजांचे शेवटचे सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या काळात घोडदळाची संख्या १,०५,००० एवढी झाली होती. त्यात ४५,००० शिलेदार तर ६०,००० बारगीर होते. यावेळी सरनौबत येसाजी कंक यांच्या नेतृत्वाखाली पायदळाची संख्या १,००,००० एवढी झाली होती.[१४]

## ४:५ स्वराज्याच्या प्रारंभीच्या लढ्याचे सेनापती :

बाळ शिवाजी व जिजाबाई यांची बंगलोरहून पुण्याला रवानगी करताना पुणे जहागिरीचा कारभार व्यवस्थित चालावा या उद्देशाने शहाजी राजांनी शामराज नीळकंठ पेशवे, बाळकृष्णपंत दिक्षीत मुजूमदार, सोनोपंत डबीर, सरनौबत माणकोजी दहातोंडे, रघुनाथ बल्लाळ, बाळाजी हरी या अधिकाऱ्यांना पाठविले होते. जिथे जहागिरी व तिचा कारभार मोठा असेल तर त्या ठिकाणी पेशवा, मुजूमदार, सरनौबत इत्यादी पदाचे अधिकारी पूर्वी नेमले जात असत. उदा. रोहिड खोऱ्याचे देशमुख कान्होजी जेधे यांच्या पदरी पेशवे या पदाचा अधिकारी होता.[१५] तसेच इतिहास प्रसिद्ध बाजीप्रभू देशपांडे हे हिरडस मावळचे बांदल देशमुखाच्या सैन्याचे सरनौबत म्हणून काम पहात होते.[१६] जहागिरदार, देशमुख मंडळी आपल्या पदरी कारभार पाहण्यासाठी निरनिराळे अधिकारी बाळगत असत. त्या काळात इतर जहागिरदारापेक्षा शहाजी राजांची जहागिरी बरीच मोठी होती. तेव्हा तेथील कारभार पहाणे व जहागिरीचे रक्षण करण्यासाठी शहाजी राजांनी काही अधिकारी पाठवले होते. तसेच या जहागिरीत शहाजी राजांचे लष्करही होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे कार्य सुरू केल्यानंतर तोरणा, राजगड व पुरंदर इत्यादी किल्ले ताब्यात घेतले. शिवाजी राजांच्या या हालचालीची दखल आदिलशाही दरबाराने घेतली. महाराजांची ही बंडखोरी आदिलशाही दरबाराला असह्य होत चालली होती. शिवाजीच्या या कार्यास शहाजी राजांची फूस असावी असे आदिलशहाला

वाटत होते. म्हणून विजापूर दरबाराने शहाजी राजांना कैद करावे व त्यांच्या कर्नाटकातील व महाराष्ट्रातील जहागिऱ्या जप्त कराव्यात म्हणून आदेश दिले. त्याप्रमाणे मुस्ताफा खानाने २५ जुलै १६४८ रोजी शहाजी राजे यांना कैद केले. तर इकडे फत्तेखानाला शिवाजी महाराजांचा मोड करण्यासाठी महाराष्ट्रात पाठवले. तर कर्नाटकातील शहाजी पुत्र संभाजीचा मोड करण्यासाठी आदिलशहाने फऱ्हादखान व तानाजी डुरे यांना फौजेसह पाठविले. परंतु या फौजेस संभाजी राजांनी यशस्वीपणे तोंड देवून फऱ्हादखानाला पराभूत केले व पळवून लावले.

फत्तेखान शिवाजी महाराजांचा मोड करण्यासाठी चालून आला. स्वराज्य स्थापनेच्या उद्योगानंतर हा पहिलाच मोठा संघर्ष होता. फत्तेखानाच्या सैन्यात बाळाजी हैबतराव, मुसेखान, फलटणचे राजे निंबाळकर, घाटगे इत्यादी आदिलशाही सरदार होते. यावेळी महाराज पुरंदरावर होते. तेथून त्यांनी फत्तेखानास प्रतिबंध करण्यासाठी 'कावजी' या शूर सेनानीच्या हाताखाली सैन्य रवाना केले. शिवभारतात त्याचा 'कावुक' असा उल्लेख केला आहे. फत्तेखान खळद बेलसर येथे छावणी करून होता. त्याचा सहाय्यक बाळाजी हैबतराव शिरवळपर्यंत पुढे आला होता. त्याच्याशी कावजीने लढाई करून त्यास ठार केले.[१७] दुसऱ्या दिवशी फत्तेखान महाराज होते त्या पुरंदरावर चालू आला. त्यावेळी गडावरील मराठा फौजेने त्याच्यावर त्वेषाने हल्ला चढविला व फत्तेखानाच्या सैन्याची दाणादाण उडविली. मुसेखान व इतर अनेकजण ठार झाले. फत्तेखानाने मात्र सहीसलामत तेथून पळ काढला.[१८]

या लढाईत कान्होजी जेधेंचा पुत्र बाजी याने मोठा पराक्रम केला. लढाईच्या धुमश्चक्रीत संकटात सापडलेले मराठ्यांचे निशाण (जरी पटका) या बहाद्दराने मोठ्या शौर्याने सुरक्षित राखले व विजय मिळवून परत गडावर आणले. महाराजांनी त्याचा गौरव करून त्यास 'सर्जेराव' हा किताब बहाल केला. याच युद्धयात महाराजांचा शूर सहाय्यक बाजी पासलकर रणांगणी ठार झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी खऱ्या अर्थाने समोरासमोर आदिलशाही सत्तेचा पराभव केला होता. यावेळी शिवाजी राजांनी सरनौबतपद नेमले होते कि नाही याबद्दल इतिहासात माहिती उपलब्ध नाही. परंतु फत्तेखानाच्या विरूद्धच्या मोहिमेचे नेतृत्व आपल्या फौजेतील

उत्कृष्ट सेनानी म्हणूनच कावजीकडे सोपविले होते. तो सरनौबतच्या तोडीचा होता. पण हा कावजी कोण होता याबद्दल इतिहासकारामध्ये मतभेद आहेत. कारण या कालखंडात शिवाजी महाराजांकडे या नावाची दोन माणसे संबंधित होती. एक म्हणजे मोसे खोऱ्याचे देशमुख बाजी पासलकर यांचे कारभारी कावजी मल्हार व दुसरे कान्होजी जेधे यांच्याकडे असलेले कावजी कोंढाळकर हे होय. शिवभारतात वर्णिलेले 'कावुका' (कावजी) म्हणजे कावजी मल्हार असावेत असे मानले जाते. परंतु इतिहास संशोधक गजानन मेहंदळे यांच्यामते या मोहिमेतील कावजी हे कावजी कोंढाळकर असावेत. शिवाजी महाराजांनी कावजी मल्हारला फत्तेखानाच्या बेलसर येथील छावणीवर छापा टाकण्याच्या कामगिरीवर पाठविले होते. परंतु सेनापती म्हणून नव्हे तर बाजी पासलकरांच्या बरोबर पाठविले. यावेळी कावजी मल्हारला मोसे खोऱ्याच्या कारभारीपणाचे वतन करून दिले, असा उल्लेख त्या घराण्याच्या एका करिन्यामध्ये आलेला आहे. परंतु या मोहिमेचे नेतृत्व महाराजांनी कावजी मल्हारकडे सोपविले असा उल्लेख या करीन्यात नाही. त्यामुळे शिवभारतात वर्णिलेला 'कावजी' हा कावजी मल्हार नसून कावजी कोंढाळकर असावा असे मेहंदळे यांचे मत आहे.[१९] हा कावजी कोंढाळकर कान्होजी जेधेकडे होता. व त्यास महाराजांनी आपल्याकडे मागून घेतले, असा उल्लेख जेधे शकावलीमध्ये आलेला आहे. थोडक्यात म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील या पहिल्या मोठ्या लढ्याचे नेतृत्व कावजीने केले हे मात्र निश्चित आहे.

## ४:६ तुकोजी चोर :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्कराचे सरनौबत म्हणून तुकोजी चोर यांचा उल्लेख सभासद बखरीमध्ये आलेला आहे. सभासद म्हणतात, ''सुपे देश साधिला, तुकोजी चोर मराठा म्हणोन लष्कराचा सरनौबत केला.''[२०] तुकोजी चोर स्वराज्याचे सरनौबत होते असे सांगणारे कागदपत्र सभासद बखरी शिवाय दुसरे कोणतेही उपलब्ध नाही. परमानंदांनी लिहिलेल्या 'शिवभारत' मध्ये सन १६४८ मध्ये फत्तेखानावरील स्वारीच्या वेळी लढणाऱ्या मराठा सेनानीमध्ये भिकाजी चोर व भैरव चोर या बंधूंचा उल्लेख आला आहे.[२१] परंतु शिवभारतात तुकोजी चोर यांचा उल्लेख आलेला नाही.

सभासद बखरीमध्ये दिलेल्या कालखंडात माणकोजी दहातोंडे सरनौबत असल्याचे सन १६५७ च्या महजरावरून दिसते. २१ मार्च १६५७ रोजी गुंजण मावळच्या देशमुखीच्या तंट्याचा निवाडा खुद्द शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत पुणे येथे झाला त्या निवाड्याच्या प्रसंगी उपस्थित असलेल्या लोकात (हाजीर मजालसीत) माणकोजी दहातोंडे व नूरबेग हे दोघेही उपस्थित असल्याचे दिसते. या तंट्याच्या निवाडापत्रावर (महजर) माणकोजींचा फार्सी सिक्का उमटवलेला असून त्यांच्या नांवाखाली 'सरनौबत' असे लिहिलेले आहे. यावरून सन १६५७ मध्ये माणकोजी दहातोंडे हे स्वराज्याचे सरनौबत होते हे सिद्ध होते.[२२]

शिवाजी महाराजांनी सुपे प्रांत संभाजी मोहिते मामाकडून (शहाजी राजांची दुसरी पत्नी तुकाबाई मोहिते यांचे बंधू) २४ सप्टेंबर १६५६ रोजी हस्तगत केला. त्यानंतर तुकोजी चोरास सरनौबत केले, असा उल्लेख सभासद बखरीत आहे. परंतु ते संभवत नाही. कारण सुपे प्रांत घेण्याअगोदर पासून माणकोजी दहातोंडे हे सरनौबत होते. त्यामुळे कदाचित माणकोजी दहातोंडे यांची सरनौबतपदी नेमणूक होण्याअगोदर अल्पकाळ तुकोजी चोर सरनौबत असावेत किंवा एखाद्या मोहिमेसाठी त्यांची प्रमुख म्हणून नेमणूक केलेली असावी. परंतु तुकोजी चोर यांच्या सरनौबतपदाबाबत सभासद बखरी व्यतिरिक्त अन्य साधनातून दुजोरा मिळत नाही.

## ४:७ माणकोजी दहातोंडे :

७ मार्च १६४७ रोजी दादोजी कोंडदेवाचा मृत्यू झाला. महाराजांचा एक प्रामाणिक व सचोटीचा कारभारी नाहीसा झाला. परंतु या घटनेनंतरच शिवाजी महाराजांच्या स्वतंत्र कारकिर्दीस सुरूवात झाली. स्वराज्य स्थापना व प्रशासनाबाबत महाराजांनी आता स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास सुरूवात केली. त्यांनी पुढील काळात काही नवीन अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. सन १६४९ मध्ये महाराजांनी सरनौबत अथवा मुख्य सेनापतीचे पद निर्माण केले व त्या पदावर माणकोजी दहातोंडे याची नियुक्ती केली.[२३] माणकोजी या पदावर इ. स. १६५७–५८ पर्यंत म्हणजे ८ – ९ वर्ष होते

शहाजी राजांनी जिजाबाई व शिवाजी राजे यांच्याबरोबर बंगलोरहून जे अधिकारी पाठवले होते, त्यात सरनौबत माणकोजी दहातोंडे हेही होते. ते शहाजी राजांचे विश्वासू अधिकारी होते. शिवाजी राजांना मदत करण्यासाठीच त्यांना पाठविण्यात आले होते. पुढील काळात त्यांची सरनौबतपदी निवड झाली. ते घोडदळाचे सरनौबत होते. त्यावेळी पायदळाचे सरनौबत 'नूरबेग' होते. माणकोजींना स्वराज्याचे पहिले सरनौबत म्हणून ओळखले जाते.

माणकोजी छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर जावळी मोहिमेत सहभागी झालेल्याचा उल्लेख ९१ कलमी बखरीत आलेला आहे. जावळी मोहिमेच्या वेळी स्वत: शिवाजी महाराज महाबळेश्वरहून निसणीचा घाट उतरून जावळीस आले. आणि माणकोजी दहातोंडे व रघुनाथ बल्लाळ सबनीस रडतोंडीच्या घाटातून जावळीस आले व जावळीस वेढा घालून जावळी जिंकली असा उल्लेख ९१ कलमी बखरीत आहे.[२४] संकर्षण सकळकळे या शिवाजी महाराजांच्या समकालीन कवीने लिहिलेल्या संस्कृत काव्यात (शिवकाव्य) जावळी मोहिमेचे वर्णन केले आहे.[२५] जावळी जिंकल्यानंतर चंद्ररावाच्या लोकांनी प्रतिकार चालू ठेवला होता तो मोडून काढण्यासाठी महाराजांनी आपल्या सेनापतीला पाठविले. याविषयी शिवकाव्यात पुढीलप्रमाणे वर्णन दिले आहे, ''..... तेव्हा कपटी शत्रूसैन्याचा नाश करण्याकरिता शिवाजीनेही कपटनीतीचा अवलंब केला. शत्रूचे सैन्य युद्धामुळे थकून एका ठिकाणी विश्रांती घेत असल्याचे दूताकडून ऐकल्यावर त्याने कपट युद्धात प्रवीण असलेल्या आपल्या सेनापतीला तिकडे पाठविले. तो सेनापती वेगाने तेथे गेला आणि जेवून व स्वत:ची सर्व शस्त्रे दूर ठेवून झोपलेल्या शत्रूसैन्याला त्याने अश्वत्थाम्याप्रमाणे पूर्णपणे कापून काढले.''[२६] वरील वर्णनात सेनापतीचे नाव सांगितले नाही. परंतु जावळी मोहिमेच्या वेळी माणकोजी सरनौबत असल्यामुळे ही कामगिरी त्यांनीच पार पाडली असावी.

सन १६५९ च्या अफजलखान वधापूर्वी शिवाजी महाराजांनी माणकोजी दहातोंडे यांच्याजागी घोडदळाचे सरनौबत म्हणून नेताजी पालकर यांची तर नूरबेग यांच्याजागी पायदळाचे सरनौबत म्हणून येसाजी कंक यांची नियुक्ती केली. मार्च १६५७ ते १६५९ या

काळात माणकोजींचा मृत्यू झाला असावा. किंवा वार्धक्यामुळे त्यांना या पदावरून दूर करून त्यांच्या जागी नेताजीची नियुक्ती केली गेली.

## ४:८ नूरबेग :

नूरबेग हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायदळाचे पहिले सरनौबत होते. शहाजी राजांनी इ. स. १६४२ मध्ये शिवाजी महाराजांकडे पाठवलेल्या विश्वासू सेवकांमध्ये नूरबेगचा समावेश होता. शिवाजी महाराजांनी त्यांना पायदळाचे प्रमुख म्हणजे सरनौबत केले. हे पद त्यांना कधी मिळाले यांच्या तारखा उपलब्ध नाहीत. ते स्वराज्यातील पायदळाचे पहिले सरनौबत होते. ते त्या पदावर किमान १६५७ पर्यंत होते. स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभीच्या काळात त्यांनी शिवाजी महाराजांना चांगली साथ दिली. २१ मार्च १६५७ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत झालेल्या तंट्याच्या महजराच्या वेळी नूरबेग उपस्थित होते. या महजरावर त्यांचा फार्सी शिक्का उमटवलेला असून त्यांच्या नावाखाली 'सरनौबत पाऊलोक' असा उल्लेख आहे.[२७] (पाऊलोक म्हणजे पायदळ) त्यानंतर काही दिवसांनी नूरबेग यांना त्या पदावरून दूर करून त्यांच्या जागी येसाजी कंक याची पायदळाचे सरनौबत म्हणून नियुक्ती केलेली दिसते.

## ४:९ येसाजी कंक :

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात अगदी प्रारंभीपासून त्यात सहभागी झालेली व आयुष्यभर महाराजांना साथ देणारी एकनिष्ठ व्यक्ती म्हणजे येसाजी कंक होय. येसाजी कंक शिवरायांच्या समकालीनच मोठे झाले व स्वराज्याचे तोरण उभारण्यापासून महाराजांच्या निधनापर्यंत अगदी इमाने इतबारे त्यांनी महाराजांची सेवा केली. शिवाजी राजावर चालून आलेल्या खडतर संकटातही त्यांनी व त्यांच्या मुलांनीही स्वराज्याला साथ दिली. इ. स. १६५९ मध्ये त्यांना शिवाजी महाराजांनी आपल्या पायदळ फौजेचे प्रमुख म्हणजे सरनौबत केले. त्या पदावर ते महाराजांच्या निधनापर्यंत म्हणजे जवळजवळ २२ वर्षे होते. एवढ्या मोठ्या जबाबदारीच्या पदावर दिर्घकाळ राहिलेला व सर्व

कठीण लष्करी मोहिमात सहभागी झालेला अधिकारी शिवाजी महाराजांच्या काळात दुसरा क्वचितच असेल. घोडदळाचे सरनौबत अनेकवेळा बदलले गेले. परंतु पायदळाचे सरनौबत येसाजी कंकांना मात्र शिवाजी महाराजांनी कधी बदलले नाही. एवढा विश्वास व पराक्रम सिद्ध केल्याशिवाय शिवकाळात एखादी व्यक्ती त्या पदावर राहणे शक्यच नव्हते.

येसाजी कंकांनी आयुष्यभर महाराजांना दिलेली साथ व स्वराज्याच्या उभारणीतील दिलेले योगदान श्रेष्ठ दर्जाचे आहे. परंतु इतिहासकारांनी मात्र त्यांच्या कार्याची नोंद घेण्यात व महत्त्व सांगण्यात कुचराई केल्याचे दिसून येते. नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते इत्यादी सेनापतीबद्दल ज्याप्रमाणे इतिहासात भरपूर लिहून ठेवले आहे. तशी माहिती येसाजी कंकांची लिहिली गेली नाही.

येसाजी कंक हे मावळातील वेळवंड खोऱ्याचे प्रतिष्ठित देशमुख होते.[२८] शिवाजी महाराजांच्या स्वराज्य कार्यात प्रथमपासूनच येसाजी सामिल झाले होते. त्यांचा पराक्रम पाहून जावळी विजयानंतर महाराजांनी त्यांना पायदळाचे सरनौबत केले. यावेळी पायदळाची संख्या १० हजार होती.[२९] ही संख्या पुढील काळात वाढत जावून महाराजांच्या कारकिर्दी अखेर ती लाखाच्या घरात गेलेली होती.

अफजलखानाच्या वधाच्या वेळी शिवाजी महाराजांनी आपल्या बरोबर विशेष पराक्रमी असे १० लोक घेतले होते, त्यात जिवा महाला, संभाजी कावजी कोंढाळकर, सिद्दी इब्राहिम, काताजी इंगळे, कृष्णाजी गायकवाड, सूरज काटके, विसाजी मुरूंबक, संभाजी करवर, कोंडाजी कंक व सरनौबत येसाजी कंक हे दहा पटाईत वीर होते.

शिवाजी महाराजांनी भेटीत अफजलखानास ठार केल्यानंतर एकच धामधुम उडाली. महाराजांवर चालून आलेल्या सय्यद बंडास जीवा महालाने ठार केले तर खानाला पालखीत घालून पळणाऱ्या भोयांचे पाय संभाजी कावजीने छाटले व लगेच त्याने खानाचे मुंडके तलवारीने कापून महाराजांपाशी आला. नंतर ते गडावर आले. त्यावेळी शामियानाच्या बाहेर खानाचे लोक व येसाजी कंक, इंगळे, काटके यांची विलक्षण झुंज सुरू होती. खानाकडील पहिलवान खान, रहिमखान, अब्दुल सय्यद, पिलाजी व शंकराजी मोहिते वगैरे दहाही जणांना

येसाजी कंक व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठार केले.[३०] या संघर्षात महाराजांच्या दहा वीरांपैकी एकही जण दगावला नाही.

अफजलखान भेट हा प्रसंग शिवाजी महाराजांच्या जीवनातील अतिशय संवेदनाक्षम प्रसंग होता. यावेळी प्रत्येक मराठा वीराने आपल्या धन्याप्रमाणेच सावध राहून आपापला कार्यभाग पार पाडला. अफजलखान वधानंतर एक हजार मावळ्यांना घेवून येसाजी कंक खानाच्या सैन्यावर तुटून पडले.[३१] त्यांनी शत्रू सैन्याची दाणादाण उडवून दिली.

शाहिस्तेखानावरील छापा व कर्नाटक मोहिम इत्यादी अनेक मोहिमेत येसाजी कंकांनी शिवाजी महाराजांबरोबर सामील होवून पराक्रम गाजविला. येसाजीने शिवाजी महाराजांना जशी आयुष्यभर साथ दिली तसेच संभाजी राजांनाही काही काळ साथ दिली. नोव्हेंबर १६८३ मध्ये पोर्तुगीजांनी फोंड्याला घातलेला वेढा उठविण्याकरीता संभाजी राजांनी बाहेरून हल्ला केला. त्या प्रसंगी येसाजी कंक व त्यांचा मुलगा कृष्णाजी यांनी मोठा पराक्रम केला. परंतु ते जखमी झाले. घरी परतल्यावर कृष्णाजी जखमांमुळे मरण पावला.[३२] या युद्धातील पराक्रमाबद्दल संभाजी महाराजांनी येसाजी कंकांना २००० होनाचे बक्षिस दिले.[३३] त्यानंतर काही दिवसांनी येसाजी कंकचाही मृत्यू झाला. अशा तऱ्हेने एका कर्तबगार, धाडसी व स्वामीनिष्ठ सेनानीचा आपल्या धन्याची सेवा करीत असताना मृत्यू झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या शिस्तप्रिय व कडव्या प्रशासकाच्या हाताखाली पायदळाचा प्रमुख या नात्याने २२ वर्षे एवढा प्रदीर्घ काळ येसाजी कंकांनी अतिशय चांगल्या प्रकारे कार्य केले, यातच येसाजीचे मोठेपण आहे. राजकीय किंवा लष्करी चूक ही महाराजांनी कधीही क्षम्य मानली नाही. त्यावरून नेताजी पालकर, प्रतापराव गुजरांसारख्या सेनानींनाही शिवाजी राजांचा रोष पत्करावा लागला. परंतु येसाजी कंक मात्र या सर्व कसोट्यातून पार पडले व आपल्या कारकिर्दीत यशस्वी ठरले. शिवाजी राजांच्या अखेरपर्यंत ते त्यांचे साथीदार राहिले. यातच त्यांचे यश आहे.

## ४:१० समारोप :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रारंभीच्या काळात महाराजांनी सेनापतीपद (सरनौबत) निर्माण केलेले नव्हते. महाराज निरनिराळ्या मोहिमांवर आपल्या लष्करातील पराक्रमी व शूर व्यक्तींची सेनानी म्हणून नेमणूक करीत असत. उदा. फत्तेखानाचा मोड करण्यासाठी त्यांनी आपल्या फौजेचा प्रमुख म्हणून 'कावजी' यांची नेमणूक केल्याचे दिसते. तर काही मोहिमांचे नेतृत्व त्यांनी स्वत: केले. त्यामुळे अगदी प्रारंभीच्या काळात सेनापतीपदच अस्तित्वात नव्हते.

दादोजी कोंडदेवाच्या निधनानंतर काही दिवसांनी महाराजांनी सरनौबतपद निर्माण केले. त्या पदावर माणकोजी दहातोंडे यांची नियुक्ती केली. शहाजी राजांचे विश्वासू सेवक या नात्याने त्याच्याकडे पाहिले जाते. त्यांनी ८–९ वर्षे त्या पदावर काम केले. यावेळी पायदळाचे प्रमुख नूरबेग होते. सन १६५८–५९ मध्ये पायदळ व घोडदळ लष्कराचे प्रमुखपद बदलण्यात आले. पायदळाचे सरनौबत म्हणून येसाजी कंक व घोडदळ लष्कराचे प्रमुख म्हणून नेताजी पालकर यांची नेमणूक झाली. नेताजी पालकरच्या कारकिर्दीपासून सरनौबत पदास खूपच महत्त्व प्राप्त झाले. येसाजी कंक यांनीही त्यांच्या जोडीनेच आपला कार्यभार पाहिला व सरनौबत म्हणून यशस्वी ठरले.

**संदर्भ :**


१. भट भास्कर वामन, 'शिवाजीची राजनीति', राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, सन १९४१, पृ. ५.

२. बनहट्टी श्री. ना. (संपा.), आज्ञापत्र अर्थात शिवाजी राजांची राजनीति, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर व पुणे, प्रकरण १, पृ. ६०.

३. दिवेकर स. म. (संपा.), कवींद्र परमानंद कृत शिवभारत, प्रकाशक स. म. दिवेकर, मुंबई, १९२७, अध्याय १० वा, पृ. ८८.

४. मेहेंदळे गजानन भास्कर, राजा श्री शिवछत्रपति, खंड १, भाग १, प्रकाशक ग. भा. मेहेंदळे, पुणे, १९९६, पृ. ६८५.

५. कुलकर्णी अ. रा., म. रा. कुलकर्णी, मा. रा. कंटक (संपा.), मराठ्यांचा इतिहास साधन परिचय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८, पृ. १७.

६. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. १५६.

७. तत्रैव, पृ. १८१.

८. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त, पृ. ७७०.

९. पठाण यू. म. (संपा.), सभासद बखर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, चतुर्थ आवृत्ती, २००७, पृ. ३६.

१०. तत्रैव, पृ. ३७.

११. Sen Surendranath, SIVA CHHATRPATI, K. P. Bagghi & Company, Calcutta, Reprint 1977, P. 8.

१२. पठाण यु. म. (संपा.), उपरोक्त, पृ. ३६.

१३. सेन एस. एन. (अनु. सदाशिव शिवदे), मराठ्यांची लष्करी व्यवस्था, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११, पृ. ६.

१४. पठाण यू. म. (संपा.), उपरोक्त, पृ. ११२.

१५. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त,पृ. ५९६.

१६. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, खंड १, भाग २, प्रकाशक ग. भा. मेहेंदळे, १९९९, पुणे, पृ. ८९१.

१७. दिवेकर स. म. (संपा.), शिवभारत, उपरोक्त, अध्याय १३ वा. पृ. १२१.

१८. तत्रैव, अध्याय १२ वा, पृ. १३२ ते १४५.

१९. मेहेंदळे गजानन भास्कर, खंड १, भाग १, उपरोक्त, पृ. ६८३.

२०. पठाण यू. म. (संपा.), उपरोक्त, पृ. ३६.

२१. दिवेकर स. म. (संपा.), शिवभारत, उपरोक्त, अध्याय १३, पृ. १२१.

२२. शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड १, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण, २००९, लेखांक ७२२, पृ. १५८.

२३. शहा मु. ब. (संपा.), इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड ११ वा, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९९८, पृ. २५६.

२४. तत्रैव, पृ. २५८.

२५. मेहेंदळे गजानन भास्कर, खंड १, भाग १, उपरोक्त, पृ. ४८.

२६. तत्रैव, पृ. ७७१.

२७. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, पृ. १५८.

२८. पोतदार द. वा. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड २, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३०, ले. ३९७, पृ. ४००.

२९. पठाण यू. म. (संपा.), उपरोक्त, पृ.९.

३०. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २१, १लोक ७० ते ८०, पृ. २०९.

३१. तत्रैव, अ. २२, १लोक २, पृ. २१२.

३२. पोतदार द. वा. (संपा.), उपरोक्त, ले. ३९७, पृ. ४००.

३३. कुलकर्णी अ. रा., म. रा. कुलकर्णी, मा. रा. कंटक (संपा.), उपरोक्त, पृ. १०८.

## प्रकरण पाचवे

# सेनापती नेताजी पालकर


| | |
|---|---|
| **५:१** | **प्रस्तावना** |
| **५:२** | **नेताजी पालकरांचे पूर्वायुष्य** |
| ५:२:१ | छ. शिवाजी महाराज व नेताजी नातेसंबंध |
| ५:२:२ | नेताजी पुरंदर किल्ल्याचे हवालदार |
| **५:३** | **सेनापतीपदाची (सरनौबत पद) प्राप्ती** |
| **५:४** | **सरनौबत नेताजींची कामगिरी** |
| ५:४:१ | अफलजखान स्वारीच्या वेळची नेताजींची कामगिरी |
| ५:४:२ | आदिलशाही प्रदेशावर स्वारी |
| ५:४:२:१ | अफजलखानाचा पराभव |
| ५:४:२:२ | आदिलशाही प्रदेशातून खंडणी वसुली |
| ५:४:३ | सिद्दी जौहरची स्वारी |
| ५:४:३:१ | नेताजींचा शहापूरवर हल्ला |
| ५:४:४ | शाहिस्तेखानाला प्रतिकार |
| ५:४:४:१ | पन्हाळ्याच्या वेढ्यातून महाराजांना सोडविण्याचा प्रयत्न |
| ५:४:४:२ | उंबरखिंडीच्या लढ्यातील सहभाग |
| ५:४:४:३ | नेताजींचा पराभव – मुघल सैन्याकडून पाठलाग |
| ५:४:४:४ | शाहिस्तेखानावर छापा – नेताजींचा सहभाग |
| ५:४:५ | सुरत लुटीतील सहभाग |
| ५:४:६ | आदिलशहाशी संघर्ष – नेताजींचा पराक्रम |
| ५:४:७ | मिर्झाराजे जयसिंगाची स्वारी |
| ५:४:७:१ | नेताजींचे परिंड्यावर आक्रमण |
| ५:४:७:२ | पुरंदरचा तह |
| ५:४:७:३ | विजापूरवरील स्वारीतील सहभाग |
| **५:५** | **नेताजी स्वराज्यातून आदिलशाहीकडे** |
| **५:६** | **आदिलशहाकडून मुघलांकडे** |
| ५:६:१ | नेताजींना कैद |
| ५:६:२ | नेताजींचे धर्मांतर |
| ५:६:३ | नेताजी स्वराज्यात माघारी |
| **५:७** | **स्वराज्याच्या सेवेत नेताजी (१६७६–१६८०)** |
| **५:८** | **नेताजींचे कार्य – संभाजी कालखंड (१६८०–१६८९)** |
| **५:९** | **नेताजींनी केलेले न्यायनिवाडे** |
| **५:१०** | **नेताजींची मुद्रा** |
| **५:११** | **नेताजी पालकरांचा मृत्यू** |
| **५:१२** | **नेताजींचे वंशज** |
| **५:१३** | **समारोप** |

## प्रकरण पाचवे

# सेनापती नेताजी पालकर

### ५:१ प्रस्तावना :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अत्यंत पराक्रमी सेनापतींमध्ये ज्यांची गणना केली जाते, त्यामध्ये नेताजी पालकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले पाहिजे. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात अगदी प्रारंभीच्या काळापासून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना मोलाची साथ दिली. त्यांच्यासारख्या सहकाऱ्यांच्या मदतीमुळेच स्वराज्याची उभारणी करणे शिवाजी महाराजांना सोपे गेले. नेताजींचा पराक्रम, शौर्य व गनिमी कावा युद्धपद्धतीतील कौशल्य यामुळे मराठ्यांच्या इतिहासात त्यांचे एक पराक्रमी सेनानी म्हणून नाव घेतले जाते. त्यांच्या पराक्रमामुळेच काहीवेळा त्यांचा 'प्रति–शिवाजी' किंवा 'दुसरा शिवाजी' म्हणूनही उल्लेख केला जातो. समकालीन मुघल इतिहासकार, डच, पोर्तुगीज, इंग्रज व फ्रेंच इत्यादी पत्रलेखकांनी त्यांच्या पराक्रमाची दखल घेतली आहे व त्यांच्या पराक्रमाच्या, धाडसी वृत्तीच्या कितीतरी नोंदी करून ठेवल्या आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांबरोबरच नेताजींच्या कर्तृत्त्वाची किर्ती सर्वत्र पसरली.

सरनौबत नेताजी पालकर यांच्या आयुष्याचे कारकिर्दीच्या दृष्टीने दोन टप्पे पडतात. आयुष्याच्या पूर्वार्धात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य उभारणीत साथ दिली. इ. स. १६६६ पर्यंतचा हा कालखंड म्हणजे त्यांनी ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्य केलेला कालखंड होय. इ. स. १६६६ मध्ये नेताजींनी स्वराज्याचा त्याग करून मुघलांकडे जाणे इथपासून ते त्यांच्या मृत्युपर्यंतचा कालखंड हा त्यांच्या आयुष्याचा उत्तरार्ध होय. आयुष्याच्या या उत्तरार्धात नेताजींनी शिवाजीराजांचा पक्ष सोडणे, मुघलशाहीची सेवा, सक्तीचे धर्मांतर, मुघलशाहीत ९–१० वर्षाचे वास्तव्य, या काळात वाट्यास आलेले दु:ख व अवहेलना व पुन्हा स्वराज्यात आगमन असा त्यांच्या जीवनाचा प्रवास घडून आला.

स्वराज्याचे पहिले सरनौबत माणकोजी दहातोंडे यांच्या मृत्यूनंतर महाराजांनी नेताजींची सरनौबतपदी नियुक्ती केली. नेताजींनी जवळजवळ सात ते आठ वर्षे स्वराज्याचे सरनौबतपद भूषविले. याकाळात अफलजखान वध, पन्हाळ्याचा वेढा, शाहिस्तेखानाशी संघर्ष, सुरत लूट, मिर्झाराजे जयसिंगाची स्वारी इ. प्रसंगात नेताजींनी शिवाजी महाराजांना मोलाची साथ दिली. निरनिराळ्या युद्धमोहिमा यशस्वी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. स्वराज्य उभारणीतील त्यांचे योगदान निश्चितच मोलाचे व इतिहासाने दखल घेण्यासारखे आहे.

दुर्दैवाने इ. स. १६६६ मध्ये नेताजी महाराजांवर रूसून स्वराज्याचा  त्याग करून मुघलांना सामील झाले आणि आयतेच औरंगजेबाच्या जाळ्यात अडकले. आग्र्याहून शिवाजी महाराज निसटले या घटनेने संतप्त झालेल्या औरंगजेबाने नेताजींना पकडून जबरदस्तीने बाटवून मुसलमान बनविले. नेताजी मनसबदार बनून मुघलांची चाकरी करू लागले. मुघल शाहीतील वास्तव्याच्या काळातच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारणीचे चालविलेले कार्य किती महान आहे आणि आपण शिवाजी महाराजांचा पक्ष सोडून मुघलशाहीत आलो ही केवढी मोठी चूक केली आहे, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. पश्चाताप झालेले नेताजी स्वराज्यात येण्यासाठी धडपडत राहिले. नऊ वर्षानंतर संधी मिळताच ते मुघलसत्ता सोडून स्वराज्यात दाखल झाले. त्यावेळी महान कार्य करणाऱ्या थोर मनाच्या या राजाने नेताजींना पुन्हा आपले म्हटले. नेताजींचे धर्मांतर करून त्यांना परत हिंदू धर्मात घेतले. एवढेच नव्हे तर त्यांना आपल्या स्वराज्यकार्यातही पुन्हा सहभागी करून घेतले. ही घटना म्हणजे त्याकाळातील एक क्रांतीच होती.

अशा प्रकारे नेताजींचे जीवन म्हणजे शौर्य, पराक्रम आणि अवहेलना व सुख आणि दु:ख यांचे अजब मिश्रण आहे. प्रस्तुत प्रकरणात त्यांच्या एकंदर कारकिर्दीचा चिकित्सकपणे व ऐतिहासिकदृष्ट्या आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ५:२ नेताजी पालकरांचे पूर्वायूष्य :

नेताजी पालकर यांचे पूर्वज वंशपरंपरागत देशमुख होते. नेताजींना व त्यांच्या घराण्यातील इतर प्रमुखांना 'राजे' हा किताब होता. अनेक कागदपत्रांमधून नेताजींचा उल्लेख 'राजे नेताजी' असा केला गेला आहे. पुणे व अहमदनगर या दोन जिल्ह्यामधील सीमेवर घोडनदीच्या दक्षिणेस चार मैलावर करडे नावाचा गाव आहे. या करडे परगण्यात असलेले मौजे तांदळी हे गाव पालकर घराण्यास वतन म्हणून मिळालेले होते. नेताजींच्या पूर्वजांपासूनच हे वतन पालकर घराण्यात पिढी दर पिढी चालत आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात नेताजीराजे व नरहरसिंगराजे या वतनाचा कारभार पहात होते. नरहरसिंगराजे हे बहुधा नेताजीराजे यांचे बंधू असावेत.[१]

मौजे तांदळी हे पालकरांचे वतनी गाव आहे. परंतु नेताजी पालकरांचे मूळ गाव कोणते? याविषयी मात्र निश्चित पुरावा उपलब्ध नाही. सातारा जिल्ह्यातील खंडोबाची पाली हे पालकरांचे मूळ गाव असावे असे काही इतिहास संशोधकांचे मत आहे.[२] या गावी पालकर आडनावाची अनेक कुटुंबे आहेत. परंतु त्यातील कोणीही नेताजींच्या वंशावळीचा दाखला देत नाहीत.[३] कुलाब्याजवळील चौक या गावी पालकरांची काही घरे असल्यामुळे ते पालकरांचे मूळ गाव असावे असे काहींचे मत आहे. नेताजी पालकर यांच्या वंशजाची एक शाखा नांदेड जिल्ह्यातील तामसा येथे असून, येथील वंशजांच्या म्हणण्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण जवळ घावरी नदीच्या काठी 'चौक' या नावाचे गाव असून, ते नेताजी पालकरांचे मूळ गाव होय.[४]

समकालीन कागदपत्रामध्ये नेताजी पालकरांचे व्यक्तिनाम 'नेतोजी' असे लिहिल्याचे दिसते. उत्तरकालीन कागदपत्रामध्ये किंवा समकालीन कागदपत्रांच्या काही उत्तरकालीन नकलांमध्ये त्यांचे नाव 'नेताजी' असे लिहिल्याचे आढळते.[५] फार्सी ग्रंथलेखकांनी नेताजींचा उल्लेख 'नेतू' किंवा 'नथूजी' असा केलेला आढळतो.

### ५:२:१ छत्रपती शिवाजी महाराज व नेताजी नातेसंबंध :

छत्रपती शिवाजी महाराजांचे पालकर घराण्याशी नात्याचे संबंध होते. शिवाजी महाराजांची पुतळाबाई ही पत्नी पालकर घराण्यातील होती. तंजावर येथील बृहदीश्वराच्या देवळाच्या दर्शनी भिंतीवर खोदलेल्या शिलालेखात शिवाजी महाराजांच्या आठ राण्यांची नावे दिली आहेत. या शिलालेखात 'चवथी पुतळाबाई पालकरांची' असा उल्लेख आहे.[६] छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर जवळजवळ तीन महिन्यांनी ती राजगडावर सती गेली. ही पुतळाबाई बहुधा नेताजींची चुलत बहिण असावी.[७] याशिवाय शिवाजी महाराजांची एक मुलगी पालकर घराण्यात दिली होती. महाराजांची एक पत्नी सकवारबाई ही गायकवाड घराण्यातील होती.[८] तिला कमळजाबाई नावाची मुलगी असून तिचे लग्न जानोजी पालकराशी झाले होते.[९] अशा प्रकारे पालकर घराण्याशी महाराजांचे नातेसंबंध होते. परंतु प्रत्यक्ष नेताजी पालकर यांच्याशी महाराजांचे नेमके कोणते नाते होते किंवा जानोजी हा नेताजींचा नात्याने कोण होता? याविषयी निश्चितपणे सांगता येत नाही.

तंजावरच्या शिलालेखात 'सखवारबाईसाहेबास कमळाबाई म्हणून एक कन्या ते पालकर नेतोजीस दिल्हे' असे म्हटले आहे. शिलालेखातील ही माहिती चुकीची असावी असे दिसते. कारण नेताजी पालकर हे शिवाजी महाराजांच्या या मुलीपेक्षा वयाने बरेच मोठे असावेत. शिवाय नेताजी पालकरासारखे प्रसिद्ध सेनानी महाराजांचे जावई असते, तर तसा उल्लेख इतर काही साधनामध्येही आला असता. परंतु इतर कोणत्याही विश्वसनीय साधनात तसा उल्लेख आलेला नाही. त्यामुळे या शिलालेखात केलेला उल्लेख चुकीचा वाटतो. इतिहासकार गजानन मेहेंदळे यांच्या मते जानोजी पालकर व नेताजी यांच्यात नाते असल्याचा बराच संभव आहे. कदाचित तंजावरच्या या शिलालेखात ते नाते सांगण्याकरिताच नेताजीचा उल्लेख करण्याचा हेतू असेल. परंतु प्रत्यक्ष खोदताना चुकून जानोजीचे नाव वगळले जावून 'कमळाबाई .... पालकर नेताजीस दिल्हे' असे खोदले गेले असावे.[१०]

आलमगिरनामा, मुन्तखबुल-लुबाव इ. मुस्लिम इतिहासकारांनी लिहिलेल्या फार्सी ग्रंथात नेताजींचा 'सीवाचा जवळचा नातलग' असा उल्लेख केला आहे.[११] नेताजी हा

महाराजांचा पुतण्या किंवा भाचा असल्याची मिर्झाराजे जयसिंग व त्याच्या लोकांची समजूत होती. दिनांक २३ फेब्रुवारी १६६६ च्या एका राजस्थानी पत्रात परखळदासने 'नेताजी सेवाका भतिजा' असा उल्लेख केला आहे.[१२] खुद्द जयसिंगाने ऑगस्ट १६६५ मध्ये पाठविलेल्या एका पत्रात नेताजींना 'शिवाजीचा पुतण्या' असे संबोधले आहे.[१३]

यावरून असे दिसते की नेताजी हा शिवाजी महाराजांचा जवळचा नातलग आहे, अशी माहिती जनमानसात प्रचलित होती. परंतु हे नाते कोणते होते हे स्पष्टपणे दर्शविणारे एकही अस्सल साधन उपलब्ध नाही.

### ५:२:२ नेताजी पुरंदर किल्ल्याचे हवालदार :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यकार्यात नेताजी कधीपासून सहभागी झाले होते याचा मागोवा घेता, नेताजींविषयी पहिला उपलब्ध असलेला कागदोपत्री पुरावा हा नेताजी पुरंदरचे हवालदार असल्याविषयीचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याचा ताबा घेतल्यानंतर नेताजींची या किल्ल्याचे हवालदार म्हणून नेमणूक केली. पुरंदरचा किल्लेदार महादजी निळकंठ याच्या मृत्यूनंतर त्यांचे चार पुत्र निळोपंत, शंकराजी, विसाजी व त्र्यंबक परस्परात भांडू लागले. त्याचा फायदा घेवून महाराजांनी किल्ला ताब्यात घेतला व तेथे नेताजींची नियुक्ती केली. महादजी निळकंठ यांचा नातू गणेश (शंकराजीचा मुलगा) याने इ. स. १७३६ मध्ये एका तंट्याच्या प्रकरणी एक निवेदन लिहून दिलेले आहे. या निवेदनात त्याने म्हटले आहे की, ''महादजी निळकंठराव मृत्यू पावले. पुत्र चार भांडो लागले. त्यामुळे शिवाजी राजे यांच्या हातास गड आला ... आमचे चुलते निळोपंत यास सरनाइकी करार करून गडावर ठेविले. नेताजी पालकर यास सरनौबती सांगोन राजे खाले उतरोन पुण्यास आले.''[१४]

वरील निवेदनात गणेश शंकराजीने नेताजींना पुरंदरचा सरनौबत केले असे सांगितले असले, तरी इतर काही पुराव्यावरून नेताजी किल्ल्याचे हवालदार (किल्लेदार) होते ही गोष्ट स्पष्ट होते. पेठ नारायणपूर, किल्ले पुरंदर येथील शेट्याजवळ त्याच्या शेट्येपणाच्या वतनाविषयीची कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. त्यात दतशेटी व जावशेटी यांच्यात

शेट्येपणाच्या वतनाविषयी भांडण होते. त्याचा निवाडा ''नेतोजीराजे पालकर, हवालदार, किल्ले मजकूर (पुरंदर)'' यांनी केला असा उल्लेख आहे.[१५]

पुरंदर किल्ला ताब्यात घेतल्यानंतर शिवाजी महाराजांनी या किल्ल्याच्या हवालदारपदी नेताजींची नेमणूक केली. हे जरी खरे असले तरी महाराजांनी पुरंदरचा ताबा नेमका कधी घेतला हे कोणत्याच साधनात नमूद केलेले नाही. पुरंदरचा किल्लेदार महादजी निळकंठ इ. स. १६५४ मध्ये मृत्यू पावल्यानंतर शिवाजी महाराजांनी त्यांच्या मुलाला ९ ऑगस्ट १६५४ रोजी पाठविलेल्या पत्रात महादजीचे मी जसे चालवीत होतो तसे तुमचेही चालवीन असे आश्वासन दिले आहे.[१६] याचा अर्थ ऑगस्ट १६५४ पर्यंत तरी हा किल्ला महाराजांच्या ताब्यात आला नव्हता. परंतु मे १६५७ च्या एका महजरात मात्र नेताजी पुरंदरचे हवालदार असल्याचा उल्लेख आहे. सासवडच्या महारकीच्या वतनाविषयी वाद सुरू होता. या वादाचा सासवड येथील गोतसभेपुढे निवाडा होवून ३१ मे १६५७ रोजी महजर झाला. या वादातील एक पक्षकार पुरंदर किल्ल्याचे हवालदार नेताजी पालकर यांच्याकडे पूर्वी तक्रार घेवून गेले होते. परंतु महिनाभर चौकशी होवूनही निवाडा झाला नाही. म्हणून दिव्य करवून निवाडा करण्यासाठी हे प्रकरण सासवडला पाठविण्यात आले असे या महजरात नमूद केले आहे.[१७] यावरून ९ ऑगस्ट १६५४ ते मे १६५७ या दरम्यान केव्हा तरी पुरंदर शिवाजी महाराजांच्या ताब्यात येवून त्याची किल्लेदारी नेताजींना देण्यात आली असावी.

नेताजी पुरंदरचे हवालदार असतानाच शिवाजीराजांनी आपल्या गरोदर पत्नी सईबाई यांना पुरंदर किल्ल्यावर आणून ठेवले होते. येथेच १४ मे १६५७ रोजी संभाजीचा जन्म झाला.[१८] नेताजीराजे हे महाराजांचे नातलग व विश्वासू सहकारी असल्यामुळे महाराजांनी आपल्या पत्नीला या नाजूक अवस्थेत पुरंदर किल्ल्यावर ठेवले असावे.

## ५:३ सेनापतीपदाची (सरनौबतपदाची) प्राप्ती :

छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले सरनौबत माणकोजी दहातोंडे यांच्या मृत्यूनंतर महाराजांनी पुरंदर किल्ल्याचे हवालदार असलेल्या नेताजी पालकर यांची सरनौबतपदी नियुक्ती केली. परंतु ही नियुक्ती निश्चितपणे कधी झाली याविषयी विश्वसनीय पुरावा

उपलब्ध नाही. सभासद बखरीनुसार महाराजांनी जावळी जिंकल्यानंतर नेताजींची सरनौबतपदी नियुक्ती केली. १५ जानेवारी १६५६ रोजी महाराजांनी जावळी घेतली परंतु मार्च १६५७ पर्यंत तरी नेताजींची या पदी नियुक्ती झाली नव्हती. २१ मार्च १६५७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या उपस्थितीत पुणे येथे झालेला एक महजर उपलब्ध असून या महजराच्या वेळी हाजीर मजालसीत सरनौबत माणकोजी दहातोंडे उपस्थित होते.[१९] याचा अर्थ नेताजींची सरनौबतपदी नियुक्ती यानंतरच्या काळात झाली. अफजलखान स्वारीच्या वेळी मात्र नेताजी सरनौबतपदी होते ही गोष्ट कवींद्र परमानंदाच्या शिवभारतातील वर्णनावरून स्पष्ट होते. अफजलखान जावळीस आल्यावर शिवाजीराजांनी शत्रूच्या राज्याचा विध्वंस करण्याचा हुकूम सेनापती नेताजींना दिला असे शिवभारतात म्हटले आहे.[२०] अफजलखान जुलै १६५९च्या पूर्वी वाईस आला.[२१] यावरून २१ मार्च १६५७ ते जुलै १६५९ या कालखंडात केव्हातरी नेताजींची सरनौबतपदी नियुक्ती झाली असावी.

नेताजींची लष्कराच्या सरनौबतपदी नियुक्ती केली त्याचवेळी महाराजांनी पायदळाचा सरनौबत म्हणून येसाजी कंकाची नेमणूक केली. यावेळेपर्यंत स्वराज्याचा विस्तार बराच वाढलेला होता. त्याचबरोबर सैन्यसंख्याही वाढू लागली होती. नेताजींनी सरनौबतपदाची सूत्रे स्वीकारली त्यावेळी मराठा सैन्याची संख्या जवळजवळ वीस हजार होती. यामध्ये दहा हजार घोडदळ व दहा हजार पायदळ होते. दहा हजार घोडदळामध्ये सात हजार पागा म्हणजे बारगीर तर तीन हजार शिलेदार अशी विभागणी होती.[२२] नेताजींच्या सरनौबतपदाच्या कालखंडात सैन्यसंख्या उत्तरोत्तर वाढतच गेली.

## ५:४ सरनौबत नेताजीची कामगिरी :

सरनौबतदी नियुक्ती झाल्यापासून ते जानेवारी १६६६ मध्ये पदावरून पायउतार होईपर्यंत नेताजींनी स्वराज्यकार्यात महाराजांना मोलाची साथ दिली. याकाळात ते महाराजांचा उजवा हात बनले होते. अफजलखान स्वारीपासून ते मिर्झाराजे जयसिंगाच्या विजापूर मोहिमेपर्यंतच्या अनेक मोहिमात सहभागी होवून, त्यांनी आपल्या असाधारण पराक्रमाचे दर्शन घडविले. स्वराज्याच्या दृष्टीने हा अत्यंत बिकट कालखंड होता. बलाढ्य

मुघलसत्ता आणि आदिलशाही या दोन्हीही सत्तांशी एकाचवेळी चिमुकले स्वराज्य झुंजत होते. अशा या आणीबाणीच्या काळात सरनौबत नेताजींनी महाराजांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य रक्षणाचे कार्य अत्यंत निष्ठेने पार पाडले.

**५:४:१ अफजलखान स्वारीच्या वेळची कामगिरी :**

नेताजी पालकर यांची सरनौबतपदी नियुक्ती झाल्यानंतर अफजलखान स्वारीच्या रूपाने स्वराज्यावर एक मोठेच संकट आले. विजापूरच्या बडी बेगम साहेबाने शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आपला पराक्रमी बलाढ्य सरदार अफजलखान यास स्वराज्यावर रवाना केले. शिवाजीचा संपूर्ण नाश करणे, हाच खानाच्या स्वारीचा मुख्य हेतू होता. अफजलखानाने मे १६५९ च्या सुमारास विजापूरहून कूच केले.[२३] अनेक नामांकित सरदार व सैन्यासह तो वाईला दाखल झाला.[२४]

खान स्वारीवर निघाला तेव्हा शिवाजी महाराजांचे वास्तव्य पुणे, राजगड भागात होते. राजगडावर महाराजांसमवेत मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर यांच्यासह अनेक मुत्सद्दी होते.[२५] अफजलखानासारख्या बलाढ्य शत्रूला कसे तोंड द्यायचे असा विचार महाराजांसह सर्वांनाच पडला होता. खानाचा कपटी स्वभाव व त्याची क्रूरता पाहून त्याच्याशी लढा देण्याचे धाडस महाराजांनी करू नये असेच सर्वांचे मत होत. महाराजांना ही गोष्ट मान्य नव्हती. आपण प्रतापगडावर जावे व जावळीच्या घनदाट जंगलाच्या परिसरात खानाशी लढा द्यावा असा शिवाजी महाराजांचा विचार होता. परंतु आपल्या सहकाऱ्यांच्या मनातील खानाविषयीची धास्ती निघून गेल्याशिवाय युद्धाचा निर्णय घेणे चुकीचे आहे. कारण त्यांच्याच सहकार्यावर या मोहिमेचे यशापयश अवलंबून आहे याची जाणीव महाराजांना होती. एका रात्री महाराजांना स्वप्न पडले. स्वप्नामध्ये तुळजापूरच्या श्री भवानीने साक्षात दर्शन देवून महाराजांना सांगितले की, ''मी तुझ्यावर प्रसन्न झाले आहे. तुला सहाय्य करून मी तुझ्या हातून अफजलखानाचा वध करविते आणि तुला यश मिळवून देते. तू काहीही चिंता करू नकोस.' सकाळी जागे झाल्यावर महाराजांनी जिजाबाई व गडावर असलेले सर्व मुत्सद्दी मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर, गोमाजी नाईक पानसंबळ, कृष्णाजी नाईक, सुभानजी नाईक इत्यादींना बोलावून

आपले स्वप्न सांगितले आणि म्हटले की, ''श्री प्रसन्न जाहाली. आता अफजलखानास मारून गर्दीस मेळवितो.'' तरीदेखील हे एवढे मोठे कठीण काम पूर्णत्वास जाईल का असा प्रश्न सर्वांना पडला. तेव्हा महाराजांनी, ''सला केलियाने प्राणनाश होईल, युद्ध केलियाने जय जाहालियास उत्तम, प्राण गेलियाने किर्ती आहे.'' असा प्रेरक विचार सर्वांना सांगून त्यांचे समाधान केले.[२६] आपल्या सहकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे अद्वितीय कौशल्य महाराजांजवळ होते.

राजगडावरील तजवीज करून खानाशी टक्कर देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज जावळीला निघाले. जावळीला निघताना महाराजांनी सरनौबत नेताजी पालकरांना शत्रूच्या प्रदेशात (आदिलशाही) विध्वंस करण्याच्या कामगिरीवर पाठविले.[२७] महाराज १२ जुलै १६५९ रोजी पायदळासह जावळीस आले. तत्पूर्वीच नेताजी शत्रूप्रदेशात मोहिमेवर गेले होते.[२८] महाराजांच्या आदेशानुसार सात हजार घोडदळ व पायदळ यासह अत्यंत जलदगतीने नेताजी शत्रूप्रदेशात घुसले आणि त्यांनी शत्रूचे प्रांत हस्तगत करून अनेक नगरे उध्वस्त केली.[२९]

नेताजींनी या मोहिमेत आदिलशहाकडून अफजलखानास मुकासा म्हणून मिळालेल्या तेरदळ परगण्यात लुटालूट करून धुमाकूळ घातला होता. ही गोष्ट अफजलखानाच्याच एका पत्रावरून स्पष्ट होते. या पत्रात नेताजींच्या नावाचा स्पष्ट उल्लेख नसला तरी याकाळात नेताजी शत्रूप्रदेशात मोहिमेवर गेले होते हे शिवभारतावरून स्पष्ट होते. तेरदळ परगण्याचा देसाई कृष्णगौडा याला ७ सप्टेंबर १६५९ रोजी अफजलखानाने पाठविलेल्या पत्रात कृष्णगौडाने शत्रूला पराभूत केले म्हणून इनाम व काही वंशपरंपरागत हक्क दिल्याचे नमूद केले आहे. इतिहासकार गजानन मेहेंदळे यांच्या मते, नेताजींचा कृष्ण गौडांसारख्या एखाद्या देसायाकडून पराभव होणे शक्य नाही. लूट करण्यासाठी नेताजीच्या सैन्याच्या तुकड्या इतस्तता विखुरल्या असतील आणि अशी एखादी तुकडी लूट करून निघून गेली असेल आणि या निघून जाण्याचा अर्थ पराभव असा करून कृष्णगौडाने अतिरंजित वृत्तांत अफजलखानास कळविला असावा.[३०]

अशा प्रकारे अफजलखान वाईला ठाण मांडून बसलेला असताना नेताजींनी त्याच्याच जहागिरीत जावून लुटालूट सुरू केली होती आणि शिवाजीच्या या सैन्याने त्याच्या जहागिरीत मांडलेल्या उच्छादाच्या बातम्या अफजलखानापर्यंत येवून पोहोचल्या होत्या. नेताजी आदिलशाही प्रदेशात थैमान घालत असतानाच इकडे अफजलखानानेही आपले सरदार महाराजांचे राज्य जिंकण्यासाठी पाठविले होते. या सरदारांनी स्वराज्यात धुमाकूळ घातला होता. आदिलशाही सरदार कल्याण जाधवने सुपे प्रांत, नाइकजी पांढरे यांनी शिरवळ प्रांत, खराटे यांनी सासवड प्रांत, सिद्धी हिलालने पुणे प्रांत तर हबशी सैफखानाने तळकोकणात शिरून ते प्रांत आपल्या ताब्यात घेतले होते.[३१] अफजलखानाच्या आदेशानुसार त्याच्या सरदारांनी व सैन्याने स्वराज्यातील प्रदेशाची लुटालूट सुरू केली होती. मावळ खोऱ्यातील निष्पाप प्रजा खानाच्या घोडेस्वारांच्या टाचाखाली भरडली जावू लागली. प्राणभयाने लोक गावे सोडून जंगलात पळून गेले.

स्वराज्याच्या प्रदेशाची व जनतेची अफजलखानाच्या सैन्याने केलेल्या दुर्दशेची वार्ता नुकत्याच शत्रूप्रदेशातून मोहिमेवरून परतलेल्या नेताजी पालकराच्या कानी आली. या वार्तेने नेताजी भयंकर संतापले आणि रागाच्या भरात त्यांनी ''खराटे, पांढरे, जाधवराव, हिलाल आणि सैफखान यांना मी यमसदनास पाठवितो'' अशी प्रतिज्ञा केली. प्रतापगडावर असलेल्या महाराजांना ही बातमी समजताच त्यांनी ताबडतोब दूत पाठवून नेताजींना या सरदारावर हल्ला करण्यापासून रोखले. आणि नेताजींना कळविले की, ''अफजलखान तह करण्याच्या इच्छेने जावळीस येत आहे. या तहाचा निर्णय होईपर्यंत तू त्याच्या सैनिकांशी युद्ध करू नकोस. परंतु सज्ज मात्र रहा आणि ज्यादिवशी त्याची व माझी भेट होईल त्याच दिवशी तू वाईस नि:संशयपणे जावेस.''[३२] वास्तविक पाहता खानाच्या सैन्याने स्वराज्यात चालविलेल्या उच्छादाची बातमी महाराजांना यापूर्वीच समजली होती. परंतु आपली सर्व शक्ती प्रतापगडावर केंद्रित करण्यासाठी आणि आपण भयभीत झालो आहोत असे खानाला भासविण्यासाठी महाराजांनी खानाच्या सैन्यास प्रतिकार करू नये अशा आज्ञा सर्वत्र पाठविल्या होत्या.[३३] या धोरणाला अनुसरूनच शत्रूचा नाश करण्यास उतावीळ झालेल्या नेताजींना महाराजांनी रोखले

होते. महाराजांनी अगदी स्पष्ट शब्दात तहाचा निर्णय होईपर्यंत खानाच्या सैन्याशी युद्ध करू नको असा आदेश दिल्यामुळे या आदेशानुसार नेताजी पालकर युद्ध सज्ज होवून मध्येच थांबले.[३४] यावेळी नेताजी नेमके कोठे थांबले हे शिवभारतात सांगितले नाही. परंतु सभासद बखरीमध्ये नेताजींना घाटमाथ्यावर थांबण्यास सांगितले होते असे म्हटले आहे. सभासद बखरीमध्ये म्हटले आहे की, घाटमाथा लष्कर (सुद्धा) नेताजी पालकर आणविले होते. त्यासि इशारत (खूण) सांगोन पाठविली की, ''उद्या खानाच्या भेटीस जातो. फत्ते करितो आणि गडावरी येतो. तेव्हा एकच आवाज गडावरि करितो तेव्हा तुम्ही घाटाखाली उतरोन लष्करात खानावर चालोन येवून मारामारी करणे.''[३५] नेताजींना अफजलखानाच्या वाई येथील सैन्यावर हल्ला करण्याचा आदेश महाराजांनी दिला होता. त्यामुळे वाई ते जावळी या मधल्या भागात घाटमाथ्यावर ते थांबले असावेत.

छत्रपती शिवाजी महाराज व अफजलखान भेट ठरल्याप्रमाणे १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी झाली. या भेटीत महाराजांनी अफजलखानाचा वध केला. अफजलखानाचा वध करून महाराज गडावर जाताच नगारे वाजवण्यात आले. या इशाऱ्याबरोबर दऱ्यात दबा धरून बसलेल्या मराठी सैन्यास समजले की, महाराज फत्ते झाले. त्याबरोबर मराठी सैन्य दाट झाडीतून बाहेर पडले आणि बेसावध खानाच्या सैन्यावर तुटून पडले. येसाजी कंक, तानाजी मालुसरे, कोंडाजी वरखल, कमळोजी साळुंखे आणि रामजी पांगारा हे पाचही शूर वीर आपापल्या एकेक हजार पायदळासह, तर पराक्रमी नारायण ब्राह्मण पाच हजार पायदळासह वेगाने येवून जंगलाच्या मध्यभागी असलेल्या शत्रूसैन्यावर तुटून पडले.[३६] गडावर वाजणाऱ्या नगाऱ्यामुळे अफजलखान मारला गेला ही गोष्ट त्याच्या सैन्याला कळाली. आपला सेनापतीच पडलेला पाहून हतबल व नायकहीन झालेले ते सैन्य जीव वाचविण्यासाठी पळू लागले. मुसेखानाने या सैन्याला अडवून मराठ्यांना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो पराभूत होताच त्याने युद्धातून काढता पाय घेतला. मुसेखान, याकुतखान, हसनखान, अंकुशखान व फाजलखान हे जीव वाचविण्यासाठी पळत सुटले. त्यांना प्रतापराव मोरेने आडवाटेने कसेबसे वाईला पोहोचविले. अंबरखान, अफजलखानाचे

दुसरे दोन पुत्र, रूस्तुमखान, झुंजारराव घाटगे इत्यादी उमराव कैद झाले.[३७] अफजलखानाच्या सैन्याचा पूर्णपणे धुव्वा उडाला. बहुतांश सैन्य मारले गेले आणि थोडेच लोक या कत्तलीतून वाचले. परंतु पुष्कळ मालमत्ता, घोडे, उंट व हत्ती सीवाच्या हाती सापडले.[३८] असे आलमगीरनाम्यात म्हटले आहे.

अफजलखान वधाच्या दिवशी सरनौबत नेताजी पालकर प्रतापगडावर नव्हते. शिवाजी महाराजांच्या आज्ञेप्रमाणे ते घाटमाथ्यावर होते. महाराजांनी त्यांना वाईच्या मुक्कामी असलेल्या खानाच्या सैन्यावर हल्ला करण्याची कामगिरी सोपविली होती. एवढेच नव्हे तर ज्या दिवशी अफजलखानाची व माझी भेट होईल त्याच दिवशी तू वाईस जावून खानाच्या सैन्यावर हल्ला चढव असा स्पष्ट आदेश दिला होता. परंतु नेताजींनी दुसऱ्या दिवशी वाई येथील सैन्यावर हल्ला चढविला. नेताजी वाईला येण्यापूर्वीच जावळीतून प्रतापराव मोऱ्यांनी आडवाटेने बाहेर काढलेले फाजलखान, मुसेखान इ. सरदार वाईतून आपला खजिना व साहित्य घेवून वेगाने निघून गेले. या सरदारांचा नेताजींनी पाठलाग सुरू केला. परंतु ते नेताजींना सापडले नाहीत.

शिवभारतात म्हटले आहे की, ''पुढे ज्या दिवशी शिवाजी व अफजलखान या दोघांमध्ये युद्ध झाले. त्याच्या दुसऱ्या दिवशीच सेनापती (नेताजी पालकर) वाईस आला. त्याने धरले नाहीत म्हणून ते मुसेखानप्रभुति दुर्जन दानव दाही दिशास पळाले.[३९] वेगाने पळून चाललेल्या त्यांचा पाठलाग करूनसुद्धा जेव्हा त्यांची गाठ पडली नाही. तेव्हा सेनापती नेताजी हा पुन्हा वाईस आला.''[४०]

वरील उताऱ्यात परमानंदांनी स्पष्टपणे सूचित केले आहे की, नेताजी शिवाजी महाराज व अफजलखान यांच्यातील युद्धाच्या दुसऱ्या दिवशी वाईस आले. ते उशीरा आल्यामुळे फाजलखान, मुसेखान इ. सरदारांना वाईतून पळून जाण्याची संधी मिळाली. नेताजींना युद्धाच्या दिवशीच वाईवर खानाच्या सैन्यावर चालून जाण्याचा आदेश असतानासुद्धा त्यांनी याकामी उशीर का केला? यामागे निश्चितपणे काहीतरी कारण असावे. जे नेताजी युद्धाच्या अगोदरच शत्रूवर हल्ला करण्यास उतावीळ झाले होते. ज्यांनी शत्रूच्या

सेनानींना ठार मारण्याची प्रतिज्ञा केली होती. ते नेताजी प्रत्यक्ष युद्धाच्या वेळी उशीरा का आले? यासंबंधी निश्चित पुरावा उपलब्ध नसला तरी याबाबतीत काही तर्क करता येवू शकतो. नेताजींना घाटमाथ्यावर थांबून वाईवर हल्ला करण्याचा आदेश होता. याचा अर्थ नेताजी यावेळी जावळी ते वाई या मार्गावर तळ देवून बसलेले होते. एक तर अफजलखान वधाची बातमी त्यांच्यापर्यंत पोहोचायला काहीसा वेळ लागला असावा. किंवा कदाचित युद्धात पराभूत होवून पळून जाणारे सरदार व सैन्य याच मार्गाने वाईस जाणार. जर आपण इथेच थांबलो तर ते आपल्या आयतेच जाळ्यात सापडतील असे वाटून ते घाटमाथ्यावरच थांबले असावेत. त्यामुळेही त्यांना वाईस येण्यास उशीर लागला असावा. परंतु पळालेले मुसेखानादि सरदार वेगळ्याच मार्गाने वाईस जावून पोहोचले असावेत. परमानंदांनी शिवभारता मध्येच म्हटले आहे की, ''तो प्रतापराव कोणासहि माहित नसणाऱ्या व पूर्वी पाहिलेल्या वाटेने त्यास (मुसेखानादि सरदारांना) शिवाजीच्या प्रांतातून त्वरीत बाहेर घेवून गेला.[४१] त्यामुळे नेताजींच्या तडाख्यातून ते केवळ नशिबानेच बचावले. नेताजींच्या वाईस उशिरा येण्यामागे कारण काहीही असो एवढे मात्र निश्चित की, या उशिरा येण्यामुळे महाराज त्यांच्यावर नाराज झाले असा उल्लेख कुठेही सापडत नाही.

### ५:४:२ आदिलशाही प्रदेशावर स्वारी :

अफजलखानाच्या पळून गेलेल्या सरदारांचा पाठलाग करून ते न सापडल्याने नेताजी वाईस माघारी आले. याचवेळी स्वत: छत्रपती शिवाजी महाराजही ससैन्य वाईस येवून पोहोचले होते.[४२] अफजलखानाचा वध व त्याच्या लष्कराची उडालेली दाणादाण याच्या बातम्या सर्वत्र पसरून शत्रू प्रदेशात घबराट निर्माण झाली होती. या परिस्थितीचा फायदा घेवून अदिलशहाचा जास्तीत जास्त प्रदेश ताब्यात घेण्याची योजना महाराजांनी आखली. या मोहिमेत सरनौबत नेताजी पालकर त्यांच्या सोबत होते. महाराजांनी नेताजींना पुढे पाठवून स्वत: वाईपासून जवळच असलेल्या आदिलशहाच्या ताब्यातील चंदन-वंदन या दोन किल्ल्यांना वेढा घातला.[४३] इकडे वाईहून निघालेल्या नेताजींनी वर्धनगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या चिमणगाव येथे तळ ठोकला व आजूबाजूच्या प्रदेशातून खंडण्या वसूल

केल्या. येथून जवळच असलेले आदिलशाही ठाणे खटाव ताब्यात घेवून नेताजीने तेथे वसुलीसाठी आपले तहसीलदार नेमले.[४४] दरम्यान महाराजांनी चंदन–वंदन किल्ले घेतले होते. यानंतर महाराजांच्या नेतृत्वाखाली नेताजी पालकर यांनी मायणी, रामापूर, कलेढोण, वाळवे, हलजयंतिका, आष्टी, आष्टे, वडगाव, वेलापूर, औदुंबर, मसूर, कऱ्हाड, सुपे, तांबे, पाली, नेरले, कामेरी, विसापूर, सावे, उरण, कोळे आणि कोल्हापूर ही गावे हल्ला करून ताब्यात घेतली. या ठिकाणी महाराजांनी बरीच खंडणी वसूल केली आणि त्यांना अभय देवून स्वराज्याला जोडले. कोल्हापूर ताब्यात आल्यानंतर मराठी सैन्याने तेथून फक्त १० मैलावर असलेल्या पन्हाळा किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्यावरील आदिलशाही सैन्याने महाराजांच्या सैन्यावर तोफगोळ्यांचा, दारूच्या बाणांचा व मोठमोठ्या शिळांचा वर्षाव केला. प्रत्युत्तरादाखल मराठा सैन्याने उल्काबाणांचा किल्ल्यावर वर्षाव केला. शत्रूचा प्रतिकार मोडून काढीत ते गडावर चढले. मार्गशीर्ष वद्य नवमी (२८ नोव्हेंबर १६५९) सोमवारी रात्री किल्ला महाराजांच्या ताब्यात आला.[४५] रात्र झाली होती तरीही महाराजांनी सबंध गडाची पाहणी केली. पन्हाळा ताब्यात आल्यामुळे वाईपासून पन्हाळ्यापर्यंतचा आजच्या सातारा, सांगली जिल्ह्याचा बराचसा व कोल्हापूर जिल्ह्याचा काही भाग महाराजांच्या ताब्यात आला. १० नोव्हेंबरला अफजलखान मारला गेला आणि पुढील केवळ अठरा दिवसांत महाराजांनी हा सर्व प्रदेश ताब्यात घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे सरनौबत नेताजी पालकर यांची ही गरूडझेप आश्चर्यकारकच होती.

**५:४:२:१ फाजलखानाचा पराभव :**

अफजलखानाचा वध व त्यानंतर महाराजांनी मिळविलेले विजय पाहून आदिलशहा गप्प बसणार नव्हता. शिवाजी वाईहून निघून पन्हाळ्याच्या दिशेने येत आहे ही बातमी त्याला हेराकरवी अगोदरच समजली होती. त्यामुळे महाराजांचा हा झंझावात रोखण्यासाठी आदिलशहाने रूस्तूमेजमानच्या नेतृत्वाखाली फौज पाठविण्याचे ठरविले.[४६] त्याच्याबरोबर अफजलखानाचा पुत्र फाजलखान, मलिक इतबार, शादतखान, फतेहखान, मुल्ला याह्या यांच्यासारखे सरदार दिले होते.[४७] रूस्तूमेजमान हा रणदुल्लाखानाचा पुत्र होता. रणदुल्लाखान व

शहाजीराजे यांचे मित्रत्वाचे संबंध होते. त्यामुळे रूस्तुमजमानखानचेही शिवाजी महाराजांशी मित्रत्वाचे संबंध होते. अनेक इंग्रज पत्रातून रूस्तूमजमान व महाराज यांच्या मैत्रीसंबंधाचा उल्लेख सापडतो.[४८] रायबाग, कोल्हापूर या भागाची जहागिरी रूस्तूमजमानखानाची होती आणि कारवारचा सुभेदारही त्याचा हस्तक होता. शिवाजी महाराजांच्या मोहिमेवर नेमणूक झालेला रूस्तूमजमान व फाजलखान हे दोघेही आदिलशहाच्या आदेशानुसार इतर सरदारांसह पन्हाळ्याच्या रोखाने निघाले. महाराजही पन्हाळा सोडून पुढे चालून आले होते. त्यामुळे दोन्ही सैन्याची वाटेतच कोल्हापूरनजीक गाठ पडली. [४९]

शिवाजी महाराजांबरोबर यावेळी सरनौबत नेताजी पालकर, हिराजी इंगळे, भिमाजी वाघ, सिधोजी पवार, गोदाजी जगताप, परशूराम महाडीक, तसेच अफलजखान वधानंतर महाराजांकडे आलेले आदिलशाही सरदार – जाधव, खराटे, पांढरे, हिलाल इत्यादी सेनानायक होते.[५०] शत्रूसेना दृष्टीपथात येताच महाराजांनी सैन्याची व्युहरचना केली. सरनौबत नेताजींना फाजलखानावर चालून जाण्यास सांगितले. तर भिमाजी वाघने मुल्लायाह्यावर, हिराजी इंगळ्यांनी मलिक इतबारावर, महाडिकाने फत्तेखानावर, सिदोजी पवारने सादतखानावर, गोदाजी जगतापने घाटगे व घोरपडे याच्यावर चालून जाण्याचे आदेश देवून स्वत: महाराज रूस्तूमजमानशी लढण्यास तयार झाले.

रणवाद्यांच्या कल्लोळात दोन्ही सेना परस्परांशी भिडल्या. व्यूहरचनेनुसार महाराज रूस्तुमजमानवर तर नेताजी फाजलखानवर त्वेषाने चालून गेले. जावळीच्या युद्धातून मोठ्या मुश्किलीने जिवंत सुटलेला फाजलखान पुन्हा नेताजींच्या कचाट्यात सापडला होता. फाजलखान व नेताजी यांच्यात झालेल्या युद्धाचे शिवभारतकार परमानंदाने मोठे रोचक वर्णन केले आहे.

परमानंद लिहितात, ''गजसमूहरूपी दुर्गामध्ये उभ्या असलेल्या व मेघाप्रमाणे प्रचंड गर्जना करणाऱ्या फाजलावर प्रचंड वाऱ्याप्रमाणे सर्व बाजूंनी हल्ला चढवून शिवाजीच्या बलाढ्य सेनापतीने त्यास गर्भगळित केले. (१लोक ६७) शिवाजीच्या सैन्याचा नेता जो नेताजी तो खवळलेला पाहून फाजलाने खरोखर प्रारंभीच पलायनरूपी नाटकाची नांदी मोठ्याने त्वरीत

म्हटली''[५१] म्हणजे प्रथमारंभीच वेगाने पलायन केले. सरनौबत नेताजींच्या झंझावातापुढे टिकाव न लागून फाजलखानाने पलायनाला सुरूवात केली आणि त्याचेच अनुकरण अनेक सरदारांनी केले. महाराजांपुढे निष्प्रभ ठरलेला रूस्तूमजमानही पराभूत होवून पळत सुटला. सेनानायकच युद्धातून पळून गेल्याने आदिलशहाचे असहाय्य सैन्यही दाही दिशांना वेगाने पळत सुटले.[५२] आदिलशाही सरदार दोनच महिन्यात महाराजांकडून दोनदा पराभूत झाले.

या युद्धाविषयी शिवापूरकर देशपांडे शकावलीतील नोंद अशी आहे, ''पौष वद्य १० बुधवार रूस्तूमजमान व फाजलखान यासी युद्ध कोल्हापूरजवळ जाहाले. बारा हत्ती व दोन हजार घोडी राजे यांनी पाडाव केली. रूस्तुमजमान पलोन गेला.''[५३]

४ फेब्रुवारी १६६० रोजी राजापूरकर इंग्रज सुरतकरांना कळवितात की, ''शिवाजीच्या सैन्याच्या हालचाली आमचेपासून जवळच होत असल्यामुळे आम्हाला त्या समजतात .... अफजलखानाचा मुलगा फाजलखान याने आपले सैन्य, या प्रांतावरील अधिकारी रूस्तूमजमा याच्या सैन्यात मिळवून ते दोघे पन्हाळ्यावर असलेल्या शिवाजीचे सैन्यावर चालून गेले .... पन्हाळ्याकडे जाताना वाटेतच उभय सैन्याच्या गाठी पडल्या. त्यात फाजलखान आघाडीस होता. त्याच्या सैन्याचा धुव्वा उडाला. पुष्कळ सैन्य पडले व नंतर त्याचा पाठलाग झाला. रूस्तुमजमानचे फार नुकसान न होता तो हुकेरीवर मागे सरला.''[५४]

शकावलीतील नोंदीनुसार ही लढाई २८ डिसेंबर १६५९ रोजी झाल्याचे स्पष्ट होते तर या युद्धातून प्रथम नेताजीने हल्ला चढविलेल्या फाजलखानानेच पळ काढला ही गोष्ट इंग्रजांच्या वरील पत्रावरून व शिवभारतावरूनही स्पष्ट होते. जावळीच्या युद्धामुळे मनोधैर्य खच्ची झालेला फाजलखान नेताजींच्या रूद्रावतारापुढे टिकू शकला नाही आणि त्याच्या पलायनामुळे आदिलशाही सैन्यालाही पराभूत होवून रणांगणातून पळ काढावा लागला.

**५:४:२:२ आदिलशाही प्रदेशातून खंडणी वसुली :**

रूस्तूमजमानवर प्रचंड विजय मिळवून महाराज पन्हाळ्यावर परतले. लागोपाठच्या दोन विजयामुळे मराठ्यांचा उत्साह प्रचंड वाढला होता. महाराजांनी आता आदिलशाही आणखी खिळखिळी करण्यासाठी नव्या मोहिमेची योजना आखली. या मोहिमेचे नेतृत्व त्यांनी

सरनौबत नेताजी पालकर यांच्याकडे सोपविले.[५५] नेताजींच्या नेतृत्वाखाली शके १५८१ माघ शु. १४ म्हणजे सोमवार दि. १६ जानेवारी १६६० रोजी मराठी फौजेने विजापूरच्या रोखाने कूच केले.[५६] या मोहिमेत नेताजींनी कवठे, बोरगाव, मालगाव, कुंडल,घोगाव, सत्तीकीर, आड, मिरज, गोकाक, दोदवाड, मुरवाड, धारवाड, क्षुद्रवंद्यपूर, सागाव, मायिल (माल), पारगाव, सांगली, काणद, कुरूंदवाड, कागल, हेबाळ, हनुवल्ली, हुणवाड, रायबाग, हुकेरी, कांडगाव, हळदी, घुणिका, किणी, अरग, तेळसंग, केरूर, अंबुप, कमळापूर, अथनी, तिकोटे इत्यादी ठिकाणे जिंकून ताब्यात घेतली.[५७] व तेथून खंडण्या वसूल केल्या. यावेळी नेताजींनी आदिलशाही मुलखात आतपर्यंत घुसून तुंगभद्रा नदी परिसरातील गदगलक्ष्मीश्वरापावेतो खंडण्या वसूल केल्या.[५८] धाडसी नेताजींनी आदिलशहाची राजधानी विजापूरपासून केवळ बारा मैलावर असलेल्या तिकोटा या ठाण्यावरही धाड टाकून खंडण्या वसूल केल्या.[५९] अफजलखान वधापूर्वी नेताजी आदिलशाही प्रदेशात मोहिमेवर आले होते. त्यावेळी त्यांच्या सैन्याने अफजलखानास मुकासा असलेला तेरदळ परगणा लुटला होता. अफजलखानाच्या मृत्यूनंतर हा परगणा त्याचा मुलगा फाजलखानाला मुकासा म्हणून मिळाला होता. हा परगणा लुटण्यासाठी नेताजींनी आपल्याबरोबर असलेल्या कल्याण जाधवराव या सरदाराला पाठविले. परंतु तेरदळ परगण्याचा देसाई कृष्णगौडाने यावेळी आपल्या सैन्यासह जाधवराव याला प्रतिकार केल्यामुळे जाधवरावाला हा परगणा काबीज करता आला नाही. परंतु जाधवरावांनी या प्रदेशात लुटालूट करून प्रदेश उध्वस्त केला.[६०] या मोहिमेत नेताजींनी अनेक ठिकाणे काबीज केली असे वर्णन परमानंदाने शिवभारतात केलेले असले तरी त्याचा अर्थ या ठिकाणावर मराठ्यांचा अंमल बसला असे दिसत नाही. लूट करणे व खंडण्या वसूल करणे एवढाच या स्वारीचा उद्देश होता.

### ५:४:३ सिद्दी जौहरची स्वारी :

छत्रपती शिवाजी महाराजांना सर्वत्र यश मिळत होते. महाराजांनी पश्चिम किनाऱ्यापासून थेट विजापूरपर्यंत वादळ उठविले होते. मराठे विजापूरपर्यंत येवून थडकले होते. मराठ्यांच्या या झंझावाताला कसे तोंड द्यायचे असा प्रश्न आदिलशहाला पडला होता.

आदिलशहाने मदतीसाठी दिल्लीला बोलणे लावले होते. पण औरंगजेबाकडून त्वरीत प्रतिसाद मिळाला नव्हता. अशा परिस्थितीत आदिलशहाने महाराजांचा बंदोबस्त करण्याच्या कामगिरीवर कर्नूलचा बंडखोर आदिलशाही सरदार सिद्दी जौहर याची नियुक्ती केली. आदिलशहाने त्याला 'सलाबततखान' हा किताब देवून वाई परगण्याचा 'दिवाण' म्हणून नामजाद केले. तसेच खटाव परगण्याचा 'लष्कर सरहवालदार' हे पदही त्याच्याकडे सोपविले.[६१]

सिद्दी जौहर आपल्याबरोबर हजारो सिद्द्यांची फौज घेवून मोहमेवर निघाला. आदिलशहाच्या आज्ञेनुसार रूस्तूमजमान, फाजलखान, सादतखान, बाजी घोरपडे, पीडनाईक, भाईखान, सिद्धी मसूद इत्यादी सरदारही सिद्दीला सामील झाले.[६२] सोळा ते वीस हजार घोडदळ व पस्तीस ते चाळीस हजार पायदळ एवढ्या प्रचंड सेनेसह[६३] विजापूरहून निघून सिद्दी जौहरने २ मार्च १६६० नंतर छत्रपती शिवाजी महाराज असलेल्या पन्हाळगडास वेढा दिला.

**५:४:३:१ नेताजींचा शहापुरवर हल्ला :**

पन्हाळ्याला वेढा घालण्यास जात असतानाच सिद्दीने आपल्या सैन्याची तुकडी खटाव परगण्याचा ताबा घेण्यासाठी पाठविली. हे सैन्य आल्यावर नेताजींनी याठिकाणी नेमलेले तहसिलदार, सैनिक ठाणे सोडून निघून गेले. त्यामुळे येथील मराठ्यांचा अंमल उठला.[६४] इकडे महाराजांनी सिद्दी जौहरच्या स्वारीला शह देण्यासाठी व त्याने पन्हाळ्याला वेढा घालण्यापूर्वीच सरनौबत नेताजींना चार ते पाच हजार फौज देवून वेगळ्या वाटेने विजापूरकडे रवाना केले होते. नेताजींनी अत्यंत वेगाने घोडदौड करून अचानकपणे विजापूरचे उपनगर असलेल्या शहापूरवर रात्रीचा हल्ला चढविला व ते यथेच्छ लुटले.[६५] मराठ्यांना रोखण्यासाठी आदिलशाही सेनापती मुल्ला महमद हा बाबुलखान (बहलोलखान) व अजापा नाईक या दोन सरदारासह धावून आला. परंतु मराठ्यांनी आदिलशाही सैन्याचा पराभव करून त्यांचे २००० घोडेस्वार कैद केले.[६६] सिद्दी जौहरबरोबर बरेचसे सैन्य गेल्यामुळे विजापूरात सैन्य कमी होते. त्यामुळे दरबारात विलक्षण धांदल उडाली. परंतु लवकरच त्यांना

समजले की, हल्ला करणाऱ्या नेताजीबरोबरही फारसे सैन्य नाही. त्यामुळे विजापूरी दरबाराने राजधानीत शिल्लक असलेले पाच हजाराचे घोडदळ वेंगुर्ल्याचा जहागिरदार खवासखान याच्या नेतृत्वाखाली देवून त्याला नेताजीवर पाठविले. उभय सैन्यात जबरदस्त संघर्ष घडून आला. यात कोणाचा जय होईल हे ठरविणे कठीण होते. परंतु शेवटी आदिलशाही सैन्याच्या रेट्यामुळे नेताजींना तेथून माघार घ्यावी लागली.[६७]

महाराजांच्या आदेशाप्रमाणे शहापूर लुटून जाळून टाकण्याचे काम सरनौबतांनी केले होते. परंतु खुद्द आदिलशहाच्या राजधानीवरच हल्ला चढवून एवढा गोंधळ निर्माण व्हावा की, राजधानीच्या संरक्षणासाठी सिद्दी जौहरला पन्हाळ्याच्या वेढ्यातील आपले काही सैन्य तिकडे पाठविण्याची आवश्यकता भासावी. म्हणजेच त्याच्या सैन्याची पांगापांग व्हावी असा महाराजांचा उद्देश असावा. परंतु हा उद्देश मात्र सफल झाला नाही.

**५:४:४ शाहिस्तेखानाला प्रतिकार :**

महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकून पडलेले असतानाच मुघल सेनापती शाहिस्तेखान स्वराज्यावर चालून आला होता. आदिलशहाच्या विनंतीनुसार औरंगजेबानेही महाराजांना बुडविण्याचा चंग बांधला होता. सत्त्याहत्तर हजार घोडदळ व अगणित पायदळ घेवून शाहिस्तेखान ३ मार्च १६६० रोजी स्वराज्यातील दौंडजवळ सोनवडी या गावी पोहोचला.[६८] शाहिस्तेखानाच्या स्वारीची बातमी महाराजांना पन्हाळ्यावर समजली. यावेळी महाराजांची मोठी कोंडी झाली होती. महाराज वेढ्यात अडकून पडले होते. त्यामुळे त्यांची बाहेरच्या कामगिरीची भिस्त सरनौबत नेताजींवरच होती.

नेताजी यावेळी विजापूरकडे गेले होते. महाराजांनी निरोप पाठवून त्यांना विजापूरच्या मोहिमेवरून माघारी बोलविले व शाहिस्तेखानापासून स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी जाण्याचा आदेश दिला.[६९] त्यानुसार नेताजी एप्रिल महिन्याच्या दरम्यान स्वराज्यात परतले (१७ एप्रिल पूर्वी) आणि स्वराज्यात घुसणाऱ्या शाहिस्तेखानाला अडविण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला.[७०] शाहिस्तेखान स्वराज्यात घुसला आणि मोगली विध्वंस सुरू झाला. गावेच्या गावे उजाड केली जावू लागली. असे थैमान घालीत खान सोनवडीपासून पुढे सरकून सुप्याला आला. खान

आलेला पाहताच मराठे सुप्याची गढी रिकामी करून निसटून गेले. यानंतर मराठे बादशाही फौजेच्या आसपास संधी मिळताच छापा घालण्यासाठी घुटमळत होते व जमेल तेथे छापे घालून खानाला सळो कि पळो करून सोडत होते. खानाने हल्ला केला की, जंगलात पळून जात होते.[७१]

मराठ्यांच्या तडाख्यातून कसाबसा वाचत खान पुढे सरकला व बारामती, इंदापूर काबीज करून शिरवळ, खेड शिवापूर, सासवड मार्गे ९ मे १६६० रोजी पुण्याला पोहोचला. शाहिस्तेखानाने पावसाळा पुण्यातच घालविण्याचे ठरविले होते. परंतु तो पुण्याला येण्यापूर्वीच मराठ्यांनी पीक, धान्ये, गवत, कडबा वगैरे नष्ट केले होते. त्यामुळे मुघली सैनिकांना व जनावरांना खाण्यापिण्याच्या सामानाचा अत्यंत तुटवडा पडला. तेव्हा पुण्याहून चाकणला जाण्याचे शाहिस्तेखानाने ठरविले. त्याप्रमाणे २१ जून १६६० ला शाहिस्तेखान चाकणला आला. चाकणपर्यंतचा पल्ला गाठताना शाहिस्तेखानाला नेताजी पालकरांना तोंड द्यावे लागले. या संघर्षात खानाला मनुष्यबळाचे व संपत्तीचे पुष्कळ नुकसान सोसावे लागले. याचदरम्यान नेताजींना महाराजांच्या मदतीसाठी पन्हाळ्याला जावे लागले. त्यामुळे खानाला चाकणला जाणे सुलभ झाले.[७२]

**५:४:४:१ पन्हाळ्याच्या वेढ्यातून महाराजांना सोडविण्याचा प्रयत्न :**

शाहिस्तेखानाने स्वराज्यात चालविलेल्या उच्छादाच्या बातम्या राजगडाच्या पायथ्याशी शिवपट्टण येथे असलेल्या जिजाबाईंच्या कानी येत होत्या. या बातम्यांनी त्या अस्वस्थ झाल्या होत्या आणि त्यापेक्षाही त्यांना पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकून पडलेल्या आपल्या प्राणप्रिय पुत्राची काळजी लागली होती. पुत्रदर्शनासाठी व्याकुळ झालेल्या जिजाबाई महाराजांना वेढ्यातून सोडविण्यासाठी स्वत: जाण्यास तयार झाल्या होत्या. याचवेळी सरनौबत नेताजी पालकर सिद्दी हिलालसह जिजाबाईंची भेट घेण्यास शिवपट्टणास आले. महाराजांना वेढ्यातून सोडविण्याचा प्रयत्न न करता नेताजी शिवपट्टणला आल्याचे पाहून जिजाबाईंच्या रागाचा पारा चढला. क्रोधाविष्ट झालेल्या जिजाबाईंनी भेटीस आलेल्या नेताजी व हिलालाची निर्भत्सना केली. पन्हाळगडावर शत्रूने वेढलेल्या धन्याला शत्रूच्या भीतीने तसेच

सोडून, सगळी लाज गुंडाळून ठेवून तुम्ही दोघे येथे आलात असा आरोप करून जिजाबाईंनी महाराजांना सोडविण्यासाठी स्वत:च जाण्याचा निर्धार व्यक्त केला. परंतु नेताजींनी संतापलेल्या जिजाबाईंचे बोल मनाला लावून न घेता त्यांची समजूत घातली. महाराजांच्या आदेशानुसारच मी विजापूर मोहिमेवरून इकडे मोगलांशी युद्ध करण्यासाठी परत आलो आहे असा स्पष्ट खुलासा नेताजींनी केला. एवढेच नव्हे तर मुघलांना रोखण्याचे काम इतर मराठे करतील व मी स्वत: महाराजांना वेढ्यातून सोडविण्यासाठी जातो. आपण निश्चित रहा अशी विनंती करून नेताजींनी पन्हाळ्यावर चालून जाण्याची तयारी केली.[७३]

नेताजी प्रचंड सेनेसह पन्हाळ्यावर चालून निघाले. यावेळी सिद्दी हिलाल त्यांच्यासोबत होता. ६ जून १६६० रोजी नेताजींनी साताऱ्याच्या पश्चिमेकडील वासोटा हा विजापूरकरांचा जुना व दुर्गम किल्ला जिंकून घेवून स्वराज्याला जोडला.[७४] परंतु त्यामुळे पन्हाळ्याच्या वेढ्यावर काहीही परिणाम झाला नाही. तेव्हा सिद्दी जौहरच्या फौजेवर अकस्मात हल्ला चढविण्याचे नेताजींनी ठरविले. सिद्दी जौहरने वेढ्याचे काम अतिशय हुशारीने व सावधपणे चालविले होते. मराठ्यांचे सैन्य जवळ येत असल्याचे पाहून सिद्दीने वेढ्याच्या अलीकडेच त्यांना रोखण्यासाठी आपले सैन्य रवाना केले. नेताजींनी त्वेषाने सिद्द्यांना धडक दिली. सिद्दीचे सैन्यही जिद्दीने लढत होते. युद्धाच्या या धुमश्चक्रीत सिद्दी हिलालचा तरूण पुत्र वाहावाह मागचा पुढचा विचार न करता शत्रूसैन्यात घुसून लढू लागला. परंतु थोड्याच वेळात शत्रूसैन्याच्या माऱ्याने जखमी होवून बेशुद्ध झाला. सिद्दीच्या सैन्याने त्याला कैद करून आपल्या गोटात नेले. आपल्या प्रिय पुत्रास शत्रूने कैद केलेले पाहून सिद्दी हिलालाचा धीर खचला. तो पळत सुटला. हिलालाचे सैन्य चारी दिशांना पळत सुटल्याने मराठ्यांची फळी फुटली. पिछाडीचे रक्षण करणारे नेताजी या सैन्याला आवरू शकले नाहीत. मराठ्यांचा प्रचंड पराभव झाला. नेताजींना माघार घ्यावी लागली.[७५] वेढा फोडण्याचा पहिला प्रयत्न निष्फळ ठरला.

यानंतरही नेताजींनी वेढा फोडण्यासाठी अनेकवेळा हल्ले चढविले. शत्रूशी उघड सामना करण्याऐवजी नेताजींनी शत्रूसैन्यावर रात्रीचे छापे घालण्यास सुरूवात केली. ज्या

बाजूला वेढा कमकुवत असे त्याबाजूने मराठे शत्रूच्या ठाण्याजवळ येत व कापाकापी करीत आणि शत्रूचे लोक अंगावर चालून आले म्हणजे त्यावर गरणाळा सोडून निघून जात. सिद्दीची रसद बंद करण्याचाही मराठ्यांनी प्रयत्न केला.[७६] त्याप्रमाणे नेताजींनी सिद्दीच्या सैनिकांना पुष्कळच हैराण केले. तरीही वेढा थोडा सुद्धा सैल करणे नेताजींना शक्य झाले नाही.

सरनौबत नेताजींच्या पराभवाची बातमी पन्हाळ्यावर महाराजांना समजली. जौहरला आपल्या सैन्याच्या सहाय्याने जिंकणे सध्या तरी शक्य नाही याची जाणीव त्यांना झाली. त्यामुळे वेढ्यातून सुटण्यासाठी त्यांनी इतर पर्यायांचा विचार सुरू केला. जेथे शक्ती कमी पडली तेथे महाराजांनी नेहमीच युक्तीचा अवलंब केलेला दिसतो. येथेही त्यांनी आपली बुद्धी वापरून शत्रूला चकवायचे ठरविले. जौहरकडे महाराजांनी गंगाधर नावाचा वकील पाठविला. त्यामुळे तो गाफील झाला. त्याचाच फायदा घेवून १३ जुलै १६६० रोजी महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटले व विशाळगडावर पोहोचले. विशाळगडावरून काही दिवसांनी राजगडावर आले. याच सुमारास शाहिस्तेखानाने चाकणचा वेढा पूर्ण शक्तिनिशी आवळला होता. पुण्यापासून चाकणपर्यंतचा मुलूख खानाच्या सैन्याने व्यापल्यामुळे महाराजांना व नेताजींना चाकणच्या मदतीला जाणे शक्य झाले नाही.[७७] तरीही फिरंगोजी नरसाळा या शूर किल्लेदाराच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी समर्थपणे छपन्न दिवस किल्ला लढविला. शेवटी किल्ल्याचा एक बुरूज उडविण्यात मोगल यशस्वी झाले. त्यामुळे नाईलाज होवून ६ ऑगस्ट १६६० रोजी मराठ्यांनी किल्ला खानाच्या होती सोपविला.

**५:४:४:२ उंबरखिंडीच्या लढ्यातील सहभाग :**

चाकणचा भुईकोट गढीवजा किल्ला घेण्यास शाहिस्तेखानाला छपन्न दिवस लागले होते. त्याची शेकडो माणसे मारली गेली होती. प्रचंड दारूगोळा खर्च झाला होता. परिणामी स्वराज्याचे डोंगरी किल्ले घेण्याचा विचार शाहिस्तेखानाने सोडून दिला. किल्ल्याखालील मुलूख घेण्याकडेच त्याने आता लक्ष केंद्रित केले. शाहिस्तेखानाचे बळ अफाट असल्याने उघड्या मैदानावर महाराज त्याला तोंड देवू शकत नव्हते. चाकण जिंकल्यानंतर खान स्वस्थ बसणार नव्हता. तिकडे सिद्दी जौहर पन्हाळा वेढून बसला होता. आदिलशहा आणि मुघल

एकाचवेळी स्वराज्याचा घास घेण्यासाठी समोर ठाकले होते. अशा वेळी दोन्ही शत्रूंशी एकाचवेळी लढणे शक्य नाही, हे ओळखून महाराजांनी आदिलशहा बरोबर सुरू असलेले युद्ध तूर्त थांबविण्याचा निर्णय घेतला आणि २२ सप्टेंबर १६६० रोजी पन्हाळा आदिलशहाला देवून आदिलशहाशी तडजोड घडवून आणली.

सन १६६० च्या पावसाळ्यानंतर शाहिस्तेखान चाकणहून पुण्यास परतला. चाकणच्या अनुभवावरून किल्ल्याच्या नादी न लागता किल्याभोवतालचा मुलूख घेण्याचा खानाचा विचार होता. परंतु हा मुलूख जिंकणेही सरनौबत नेताजींच्या व अन्य मराठे सरदारांच्या चिवट प्रतिकारामुळे खानाला शक्य होत नव्हते.[७८] अशा परिस्थितीत महाराजांचा कायमचा बंदोबस्त करायचा तर त्यांच्या बलस्थानावर आघात केला पाहिजे हे शाहिस्तेखानाने ओळखले. सह्याद्री जिंकल्याशिवाय सह्याद्रीधिपती (शिवाजी) आपल्या ताब्यात येणार नाही हे ओळखूनच शाहिस्तेखानाने सह्याद्रीच्या आश्रयाने पसरलेली कोकणपट्टी जिंकण्यासाठी कारतलबखान या आपल्या शूर सरदारास जाण्याचा आदेश दिला.

कारतलबखानासोबत कछप, चव्हाण, अमरसिंह, मित्रसेन व त्याचा भाऊ, सर्जेराव गाढे, जसवंत कोकाटे, जाधवराव या सरदाराबरोबरच माहुरच्या जहागिरदाराची पत्नी 'रायबागीण' हिचीही नियुक्ती या मोहिमेसाठी करण्यात आली. शाहिस्तेखानाच्या आदेशाप्रमाणे कारतलबखान मोठे सैन्य घेवून जानेवारी १६६० मध्ये मोहिमेवर निघाला.[७९] लोहगडाच्या दक्षिणोत्तर मार्गाने खानाचे सैन्य सह्याद्री उतरू लागले. अत्यंत अरूंद आणि नलिकायंत्रासारख्या वळणावळणाच्या पाऊल वाटेने घाट उतरताना मुघल सैन्य भयभीत झाले होते.

कारतलबखानाने अगदी गुप्तपणे मोहिमेची आखणी केली होती. त्यासाठीच त्याने हा बिकट मार्ग निवडला होता. कारतलबखानाने गुप्तता राखूनही महाराजांच्या हेरांनी त्याच्या मोहिमेची सर्व बित्तंबातमी महाराजांकडे पोहोच केली होती. अर्थात शाहिस्तेखान चाकणवरून पुण्यास आल्यानंतर आपले सैन्य आज ना उद्या सह्याद्री उतरून कोकणात पाठवील असा अंदाज महाराज व त्यांच्या मुत्सद्यांनी अगोदरच बांधला होता. या सैन्याला कोकणात

जाण्यापासून रोखण्यासाठी त्यांची तयारी सुरू होतीच.[८०] कारतलबखानाच्या मोहिमेची बातमी समजताच महाराजांनी जलद हालचाली करून खानाच्या अगोदरच आपले पायदळ सैन्य सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या उंबरखिंडीच्या झाडीत लपवून ठेवले. स्वत: शिवाजी महाराजही सरनौबत नेताजी समवेत तिथे येवून थडकले होते.[८१] कारतलबखान अरुंद वाटेने सह्याद्री उतरत असतानाही महाराजांनी त्याला अजिबात विरोध केला नाही. कारण उंबरखिंडीच्या घनदाट अरण्यातच खानाला घेरण्याचा महाराजांचा विचार होता.

उंबरखिंडीच्या अरण्यातील पाऊलवाटेवर खान पोहोचताच महाराजांच्या रणभेरी वाजू लागल्या आणि पाठोपाठ मराठ्यांनी मुघल सेनेवर हल्ला चढविला. मराठ्यांच्या तोफा दणाणू लागल्या. बंदुकांचा आणि बाणांचा मारा परस्परांवर होवू लागला. कारतलबखानाने आरंभी मराठ्यांना चांगलेच तोंड दिले. अमरसिंह व मित्रसेन या खानाच्या सहकाऱ्यांनी बाणांचा वर्षाव करून मराठ्यांना रोखले व आपल्या सैन्याचे रक्षण केले. कारतलबखान कोंडीत सापडूनही आपला युद्धावेश सोडत नाही, हे पाहिल्यानंतर महाराजांनी ताबडतोब खानाचे सर्व मार्ग अडवून धरण्याची सरनौबत नेताजींना आज्ञा दिली.[८२] त्याप्रमाणे नेताजींनी ताबडतोब शत्रूचे सर्व मार्ग बंद केले व मुघल सेनेला चारी बाजूंनी घेरले.[८३] आता युद्धाला चांगलेच तोंड लागले. यावेळी खुद्द शिवाजी महाराजही धनुष्यबाणाच्या सहाय्याने शत्रूशी लढत होते. मराठ्यांच्या जबरदस्त माऱ्यामुळे शत्रूसेनेची दाणादाण उडाली. जसजशी उन्हे वाढू लागली, तसे मुघल सैन्य पाण्याअभावी कासावीस झाले.[८४] जिथे वाराही पोहोचू शकणार नाही अशा या घनदाट अरण्यात मराठ्यांनी आपल्याला पूर्णपणे कोंडले आहे. या जाणीवेने मुघल सैन्याचा धीर खचला. युद्ध करण्याचे सोडून हे सैन्य चित्राप्रमाणे तटस्थ उभे होते. कारतलबखानावर सर्वनाश ओढवण्याची पाळी आली होती. मुघल सैन्याची ही अवस्था पाहिल्यानंतर रायबागनने कारतलबखानास महाराजांना शरण जाण्याचा सल्ला दिला. तो मान्य करून कारतलबखानाने आपला दूत महाराजांकडे पाठवून अभयदान व जीवदान मागितले. महाराजांनी कारतलब खानाचा दयेचा अर्ज मंजूर केला. खानाने खंडणीची रक्कम महाराजांकडे पाठवून दिली.

यावेळेपर्यंत मराठा सैन्य लढतच होते. खंडणी पोहोचताच महाराजांनी युद्ध बंद करण्याचा आदेश दिला.[८५]

३ फेब्रुवारी १६६१ रोजी कारतलबखानाने खंडणी देवून स्वत:ची सुटका करून घेतली. कारतलबखानाचे सर्व युद्धसाहित्य, मौल्यवान सामानसुमान, हत्ती, घोडे इत्यादी मराठ्यांनी आपल्या ताब्यात घेतले. कारतलबखानचा पराभव केल्यानंतर महाराजांनी द्रव्यार्जनासाठी व शत्रूचा समाचार घेण्यासाठी तळकोकणवर स्वारी करण्याचा निर्णय घेतला. सरनौबत नेताजींना मात्र त्यांनी मोगलांच्या बंदोबस्तासाठी याच भागात ठेवले. मोगली सैन्य पुन्हा कोकणात उतरू नये यासाठी सतर्क राहण्याची कामगिरी सरनौबतावर सोपविली गेली. मुघल जरी आता येथून निघून गेले असले तरी ते पुन्हा माघारी येणार नाहीत असे तू समजू नकोस असा सल्लाही महाराजांनी सरनौबतांना दिला.[८६]

आपल्या अनुपस्थितीत स्वराज्याचे संरक्षण करण्याची फार मोठी जबाबदारी महाराजांनी नेताजींवर टाकली होती. नेताजींच्या पराक्रमाची, शौर्याची जाण असल्यामुळेच महाराजांनी ही कामगिरी नेताजींवर सोपविली होती. नेताजींवरील विश्वासामुळेच महाराज निर्धास्तपणे कोकणात उतरून आपली मोहिम फत्ते करू शकले. या मोहिमेत महाराजांनी आदिलशहाच्या ताब्यातील दक्षिण कोकणावर आपला अंमल प्रस्थापित केला.

शिवाजी महाराज तळकोकणात उतरताच शाहिस्तेखानाने पुन्हा जोर धरला. सरनौबत नेताजी पालकर यावेळी खानाच्या फौजेवर जमेल तिथे छापे घालत होते. सुपे ते परिंडा भागात यावेळी नेताजींनी धामधूम चालविली होती. दरम्यान कारतलबखानाच्या पाडावानंतर शाहिस्तेखानाने मे १६६१ मध्ये दुसरी मोठी फौज पाठवून उत्तर कोकणातील कल्याण जिंकून घेतले होते. सरनौबत नेताजी व मोरोपंत यांना देशावरच मोगली बंदोबस्तासाठी अडकून पडावे लागले होते. त्यामुळे कल्याण–भिवंडी मुघलांकडून सोडविण्याचा प्रयत्न स्वत: महाराजांनी केला पण त्यात त्यांना यश मिळाले नाही.[८७]

**५:४:४:३ नेताजींचा पराभव : मुघल सैन्याकडून पाठलाग :**

सन १६६२ च्या प्रारंभीच शिवाजी महाराजांनी पेणपासून सहा मैलावर असलेला मिऱ्या डोंगर चढून कल्याण भिवंडीत धुमाकूळ घालणाऱ्या नामदार खानाच्या ठाण्यावर हल्ला करून ठाणे घेतले. पेण शहर लुटले. नामदारखानही सावध होता. त्यामुळे या युद्धात महाराजांना फारसा लाभ झाला नाही. उलट युद्धात वाघोजी तुपे व इतर अनेक सैनिक जखमी झाले.[८८] नामदारखान हा औरंगजेबाचा वजीर जाफरखान याचा मुलगा होय. शाहिस्तेखानाच्या सैन्याचा बिनीचा सरदार असलेल्या नामदारखानाने मराठ्यांशी अनेक लढाया करून मराठ्यांचा मोड करण्याचा प्रयत्न चालविला होता.[८९] याच नामदारखानाने सरनौबत नेताजींना सुप्याजवळ पराभूत केले. सुप्याजवळ नेताजींची सर्फराजखान व नामदारखान यांच्याशी चकमक उडाली. यात नेताजींना पराभव पत्करावा लागला. यावेळी मुघलांना १५३ बैल, ८ घोड्या व शिंगरे याबरोबरच ३४ तोळे ३११ मासे रुपे व ७ मासे सोने इत्यादींची लूट मिळाली. मुघल सरदारांनी अभिमानपूर्वक ही लूट औरंगजेबाकडे पाठवून दिली.[९०] मुघलांना मिळालेली ही लूट अल्प असली तरी शिवाजी महाराजांच्या सरनौबतांना पराभूत केल्याचा अभिमान वाटल्यामुळेच मुघलांनी ही लूट औरंगजेबाकडे पाठविली असावी.

शाहिस्तेखानाचा त्रास आता चांगलाच जाणवू लागला होता. शाहिस्तेखान पुण्यात लाल महालात मुक्काम ठोकून होता. अधूनमधून महाराजांच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशांवर लष्करी तुकड्या पाठवून खेडी व परगणे जाळून लुटत होता. महाराज व सरनौबत नेताजी खानाच्या लष्करावर जागोजागी हल्ले चढवीत होते. पण त्याचा फारसा परिणाम होत नव्हता. अशा परिस्थितीत महाराजांनी नेताजींना मोगली मुलखात लूट करण्यासाठी पाठविले. मार्च १६६३ मध्ये नेताजींनी मुघल प्रदेशात घुसून तो उध्वस्त करण्याचा व लुटण्याचा धुमधडाका चालविला. नेताजींनी मोगली फौजेची रसद बंद करून व अचानक छापे घालून मुघलांना त्रस्त करून सोडले. तेव्हा नेताजींचा बंदोबस्त करण्यासाठी शाहिस्तेखानाने मोठी फौज पाठविली. या फौजेने नेताजींवर हल्ला चढविला. उभय पक्षाचे घनघोर युद्ध झाले. शत्रूसैन्याची संख्या जास्त असल्याने नेताजींना या युद्धात पराभव पत्करावा लागला.[९१]

या युद्धात नेताजी स्वत: जखमी झाले. त्यांचे ३०० घोडे ठार झाले. अशा परिस्थितीत बचावासाठी ते दक्षिणेकडे पळत सुटले. तरीही मोगलांनी त्यांचा पिच्छा सोडला नाही. मोगलांच्या तावडीतून वाचण्यासाठी मराठ्यांना रोज ४५ ते ५० मैलाची घोडदौड करावी लागली. नेताजींचा पाठलाग करत मोगल विजापूरपासून अवघ्या १५ मैलावर थडकले. मोगलांच्या भयाने आदिलशहा आपल्या कुटुंबासह फक्त १०० घोडेस्वार घेवून बंकापूरला पळून गेला.[९२] यावेळी नेताजींची अवस्था मोठी बिकट झाली होती. सुदैवाने यावेळी त्यांच्या मदतीला आदिलशाही सरदार रूस्तुमजमान धावून आला. त्याने मोगलांची भेट घेवून त्यांच्याशी तह केला. एवढेच नव्हे तर त्याने नेताजींचा पाठलाग न करण्याबद्दल मुघल सरदारांचे मन वळविले. ''पुढचा प्रदेश तुमच्यासाठी अपरिचित असल्याने त्यातून नेताजींचा पाठलाग करणे धोक्याचे आहे, तेव्हा तुम्ही इथूनच माघारी जा. मी स्वत: नेताजीचा पाठलाग करून त्यास पकडतो.'' अशी मुघल सरदारांची समजूत घालून रूस्तूमजमानने मुघलांना माघारी पिटाळले.[९३] रूस्तुमजमान हा अंतस्थपणे महाराजांचा मित्र असल्यानेच त्याने मुघल सरदारांची समजूत घातली व नेताजीला तेथून पळून जाण्यासाठी संधी दिली. रूस्तुमजमानच्या या सहकार्यामुळे जखमी झालेले नेताजी स्वत:चा बचाव करू शकले. या मोहिमेत नेताजींना लूट थोडीच मिळाली, परंतु त्रास मात्र पुष्कळच सहन करावा लागला. नेताजींचा हा दारूण पराभव १८ मार्च ते ३० मार्च १६६३ च्या दरम्यान झाला.[९४]

नेताजींच्या पराभवाची बातमी समजली तेव्हा महाराज रायगडावर होते. कल्याण भिवंडीकडे नामदारखानावर मोहिम काढण्याची तयारी ते करत होते. याचवेळी महाराजांना सिंहगडावर काही फंदफितुरी होत असल्याचीही कुणकुण लागली.[९५] बहुधा शाहिस्तेखानाने गडावर फितुरी माजवून भेदाने हा किल्ला घेण्यासाठी प्रयत्न सुरू केला असावा. शाहिस्तेखानाने चाकणचा किल्ला १६६० मध्ये घेतल्यानंतर नंतरच्या दोन तीन वर्षाच्या काळात किल्ले घेण्याचा प्रयत्न केला नव्हता. त्याने स्वराज्यातील मैदानी मुलूख आपल्या ताब्यात घेतला होता. त्यामुळे किल्ले महाराजांच्या ताब्यात आणि त्याखालचा मुलूख मुघलांच्या ताब्यात अशी परिस्थिती निर्माण झाली होती. किल्ल्याखालचा मुलूख आपल्या

ताब्यात असल्यानंतर किल्ले जास्त दिवस तग धरणार नाहीत असा शाहिस्तेखानाचा अंदाज होता. परंतु पुण्यात मुक्काम ठोकून ३ वर्षे झाली तरी किल्लेदार शरण आले नाहीत. तेव्हा खानाने फितुरीचा अवलंब करून सिंहगड ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू केला. सिंहगड मोगलांच्या ताब्यात जाणे म्हणजे पुणे प्रांतच हातून जाण्यासारखे होते. त्यामुळे महाराज अस्वस्थ झाले. त्याबरोबरच शाहिस्तेखानाचा कायमचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय गत्यंतर नाही याची जाणीवही महाराजांना झाली आणि त्यांनी शाहिस्तेखानावर छापा टाकण्याचे निश्चित केले.

**५:४:४:४ शाहिस्तेखानावर छापा – नेताजींचा सहभाग :**

चैत्र शु. अष्टमी म्हणजेच ५ एप्रिल १६६३ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानावर छापा टाकण्याचे निश्चित केले. हुजूरपागेतून एक हजार निवडक धारकरी आणि इतर लष्करातून दोन हजार घोडेस्वार निवडून महाराजांनी बरोबर घेतले. या सैन्याबरोबरच सरनौबत नेताजी पालकर, बाबाजी बापूजी, चिमणाजी बापूजी मुदगल, मोरोपंत पिंगळे, बाजी सर्जेराव जेधे, चांदजी जेधे, कोयाजी बांदल, येसाजी कंक, तानाजी मालुसरे इत्यादी सरदारही महाराजांबरोबर निघाले. पुण्याजवळ येताच महाराजांनी निवडक ४०० लोक आपल्याबरोबर घेतले. उर्वरित सैन्य दोन ठिकाणी विभागून एक तुकडी नेताजी पालकर व दुसरी तुकडी मोरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली शाहिस्तेखानाच्या तळाच्याबाहेर अर्ध्या कोसावर परतीच्या वाटेवर दोन बाजूंनी उभ्या केल्या.[९६] आणि स्वत: महाराजांनी बाबाजी व चिमणाजी या बंधूसह शाहिस्तेखानाच्या छावणीवर धाडसी हल्ला चढविला. यावेळी शाहिस्तेखानाच्या जीवावरच बेतले होते. पण ते बोटावर निभावले. खानाची तीन बोटे कापली गेली. त्याचा मुलगा अब्दुलफतह मारला गेला. इतर ५० च्या वर माणसे मारली गेली व जखमी झाली. शाहिस्तेखान मारला गेला या समजुतीने महाराजांनी खानाची छावणी सोडली आणि धावत बाहेर येवून येथून सरनौबत व पेशवे यांच्या फौजेत सामील होवून सिहंगडाच्या रोखाने दौडत निघाले.[९७]

महाराजांचे हे अचाट कर्तृत्व खरोखरी थक्क करून सोडणारे होते. या हल्ल्याने खानाची तर अब्रूच गेली. त्यामुळेच त्याने पुण्यातील मुक्काम हलविला आणि तो औरंगाबादेकडे

रवाना झाला. शाहिस्तेखानाची फटफजिती औरंगजेबाला ८ मे १६६३ रोजी तो काश्मिरच्या वाटेवर असताना कळली. या वार्तेने चिडून त्याने शाहिस्तेखानाची बदली बंगालचा सुभेदार म्हणून केली. खानाला हुसकावून लावल्यामुळे तीन वर्षे कोंडले गेलेले स्वराज्य पुन्हा समाधानाने सुटकेचा श्वास सोडू लागले.

शाहिस्तेखानाच्या रूपाने स्वराज्यावर आलेल्या या मोठ्या संकटात सरनौबत या नात्याने नेताजींचाही कस लागला होता. शूर, पराक्रमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेताजींना याकाळात अनेकवेळा पराभव पत्करावा लागला होता. नेताजी कितीही पराक्रमी असले तरी आपल्या मर्यादित सैन्यबळाने खानाच्या अवाढव्य फौजेशी लढा देताना नेताजींना अनेकवेळा माघार घ्यावी लागली. असे असले तरी नेताजींच्या चिवट प्रतिकारामुळेच खानालाही प्रचंड नुकसान सोसावे लागले होते.

खानावर महाराजांनी घातलेल्या छाप्यावेळी शाहिस्तेखानाच्या छावणीत घुसणाऱ्या मराठ्यांच्या पथकात नेताजी सहभागी नव्हते. याकामी महाराजांनी शत्रूसैन्याला अपरिचित अशा चेहऱ्यांना सहभागी करून घेतले असावे. शत्रूसैन्याला सतत हल्ले करून त्रस्त करणारे नेताजी शत्रूला परिचित होते. त्यामुळेच ते ओळखले जाण्याचा धोका होता. कदाचित या कारणामुळेच नेताजींना छावणीबाहेर ठेवण्यात आले असावे. सुदैवाने छाप्याची कामगिरी महाराजांनी इतकी बेमालुमपणे पार पाडली की, छावणीबाहेर असलेल्या नेताजींना व मोरोपंतांना विशेष काही करण्याची वेळच आली नाही. परंतु जर छाप्याची ही योजना काही कारणाने फसली असती. शत्रूसैन्य लवकर सावध झाले असते तर शत्रूला अडवून धरून महाराजांना सुखरूपपणे बाहेर काढण्याची मोठी जबाबदारी नेताजी व मोरोपंतांना पार पाडावी लागली असती. परंतु तशी वेळच आली नाही. महाराज कामगिरी फत्ते करून बाहेर आले. आणि मोगली सैन्याला लक्षात येण्यापूर्वीच निसटून सिंहगडावर सुखरूप पोहोचले.

शाहिस्तेखानावरील छाप्यानंतर केवळ आठच दिवसात म्हणजे १३ एप्रिल १६६३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज कोकणातील कुडाळ वेंगुर्ले भागात मोहिमेवर गेले. महाराज वेंगुर्ल्याजवळ आल्याचे समजताच तेथील डच रेसिडेंटने महाराजांचे अभिनंदन करणारे पत्र व

नजराणा घेवून बाबा शेणवी याला पाठविले. याचवेळी सरनौबत नेताजी व रावजी पंडित यांनाही पत्रे पाठविण्यात आली.[९८] परंतु नेताजी यावेळी महाराजांबरोबर नव्हते. त्यामुळे महाराज व पंडित यांच्या पत्रांची उत्तरे व नजराणा घेवून शेणवी माघारी गेला. नजराणा अगदीच क्षुद्र असल्याने महाराजांनी तो स्वीकारला नाही. तेव्हा डचांनी नजराणा वाढवून पाठविला. तो मात्र महाराजांनी स्वीकारला. या मोहिमेत महाराजांनी कुडाळ व आसपासचा प्रदेश जिंकून घेतला. पुढे मिरजन कारवारपर्यंत धडक मारण्याची त्यांची इच्छा होती. परंतु याचवेळी मोगलांनी महाडपर्यंत रेटा दिल्याची व एका चकमकीत नेताजी ठार झाल्याची बातमी आल्यामुळे महाराजांना परतावे लागले. सुदैवाने नेताजी पालकर मारले गेल्याचे वृत्त खोटे होते. ती एक अफवा होती.[९९]

### ५:४:५ सुरत लुटीतील सहभाग १६६४ :

छत्रपती शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानावर टाकलेल्या छाप्याच्या धक्क्यातून मुघल सत्ता सावरते न सावरते तोच जानेवारी १६६४ मध्ये महाराजांनी सुरत लुटून मुघलांना दुसरा धक्का दिला. सुरतेवरील या हल्ल्यात महाराजांबरोबर सरनौबत नेताजी पालकर, नारो बापूजी, चिमणाजी बापूजी, परसोजी महाडिक, संताजी बोबडे इत्यादी सरदार मंडळीही होती.[१००] दहा हजार घोडदळासह महाराजांनी राजगडाहून सुरतेवरील स्वारीस प्रयाण केले व ५ जानेवारी १६६४ रोजी ते सुरतेपासून अवघ्या अठ्ठावीस मैलावर असणाऱ्या गणदेवी या ठिकाणी आले. येथूनच त्यांनी आपले दूत सुरतेचा सुभेदार इनायतखान व सुरतेतील धनाढ्य व्यापाऱ्यांकडे पाठविले. सुरतकरांनी आपणास ५० लाखाची खंडणी द्यावी अशी महाराजांची अपेक्षा होती. परंतु सुरतकरांनी त्यांना प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे महाराजांचे सैन्य शहरात घुसले व त्यांनी शहर लुटले. ६ जानेवारीपासून ९ जानेवारीपर्यंत महाराज स्वस्थपणे सुरत लुटीत होते. रोकड आणि मालमत्ता या दोन्ही रूपाने त्यांनी सुरतेहून जी लूट नेली ती जवळपास १ कोटी रुपयाची असावी. सर्व लूट घेवून महाराज ससैन्य आल्या वाटेनेच माघारी फिरले. परतीच्या प्रवासात महाराजांचा तळ काही काळ लोहगडावर पडला होता. सरनौबत नेताजी पालकर इतर सरदारांसह तळावर होते. लोहगडावरून मराठी लष्कर लुटीसह

राजगडाकडे जायला निघाले. रस्त्यातील वडगाव या गावाजवळ लष्कर येताच मुघल सरदार मुकुंदसिंग राजपूत याने मराठ्यांना गाठले. यावेळी नेताजी बरोबर परसोजी, चिमणाजी, संताजी इत्यादी सरदार लूट घेवून पुढे सरकले. मुकुंदसिंगाबरोबर नारोबापूजीची चकमक उडाली. यात नारोबापूजी छातीत बाण लागून ठार झाला.[१०१]

सुरतेहून परत आल्यावर शहाजीराजे मरण पावल्याची अत्यंत शोकजनक वार्ता महाराजांना कळाली. त्यामुळे त्यांचे काही दिवस दु:खात गेले. याकाळात महाराज काही काळ स्वस्थ असले तरी सरनौबत नेताजी पालकरांचा मोगल मुलूखात सारखा धुमाकूळ सुरू होता.[१०२] नंतर लवकरच खुद्द महाराजांनी अहमदनगरवर हल्ला करून तेथील पेठ लुटली व औरंगाबादपर्यंतचा मुलूख पुन्हा लुटून उध्वस्त केला.

**५:४:६ आदिलशहाशी संघर्ष – नेताजींचा पराक्रम नोव्हेंबर १६६४ :**

शिवाजी महाराजांनी सुरत लुटली ही गोष्ट औरंगजेबाला अस्वस्थ करू लागली. स्वराज्यावर निर्णायक मोहीम काढण्यासाठी त्याने त्वरेने हालचाल सुरू केली. परंतु मोहिमेची नीट आखणी होईपर्यंत महाराजांचे वाढते बळ रोखून धरण्यासाठी औरंगजेबाने आदिलशहाकडे महाराजाविरूद्ध उठावणी करण्याचा तगादा लावला. आदिलशहाकडून येणाऱ्या खंडणीमध्ये तीस हजार होन (सुमारे एक लाख वीस हजार रुपये) सुट देण्यास आपण तयार आहोत असेही त्याने विजापूरला कळविले. यावेळी महाराजांनीही आदिलशहाशी तडजोडीचा पवित्रा घेवून दरसाल तीस हजार होन खंडणी आपण देण्यास तयार आहोत. ती घेवून मोगलांशी मैत्री तोडावी असे बोलणे लावले. परंतु त्याचा उपयोग झाला नाही.उलट आदिलशहावरील मोगलांचे दडपण वाढले. अखेर या दबावाखाली येवून आदिलशहाने अजीजखानाला कोकणात पाठविले. त्याने व लखम सावंताने कुडाळवर हल्ला करून मे १६६४ मध्ये ते ताब्यात घेतले.[१०३]

सन १६६४ च्या हिवाळ्यात आदिलशहाने अनेक प्रयत्नांनी शिवाजी महाराजांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. आदिलशहाने वजीर खवासखानास तीस हजार सैन्यासह कोकणात पाठविले. खानाला या मोहिमेत बाजी घोरपडे, लखम सावंत, व खेम सावंत मदत करणार होते. मोहिमेवर नेमणूक होताच खवासखान जलदीने महाराजांकडून घाटाचा बंदोबस्त

होण्यापूर्वीच घाट उतरला.[१०३] शिवाजी महाराजांनीही प्रत्युत्तराची पूर्ण तयारी केली. बाजी घोरपडे खवासखानाला मिळण्यासाठी जाणार होता. ही बातमी समजताच सर्व फौज एकत्र येण्यापूर्वी महाराजांनी अत्यंत वेगाने घोडदौड करून खुद्द मुधोळवर छापा घातला व बाजी घोरपड्याला लढाईत ठार करून मुधोळ जाळून टाकले.

मुधोळवरील स्वारी आटोपून महाराज खवासखानावर चालून गेले. सरनौबत नेताजी त्यांच्याबरोबर होते. खवासखान घाटाखाली एका अडचणीच्या जागी निष्काळजीपणे छावणी देवून राहिलेला होता. महाराज कोठे आहेत याची खबरबात खानाला नव्हती. तोच महाराजांनी अचानकपणे खवासखानाच्या फौजेला घेरले.[१०४] डचांच्या नोंदीप्रमाणे महाराजांबरोबर यावेळी दहा हजार पायदळ, पाच ते सहा हजार घोडदळ, सात ते आठ हजार बिगारी, चार ते पाच हजार वाहतुकीची जनावरे, नव्वद लढाऊ गलबते होती.[१०५]

महाराज व खवासखान यांच्यात झालेल्या या युद्धाचे तपशीलवार वर्णन डच रेकॉर्डमध्ये दिलेले आहे. या नोंदीनुसार – या दोन्ही सैन्यात चकमकी सुरू झाल्या. . . . . .. शिवाजीने पुन्हा सर्व सैन्य एकत्र केले. या सैन्याचे चार भाग केले आणि अत्यंत शिस्तबद्धपणे खानाच्या सैन्यावर चालून गेले. दोन्ही बाजूंनी परस्परांवर रॉकेटचा मारा सुरू झाला. शिवाजीकडून मारण्यात आलेली बहुतेक रॉकेट खवासखानाच्या सैन्यावर आदळली. हे लक्षात येताच शिवाजीने लखम सावंताच्या पायदळावर जबरदस्त हल्ला चढविला. सावंताच्या सैन्यानेही जोरदार प्रतिकार केला. दोन्ही सैन्यात जोरात चकमक झाली. परंतु खवास–खानाच्या अनुपस्थितीमुळे लखम सावंताच्या फौजेला पराभूत व्हावे लागले. युद्धात नेताजीचे घोडदळ जय्यत (सुसज्ज) तयारीत असतानासुद्धा खवासखानाने या सैन्यात आरपार घुसण्याचे धाडस केले. परंतु नेताजीच्या घोडदळाच्या भाल्यांच्या आणि बंदुकीच्या माऱ्यामुळे खवासखानाचे काही उत्कृष्ट सरदार मृत्यूमुखी पडले. चार तासांच्या युद्धानंतर खानाचे १०० सैनिक मृत्यूमुखी पडले तर काही जखमी झाले. परंतु शिवाजीचे ४०० सैनिक ठार झाले तर ८०० ते १००० सैन्य जखमी झाले. त्यामुळे निराश झालेल्या बंडखोराने (शिवाजी) माघार घेतली. खान विजयी झाला. परंतु त्याच दिवशी लखम सावंताने त्याच्या कुमकुवत दुव्याकडे

लक्ष वेधल्याने खवासखानाने त्याच्या सल्ल्याने कुडाळ सोडले. ही बातमी समजताच शिवाजी तातडीने कुडाळला गेला व त्याने किल्ल्याचा बंदोबस्त केला. ५ नोव्हेंबरला शिवाजीने खानावर अचानक छापा घालण्यासाठी नेताजीला निवडक घोडदळासह बांद्याला पाठविले. परंतु नेताजीच्या आगमनाची बातमी समजताच खवासखान आपल्या सैन्यासह बालाघाटातील चांदगड किल्यात पळून गेला.[१०६]

डचांच्या वरील वृत्तांतानुसार महाराज व खवासखान यांच्या २–३ झटापटी झाल्या. प्रथम महाराज पराभूत झाले परंतु नंतर खवासखान पराभूत झाला. खवासखानाने नेताजींचा पराभव केला तरी नेताजी बरोबरच्या संघर्षात खानाचे मोठे शूर सरदार ठार झाले. दिनांक ५ नोव्हेंबरला नेताजी पुन्हा बांद्यास चालून जाताच खवासखान घाटावर पळून गेला. या युद्धात निर्णायक विजय कुणाला मिळाला या विषयी दोन्ही प्रकारचे उल्लेख आढळतात. सभासद बखर, जेधे शकावली, खुद्द महाराजांचे एक पत्र[१०७] यात खवासखान पराभूत होवून पळून गेल्याचे म्हटले आहे. तर मुहमद नुस्त्रती याच्या 'अलिनामा' या ग्रंथात[१०८], सुरतेच्या एका पत्रात[१०९] महाराजांचा पराजय झाला असे म्हटले आहे. परंतु या युद्धात निर्णायक विजय महाराजांना मिळाला असावा असे डच वृत्तांतावरून स्पष्ट होते. मात्र मराठ्यांचे मोठे नुकसान झाले.

खवासखानाबरोबरच्या या युद्धात सरनौबत नेताजी पालकर यांनी पराक्रमाची शर्थ केली. खवासखानाने नेताजीचा पराभव केला तरी या संघर्षात खानाचे मोठे शूर सरदार ठार झाले असे निरीक्षण डचांनी नोंदविले आहे.

खवासखानाबरोबरचे हे युद्ध ऑक्टोबर १६६४ मध्ये झाले असे जेधे शकावलीत म्हटले आहे, ''कार्तिक मासी येदिलशहाची व राजेश्री स्वामीचा बिघाड होवून नी खवासखान कुडाळास आले. राजेश्री स्वामी शेने सह वर्तमान जाऊन घोरपडे मारिले. खवासखानाशी युद्ध केले. तो पळोन घाटावरी गेला.''[११०] जेधे शकावलीप्रमाणे इंग्रज पत्रातही युद्ध ऑक्टोबरमध्ये झाल्याचा उल्लेख आहे. कारवारकर इंग्रजांनी सुरतेला २९ ऑक्टोबर १६६४ रोजी पाठविलेल्या पत्रात शिवाजीने वेंगुर्ला जाळून जमीनदोस्त केले आणि त्याबाजूने त्याच्यावर

आलेल्या विजापूरी सैन्याला परतवून लावले अशी बातमी आल्याचे म्हटले आहे.[१११] डच रेकॉर्डमध्ये मात्र महाराजांनी नेताजींना ५ नोव्हेंबर १६६४ रोजी खवासखानावर छापा घालण्यासाठी पाठविले. ते समजताच खान पळून गेला असा उल्लेख आहे. खानाबरोबर मराठ्यांच्या दोन ते तीनवेळा चकमकी झाल्या. या चकमकी ऑक्टोबरमध्ये झाल्या असाव्यात व नेताजी यानी ५ नोव्हेंबर रोजी केलेल्या स्वारीनंतर खान पळून गेला असावा.

**५:४:७ मिर्झाराजे जयसिंगची स्वारी १६६५ :**

शाहिस्तेखानाचा पराभव आणि सुरतेची लूट या एका पाठोपाठ घडलेल्या दोन्ही घटनामुळे संतापलेल्या औरंगजेब बादशहाने शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी दरबारातील श्रेष्ठ व महापराक्रमी सरदार मिर्झाराजे जयसिंग याची नेमणूक केली. आपल्या ४७ व्या वाढदिवशी म्हणजे ३० सप्टेंबर १६६४ रोजी औरंगजेबाने 'सीवाला दफे करण्याची' महत्त्वपूर्ण कामगिरी मिर्झाराजे जयसिंगावर सोपविली. मिर्झाराजाच्या मदतीला दिलेरखान, दाऊदखान, राजा रायसिंग सिसोदिया, इहतशामखान, शेखझादा, कुबातखान, सुजनसिंह बुंदेला, कीरतसिंह कछवाह, मुल्ला याह्या नायतह, राजा नरसिंग गौर, पुरणमल बुंदेला, झबरदस्तखान, बादिल बख्तियार, बर्कदाजखान इत्यादी बडे बडे सरदार, १४ हजार सैन्य व तोफखाना देण्यात आला.[११२] दिलेरखानाचे ५००० पठाण व इतर सरदारांचे सैन्य याची भर पडून सैन्य संख्या आणखी वाढली. याशिवाय दक्षिणेत पूर्वीच पाठविलेली फौज पुढे या फौजेला मिळणार होती.

जय्यत तयारीनिशी मिर्झाराजे १० फेब्रुवारी १६६५ रोजी औरंगाबादला पोहोचले. तेथून शहजाद्याचा निरोप घेवून ३ मार्च १६६५ रोजी मिर्झाराजेंनी पुणे गाठले. दक्षिणेकडे येतानाच जयसिंगाने महाराजांना एकटे पाडण्याचे प्रयत्न सुरू केले होते. त्याने आदिलशहा महाराजांना मिळू नये यासाठी त्यांना तंबी दिली. उलट आदिलशहाने मोगलांना मदत केली तर खंडणी कमी करण्याचे आश्वासन दिले. याचवेळी जयसिंगाने गोव्याच्या पोर्तुगीजांना जंजिऱ्याच्या सिद्दिंना, वेंगुर्ल्याच्या डचांना, सुरतेच्या इंग्रजांना, जव्हार रामनगर येथील राजांना कर्नाटकातील पाळेगारांना मोहिमेत साह्य करण्यासाठी लिहिले होते. जयसिंगाच्या या

प्रयत्नांना यश येवून बेदनूरचा व बसवपट्टणचा नायक, जव्हार व रामनगरचे राजे, चंद्रराव मोऱ्यांचे वंशज, विजापूरचा मातब्बर सरदार मुल्ला अहमद, अफजलखानाचा पुत्र फाजलखान इत्यादी अनेक लोक मोगलांना येवून मिळाले.[११३]

जयसिंगाने महाराजांना एकटे पाडण्याबरोबरच स्वराज्याची सर्व बाजूंनी नाकेबंदी केली. कुतुबुद्दिनखानाची सात हजार स्वारासह जुन्नरपासून तळकोकणच्या घाटाच्या प्रदेशापर्यंत नेमणूक केली. तर खास पुण्याचे ठाणे चार हजार फौज व इतर सरदार मदतीला देवून इहतीशामकडे सोपविले. पुणे लोहगड मार्गावरील डोंगरी घाटात दोन हजार सैनिकांचे ठाणे कायम केले. शिरवळ येथे सय्यद अब्दुल अजीज शुजातरवानी याला तीन हजार स्वारासह नेमले. पुरंदरच्या पठारावरील लोणी या गावी रामा व हणमंत निंबाळकर यांना ठाणेदार म्हणून नियुक्त केले. अशा प्रकारे सर्व ठाण्यांची नाकेबंदी करून जयसिंगाने स्वत: सासवड व पुरंदरच्या मधोमध तळ ठोकला. दिलेरखानाने पुढे जावून पुरंदर किल्ल्याला वेढा दिला.[११४]

**५:४:७:१ नेताजींचे परिंड्यांवर आक्रमण :**

शिवाजी महाराज या काळात राजगडावर होते. जयसिंगाच्या हालचालींची बित्तंबातमी त्यांना जासूदांकडून कळत होती. त्यामुळे महाराज काळजीत पडले होते. यावेळी राजगडावर असलेल्या मुत्सद्यांनी जयसिंगाशी तह करावा असा सल्ला दिला. अफजलखान व शाहिस्तेखान प्रकरणाच्या अनुभवामुळे जयसिंग सावध होता. त्यामुळे काही युक्तीने त्याला नमविणे अवघड होते आणि जयसिंगाच्या प्रचंड सैन्याशी सरळ सामना देणे म्हणजे आत्मघात करण्यासारखे आहे, हे ही महाराज जाणून होते. त्यामुळे जयसिंगाच्या सैन्यावर अचानक गनिमी हल्ला चढविण्याच्या तंत्राचा वापर करण्याचे तसेच जयसिंगाचे लक्ष पुरंदरच्या वेढ्यातून विचलित करण्यासाठी मुघल प्रदेशावर हल्ला करण्याचे धोरण त्यांनी ठरविले. मुघल प्रदेशावर हल्ला करण्याचे काम त्यांनी नेताजींवर सोपविले. महाराजांच्या आदेशानुसार सरनौबत नेताजी ससैन्य मुघल प्रदेशात मोहिमेवर गेले आणि त्यांनी परांड्याच्या प्रदेशावर आक्रमण केले.

मुघल सैन्याचे पुरंदर किल्ल्याभोवती मोर्चेबंदीचे काम सुरू होते. या कामाची पहाणी करून जयसिंग तळावर माघारी आला. एवढ्यात जासूदांनी बातमी आणली की, सीवाचा जवळचा नातलग व घोडेस्वाराचा सेनापती नेतू फौज घेऊन परिंड्याकडे धावून गेला आहे. जयसिंगाने ताबडतोब सय्यद मुनवरखान बाही याला नेताजीचा बंदोबस्त करण्यासाठी तिकडे रवाना केले. याशिवाय सुप्याच्या ठाण्यात असलेले शर्झेखान, हुसेनखान, जौहरखान, जगत्सिंघ इत्यादींनाही त्याच्याबरोबर नेताजीच्या पाठलागावर पाठविले. ही फौज परिंड्यापर्यंत गेली. परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. मुघल फौज येण्यापूर्वीच जमेल तेवढी लूटालूट करून नेताजी निघून गेले होते.[११५]

जयसिंगाच्या सावधानतेमुळे मुघल मुलुखात घुसून धुमाकूळ माजविणे नेताजींना शक्य झाले नाही. इकडे पुरंदरचा वेढा सैल व्हावा यासाठी जमेल तेवढा प्रयत्न महाराज करत होते. याशिवाय मुघल सेनेला प्रतिकार करण्याचे प्रयत्न सुरू होते. परिंड्याकडून माघारी आलेले नेताजी याकामी महाराजांना मदत करत असावेत. जयसिंगाने दाऊदखान, राजा रामसिंग, इत्यादी सरदारांबरोबर सात हजार स्वार देवून त्यांना शिवाजी महाराजांचा प्रदेश जाळून टाकण्याच्या मोहिमेवर नेमले. त्यांनी राजगड, सिंहगड, रोहिडा इत्यादी किल्ल्यांच्या आसमंतात असणारी शेकडो खेडी उध्वस्त केली. हजारो माणसे व जनावरे पकडून नेण्यात आली. या मुघली आक्रमणाला मराठेही विरोध करत होते. शत्रूसैन्यावर अचानक हल्ले चढविणे, रात्रीचे छापे घालणे, रस्ते व घाट रोखून धरणे,दाट झाडीच्या जंगलांना आगी लावून देणे इत्यादी मार्गांनी मराठ्यांनी मुघलांना हैराण केले होते. मराठ्यांच्या हल्ल्यांनी मुघलांचे अनेक सैनिक व जनावरे मृत्युमुखी पडले होते.[११६] परंतु त्यामुळे जयसिंगाच्या एकूण मोहिमेवर प्रतिकूल परिणाम व्हावा असे काही घडत नव्हते.

**५:४:७:२ पुरंदरचा तह :**

मराठ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट बनत चालली होती. पुरंदरही अल्पकाळातच गमवावा लागेल हे महाराजांना दिसू लागले. अशा परिस्थितीत महाराजांनी युद्ध थांबविण्याचा निर्णय घेतला व आपला वकील जयसिंगाकडे पाठवून तहाची बोलणी लावली. २० मे १६६५

रोजी महाराजांचा वकील रघुनाथ बल्लाळ अत्रे जयसिंगाला भेटला. जयसिंगाने त्यास सांगितले की शिवाजी राजांनी बिनशर्त शरणागती स्वीकारावी. महाराजांनी त्यास तयारी दर्शविली. जयसिंगाकडून जीवास अपाय होणार नाही याबद्दल वचन घेतले आणि तारीख ११ जून रोजी महाराज जयसिंगास भेटावयास गेले. यावेळी महाराजांबरोबर नेताजीही होते असा उल्लेख कारवारकर इंग्रजांनी २५ ऑगस्ट १६६५ रोजी सुरतेला पाठविलेल्या एका पत्रात आहे.[११७] परंतु ही बातमी चुकीची होती. नेताजी शिवाजी राजांबरोबर नव्हे तर नंतर संभाजी राजाबरोबर जयसिंगाच्या छावणीत गेले होते. जयसिंगाच्या भेटीला जाताना महाराजांबरोबर सहा ब्राह्मण आणि काही कहार (पालखी वाहणारे) आहेत असे जयसिंगाने औरंगजेबाला पाठविलेल्या एका पत्रात स्पष्ट म्हटलेले आहे.[११८] महाराज पूर्णपणे जयसिंगाने दिलेल्या वचनावर विसंबून त्याच्या भेटीला गेले होते. मात्र जाण्यापूर्वी त्यांनी नेताजींसह सर्वच लोकांना सांगून अशी व्यवस्था ठेवली होती की जर मी ठराविक वेळेत माघारी परत आलो नाही तर माझे काही बरेवाईट झाले असे समजून स्वराज्य सांभाळण्याचे सर्व तऱ्हेचे प्रयत्न करीत रहावे.[११९] परंतु प्रत्यक्षात अशी वेळच आली नाही. जयसिंगाशी वाटाघाटी व तह करून १५ जून रोजी शिवाजी महाराज रायगडला परत आले.

१४ जून १६६५ रोजी मिर्झाराजे जयसिंग व शिवाजी महाराज यांच्यात झालेल्या पुरंदरच्या तहानुसार स्वराज्यातील तेवीस किल्ले आणि त्याखालील चार लक्ष उत्पन्नाचा मुलूख मोगलांना मिळाला तर बारा किल्ले आणि त्याखालील एक लक्ष उत्पन्नाचा मुलूख महाराजांकडे राहू देण्यास जयसिंगाने मान्यता दिली. शिवाजी पुत्र संभाजीला मुघलांची पंचहजारी मनसबदारी देण्यात येणार होती. परंतु संभाजी लहान असल्यामुळे त्यांच्याबरोबर सरनौबत नेताजी पालकर यांनी दख्खनच्या सुभेदाराबरोबर रहावे. याशिवाय दख्खनच्या सुभ्याच्या अंमलात हुकुम होईल तेव्हा महाराजांनी कामगिरीवर हजर रहावे असे ठरविण्यात आले. विजापुरी तळकोकणातील चार लक्ष होनाचा मुलूख व पाच लक्ष होनांचा विजापुरी बालाघाटी मुलूख महाराजांना बहाल करून तसे फर्मान मोगल बादशहाने त्यांना द्यावे व असे फर्मान

मिळाल्यास महाराजांनी त्या मोबदल्यात चाळीस लक्ष होन खंडणी, सालीना तीन लक्ष होनांच्या हप्त्याने बादशहाला द्यावी असे ठरले.[१२०]

१४ जूनला तह झाल्यानंतर दुपारी महाराज जयसिंगाचा मुलगा किरतसिंग व उग्रसेन कछवाह यांना बरोबर घेवून सिंहगडावर गेले व त्यांनी तो किल्ला किरतसिंगच्या ताब्यात दिला. दि. १५ जूनला महाराज रायगडावर गेले यावेळी संभाजीला सुरक्षितपणे जयसिंगाच्या छावणीत घेवून येण्यासाठी उग्रसेन कछवाह हा महाराजांबरोबर रायगडावर गेला होता. त्याच्याबरोबर १७ जूला संभाजीची रवानगी जयसिंगाच्या छावणीत करण्यात आली. जयसिंगाने संभाजीला आपल्या डेऱ्यातच ठेवून घेतले. मिर्झाराजे जयसिंगाने जून १६६५ मध्ये औरंगजेबाला पाठवलेल्या पत्रात हा सर्व वृत्तांत कळविला आहे.[१२१] जयसिंगाने पुरंदरच्या तहासंबंधी औरंगजेबाचे फर्मान येईपर्यंत संभाजीला आपल्याकडे ओलीस ठेवले होते. यावेळी संभाजीचे वय केवळ आठ वर्षाचे होते. त्यामुळे तहात ठरल्याप्रमाणे नेताजी पालकरही संभाजीबरोबर जयसिंगाच्या छावणीत दाखल झाले.[१२२] शिवाय काही घोडदळ व पायदळही त्यांच्यासोबत होते. शंभूराजे मिर्झाराजांच्या छावणीत पोहोचल्यानंतर काही दिवसातच तहात ठरल्याप्रमाणे महाराजांनी किल्ल्यांचा ताबा मिर्झाराजांना दिला. हे किल्ले ताब्यात येताच मिर्झाराजांनी शंभू महाराजांची परत पाठवणी केली.

मिर्झाराजे जयसिंगाची स्वारी हे स्वराज्यावर आलेले फार मोठे संकट होते. शिवाजी महाराजांनी या संकटाला आपल्या सर्व शक्तिनिशी तोंड दिले व जेव्हा निरूपाय झाला तेव्हा शरणागती पत्करून पुरंदरचा तह स्विकारला. यावेळी खुद्द महाराजांनी मुघलांची मनसबदारी न स्वीकारता ती आपल्या पुत्रास स्वीकारावयास लावली. मुघली मनसबदारी स्वीकारणे म्हणजे उघड उघड गुलामगिरी स्वीकारण्यासारखेच असल्याने महाराजांनी अत्यंत धूर्तपणे व मुत्सद्देगिरीने ही गोष्ट टाळली. अर्थात मिर्झाराजे जयसिंगही मुत्सद्देगिरीत महाराजांपेक्षा तिळमात्र कमी नव्हता. महाराजाऐवजी शंभूराजांना मोगली मनसबदारी देण्याचे जरी त्याने मान्य केले असले तरी याचवेळी त्याने प्रतिशिवाजी नेताजी पालकरांना शंभूराजाबरोबर मोगली चाकरीत बांधून घेतले.

मिर्झाराजे जयसिंगाने पुरंदरचा तह मुत्सेद्देगिरीने घडवून आणला होता. या तहाची सर्व हकीकत औरंगजेबाला कळवून आपल्या सुचनेनुसार शिवाजी महाराजांना शाही फर्मान पाठवावे अशी त्याने औरंगजेबाला विनंती केली. परंतु संशयी वृत्तीच्या औरंगजेबाने लगेचच तहास मान्यता दिली नाही. जयसिंगाने शिवाजी महाराजांना आपल्या छावणीतून जावू दिले ही गोष्ट औरंगजेबाला आवडली नाही. त्याबद्दल व तहात ठरलेल्या अटींबद्दल त्याने पत्र पाठवून जयसिंगाला खुलासा विचारला. यावर जयसिंगाने पाठविलेल्या पत्रात सर्व बाबींचा सविस्तर खुलासा करून तहाच्या अटी कळविल्या. एवढ्यानेही औरंगजेबाचे समाधान झाले नाही. पुरंदरच्या वाटाघाटीनुसार विजापुरी बालाघाटातील मुलूख महाराजांकडे सोपवण्यास त्याने नकार दिला. ''शिवाजीला विजापूरी तळकोकण दिले आहे परंतु विजापूरी बालाघाटाबद्दल काहीच हुकूम देणार नाही. त्याला सामर्थ्य असेल तर त्याने आदिलशहापासून तो मुलूख हिसकावून घ्यावा असे औरंगजेबाने जयसिंगाला कळविले.[१२३] यावेळी जयसिंगाची मोठी कोंडी झाली होती. एकीकडे जयसिंगाने तहात ठरविलेल्या अटी मान्य करण्यास बादशहा तयार नव्हता. तर दुसरीकडे दक्षिणेच्या परिस्थितीची जाणीव असलेल्या जयसिंगाला ठरल्याप्रमाणे तह होणे अगत्याचे वाटत होते. कारण आता विजापूरकरांनी शिवाजीराजांशी तहाची बोलणी करून काही आश्वासने दिली होती. त्यानुसार शिवाजी महाराजांनी आपल्या पुतण्याला म्हणजे नेताजी पालकरांना (राजस्थानी पत्रव्यवहारात नेताजींचा उल्लेख शिवाजीचा पुतण्या किंवा भाचा असा होत असे) आपल्याकडे सेवा करण्यास पाठविले तर विजापुरी तळकोकण व बालाघाटचा मुलूख महाराजांना देण्यास विजापूरकर तयार होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराज विजापूरकरांकडे मिळाल्यास जयसिंगाचे सर्व प्रयत्न वाया जाणार होते. त्यामुळे जयसिंगाने पुन्हा औरंगजेबाला पत्र लिहून विजापूरकरांकडून महाराजांना आलेल्या प्रस्तावाचा सर्व वृत्तांत कळविला आणि शिवाजीने माझ्या वचनांवर व बादशहाच्या उदारपणावर विसंबून त्याला नकार दिला आहे. तेव्हा ठरल्याप्रमाणे हप्तेबंदीने चाळीस लाख रूपये खंडणी देण्याच्या अटीवर नऊ लाख होनाच्या मुलुखाचे फर्मान शिवाजीला देण्यात यावे अशी औरंगजेबाला विनंती केली.[१२४] यामुळे शेवटी औरंगजेबाने तहाला मान्यता दिली खरी, पण ती मोकळ्या मनाने दिली असे वाटत नाही.

**५:४:७:३ विजापूरवरील स्वारीतील सहभाग :**

शिवाजी महाराज व औरंगजेब यांच्यामध्ये झालेल्या या पुरंदरच्या तहात महाराजांनी मोगलास दख्खनमधील लढायात मदत करण्याचे कलम होते. मराठ्यांबरोबर लढा संपुष्टात येताच, औरंगजेबाने राजा जयसिंगास आदिलशहावर स्वारी करण्यास फर्मावले होते. महाराजांनीही जयसिंगास संभाजीच्या पाच हजार सरंजामी स्वाराशिवाय अधिक मोठ्या फौजेनिशी मिळण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनानुसार महाराज पंधराशे स्वार आणि सात हजार पायदळ घेवून सरनौबत नेताजींसह मिर्झाराजेंच्या छावणीत दाखल झाले.[१२५] पुरंदरच्या तहानुसार संभाजीला पंच हजारी मनसबदारी देण्यात आली होती आणि संभाजीबरोबर नेताजींनीही मुघल सुभेदाराच्या चाकरीत रहाणे बंधनकारक होते.

मिर्झाराजे जयसिंगाने २० नोव्हेंबर १६६५ रोजी पुरंदरच्या पायथ्यापासून विजापूरवरील मोहिमेसाठी कूच केले. सैन्याच्या आघाडीला दिलेरखान होता. महाराज आपल्या सैन्यासह  जयसिंगाच्या डाव्या बाजूने चालत होते. महाराज व नेताजी किल्ले जिंकण्यात चांगले तरबेज निष्णात शूरवीर आहेत हे जयसिंगाला माहित होते. त्यामुळे त्यांच्या या कौशल्याचा उपयोग करून आदिलशाही वाटेवर जे जे किल्ले लागतील ते जिंकून घेण्याचे जयसिंगाने ठरविले.[१२६] ५ डिसेंबरला शाही सैन्य विजापूरच्या सरहद्दीवरील फलटण किल्ल्या पासून १० कोसावर येताच जयसिंगाने नेताजींना तो किल्ला घेण्यासाठी पाठविले. नेताजी फौजेसह किल्ल्यावर चालून गेले. परंतु नेताजींना येथे लढण्याचा प्रसंग आलाच नाही. हल्ल्याची बातमी समजताच किल्लेकरी भीतीने किल्ला खाली करून पळून गेले होते. त्यामुळे ७ डिसेंबर १६६५ रोजी फलटणचा किल्ला सहजगत्या ताब्यात आला.[१२७] फलटणचा किल्ला महाराजांचे आप्तस्वकीय बजाजी निंबाळकरांच्या ताब्यात होता. बजाजी निंबाळकर आदिलशाही चाकरीत होता. परंतु मुघल सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही हे ओळखून त्याने जयसिंगाची भेट घेवून मर्जी संपादन केली. नेताजींनी तेथून तडक फलटणपासून सात कोसावर असलेल्या ताथवडा किल्ल्यावर हल्ला चढविला व ८ डिसेंबरला गडकऱ्यांना वश करून किल्ला ताब्यात घेतला. यानंतर जयसिंगाने विजापूरपासून सोळा कोसावर असलेला

मंगळवेढ्याचा किल्ला घेण्यासाठी नेताजींना सैन्यासह पुढे पाठविले. नेताजी मंगळवेढ्याला पोहोचण्यापूर्वीच आपला टिकाव लागणार नाही हे ओळखून आदिलशाही सैन्याने किल्ला मोकळा केला होता. तो १८ डिसेंबरला नेताजींनी ताब्यात घेतला. दरम्यान इकडे जयसिंगाने ३०० मराठ्यांना मसउदखानाबरोबर पाठवून खटावचा किल्ला ताब्यात घेतला.[१२८] अशा प्रकारे मोहिम सुरू झाल्यापासून तीन आठवड्याच्या आत महाराज व नेताजींनी मोठ्या कौशल्याने फलटण, ताथवडा, खटाव व मंगेळवेढे हे किल्ले जिंकून मुघलांच्या ताब्यात दिले.

शिवाजी महाराज व नेताजी यांनी ८ डिसेंबरला फलटण किल्ला जिंकून घेतल्यानंतर त्यांच्या कार्याबद्दल जयसिंगाने औरंगजेबास कळविले होते तेव्हा औरंगजेबाने लगेच २५ डिसेंबर १६६६ रोजी महाराजांना मानाचा पोशाख व रत्नजडित कट्यारीसह प्रोत्साहनपर फर्मान पाठवून दिले.[१२९] मोगली इतिहासकार खाफीखान म्हणतो, ''सीवा व नथुजी (नेताजी) यांनी दोन हजार स्वार व आठ नऊ हजार पायदळ याच्या मदतीने किल्ले हस्तगत करण्यात मोठे कौशल्य दाखवून पुष्कळ किर्ती मिळविली आणि तीन–चार आठवड्याच्या अवधीत मंगळवेढे व इतर असे ३ किल्ले ताब्यात आणले.''[१३०] खाफीखानाने अनेकवेळा छत्रपती शिवाजी महाराज व नेताजी यांच्या युद्धकौशल्याविषयी प्रशंसोद्‌गार काढले आहेत.

दि . २५ डिसेंबर १६६५ रोजी मोगली सैन्याची विजापूरी सैन्याशी प्रथम गाठ पडली. जयसिंगाने दिलेरखान, शिवाजी महाराज, राजा रायसिंग, कुत्बुद्दिनखान, कुबादखान, किरतसिंग, फतहजंगखान इत्यादींना शत्रूचा समाचार घेण्यास पाठविले. यावेळी नेताजीही महाराजांबरोबर होते. आदिलशाही सरदार सर्जाखान, खवासखान, बहलोलखान, एकोजी भोसले इत्यादी बारा हजार फौजेसह चालून आले. दोन्ही सैन्यात घनघोर संग्राम झाला. आदिलशाही सैन्याचे धोरण समोरासमोर लढाई करण्याचे नव्हते तर गनिमी पद्धतीने झुंजण्याचे म्हणजे माघार घेवून बेसावध शत्रूवर पुन्हा छापा घालण्याचे होते. या पद्धतीनुसार त्यांनी युद्धातून माघार घेतली. आता दिवस मावळण्यास आला होता. त्यामुळे मुघल लष्कर तळावर जाण्यासाठी माघारी फिरले. मुघल सैन्य परत फिरल्याचे समजताच आदिलशाही सैन्याने पुन्हा उलटून मुघल सैन्यावर हल्ला चढविला. यावेळी नेताजी आपल्या सैन्यासह मुघल

सैन्याच्या पिछाडीवर होते. त्यामुळे आदिलशाही सैन्याने नेताजीवर जबरदस्त हल्ला चढविला. नेताजी पूर्णपणे घेरले गेले. नेताजींनी हा हल्ला परतवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू केले. तेवढ्यात आणखी आदिलशाही सैन्य त्यांच्यावर तुटून पडले. नेताजी प्राणसंकटात सापडले. या कठीण प्रसंगी कीरतसिंग व फतहजंगखान हे नेताजीच्या मदतीस धावले. त्यांनी प्रयत्नांची शर्थ करून शत्रूस पळवून लावले व नेताजींची सुटका केली.[१३१] परंतु या युद्धात अनेक मराठे कापले गेले.

२७ डिसेंबरला आदिलशाही सैन्य पुन्हा चालून आले. यावेळी खुद्द जयसिंगाला हाती शस्त्र धरावे लागले. शिवाजी महाराज व किरतसिंग यांनी एका हत्तीवर बसून लढाई दिली. शेवटी विजापूरी सैन्य पळून गेले. ता. २९ डिसेंबर १६६५ रोजी विजापूरच्या उत्तरेस दहा मैलावर असणाऱ्या माखणापूर येथे जयसिंगाने मुक्काम केला.[१३२] विजापूरवर निर्वाणीचा हल्ला चढविण्यासाठी मिर्झाराजांनी व्यूहरचना केली व विजापूरवर हल्ला चढविला. आदिलशाही पठाण सरदार सर्जाखानाने आघाडीवर असलेल्या शिवाजी महाराजांच्या सैन्यावरच धडक मारली. घनघोर युद्ध सुरू झाले. मुघल सैन्याने महाराजांच्या सैन्याला वेळेवर मदत न केल्याने ते एकाकी लढू लागले. मदतीअभावी महाराजांच्या सैन्याची फळी फुटून ते पळू लागले. सर्जाखानाच्या इतर सरदारांनी जयसिंगाच्या सैन्यावर हल्ले चढविले. त्यापुढे मुघलांचा टिकाव न लागल्याने त्यांचा पराभव झाला.[१३३] विजापूर जिंकणे शक्य नाही हे पाहून मिर्झाराजेंनी ५ जानेवारी १६६६ पासून माघार घ्यायला सुरूवात केली.

विजापूर घेता आले नाही म्हणून मोगली लष्करात सर्वत्र नाराजी पसरली. दिलेरखानाने तर या अपयशाचे खापर शिवाजी महाराजांवरच फोडले. या पराभवाबद्दल शिवाजीस जबाबदार धरून दिलेरखानाने जयसिंगाकडे त्याच्या फितुरीबद्दल तक्रार केली. शिवाजीला ठार मारावे असे राजा जयसिंगाला त्याने अनेकवेळा सुचविले होते. परंतु शिवाजीला कोणत्याही प्रकारे धक्का लावणार नाही अशा प्रकाराच्या आणाशपथा जयसिंगाने घेतल्या असल्याने त्याने उलट महाराजांच्या भक्कम संरक्षणाची व्यवस्था केली.[१३४]

दिलेरखान आपल्या जिवावर उठला आहे, हे महाराजांच्या व सरनौबत नेताजींच्या लक्षात आलेच होते. त्यांनीही मुघल छावणीतून बाहेर पडण्यासाठी काहीतरी धोरण निश्चित केलेच असावे. यासंबंधी निश्चित पुरावा उपलब्ध नसला तरी मिर्झाराजे जयसिंगाच्या जानेवारी १६६६ च्या पत्रावरून महाराजांनीच पन्हाळ्यावर हल्ला करण्याची योजना जयसिंगाच्या गळी उतरवून आपली व नेताजींचीही मुघल छावणीतून सुटका करून घेतली हे स्पष्टपणे लक्षात येते. औरंगजेबाला पाठविलेल्या या पत्रात जयसिंग लिहितो, ''शिवाजी विजापूरला वेढा घालण्यासाठी मदत करावयास तयार होता. परंतु .. मलाच ते शक्य वाटले नाही. शिवाजी म्हणाला पन्हाळ्याची मला बित्तंबातमी असल्यामुळे तिकडे मला पाठविल्यास शिबंदी गैरसावध असताना मी तो किल्ला मोगलांना मिळवून देईन. आणि त्या प्रांतात नंतर इतका धुमाकूळ घालीन की माझे बंदोबस्ताकरिता त्यांना मोठे सैन्य पाठवावे लागेल.''[१३५]

शिवाजी महाराजांनी पन्हाळ्यावरील हल्ल्याची योजना जयसिंगापुढे मांडताच त्यांनी त्यास ताबडतोब मान्यता दिली. दिलेरखानाविषयी जयसिंग साशंकच होता. तो शिवाजी महाराजांना दगाफटका करील अशी भीती जयसिंगाला वाटतच होती. पन्हाळा घेण्यास महाराज गेल्यास त्यांच्या प्राणावरील धोकाही टळू शकत होता. याशिवाय तिकडे महाराजांनी आघाडी उघडली की, विजापूरकरांना मोठे सैन्य तिकडे पाठवावे लागेल आणि विजापूर घेणे सोपे होईल असे जयसिंगाला वाटत होते आणि संधी मिळाल्यास किल्लाही ताब्यात येईल. परकीय शिवचरित्रकार कोस्मि–द–ग्वार्दे म्हणतो, ''यावेळी विजापूरकरांबरोबरचे युद्धही स्थगित असल्याने काहीच काम नव्हते आणि महाराजांनीही आपल्या प्रदेशाच्या व्यवस्थेसाठी आपण जाणे गरजेचे असल्याचे सांगितल्याने जयसिंगाने त्यांना ताबडतोब परवानगी दिली.''[१३६] अशा प्रकारे महाराज मुघल छावणीतून जयसिंगाच्या परवानगीने बाहेर पडले.

## ५:५ नेताजी स्वराज्यातून आदिलशाहीकडे :

छत्रपती शिवाजी महाराज मुघल छावणीतून चातुर्याने सुटका करून घेवून आपल्या सर्व लोकांसह बाहेर पडले. परंतु दुर्दैवाने लवकरच महाराजांचे सरनौबत नेताजी पालकर स्वराज्याचा त्याग करून आदिलशाहाला जावून मिळाले. नेताजींचे महाराजांना सोडून जाणे ही

तत्कालीन परिस्थितीत अत्यंत धक्कादायक घटना होती. शिवाजीराजांचे खास मर्जीतील विश्वासू सेवक, स्वराज्याची सुरूवातीपासून निष्ठेने सेवा करणारे पराक्रमी सेनानी नेताजी स्वराज्याचा त्याग करून आदिलशहाला जावून मिळाले ही घटना स्वराज्याच्या दृष्टीने खरोखरच दुर्दैवी म्हटली पाहिजे.

११ जानेवारी १६६६ रोजी महाराज, नेताजी व इतर सर्व लोकांसह जयसिंगाच्या छावणीतून बाहेर पडले व पन्हाळ्याच्या दिशेने निघाले.[१३७] यावेळी वाटेतील अनेक आदिलशाही शहरे त्यांनी जाळली. पाच दिवसांनी महाराज पन्हाळ्याच्या पायथ्याशी पोहोचले. १६ जानेवारीला भल्या पहाटे महाराजांनी पन्हाळ्यावर हल्ला चढविला. परंतु किल्ल्यावरील शिबंदी सावध असल्याने त्यांनी जोरदारपणे हल्ला परतवून लावला. घनघोर लढाई होवून महाराजांचे पाचशे सैनिक मारले गेले. त्यानंतर पन्हाळ्यावरून माघार घेवून महाराज विशाळगडावर निघून गेले. येथेच महाराज व नेताजी यांच्यात बेबनाव होवून नेताजी महाराजांना सोडून आदिलशहाला जावून मिळाले.[१३८]

नेताजी नेमके कोणत्या कारणामुळे महाराजांना सोडून गेले याविषयी तत्कालीन कागदपत्रामध्ये वेगवेगळी कारणे सांगितली गेली आहेत. नेताजी आदिलशहाला जावून मिळाले याचा पहिला उल्लेख मिर्झाराजे जयसिंगाच्या लोकांनी लिहिलेल्या पत्रामध्ये सापडतो. या पत्रामध्ये त्यांनी नेताजी आदिलशहाला का मिळाले याचे कारणही सांगितले आहे. हे पत्र या घटनेनंतर केवळ एक महिन्यात लिहिलेले आहे. २३ फेब्रुवारी १६६६ रोजी लिहिलेल्या या पत्रात परखळदास कल्याणदासाला लिहितो, ''बादशहाने शिवाजीचा भाचा (किंवा पुतण्या) नेताजी याला दोन हजारी मनसब दिली. जेव्हा त्याला ही मनसब दिल्याचे समजले तेव्हा तो रंजिस आला (रागावला) आणि योग्य संधी पाहून आदिलशहाला जावून मिळाला.''[१३९] नेताजी यावेळी महाराजांचे सरनौबत होता. याशिवाय मुघलांचे मनसबदार झालेल्या संभाजीचे प्रतिनिधी या नात्याने ते जयसिंगाचे चाकरही होते. त्यामुळे बादशहाकडून त्यांना मनसब दिली जाणार होती. नेताजींना पंचहजारी मनसब मिळावी असे सुचविण्यात आले होते.[१४०] परंतु प्रत्यक्षात बादशहाने हलक्या दर्जाची (दोन हजारी) मनसब दिल्याबद्दल ते नाराज झाले व

विजापूरकरांना जावून मिळाले. असे कारण जयसिंगाच्या लोकांनी या पत्रात नमूद केले आहे. नेताजी मुघलांवर चिडून आदिलशहाला मिळाले. (महाराजांशी भांडून नव्हे.) असे जयसिंगाच्या लोकांचे मत आहे.

इंग्रजांच्या पत्रव्यवहारात मात्र नेताजीचे शिवाजी राजांशी भांडण झाल्याचा उल्लेख आहे. २८ एप्रिल १६६६ रोजी कारवारकर इंग्रज सुरतकरांना लिहितात, ''..... शिवाजीने दुसऱ्या दिवशी (पन्हाळ्यावर) हल्ला केला. पण त्यातही ५०० लोक मृत्यूमुखी पडून अपयश आल्यामुळे राजापूरपासून पाच गाव किंवा ३० मैल लांब असलेल्या खेळण्याकडे (विशाळगड) तो गेला. तेथे नेताजीचे आणि त्याचे भांडण झाले असे म्हणतात. हे भांडण खरोखरच होते की त्यात आणखी काही रहस्य आहे हे सांगता येत नाही. परंतु एवढे खरे की नेताजी तेथून निघाला तो विजापूर दरबाराकडे जावून तेथील शहाला खूष करून त्याचेकडून त्याने दरसाल तीन लक्ष होनाची नेमणूक व मोगलांच्या सरहद्दीवरील काही मुलूख मिळविला, आणि त्याच्या संरक्षणाकरिता म्हणून तो आदिलशहाच्या हुकुमावरून तिकडे गेला आहे.''[१४१] या पत्रात इंग्रजांनी 'नेताजीचे महाराजांशी भांडण झाले असे सांगतात' असा उल्लेख केला आहे. परंतु हे भांडण कोणत्या कारणावरून झाले हे मात्र त्यांना माहीत नाही. अर्थात हे भांडणसुद्धा खरोखरच आहे का? त्यात आणखी काही रहस्य (डाव) आहे अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली आहे.

सभासद बखरीमध्ये महाराजांनी नेताजीस सरनौबत पदावरून काढून टाकण्याचे कारण सांगताना म्हटले आहे की, पन्हाळ्यास सिद्दी जौहरने वेढा घातला असता महाराजांनी नेताजीना मदतीस बोलाविले. परंतु नेताजींना वेळेवर येणे जमले नाही. त्यामुळे महाराजांनी ''समयास कैसा पावला नाहीस?''म्हणून शब्द लावून (दोष देवून) सरनोबत पद काढून घेतले व त्या जागी प्रतापराव गुजरांची नियुक्ती केली.[१४२] सभासदाने हा प्रसंग १६६० च्या सिद्दी जौहरच्या पन्हाळ्याच्या वेढ्याच्या वेळी घडला असे म्हटले आहे. परंतु ते चूक आहे. नेताजी जानेवारी १६६६ पर्यंत सरनौबत होते हे सिद्धच आहे. त्यामुळे हा प्रसंग घडलाच असेल तर तो जानेवारी १६६६ च्या पन्हाळ्याच्या हल्ल्याप्रसंगीच घडला असण्याची शक्यता आहे.

एक्याण्णव  कलमी बखरीत वेगळेच कारण सांगितले आहे. फाजलखानाने पन्हाळ्यास वेढा घालताना (इ. स. १६६०) शिवाजीने त्याजवर छापा घातला तेव्हा एके दिवशी नेताजीचा मेहुणा रात्री मोर्चा मारावयास (छापा घालण्यासाठी) जाता गैरहाजीर झाला ... त्या समयी नेताजी पालकर यांनी बहुत रदबदली केली म्हणून राजे स्वामी पालकर याजवर इतराजी करून (नाराज होवून) दूर केले, असे कारण या बखरीत दिले आहे.[१४३] अर्थात याही बखरकाराने हा प्रसंग इ. स. १६६० मध्ये पन्हाळ्याच्या वेढ्यात घडला आणि या वेढ्यात महाराजांबरोबर नेताजींही अडकले होते अशी चुकीची माहिती दिली आहे.

मुघल इतिहासकार खाफीखानाने आपल्या 'मुन्तखबुल–लुबाब' या ग्रंथात नेताजींना विजापूरी सरदारांनी फितवून फोडले असे म्हटले आहे.[१४४]

वरील सर्व साधनांवरून लक्षात येते की, नेताजींनी महाराजांना सोडून आदिलशहाला मिळणे या घटनेची कारणमिमांसा प्रत्येकाने वेगवेगळी केली आहे. सभासदाने नेताजींना महाराजांनी त्यांच्या बेजबाबदार वर्तनाबद्दल सरनौबतपदावरून काढून टाकले असे म्हटले आहे. तर जयसिंगाचे लोक मुघलावरील रागाने व मोठ्या वतनाच्या आशेने नेताजी आदिलशहाकडे गेले असे म्हणतात. इंग्रजांना या भांडणाचे कारण माहीत नाही. खाफीखानाने या घटनेचा ठपका विजापूरी सरदारांवर ठेवला आहे. एकूणच या सर्व साधनात नेमक्या कारणाची स्पष्टता होवू शकत नाही. त्यामुळे याबाबतीत अंदाजच बांधावा लागतो.

नेताजी आदिलशाहीकडे गेल्यानंतर शहाने दरसाल तीन लाखांची नेमणूक व मुघल सरहद्दीवरील काही मुलूख देवून त्यांना आपल्या चाकरीत ठेवले. नेताजी आता आदिलशहाच्या वतीने मुघलाशी लढू लागले व मुघल प्रदेशावर मोठ्या जोमाने हल्ले चढवू लागले. जयसिंगाच्या सैन्यासाठी रसद आणणाऱ्या सैनिकी तुकड्यावर हल्ले करण्याची कामगिरी नेताजी व बहलोलखान यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी बिदर, कल्याण परिसरात मुक्काम ठोकला होता. त्यांच्या सततच्या हल्ल्यांनी मुघलांना त्रस्त केले होते.[१४५]

## ५:६ आदिलशहाकडून मुघलाकडे :

नेताजी विजापूरकरांना सामील झाले. त्याचदरम्यान (जानेवारी १६६६ च्या प्रारंभी) गोवळकोंड्याच्या कुतुबशहाने नेकनामखानाच्या नेतृत्वाखाली बारा हजार स्वार व ४० हजार पायदळ आदिलशहाच्या मदतीला पाठविले होते.[१४६] शिवाजी महाराजांचे पन्हाळ्यावरील अपयश, नेताजींचे आदिलशहाकडे जाणे आणि कुतूबशहाने आदिलशहाला सहाय्य करणे या घटनांनी जयसिंगाच्या मनात आपल्याला या दक्षिण मोहिमेत यश येईल की नाही याबद्दल शंका उत्पन्न झाली. नेताजी पाठोपाठ शिवाजी महाराजही आदिलशहाला जावून मिळाले तर आपल्याला या मोहिमेत अपयशाचे धनी व्हावे लागेल, अशी भीती जयसिंगाला वाटू लागली. त्यामुळे दक्षिण सत्तांच्या या युतीपासून महाराजांना दूर ठेवणे व नेताजींना आपल्या पक्षात माघारी आणण्यासाठी त्याने प्रयत्न सुरू केले.

मिर्झाराजे जयसिंगाने शिवाजीराजांना औरंगजेबाच्या भेटीला पाठवून देण्याचे ठरविले. त्यासाठी महाराजांचे मन वळविण्यासाठी त्याने आपले सारे कौशल्य पणाला लावले. त्याने महाराजांच्या जीवित रक्षणाची पूर्ण हमी घेतली परिणामस्वरूप महाराज आग्र्यास जाण्यास तयार झाले. याचवेळी जयसिंगाने एकीकडे नेताजीशी पत्राद्वारे संपर्क साधून वेगवेगळी आमिषे दाखवून त्यांना आपल्या पक्षात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले.[१४७] नेताजीसारखा शूर व पराक्रमी सेनानी कोणतीही किंमत देवून आपल्याकडे आणण्यासाठी जयसिंग उत्सुक होता. शेवटी जयसिंगाने नेताजीच्या सर्व मोठ्या व अवास्तव मागण्या मान्य करून त्यांना आपल्या पक्षात ओढण्यात यश मिळविले. त्यानुसार नेताजींना पंचहजारी मनसबदारी देण्याचे जयसिंगाने मान्य केले. शिवाय नेताजींना मुघलांच्या संपन्न जुन्या मुलूखातील (नुकताच जिंकलेला अस्थिर व उध्वस्त मुलूख नव्हे) प्रदेश जहागीर म्हणून व ५० हजार रुपये रोख देण्यात येणार होते.[१४८] दि. ५ मार्च १६६६ रोजी शिवाजी महाराज औरंगजेबाच्या भेटीसाठी आग्र्यास रवाना झाले. आणि २० मार्च १६६६ रोजी नेताजी विजापूरकरांची नोकरी सोडून मुघलांना सामील झाले. यावेळी ठरल्याप्रमाणे नेताजींना विदर्भात एलिचपूर जवळ जहागीर देण्यात आली. निजामशाहीचा नाश झाल्यांनतर विदर्भाचा संपूर्ण मुलूख मोगलांच्या ताब्यात

आला होता. त्याची पाच भागात (सरकार) विभागणी करण्यात आली होती. या पाच भागांपैकी एलिचपूर हा एक भाग होता.[१४९] या एलिचपूरजवळ तमसा (सध्या जि. नांदेड) परगण्याची जहागिरी नेताजींना देण्यात आली.[१५०] नेताजी आता मुघलांचे पंचहजारी मनसबदार बनले.

याशिवाय नेताजींना सुपे परगणा मुघलांकडून मुकासा म्हणून मिळाला होता. ७ ऑगस्ट १६६६ चे नेताजींनी सुप्याच्या कारकून व देशमुखांना पाठविलेले एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रात 'महाराज रा. नेताजी राजे' असा नेताजींचा उल्लेख करण्यात आला आहे. मांडोगण कसब्याचा रहिवासी राम जोशी बिन धन जोशी याला सुपे परगण्यात इनामी जमीन होती. हे इनाम त्याला शहाजी महाराजांच्या काळापासून चालत आले होते. सुपे परगणा नेताजींना मुकासा म्हणून मिळाल्यानंतर रामजोशींनी आपल्याला नवीन खुर्दखत मिळावे अशी विनंती नेताजींना केली होती. तेव्हा नेताजींनी ७ ऑगस्ट १६६६ रोजी सुप्याच्या कारकून व देशमुखांना पत्र पाठवून त्यांचे इनाम चालवावे असा हुकूम दिलेला आहे.[१५१]

मुघलांचे मनसबदार झाल्यानंतर नेताजी मुघलांकडून विजापूरच्या वेढ्यात सामील झाले. नेताजी मुघलांना मिळाल्यानंतर पुढे जवळजवळ अडीच महिने (२० मार्च ते ३१ मे) मुघलांचा विजापूरकरांशी संघर्ष सुरू होता. या काळात नेताजींची जयसिंगाला भरपूर मदत झाली. मुघल इतिहासकार खाफीखान याने 'मुन्तखबुल–लुबाब' या आपल्या ग्रंथात ''विजापूरच्या खराबीत जयसिंहास अतिशय मदत करणारा'' अशा शब्दात नेताजीच्या कामगिरीचे वर्णन केले आहे.[१५२] विजापूरकरांबरोबरच्या या युद्धात शेवटी जयसिंगाला अपयशी होवून माघार घ्यावी लागली. जयसिंगाच्या उत्तरेकडील प्रयाणाला ३१ मे रोजी प्रारंभ झाला.

### ५:६:१ नेताजींना कैद (सप्टेंबर १६६६) :

विजापूरच्या मोहिमेत अपयशी ठरलेल्या मिर्झाराजे जयसिंगाने माघार घेवून १० जूनच्या आसपास भूम येथे आपला मुक्काम ठोकला. येथे जवळजवळ साडेतीन महिने त्याचा मुक्काम होता. २८ सप्टेंबरला तेथून मुक्काम हलवून तो बीडच्या परिसरात पोहोचला. येथे त्याचा मुक्काम १७ नोव्हेंबरपर्यंत होता. यावेळी नेताजी मुघल छावणीत फतहबादेस म्हणजे

बीड जिल्ह्यातील धारूर या गावी तळ देवून होते.[१५३] दरम्यानच्या काळात औरंगजेबाच्या भेटीस गेलेल्या शिवाजी महाराजांना औरंगजेबाने कपटाने कैद केले होते. आग्र्याला जाताना जयसिंगाने अनेक महत्त्वाकांक्षी स्वप्ने महाराजांच्या नजरेसमोर उभी केली होती. त्याने महाराजांच्या जिविताची हमी घेतली होती. खुद्द बादशहानेही फर्माने पाठवून गोड गोड शब्दांनी निमंत्रण दिले होते. पण प्रत्यक्ष आग्र्यात उलटेच घडले. महाराजांच्या प्राणांनाच धोका निर्माण झाला. पिंजऱ्यात अडकलेल्या सिंहासारखी महाराजांची स्थिती झाली होती. परंतु अशा कठीण परिस्थितीतही मन स्थिर ठेवून महाराजांनी आपल्या सुटकेची योजना आखली आणि दि. १७ ऑगस्ट १६६६ रोजी महाराजांनी अत्यंत चातुर्याने औरंगजेबाच्या कैदेतून स्वत:ची सुटका करून घेतली.

शिवाजी महाराज कैदेतून निसटल्याचे वर्तमान बादशहास समजताच त्याचा संताप अनावर झाला. सर्व मार्गावर घोडेस्वार पिटाळण्यात आले आणि दक्षिणेचे सर्व मार्ग रोखून धरण्याचे हुकूम सुटले. महाराजांना शोधण्यासाठी मोगलांनी कसून प्रयत्न केले. मोगली दरबाराच्या बातमीपत्रात माळवा व इतर दक्षिण प्रांतात केलेल्या अनेक धरपकडीचे उल्लेख आहेत. परंतु एवढे करूनही महाराज काही मुघलांच्या हाती लागले नाहीत. महाराजांच्या निसटून जाण्याने संतापलेल्या औरंगजेबाने आता मुघलांच्या चाकरीत असलेल्या नेताजी पालकरांना कैद करण्याचे आदेश सोडले. महाराज औरंगजेबाच्या कैदेतून निसटून गेले ही बातमी अजून दक्षिणेत कळाली नव्हती. त्यामुळे ही बातमी सर्वांना समजण्याअगोदरच सिवाचा नातलग नेताजीला पकडून दरबारात पाठवून द्या असा हुकूम त्याने जयसिंगाला पाठविला.[१५४] महाराज निसटून गेल्याचे कळताच नेताजीही जयसिंगाकडून पळून जाईल व महाराजांना सामील होवून पुन्हा उपद्रव सुरू करेल अशी भीती बादशहाला वाटत होती.[१५५] मिर्झाराजे जयसिंग विजापूरहून माघार घेत असतानाच शिवाजी पळून गेल्याबद्दल आणि नेताजीला कैद करून पाठविण्याबद्दलचा हुकूम त्याच्या हातात पडला. बादशहाचा हुकूम पोहोचताच जयसिंगाने सैन्याची एक तुकडी नेताजींना कैद करण्यासाठी पाठविली. यावेळी नेताजी फतहाबादेस (धारूर) होते. जयसिंगाच्या सैन्याने अचानकपणे जावून नेताजींना कैद केले.[१५६]

यावेळी त्यांच्या मुलालाही कैद करण्यात आले. नेताजी बेसावध होते. असे काही संकट आपल्यावर येईल याची पुसटशीही कल्पना त्यांना नव्हती. नेताजींच्या दुर्दैवाला आता सुरूवात झाली होती. महाराज सुटून गेल्याचा राग औरंगजेबाने नेताजींवर काढला होता.

नेताजींना कैद केल्याची बातमी जयसिंगाने औरंगजेबास कळविली. २६ सप्टेंबर १६६६ रोजी नेताजींना कैद केल्याची व सीवा अजून आपल्या मुलूखात पोहोचलेला नाही या दोन्हीही बातम्या औरंगजेबाला समजल्या होत्या. औरंगजेबाच्या दरबारी अखबारात तशी नोंद आहे. याअगोदर दहा–बारा दिवसापूर्वी तरी (सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात) नेताजींना कैद करण्यात आले असावे. नेताजींच्या कैदेची बातमी ऐकून बादशहाला आनंद झाला. सीवा सुटला निदान 'प्रति शिवाजी' किंवा 'दुसरा शिवाजी' म्हणून ओळखला जाणारा नेताजी तरी हाती गवसला म्हणून बादशहा खूश झाला. शिवाजी महाराज कैदेतून पळून गेल्यानंतर बादशहाने जयसिंगाचा मुलगा रामसिंग याची जहागिर जप्त करून त्यास दरबारात येण्यास मनाई केली होती. परंतु आता खूश झालेल्या बादशहाने त्याच्या मनसबीचा फेरविचार सुरू केला.[१५७] नेताजींना कैद केलेल्या सैन्याने २४ ऑक्टोबर १६६६ रोजी त्यांना जयसिंगाच्या लष्करात आणून पोहोचविले. नेताजींना दिलेरखानाबरोबर दरबारात पाठवावे असा औरंगजेबाचा हुकूम होता. या मोहिमेत दिलेरखान हा जयसिंगाचा प्रमुख सहाय्यक होता.[१५८] येथून निघण्यापूर्वी या मोहिमेतील सर्व आर्थिक व इतर बाबींची पूर्तता करून व जयसिंगाचा निरोप घेवून त्याने दि. २५ ऑक्टोबर १६६६ रोजी बीडजवळ नेताजीसह दरबारात जाण्यासाठी कूच केली.[१५९] दिलेरखानाच्या कामाची पूर्तता होईपर्यंत नेताजींना कैद केल्यानंतर जवळजवळ एक महिनाभर दक्षिणेतच ठेवण्यात आले होते.

### ५:६:२ नेताजींचे धर्मांतर :

नेताजी पालकरांना दिलेरखानाने बंदोबस्तात दिल्लीस आणले. शिवाजीराजांच्या वेळी झालेली चूक बादशहाला पुन्हा होवू द्यायची नव्हती. त्यामुळे बादशहाने नेताजींना पोलिसप्रमुख फिदाईखान याच्या ताब्यात दिले. तेथे त्यांचा भयंकर छळ सुरू झाला. मुस्लिम धर्म स्वीकारण्याची त्यांच्यावर सक्ती करण्यात आली. आपली सुटका इस्लामी धर्म

स्वीकारल्याशिवाय होत नाही हे पाहून नेताजींनी तीन दिवसानंतर अखेर आपण इस्लाम धर्म स्वीकारण्यास तयार आहोत असा विनंती अर्ज बादशहाकडे पाठविला. बादशहाने आनंदाने त्यांची विनंती मान्य करून १५ फेब्रुवारी १६६७ रोजी त्यांना मुसलमान करण्यात आले.[१६०] दि. १७ मार्च १६६७ रोजी नेताजींना तीन हजारी जात व दोन हजार स्वार अशी मनसब आणि मुहम्मद कुलीखान असा किताब देवून सन्मानित करण्यात आले. नेताजींनी आपले प्राण वाचविण्यासाठी मुस्लीम धर्म स्वीकारला होता. मुघल सैन्यात असलेला इटालियन प्रवासी मनुची म्हणतो, ''नेताजीने धर्म बदलण्याचे सोंग केले.''[१६१] बादशहाचा राग शांत झाल्यावर आज ना उद्या येथून सुटका करून घेण्याची संधी मिळेल या आशेवरच नेताजी प्राप्त परिस्थितीला तोंड देत होते.

नेताजींनी मुस्लीम धर्म स्वीकारल्यानंतर औरंगजेब बादशहाचा राग काही अंशी का होईना कमी झाला. मुसलमान झालेल्या नेताजींना मोठ्या मनसबीची लालूच दाखवून आपलेसे करण्याचा तो प्रयत्न करू लागला. ६ एप्रिल १६६७ रोजी बादशहाने फिदाईखानास हुकूम दिला की, ''मुहम्मद कुलीस पंजमीरची (काबुल) ठाणेदारी दिली आहे. हे त्यास कळव आणि हे ही सांग की ही मनसब मातबर आहे. त्याने काही दिवस सरहद्दीबद्दल माहिती करून घ्यावी. एक वर्षानंतर गझनीची ठाणेदारी देईल.''[१६२] परंतु नेताजीजवळ सरंजाम नसल्यामुळे ही नियुक्ती स्थगित करण्यात आली. त्यामुळे नेताजींना आणखी काही दिवस दरबारात रहावे लागले.

शिवाजी महाराजांच्या सुटकेनंतर औरंगजेबाने त्यांच्या अनेक लोकांना पकडून कैदेत ठेवले होते. या लोकांचे भविष्य अंधकारमयच होते. कदाचित कैदेतच खितपत त्यांना आपले प्राण गमवावे लागले असते. नेताजींनी फिदाईखानामार्फत बादशहाला विनंती केली की, ''सीवाच्या सर्व लोकांना कैदेतून सोडून माझ्या ताब्यात द्यावे म्हणजे मी त्यास नोकर ठेवीन.'' नेताजींची ही विनंती बादशहाने मान्य केली.[१६३]

दरम्यानच्या काळात नेताजींच्या कुटुंबियांना दिल्लीला आणण्याची औरंगजेबाने आज्ञा सोडली. त्याप्रमाणे मिर्झाराजे जयसिंगाने जाननिसार खानाबरोबर नेताजींच्या मुलांना दरबारात

पाठविण्याची व्यवस्था केली व पाठोपाठ नेताजींच्या पत्नींनाही दिल्लीस पाठविण्यात आले. दि. ६ मे १६६७ रोजी नेताजींचे कुटुंबिय दिल्लीस पोहोचले. नेताजींच्या तीन पत्नींपैकी दोघी दिल्लीस आल्या. एक मात्र दक्षिणेतच राहिली. बादशहाने त्यांनाही मुसलमान होण्याची आज्ञा दिली. परंतु त्यांनी धर्मांतरास नकार दिला. तेव्हा बादशहाने त्याचे मन वळविण्यासाठी नेताजींना त्यांच्याकडे पाठविले. जर त्या धर्मांतरास तयार झाल्या नाहीत तर नेताजींनी दुसऱ्या मुसलमान स्त्रीशी निकाह लावावा असे बादशहाने सांगितले. परंतु तशी वेळ आली नाही. नेताजींनी आपल्या पत्नींची भेट घेवून त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितल्यानंतर त्या धर्मांतरास तयार झाल्या. त्यांनाही मुसलमान करण्यात आले. यानंतर औरंगजेबाने २४ जुलै १६६७ रोजी नेताजींचा त्यांच्या पत्नींशी मुसलमान धर्माप्रमाणे पुन्हा निकाह लावण्याची आज्ञा दिली.[१६४] या विवाहप्रसंगी बादशहाने पाच हजार रुपयांचा आहेर नेताजींना केला. नेताजी बरोबरच मुघलांच्या नोकरीत असणारे त्यांचे चुलते कोंडाजी पालकर यालाही डिसेंबर १६६७ मध्ये मुस्लीम धर्माची दीक्षा देण्यात आली. बादशहाने त्याला दोन हजार रुपये बक्षीस दिले. एक हजारी मनसब बहाल केली.[१६५] नेताजींच्या मुलालाही धर्मांतरित करण्यात आले. नेताजींच्या दोन मुलांपैकी किमान एकजण तरी निश्चितपणे मुस्लीम बनला होता.

दरम्यानच्या काळात नेताजींचा सरंजामही तयार होत होता. नेताजींच्या खर्चासाठी सावकाराकडून दरमहा १५०० रुपये दिले जात होते. हे पैसे नंतर नेताजींच्या जहागिरीच्या वसुलातून वसूल केले जाणार होते. दरम्यान त्यांची घोरबंदरचा ठाणेदार म्हणून नियुक्ती झाली. नेताजीची नियुक्ती काबुल प्रांतात झाली होती त्यामुळे त्यांची पूर्वीची जहागिरीही (वऱ्हाडातील तमसा) बदलण्याची शक्यता होती. त्यामुळे सावकारांना आपला पैसा कसा वसूल होईल याची काळजी लागली. ही गोष्ट बादशहाला समजताच बादशहाने नेताजींना पूर्वीचीच जहागीरी बहाल केली आहे असा हुकूम दिला. याकाळात औरंगजेबाची नेताजींवर पूर्ण मर्जी होती. ३ ऑक्टोबर १६६७ रोजी फिदाइखानाने दरबारात तक्रार केली की, मुहम्मद कुलीखान उर्फ नेताजी याने आपल्या घोड्यावर डाग देणे व शिक्के मारणे यांचा तपशील व मुचलका दिले नाहीत. तेव्हा बादशहाने हुकूम दिला की, ''शिक्के मारण्याचा तपशील राहिला

असेल तो मुहम्मद कुलीखानाने काबुलला जाताना लाहोर सुभ्यात देवून पुढे जावे आणि त्यास घोड्यांची माफी केली आहे. त्याच्याजवळ डागनाम्याबद्दल सनदा असतील त्यास अडथळा आणू नये.''[१६६] यानंतर लवकरच १९ ऑक्टोबर १६६७ रोजी नेताजींना सरोपा, पोशाख, सोन्याच्या साजाचा घोडा, लाकडी हौद्यासह हत्तीण व झेंडा देवून काबुलला जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

नेताजी आता औरंगजेब बादशहाच्या पोलादी पंज्यात पूर्णपणे अडकले होते. मुस्लिम धर्म स्वीकारून बादशहाचा राग शांत करावयाचा आणि संधी मिळताच सुटका करून घेवून दक्षिणेत पळून जायचे हाच नेताजींचा डाव असावा. परंतु औरंगजेबही कच्च्या गुरुचा चेला नव्हता. त्याने नेताजींच्या कुटुंबियांनाही दिल्लीत आणून धर्मांतरीत केले आणि नेताजींची नेमणूक स्वराज्याच्या विरूद्ध दिशेला मुघल साम्राज्याच्या सरहद्दीवरच्या वायव्य प्रांतात केली. जिथून निसटून जाणे हे अत्यंत धोकादायक व अवघड कार्य होते. त्यामुळे मनात असूनही सुरूवातीच्या काळात नेताजींना आपली सुटका करून घेता आली नाही. परंतु १६७२–७३ मध्ये अशी संधी त्यांना मिळाली. यावर्षी प्रसिद्ध मुघल सरदार महाबतखान याची काबुलचा सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. या प्रांतातील अफगाण टोळ्यांचा बंदोबस्त करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविण्यात आली होती. महाबतखानाबरोबर नेताजींनाही या मोहिमेवर पाठविण्यात आले. महाबतखानाचे सैन्य काबुलच्या परिसरात आले आणि याचवेळी नेताजी संधी साधून पळाले. नेताजींच्या दुर्दैवाने नेताजी पळाल्याचे महाबतखानाच्या लक्षात येताच त्यांना पकडण्यासाठी सैन्य रवाना झाले. आजूबाजूच्या सुभेदारानाही सूचना देण्यात आल्या. पंजाबहून पेशावरच्या सरहद्दीवरून पळून जात असताना लाहोरच्या सुभेदाराने त्यांना पकडले आणि लाहोरला आणले. तेथे त्यांना फटक्यांची शिक्षा सुनावण्यात आली. जखमी अवस्थेतील नेताजींना पिंजऱ्यात ठेवण्यात आले. इटालियन प्रवासी मनुची यावेळी लाहोरमध्ये वैद्यकीय व्यवसाय करत होता. या मनुचीनेच नेताजींच्या पाठीवरच्या वळांना मलमपट्टी केली. या सर्व घटनेचे वर्णन मनुचीने आपल्या "Storia do Mogor" या ग्रंथात केले आहे.[१६७] नेताजींनी दोनदा पळून जाण्याचा प्रयत्न केला असे इतिहास संशोधक सेतू माधवराव पगडी यांनी म्हटले

आहे. पळून जाण्याचा प्रयत्न फसल्यानंतर मात्र नेताजींना असहायपणे पुन्हा मुघलांची चाकरी करणे नशिबी आले.

**५:६:३ नेताजी स्वराज्यात माघारी :**

१६६६ पासून १६७६ पर्यंत जवळजवळ नऊ ते दहा वर्षे नेताजी औरंगजेबाच्या सेवेत होते. दक्षिणेत जाण्याची आशा मावळत चालली होती. आणि १६७६ मध्ये अचानकपणे नेताजींना दख्खनच्या मोहिमेवर जाण्याचा हुकूम आला. १६७६ मध्ये औरंगजेबाने दक्षिणेचा सुभेदार बहादूरखानाला विजापूरवर चढाई करण्याचा आदेश दिला. याकामी बहादूरखानाला मदत करण्यासाठी उत्तरेत असलेल्या दिलेरखानाची पुन्हा दक्षिणेत नेमणूक करण्यात आली. औरंगजेबाने दिलेरखानासोबत दक्षिणेची खडानखडा माहिती असलेल्या मुहम्मद कुलीखान उर्फ नेताजींनाही जाण्याचा आदेश दिला. नऊ वर्षे मुस्लिम धर्मात राहिलेले नेताजी आता पक्के मुसलमान झाले आहेत अशी औरंगजेबाची समजूत असावी. त्यामुळेच त्याने नेताजींना दक्षिणेत पाठविले असावे. परंतु नेताजी अजूनही स्वराज्याला व महाराजांना विसरले नव्हते. मोगली फौज आणि तिच्याबरोबर नेताजी दक्षिणेकडे निघाले. यावेळी बहादूरखान विजापूरकराशी संघर्ष करण्याच्या तयारीत सोलापूर परिसरात भीमेच्या काठी तळ देवून होता. दिलेरखानाची मोगली फौज नेताजींसह त्याला मिळण्यासाठी निघाली होती. मायभूमी येताच नेताजींचे मन सैरभैर झाले आणि एके दिवशी नेताजी दिलेरखानाच्या फौजेतून निसटले (१९ जून १६७६ पूर्वी) आणि रायगडावर येवून दाखल झाले.[१६८] एकेकाळचे स्वराज्याचे सरनौबत अशा विचित्र अवस्थेत महाराजांकडे आले. महाराजांचा मुक्काम यावेळी रायगडावर होता. नेताजींची व महाराजांची भेट झाली. नेताजी परत आल्याचे पाहून महाराजांना अवर्णनीय आनंद झाला. नेताजी मुसलमान होवून नऊ वर्षे होवून गेली होती. तरीही महाराजांनी ठरविले की, नेताजींना शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घ्यायचे. १९ जून १६७६ रोजी महाराजांनी नेताजींना शास्त्रविधीनुसार पुन्हा हिंदू करून घेतले. जेधे शकावलीत नोंद आहे की, ''शके १५९८ नळनाम संवछरे, आषाढ वद्य ४ रा नेताजी पालकर यांनी प्रायश्चित घेतले. श्रुध

(शुद्ध) जाले.''[१६९] महंमद कुलीखानाचे पुन्हा 'राजश्री नेताजी पालकर' बनले आणि पुन्हा स्वराज्याच्या सेवेत दाखल झाले.

नेताजींचे धर्मांतर व मुघलांकडून पळून स्वराज्यात येणे याविषयी मुघल इतिहासकार खाफीखान म्हणतो, ''सीवाचा नातलग नथुजी (नेताजी), गुर्जबर्दार व राजा जयसिंगाचे लोक याजबरोबर हुजूर पोहोचल्यावर हुकूम आला की, त्यावर सक्त नजर ठेवावी. आपली सुटका इस्लामी धर्म स्वीकारल्याशिवाय होत नाही असे पाहून हुजूरच्या जवळच्या करवी हजरतास आपली तशी इच्छा असल्याचे नथुजीने कळविले. त्याची विनंती मान्य करून त्यास मुसलमान बनविले ... पुढे दिलेरखानाच्या मदतीसाठी नेमिल्यामुळे तो दक्षिणेत गेला तेव्हा पुन्हा संधी साधून सीवाकडे पळाला. नंतर त्याने जी बंडखोरी दक्षिणेत उठविली ती अजून दक्षिणच्या सर्व सुभ्यात वाढत्या प्रमाणात आहे.'' निकालाओ मनुची म्हणतो, ''... नेतोजी पुन्हा नाहीसा झाला आणि शिवाजीच्या मुलूखात निघून गेला. तिथून तो मोगलांच्या विरुद्ध आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे लढू लागला.''

महाराजांनी नेताजींना पुन्हा हिंदू करून घेतले या घटनेचे पडसाद तत्कालीन पत्रव्यवहारात उमटलेले दिसतात. राजापूरकर इंग्रज २४ जुलै १६७६ रोजी सुरतेला लिहिलेल्या पत्रात म्हणतात, ''१० वर्षे मोगलाकडे राहून मुसलमान बनलेल्या नेताजी नावाच्या खोल मुत्सद्दी मनुष्याला पुन: हिंदू करून घेवून शिवाजीने आपल्याकडे मिळविला आहे. त्याअर्थी शिवाजीचा काहीतरी मोठा बेत चालला आहे असे पुष्कळांना वाटते.''[१७०]

नेताजी शिवाजीराजांना मिळाले आणि पुन्हा हिंदू झाले ही बातमी जेव्हा औरंगजेबाला समजली असेल तेव्हा त्याला किती राग आला असेल याची कल्पना न केलेलीच बरी.

## ५:७ स्वराज्याच्या सेवेत नेताजी (१६७६–१६८०) :

छत्रपती शिवाजी महाराजांनी नेताजींना शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेतले एवढेच नव्हे तर जावळीच्या प्रांतावर सुभेदार म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. वाई परगण्यातील मौजे पसरणी या गावाचा मुकासा नेताजींना देण्यात आला.[१७१] नेताजी स्वराज्यात माघारी आले तेव्हा स्वराज्याच्या सैन्याचे सेनापती हंबीरराव मोहिते हे होते.

यावेळेपर्यंत स्वराज्याच्या लष्करात मोठी वाढ झाली होती. पंचेचाळीस हजार बारगीर व साठ हजार शिलेदार मिळून एक लाख पाच हजाराचे सुसज्ज घोडदळ तयार झाले होते. पागेतील बारगीर घोडदळ विभागातील सरदारकी नेताजींना देण्यात आली.

नेताजी स्वराज्यात आल्यानंतर लवकरच कर्नाटक मोहिमेची तयारी सुरू झाली आणि जानेवारी १६७७ मध्ये महाराज पंचवीस हजार सैन्यानिशी गोवळकोंड्याकडे निघाले. या स्वारीत महाराजांबरोबर नेताजी पालकरही सहभागी झाले होते.[१७२] याशिवाय आनंदराव मकाजी, मानाजी मोरे, सुर्याजी मालुसरे, पायदळाचे सरनौबत येसाजी कंक, सोनाजी नाईक ही सरदार मंडळी आणि हणमंते बंधू, दत्ताजी वाकनीस, बाळाजी आवजी, केसो निळो इ. मुत्सद्दी मंडळीही महाराजांबरोबर होती. महाराजांची कर्नाटक मोहिम जवळजवळ वर्ष–सव्वा वर्ष (जानेवारी १६७७– एप्रिल १६७८) चालली होती. या मोहिमेत महाराजांनी २० लाख होन उत्पन्नाचा मुलूख व या मुलखातील लहानमोठे १०० किल्ले जिंकून आपल्या राज्यात सामील केले.

स्वराज्यात माघारी आल्यापासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंत कर्नाटक मोहिम वगळता इतर कुठल्याही लष्करी मोहिमेतील नेताजींचा सहभाग दर्शविणारी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. मात्र याकाळात नेताजींनी केलेल्या निवाड्याचा महजर उपलब्ध आहे. याकाळात नेताजी लष्करी मोहिमांपेक्षा प्रशासकीय कामकाजात व्यग्र असावेत असे दिसते.

## ५:८ नेताजींचे कार्य – छत्रपती संभाजी कालखंड (१६८०–१६८९) :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजीराजे स्वराज्याचे छत्रपती बनले. छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातही नेताजी स्वराज्याची सेवा बजावत असल्याचे त्रोटक उल्लेख आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यु झाला, तेव्हा मराठ्याचा मोगलांशी संघर्ष चालूच होता. महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजांनी पन्हाळ्यावर राज्याची सूत्रे हाती घेतली तेव्हा बहादूरखान दक्षिणेच्या सुभेदारीवर रूजू झाला होता. त्याने दक्षिणेत आल्याबरोबर खानदेश, बागलाणात किल्ले जिंकण्याची मोहिम हाती घेतली होती. बागलाणात

मुघलांबरोबर चाललेल्या या संघर्षावेळी (१६८०-८१) नेताजीही लढत असल्याचे उल्लेख सापडतात.[१७३]

मे-जून १६८१ मध्ये औरंगजेब बादशहाचा तृतीय पुत्र शहजादा अकबर हा आपल्या वडिलाविरूद्ध बंडखोरी करून संभाजी महाराजांच्या आश्रयाला आला. संभाजी महाराजांनी त्याचा योग्य आदर सत्कार करून उत्तर कोकणातील पाली या ठिकाणी त्याची राहण्याची सोय केली. जून १६८१ मध्ये संभाजी राजांनी आपला प्रतिनिधी म्हणून हिरोजी फर्जद यास अकबराकडे पाठविले. याच्याबरोबर नजराणा व एक पत्रही दिले. यापाठोपाठ बहुधा जून-जुलैच्या दरम्यान संभाजीराजांनी नेताजी पालकरांनाही अकबराच्या व्यवस्थेसाठी पालीला पाठवून दिले. २२ जुलै १६८१ ची औरंगजेबाच्या दरबाराच्या अखबारात नोंद आहे की, ''अकबर हा तळकोकणात रहात आहे. सीवाचा मुलगा संभाजी याने त्यास वीस हजार होन दिले असून मुहम्मद कुली उर्फ नेताजी व आपले इतर लोक त्याच्यापाशी ठेवले आहेत.''[१७४] मुघल रीतीरिवाजांची माहिती असलेले म्हणूनच नेताजी व हिरोजी यांची याकामी संभाजी राजांनी नेमणूक केली असावी.

सन १६८२ मध्ये नेताजी पालकर सरनौबत असल्याचा उल्लेख एका टिपणात आढळतो. रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथील खंडो बल्लाळच्या वंशजांची एक शाखा असलेल्या चित्रे घराण्याच्या कागदपत्रात एक टिपण (यादी) सापडले आहे. या टिपणात 'श. १६०४ दुर्दुंभिनाम संवत्सरे, सलास समानीन आलफ, राज्या. शक़ . ९, मोरेश्वर पंडितराव, विठ्ठल शंकर देशाधिकारी, नेताजी पालकर सरनोबत.' असा उल्लेख आहे.[१७५] या उल्लेखामुळे याकाळात नेताजी पालकर सरनौबत (सेनापती) होते की काय असा संभ्रम निर्माण होतो. वस्तुत: संभाजी महाराजांच्या कालखंडात सातहजारी सैन्यावरील अधिकाऱ्यास 'सरनौबत' असे म्हटले जात असे. या काळात नेताजी पालकर, मालोजी घोरपडे आणि येसाजी कंक सरनौबत पदावर होते[१७६] तर लष्कराच्या सर्वोच्चपदी सेनापती हंबीरराव मोहिते होते. १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी अष्टप्रधान मंडळाची फारशी नावे बदलून त्यांची संस्कृत नावे निश्चित केली. त्यानुसार सैन्याच्या प्रमुखास 'सरनौबत ऐवजी

सेनापती' असे म्हटले जावू लागले. १६७४ पासून हंबीररावांच्या मृत्यूपर्यंत (१६८७) तेच सेनापती पदावर होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या कालखंडात सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या नेतृत्वाखालील लष्करात सप्तहजारी सैन्यावरील अधिकारी म्हणून नेताजी वावरत असले तरी याकाळातील त्यांच्या सैनिकी हालचाली विषयी माहिती देणारी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्यांच्या कार्याची माहिती मिळू शकत नाही.

मात्र छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातही नेताजी जावळीचे सुभेदार असावेत. जावळी सुभ्यातील परगणे वाईतील मौजे अभेपुरीच्या पाटीलकीच्या वाटणीचे निवाडापत्र उपलब्ध आहे. इ. स. १६८२ मध्ये गोत सभेत या वादाचा निवाडा झाला. त्याच्या हाजीर मजालसीत नेताजी पालकर उपस्थित होते.[१७७]

## ५:९ नेताजींनी केलेले न्यायनिवाडे :

राजसत्तेच्या अनेक कार्यापैकी न्यायनिवाडे करणे हे फार महत्त्वाचे कार्य होते. शिवकालीन न्यायव्यवस्थेत अनेक वाद गोतसभा, देशकसभा यांच्याकडून सोडविले जात. परंतु त्यांनी दिलेला निकाल मान्य नसणारे काही लोक न्यायासाठी राजसत्तेकडे धाव घेत. अशा अनेक खटल्याचा राजाने नेमलेला व राजमुद्रा दिलेला अधिकारी म्हणून प्रधान मंडळातील मंत्री न्यायनिवाडा करीत असत. सरनौबत नेताजी अशा प्रकारची न्यायनिवाड्याची कामे त्यांचा मुक्काम ज्या भागात पडे त्याभागातील रयतेची करीत असत. अशा प्रकारचे अनेक निवाडे नेताजींच्या उपस्थितीत पार पडलेले दिसतात. इ. स. १६६१ मध्ये शिरवळ परगण्यातील मौजे भवाली या गावच्या पाटीलकचा पाचपुते आणि रणदिवे यांच्यातील वादाचा निवाडा नेताजींनी केला होता. यासंबंधीची तक्रार महादजी रणदिवे याने खुद्द नेताजींकडेच केली होती. भवालीची पाटीलकी हे माझे वतन असताना पाचपुते हे वतन खात आहेत अशी तक्रार त्याने केली. नेताजींनी या प्रकरणाची पूर्ण चौकशी करून गोतसभेत भवालीची पाटीलकी पाचपुते यांची आहे असा निर्णय दिला.[१७८]

नेताजींची न्यायनिवाडा करण्यात चांगलीच ख्याती असावी. इ.स. १६६३ मध्ये कऱ्हाडजवळ वसंतगडच्या पायथ्याशी असलेल्या तळबीड गावच्या पाटीलकी विषयीच्या

वादाचा निवाडा नेताजींनी केलेला दिसतो. तळबीड हे सेनापती हंबीरराव मोहिते यांचे गाव होय. तळबीड येथील पाटीलकीचे व देशमुखीचे वतन मोहिते घराण्याकडे होते. या घराण्यातील साऊजी मोहिते व नेताजी मोहिते यांच्यात वतनावरून वाद सुरू झाला. या वादाच्या निवाड्याकरिता जावळी येथील पार हे ठिकाण स्थळ म्हणून नेमण्यात आले. या वादाचा सरनौबत नेताजी यांच्या प्रमुख उपस्थितीत २३ सप्टेंबर १६६३ रोजी निवाडा होवून महजर झाला. या गोतसभेचा प्रमुख या नात्याने नेताजींनी या निवाड्याचा निर्णय काटेकोरपणे कसा घेतला याची कल्पना आपल्याला निवाडापत्रावरून येवू शकते. या निवाडापत्रात म्हटले आहे की, ''आजि मजालसीस लोक ज्यास वृत्ती (वतन) आहेत व वृत्तीचे (वतनाचे) व्यवहार जी ही निवडले आहेत. देखिले ऐकिले ऐसे लोग मजालसी सभेस (गोतसभेस) बैसविले होते. त्यास स्वतंत्र वादे एक एकास पुशिले (विचारले). ज्या ज्याची बुध्दि जैसी चालिली तैसी अवघियांनी सांगितली. ते राजश्री नेताजी राजे पालकर येही (यांनी) मनीच ठेवून मग महाबळेश्वरास मनुष्य पाठवून विज्ञानेश्वर आणविला (विज्ञानेश्वरांनी लिहिलेला 'मिताक्षरा' हा ग्रंथ) आणि पंडित विद्वंस (विद्वान) याच्या मुखांतेरे विज्ञानेश्वरामध्ये वृत्तीच्या (वतनाच्या) विशेष विवंचना (स्पष्टीकरण) ज्या होत्या त्या संपूर्ण मनास आणून धर्मशास्त्राचा मतितार्थ काढून व सकल गोत व सभानायक मिळोन धर्मता आपले पूर्वज स्मरोन बर हक्क निवाडा केला...''[१७९]

शिवकाळात आजच्यासारख्या कायद्याच्या संहिता अस्तित्वात नव्हत्या किंवा गोतसभेसाठी जमलेले प्रतिष्ठित वतनदार हे काही धर्मशास्त्राचा अभ्यास केलेले विद्वान नसत. त्यामुळे गोतसभेपुढे एखादा अडचणीचा मुद्दा उपस्थित झाला तर त्याच्या स्पष्टीकरणासाठी १२ व्या शतकात विज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या 'मिताक्षरा' या ग्रंथाचा आधार घेतला जात असे. नेताजींना जेव्हा या वादात धर्मशास्त्राचा आधार घेणे योग्य आहे असे वाटले, तेव्हा त्यांनी महाबळेश्वरावरून ग्रंथ आणविला आणि पंडितांकडून संदर्भ वाचून घेवून त्यानुसार वादाचा निवाडा केला.

या निवाड्यानुसार पाटीलकीचे वतन साऊजी व नेताजी मोहिते यांच्यात निम्मे निम्मे वाटून देण्यात आले. साऊजीस देशमुखीचे वतन मात्र दिले नाही. हे वतन फक्त नेताजी मोहिते यासच मिळाले. या निवाड्याचा महजर झाल्यानंतर चार दिवसांनी म्हणजे २७ सप्टेंबर १६६३ रोजी सरनौबत नेताजींनी तळबीडच्या नेताजी मोहिते यांना कौलनामा दिलेला दिसतो. नेताजी मोहिते मौजे येरफळ येथे रहात असत. या परिसरात सैन्याच्या हालचाली होत असताना त्याचा मोहित्यांना नेहमीच त्रास होत असे. तरी येथून पुढे आमच्याकडून तुम्हाला कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही असे आश्वासन सरनौबत नेताजींनी दिलेले दिसते.[१८०]

स्वराज्याचे सरनौबत या नात्याने नेताजींनी अनेक वादांचे निवाडे केले एवढेच नव्हे तर या पदावर नसतानाही इ. स. १६७९ मध्ये त्यांनी वाई परगण्यातील मौजे पसरणी येथील पाटीलकीच्या विभाजनाचाही निवाडा केलेला दिसतो.

मुघलांकडून स्वराज्यात परत आल्यावर जावळी प्रांताचे सुभेदार म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. याचवेळी वाई परगण्यातील मौजे पसरणी या गावाचा मोकासा त्यांना मिळाला. पसरणीच्या पाटीलकीच्या विभाजनाविषयीचा वाद अनेक वर्षांपासून महागुडे विरूद्ध रिकामे व येवले असा सुरू होता. नेताजींना हा गाव मोकासा मिळाल्यानंतर रिकामे यांनी त्यांचे नातलग जे नेताजींकडे नोकर होते त्याच्यामार्फत नेताजींशी संपर्क साधला आणि तक्रार केली की, पसरणीच्या पाटीलकीचा तिसरा हिस्सा आमचा असतानासुद्धा महागुडे तो आम्हाला देत नाहीत. याबाबतीत नेताजींनी महागुडे यांना विचारले असता त्यांनी गोतसभा भरवून आमच्या वादाचा न्यायनिवाडा करा अशी नेताजींना विनंती केली. नेताजींनी ही विनंती मान्य केली. पुढे नेताजींनी आपल्या मुलाला शुद्ध करून हिंदू धर्मात घेण्याच्या निमित्ताने देशकसभा भरविली होती. तिच्यापुढे पसरणीच्या पाटीलकीच्या वादाचा विषय नेताजींनी मांडला. नेताजींच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सभेने सर्व कागदपत्रांची तपासणी करून या वादाचा निवाडा केला. त्यानुसार पाटीलकीच्या वतनाचे दोन भाग महागुडा यांना तर तिसरा भाग रिकामे व येवले यांना निम्मा निम्मा देण्यात आला.[१८१] पुढे छत्रपती संभाजी

महाराजांच्या काळात इ. स. १६८२ मध्ये अभेपुरीच्या पाटीलकीचा वाटणीचा वाद नेताजींनी सोडविला होता.

निवाडे करून रयतेचे वतनाचे वाद सोडविणारे नेताजी स्वत:ही वतनाच्या वादात अडकलेले होते. पुणे व अहमदनगर जिल्ह्याच्या सीमेवर घोडनदीच्या दक्षिणेस चार मैलावर असलेले करडे परगण्यातील तांदळी गाव हे नेताजींचे वतनी गाव होते. या गावचे देशमुखी वतन नेताजीच्या घराण्यात वंशपरंपरेने चालत आले होते. पुढे निजामशाही कालखंडात बाटून मुसलमान झालेल्या कळसकर यांनी या वतनावर आपला हक्क सांगायला सुरूवात केली. या वादाचा निवाडा दोनदा पालकरांच्या बाजूने झाला होता. एक निवाडा खुद्द शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत होवून कळसकर खोटे ठरले होते. तरीही कळसकर हा निर्णय मानायला तयार नव्हते. नेताजी राजे व त्यांचे बंधू नरहरसिंगजीराजे यांच्याबरोबरचा त्यांचा वाद किमान इ. स. १६६१ पर्यंत तरी चालूच होता.[१८२] अशा प्रकारे नेताजींनी केलेल्या या निवाड्यावरून शिवकालीन न्यायपद्धतीला अनुसरून त्यांनी नि:पक्षपातीपणे न्यायदान केले.लष्कराचे प्रमुखपद सांभाळत असतानाच प्रशासनाच्या या महत्त्वपूर्ण कार्यातही त्यांनी योगदान दिल्याचे दिसते.

### ५:९:१ नेताजींची मुद्रा :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व अधिकाऱ्यांच्या मुद्रा या मराठीत किंवा संस्कृतात आहेत. मात्र नेताजींची मुद्रा फार्सीत आहे. १६५७ पर्यंत शिवाजी महाराजांच्या हाताखाली शहाजीच्या पुण्याच्या परिसरातील मुकाशाचा कारभार पाहणारे जे अधिकारी होते त्यापैकी काहींच्या मुद्रा फार्सीत आहेत. परंतु ते अधिकारी शहाजीचे नोकर होते. त्यानंतरच्या काळात नेताजीचा अपवाद वगळता महाराजांच्या कोणाही अधिकाऱ्याची मुद्रा फार्सीत नाही.

## ५:१० नेताजीराजे पालकरांचा मृत्यु :

नेताजीचा मृत्यु नेमका कधी झाला याविषयी निश्चित माहिती उपलब्ध होवू शकत नाही. नेताजीविषयी कागदोपत्री शेवटची नोंद ११ जानेवारी १६९० ची आहे. या दिवशी नेताजींनी इंदापूर परगण्याच्या कारकूनाला पाठविलेले पत्र उपलब्ध आहे. या पत्रावरून

यावेळी इंदापूर परगण्याचा मुकासा नेताजींकडे होता हे स्पष्ट होते. पत्रामध्ये 'साहेबास (नेताजी पालकरास) मुकासा जाला आहे' असे म्हटले आहे.[१८३]

या पत्रामुळे छत्रपती संभाजीराजांच्या वधानंतर नेताजी पुन्हा मुघल मनसबदार झाले असावेत असे म्हटले जाते. परंतु त्यास इतरत्र पुरावा मिळत नाही. जानेवारी १६९० नंतरचा नेताजीविषयी कुठलाच संदर्भ उपलब्ध नसल्याने यानंतरच्या काळात नेताजींचा वृद्धापकाळामुळे मृत्यू झाला असावा.

नेताजी वृद्धापकाळात त्यांच्या मुलाकडे जहागिरीत तामसा येथे येवून राहिले आणि तेथेच त्यांचा मृत्यु झाला. नेताजींचे वंशजांना इ. स. १७५९ मध्ये अहमदशाह बादशहाच्या काळात जहागिरीचा परवाना (जुलूस ११६२ हिजरी) देण्यात आला होता. या परवान्याच्या शरेह दस्तखतमध्ये नेताजी पालकर (नेताजीचे नातू) असे म्हणतो की, ''तामसा ही जहागीर आमचे वडील व आजे यांना हजरत खुल्देमकान (औरंगजेब बादशहा) कडून मिळालेली आहे. आमचे वडील व आजे हे याच तामसा भूमीत मृत्यु पावले.''[१८४] तामसा येथील नदीच्या काठी पूर्वी पालकरांच्या समाधी, छत्र्या व काही स्मारके होती. ती पुढे स्थानिक मुसलमानांनी उध्वस्त केली. परंतु अद्यापही तेथे त्याचे अवशेष आहेत.

## ५:११ नेताजीचे वंशज :

नेताजींना नरसोजी व कर्णसिंग या नावाचे दोन पुत्र असल्याचे उल्लेख सापडतात. हे दोघेही सख्खे भाऊ होते. (हकीकी बिरादार) बादशहाने नेताजींना कैद करून दिल्लीला नेले. त्यावेळी त्याच्या एका मुलालाही कैद केले. त्यानंतर औरंगजेबाने नेताजींच्या कुटुंबियांनाही दिल्लीला पाठवून देण्याविषयी मिर्झाराजे जयसिंगाला हुकूम दिला. त्यानुसार नेताजींच्या दोन पत्नी व मुलांनाही दिल्लीला पाठविल्याचे उल्लेख सापडतात. या सर्वांनाच नेताजींबरोबर मुस्लिम धर्म स्वीकारण्याची सक्ती केली गेली. त्यांची एक पत्नी मात्र दक्षिणेतच राहिल्यामुळे हिंदू राहिली. इ. स. १६७६ मध्ये नेताजी स्वराज्यात माघारी आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडावर त्यांना विधिवत शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेतले. परंतु यावेळी नेताजींचे कुटुंबीय त्यांचेबरोबर होते की नाही याविषयी निश्चितपणे समजू शकत नाही. बहुधा यावेळी

नेताजींचे कुटुंबीय त्यांचेबरोबर नसावेत. नेताजीचे पुत्र किंवा त्यांच्या पत्नी त्यांच्याबरोबर असते तर त्यांचाही धर्मांतर विधी यावेळीच केला गेला असता. परंतु तसा उल्लेख कुठेही सापडत नाही. नेताजींची कुटुंबीय मंडळी ही नंतर दक्षिणेत आली असावीत. कारण इ.स.१६७९ मध्ये नेताजी राजे यांनी आपला पुत्र गोतात घ्यावयाबद्दल देशमुख व देशपांडे व गोत मेळविले होते. असा उल्लेख पसरणी महजरातील कागदपत्रात आढळतो. पसरणीच्या पाटील वतनाच्या विभाजनाचा दि. ६ एप्रिल १६७९ चा महजर उपलब्ध आहे. राजश्री नेताजी राजे यांच्या प्रमुख उपस्थितीत गोतसभेने हा महजर तयार केला आहे. ही गोतसभा प्रमुख्याने नेताजींनी आपल्या पुत्राची गोतपत करण्यासाठी म्हणजेच त्याला शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेणे यासाठी भरवली होती.[१८५]

नेताजींनी आपल्या मुलाची गोतपत करण्यासाठी गोतसभा भरविली असे जरी या कागदपत्रावरून स्पष्ट होत असले तरी हा मुलगा नेमका कोण? याचे उत्तर मिळू शकत नाही. मात्र पुढील काळात नेताजींची नरसोजी व कर्णसिंग ही दोन्ही मुले तामसा येथे हिंदू म्हणूनच नांदत होती. मिर्झाराजे जयसिंगाच्या मध्यस्थीने नेताजी पालकर १६६६ मध्ये जेव्हा मुघलांना मिळाले तेव्हा त्यांना मुघलांकडून मिळालेली तामसा (ता. हादगाव, जि. नांदेड) परगण्याची जहागीर ही कायम पालकरांकडेच वंशपरंपरेने राहिलेली दिसते. १७२८ पासून पुढील कालखंडातील दिल्लीच्या बादशहाने नेताजींच्या वंशजांना पाठविलेली वतनाची फर्माने व परवाने उपलब्ध आहेत व याच्यावरून स्पष्ट होते की, नेताजीचे वंशज छत्रपती शाहू महाराजांच्या काळात मुघल बादशहाची चाकरी करत होते. याकाळात छत्रपती शाहूराजे यांनीच मोगलांचे मांडलिकत्व स्वीकारले होते. मुघलांकडून मिळालेल्या जहागीरीचा उपभोग घेणाऱ्या नेताजीच्या वंशजांना मुघलांची चाकरी करणे क्रमप्राप्त होते.

सरनौबत नेताजीचे पुत्र नरसोजी यांच्या मुलाचे नाव नेताजी तर दुसरे पुत्र कर्णसिंह यांच्या मुलाचे नाव नरहरसिंग असे होते. म्हणजेच नेताजी व नरहरसिंग हे सरनौबत नेताजी पालकरांचे नातू होते. नेताजी व नरहरसिंग दोघेही शूर व लढवय्ये होते. नरहरसिंग निजामच्या (निजाम उल्मुक) सैन्याचा अधिकारी व निरनिराळ्या ठिकाणी फौजदार व आमीन होता.

त्याला व त्याचा वडील कर्णसिंगला १३०० स्वरांची मनसब होती. नरहरसिंग पुढे राक्षसभुवनच्या (मराठे व निजाम यांच्यातील) लढाईत मारला गेला. तर नेताजीने वृद्धापकाळात सरकारी चाकरीतून निवृत्ती घेतली.

हिजरी सन ११२४ (इ. स. १७५६) च्या बादशाही फर्मानात उल्लेख आहे की, ''तामसा परगण्यापैकी चार लाख तेरा हजार दाम जहागिरीच्या रूपाने नेताजीच्या जहागिरीचा तनखा म्हणून त्यांच्या वंशजांना मुकरर झाले आहेत. तनख्याच्या स्वरूपात ही जहागीर मुकरर झाली आहे. पुढे नरसोजी पालकर व कर्णसिंग पालकर यांच्या मृत्युनंतर तो तनखा त्यांचे पुत्र अनुक्रमे नेताजी पालकर व नरहरसिंग पालकर यांना देण्यात आला आहे.'' परंतु पुढील काळात पालकरांची जहागिरी कमी होवून तामसासह पाच गावे आणि पाच हजाराचा तनखा मनसब म्हणून राहिला. राजे नेताजी व राजे नरहरसिंग यांच्यानंतर त्यांचे पुत्र अनुक्रमे जानोजी व कर्णसिंग यांच्यात दोन हजार सातशे तनखा व २।। गावे एकाला आणि दोन हजार तीनशे तनखा व २।। गावे एकाला अशी वाटणी कागदोपत्री झाली होती. पुढे निजामाचा दिवाण सालारजंग याने पालकरांची जहागीर जप्त केली.

नागपूरकर भोसले व राजे पालकर यांचे पूर्वीपासून आप्तसंबंध होते. नागपूरचे राजे रघुजीराव भोसले (तिसरे) यांची भाची राजा राणोजीराव पालकर (सरनौबत नेताजींचे खापर पणतू) यांना दिली होती. नागपूरकर भोसल्यांचे मोगलाईतील कहदाणा, घासदाणा इत्यादी प्रकारचे वसुलीचे हक्क पालकर कुटुंबियांकडे होते. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात दख्खन सुभ्यातून चौथ व सरदेशमुखी वसुल करण्याचे हक्क मिळाले होते. ही वसुली करून मराठ्यांना देण्याचे काम निजामउल्मुक (दख्खनचा सुभेदार) याने पालकराकडे सोपविले होते.[१८६]

## ५:१२ समारोप :

मराठ्यांच्या इतिहासात एक पराक्रमी सेनापती म्हणून नेताजी पालकर यांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वकर्तबगारीने स्वराज्य उभे केले. या स्वराज्याचा विस्तार करण्याच्या कामी त्यांना सेनापती या नात्याने नेताजी पालकर यांनी

मोलाची साथ दिली. स्वराज्य उभे करण्याच्या कालखंडातच छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली स्वत:ची प्रशासन यंत्रणा उभी केली होती. त्यामध्ये लष्कराचे प्रमुखपद (सेनापती किंवा सरनौबत) हे लढवय्या व पराक्रमी व्यक्तीस दिले जात होते. अशा पदावर छत्रपती शिवाजी महाराजांनी नेताजीची निवड केली व ही निवड कशी योग्य होती हे नेताजी पालकरांनी पुढील काळात स्वकर्तबगारीने सिद्ध करून दाखविल्याचे दिसते.

इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच, डच कागदपत्रे, तत्कालीन मुस्लीम इतिहासकार, 'शिवभारत' हा संस्कृत ग्रंथ इत्यादी सर्व कागदपत्रातून नेताजींच्या पराक्रमाची वर्णने येतात. अफझलखान वध, पन्हाळ्याचा वेढा, शाहिस्तेखानावरील हल्ला, मुघल व आदिलशाही, सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशी स्वराज्य उभारणीच्या काळात शिवाजी महाराजांचा जो संघर्ष झाला, त्यात नेताजींनी महाराजांना बहुमोल साथ दिली. नेताजींची रणांगणावरील मर्दुमकी, साहस व शत्रुलाही दमछाक करणारी युद्धनिती पाहिल्यानंतर शिवाजी महाराजांनी त्यांना आपल्या लष्कराचे सरनौबत केले. राजामाता जिजाऊ साहेबांचे त्यांच्यावर मुलाप्रमाणे प्रेम होते. १६६६ पर्यंत नेताजीच्या जीवनाचा व पराक्रमाचा आलेख चढताच राहिलेला आहे. परंतु १६६६ च्या पुरंदर तहामुळे शिवाजीराजे व स्वराज्यावर काही काळ मर्यादा आल्या. मुघलांच्या विरूद्ध लढणाऱ्या शिवाजी महाराज व नेताजी यांना मुघलांच्या बाजूने लढावे लागले. विजापूरकरांच्या ताब्यात असलेला पन्हाळा जिंकून घेवून मुघलांना देण्यासाठी शिवाजीराजांना मोहिम काढावी लागली. पन्हाळ्याला वेढा घातला त्यावेळी नेताजी वेळेत पोहचू शकले नाहीत. हे निमित्त होवून शिवाजीराजांनी त्यांना सेनापतीपदावरून पायउतार केले. स्वाभिमानी वृत्तीच्या नेताजींना ते सहन न होवून ते आदिलशहाच्या सेवेत गेले आणि त्यांचे आयुष्य राजकीय चक्रीवादळात सापडले. अल्पकाळ आदिलशाहीत काढल्यानंतर आपली कर्तबगारी आणखी उंचाविण्यासाठी ते मुघलशाहीकडे गेले. मिर्झाराजे जयसिंगाच्या मनसबदारी, जहागिरी, मानमरातब या प्रलोभनाला फसून त्यांनी मुघल दरबारी सेवा पत्करली. या काळापासून त्यांच्या जीवनाचा दुसरा अध्याय सुरू झाला. दरम्यानच्या काळात शिवाजी महाराजांची आग्राभेट व सुटका हे प्रकरण घडून आले. शिवाजी महाराजांनी स्वत: कैदेतून

सुटका करून घेतल्याने सर्व मुघलशाहीत एकच हाहाकार उडाला. औरंगजेबाच्या क्रोधाला सीमा राहिली नाही. त्याने या घटनेचा सूड नेताजीवर घेतला. शिवाजीराजांशी मतभेद होवून व त्यांचा पक्ष सोडून ते औरंगजेबाच्या सेवेत येवूनही औरंगजेबाने आपला सर्व राग नेताजीवर काढला. हे नेताजींचे दुर्दैव होते. या दुसऱ्या कालखंडात मुघलांचा कैदी, धर्मांतराचा जाच, अवहेलना व सामाजिक नाचक्की नेताजींच्या वाट्याला आली.

मुघलांचा कैदी झाल्यानंतरच नेताजीला आपल्या कृतीचा पश्चाताप वाटू लागला होता. मुघल फौजेत मनसबदार होवून राहण्यापेक्षा स्वराज्यात साधा सैनिक म्हणून राहिलो असतो तरी बरे झाले असते, असे त्यांना वाटू लागले. स्वराज्यात येण्यासाठी त्यांचे मन धडपडू लागले. पण ते एवढे सोपे नव्हते. एक–दोन वेळा त्यांनी तसा प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्न फसल्यावर त्यांचा प्रचंड छळ झाला. अशी नऊ वर्षे निघून गेल्यावर आता नेताजी पक्का मुसलमान झाला आहे. मुघल फौजेत चांगला रूळला असे वाटल्याने त्याला औरंगजेबाने दिलेरखानाबरोबर गोवळकोंड्याच्या मोहिमेवर पाठविले. नेताजीने त्याचा फायदा घेवून रायगड गाठला व शिवाजी महाराजांची भेट घेतली व 'महाराज मला आपले म्हणा' अशी मागणी महाराजांकडे केली. त्या उदार मनाच्या राजाने नेताजीला आपल्या छातीशी धरले. आपला म्हणून स्वराज्यात पुन्हा रूजू करून घेतले. पुन्हा हिंदू करून घेतले. हा नेताजीचा पुनर्जन्म होता. नेताजीचे हिंदुकरण ही एक सामाजिक क्रांतीच होती. त्यातून शिवाजी महाराजांचे पुरोगामित्व सिद्ध झाले. नेताजी व शिवाजी महाराजांचे हृदयबंध किती भक्कम होते हे सर्व महाराष्ट्राला दिसून आले. नेताजीच्या आयुष्याचा सूर्यास्त स्वराज्यात झाला हे त्यांच्या दृष्टीने व सर्व स्वराज्यप्रेमी मराठी माणसाला समाधान देणारी घटना होती.

**संदर्भ :**


१. शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड २, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे, पुनेर्मुद्रण २००९, ले. २३२२, पृ. ७०९.

२. कुलकर्णी म. रा., महाराष्ट्रातील प्रसिद्ध सरदार घराणी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९, पृ. २०.

३. मुलाखत : श्री. काळभोर शंकर तुकाराम (खंडोबाची पाली), दि. ८–५–२०१२

४. फाटक न. र., खोबरेकर वि. गो. (संपा.), भारतीय इतिहास आणि संस्कृती, इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन, मुंबई, १९७६, पृ. ३३.

५. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, खंड १, भाग १, प्रकाशक ग. मा. मेहेंदळे, पुणे, १९९६, पृ. १०१४.

६. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, खंड १, भाग २, प्रकाशक ग. मा. मेहेंदळे, पुणे, १९९९, पृ. ११२२.

७. सासवडकर प्र. ल., छ. शिवाजी महाराज (लेखसंग्रह), सेवा प्रकाशन, अमरावती, १९८१, पृ. १०९.

८. सोवनी अविनाश (संपा.), ऐतिहासिक शकावल्या (शिवापूरकर देशपांडे वहीतील शकावली), शब्दवेध प्रकाशन, पुणे, १९९८, पृ. ७७.

९. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त, खंड १, भाग २, पृ. ११३६.

१०. तत्रैव, पृ. ११३६.

११. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्त संग्रह – खंड ३ (आलमगीरनामा), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४१, पृ. २९.

१२. बेंद्रे वा. सी., राणा जयसिंग आणि शिवाजी, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९६५, पृ. ७२.

१३. शिवकालीन पत्रसार संग्रह – खंड १, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण २००९, लेखांक १०७९, पृ. २९६.

१४. पुरंदरे कृष्णाजी वासुदेव (संपा.) शिवचरित्र साहित्य खंड १, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९२६, लेखांक ९२, पृ.

१५. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त, खंड १, भाग २, (टीप ५२०) पृ. ४२.

१६. तत्रैव, पृ. ७४०.

१७. पुरंदरे कृ. वा. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड ७, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३८, पृ. ६२.

१८. आपटे द. वि., दिवेकर स. म. (संपा.), शिवचरित्र प्रदिप (शिवापूरकर देशपांडे वहीतील शकावली), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९२५, पृ. ५६.

१९. कुलकर्णी अनुराधा गोविंद (संपा.), शिवछत्रपतींची पत्रे खंड १, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०११, पत्र क्र. ६९, पृ. २१३.

२०. दिवेकर स. म. (संपा.), कवींद्र परमानंदकृत श्री शिवभारत, स. म. दिवेकर, मुंबई, १९२७, अध्याय १८, श्लोक ४१, पृ. १८०.

२१. मेहेंदळे गजानन भास्कर, खंड १, भाग १, उपरोक्त, पृ. ९१२.

२२. हेरवाडकर र. वि. (संपा.), कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र, व्हिनस प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण २०००, पृ. ९.

२३. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली – करीना, डायमंड पब्लिकेशन्स् , पुणे, २००७, पृ. २७.

२४. हेरवाडकर र. वि., (संपा.), उपरोक्त, पृ. ११.

२५. तत्रैव, पृ. १३.

२६. तत्रैव

२७. दिवेकर स. म. (संपा.), श्रीशिवभारत, उपरोक्त, अध्याय १८, श्लोक ४१, पृ.१८०.

२८. तत्रैव, अध्याय २३, श्लोक १४, पृ. २२५.

२९. तत्रैव, अध्याय २३, श्लोक ८, पृ. २२४.

३०. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त, खंड १, भाग १, पृ. ९१८.

३१. दिवेकर स. म. (संपा.), श्रीशिवभारत, उपरोक्त, अ. २३, श्लो. ९ ते १२, पृ.२२४

३२. तत्रैव, अ. २३, श्लो. १३ ते २०, पृ. २२५

३३. देशमुख विजय, शककर्ते शिवराय (पूर्वार्ध), सन पब्लिकेशन्स्, पुणे, १९८६, पृ. ३३२.

३४. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २३, श्लो. २१, पृ. २२५.

३५. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. १९.

३६. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २२, श्लो. २ ते ५, पृ. २१२.

३७. पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन्स, कोल्हापूर, २००२, पृ. ८५.

३८. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड ३ (आलमगीरनामा), उपरोक्त, पृ. १९.

३९. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २३, श्लो. २२ व २३, पृ. २२७.

४०. तत्रैव, अ. २३, श्लो. ४७, पृ. २२९.

४१. तत्रैव, अ. २३, श्लो. ४४, पृ. २२९.

४२. काळे दि. वि, छत्रपति शिवाजी महाराज, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९७१ (तृतीय आवृत्ती), पृ. ८१.

४३. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २३, श्लो. ५२, पृ. २३०.

४४. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त, खंड १, भाग २ (टीप २१२), पृ. ५४४.

४५. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ३५.

४६. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड ३, (मुनतखबुल–लुबाव), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४१, पृ. ६५.

४७. दिवेकर स. म., उपरोक्त, अ. २३, श्लो. ४२ ते ४५, पृ. २२८.

४८. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. ८००, पृ. १७९.

४९. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ३६.

५०. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २४, श्लो. ३२ ते ४०, पृ. २३८.

५१. तत्रैव, अ. २४, श्लो. ४७ ते ६८, पृ. २४०.

५२. तत्रैव, अ. २४, श्लो. ७३, पृ. २४५.

५३. आपटे द. वि., दिवेकर स. म. (संपा.), शिवचरित्रप्रदिप (शिवापूरकर देशपांडे वहीतील शकावली), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९२५, पृ. ५७.

५४. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. ८००, पृ. १७९.

५५. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. १५, श्लो. २, पृ. १४७.

५६. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ३५.

५७. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २५, श्लो. ४ ते ९, पृ. २४९.

५८. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ३५.

५९. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २५, श्लो. ८, पृ. २४९.

६०. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त (खंड १, भाग २), पृ. १२६४.

६१. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ३७७.

६२. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २५, श्लो.१७–१८, पृ. २५०.

६३. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. ८१२, पृ. १८७.

६४. मेहेंदळे गजानन भास्कर, खंड १, उपरोक्त, पृ. ९४५.

६५. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. ८१२, पृ. १८४–८८.

६६. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. ८३९, पृ. १३६.

६७. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. ८१२, पृ. १८४–८८.

६८. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, उपरोक्त, पृ. २०.

६९. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २६, श्लो. ६–७ व २०, पृ.२५७ ते २५९.

७०. बेंद्रे वा. सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र (पूर्वार्ध), वा. सी. बेंद्रे, १९७२, पृ. २६४.

७१. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, उपरोक्त, पृ. २१.

७२. बेंद्रे वा. सी. उपरोक्त, पृ. ४३७.

७३. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, पृ. २६.

७४. काळे दि. वि., उपरोक्त, पृ. ८८.

७५. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २६, श्लो. १ ते १४, पृ. २५७.

७६. केळूसकर कृष्णराव अर्जुन, क्षत्रियकुलावंतस छ. शिवाजी महाराज यांचे चरित्र, प्रकाशक र. दा. यंदे, पुणे, तृ. आवृत्ती १९६५, पृ. २०३.

७७. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे (संपा.), मराठ्यांचा इतिहास (खंड १), कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४.

७८. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ४२०.

७९. सरकार जदुनाथ (अनु. श. गो. कोलारकर), औरंगजेब, डायमंड, पब्लिकेशन्स, पुणे, २००६, पृ. २०२.

८०. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, अ. २८, श्लो. ४८, ४९, पृ. २८३.

८१. तत्रैव, श्लो. ८९, पृ. २९०.

८२. तत्रैव, श्लो. ८९, पृ. २९०.

८३. तत्रैव, अ. २९, श्लो. ७, पृ. २९२.

८४. सरकार जदुनाथ, उपरोक्त, पृ. २०२.

८५. दिवेकर स. म. (संपा.), उपरोक्त, पृ. २९१ – २९८.

८६. तत्रैव, अ. २९, श्लोक ५३ – ६३, पृ. २९९.

८७. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ४३८, ४४५.

८८. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ४३.

८९. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतुमाधवराव पगडी खंड ३ (तारीखे दिल्कुशा) मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०, पृ. २१०.

९०. देशमख विजय (पूर्वार्ध), उपरोक्त, पृ. ४४६.

९१. केळुसकर कृष्णराव अर्जुन, उपरोक्त, पृ. २४६.

९२. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. ९२३, पृ. २२३.

९३. तत्रैव, ले. ९२७, पृ. २२५.

९४. देशमुख विजय (पूर्वार्ध), उपरोक्त, पृ. ४४८.

९५. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. ९२५, पृ. २२४.

९६. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ४१.

९७. तत्रैव, पृ. ४३.

९८. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले.९५९, पृ. २३७.

९९. तत्रैव, ले. ९४६, पृ. २३२.

१००. देशमुख विजय (उत्तरार्ध), उपरोक्त, पृ. ५२८.

१०१. मेहेंदळे गजानन भास्कर (खंड १, भाग २), उपरोक्त, पृ. १२५२.

१०२. केळूसकर कृ. अ., उपरोक्त, पृ. २७०.

१०३. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. १०११, पृ. २६७.

१०४. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्त संग्रह, खंड २, अलीनामा, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, पृ. ६६.

105. Balkrishna, Shivaji the great, Appendix – II, Modern Publisher, Delhi, 1985, P. 527.

१०६. तत्रैव, पृ. ५२७.

१०७. शिवकालीन पत्रसारसंग्रह (खंड १), उपरोक्त, ले. १०४१, पृ. २७८.

१०८. खरे ग. ह. (संपा.), खंड २, उपरोक्त, पृ. ६६.

१०९. शिवकालीन पत्रसार संग्रह खंड १, उपरोक्त, ले. १०१९, पृ. २७१.

११०. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ४९.

१११. शिवकालीन पत्रसार संग्रह खंड १, उपरोक्त, ले. १०१५, पृ. २६९.

११२. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३ (आलमगीरनामा), उपरोक्त, पृ. २७.

११३. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ. १२१.

११४. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३ (आलमगीरनामा), उपरोक्त, पृ. २७.

११५. तत्रैव, पृ. २९.

११६. खरे ग. ह. (संपा.) शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३ (मुन्तखबुल लुवाब), उपरोक्त, पृ. ७१.

११७. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. १०७६, पृ. २९४.

११८. जोशी द. प., जोशी उषा (संपा.), समग्र सेतुमाधवराव पगडी खंड २, (शिवचरित्र), मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०, पृ. ४७५.

११९. बेंद्रे वा. सी., राणा जयसिंग आणि शिवाजी, उपरोक्त, पृ. ३८.

१२०. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. १०७७, पृ. २९५.

१२१. बेंद्रे वा. सी., उपरोक्त, पृ. ४१.

१२२. तत्रैव, पृ. ५८.

१२३. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. १०७९, पृ. २९६.

१२४. तत्रैव.

१२५. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३ (आलमगीरनामा), उपरोक्त, पृ. ४३.

१२६. तत्रैव, पृ. ७४.

१२७. तत्रैव, पृ. ४४.

१२८. तत्रैव.

१२९. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. १०९९, पृ. ३०३.

१३०. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३ (मुन्तखबुल–लुबाब), उपरोक्त, पृ. ७४.

१३१. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३ (आलमगिरनामा), उपरोक्त, पृ. ४६.

१३२. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ. १३०.

१३३. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड २ (अलीनामा), उपरोक्त, पृ. ७२.

१३४. चौबळ ज. स. (अनु.), असे होते मोगल (स्टोरियो), महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती १९८२, पृ. १८२.

१३५. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. ११०५, पृ. ३०५.

१३६. बेंद्रे वा.सी., श्री. छ. शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, उपरोक्त, पृ. ५४२.

१३७. तत्रैव, पृ. ५४३.

१३८. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. ११२६, पृ. ३११.

१३९. बेंद्रे वा. सी., राणा जयसिंग आणि शिवाजी, उपरोक्त, पृ. ७२.

१४०. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३ (मुन्तखबुल–लुबाब), उपरोक्त, पृ. ७४.

१४१. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, उपरोक्त, ले. ११२६, पृ. ३११.

१४२. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ७२.

१४३. तत्रैव, टीपा, पृ. १२.

१४४. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, उपरोक्त, पृ. ७४.

१४५. कोलारकर श. गो. (अनु.), औरंगजेब, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००६, पृ. २४६.

१४६. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड २, उपरोक्त (तारीख–इ–अली), पृ. ४९.

१४७. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, उपरोक्त (मुन्तखबुल–लुबाब), पृ. ७६.

148. Sarkar Jadunath, Shivaji and his times, Orient Blacks Won Private Limited, New Delhi, Reprint 2011, P. 101.

१४९. शिवकथाकार विजयराव देशमुख कार्य गौरव समिती (संपा.), शिवविजय (शिवकालीन विदर्भ), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९२, पृ. १७३.

१५०. फाटक न. र., वि. गो. खोबरेकर (संपा.), भारतीय इतिहास आणि संस्कृती, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ३६.

१५१. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड ३, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण २००९, ले. २६९५, पृ. १०२.

१५२. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, उपरोक्त, पृ. ७९.

१५३. तत्रैव, (आलमगीरनामा), पृ. ६०.

१५४. तत्रैव, (मुन्तखबुल–लुबाब), पृ. ८१.

१५५. तत्रैव, (आलमगीरनामा), पृ. ४०.

१५६. तत्रैव, पृ. ६०.

१५७. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ६, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९७३, लेखांक २६, पृ. १८.

१५८. तत्रैव, ले. २७, पृ. १८.

१५९. देशमुख विजय, (उत्तरार्ध), उपरोक्त, पृ. ६९६.

१६०. फाटक न. र., वि. ग. खोबरेकर (संपा.), उपरोक्त, पृ. ३८.

१६१. चौबळ ज. स. (अनु.), उपरोक्त, पृ. २१४.

१६२. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ४३, पृ. २६.

१६३. तत्रैव, ले. ४९, पृ. २९.

१६४. तत्रैव, ले. ७४, पृ. ४३.

165. Sarkar Jadunath, House of Shivaji, P. 155.

१६६. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. १००, पृ. ५८.

१६७. चौबळ ज. स. (अनु.), उपरोक्त, पृ. २१४.

१६८. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, (मुन्तखबुल–लुबाब), पृ. ७८.

१६९. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ८३.

१७०. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. १८६३, पृ. ५५०.

१७१. जोशी श. ना. (संपा.), शिवचरित्रसाहित्य, खंड ८, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९४२, पृ. ८२.

१७२. गर्गे स. म. (संपा.), मराठी रियासत – खंड १ (शककर्ता शिवाजी), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु. पुनर्मुद्रण २०११, पृ. ३१६.

१७३. तत्रैव, पृ. ३०६.

१७४. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, उपरोक्त, ले. २२४, पृ. १२९.

१७५. आवळसकर शा. वि. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड १०, भारत इतिहास संशोधक मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ८६, पुणे, १९५३, पृ. ५६.

१७६. गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, ज्ञान विज्ञान विकास मंडळ, पुणे, १९७६, पृ. ९८.

१७७. तत्रैव, पृ. ४०७.

१७८. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, ले. ८५९, पृ. २०५.

१७९. हरदास बाळशास्त्री, पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी, खंड ४, प्रकाशक दाते श. रा., पुणे, १९६०, पृ. १६२.

१८०. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. ९५६, पृ. २३५.

१८१. जोशी श. ना. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड ८, उपरोक्त.

१८२. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. २३२२, पृ. ७०९.

१८३. जोशी श. ना., खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड ३, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३०, ले. ६६९, पृ. २५१.

१८४. फाटक न. र., खोबरेकर वि. गो. (संपा.), उपरोक्त, पृ.

१८५. जोशी श. ना. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड ८, उपरोक्त,

१८६. फाटक न. र., खोबरेकर वि. गो. (संपा.), उपरोक्त, पृ.

## प्रकरण सहावे

# सेनापती प्रतापराव गुजर

| | |
|---|---|
| **६:१** | **प्रस्तावना** |
| **६:२** | **प्रतापराव गुजर – पूर्ववृत्त** |
| ६:२:१ | सेनापतीपदापूर्वीची प्रतापराव गुजरांची कामगिरी |
| ६:२:१:१ | पन्हाळ्याच्या वेढ्याप्रसंगीची कामगिरी |
| ६:२:१:२ | संभाजी कावजीला शासन |
| ६:२:१:३ | मिर्झाराजे जयसिंगावर हल्ल्याचा अयशस्वी प्रयत्न |
| **६:३** | **सेनापतीपदाची (सरनौबत) प्राप्ती** |
| **६:४** | **स्वराज्यावरील संकट व सरनौबत प्रतापराव गुजर** |
| **६:५** | **मराठे–मुघल शांतता तह** |
| ६:५:१ | सरनौबत प्रतापराव मुघलांच्या छावणीत |
| ६:५:२ | मराठे–मुघल तह संपुष्टात |
| **६:६** | **मुघलांशी संघर्षाला सुरूवात** |
| ६:६:१ | प्रतापरावांचे आक्रमक धोरण |
| ६:६:२ | शहजादा मुअज्जम आणि दिलेरखान यांचे भांडण |
| ६:६:३ | प्रतापरावांनी मुंगी पैठण लुटले |
| ६:६:४ | दुसऱ्या सुरत लुटीत सहभाग |
| ६:६:४:१ | कांचनबारीची लढाई – प्रतापरावाचा पराक्रम |
| ६:६:५ | खानदेश व वऱ्हाडात लूटालूट |
| ६:६:५:१ | कारंजा शहराची लूट |
| ६:६:५:२ | मुघल मुलूखात चौथाईची अंमलबजावणी |
| ६:६:६ | साल्हेर किल्ला ताब्यात |
| ६:६:६:१ | प्रतापरावाची पावसाळ्यातील छावणी |
| ६:६:६:२ | साल्हेरी किल्ल्याला मुघलांचा वेढा |
| ६:६:६:३ | प्रतापरावांच्या मृत्युची अफवा |
| ६:६:६:४ | साल्हेरीचा रणसंग्राम |
| ६:६:७ | प्रतापरावांचे सुरतकरांना खंडणीचे पत्र |
| **६:७** | **सैन्य उभारणी** |
| **६:८** | **प्रतापरावांची आदिलशाही प्रदेशावरील स्वारी** |
| ६:८:१ | बहलोलखानाची शिवाजीराजाच्या बंदोबस्तासाठी नेमणूक |
| ६:८:२ | उमराणीचे युद्ध |
| ६:८:२:१ | पाण्याचे दुर्भिक्ष्य |
| ६:८:२:२ | प्रतापरावांचे औदार्य कि ऐतिहासिक चूक |
| ६:८:२:३ | महाराजांची नाराजी |
| ६:८:३ | हुबळी लूट |
| ६:८:४ | कर्नाटक स्वारी |
| ६:८:५ | नेसरीचे युद्ध – प्रतापरावांचा मृत्यु |
| **६:९** | **प्रतापरावांचे वंशज** |
| **६:१०** | **मुद्रा** |
| **६:११** | **समारोप** |

## प्रकरण सहावे

# सेनापती प्रतापराव गुजर

### ६:१ प्रस्तावना :

कुडतोजी उर्फ प्रतापराव गुजर हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील स्वराज्याच्या लष्कराचे तिसरे सेनापती होत. इ. स. १६६६ मध्ये नेताजी पालकरांना सरनौबतपदावरून दूर केल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी राजगड किल्ल्याचे किल्लेदार कुडतोजी गुजर यांची सरनौबतपदी नियुक्ती केली. याचवेळी महाराजांनी आपल्या या पराक्रमी सेवकास 'प्रतापराव' अशी पदवी दिली. सरनौबतपदी नियुक्ती होण्यापूर्वी अनेक प्रसंगात कुडतोजींनी आपल्या पराक्रमाचा प्रताप दाखवून दिलेला होता. महाराजांनी सोपविलेली अनेक कामे त्यांनी पार पाडली होती. त्यांचा पराक्रम, त्यांची कर्तबगारी आणि स्वराज्यनिष्ठा पाहूनच महाराजांनी प्रतापरावांना स्वराज्याचे सरनौबत केले होते. अशाप्रकारे एका सामान्य कुटुंबात जन्मलेले 'कुडतोजी गुजर' स्वकर्तबगारीने स्वराज्याचे 'सेनापती प्रतापराव गुजर' बनले.

इ. स. १६६६ मध्ये या पदावर नियुक्ती झाल्यापासून ते त्यांच्या इ. स. १६७४ मधील मृत्यूपर्यंत जवळजवळ आठ वर्षे प्रतापरावांनी सरनौबतपदाची जबाबदारी उत्तमरित्या पार पाडली. प्रतापरावांची सरनौबतपदी नियुक्ती झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना लवकरच औरंगजेबाच्या भेटीला आग्ग्राला जावे लागले. याकाळात मातोश्री जिजाबाईंच्या मार्गदर्शनाखाली स्वराज्याची चोख व्यवस्था ठेवण्याचे काम प्रतापरावांनी केले. आग्ग्राहून परतल्यानंतर महाराजांनी मोगलांशी शांततेचे धोरण स्वीकारून तह केला. या तहानुसार शंभूराजांना पंचहजारी मनसबदारी देण्यात येवून त्यांनी औरंगाबादला शहजाद्याकडे जावून चाकरी करावी असे ठरले. तहात ठरल्याप्रमाणे शंभूराजांचे प्रतिनिधी या नात्याने प्रतापराव औरंगाबादला मुघलांच्या छावणीत जवळजवळ दीड वर्षे होते.

इ. स. १६६९ मध्ये मराठे–मुघल तह संपुष्टात आला आणि मराठ्यांची मुघलांशी संघर्षाला सुरूवात झाली. शिवाजी महाराजांनी आक्रमक धोरण स्वीकारून पुरंदरच्या तहाने

मुघलांना दिलेले किल्ले व प्रदेश माघारी घेण्यास सुरूवात केली. या संघर्षाच्या काळात प्रतापरावांनी अनेक प्रसंगी आपल्या पराक्रमाचे व युद्धकौशल्याचे दर्शन घडविले. शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली सूरत, कारंजा व खानदेश, वऱ्हाडातून त्यांनी अगिणत लूट पैदा केली. सूरतेवरून लूट घेवून जाताना मुघलांशी झालेल्या कांचनबारीच्या लढाईत प्रतापरावांनी अप्रतिम पराक्रम गाजवला. महाराजांच्या अनुपस्थितीत झालेल्या साल्हेरीच्या युद्धात गनिमी कावा युद्ध पद्धतीचा वापर करून प्रतापरावांनी मुघलांची दाणादाण उडवून दिली.

मुघलांबरोबरचा संघर्ष सुरू असतानाच इ. स. १६७३ पासून मराठ्यांचा आदिलशाहीशी संघर्ष सुरू झाला. आदिलशहाचा बलाढ्य सेनापती बहलोलखान मराठ्यांवर चालून आला. त्याच्याशी उमराणी येथे झालेल्या युद्धात प्रतापरावांच्या अप्रतिम युद्धकौशल्याने बहलोलखानला दाती तृण धरून शरण यावे लागले. शरण आलेल्या बहलोलखानाला प्रतापरावांनी उदारपणे सोडून दिले आणि इथेच ते फसले. हाती आलेल्या शत्रूला सोडून दिल्यामुळे महाराज प्रतापरावांवर नाराज झाले. सोडून दिलेला बहलोलखान शिरजोर होवून पुन्हा स्वराज्यावर चालून आला. या कृतघ्न खानाचा बंदोबस्त करून महाराजांची नाराजी दूर करायची आणि मगच शिवराज्याभिषेकासाठी रायगडावर माघारी यायच असा निश्चय करूनच प्रतापराव मोहिमेवर गेले. परंतू दुर्दैवाने खानाशी लढताना नेसरी येथे २४ फेब्रुवारी १६७४ रोजी झालेल्या युद्धात प्रतापरावांना वीरमरण प्राप्त झाले. आपल्या हातून झालेल्या एका चुकीचे परिमार्जन करण्याच्या प्रयत्नात प्रतापरावांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. प्रतापरावांनी स्वराज्यासाठी दिलेले योगदान आणि त्यांचे हौतात्म्य मराठी माणसाच्या मनात कायमचे कोरले गेले आहे. त्यांनी स्वराज्यासाठी केलेल्या कार्याचा समग्र अभ्यास या ठिकाणी करण्यात आलेला आहे.

## ६:२ प्रतापराव गुजर – पूर्ववृत्त :

प्रतापराव गुजरांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील भोसरे हे होय. शिवकालखंडात हे गाव आदिलशाहीचे वर्चस्व असलेल्या खटाव परगण्यात समाविष्ट होते. आदिलशाहीच्या ताब्यात हा प्रदेश असल्याने येथील लोकांना आदिलशाही अधिकाऱ्यांचा त्रास

नेहमीच सहन करावा लागत असे. या त्रासाला कंटाळून भोसरे येथील गुजरांनी आपल्याकडे शस्त्रे व सैनिक ठेवलेले होते. गुजर घराण्याकडे भोसरे गावचे पाटीलकीचे वतन होते.[१] परंतु हे वतन त्यांना नेमके कधी मिळाले हे पुराव्याअभावी निश्चितपणे सांगता येत नाही. शिवजन्मापूर्वी इ. स. १६२५ ते १६२८ या कालखंडात खटाव परगणा आदिलशहाकडून शहाजी राजांना मुकासा म्हणून मिळाला होता.[२]

कुडतोजी उर्फ प्रतापरावांच्या वडिलांचे नाव अर्जोजीराव गुजर असे होते. अर्जोजीरावांना कुडतोजी व शिवाजी अशी दोन मुले होती.[३] कुडतोजींचा जन्म केव्हा झाला याची नोंद इतिहासात कुठे सापडत नाही. परंतु सध्याच्या रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील ताम्हाणे नावाच्या गावात कुडतोजींचा जन्म झाला. असा उल्लेख रायगड गॅझेटियरमध्ये आढळतो.[४]

समर्थ रामदास स्वामींचे शिष्य उद्धव स्वामी यांनी भोसरे गावी हनुमंताच्या पाषाण मूर्तीची प्रतिष्ठापना केली. पुढे हे भोसरे गावचे ग्रामदैवत बनले.[५] या मंदिराच्या शेजारीच गुजर यांचा वाडा असून त्याच ठिकाणी कुडतोजी यांच्या स्वराज्यकार्याचा श्रीगणेशा सुरू झाला असावा. कुडतोजी गुजर अनेक वीरासह महाराजांच्या घोडदळात सामील झाले. हे दगडावर कोरलेले चित्र आजही भोसरे येथील हनुमान मंदिर परिसरात पहावयास मिळते. त्याकाळात निरनिराळ्या खेड्यातून अनेक पराक्रमी वीर पुरुष स्वकर्तबगारीने पुढे येत असत व तत्त्कालीन आदिलशाही, निजामशाही, मुघलशाही इत्यादी सत्तांच्या सेवेत रूजू होत असत. सतराव्या शतकाच्या पाचव्या दशकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे कार्य सुरू केल्यानंतर कुडतोजी गुजर शिवाजी महाराजांच्या सेवेत गेले. महाराजांनी त्यांना सेवेत रूजू करून घेवून त्यांची राजगडचा किल्लेदार म्हणून नियुक्ती केली.[६] पुढील काळात आयुष्यभर कुडतोजी शिवाजी महाराजांच्या सेवेतच राहिले.

### ६:२:१ सेनापतीपदापूर्वीची प्रतापराव गुजरांची कामगिरी :

कुडतोजी गुजर छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेवेत दाखल झाल्यानंतर अनेक महत्त्वपूर्ण प्रसंगात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावलेली दिसते.

### ६:२:१:१ पन्हाळ्याचा वेढ्याप्रसंगीची कामगिरी (१६६०) :

छत्रपती शिवाजी महाराज १६६० मध्ये आदिलशाही सरदार सिद्धी जोहरने घातलेल्या पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकले होते. त्याप्रसंगी कुडतोजी गुजरही त्यांच्याबरोबर पन्हाळ्यावर होते. सिद्धीचा वेढा फोडण्यासाठी सरनौबत नेताजी पालकर सिद्धीच्या सैन्यावर बाहेरून हल्ल्यावर हल्ले चढवीत होते. परंतु नेताजींची फौज थोडी असल्यामुळे बाहेरून सिद्धीस शह देणे त्यांना शक्य झाले नाही. यावेळी किल्ल्यावर असलेल्या कुडतोजी गुजर यांनी रात्रीच्यावेळी किल्ल्यातून बाहेर पडून विजापूरी फौजेवर वारंवार हल्ले चढविले. कुडतोजीच्या अचानक केलेल्या हल्ल्यांमुळे विजापूरी फौजांची अतिशय हानी झाली.[७]

### ६:२:१:२ संभाजी कावजीला शासन :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदेशानुसार स्वराज्यद्रोही संभाजी कावजीला फितूरीचे शासन करण्याची कामगिरी कुडतोजींनी पार पाडली. संभाजी कावजी कोंढाळकर हा महाराजांचा एक जवळचा विश्वासू सहकारी होता. जावळी मोहिमेत त्याने मोठी कामगिरी केली होती. अफजलखान वधाच्यावेळी संभाजी कावजी महाराजांचा शरीर संरक्षक म्हणून त्यांच्याबरोबर होता.[८] त्यानेच अफजलखानाचे पालखीचे भोई खानाचा मृतदेह पालखीतून घेवून जात असता त्या भोयांचे पाय तोडून पालखी खाली पाडली व खानाचे शिर कापून घेतले होते. असा हा पराक्रमी आणि अतिशय ताकदवान असलेला संभाजी कावजी स्वराज्यद्रोह करून शाहिस्तेखानाला जावून मिळाला. शाहिस्तेखानाने आनंदाने त्याला आपल्या सेवेत घेवून ५०० स्वारांची मनसब दिली व मौजे मलकर येथील ठाण्यावर त्याची नेमणूक केली. या संभाजी कावजीला फितुरीचे शासन करण्याची जबाबदारी छत्रपती शिवाजी महाराजांनी कुडतोजी गुजरांवर सोपविली. कुडतोजीनी हल्ला करून ठाणे ताब्यात घेतले व संभाजीला ठार करून फितुरीबद्दल शासन केले.[९]

### ६:२:१:३ मिर्झाराजे जयसिंगावर हल्ल्याचा अयशस्वी प्रयत्न :

इ. स. १६६५ मध्ये मिर्झाराजे जयसिंगाच्या स्वारीच्या रूपाने स्वराज्यावर मोठेच संकट आले. या संकटावर मात करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी खुद्द जयसिंगालाच

ठार मारण्याची योजना आखली व बायकामुलांचा सांभाळ करून इनाम देवू असा करार करून ही जबाबदारी कुडतोजीवर सोपविण्यात आली. परंतु या कामगिरीत कुडतोजी अयशस्वी होवून पकडले गेले. तेव्हा मिर्झाराजे जयसिंगाने कुडतोजीला शिक्षा न करता उलट उत्तम घोडा देवून त्यांची शिवाजी राजाकडे रवानगी केली अशी हकीकत ९१ कलमी बखरीत सांगितली आहे. ९१ कलमी बखरींतील ४८ व्या कलमात म्हटले आहे की, ''त्याउपर मिरजा राजा किले सिंहगडास वेढा घातला. राजे राजगडाहून हशमी लोक पाठवून मोर्चे रात्रीस मारिले. जकिरा पाहिजे तो वरचेवर पोचविला. त्यानंतर प्रतापराव गुजर यांचे मुलाबाळांचा सांभाळ करणे याचा करार करून इनाम देवू केले आणि दगा करावयाशी मिरजा राजा याजकडे पाठविला. तो तेथे जावून त्याचे लष्करात जाणे येणे याचा राबता केला. हाती कटार मात्र असे. दुसरे हत्यार नाही. बेरोजगारी असे सांगून संपादणी करून रोजगाराचे निमित्त्ये नित्य मुजरेयासी जावू लगला. एके दिवशी महालात भिंतीचे समीप दिव्याचे अंधारात उभा राहिला. कटारी काढून मिरजा राजा यासी मारावे असा निश्चय करून चालून अंगावर आला. त्याची नजर बावरी पाहून सेवकांनी वरचेवर पाहून बाहेर काढून गचांड्या बुक्या देवून हैराण केला. कैद करून मिरजा राजा याजकडे आणिला. त्यास पुशिले तू कोणाचा कोण? कोणाकडून मारकरी आलास? ही खबर सांगणे जिवदान दिले जिवे मारित नाही. ऐसी भाक दिली त्याजवरून अभय जाणून बोलता जाहाला जे शिवाजी राजे यांनी तुम्हास मारावयासी आज्ञा करून पाठविले आहे. साहेब चाकरी समजोन जिवावर उदार होवून साहेबाकडे आलो. परंतु ईश्वर तुमच्या बऱ्यावर म्हणोन माझे हातून तुम्हास मृत्यु आला नाही. हे उत्तर ऐकून मिरजा राजा संतोष होवून शिरपाव देवून घोडा उत्तम देवून शिवाजीकडे रवाना केला. तो राजगडास येवून भेटला. राजे कृपावंत होवून पाठ थोपटून शाबासकी दिली वाचून आलास. आपणाकडूनही शिरपाव देवून संतोष केला.''[१०]

कुडतोजी गुजरांनी जयसिंगावर केलेल्या हल्ल्याची हकीकत फक्त ९१ कलमी बखरीतच आढळते. अन्य कोणत्याही कागदपत्रामध्ये आढळत नाही. त्यामुळे या प्रसंगाच्या विश्वसनीयतेबाबत शंका निर्माण होते.

## ६:३ सेनापतीपदाची (सरनौबत) प्राप्ती – १६६६ :

कुडतोजी गुजरांचा पराक्रम पाहून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांची नियुक्ती राजगडचा किल्लेदार म्हणून केली. राजगडसारख्या स्वराज्याची राजधानी असलेल्या महत्त्वपूर्ण किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी कुडतोजीवर सोपविण्यात आली होती. ही जबाबदारी उत्तमरित्या पार पाडल्यामुळे इ. स. १६६६ मध्ये त्यांना स्वराज्याचे 'सरनौबत' बनविण्यात आले. इ. स. १६६६ मध्ये नेताजी पालकरांना सरनौबत पदावरून काढून टाकल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी कुडतोजी गुजर यांना 'प्रतापराव' ही पदवी देवून त्यांची 'सरनौबत'पदी नियुक्ती केली. या घटनेचे वर्णन करताना कृष्णाजी अनंत सभासद म्हणतात, ''मग राजियानी नेताजी पालकर यास बोलावून आणिला आणि ''समयास कैसा पावला नाहीस?'' म्हणून शब्द लावून सरनौबती दूर करून, राजगडचा सरनौबत कुडतोजी गुजर म्हणून होता. त्याचे नाव दूर करून प्रतापराव नाव ठेविले आणि सरनौबती दिधली.''[११]

छत्रपती शिवाजी महाराजांनी कुडतोजींना सरनौबतपदाची वस्त्रे देताना त्यांचे साहस, शौर्य, पराक्रम, स्वराज्यावरील निष्ठा इत्यादी गुणांची पारख करूनच त्यांना 'सरनौबत' पदावर बढती दिली होती. याशिवाय आतापर्यंत त्यांनी एकनिष्ठेने केलेल्या स्वराज्य सेवेचेही ते फळ होते. मल्हारराव रामराव चिटणीस म्हणतात, ''..... राजगडी कुडतोजी गुजर किल्ल्याचे सरनौबत शाहाणे, शूर असून त्यांनी बहुत कामे केली होती. त्यास आणून, त्यांचे नाव प्रतापराव ऐसे ठेवून सरनौबती दिल्ही. दोही पातशाहीचा हिसाब न धरिता मर्दुमी करून, स्वारी शिकारी करून लढाई करणे, शहर मारणे, करू लागले. शाहाणे, कर्ते, मर्द, विश्वासू ऐसे झाले.''[१२]

चिटणीसांच्या म्हणण्यानुसार कुडतोजींनी स्वराज्याचे सरनौबत होण्यापूर्वीच बहुत कामे केली होती. त्याच्या या कर्तबगारीमुळेच छत्रपती शिवाजी राजांनी त्याला आपले सरनौबत केले होते आणि त्यांच्या पराक्रमाचा 'प्रताप' पाहून त्यांचे 'प्रतापराव' असे नामकरण केले होते. त्यामुळे कुडतोजी गुजर प्रतापराव या नावाने पुढील काळात ओळखले जावू लागले.

सभासद बखर व चिटणीस बखर या दोन्ही बखरीत प्रतापराव गुजराचे नाव कुडतोजी असेही होते. याविषयी ऐतिहासिक साधनात अनेक उल्लेख आढळतात. या व्यतिरिक्त एक महजर उपलब्ध असून त्यामध्ये प्रतापराव व कुडतोजी या दोन्ही नावांचा उल्लेख सापडतो. प्रतापराव सरनौबतपदी असतानाच इ. स. १६६८ मध्ये त्यांच्या उपस्थितीत शिरवळ येथील केदारेश्वराच्या मंदिरात एक महजर झाला. या महजरात सुरवातीला 'राजश्री कुडतोजी गुजर सभानायक' असा तर महजराच्या शेवटी 'प्रतापराऊ सरनौबत' असा उल्लेख आहे.[१३] इंग्रजी कागदपत्रात मुंबईहून सुरतेला २० जून १६७२ रोजी पाठविलेल्या पत्रात प्रतापरावांचा कुडतोजी असा उल्लेख आढळतो. दिलेरखान, बहादूरखान व महाबतखान यांनी पुणे घेतले आणि तेथे शिवाजीचा लेफ्टनंट कुडतोजी गुजर (Curtage Goodier) यास ठार मारले, अशा आशयाच्या या पत्रातील बातमी चुकीची होती. पण प्रतापरावांचे नाव कुडतोजी होते ही इंग्रजांना मिळालेली माहिती मात्र बरोबर होती.[१४]

प्रतापराव गुजरांना इ. स. १६६६ मध्ये सरनौबतपदाची प्राप्ती झाली. परंतु या घटनेची निश्चित तारीख मात्र कुठल्याही ऐतिहासिक साधनात उपलब्ध नाही. १६ जानेवारी १६६६ रोजी महाराजांनी पन्हाळ्यावर केलेल्या हल्ल्याच्या प्रसंगी महाराज व नेताजी यांच्यात बेबनाव होवून महाराजांनी नेताजीला सरनौबतपदावरून दूर केले आणि ५ मार्च १६६६ रोजी महाराज आग्र्याला रवाना झाले. आग्रा भेटीला जाण्यापूर्वी महाराजांनी रिक्त झालेल्या सरनौबतपदी कुडतोजींची नियुक्ती केली होती व स्वराज्याची उत्तम व्यवस्था लावलेली होती. म्हणजेच १६ जानेवारी १६६६ ते ५ मार्च १६६६ या दरम्यान सरनौबतपदी कुडतोजी उर्फ प्रतापरावांची नियुक्ती झाल्याचे दिसून येते.

## ६:४ स्वराज्यावरील संकट व सरनौबत प्रतापराव गुजर :

प्रतापराव गुजर सरनौबत झाले त्यावेळी स्वराज्य मोठ्या कठीण प्रसंगातून जात होते. नुकताच पुरंदरचा तह होवून २३ किल्ले व ४ लक्ष होनाचा मुलूख मुघलांना मिळाला होता. १२ किल्ले आणि १ लक्ष होनाचा मुलूख महाराजांकडे राहिला होता. पुरंदरच्या तहानंतर मिर्झाराजे जयसिंगाने आदिलशाहीविरूद्ध मोहिम सुरू केली होती. परंतु त्याची ही मोहीम

अयशस्वी होवून त्याला विजापूराहून माघार घ्यावी लागली. विजापूरकरांकडून झालेला पराभव ही मोगलांचे नीतिधैर्य खचविणारी घटना होती. अशा परिस्थितीत आदिलशहा, कुतूबशहा व शिवाजी मुघलांविरूद् एकत्र आले तर दक्षिणेतील मोगली फौजा मोठ्या अडचणीत सापडतील अशी भीती जयसिंगाला वाटू लागली. त्यामुळे त्याने महाराजांनी आग्र्यास जावे म्हणून मोठी मनधरणी केली आणि त्यात तो यशस्वी झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी बादशहाच्या भेटीसाठी आग्र्याला जाण्याचे मान्य गेले.

आग्र्याला जाण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याचा पक्का बंदोबस्त केला. आपल्यावर कसाही प्रसंग गुदरला तरी पाठीमागे सर्व गोष्टी सुरळित चालाव्यात यासाठी महाराजांनी स्वराज्याचा संपूर्ण अधिकार मातोश्री जिजाबाईकडे सोपविला. आपल्या गैरहजेरीत मातोश्री जिजाबाई यांच्या आज्ञेत राहून पेशवे मोरोपंत पिंगळे, सरनौबत प्रतापराव गुजर व मुजुमदार निळो सोनदेव यांच्या मंत्रीमंडळाने स्वराज्याचा राज्यकारभार करावा अशी व्यवस्था केली.[१५] पुरंदरच्या  तहानंतर जे काही स्वराज्य शिल्लक होते त्यातून महाराज हिंडले. गडांची पहाणी केली. आपल्या पश्चात गडकऱ्यांनी दक्षतेने गडांची राखण करावी आणि घालून दिलेल्या नियमानुसार सर्वांनी वागावे अशा आज्ञा दिल्या. मुलकी अधिकाऱ्यांनाही अशाच स्वरूपाच्या आज्ञा दिल्या आणि दि. ५ मार्च १६६६ रोजी सुमुहूर्तावर राजगडी सर्वांचा निरोप घेवून आग्र्याला जाण्यासाठी प्रस्थान केले.

छत्रपती शिवाजी महाराज दि. ११ मे १६६६ रोजी आपल्या निवडक लोकांसह आग्र्याला जावून पोहोचले आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी औरंगजेब बादशहाची भेट घेतली. त्यावेळी झालेल्या प्रसंगानंतर त्यांच्या नशिबी नजरकैद आली. अशा कठीण परिस्थितीतून त्यांनी मोठ्या कौशल्याने स्वत:ची सुटका करून घेतली आणि १२ सप्टेंबर १६६६ रोजी ते राजगडावर येवून पोहोचले.[१६] जवळजवळ सहा महिने महाराज स्वराज्यापासून दूर होते. याकाळात स्वराज्याचा सेनापती या नात्याने प्रतापराव गुजर मातोश्री जिजाबाईंच्या आज्ञेत राहून कार्य करत होते. पेशवे मोरोपंत व सरनौबत प्रतापराव यांनी स्वराज्याचा कडक बंदोबस्त ठेवला होता. महाराज कैदेत पडले व ते सुटण्याची शक्यता मावळली असतानाही

एकही किल्लेदार मोगलांना फितूर झाला नव्हता. सर्वांनी आपापली कामे मोठ्या दक्षतेने केली होती. महाराज परत आल्यावर त्यांना सर्व व्यवस्था पूर्वीपेक्षाही जास्त चांगली आढळली.[१७] महाराज जेव्हा आग्र्याच्या नजरकैदेत होते तेव्हा दख्खनचा सुभेदार मिर्झाराजे जयसिंग याने औरंगजेबाला पत्र पाठवून कळविले होते की, ''बादशहांनी शिवाजीला दख्खनमध्ये रवाना करावे. शिवाजीला कैदेत ठेवल्यामुळे किंवा ठार मारल्यामुळे आपला काहीही फायदा होणार नाही. तो एकटा नाहीसा झाल्याने मराठ्यांचे राज्य मोडेल अशातला प्रकार बिलकूल नाही, इतकी त्याची व्यवस्था इकडे परिपूर्ण झालेली आहे....''[१८] जयसिंगाचे हे पत्र शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत त्यांच्या अधिकारी वर्गाने स्वराज्याचा कसा चोख बंदोबस्त ठेवला होता हे सांगण्यास पुरेसे आहे.

## ६:५ मराठे – मुघल शांतता तह १६६८ :

आग्र्याहून सुटून आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या परिस्थितीत बराच बदल झाला होता. पुरंदरच्या तहाच्यावेळी महाराजांची जशी आगतिक स्थिती झाली होती तशी ती आता आग्र्याहून सुटून आल्यानंतर राहिली नव्हती. महाराजांच्या अनुपस्थितीत अनेक घडामोडी झाल्या होत्या. मिर्झाराजे जयसिंगला विजापूर घेण्यात अपयश आले होते. महाराजांच्या पलायनाचा दोष त्याच्या मुलावर आला होता त्यामुळे तो खचून गेला होता. असे असूनही महाराजांनी मात्र आपणहून मोगलांची कुरापत काढायची नाही असे ठरविले. आग्रा भेटीत त्यांच्या प्रकृतीवर ताण पडून ते आजारी पडले होते. दुसरे म्हणजे महाराजांना कोकणात आपली घडी नीट बसवायची होती. स्वराज्यातही सुव्यवस्था निर्माण करावयाची होती व त्यासाठी त्यांना मोगलांशी शत्रूत्त्व नको होते. म्हणून त्यांनी आपण व आपला पुत्र संभाजी राजे मोगल बादशहाची सेवा चाकरी करावयास तयार आहोत अशा अर्थाचा पत्रव्यवहार जयसिंगाशी व बादशहाशी चालू ठेवला.[१९] त्याचाच एक भाग म्हणून औरंगजेबाकडे शरणागतीचे एक पत्र त्यांनी आपल्या वकीलाबरोबर दिल्लीला रवाना केले. परंतु औरंगजेबाचा राग अजून शांत झालेला नसल्यामुळे त्याने महाराजांच्या वकिलास कैदेत डांबून ठेवले. अखेर ६ मे १६६७ रोजी बादशहाने आज्ञा केली की, ''सीवाच्या वकीलास बोलावून त्यास दिलासा

द्यावा व त्यास सांगावे की, स्वत:च्या मालकाकडे जावून त्यास कळव की, तुझे अपराध आम्ही माफ केले आहेत. तुझ्या मुलास चाकर ठेवून घेतले आहे. विजापूरी मुलूख काबीज करशील तो तुला देवू. स्वत:च्या मुलूखातच कायम असावे. तुझ्याकडे असलेला प्रत्येक महाल शहजाद्याकडे रूजू करावा.''[२०]

दरम्यान बादशहाची गैरमर्जी झाल्यामुळे जयसिंगाला दक्षिणेतून निघून येण्याचा हुकूम येवून दक्षिणेचा सुभेदार म्हणून शहजादा मुअज्जमची नेमणूक झाली होती. दिल्लीला जाताना वाटेतच बुऱ्हाणपूर येथे १४ ऑगस्ट १६६७ रोजी जयसिंगाचा मृत्यु झाला. तत्पूर्वीच मे महिन्यात दक्षिणेचा नवनियुक्त सुभेदार शहजादा मुअज्जम औरंगाबादला पोहोचला होता. जसवंतसिंग व दिलेरखान हे मुअज्जमचे मदतनीस होते. शहजादा मुअज्जम व जसवंतसिंह हे महाराजांना जयसिंगाहून अनुकूल होते.

छत्रपती शिवाजी महाराजांना काही काळ सर्व आघाड्यावर शांतता पाहिजेच होती. पण त्याचवेळी एक अडचणही त्यांना जाणवू लागली होती. पुरंदरच्या तहाने स्वराज्याचा आकार कमी झाल्यामुळे आर्थिक विवंचना प्रकर्षाने जाणवू लागली होती. अंतर्गत स्थैर्यासाठी त्यांनी आदिलशहाशी शांततेचा व सलोख्याचा तह केला. पण त्यामुळे लुटीचा मार्ग बंद होवून स्वराज्याच्या खजिन्यावर जबरदस्त ताण पडू लागला. परिणामस्वरूप महाराजांची आर्थिक कोंडी होवू लागली. यातून मार्ग काढण्यासाठी महाराजांनी शहजादा मुअज्जमला एक पत्र लिहून अर्ज केला की, ''मी मोगली साम्राज्याचा निष्ठावंत चाकर आहे. माझ्या मुलास बादशहाने पूर्वी पंचहजारी मनसबदारी दिली असली तरी तनख्यादाखल त्याला जहागिरी मात्र अजून दिलेली नाही. म्हणून मी विनंती करतो की, माझ्या अपराधाबद्दल क्षमा करण्यात यावी व शंभूराजांची (जप्त केलेली) पंचहजारी पुन्हा बहाल करण्यात येवून त्याबद्दल त्यांना जहागिरी मिळावी. हुकूम होईल त्याप्रमाणे कुठेही शाही चाकरी करण्यास मी तयार आहे.'' महाराजांकडून आलेला हा विनंती अर्ज अनुकूल शिफारसीसह शहजाद्याने दिल्लीला रवाना केला. शहजाद्याच्या शिफारशीनुसार औरंगजेबाने संभाजीस पंचहजारी मनसब देवून त्याने

शहजाद्याकडे जावून चाकरी करावी व जहागिरी दाखल त्यास मुलूख देण्यात यावा असा हुकूम सोडला.[२१] अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कुटनीतिला यश आले.

### ६:५:१ सरनौबत प्रतापराव मुघलांच्या छावणीत :

बादशाही हुकूमाची वार्ता राजगडावर पोहोचली आणि शंभूराजे कार्तिक शुद्ध द्वितीयेला म्हणजे दि. ९ ऑक्टोबर १६६७ रोजी राजगडावरून शहजाद्याकडे औरंगाबादला जाण्यासाठी निघाले. शंभूराजांचे वय यावेळी जेमतेम १० वर्षे ५ महिने एवढे होते. म्हणून महाराजांनी सरनौबत प्रतापराव गुजर यांना शंभूराजांचे मुतालिक म्हणून बरोबर पाठविले.[२२] १००० फौजेसह सरनौबत प्रतापराव गुजर शंभूराजांना घेवून २७ ऑक्टोबर १६६७ रोजी औरंगाबादला पोहोचले. दुसऱ्या दिवशी (दि.२८ ऑक्टोबर) शंभूराजे आणि जसवंतसिंग यांची भेट झाली. ४ नोव्हेंबर १६६७ रोजी शंभूराजांनी शहजादा मुअज्जम याची भेट घेतली. मुअज्जमने एक खास हत्ती आणि रत्नजडित तलवार भेट दिली. भेटीनंतर संभाजीराजांना पाच हजारी मनसबदार करण्यात आले. वऱ्हाड सुभ्यात आणि इतरत्र त्यांना १५ लक्ष होनांची जहागिरी देण्यात आली. संभाजीराजे वयाने लहान असल्यामुळे त्याला माझ्याकडे परत येण्यास निरोप द्यावा. तो बादशहाची सेवाचाकरी करण्यास योग्य झाला की त्याला आपल्या सेवेत पाठवीन अशी विनंती शिवाजी महाराजांनी केली होती. त्यामुळे मनसबदारीच्या तांत्रिक बाबी पूर्ण झाल्यानंतर संभाजीराजांना माघारी जाण्यास परवानगी देण्यात आली. त्यानुसार ५ नोव्हेंबर १६६७ रोजी शंभूराजासह प्रतापराव गुजर राजगडी जाण्यासाठी माघारी फिरले.[२३]

शंभूराजांना राजगडी पोहोचवून सरनौबत प्रतापरावांना त्यांचे नायब (प्रतिनिधी) म्हणून औरंगाबादला परत दाखल व्हायचे होते. निराजी रावजी महाराजांचे वकील म्हणून औरंगाबादला राहणार होते. याशिवाय राहुजी सोमनाथ व प्रल्हाद निराजी हेही औरंगाबादला जाणार होते. प्रल्हादपंत लष्करचे सबनीस म्हणून तर राहुजी जो मुलूख जहागिरी मिळेल त्याचे सुभेदार म्हणून महाराजांनी नियुक्त केले होते.[२४] त्याप्रमाणे ५ हजार सैन्यासह प्रतापराव गुजर ५ ऑगस्ट १६६८ रोजी औरंगाबादेस गेले. जेधे शकावलीत नोंद आहे की,

''शके १५९० कीलक संवछरे श्रावण श्रुध आष्टमी बुधवारी प्रतापराऊ व श्रावण श्रुध पंचमी रविवारी निराजी राहुजी स्वार होवून फौजेनिशी औरंगाबादेस गेले.''[२५]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नियोजनानुसार सरनौबत प्रतापराव गुजर निम्म्या सैन्यासह मोगल सुभेदाराच्या मदतीसाठी औरंगाबादेस राहिले. तर मिळालेली जहागिरी वऱ्हाडात दिली गेली असल्यामुळे त्यातील वसुलीसाठी राहुजी सोमनाथ निम्म्या सैन्यानिशी तेथे राहिला. मोगल दरबाराचे काम पाहण्यासाठी व मराठी राज्याबद्दल बोलणी करण्यासाठी निराजी रावजी या हुशार मुत्सद्याची मुअज्जमजवळ नेमणूक करण्यात आली. त्यामुळे तेही औरंगाबादेत राहिले. मुघलांच्या छावणीत जावून राहिल्यामुळे शिवाजीराजांच्या या तीनही सरदारांना मोगली राज्याचे स्वरूप जवळून पाहता आले.[२६] मोगलांची राज्यपद्धती, तिच्यातील बळकट तसेच दुबळा भाग, मोगली राज्याचा भूगोल, त्यातील वाटा, तिकडील श्रीमंत वर्ग याची त्यांनी अगदी बारकाईने मनात नोंद करून घेतली. त्याचा फायदा त्यांना पुढील काळात मुघलांशी संघर्ष करताना झाला.

सरनौबत प्रतापराव गुजर व निराजी पंत जवळजवळ १ वर्ष ५ महिने औरंगाबादेत होते. याकाळात त्यांनी शहजादा मुअज्जमला खूष करून त्याच्याशी स्नेह जुळविला. त्यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर शहजाद्याचे मैत्रीसंबंध निर्माण झाले. शिवचरित्रकार सभासद लिहितात, ''शहाचा व रजियाचा घरोबा बहुत चालिला. परस्परे वस्ताभावा (विविध वस्तू) धाडू (पाठवू) लागले.''[२७] महाराज व शहजादा यांच्यात मैत्रीसंबंध निर्माण करण्यात औरंगाबादेत रहात असलेल्या सरनौबत प्रतापरावांचा व निराजी रावजी यांचा महत्त्वपूर्ण सहभाग असणार हे उघड आहे. या मैत्रीमुळे निर्माण झालेल्या शांततेचा उपयोग करून छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली स्थिती भक्कम केली व पुढील लढ्यासाठी जय्यत तयारी करून ठेवली.

### ६:५:२ मराठे – मोगल तह संपुष्टात (डिसेंबर १६६९) :

छत्रपती शिवाजी महाराज व शहजादा मुअज्जम यांच्यामधील मैत्रीसंबंधामुळे औरंगजेब बादशहा अस्वस्थ झाला. आपल्या मुलाकडे सतत संशयी नजरेने पहाणाऱ्या

औरंगजेबाला मुअज्जम आणि शिवाजी यांच्यातील सख्य हा आपल्या सिंहासनाला निर्माण झालेला धोका आहे असे वाटू लागले. म्हणून त्याने महाराजांबरोबर झालेला तह उधळून लावण्याचे ठरविले. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून आपल्या हातून निसटून गेले हे शल्य त्याच्या जिव्हारी एवढे झोंबत होते की, महाराज नाहीत तर निदान त्यांचे जमतील तेवढे सहकारी तरी कैद व्हावेत असे त्याला वाटू लागले. त्यामुळे त्याने शहजाद्याला गुप्तपणे पत्र लिहून प्रतापराव व निराजी रावजी यांना कैद करावे असा हुकूम पाठविला.

या घटनेचे वर्णन करताना सभासद लिहितात, दिल्लीस औरंगजेबास शंका उत्पन्न झाली की, ''शाहाजादे व शिवाजी एक जाहाले. एखादे वक्ती फितवा होवून आपणास दगा करतील'' अशी कल्पना केली की, आता या उभयतात कज्या वाढवावा. म्हणून शाहास लिहिले की, ''शिवाजी हारामी आहे. त्याचा सरदार प्रतापराव व निराजीपंत हे दोघे फौजेनिशी आहेत. याकरिता त्यास पातेजो नये. एखादे वक्ती दौलताबादेस भेद करतील तरी तुम्ही त्या दोघास कैद करणे. त्यांची घोडी अवघी तबेल्यास लावणे. येविषयी रयात न करणे.''[२८]

औरंगजेबाच्या हुकूमाचा खलिता दिल्लीहून निघाल्याची बातमी शहजादा मुअज्जमच्या दरबारात असलेल्या वकीलाने मुअज्जमला तातडीने कळवून त्याला सावध केले. ही बातमी समजताच मुअज्जमने ताबडतोब प्रतापराव व निराजी रावजी यांना बोलावून बादशहाचा हुकूम येण्यापूर्वीच तुम्ही सैन्यासह इथून निघून जा असा सल्ला दिला. अन्यथा हुकूम आल्यावर आपल्याला त्यांना कैद करावे लागेल असा इशारा दिला. मुअज्जमच्या इशाऱ्यानुसार दुसऱ्याच रात्री सरनौबत प्रतापराव व निराजी रावजी २५०० फौजेसह औरंगाबादेतून निघून गेले. संभाजी राजांना मिळालेल्या वऱ्हाडातील जहागिरीचा कारभार पाहण्यासाठी राहुजी सोमनाथ २५०० फौजेसह होते. प्रतापरावांनी त्यांनाही तिथून निघून येण्याविषयी निरोप पाठविला. त्यानुसार सर्व फौज घेवून प्रतापराव सुरक्षितपणे स्वराज्यात परतले. मुघल प्रदेशातून परत येताना प्रतापरावांनी मुघलांच्या ठाण्यातून लाखो रुपयांची लूट करून बरोबर आणली. प्रतापरावांच्या पथकातील सैन्याने वऱ्हाड परगणा लुटला ही बातमी समजताच मुघल सैन्य पाठलागावर पाठविण्यात आले. पण मराठ्यांचा पत्ता लागला नाही.[२९]

प्रतापराव औरंगाबादेतून निघून गेल्यावर ८ दिवसांनी औरंगजेबाच्या हुकूमाचा खलिता येवून पोहोचला. मुअज्जमने उत्तर पाठविले की, हुकूमाप्रमाणे वर्तणूक करावी तर मराठे आठ दिवस अगोदर पळाले. कैद करायला विलंब नव्हता. त्याच्या साळसूद उत्तराचे पत्र औरंगजेबाला मिळाले, तेव्हा तो थक्क होवून इतकेच म्हणाला की, '' मराठे हरीफ (लबाड) बहुत आहेत.''[३०]

सभासद बखरीत औरंगजेबाचा हुकूम आल्यामुळे मुघल–मराठे यांच्यातील तह मोडला असे कारण सांगितले असले तरी याकाळात शहजादा मुअज्जमच्या छावणीत असलेला 'तारीखे–दिल्कुशां'चा लेखक भीमसेन सक्सेना मात्र तह मोडण्याचे वेगळेच कारण देतो. तो लिहितो शिवाजी आग्र्याला गेला त्यावेळी त्याला एक लाख रुपये देण्यात आले होते. त्याची भरपाई करून घेण्यासाठी म्हणून संभाजीला दिलेल्या जहागिरीतून काही महाल जप्त करण्यात आले. ही बातमी शिवाजीला कळाली तेव्हा त्याने औरंगबादेत सैन्यासह असलेल्या प्रतापरावांना माघारी बोलावले. त्याप्रमाणे डिसेंबर १६६९ मध्ये प्रतापराव सैन्य घेवून निघून गेले.[३१]

अशाप्रकारे मराठे व मुघल यांच्यातील तह १६६९ च्या उत्तरार्धात संपुष्टात आला. या घटनेची निश्चित तारीख उपलब्ध नसली तरी जेधे शकावलीत, ''शके १५९१ सौम्य संवछरे, पौष मासी मोगलांचा व शिवाजीराजे यांचा सला तुटला प्रतापराव आनंदराव फौजेनिशी औरंगाबादेस शहाजादीयाजवळ होते ते राजगडा आले.'' अशी नोंद आढळते.

सरनौबत प्रतपराव गुजर सर्व फौज व चीजवस्तू घेवून व शहजाद्याने गुप्तपणे दिलेला पुष्कळ नजराणा घेवून सुरक्षितपणे राजगडावर परत आल्याने महाराजांना आनंद वाटला. ते उद्‌गारले, ''दोन वर्षे लष्कराचे पोट भरले आणि शहजादा मित्र जोडला ही बरी गोष्ट झाली. आता मोगलाई मुलूख मारून खावयास वाव जाहला.''[३२] छत्रपती शिवाजी महाराजांनी आता पुढच्या चढाईची आखणी सुरू केली.

## ६:६ मुघलांशी संघर्षाला सुरूवात १६७० :

मुघल–मराठे यांच्यातील तह १६६९ च्या उत्तरार्धात संपुष्टात आला. हा तह मोडल्याबद्दल छत्रपती शिवाजी महाराजांना वाईट वाटले नाही. कारण त्यांना आता स्वस्थ बसून राहणे योग्य वाटत नव्हते. दोन वर्षाच्या शांततेचा फायदा घेवून महाराजांनी आपल्या राज्याची नीट व्यवस्था लावली होती आणि त्याबरोबरच आपली सैन्यशक्ती ही मोठ्या प्रमाणात वाढविली होती. त्यामुळे औरंगजेबाने तह उधळून लावताच महाराजांनीही मुघलां बरोबरचे मित्रत्वाचे संबंध तोडून टाकले आणि आपल्या आक्रमणाला जोमाने प्रारंभ केला.

मुघलांवरील आक्रमणाला प्रारंभ करण्यापूर्वी सरनौबत प्रतापरावांनी छत्रपती शिवाजी महाराजांची भेट घेतली. सभासद म्हणतात, ''प्रतापरावांची व राजियांची भेट जाहाली. पागा सजली. गनिमांची फौज आपले राज्यावर चालून आली त्यास मारून चालून मोंगल देश मारून धुंद उठविली.''[३३] प्रतापराव व महाराज यांच्यात या भेटीदरम्यान मुघलांवरील आक्रमणाच्या रणनीतीसंबंधी निश्चितच चर्चा झाली असावी.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या रणनीतीनुसार याकाळात मराठ्यांचे २० हजार सैन्य शत्रूच्या वऱ्हाड, खानदेश, बागलाण इत्यादी भागात धडक मारून लूटालूट करत होते. याचवेळी बाकीच्या सैन्याने पुरंदरच्या तहाने गमविलेले किल्ले परत घेण्यास सुरूवात केली होती. यावेळी सरनौबत प्रतापरावांकडे कुठल्या मोहिमेचे नेतृत्व सोपविले होते याविषयी निश्चित पुरावा उपलब्ध नाही तथापि छत्रपती शिवाजी महाराज आपले डोंगरी किल्ले परत मिळवण्यात गुंतले आहेत अशा आशयाचे मुंबईकर इंग्रजांनी सुरतकरांना पाठविलेले २९ मार्च १६७० चे एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रात म्हटले आहे, ''शिवाजी कोणाचाही विरोध न होता एकसारखा जिंकीत चालला आहे. त्याने मोगलापासून पुरंधर किल्ला घेतल्याची आज बातमी आली. कर्नाळा देखील फार दिवस टिकाव धरणार नाही .... शिवाजी सुरतेकडे गेला नसून आपले डोंगरी किल्ले परत मिळविण्यात गुंतला आहे असे वाटते.''[३४] इंग्रजांच्या या पत्रावरून स्वराज्यातील किल्ले मुघलांकडून परत घेण्याची मोहिम छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली सुरू होती असे म्हणता येईल. महाराजांच्या नेतृत्वाखाली मोरोपंत

पेशवे, निळोपंत मुजुमदार, आबाजीपंत सुरनिस इत्यादी मंडळी किल्ले ताब्यात घेण्यासाठी झटत होती. याचवेळी मराठ्यांची २० हजाराची फौज मोगल प्रदेशात धुमाकूळ घालत होती. तिचे नेतृत्व मराठा सैन्याचा सर्वोच्च अधिकारी सेनापती प्रतापराव गुजर यांच्याकडे असावे[३५] असे वाटते. प्रतापराव नुकतेच मुघलांच्या छावणीतून परतले होते. मुघलांच्या ताब्यातील प्रदेश, त्यातील वाटा, किल्ले, त्या प्रदेशातील व्यापार, श्रीमंत वर्ग याची त्यांना चांगलीच माहिती झाली होती. यामुळेही या मोहिमेचे नेतृत्व प्रतापरावांकडे दिले गेले असावे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या याकाळातील रणनीतीविषयी जदुनाथ सरकार आपल्या "Shivaji and his times", या ग्रंथात म्हणतात, "Shivaji opened his offensive with great vigour and immediate success. His roving bands looted Mughal territory and he attacked several of the forts."

**६:६:१ प्रतापरावांचे आक्रमक धोरण (१६७०) :**

सभासदाने म्हटल्याप्रमाणे प्रतापरावांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी खरोखरच मोगलदेशे धुंध उठविली होती (हाहाकार माजविणे), सीवाच्या फौजेने त्रस्त केल्यामुळे मोगली अधिकारी बादशहाकडे मदतीसाठी अर्ज करू लागले होते. २४ जानेवारी १६७० रोजी औरंगजेबाच्या दरबारात खानदेशाचा दिवाण मुहम्मद अश्रफ आणि औशाचा किल्लेदार बर्खुर्दारखान या दोघांचेही अर्ज आले होते. मुहम्मद अश्रफने लिहिले होते की, ''सीवाची फौज वऱ्हाडात येवून लुटालूट करीत होती'' तर बर्खूर्दारखानाने लिहिलेले होते, ''सीवाचे २० हजार स्वार व पायदळ या प्रांतात (औसा, जि. लातूर) येवून लुटालूट करीत आहेत व चौथ वसूल करीत आहेत ..... (ते) माझ्या जहागिरीतील सर्व वसूल लुटून नेऊन व तीत फार खराबी करून गेले. यामुळे माझ्या हाती काहीही आले नाही. माझी परिस्थिती बिकट आहे. तेव्हा आशा करितो की, ''माझ्यावर काही कृपा होईल.'' हे ऐकून औरंगजेबाने वैतागून हुकूम दिला की, ''उपर्युक्त कृपेस पात्र आहे. परंतु याजसारखे अनेक लोक आहेत. सर्व लोकांनी अशी विनंती केली तर कुणाकुणावर कृपा करावी? म्हणून मी कृपा करू शकत नाही.''[३६]

मराठी आक्रमणाच्या या पहिल्याच तडाख्याने औरंगजेब बादशहा गोंधळून गेला होता. मराठ्यांच्या बंदोबस्तासाठी जाण्यासाठी त्याने २० जानेवारी १६७० रोजी दाऊदखानास

हुकूम पाठविला होता. त्यापाठोपाठ १२ एप्रिल १६७० रोजी देवगडच्या मोहिमेवर गेलेल्या दिलेरखानास तातडीने शहजाद्याची भेट घेवून पुण्यास जावून छावणी करावी असा हुकूम औरंगजेबाने पाठविला.[३७] इकडे मराठ्यांची मोगली प्रदेशातील लुटालूट सुरूच होती. मार्च महिन्यात मराठ्यांनी चांदवड शहर लुटले. त्यात २ हत्ती,१२ घोडे, ४०००० रुपये मराठ्यांच्या हाती लागले. एप्रिल अखेरपर्यंत मराठ्यांनी परिंडा, अहमदनगर, जुन्नरजवळचे ५१ महाल लुटून फस्त केले. [३८]

अशाप्रकारे मराठा फौज मुघली प्रदेशात धुमाकूळ घालत असतानाच इकडे शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली मराठे सरदारांनी पुरंदरच्या तहाने मुघलांना दिलेले किल्ले परत घ्यायला सुरूवात केली होती. ४ फेब्रुवारी सिंहगड, ८ मार्चला पुरंदर, १५ मार्चला कल्याण, १३ मे ला लोहगड, १६ जूनला माहुली, २२ जूनला कर्नाळा, २८ जूनला रोहिडा हे महत्त्वाचे व त्याबरोबरच कोहोज, कुर्डूगड, प्रभावळगड इत्यादी लहान किल्ले जून अखेरपर्यंत स्वराज्यात दाखल झाले होते.

मराठ्यांच्या या झंझावातामुळे मुघली अधिकाऱ्यांची दुर्दशा होवून ते औरंगाबादला येवून पोहोचले असे वर्णन औरंगाबादला शहजाद्याच्या छावणीत असणाऱ्या भीमसेन सक्सेना याने आपल्या 'तारीखे दिल्कुशा' या ग्रंथात केले आहे. मराठ्यांबरोबरच्या या संघर्षात दाऊदखान कुरेशी या फक्त एकाच मोगल सरदाराने मोगलांची प्रतिष्ठा टिकवून धरण्याचा प्रयत्न केला. त्याने पारनेर व जुन्नर या मोगली ठाण्यावरचा ताबा आपल्याकडे ठेवण्यात यश मिळविले.[३९]

अशाप्रकारे आक्रमक धोरण स्वीकारून मराठ्यांच्या फौजांनी मोगलांची दाणादाण उडवली होती. यामध्ये सेनापती या नात्याने प्रतापराव गुजरांनी केलेले नेतृत्व व मार्गदर्शन अतिशय महत्त्वपूर्ण असे आहे.

### ६:६:२ शहजादा मुअज्जम आणि दिलेरखान यांचे भांडण :

मराठ्यांच्या आक्रमणाला चोख प्रत्युत्तर देण्याचे काम याकाळात मुघल सरदारांकडून झाले नाही. याचे एक कारण म्हणजे शहजादा व दिलेरखान यांच्यात सुरू झालेले भांडण हे होय. शहजादा व त्याचा सहकारी जसवंतसिंग यांच्यात गाढ मैत्री होती तर दिलेरखानाचे

जसवंतसिंगाशी बिनसलेले होते. स्वाभाविकच शहजाद्याची दिलेरखानावर खप्पा मर्जी होती. मराठ्यांच्या वाढत्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी औरंगजेबाने दिलेरखानाची मराठ्यांवरील मोहिमेसाठी नेमणूक केली व औरंगाबादला जावून शहजाद्याला भेटावे असा हुकूम दिला. याचवेळी मोहिमेसाठी लागणारा सरंजाम शहजादा मुअज्जमने त्याला द्यावा अशी त्याला आज्ञा केली. परंतु दिलेरखानाला शहजाद्याच्या भेटीत आपल्याला दगाफटका होईल अशी भीती वाटल्यामुळे त्याने भेट घेण्याचे टाळले. या अपमानामुळे चिडून शहजाद्याने दिलेरखानाने बंड पुकारले असल्याची बादशहाकडे तक्रार केली. याउलट दिलेरखानाने शहजाद्याचे शिवाजीशी अंत:स्थ सूत जुळले असल्याची तक्रार बादशहाकडे केली.[४०] मुघलांच्या या दुफळीचा फायदा घेवून प्रतापरावांनी मुंगी पैठण लुटले.

### ६:६:४ प्रतापरावांनी मुंगी पैठण लुटले (ऑगस्ट १६७०) :

दिलेरखानाचे शहजादा मुअज्जमशी भांडण सुरू असतानाच इकडे प्रतापराव गुजरांनी मुघलांच्या ताब्यातील मुंगी पैठण येथे लुटालूट सुरू केली. ही बातमी समजताच दिलेरखानाने गोदावरी नदी ओलांडून प्रतापरावांचा पाठलाग सुरू केला. हा पाठलाग सुरू असतानाच दिलेरखानाला बातमी समजली की, शहजादा मुअज्जमने त्याच्या उद्धटपणाची तक्रार बादशहाकडे केल्यामुळे बादशहाने त्याला शिक्षा करण्याचे फर्मान शहजाद्याकडे पाठविले आहे. ही बातमी समजताच घाबरलेल्या दिलेरखानाने प्रतापरावाच्या पाठलागाचे काम सोडून ताबडतोब उत्तरेकडे पलायनाला सुरूवात केली. त्याचा पाठलाग करीत शहजादा मुअज्जम व जसवंतसिंगही ऑगस्ट १६७० मध्ये उत्तरेकडे निघून गेले.[४१]

### ६:६:४ दुसऱ्या सुरत लुटीत सहभाग (ऑक्टोबर १६७०) :

शहजादा मुअज्जम व दिलेरखान यांच्यातील भांडणाचा छत्रपती शिवाजी महाराजांनी जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. इ. स. १६७० चा पावसाळा संपल्यानंतर त्यांनी दुसऱ्यांदा सुरतेची लूट करण्याचे ठरविले. जेधे शकावलीत नोंद आहे की, ''शके १५९२ साधारण संवछरे, कार्तिक सुध प्रतिपदेस सुरतेस जावून शाहार लुटिले.'' सप्टेंबरमध्येच कल्याणला येवून महाराजांनी सैन्याची जमवाजमव केली व सुरतच्या दिशेने कूच केली.

यावेळी सरनौबत प्रतापराव गुजरही त्यांच्याबरोबर होते. सभासद बखरीत म्हटले आहे की, ''तो इतक्यात सुरतेहून पाळती बहिरजी जासूद आला की, ''सुरत मारिल्याने अगणित द्रव्य सापडेल'' असे सांगितले. त्याजवरून राजियांनी विचार केला, ''लष्कर चाकरी नफरी, काम मनाजोगे होणार नाही. याजकरिता जावे तरि खासा लष्कर घेवून जावे ... आणि प्रतापराव सरनौबत व वेकांजी दत्तो व मकाजी आनंदराव व वरकड सरदार दहा हजार पागा व दहा हजार शिलेदार असे वीस हजार जमाव लष्कर, तसेच सात–पाच हजार मावळे लोक निवडक ..... असे बरोबर घेतले.'' सभासदाने सैन्याचा आकडा फुगवून सांगितलेला आहे. परंतु महाराजांबरोबर १५ हजार सैन्य होते असे प्रत्यक्षदर्शी इंग्रजांनी कंपनीला पाठविलेल्या २० नोव्हेंबर १६७० च्या पत्रात म्हटले आहे. ३ ऑक्टोबरला सकाळीच महाराजांनी सुरतेवर हल्ला चढविला. यावेळी सुरतेला औरंगजेबाने संरक्षक तटबंदी केलेली होती. महाराज तटबंदीजवळ येताच मुघल सैन्याने थोडाफार प्रतिकार केला. परंतु त्यांची संख्या फक्त ३०० होती. महाराजांच्या सैन्यापुढे टिकाव न लागल्याने त्यांनी पळ काढला. मराठी फौज शहरात घुसली आणि सतत तीन दिवस त्यांनी शहर लुटून जाळून टाकले. महाराजांनी युरोपीय व्यापाऱ्यांना त्रास दिला नाही. तिसरे दिवशी त्यांनी सुरत सोडली. जाताना मुख्य अधिकारी आणि प्रमुख व्यापारी यांना पत्र पाठवून 'दरसाल १२ लक्ष रुपये न द्याल तर पुन: पुढच्या वर्षी येवून राहिलेला शहराचा भाग जाळून टाकीन' अशी धमकी त्यांनी दिली.[४२] सुरतेच्या या लुटीत महाराजांना ६६ लाख रुपये मिळाले. त्यापैकी प्रत्यक्ष सुरतेत ५३ लाख रुपयांची तर नवल साहू, हरि साहू यांच्याकडून व शेजारील एका खेड्यातून १३ लाख रुपयांची लूट मिळाली.[४३] महाराजांची ही सुरत स्वारी यशस्वी करण्यात सरनौबत प्रतापरावांचेही योगदान होते.

### ६:६:४:१ कांचनबारीची लढाई (१७ ऑक्टोबर १६७०) प्रतापरावांचा पराक्रम :

सुरतेहून महाराज पेठ बागलाणमार्गे मुल्हेरकडे निघाले. साल्हेर–मुल्हेर वरून चांदवडास जावून तेथून कंचनमंचन घाटाने कोकणात उतरण्याचा शिवाजी महाराजांचा विचार होता. यावेळेपर्यंत शहजादा मुअज्जम व दिलेरखानाचे भांडण मिटून मुअज्जम सप्टेंबरअखेर

औरंगाबादला आला होता. सुरतलुटीची वार्ता समजताच त्याने खानदेशचा सुभेदार दाऊदखान कुरेशी याला महाराजांची वाट अडवण्यासाठी पाठविले. यावेळी दाऊदखानासोबत पंचहजारी मनसबदार इखलासखान भियाना, रायमकरंद खत्री, संग्रामखान घोरी, भान पुरोहित, गालिबखान इत्यादी सरदार होते. इतिहासकार भीमसेन सक्सेना हा दाऊदखानाचा अधिकारी म्हणून या मोहिमेत दाऊदखानाच्या बरोबर होता. दाऊदखानाचा तळ वैजापूरजवळ (जि. औरंगाबाद) असतानाच हरकाऱ्यांनी बातमी दिली की, शिवाजी सुरत लुटून परत चालला आहे. तेव्हा दाऊदखानाने आपले बाजारबुणगे औरंगाबादेस रवाना केले व तो सड्या सैन्यानिशी पुढे रवाना झाला.[४४]

इकडे सुरतेहून निघालेले छत्रपती शिवाजी महाराज बागलाणातील मुल्हेरच्या किल्ल्याजवळ आले. सुरत लुटीच्यावेळी त्यांच्याबरोबर असलेले सरनौबत प्रतापराव, मकाजी आनंदराव, व्यंकोजी दत्तो इत्यादी सरदार व सैन्य याही लढाईत त्यांच्याबरोबर होते. महाराजांनी मुल्हेर किल्ल्याखालची पेठ लुटली. मुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान याने दाऊदखानाला कळविले की, ''शिवाजीने मुल्हेर येथील पेठ लुटली असून तो तावडीत सापडण्यासारखा आहे.'' ही बातमी समजताच दाऊदखान महाराजांना आडविण्यासाठी चांदवडला रवाना झाला.[४५] इकडे महाराजांनाही मोगलांची फौज येत आहे ही बातमी समजली त्याबरोबर त्यांनी मुल्हेर सोडून तातडीने कूच केले. नाशिक जिल्ह्यातील चांदवडच्या पश्चिमेस १० मैलावर असलेला कंचनमंचनचा घाट (बारी) उतरून मोगली सैन्य तेथे येण्यापूर्वीच निसटून जाण्याचा त्यांचा विचार होता.

१६ ऑक्टोबर १६७० रोजी सायंकाळी दाऊदखान चांदवडला पोहोचला. मध्यरात्री शिवाजीने घाट पार केलेला आहे आणि आपल्या अर्ध्या सैन्यासह तो नाशिकला जाणाऱ्या रस्त्याने घोडदौड करीत आहे आणि त्याचे अर्धे सैन्य घाट वर चढून येणाऱ्या सैनिकांना मदत करण्याकरिता खिंड धरून उभे आहे अशी बातमी समजताच खानाने ताबडतोब कूच केले. खानाने आपल्याला गाठल्याचे लक्षात येताच मराठे सैन्यही युद्धासाठी सज्ज झाले. मुघल सैन्याच्या आघाडीला इखलासखान भियाना हा तरुण सरदार होता. तो कांचनबारीच्या

घाटमाथ्यावर पहाटे पोहोचला. तेव्हा त्याला मराठ्यांचे सैन्य सुसज्ज असलेले दिसले. यावेळी दाऊदखानाच्या सैन्याची वाट चुकल्यामुळे तो अजून मागेच होता. परंतु तो येण्याची वाट न पाहता इखलासखानाने मराठ्यांवर हल्ला चढविला.[४६] दाऊदखान चालून येतोय हे कळाल्यावर महाराजांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला. सुरतेहून आणलेल्या लूटीचा खजिना त्यांच्याबरोबर होता. खजिन्यासह पळून जाणे शक्य नव्हते व सर्व सामग्री बरोबर घेवून युद्ध करणे अतिशय धोक्याचे होते. त्यामुळे महाराजांनी सैन्याच्या एका तुकडीबरोबर आणलेली लूट पुढे पाठवून दिली व आपण खानाशी लढण्याची तयारी केली.[४७]

१७ ऑक्टोबर १६७० रोजी पहाटे इखलासखान मियाना याने मराठा सैन्यावर हल्ला चढविला. हा हल्ला मराठ्यांच्या पिछाडीवर झाला होता. त्या ठिकाणी मराठा सैन्याची संख्या अदमासे १०००० होती आणि त्याचे नेतृत्व प्रतापराव गुजर, व्यंकोजी दत्तो आणि मकाजी आनंदराव ह्यासारख्या अनुभवी सेनापतींकडे होते.[४८] ह्या हल्ल्यात इखलासखान लवकरच जखमी झाला आणि घोड्यावरून खाली कोसळला. इतक्यात दाऊदखान तेथे येवून पोहोचला. त्याने ताबडतोब इतर सरदारांना इखलासखानाच्या मदतीला पाठविले. तो स्वत:ही चालून गेला. जखमी होऊन जमिनीवर पडलेल्या इखलासखानाला त्याने बाजूला घेतले आणि तो स्वत: मराठ्यांशी लढू लागला. पण अल्पावधीतच तो चारही बाजूंनी कोंडला गेला. मराठे मोगल सैन्याच्या भोवती घिरट्या घालून हल्ले करू लागले. (याला बरगीगीरी म्हणतात) यानंतर अनेक तास भीषण व रक्तमय लढाई लढली गेली.

दुपारी लढाई मंदावली. संध्याकाळ होताच मराठ्यांनी पुन्हा हल्ला चढविला व मुघलांची दारूण अवस्था केली. इखलासखान भियाना, संग्रामखान घोरी, दाऊदखानाचा बक्षी अब्दुल्गाबूद इत्यादी सरदार जखमी झाले. अनेक मुघल सैनिक मारले गेले व जखमी झाले. यानंतर मराठ्यांनी माघार घेतली व ते कोकणात निघून गेले.[४९]

इतिहासात वणी–दिंडोरीची लढाई म्हणून प्रसिद्ध असलेली पण प्रत्यक्षात कंचन–मंचन घाटमाथ्यावर झालेली ही लढाई शके १५९२ साधारण नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध चतुर्दशी म्हणजे सोमवार दिनांक १७ ऑक्टोबर १६७० रोजी झाली.[५०]

कांचनबारीच्या या युद्धातील सरनौबत प्रतापराव व इतर सरदारांच्या पराक्रमाचे वर्णन करताना सभासद म्हणतात, '' राजियांनी आपली फौज पुढे करून पाठीवर आपण खासा राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व व्यंकोजी दत्तो व आनंदराव वरकड सरदार पुढे होवून मोठी कत्तल केली आणि मोगल मारून मुरदे पाडिले. दोन प्रहर युद्ध झाले. मराठे यांनी शर्त केली.'' छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मुघलांशी पहिल्यांदाच समोरासमोर झालेल्या या युद्धात सरनौबत प्रतापराव गुजर यांनी अप्रतिम पराक्रम गाजविला. मराठ्यांचा विजय झाला. महाराजांची वाट अडविण्यास आलेल्या दाऊदखानाला नमवून सुरतेची लूट सुरक्षितपणे स्वराज्यात पोहचविण्यात मराठे यशस्वी झाले.

### ६:६:५ खानदेश व वऱ्हाडात लूटालूट (नोव्हेंबर १६७०) :

सुरतेची लूट सुरक्षितपणे स्वराज्यात रवाना झाल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी सरनौबत प्रतापराव गुजरांसह नोव्हेंबर १६७० मध्ये खानदेशात स्वारी केली. आतापर्यंत महाराजांनी मुघलांना स्वराज्यातून हाकलून लावले होते. आता आपल्या प्रदेशाचे रक्षण करण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे शत्रूच्या इलाख्यात युद्ध चालू ठेवून त्यांना त्यातच गुंतवून ठेवणे. या रणनीतीला अनुसरून महाराजांनी मुघल प्रदेशात आक्रमण केले.

कांचनबारीच्या युद्धात सपाटून मार खाल्लेला दाऊदखान कुरेशी यानंतर एक महिना नाशिक येथे तळ देवून होता. त्यानंतर तो अहमदनगरला निघून गेला होता. मराठे प्रथम बागलाणात घुसले. वणीपासून जाणाऱ्या घाटमार्गावर असलेले अहिवंतगड, रवळा, जवळा व मार्कंडा हे ४ किल्ले जिंकून घेतले.[५१] व मराठा फौज खानदेशची राजधानी असलेल्या बुऱ्हाणपूरावर चालून गेली. दाऊदखानाचा पुत्र हमीदखान हा आपल्या वडीलातर्फे नायब म्हणून तेथे काम करत होता. मराठे बुऱ्हाणपूरावर चालून येत आहेत हे समजताच त्याने आपल्या वडिलांना पत्र पाठवून मदतीसाठी बोलाविले. परंतु दाऊदखान मदतीला येण्यापूर्वीच मराठा सैन्याने बहादूरपूरा हे बुऱ्हाणपूरचे उपनगर लुटले. मुलाच्या मदतीसाठी निघालेल्या दाऊदखानाला रस्त्यातच समजले की, मराठे बुऱ्हाणपूरावरून निघून बागलाणाकडे वळले आहेत. त्यामुळे दाऊदखानही मराठ्यांच्या पाठलागावर निघाला.[५२]

### ६:६:५:१ कारंजा शहराची लूट (नोव्हेंबर–डिसेंबर १६७०) :

छत्रपती शिवाजी महाराजांनी आता वऱ्हाडात लूट करण्याची योजना आखली. दाऊदखानाला चकविण्यासाठी महाराजांनी आपल्या सैन्याची विभागणी दोन तुकड्यामध्ये केली. एक तुकडी मोरोपंत पेशव्यांच्या नेतृत्वाखाली बागलाणात धुमाकूळ घालू लागली. याचवेळी स्वत: महाराज प्रतापराव गुजरासह वऱ्हाडातील श्रीमंत शहर असलेल्या कारंजावर येवून धडकले. जेधे शकावलीत नोंद आहे की, ''शके १५९२, साधारण संवछरे, मार्गशीर्ष मासी कारंजीयास गेले. (डिसेंबर १६७०) जाता अहिवंत व रवला ज(व)ला व मारकडा हे गड काबीज केले.'' लाडाचे कारंजे या नावानेही ओळखल्या जाणाऱ्या या शहरात धनाढ्य लोकांचे मोठमोठे वाडे, दुकाने, पेढ्या होत्या. कारंज्याच्या अपार संपत्तीच्या बातम्या या अगोदरच महाराजांना समजल्या होत्या. संभाजीराजांचे प्रतिनिधी म्हणून औरंगाबादला असतानाच सरनौबत प्रतापरावांना वऱ्हाडातील जहागिरीत राहणाऱ्या राहुजी सोमनाथकडून या मुलखाची विशेषत: कारंजा शहराच्या संपत्तीविषयी माहिती मिळाली असावी. महाराज कारंजाला येवून तीन दिवस राहिले. महाराजांच्या मार्गदर्शनाखाली प्रतापरावांनी शहराची पूर्णपणे लूट केली. प्रतापरावांनी शहरातील मोठ्या व्यापाऱ्यांना कैद केले. एक श्रीमंत व्यक्ती स्त्रीवेष करून पळून गेला. या ठिकाणी मोठमोठ्या वाड्यातून प्रचंड संपत्ती पुरलेली होती. ती खणती लावून काढण्यात आली.[५३] दाऊदखान मराठ्यांच्या पाठलागावर बागलाणात गेलेला असल्यामुळे महाराजांना निश्चिंतपणे शहर लुटता आले.

कारंजा शहरात महाराजांना अगणित लूट मिळाली. मोगल सैन्यातील गोलंदाज जॉन ट्रॉटर याने सुरतेच्या इंग्रज प्रेसिडेंटला २० डिसेंबर १६७० रोजी लिहिलेल्या पत्रात या लुटीविषयी माहिती दिली आहे. तो म्हणतो, ''शिवाजीने वऱ्हाडचे मुख्य शहर कारंजा लुटले. तेथून उत्तम कापड, सोने, रूपे, इत्यादी १ कोटीचा माल त्याने ४००० बैल व गाढवे यावर लादून नेला. इतरत्रही पुष्कळ लूट केली. सर्वात जास्त लूट त्याने राजपुत्राच्या जहागिरीत केली.''[५४]

कारंजाप्रमाणे इतरही शहरात मराठ्यांना भरपूर लूट सापडली. वऱ्हाडात अर्ध्या शतकापेक्षा जास्त काळ शांतता आणि संपन्नता नांदत असल्याने संपत्तीचा संचय मोठ्या प्रमाणात झाला होता. ही संपत्ती मराठ्यांच्या हाती सापडली.

**६:६:५:२ मुघल मुलुखात चौथाईची अंमलबजावणी :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापरावासह मुघल मुलुखात काढलेल्या या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे याच मोहिमेत महाराजांनी मोगल मुलुखात पहिल्यांदा चौथाई बसविली व प्रतापरावांनी तिची अंमलबजावणी सुरू केली.[५५] यावेळी महाराजांनी सर्व प्रांतातून चौथाई वसूल करण्याचा हुकूम जाहीर केला. सरनौबत प्रतापरावांनी या हुकूमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली. त्यांनी गावोगावच्या पाटील कुलकर्ण्याकडून असे लेखी ठराव करून घेतले की, ''मोगल सरकारास जो वार्षिक वसूल द्यावयाचा त्याचा चौथा हिस्सा (चौथाई) शिवाजी महाराजांना किंवा त्यांच्या अंमलदारांना दरवर्षी देत जावू.'' एवढेच नव्हे तर प्रतापरावांनी ही चौथाई दरवर्षी दिल्यास त्यांच्या गावाची लूट होण्याची भीती उरणार नाही असे आश्वासन गाव प्रमुखांना दिले, आणि ज्या गावांनी वसूल दिला त्यांना पावत्या लिहून देण्याची वहिवाट पाडली. त्यामुळे जे पावती दाखवतील त्यांना मराठ्यांकडून पुन्हा त्रास दिला जाणार नाही अशी व्यवस्था करण्यात आली.[५६] याविषयी सुरत वखारीतील इंग्रज अधिकारी मास्टर हा आपल्या १९ डिसेंबर १६७० च्या पत्रात लिहितो, ''कारंजा सधन आहे ते त्याने (शिवाजीने) लुटले व तेथील सर्व लोकांना धरून नेले. .. जाताना शिवाजीने नद्रांबादचे व आसपासचे सर्वांकडून वसुलाची चौथाई आपल्याला भरण्याबद्दल लिहून घेतले आहे.''[५७]

वरील पत्रावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघल प्रदेशात चौथाई लागू केली हे स्पष्ट होते. याबरोबरच चौथाईची वसूली करून प्रतापराव गावोगावच्या पाटील–कुलकर्ण्यांना त्याची पोहोचपावतीही देत होते ही माहिती स्पष्ट करणारे प्रतापरावांचेच एक पत्र नुकतेच उपलब्ध झाले आहे.[५८] हे पत्र पुढीलप्रमाणे –

२६ रमजान, सं. १०७१ २८ जानेवारी १६७१

अज सुभा राजश्री प्रतापराव सरनौबत ताा मोकदमानी मौजे वणकुटे ताा आडी पारनेर सुा इहिदे सर्बेन अलफ अज गुजदी मौजे माा पैकी जमा माहाल कोठी बाा जमा हाा बाो बापूजी कुलकर्णी मौजे माा सजगुरे कोठी मापे खंडी १/१ येकून माहाल मापे बारुले साडे दाहा सेरी मापे खंडी १ येक खंडी रास जमा जाले छ २७ रमजान मोर्तबसुद.

सरनौबत प्रतापरावांनी मौजे वणकुटे येथील मोकदमांना (पाटीलांना) पाठविलेले हे पत्र म्हणजे त्यांनी दिलेल्या खंडणीची पोहोच आहे. पारनेर परगण्यातील मौजे वणकुटे येथील बापूजी कुलकर्णी यांचेकडून १ खंडी बाजरी (सजगुरे) जमा झाली अशी पोहोच प्रतापरावांनी गावच्या पाटलांना पत्राद्वारे दिली आहे. पारनेर परगणा हा अहमदनगरच्या जवळ असलेला परगणा मुघलांच्या ताब्यात आहे. या परगण्यातून १ खंडी धान्य वसूल केले याचा अर्थ ते शत्रूच्या मुलुखातून वसूल केले असा होतो. म्हणजेच ती वसुली ही खंडणी आहे आणि म्हणूनच तिची पोहोचपावती महसुली अधिकाऱ्याने न देता सेनाधिकाऱ्याने दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज मुघल मुलुखातून खंडणीची मागणी करीत असत आणि जी गावे त्यांना खंडणी देत अशा गावांना ते लुटीत नसत. शिवाजी महाराजांच्या या धोरणानुसार सरनौबत प्रतापरावांनी वणकुटे गावच्या पाटलांकडे खंडणीची मागणी केली असावी आणि पाटलांनीही सामोपचाराचा मार्ग स्वीकारून खंडणी दिलेली दिसते. अर्थात दिलेल्या खंडणीची पावती पाटलांनी मागितली असावी कारण मराठ्यांच्या फौजा टोळ्याटोळ्यांनी शत्रूच्या मुलुखात लूट करत. अशी दुसरी एखादी टोळी जर त्या गावावर परत आली तर आम्ही यापूर्वी खंडणी दिलेली आहे हे दाखवून द्यायला पाटलाला ती पावती उपयोगी पडली असती. याशिवाय मुघलांच्या ज्या प्रदेशातून मराठे खंडणी वसूल करीत त्या प्रदेशातील लोकांना पुन्हा मुघल जहागिरदारांना महसूल देणे शक्य होत नसे. त्यामुळे लूट झालेल्या प्रदेशातील लोकांना महसूलात सूट देणे मुघल जहागिरदारांना भागच होते. जेव्हा जहागिरदाराचे अधिकारी महसूल मागायला येतील तेव्हा प्रतापरावांचे हे पत्र पुरावा म्हणून पाटलाला उपयोगी पडले असते.

शिवकालखंडामध्ये परमुलुखाची लूट, चौथाई हे हिंदवी स्वराज्याच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन होते. मोगल व विजापूरकर यांच्यापासून आपल्या मुलुखाचे रक्षण करण्यासाठी आपल्याला फौज बाळगावी लागते. तिच्या खर्चापोटी ही वसुली करणे आपणास भाग आहे असे रास्त समर्थन महाराजांनी या चौथाई संदर्भात केलेले आहे. महाराजांच्या या ध्येयधोरणाला अनुसरूनच त्यांचे प्रतापरावासारखे सेनानी सतत शत्रूच्या मुलुखात स्वाऱ्या करून चौथाई, लूट जमा करत असलेले दिसतात. शत्रूप्रदेशाची लूट करणे हे स्वराज्य रक्षणासाठी अपरिहार्य होते.

**६:६:६ साल्हेर किल्ला ताब्यात (५ जानेवारी १६७१) :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली सरनौबत प्रतापराव गुजर वऱ्हाडात लूट करत होते त्याचवेळी मराठ्यांचे दुसरे सरदार मोरोपंत पिंगळे बागलाणात हल्ले चढवीत होते. त्यांनी त्रिंबकगड ताब्यात घेतला होता. लवकरच ही दोन्ही सैन्ये एकत्र येवून त्यांनी साल्हेर किल्ल्याला वेढा घातला. रस्त्यात त्यांनी मुल्हेरगड उर्फ औरंगगड किल्ल्याची पेठ लुटली. मराठ्यांचे २० हजार सैन्य किल्ल्याला वेढा देवून बसले होते.[५९] एकेदिवशी किल्ल्यातील शिबंदीच्या पहाऱ्यात थोडी ढिलाई आलेली पाहून मराठ्यांनी शिड्या लावून किल्ल्यावर सैन्य चढविले व किल्ल्यात प्रवेश मिळविला. किल्लेदार फतहुल्लाहखान पहिल्याच झटापटीत ठार झाला. तेव्हा त्याच्या मेहुण्याने (बायकोचा भाऊ) वाटाघाटी करून ५ जानेवारी १६७१ रोजी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात देवून टाकला. यावेळी खानदेशचा सुभेदार दाऊदखान कुरेशी मराठ्यांना अडविण्यासाठी धावून आला. परंतु तो साल्हेरच्या वाटेवर असतानाच त्याला कळले की मराठ्यांनी साल्हेरचा किल्ला घेतला. त्यामुळे तो मुल्हेरला माघारी गेला.

१६७०–७१ च्या या संघर्षात मराठ्यांनी एक मुल्हेर सोडता बागलाणातील जवळजवळ सर्व किल्ले घेतले होते. मराठे त्या भागात ठाण मांडून बसले होते. त्यांच्या गनिमी टोळ्यांनी नेकनामखानाचा (बागलाणाचा फौजदार) धान्यपुरवठा बंद पाडला होता. अशा प्रकारे शिवाजी महाराजंच्या रणनीतीला अनुसरून या काळात मराठ्यांनी आक्रमक अशी भूमिका घेतली व मुघल प्रदेशात घुसून त्यांना सळो की पळो करून सोडले होते.

### ६:६:६:१ प्रतापरावांची पावसाळ्यातील छावणी (१६७१) :

१६७१ चा पावसाळा सुरू होण्यापूर्वी प्रतापराव फौजेसह स्वराज्यात परतले. पावसाळ्याचे चार महिने सैन्याच्या हालचाली शक्यतो होत नसत. यावर्षी प्रतापरावांच्या सैन्याची छावणी कोठे होती ते ठिकाण निश्चितपणे माहित नसले तरी हे ठिकाण जावळीच्या आसपास असावे. २४ जुलै १६७१ चे छत्रपती शिवाजी महाराजांचे एक पत्र उपलब्ध असून हे पत्र महाराजांनी जावळीचा सुभेदार विठ्ठल दत्तो याला लिहिले आहे. या पत्रासोबत महाराजांनी दहा हजार रुपयांचा ऐवज सरनौबत प्रतापरावांसाठी पाठविला होता. हा ऐवज विश्वासू माणसाबरोबर ताबडतोब प्रतापरावांकडे पोहोचवण्याची व्यवस्था करावी असा आदेश महाराजांनी सुभेदारास दिला आहे.[६१] शिवकाळात पावसाळ्याचे चार महिने सैन्याची छावणी एखाद्या ठिकाणी पडत असे तेथेच सैन्याची राहण्याची व्यवस्था केली जात असे. या सैन्याच्या खर्चासाठी किंवा पगारासाठी महाराजांनी हे पैसे प्रतापरावांना जावळीच्या परिसरातील छावणीत पाठविलेले दिसतात.

### ६:६:६:२ साल्हेरी किल्ल्याला मुघलांचा वेढा :

दक्षिणेकडील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून औरंगजेबाने दक्षिणेच्या मोहिमेचा प्रमुख म्हणून महाबतखानाची नेमणूक केली. १६७१ च्या जानेवारी महिन्याच्या शेवटी तो चांदोरनजीक दाऊदखानाला जावून सामील झाला आणि त्या दोघांनी मिळून मराठ्यांनी नुकताच जिंकून घेतलेला अहिवंतगड जिंकून घेतला. परंतु या विजयाच्या श्रेयावरून दाऊदखान व महाबतखान यांच्यात संघर्ष सुरू झाला. त्यामुळे त्यांच्यातील सहकार्य संपून महाबतखान नाशिकला जावून तीन महिने राहिला तर दाऊदखानाला उत्तरेत बोलविण्यात आले. महाबतखानाला या स्वारीत विशेष लाभ न झाल्याने आणि बरेच दिवस तो नुसता स्वस्थ बसल्याने त्याने शिवाजीशी गुप्त हातमिळवणी केली असावी असा संशय बादशहाला येवू लागला. त्यामुळे १६७१ च्या सप्टेंबर महिन्यात महाबतखानाचीही तडकाफडकी बदली करण्यात आली. त्याच्या जागी गुजराथचा सुभेदार बहादुरखान कोकलताश याची नियुक्ती करण्यात आली. त्याच्याबरोबर दिलेरखान व कुत्बउद्दीनखान यांनाही दख्खनच्या कामगिरीवर

रूजू होण्याचा हुकूम झाला. बादशहाच्या आज्ञेप्रमाणे बहादूरखानाने जून १६७१ मध्ये साल्हेरच्या किल्ल्याला वेढा दिला.[६२]

**६:६:६:३ प्रतापरावांच्या मृत्यूची अफवा :**

बहादूरखान व दिलेरखान किल्ल्याला वेढा देवून स्वस्थ बसले नाहीत. वेढ्याचे काम इखलासखान मियाना, अमरसिंह चंद्रावत इत्यादी अधिकाऱ्याकडे सोपवून दोघेही स्वराज्यावर चालून गेले.[६३] बहादुरखान अहमदनगरवरून सुपे प्रांतावर चालून गेला तर दिलेरखानाने नाशिकमार्गे जावून पुण्यावर हल्ला चढविला. आपल्या गनिमी तुकड्यांच्या मदतीने दिलेरखानाने डिसेंबर १६७१ मध्ये पुण्याचा ताबा मिळविला आणि त्याठिकाणी नऊ वर्षे वयाच्यावर जी माणसे होती त्या सर्वांची कत्तल केली. दिलेरखानाने पुण्यावर केलेल्या या हल्ल्यात सरनौबत प्रतापराव ठार झाले अशी अफवा त्यावेळी पसरली होती. मुंबईकर इंग्रज सुरतकरांना २० जानेवारी १६७२ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतात, ''त्याने (शिवाजीने) झाडून सगळे किल्ल्यावरील शिबंदी एकत्र करून मोठे सैन्य जमा केले आहे. दिलेरखानाला परतावून लावण्याचा तो प्रयत्न करून पाहणार आहे. दिलेरखान, बहादूरखान व मोहबतखान यांनी पुणे, चाकण घेतले. शिवाजीचा सेनापती कुडतोजी गुजर याचा वध केला व सर्वत्र तरवार व आग चालविली. तेथून त्यांना हुसकावून लावण्याचा त्याचा विचार आहे.''[६४] मुंबईकर इंग्रजांना जरी प्रतापवराच्या वधाची बातमी कळाली असली तरी ती अफवाच होती. प्रत्यक्षात प्रतापराव मुघल प्रदेशात मोहिमेवर गेले होते.

**६:६:६:४ साल्हेरीचा रणसंग्राम (फेब्रुवारी १६७२) :**

मोगलांनी साल्हेरचा किल्ला वेढल्याचे वृत्त कळताच महाराजांनी त्वरेने मुघल प्रदेशात मोहिमेवर गेलेल्या प्रतापरावांना पत्र पाठवून साल्हेरला जावून वेढा देवून बसलेल्या मुघल सैन्यावर छापा टाकण्यास सांगितले. याचवेळी मोरोपंतांनाही बरीच मोठी फौज देवून रायगडावरून साल्हेरीस रवाना केले.

कृष्णाजी अनंत सभासद लिहितात, ''राजियांनी प्रतापराव सरनौबत लष्कर देवून मोगलाईत पाठविले होते. त्यास पत्रे व जासूद पाठविले की, तुम्ही लष्कर घेवून सिताबीने

वरघाट सालेरीस जावून बेलोलखानावरी छापा घालून बेलोलखान मारून चालवणे आणि कोकणातून मोरोपंत पेशवे यास हशमानिशी रवाना केले. हे इकडून येतील आणि तुम्ही वरघाटी कोकणातून येणे; असे दुतर्फा चालून घेवून गनीमास मारून गर्दीस मिळविणे.''

सभासदाने मुघल सरदार बेलोलखानने वेढा दिला होता असे म्हटले आहे. हा बेलोलखान (बहलोलखान) म्हणजे विजापूरी सरदार बहलोलखानाचा चुलता अब्दुल महंमद हा होय. १६६५ मध्ये तो मुघलांना जावून मिळाला होता. १६६९ मध्ये त्याला 'इखलासखान' ही पदवी मिळाली.[६५] याच इखलासखानाकडे साल्हेरीच्या वेढ्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. प्रतापराव व मोरोपंतांनी दोन्ही बाजूंनी हल्ला चढवून साल्हेरीला वेढा देवून बसलेल्या मुघल सैन्याची दाणादाण उडवून द्यावी अशी महाराजांची योजना होती. महाराजांच्या आदेशाप्रमाणे प्रतापराव मुघल सैन्यावर चालून गेले. प्रतापरावांची फौज साल्हेरकडे येत आहे हे पाहून तिला रोखण्यासाठी इखलासखानाने आपली फौज पाठविली. या फौजेने मोठ्या आवेशाने प्रतापरावाच्या फौजेवर हल्ला चढविला. तेव्हा त्यांच्याशी काही काळ युद्ध करून प्रतापरावांनी आपल्या सैन्यास पळण्याचा इशारा केला. त्याबरोबर प्रतावरावांचे सैन्य उलटे पळू लागले. हे पाहून मोगल सैन्याने विजयाच्या आनंदात त्यांचा पाठलाग सुरू केला. हा पाठलाग करताना मुघल सैन्य विखुरले गेले आणि अचानक प्रतापरावांनी आपल्या सैन्याला उलटे फिरून मुघल सैन्यावर आक्रमण करण्याचा इशारा दिला. त्याबरोबर ते एकत्र येवून शत्रूवर तुटून पडले. याचवेळी मोरोपंतही ससैन्य त्याठिकाणी आले. दोन्हीही सैन्यांनी मुघल सैन्याचा पुरता फडशा उडविला.[६६]

साल्हेरीचे हे युद्ध १६७२ च्या जानेवारी महिन्याच्या शेवटी किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घडून आले.[६७] या युद्धात मुघलांचा पराभव होवून त्यांची प्रचंड हानी झाली. या युद्धाचे रोचक वर्णन सभासदाने केले आहे. ''मोठे युद्ध जाहाले. चार प्रहर दिवस युद्ध जाहाले... युद्ध होताच पृथ्वीचा धुराळा असा उडाला की, तीन कोश औरस चौरस आपले व परके माणूस दिसत नव्हते. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहाले. घोडी, उंट, हत्ती (यास) गणना नाही. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताचे चिखल जाहाले त्यामध्ये रूतो

लागले. असा कर्दम जाहाला. मारता मारता घोडे जिवंत उरले नाहीत. जे जिवंत सापडले ते साहा हजार घोडे राजियाकडे गणतीस लागले. सवाशे हत्ती सापडले. साहा हजार उंटे सापडली. मालमत्ता खजीना, जडजवाहीर, कापड, अगणित बिछाईत (मालमत्ता) हातास लागली. बेवीस वजीर नामांकित धरले. खासा इखलासखान व बेलोलखान पाडाव झाले. ऐसा कुलसुभा बुडविला.''

साल्हेरीच्या या युद्धात मुघलांची किती हानी झाली याचे सभासदाने केलेले हे वर्णन अतिशयोक्त नाही याची खात्री खुद्द मुघल इतिहासकारांनी केलेल्या वर्णनावरून पटते. 'फुंतुहाते आलमगिरी' या ग्रंथात ईश्वरदास नागरने मुघलांच्या हानीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे – ,

''मोगल व मराठे यांचे निकराचे युद्ध झाले. इखलासखान हा जखमी झाला आणि आपल्या ५० माणसासहित मराठ्यांच्या कैदेत सापडला. या युद्धात मोगलांची ५ हजार माणसे ठार झाली. मराठ्यांचीही अनेक माणसे मारली गेली. पण साल्हेरचा किल्ला काही मोगलांना मिळाला नाही.''[६८] ईश्वरदासाने फक्त मुघलांचेच ५ हजार लोक ठार झाले असे म्हटले आहे तर सभासदाने दोन्ही बाजूंचे १० हजार लोक ठार झाले असे म्हटले आहे.

'तारीखे–दिल्कुशा' चा लेखक भीमसेन सक्सेना लिहितो, ''मोगलांनी साल्हेरीला वेढा घातला होता. बातमी आली की, मराठे मोगलांवर तुटून पडले. युद्धात इखलासखान भियाना आणि मुहकमसिंग हे जखमी होवून मराठ्यांच्या हाती सापडले. मुहकमसिंग हा राव अमरसिंग याचा मुलगा होय. स्वत: राव अमरसिंग आणि त्याचे सहकारी हे लढत असता मारले गेले. मोगलांचा सगळा सरंजाम मराठ्यांच्या हाती पडला. बहादुरखान तातडीने रवाना झाला. पण तो बागलाणात येवून पोहोचेपर्यंत मराठे कोकणात उतरले होते. मोगलांचा सगळा सरंजाम लुटून ते आपल्याबरोबर घेवून गेले.''[६९]

साल्हेरच्या या भीषण युद्धात मराठ्यांना प्रचंड विजय प्राप्त झाला. इखलासखान मियाणा व मुहकमसिंग चंद्रावंत जखमी होवून मराठ्यांच्या हाती सापडले. दरकोजी भोसलेही

कैद झाला. राव अमरसिंग व त्याचे सहकारी ठार झाले. फक्त हजार दोन हजार मोगल सैनिक कसेबसे निसटून गेले. मोगलांचे एकूण ३० मोठे अंमलदार मराठ्यांनी कैद केले.

या युद्धात सरनौबत प्रतापराव गुजर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठा पराक्रम गाजविला. त्यांच्या पराक्रमाचे वर्णन करताना सभासद म्हणतात, ''त्या युद्धात प्रतापराव सरनौबत व आनंदराव व व्यंकोजी दत्तो व रूपाजी भोसले व सुर्यराव काकडे, शिदोजी निंबाळकर व खंडोजी जगताप व गोदजी जगताप व संताजी जगताप व मानाजी मोरे व विसाजी बल्लाळ, मोरो नागनाथ व मुकुंद बल्लाळ, वरकड बाजे वजीर, उमरास असे याणी कस्त केली. मुख्य मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनौबत या उभयतांनी आंगीजणी (पराक्रम) केली.''

मराठ्यांना विजय मिळाला असला तरी मराठ्यांचेही मोठे नुकसान झाले. महाराजांचे बालपणीचे सवंगडी, पंचहजारी लष्करी अधिकारी सुर्यराव काकडे गोळा लागून ठार झाले. अनेक मराठा सैनिक मारले गेले. साल्हेर येथील आपल्या विजयाची बातमी प्रतापराव व मोरोपंत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना कळविली. या बातमीने महाराज अत्यंत खूष झाले. स्वराज्यात विजयाच्या तोफा उडविल्या गेल्या. सगळीकडे साखर वाटली. विजयाचे हे पत्र ज्या जासूदांनी आणले त्यांच्या हातात सोन्याची कडी घातली. या युद्धात सहभागी असणाऱ्या सर्वांना बक्षीसे देण्यात आली. सरनौबत प्रतापराव गुजर, मोरोपंत पेशवे, आनंदराव, व्यंकोजीपंत यांना भरपूर द्रव्य बक्षीस दिले. युद्धात कैद झालेल्या इखलासखान, मुहकमसिंग व इतर सरदार यांना वस्त्रे व घोडे देवून सन्मानाने सोडून देण्याचा हुकूम महाराजांनी दिला.[७०]

साल्हेरच्या युद्धात मराठ्यांना प्रचंड यश मिळाले. मोगल व मराठ्यांच्यात उघड्या मैदानावरील एवढी प्रचंड लढाई यापूर्वी कधीच झाली नव्हती. शिवाय या लढाईचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य हे की, शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत सरनौबत प्रतापराव व पेशवे मोरोपंत यांनी विजयश्री खेचून आणली होती. म्हणूनच इतिहासकार बाळकृष्ण आपल्या 'SHIVAJI THE GREAT' या ग्रंथात म्हणतात, "The victory of Salhir immensely enhanced the reputation of the Maratha Soldiery, as they had achieved it in a

pitched battle with the Moguls wherein their uncrowned king Shivaji was not present to guide, cheer and encourage them."[७१]

या युद्धात प्रतापराव व मोरोपंताच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी दाखविलेल्या शौर्याची व युद्धकौशल्याची कीर्ती सगळीकडे पसरली. मराठ्यांचा दरारा वाढला. समोरासमोरच्या लढाईतही आपण मुघल सैन्याचा पराभव करू शकतो असा जबरदस्त आत्मविश्वास मराठ्यांच्यात निर्माण झाला. मुघलांना मराठ्यांची दहशत वाटू लागली. मुघलांनी किल्ल्याचा वेढा उठवून माघार घेतली. बहादूरखान व दिलेरखानाला हात चोळत बसण्याखेरीज काहीही करता आले नाही. दोघांचीही मानखंडना होवून मोठे नुकसान सोसून त्यांना मराठ्यांच्या प्रदेशातून माघार घ्यावी लागली. पाठोपाठ प्रतापरावांनी मुल्हेरही काबीज केले.[७२] साल्हेरच्या पराभवाची बातमी समजताच औरंगजेब बादशहा अतिशय संतापला. त्याने बहादूरखानाची व दिलेरखानाची निर्भत्सना करताना लिहिले,''साल्हेरीच्या युद्धात तुम्ही मेला का नाहीत. आदिलशहा, कुतूबशहा, फिरंगी, हबशी इत्यादी सत्ताधारी त्याला नजराना पाठवून खूष करितात. त्याऐवजी ते व तुम्ही मिळून चोहोकडून त्याजवर चाल कराल तर तो किल्ल्यावर किती दिवस कोंडून राहील. बोलबोल म्हणता जेरीस आला पाहिजे.'' याचवेळी औरंगजेबाने दोन्ही खानाकडे फर्माने पाठवून आदिलशाही व कुतूबशाही यांना बरोबर घेवून शिवाजीच्या मुलूखावर स्वारी करण्याचा हुकूम सोडला.[७३] वास्तविक पाहता महाराजांना जेरीस आणण्याची भाषा बोलणाऱ्या औरंगजेबाचेच सरदार मराठ्यांच्या पराक्रमाने जेरीस आले होते.

**प्रतापरावांचे सुरतकरांना खंडणीचे पत्र १६७२ :**

साल्हेरच्या युद्धात विजय मिळवल्यानंतर सरनौबत प्रतापराव गुजर काही काळ याच परिसरात (बागलाण) असावेत असे वाटते. कारण याच दरम्यान त्यांनी सुरतेचे अधिकारी व नागरिक यांना पत्र पाठवून चौथाई खंडणीची मागणी केली व खंडणी न दिल्यास सुरतेचा नाश करण्याची धमकी दिली. ऑक्टोबर १६७० च्या दुसऱ्या सुरत लुटीच्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत शहरातील व्यापारी व सरकारी अधिकारी यांच्याशी बोलणी करून दरवर्षी १२ लाख रुपये खंडणी कबुल करून घेतली होती. पण एक वर्ष उलटून गेले तरी सुरतकरांनी

खंडणी दिली नव्हती. म्हणून प्रतापरावांनी पत्र पाठवून खंडणीची मागणी केली. या पत्रात प्रतापराव म्हणतात.

''सुरतचे अधिकारी, कानूनगो, देसाई, व्यापारी, दलाल, महाजन, इंग्रज, फ्रेंच आणि डच या कंपन्यांचे लोक आणि सामान्य जनता यांनी काळजीपूर्वक जाणावे की, शिवाजी महाराजांच्या आज्ञेप्रमाणे सुरतेतील आयात–निर्यात होणाऱ्या मालमत्तेवर जो कर आकारला जातो, त्याचे एकंदरीत उत्पन्न काय होते याचा तपशील लिहिण्यात यावा. या उत्पन्नाची चौथाई महाराजांच्या सैन्याने घ्यावी. या कामाकरिता महाराजांनी माझी नेमणूक केली आहे. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे मी तुम्हाला लिहित आहे. नशिबाने तुमचे मार्गदर्शन केले आणि माझ्या हुकमांची अंमलबजावणी करण्यातच तुमचे हित आहे हे तुम्हाला पटले तर मी माझा अधिकारी पाठवीत आहे. तो म्हणेल त्याप्रमाणे करा, म्हणजे तुमचे आमचे चांगले होईल. नाहीतर शूर आणि विजयी सैन्य लवकरच या भागात सहज शिकार करण्यासाठी येवून थडकेल. या गावातील घर न घर धुळीला मिळविण्यात येईल. या गावाचे अवशेषही राहणार नाहीत. या शहरातील सर्व माणसे आमच्या तावडीत सापडतील. एकाही माणसाला सुटून जाता येणार नाही. बादशहाची मदत येईल या समजुतीने तुमची डोकी फिरली असतील तर यात तुमचा सर्वनाश आहे असे समजा. आमच्या विजयी सैन्याने दोन वेळा हा प्रांत आपल्या टाचांखाली रगडून काढला आहे. बादशहा आमचे काय करू शकला? तुमच्या तोफांचा आणि बंदुकीचा धूर तुमच्या डोक्यात साठला असेल (तुम्हाला आपल्या तोफांचा आणि बंदुकीचा गर्व असेल), आणि आपला किल्ला अजिंक्य आहे असे तुम्हाला वाटत असेल तर एक गोष्ट लक्षात ठेवा आमचे विजयी सैन्य येथे लवकरच येवून पोहोचेल. पिंजारी कापूस धुनकतो त्याप्रमाणे आमचे सैन्य तुमच्या किल्ल्याचा दगड आणि दगड धुनकून काढील आणि तुमच्याच शहराच्या तोफांनी आणि बंदुकांनी तुमचे शहर उध्वस्त करून टाकील.

साल्हेर आणि माहुली हे किल्ले अतिशय मजबूत आहेत. मनुष्य आपल्या कल्पनेच्या दोऱ्यानेही त्या किल्ल्याचे बुरुजही हस्तगत करू शकत नाही. असे असूनही आम्ही तोंडातून शब्द बाहेर पडण्यास जो वेळ लागेल तेवढ्यात ते किल्ले महाराजांच्या कृपेने जिंकून घेतले. मग

सुरतेच्या तटाची काय कथा? डोंगरदऱ्यातून फिरणाऱ्या आमच्या वीरांपुढे त्यांची काय मातब्बरी आहे? बहादूरखान आणि दिलेरखान हे तुमच्या बादशहाचे सेनापती आहेत. फजीत पावून, मनगटे चावीत, निराशेने जमिनीवर आदळआपट करीत साल्हेर समोरून त्यांना पुण्याकडे पळून जावे लागलेच ना.

केवळ तुमच्यावर दया म्हणून, तुमचे उत्तर येईपर्यंत माझे सैन्य पाठविण्याचे मी थांबविले आहे. परमेश्वराने तुम्हाला सदबुद्धी दिली, तुमचा गाफीलपणा दूर झाला आणि उपदेशाचे शब्द तुम्ही ऐकलेत तर त्यात तुमचे हित राहील. नाही तर तुम्हावर पश्चाताप करण्याची पाळी येईल.''[७४]

प्रतापरावांनी सुरतकरांना पाठविलेल्या या पत्रात साल्हेरीच्या विजयामुळे निर्माण झालेला आत्मविश्वास स्पष्टपणे दिसतो. सुरतकर सहजासहजी खंडणी देणार नाहीत हे प्रतापराव जाणत होते. त्यामुळेच या पत्रात त्यांनी सुरतकऱ्यांना धाक दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. पत्रावर तारीख लिहिलेली नसली तरी हे पत्र इ. स. १६७२ च्या मार्च महिन्याच्या उत्तरार्धात लिहिले असावे. कारण ६ एप्रिल १६७२ रोजी सुरतकर इंग्रजांनी कंपनीला लिहिलेल्या पत्रात शिवाजीकडून खंडणी मागणारे पत्र सुरतेला आले आहे असा उल्लेख केलेला आहे.''[७५]

प्रतापरावांनी सुरत बेचिराख करण्याची धमकी देवूनसुद्धा सुरतकरांनी खंडणी देण्याचे नाकारले. सुरतेच्या अधिकाऱ्यांनी प्रतापरावांना पुढीलप्रमाणे पत्र पाठविले. ते लिहितात,

''प्रतापराय व मराठे, ब्राह्मण, नाईकवाडी व बारगीर यांचे तीव्र बुद्धीस कळावे की, तुमचे पत्र आताच आमचे हातास आले. दुष्टांनो ज्या बादशहाचा लहानसा नोकर मीर्झाराजा जयसिंग याने तुमच्या शिवाजीला वठणीस आणून बादशहापुढे नाक घासण्यास लाविले; विजापूर व गोवळकोंडा येथील शहा, ज्या बादशहाच्या नोकरांपुढे नाक घासून सालोसाल खंडणी भरून आपला बचाव करितात; त्या बादशहाचा प्रभाव तुम्हाला अजून ठाऊक झाला नाही काय? तुमच्या या उध्दट शब्दाबद्दल तो तुमची जीभ कापून तुम्हास दगडाखाली ठेचून काढील, हे तुम्हास कळत कसे नाही? पहिली ती सुरत ही नव्हे. तुम्हा उंदरांच्या

बंदोबस्तासाठी सुरतेला आता नवीन तट बांधलेला आहे आणि आता येथे मोगलांचे शूर सिंह जागत बसले आहेत. सबब हा भलताच खटाटोप सोडून देवून, पळून जावून लपून बसा कसे! सुलतान शहजादा सत्तर हजार फौज घेवून तुमचे पाठीवर येत आहे. तो आल्यावर तुमच्या प्रेतांनी गिधाडांची मात्र चैन होईल. आपला बचाव व्हावा अशी तुमची इच्छा असेल तर आजपावेतो तुम्ही जे काही अपहार करून घेतले आहे, ते सर्व बहादुरखान व दिलेरखान यास नेऊन सोपून द्या. म्हणजे ते तुम्हास केलेल्या अपराधाची क्षमा करून बादशहाच्या कृपाछत्राखाली घेतील.''[७६]

सरनौबत प्रतापरावांनी मागितलेल्या खंडणीस नकार देण्याचे धाडस सुरतेच्या अधिकाऱ्यांनी केले याची कारणे पत्रातूनच स्पष्ट होतात. सुरतेच्या लुटीनंतर सुरतेला तटबंदी करण्यात आली होती. अर्थात सुरतेच्या दुसऱ्या लुटीच्या वेळी ही तटबंदी असूनही त्याचा काही उपयोग झाला नव्हता. या सत्याकडे सुरतकर जाणूनबुजून दुर्लक्ष करत होते. तटबंदी पेक्षाही यावेळी त्यांना शहजादा मुअज्जमच्या ससैन्य येण्याचा आधार वाटला असावा त्यामुळे त्यांनी प्रतापरावांना खंडणी देण्यास नकार दिला. प्रतापरावांनीही सुरत लुटण्याची धमकी दिली असली तरी प्रत्यक्षात तशी कृती केली नाही. कदाचित सुरतेवर हल्ला करण्याइतकी त्यांची तयारी झालेली नसावी किंवा मुघल सैन्य जवळपास असल्यामुळे प्रतापरावांनी सुरतेवर हल्ला केला नाही.

प्रतापरावांच्या पत्राला सुरतकरांनी दाद दिली नसली तरी पुढे जूनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज किंवा मोरोपंत यांनी खंडणीसाठी पाठविलेल्या पत्राला नकार देणे त्यांना शक्य झाले नाही. या पत्रामुळे भेदरलेल्या सुरतकरांची मध्यरात्रीच पळापळ सुरू झाली. दुसऱ्याच दिवशी सुभेदाराने महाराजांची मागणी कशी पूर्ण करावी हे ठरविण्यासाठी सभा बोलाविली. सुरतकरांच्या सुदैवाने याचवेळी पावसाची संततधार सुरू झाली. तसेच दिलेरखान मराठ्यांना थोपविण्यासाठी येत असल्याचे वृत्त सर्वत्र पसरले. त्यामुळे मोरोपंत रायगडाकडे परत फिरले आणि सुरतकरांनी सुटकेचा निश्वास टाकला.[७७] सुरतेची तिसऱ्यांदा लूट होण्यापासून सुरतेचा बचाव झाला परंतु सुरतकरांना शिवाजी महाराज व त्यांच्या सरदारांची

कायमची दहशत बसली. मराठी सैन्य कधीही सुरतेवर हल्ला करावयास येईल अशी भीतीची कायमची टांगती तलवार सुरतकरांच्या डोक्यावर पुढे अनेक दिवस लटकत राहिली. परंतु मराठ्यांनी पुन्हा सुरतेवर हल्ला केला नाही.

## ६:७ सैन्य उभारणी (१६७२) :

१६७२ च्या पावसाळ्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञेनुसार सरनौबत प्रतापरावांनी सैन्यउभारणीचे काम हाती घेतलेले दिसते. मुंबईकर इंग्रज सुरतकर इंग्रजांना १६ ऑक्टोबर १६७२ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतात, ''शिवाजी मोठे सैन्य उभारीत आहे. १६००० सैन्य खडे तयार असून ४ मोठी घोडदळाची पथके तो आणखी वाढवीत आहे. ही पथके मूळची मोगलाकडील असून ती आता तिकडून फुटून सिद्धी हिलाल, जाधवराव, आणखी इतर दोघेजण यांच्या नेतृत्वाखाली शिवाजीला मिळाली आहेत. आणखीही पुष्कळ येणार आहेत अशी वदंता आहे. आता दिलेरखान एकटा पडला आहे. त्याच्याशी युद्ध करण्याचा त्यांचा बेत आहे.''[७८] इंग्रजांच्या या पत्रानुसार शिवाजी राजे आपले सैन्यबळ आणखी वाढवत आहेत आणि सैन्य उभारणीचे हे काम सेनापती प्रतापरावांकडेच असणार हे उघड आहे. स्वराज्याचे सरनोबत या नात्याने सर्व सैन्याची व्यवस्था पाहणे, सैन्याचे पगार, त्यांची शस्त्रे, सैन्य उभारणी, सैन्याचे प्रशिक्षण इत्यादी बाबींकडे लक्ष देणे हे प्रतापरावांचे कर्तव्यच होते. सैन्याच्या तक्रारींचे निवारण करण्याची जबाबदारीही त्यांचीच होती. ही जबाबदारी ते कशाप्रकारे पार पाडत होते हे त्यांच्याच एका पत्रावरून स्पष्ट होईल. प्रतापरावांची मुद्रा असलेले ३ नोव्हेंबर १६७२ चे हे अस्सल पत्र त्यांच्या सैन्यातील एका बारगीराच्या (राऊत) तक्रारीचे निवारण करण्यासाठी त्यांनी लिहिलेले आहे. शिवरायांच्या घोडदळात बारगीर व शिलेदार असे दोन प्रकार असत. शिलेदाराकडे स्वत:चा घोडा व शस्त्र असे तर बारगिराला घोडा व शस्त्र सरकारकडून दिला जात असे. प्रतापरावांच्या सैन्यात असलेल्या बकाजी नावडकर या बारगिराची तलवार पंढरपूरजवळील कासेगाव कर्यातीचे देशमुख गोदाजी याने बळजबरीने काढून घेतली. ही तलवार गोदाजीने माघारी द्यावी यासाठी प्रतापरावांनी गोदाजीला हे पत्र लिहिले आहे. ते पुढीलप्रमाणे –

ले. ३ मु. १०७३ श. १५९४ कार्तिक वद्य ९

रजब २२ इ. १६७२ नोव्हेंबर ३

श्री शिवसे /
नानेर्तु मुं / द्रा
जयति
प्रतापरायश्य /

र्द मशहूरल अनाम राजश्री गोदजी बिन देशमुख क।। कासेगाऊ प्रती प्रतापराऊ सरनौबत शहुर सन सलास सबैन व अलफ म।। बकाजी नावडकर यास दिवाणातून तरवार बारगीर होती. ते तुम्ही हुनरबंदीने घेतली आहे म्हणून तरी सरकारीची तरवार तुम्ही घ्यावयास काये निसबती आहे. ते तुम्हास हजम होईल की काये (यैसा) तुम्हास समज नाही. याउपरी पत्र देखताच सदरहू तरवार पाठऊन दीजे. दिरंग केलिया दूरदराज लागेली आम्हावरी बोल नाही यैसे समजून वर्तुणूक करणे.

छ.२२ रजब पा।। हुजूर मोर्तब [७९]

सूद

प्रतापराव गुजर यांनी गोदाजी देशमुखला पत्र पाठवून त्याची कानउघडणी केली आहे. सरकारी तलवार तुम्ही घेण्याचे काही कारण नव्हते. ती तुम्हाला सहजासहजी पचेल असे वाटते काय? अशा रोखठोक शब्दात गोदाजीला त्यांनी लष्करातील आपल्या कडक प्रशासनाची जाणीव करून दिली आहे. पत्र पोहोचताच ताबडतोब तलवार पाठवून द्या अन्यथा होणाऱ्या परिणामांची जबाबदारी आमच्यावर नाही अशी समज दिली आहे.

## ६:८ प्रतापरावांची आदिलशाही प्रदेशावरील स्वारी (१६७३) :

मोगलांशी युद्ध सुरू असतानाच छत्रपती शिवाजी महाराजांना आदिलशाही प्रदेशातही धडक मारण्याची संधी प्राप्त झाली. दिनांक २४ नोव्हेंबर १६७२ रोजी विजापूरचा अली आदिलशहा मृत्यू पावला. आदिलशाही दरबारातील कारभाऱ्यांनी त्याचा ४ वर्षाचा मुलगा सिकंदर आदिलशहा याला गादीवर बसविले. विजापूरचा मुख्य प्रधान अब्दुल महंमद याने

अली आदिलशहाच्या मृत्युपूर्वीच त्याच्या संमतीनेच राज्याच्या कारभाराची व्यवस्था ठरविली होती. त्यानुसार

१) अल्पवयीन सिकंदर बादशहाचा पालक आणि राज्याचा कारभारी म्हणून खवासखान (ॲबेसिनियन सरदार) याने काम पहावे.

२) अब्दुल मुहंमद याने नळदुर्ग व गुलबर्गा हे किल्ले आपल्या ताब्यात ठेवावेत व मुघलाच्या आक्रमणापासून विजापूरचे रक्षण करावे.

३) अब्दुल करीम बहलोलखान या पठाण सरदाराने पन्हाळा व मिरज आपल्या ताब्यात ठेवून शिवाजी महाराजांविरुद्ध मोहीम चालू ठेवावी.

४) मुजफ्फरखान याचेकडे कर्नाटकचा प्रदेश देण्यात यावा.[८०]

वरीलप्रमाणे व्यवस्था ठरली असली तरी अली आदिलशहाच्या मृत्यूनंतर खवासखानानेच सर्व सत्ता बळकाविली. त्यामुळे राज्यात गोंधळ निर्माण झाला. या संधीचा फायदा करून घेण्याचे शिवाजी महाराजांनी ठरविले. मे १६६७ मध्ये महाराजांचा आदिलशहाशी गुप्त तह झाला होता. वार्षिक ३ लाख होन खंडणी महाराजांना देण्याचे आदिलशहाने मान्य केले होते. महाराजांचा वकील बाबाजी नाईक पुंडे हा आदिलशाही दरबारात होता. अली आदिलशहाचा वजीर अब्दुल मुहमंद व शिवाजी महाराज यांचे परस्परसंबंध सलोख्याचे होते.[८१] अली आदिलशहाच्या मृत्यूनंतर मात्र परिस्थिती बदलली. मुख्य कारभारी सिद्धी खवासखानाने आपल्या तीनही सहकाऱ्यांना बाजूला सारून सर्व अधिकार स्वत:कडेच घेतल्याने तो आदिलशाहीचा सर्वेसर्वा झाला. परिणामी दरबारातील दक्षिणी व पठाणी मुसलमान सरदार यांच्यात बंडाळी माजली. या अस्थिरतेचा फायदा घेवून महाराजांनी विजापूरशी पूर्वी असलेले मैत्रीचे संबंध तोडले व डिसेंबर १६७२ मध्ये आपला वकील बाबाजी नाईक पुंडे याला आदिलशाही दरबारातून ताबडतोब माघारी बोलविले. याचवेळी महाराजांनी वऱ्हाड तेलंगणच्या बाजूस मोहिमेवर असलेल्या सरनौबत प्रतापराव व त्यांचा सहकारी आनंदराव या दोघांना पत्रे पाठवून आज्ञा दिली की, ''औरंगशहाचा आणि कुतूबशहाचा त्याचप्रमाणे दुसऱ्या कोणाचा मुलूख मध्ये असेल तो झाडून सर्व उसाप्रमाणे

पिळून काढून उध्वस्त करावा म्हणजे ते जेरीस येवून तह करण्याचा विचार करतील. यासाठी तुम्ही आपापल्या सेनेसह एकत्र येवून वाईपासून लक्ष्मेश्वरापर्यंतचा व त्याच्याही पुढील प्रदेश आपल्या ताब्यात आणावा.''[८२]

पन्हाळ्याचा किल्ला इ. स. १६६० मध्ये महाराजांनी आदिलशहाला दिला होता. तिकडे आता त्यांनी पुन्हा लक्ष वळविले व हे मोक्याचे ठिकाण घेण्याकरिता अण्णाजी दत्तो व कोंडाजी फर्जद या दोन योद्ध्यांची योजना केली.

महाराजांच्या आज्ञेप्रमाणे प्रतापरावांनी आदिलशाही मुलूखात जबरदस्त धडक मारली व अत्यंत जलदगतीने वाई, कऱ्हाड, चंदनवंदन, नांदगिरी, कोल्हापूर हा भाग जिंकून घेतला.[८३] दरम्यान कोंडाजी फर्जद व अण्णाजी दत्तो यांनी ६ मार्च १६७३ रोजी पन्हाळा किल्ला जिंकून घेतला. कोंडाजीने पन्हाळा विजयाची वार्ता रायगडावर महाराजांकडे रवाना केली. विजयाच्या वार्तेने महाराजांना अतिशय आनंद झाला. गडावर नगारे वाजवून व तोफा डागून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. पन्हाळा विजयाची वार्ता समजल्यावर दुसऱ्याच दिवशी म्हणजे रविवार दिनांक ९ मार्च १६७३ रोजी महाराज पन्हाळ्याकडे निघाले. महाराज पन्हाळ्यावर आले त्यावेळी सरनौबत प्रतापरावांचा तळ पन्हाळा किल्ल्याच्या पायथ्याशी पडलेला होता.[८४]

### ६:८:१ बहलोलखानाची शिवाजीराजांच्या बंदोबस्तासाठी नेमणूक :

पन्हाळा किल्ला शिवाजी महाराजांनी जिंकून घेतल्याची बातमी ऐकून आदिलशाही दरबार हतबुद्ध झाला. या अपयशासाठी आदिलशाही मुत्सद्यांनी वजीर खवासखानास दोषी ठरवून त्याची निंदा केली. ''तू बुद्धिमान असूनही तुझ्या उद्धटपणामुळे शिवाजीने तह मोडला व हे संकट निर्माण झाले आहे.'' अशा शब्दात बहलोलखान व इतर प्रमुख सरदारांनी खवासखानास दोष दिला. यावेळी खवासखानाने नमते घेवून सर्व सरदारांची समजूत काढली व त्यांच्याशी विचारविनिमय करून शिवाजीचा बंदोबस्त करण्याच्या व पन्हाळा पुन्हा जिंकण्याच्या कामगिरीवर बहलोलखान (चौथा) या पठाण सरदाराची नेमणूक केली.[८५]

बहलोलखानाचे मूळ नाव अब्दुल करीम असे होते. त्याचा पूर्वज पहिला बहलालेखान (बहलोलखान शाहजहानी) १६४७ पासून विजापूरी दरबारात चाकरी करत होता. त्याच्यानंतर

त्याचा मुलगा अब्दुल क्वादीर यालाही बहलोलखान (दुसरा) असे संबोधले जावू लागले. त्याच्यानंतर अब्दुल रहिम हा तिसरा बहलोलखान आला. १६६५ मध्ये त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा अब्दुल करीम हा बहलालेखान (चौथा) म्हणून ओळखला जावू लागला.[८६]

बहलोलखान हा अतिशय शूर व दरबारातील पठाणी पक्षाचा नेता होता. मिरज व बंकापूरची जहागिरी त्याच्याकडे दिलेली होती. विजापूरच्या अलि आदिलशहाने मृत्युपूर्वी राज्याच्या कारभाराची जी व्यवस्था ठरविली होती त्यानुसार पन्हाळा व मिरज आपल्या ताब्यात ठेवून शिवाजीविरुद्ध मोहीम चालू ठेवण्याची जबाबदारी बहलोलखानावर टाकली होती. त्यामुळे शिवाजी महाराजांनी पन्हाळा जिंकल्यानंतर त्यांचे पारिपत्य करण्याची जबाबदारी त्याच्याकडेच सोपविण्यात आली.

आदिलशहाचा मुख्य कारभारी खवासखानाने खास दरबार भरवून शाही रिवाजाप्रमाणे सिकंदर आदिलशहाच्या हातून बहलोलखानास निरोपाचा विडा दिला.यावेळी दोन मदोन्मत्त हत्ती, चार घोडे, मौल्यवान वस्त्रे, शस्त्रे देवून खानास सन्मानित करण्यात आले. यानंतर बहलोलखान मोहिमेवर रवाना झाला.

### ६:८:२ उमराणीचे युद्ध (मार्च – एप्रिल १६७३) :

बहलोलखान मोहिमेवर निघाला तेव्हा त्याच्याबरोबर १२ हजार सैन्य होते. त्याने प्रथम तिकोटा या शहराकडे कूच केले व तेथून दोन दिवसात तो विजापूरच्या पश्चिमेला ३६ मैल अंतरावर असलेल्या उमराणी येथे पोहोचला. याठिकाणी त्याला आदिलशहाचे पत्र मिळाले. रांगण्याच्या परिसरात असलेला सर्जाखान व मुजफ्फर मलिक,अदोनीचा सिद्धी मसूद, कर्नूलचा अब्दुल अजीज व नळदुर्गचा खिजरखान पन्नी यांना सहाय्यासाठी बोलविण्याची त्यात सूचना होती. याशिवाय मोगलांकडच्या दिलेरखानाकडून काही सैन्य भाड्याने घेण्याचीही सूचना होती. या सूचनांप्रमाणे सैन्याची जमवाजमव करण्यासाठी बहलोलखानाने उमराणीजवळ तळ दिला.[८७]

बहलोलखान चालून येत आहे ही खबर पन्हाळ गडावर असलेल्या शिवाजी महाराजांना समजताच त्यांनी गडाखाली तळ देवून असलेल्या प्रतापराव, आनंदराव इत्यादींना बोलावून

घेवून त्यांच्याशी गुप्त मसलत केली आणि आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे शत्रूसैन्य एकवटण्यापूर्वीच बहलोलवर हल्ला चढवून शत्रूची योजना उधळून लावण्याचे ठरविले. बहलोलखानाचे सैन्य वाढून प्रकरण अवघड होण्याअगोदरच त्याच्यावर घाव घालणे आवश्यक होते. महाराजांनी प्रतापरावांना सल्ला दिला की, जोवर बहलोलखान थोड्या सेनेसह समीप आहे तोवरच त्याला पकडून आणा.[८८]

महाराजांच्या आज्ञेप्रमाणे सरनौबत प्रतापराव गुजर १५ हजार फौजेसह मोहिमेवर निघाले.[८९] यावेळी त्यांच्याबरोबर आनंदराव, सिद्धी हिलाल व त्याचे ५ पुत्र, विठोजी शिंदे, कृष्णाजी भास्कर, विठ्ठल पिलदेव, विसो बल्लाळ, रुपाजी भोसले, सोमाजी मोहिते, सिधोजी निंबाळकर, महादजी ठाकूर व दिपाजी राऊतराव, इत्यादी सरदार होते. अत्यंत जलदगतीने आणि गुप्ततेने रात्रीची वाटचाल करीत प्रतापरावांनी दोनच दिवसात बहलोलखानाला उमराणी येथेच गाठले.[९०] प्रतापराव आपल्या अगदी जवळ येवून ठेपला आहे याची खानाला बातमीच लागली नाही. उमराणीच्या पूर्वेला वाहणारी नदी बहलोलखानाच्या सैन्याला पाणीपुरवठा करत होती. ही बहुधा दोण नदी असावी. ते मार्च–एप्रिलचे दिवस होते. उन्हाळा सुरू झाला होता. त्यामुळे नदी बरीच आटली होती. नदीचे कुठेकुठे साठणारे पाणीच (डोह) उपयोगाला येत होते. प्रतापरावांनी प्रथम जलाशयाला वेढा घालून तो आपल्या ताब्यात घेतला.[९१]

सरनोबत प्रतापरावांच्या सैन्याने रातोरात जलाशय ताब्यात घेवून विजापूरी सैन्याला वेढले तरीही बहलोलखान व त्याच्या सैन्याला त्याची चाहूलही लागली नाही. एवढे बिनबोभाटपणे मराठ्यांनी हे काम पार पाडले होते. मराठा सैन्याच्या आघाडीवर सिद्धी हिलाल होता. त्याच्यामागे फक्त एक कोसावर विठोजी शिंदे तैनात होता. तर कृष्णाजी भास्कर व विठ्ठल पिलदेव हे दोघे शत्रूच्या दोन्ही बाजूंवर जय्यत तयारीत खडे होते आणि विसाजी बल्लाळ शत्रूसैन्याभोवती घिरट्या घालीत होता. बहलोलचे सैनिक जेव्हा हत्तींना पाणी पाजण्याकरिता जलाशयाकडे निघाले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, शत्रूने जलाशय ताब्यात घेतला असून आपण पूर्णपणे वेढले गेलो आहोत. अकस्मात कोसळलेल्या संकटामुळे सुरूवातीला आदिलशाही सेना घाबरली पण लगेच सावरून त्यांनी लढण्याची तयारी केली.

खासे प्रतापराव हजार घोडेस्वारासह आदिलशाही सैन्यावर चालून आले. लौकरच दोन्ही बाजूचे घोडदळ व पायदळ एकमेकांवर आवेशाने तुटून पडले. एकच रणकंदन माजले. आनंदराव शत्रूकडून जखमी झाला तरीही डोक्यावर ढाल धरून शत्रूसैन्यात घुसला व तीन घटकांपर्यंत त्याने शत्रूसैन्याची त्रेधा उडविली. सिद्धी हिलाल आपल्या ५ पुत्रासह शत्रूवर चालून गेला. रूपाजी भोसले, सोमाजी मोहिते, सिंधोजी निंबाळकर, विठोजी शिंदे, विठ्ठल पिलदेव, महादजी ठाकूर हे सर्व सरदार आपापल्या सैन्याच्या तुकडीसह शत्रूवर तुटून पडले. युद्धाच्या ऐन धुमश्चक्रित बहलोलखानाचा एक मदोन्मत्त हत्ती साखळी सोंडेत धरून धावत सुटला. त्याच्या हल्ल्यात त्यांच्याच गोटातील अनेक लोक चिरडले गेले. माहुताने त्याला शांत केले. पण संध्याकाळी सिधोजी निंबाळकरने त्या हत्तीला पकडून आपल्या गोटात आणले.[९२] बहलोलखान शर्थीने प्रतिकार करत होता. परंतु त्याची परिस्थिती अत्यंत बिकट बनत चालली होती.

**६:८:२:१ पाण्याचे दुर्भीक्ष :**

उमराणीचा हा रणसंग्राम भर उन्हाळ्यात सुरू होता. प्रतापरावांनी जलाशयावर ताबा मिळविल्यामुळे विजापूरी सैन्याला पाण्याविना लढावे लागत होते. तहानेने सैन्य, हत्ती, घोडे कासावीस झाले होते. पाण्याविना बहलोलखानाच्या सैन्याची अवस्था कशी झाली होती याचे वर्णन आदिलशाही दरबारातील समकालीन कवी मुल्ला नुस्त्रती याने त्याच्या 'तारीखे-इस्कदंरी' या काव्यात केले आहे. तो म्हणतो,

''हवा खुश्क ल्हू ल्या न मिहनत कि ताब
खडग बिन न था किस बी जागे पो आब।
खडे थे तो धर यक ते यक दिल मे जोग
वले आब बिन तलमल्या सब बी लोग।''

(अर्थ – कठीण श्रम सहन न होवून रक्त शुष्क झाल होत. (रणक्षेत्रात) तलवारीच्या (पाण्याशिवाय) शिवाय इतरत्र कुठेही पाणी नव्हते. एकमेकाच्या आधाराने मनात ऐक्यभाव धरून सैनिक उभे होते, परंतु पाण्याविना सर्वजण तळमळत होते.)

बहलोलखानाच्या यावेळच्या मनस्थितीचे वर्णन करताना कवी म्हणतो,

''कि पकड है लग  लर वो काफिर पलीद

हुए आह! सब यांच मारे शहीद।''[९३]

(अर्थ – त्या अपवित्र धर्म पाखंड्यांनी तो जलाशय आपल्या ताब्यात ठेवला आहे. त्यामुळे आपण इथेच हुतात्मे तर होणार नाही ना! अशी मला भीती वाटू लागली आहे.)

**प्रतापरावांचे औदार्य कि ऐतिहासिक चूक (बहलोलखानाची सुटका) :**

उमराणीची ही लढाई संध्याकाळपर्यंत चालली होती. दोन्हीही बाजूंची जबर हानी झाली होती. परंतु पाणी तोडलेल्या आणि चारही बाजूंनी वेढल्या गेलेल्या बहलोलखानाची अवस्था मोठी बिकट झाली होती. बहलोलखानाचे शेकडो सैनिक मृत्यूमुखी पडले होते, शेकडो जखमी झाले होते. तर उरलेल्या सैन्याच्या ऐन उन्हाळ्यात पाण्याच्या अभावी लढून अंगात त्राण उरले नव्हते. त्याचे सहकारी सिद्धीमहंमद बर्की, शाहा महमद काकडा व मुल्ला उस्मान वलद मुल्ला मन्सूर इत्यादी सरदार ठार झाले होते.[९४]

बहलोलखानाने शेवटी शरण जाण्याचे ठरविले. रात्री त्याने आपला वकील प्रतापरावाकडे पाठवून त्याच्याबरोबर गुप्त संदेश पाठविला की, ''आपण तुम्हावरी येत नाही पादशहाचे हुकूमाने आलो याउपरी आपण तुमचा आहे. हरऐक वक्ती आपण राजियाचा दावा न करी.'' बादशहाच्या हुकूमाने मी तुमच्यावर चालून आलो आता येथून पुढे मी शिवाजी महाराजांच्या वाटेला जाणार नाही अशा आशयाची दीन याचना त्याने सुरू केली.[९५] बहलोलखानाच्या विनवणीमुळे प्रतापराव गुजरांचे मन विरघळले. त्यांनी बहलोलखानास सोडून दिले. प्रतापरावांनी आपले सैन्य काढून घेतल्यामुळे बहलोलखानाचे सैन्य सुरक्षितपणे तिकोटा येथील तळावर माघारी गेले.[९६] प्रतापरावांच्या औदार्यामुळे पराभूत होवूनही बहलोलखान आपली सुटका करून घेवू शकला.

उमराणीच्या या लढाईची निश्चित तारीख उपलब्ध नाही. जेधे शकावलीत नोंद आहे की, ''चैत्र सुध प्रतिपदा राजश्री राहीईरीहून पनाल्यास गेले. तेच मासी बहलोलखान व प्रतापराव व आनंदराव यासी लढाई जाहाली. विजापूरजवळ फत्ते झाली येक हती पाडाव

जाला.'' या नोंदीनुसार चैत्र महिन्यात ही लढाई झाली. खरे जंत्रीनुसार ९ मार्च ते ७ एप्रिल हा चैत्र महिन्याचा कालखंड आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजे ९ मार्चला छत्रपती शिवाजी महाराज रायगडावरून पन्हाळ्याला गेले. त्यानंतरच्या काळात ही लढाई झाली. यावरून मार्च महिन्याच्या उत्तरार्धात किंवा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात ही लढाई झाली असावी.

**६:८:२:३ महाराजांची नाराजी :**

उमराणीच्या युद्धाचा वृत्तांत महाराजांना पन्हाळ्यावर समजला. पूर्णपणे कोंडीत सापडलेल्या व हतबल झालेल्या बहलोलखानाला प्रतापरावांनी दया दाखवून सोडून दिले याचा शिवाजी महाराजांना राग येवून ते म्हणाले, ''सला काय निमित्य केला?''[९७] बहलोलखानाला वेढून पकडून कैद का केले नाही? तुम्हाला असे करावयाचे होते तरी बहलोलखानाचे अंगावर चोहोबाजूंनी कशाला चालून गेलात?''[९८] हाती आलेला शत्रू सोडून देणे हे शिवाजी महाराजांच्या राजनीतीत न बसणारे होते. त्यामुळेच त्यांनी प्रतापरावांना दूषणे दिली होती.

महाराजांच्या नाराजीमुळे प्रतापरावांच्या युद्ध जिंकल्याच्या आनंदावर विरजण पडले. 'युद्धात जिंकले परंतु तहात हरले' अशी आपली अवस्था झाली आहे, हे त्यांच्या लक्षात आले. आपले कुठेतरी चुकले, मुत्सद्देगिरीत आपण कमी पडलो याची जाणीव त्यांना आता कुठे महाराजांच्या शब्दामुळे झाली असावी. परंतु आता ते काहीही करू शकत नव्हते. हाती आलेला बहलोलखान त्यांच्यापासून केव्हाच दूर निघून गेला होता. प्रतापराव अस्वस्थ झाले. पन्हाळ्याला जाण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. कदाचित त्यामुळेच ते पन्हाळ्याला जाण्याऐवजी शत्रूच्या मुलखात घुसले व अथणी हुबळीच्या दिशेने त्यांनी मुलूखगिरी सुरू केली.

**६:८:३ हुबळी लूट (१६ एप्रिल १६७३) :**

उमराणीच्या रणभूमीवरून निघालेल्या प्रतापरावांनी दक्षिणेकडे विजापूरी कॅनरा प्रदेशात धडक मारली व तेथील अनेक ठिकाणे लुटली. १६ एप्रिलला प्रतापरावांनी विजापूरकरांच्या हुबळी येथील बाजारपेठेवर हल्ला चढविला व ती लुटली. या हल्ल्याच्या वेळी हुबळीत असलेली इंग्रजांची वखारही त्यांनी लुटली. हुबळी हे मोठे व्यापारी केंद्र होते. इंग्रजांच्या कारवारच्या वखारीचा सर्व माल खरेदी-विक्री करण्याची बाजारपेठ हुबळीला होती. सरनौबत

प्रतापरावांच्या आदेशानुसार त्यांच्या सैन्याने हुबळीच्या इंग्रज वखारीत पुरुषभर (६ फूट) खोल खणून सापडेल ती लूट नेली. त्यात तांब्याची भांडी, कापड, पोती, मिरी, शिसे, काथ्या, कागदाची रीमे, इत्यादी वस्तूंचा समावेश होता. मराठी सैन्याने प्रतापरावांच्या समोरच कापडाचे तागे बाहेर काढून बाजारात नेले. ही लुटालूट सुरू असताना इंग्रजांचा प्रतिकार झाला नाही. मात्र मराठ्यांच्याच चुकीमुळे त्यांचे २० लोक ठार झाले. वखार खणत असताना इंग्रजांनी तोफा उडविण्यासाठी दारू ठेवलेली होती, त्या ठिकाणाला मराठ्यांच्या हातूनच आग लागली आणि दारूचा स्फोट होवून २० सैनिक होरपळून ठार झाले. या लुटीत प्रतापरावांना इंग्रज वखारीतून ७८९४ होनांची व इतर व्यापाऱ्यांकडून ५२०० रुपयांची मालमत्ता मिळाली.[९९]

दरम्यान मराठे हुबळीत लुटालूट करीत आहेत ही बातमी आदिलशाही सरदार मुजफ्फरखानाला समजली. या प्रदेशाच्या संरक्षणाची व्यवस्था त्याच्याकडे सोपविण्यात आली होती. बातमी समजताच ४–५ हजाराची फौज घेवून तो ताबडतोब हुबळीकडे निघाला. मुजफ्फरखान हुबळीच्या संरक्षणासाठी येतोय ही बातमी समजताच मराठ्यांनी बांधून तयार होते तेवढेच बोजे घेवून माघार घेतली. त्यामुळे कितीतरी माल रस्त्यावर पडून होता.[१००] मुजफ्फरखान हुबळीला पोहोचला त्याच्या एक दिवस अगोदर प्रतापराव निघून गेले होते. त्यामुळे खानाला काहीच करता आले नाही.

प्रतापरावांनी हुबळी येथे केलेल्या इंग्रज वखारीच्या लुटीची नुकसान भरपाई मिळविण्याचा इंग्रजांनी पुढे बराच प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. ३ जून १६७३ रोजी इंग्रजांचा वकील टॉमस निकल्स याने रायगडावर जावून महाराजांची भेट घेतली. या भेटीचा वृत्तांत निकल्सने आपल्या रोजनिशीत लिहिला आहे. तो लिहितो, ''ही हुबळीची लूट तुमच्या संमतीने झाली आहे काय?'' असे विचारताच, ''इंग्रजांना त्रास देण्याबद्दल मी केव्हाच हुकूम दिला नव्हता व त्यांचा आमचा स्नेह आहे'' असे तो (शिवाजी महाराज) म्हणाला. हे ऐकून नुकसान भरपाईबद्दल सामोपचाराने विचारले तेव्हा तो म्हणाला, ''माझे तिकडील लोक अद्यापी त्याच बाजूला आहेत. तिकडील विशेष बातमी किंवा पत्रे मजपुढे नाहीत. कोणाच्या सैन्याने लूट केली, किती लूट झाली ही सविस्तर माहिती मला आधी

मिळविली पाहिजे.'' 'हा सर्व तपशील पुरविला तर भरपाई करून द्याला काय?' असा प्रश्न नंतर मी विचारला. तिकडे कानाडोळा करून त्याने आमच्याकरीता पान मागविले. एकूणच इंग्रजांच्या हुबळीच्या नुकसानभरपाईच्या मागणीकडे महाराजांनी दुर्लक्ष केले. एवढेच नव्हे तर ही लूट आपल्या माणसांनी केल्याचेच अमान्य केले व आपण आपल्या शत्रूच्या देशात न्याय्य युद्ध केले आणि जर शत्रूच्या मुलूखाची लूट केली आणि त्यामध्ये अजाणता इंग्रजांचा माल लुटला गेला. तर त्या गोंधळामध्ये ती लूट आपल्या शिपायांकडून झाली असण्याचा जितका संभव आहे. तितकाच स्थानिक लोकांकडून झाली असल्याचा संभव असल्यामुळे आपला त्याला इलाज नाही असे सांगून लूटीची जबाबदारी झटकली.

हुबळी लुटीच्या नुकसानभरपाईच्या मागणीकडे शिवाजी जर लक्ष देत नसेल तर त्याला त्याबद्दल कशाप्रकारे दंड (शिक्षा) करावा याविषयीची चर्चा पुढे अनेक दिवस इंग्रज पत्रव्यवहारातून चाललेली दिसून येते. कारवारकर इंग्रजांनी १८ जून १६७३ रोजी सुरतकरांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ''तुमच्या २४ तारखेच्या पत्रात शिवाजीला वठणीवर आणण्याचा आपला निश्चय वाचून आनंद झाला. त्याच्या लोकांकडून त्यांनी लुटलेला माल परत मिळविणे तितके सोपे नाही. कारण त्यांची आता पांगापांग झाली आहे आणि ते जवळपास असते तरी त्यांना आपल्या धन्याचे ब्रीद अवगत असल्यामुळे एकदा हाती गेलेला माल ते केव्हाच परत न देते. त्यांनी नकळत आमची वखार इतरांबरोबर लुटली असे म्हणावयास त्यांना तोंडच नाही. कारण अगदी प्रथम ते थेट वखारीवरच आले! सेनापती प्रतापराव याच्यापुढे आमचे कापड भरबाजारात नेले आणि ते आमच्या दलालाला शोधितही होते...राजापूरचे गलबत पकडले ते कळले. असाच काही उपाय केल्याशिवाय गत्यंतर नाही.''[१०१] शिवाजी महाराजांची गलबते पकडून त्यांना वठणीवर आणण्याची भाषा इंग्रज करत असले तरी त्याची अंमलबजावणी करणे त्यांना अनेक कारणांमुळे शक्य झाले नाही.

हुबळी पाठोपाठ प्रतापरावांनी अथणीवरही धाड घातली. तेथील आदिलशाही अधिकारी व गावकरी गाव सोडून पळून गेले.[१०२] प्रतापरावांनी कारवार प्रांतात धामधूम मांडलेली पाहून बहलोलखानाने कोल्हापूर भागात सैन्याची जमवाजमव करून प्रतापरावावर दडपण आणले.

त्यामुळे प्रतापरावांना कोल्हापूर भागाकडे लक्ष देणे भाग पडले. पावसाळा सुरू झाल्याने उभय पक्षाच्या हालचाली जलद गतीने होवू शकत नव्हत्या तरी किरकोळ झटापटी सुरू होत्याच. बहलोलखान पावसाळ्यात मिरजेला होता. यावेळी तो आजारी असल्याने त्याच्या हालचालीही थंडावलेल्या होत्या.

### ६:८:४ कर्नाटक स्वारी (ऑक्टोबर – डिसेंबर १६७३) :

पावसाळा संपताच दख्खनमध्ये मोठी निकराची लढाई करण्याचा माझा विचार आहे असा मनसुबा महाराजांनी इंग्रज वकील निकल्सपुढे जाहीर केला होता. त्यानुसार १६७३ चा पावसाळा संपल्यानंतर विजयादशमीच्या मुहूर्तावर शिवाजी महाराजांनी विजापूरकरांवरील मोहिम पुन्हा सुरू केली. १३ ऑक्टोबर रोजी महाराज साताऱ्यात आले.[१०३] साताऱ्याहून महाराज बंकापूर, हुबळी, काद्रा, कारवार या भागात स्वारीवर गेले. या मोहिमेच्या वेळी विजापूरकरांच्या कर्नाटक प्रदेशातून चौथाई वसूल करण्याची कामगिरी महाराजांनी सरनौबत प्रतापराव यांच्याकडे सोपविली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूरकरांच्या प्रदेशातून चौथाई वसूल करण्यास १६६१ पासूनच सुरूवात केली होती. अर्थातच या वसुलीचे सुरूवातीचे स्वरुप हे लुटीचेच होते. नंतरच्या काळात त्याला चौथाईचे स्वरुप प्राप्त झाले. ही वसुली बळजबरीनेच केली जात असे. बऱ्याच वेळा खंडणीची रक्कम ठरवून दिली जात असे. परंतु ती देण्यास अधिकारी वर्ग टाळाटाळच करत असत. विजापूरकरांच्या हुकेरी परगण्यातील खुद्द वतनदारांवर १० हजार व विलायतीवर (परगण्यातील इतर रहिवासी) १० हजार याप्रमाणे २० हजार खंडणी शिवाजी महाराजांनी आकारली होती. महाराजांनी ही खंडणी नेमकी कधी सुरू केली याविषयी निश्चित माहिती नाही. परंतु इ. स. १६७३ पूर्वी महाराजांच्या कर्नाटकात ज्या स्वाऱ्या झाल्या त्यापैकी कोणत्यातरी एखाद्या स्वारीत ही खंडणी हुकेरी परगण्यावर आकारण्यात आली होती.[१०४] या खंडणीच्या वसुलीसाठी महाराजांनी सरनौबत प्रतापराव गुजरांना रवाना केले. पण योग्य रक्कम हाती न आल्यामुळे त्यांनी हुकेरी येथील देशमुख श्री सिदगौंडा देसाई व मुरारीराव त्रिमल देसकुलकर्णी यांना पकडून आणले व त्यांची रवानगी रायगडावरील कैदखान्यात केली. पुढे

प्रतापरावांच्या मृत्यूनंतर शिवराज्याभिषेकाच्या वेळी सिंहासनपट्टी म्हणून जो कर सर्व वतनदारांवर बसविला होता त्यात ही खंडणी एक वर्षात चार हप्त्यांनी मिळून द्यायची असा करार होवून हुकेरीच्या देशमुख–देशपांड्याची थोडी आगेमागे मुक्तता करण्यात आली.[१०५]

महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने विजापूरकरांची अनेक संपन्न शहरे लुटली व अधिक लूट मिळविण्यासाठी कॅनरात प्रवेश केला. मराठ्यांना रोखण्यासाठी बहलोलखानाने सर्जाखानाची रवानगी केली. चांदगड येथे युद्धाची धुमश्चक्री उडून त्यात सर्जाखानाकडून मराठ्यांचा एक नामांकित सरदार विठोजी शिंदे ठार झाला. मराठ्यांनी सर्जाखानाला मागे रेटले व ते बंकापूरच्या दिशेने सरकले. बंकापूरला बहलोलखानाने मराठ्यांना रोखले. त्यामुळे मराठ्यांना पन्हाळा भागात माघार घ्यावी लागली.[१०६]

### ६:८:५ नेसरीचे युद्ध – प्रतापरावांचा मृत्यू (२४ फेब्रुवारी १६७४) :

उमराणीच्या रणभूमीवर मराठ्यांच्या तावडीत सापडलेल्या बहलोलखानाने प्रतापरावांना विनंती अर्जवे करून स्वत:ची सुटका करून घेतली होती. सुटका होताच तो मराठ्यांवरील मोहिमा नव्या जोमाने चालवू लागला. उमराणीच्या रणमैदानावरून प्रतापराव हुबळी परिसरात मोहिमेवर गेले होते. परंतु बहलोलखानाने कोल्हापूर भागात सैन्याची जमवाजमव करून दबाव आणल्यामुळे प्रतापरावांना आपल्या मुलुखाच्या संरक्षणासाठी जावे लागले. याचदरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांनी बहलोलखानाशी तहाची बोलणी करण्याचा प्रयत्न केला. परंतु बहलोलने त्याला दाद दिली नाही.[१०७] उलट शिवाजी महाराजांच्या ऑक्टोबर १६७३ च्या कर्नाटक मोहिमेतही बहलोलखानाने अडथळे आणले. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज संतापले. त्यांनी सरनौबत प्रतापरावांकडे कडक खलिता रवाना केला. ''तुम्ही लष्कर घेवून जावून बेलोलखाना येतो, याशी गाठ घालून, बुडवून फत्ते करणे. नाही तर तोंड न दाखविणे.''[१०८]

बहलोलखान कोल्हापूरात तळ देवून बसला होता. मुघल सेनापती दिलेरखानही मराठ्यांवर चालून येण्याच्या तयारीत होता. तो येण्यापूर्वी बहलोलखानाचा नि:पात झालाच पाहिजे. नाहीतर मुघल सेनापती दिलेरखान व बहलोलखान एक झाले तर महाराजांच्यापुढे

मोठेच संकट निर्माण होणार होते. त्यामुळे दिलेरखान बहलोलखानाच्या मदतीला येण्यापूर्वीच बहलोलखानाचा बंदोबस्त करणे गरजेचे होते. प्रतापवराव त्याचा योग्य समाचार घेतील ही खात्री महाराजांना होती. परंतु प्रतापरावांना डिवचण्याकरिता म्हणून महाराजांनी असा कडक निरोप पाठविला असावा.

महाराजांचा संताप प्रतापराव समजू शकत होते. बहलोलखानाला सोडून देण्याची चूक केल्याबद्दल ते स्वत:च खजिल झाले असावेत. या आपल्या चुकीचे दुष्परिणाम गेले अनेक दिवस महाराजांसह अनेक मराठा सैनिकांना आणि खुद्द प्रतापरावांनाही भोगावे लागले होते. त्यामुळे आता यावेळी ही चूक होवू द्यायची नाही, व महाराजांनी सोपविलेली कामगिरी फत्ते करावयाचीच या निश्चयाने प्रतापराव कामाला लागले. यावेळी प्रतापरावांबरोबर १० हजार लष्कर होते.[१०९] इतक्यात जासूदांनी बातमी आणली की, बहलोलखानाचा तळ गडहिंग्लज परिसरात पडलेला असून त्याच्याबरोबर मोठी फौज आहे.

सरनौबत प्रतापराव आपल्या सैन्यासह गडहिंग्लजच्या दिशेने दौडत निघाले. कोल्हापूरच्या दक्षिणेस ४० मैलावर असलेल्या नेसरी येथील खिंडीत प्रतापरावांची बहलोलखानाशी गाठ पडली. युद्धाच्या दृष्टीने ही जागा मराठ्यांना सोयीची नव्हती. खिंड अरुंद होती. प्रतापराव मोजक्याच सैन्यानिशी तेथे पोहोचले होते. बाकीचे सैन्य आनंदरावाच्या नेतृत्वाखाली अजून मागून येत होते. परंतु हे सैन्य येईपर्यंत बहलोलखान निसटून जाण्याची शक्यता होती. त्यामुळे उत्तेजित झालेल्या प्रतापरावांनी आपल्या बरोबरच्या थोड्याच सैन्यानिशी मोठ्या आवेशाने खानावर हल्ला चढविला.[११०] शत्रूचे सैन्य फार मोठे होते याचा त्यांनी विचारही केला नाही. शत्रूसैन्य प्रबळ असले म्हणजे त्याला आपल्या अंगावर घेवून त्याच्यापुढे आपला मोड झाला असे दर्शवून पळून जाण्याचे नाटक करावे आणि शत्रूचे सैन्य विस्कळीत होवून पाठीशी लागले म्हणजे त्यावर अकस्मात उलटून एकजूट होवून शत्रूचा फडशा उडवून द्यावा. हा गनिमी कावा प्रतापरावांनी यावेळी केला नाही आणि उतावीळपणे शत्रूवर हल्ला केला. प्रतापराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयत्नांची शर्थ केली परंतु मोठ्या फौजेपुढे त्यांचा निभाव न लागून प्रतापराव व त्यांचे सहा शूर सहकारी धारातीर्थी पडले. या

युद्धाविषयी इंग्रजांचा वकील नारायण शेणवी याने ५ एप्रिल १६७४ रोजी इंग्रज गव्हर्नरला पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, ''शिवाजीचे सैन्य आणि बहलोलखान याची दोन डोंगराच्या मध्ये अरुंद जागेत गाठ पडून चकमक उडाली. या चकमकीत बाकीच्या सैन्याची अडचणीच्या वेळी मदत न आल्याने प्रतापराव सहा घोडेस्वारासह पडला.''[१११] आनंदरावाच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या तुकडीची मदत येवून पोहोचण्यापूर्वीच प्रतापराव पडले. सेनापती पडला हे पाहून मराठ्यांचे धैर्य खचून ते पळत सुटले. पळालेले मराठे थेट पन्हाळा किल्ल्याच्या आश्रयाला गेले.[११२]

प्रतापराव गुजरांचे महानिर्वाण झाले ती तिथी होती माघ वद्य १४ शके १५९५ म्हणजेच मंगळवार दि. २४ फेब्रुवारी १६७४. जेधे शकावलीत पुढीलप्रमाणे नोंद आहे. ''शके १५९५ प्रमादी (नाम) संवछरे माघ वद्य १४ सिवरात्रीस बहलोलखान व प्रतापराव सरनोबत यांचा झगडा निवटियास (नेसरी) झाला. प्रतापराव पडिले.''[११३]

सरनौबत प्रतापरावांच्या मृत्युची बातमी आनंदरावाने रायगडावर महाराजांना कळविली. ही बातमी ऐकून महाराज अत्यंत दु:खी झाले आणि उद्‌गारले की, ''आज एक बाजू पडली. प्रतापराव यास आपण लिहून पाठविले की, फत्ते न करता तोंड दाखवू नये. त्यासारिखे करून बरे म्हणविले.'' आता लष्कराची व्यवस्था कशी करावी? सरनौबत कुणाला करावा याचा विचार सुरू होता. नवा सरनौबत नेमून, सैन्याला नवे हुकूम देण्यासाठी महाराज कुडाळला जाणार होते. परंतु याचवेळी प्रतापरावांचा सहाय्यक आनंदराव मकाजी यानी धीराचे पत्र लिहिल्यामुळे महाराजांनी त्यांना सेनापतीपद देवून 'शत्रूचा मोड केल्याशिवाय तोंड दाखवू नये' असा हुकूम केला.''[११४]

महाराजांची आज्ञा मिळताच शूर आनंदराव बहलोलखानाचा पाठलाग करीत शत्रूच्या मुलखात शिरले. एवढ्यात प्रतापरावाच्या मृत्युची बातमी ऐकून मुघल सेनापती दिलेरखानही बहलोलखानाच्या मदतीला आला. दोघेही शत्रू एकत्र आल्याने आपली धडगत नाही असे पाहून आनंदराव रोज ४५ मैलाची मजल मारीत त्वरेने कानडी मुलूखात घुसले. दिलेर व

बहलोल खानाने पाठलाग करूनही ते आनंदरावाला गाठू शकले नाहीत. परिणामी दिलेरखान पन्हाळ्याला वेढा घालण्यासाठी तर बहलोलखान कोल्हापूरला निघून गेला.

दरम्यान आनंदराव बहलोलच्या जहागिरीत घुसले व त्यांनी बंकापूरपासून २५ मैलावर असलेला पेंच नावाचा खानाच्या जहागिरीतील गाव लुटला. २२ मार्च १६७४ रोजी त्यांनी संपगावची पेठही लुटली.[११५] ही लूट ३००० बैलांवर लादून आनंदराव परत फिरले. ही बातमी समजताच बंकापूरजवळ बहलोलखान व खिदरखान यांनी त्यांना रोखले. तेथेच दोन्ही सैन्यात घनघोर युद्ध झाले. आनंदरावांच्या नेतृत्वाखाली मराठी सैन्याने विजापूरी सैन्याचा पार धुव्वा उडविला. खिदरखानाचा भाऊ मारला जावून मराठ्यांना ५०० घोडे, २ हत्ती, इत्यादी भरपूर लूट मिळाली. ही सर्व लूट आनंदरावांनी सुरक्षितपणे महाराजांकडे पोहोच केली.[११६] बहलोलखान व सिखदरखान पळून गेले. अशा प्रकारे आनंदरावांनी बहलोलखानाला रोखण्यात काही प्रमाणात यश मिळविले. परंतु बहलोलखानाचा पूर्ण नि:पात करण्याचे प्रतापरावांचे स्वप्न मात्र पूर्ण होवू शकले नाही.

## ६:९ प्रतापरावांचे वंशज :

सरनौबत प्रतापरावांच्या कुटुंबियांविषयी ऐतिहासिक साधनामध्ये फार थोडी माहिती सापडते. प्रतापरावांना नागोजी, खंडेराव व जगजीवन ही तीन मुले व जानकीबाई ही कन्या अशी एकूण ४ अपत्ये असल्याचे विश्वसनीय कागदपत्रांच्या आधारे सांगता येते. याशिवाय राजारामकाळात मराठा आरमाराचे प्रमुख असलेले शिदोजी गुजरही प्रतापरावाचे पुत्र होते असे चिटणीस बखरीत म्हटले आहे.

नागोजी हे प्रतापरावांचे वडील पुत्र असावेत. प्रतापरावांच्या मृत्युनंतर जवळजवळ दोन वर्षांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत कऱ्हाड परगण्यातील पाली येथे खराडे व काळभोर यांच्यातील पाटीलकीच्या वादाचा निवाडा होवून महजर झाला. या निवाड्याच्या वेळी हाजिरमजालसीत नागोजी गुजरही उपस्थित होते. या निवाड्याच्या महजरावर नागोजी गुजर याच्या नावाखाली प्रतापरावांचा चौकोनी शिक्का उमटविलेला दिसतो.[११७] यावरून नागोजी गुजर स्वराज्यकार्यात सहभागी असावेत असे दिसते. नागोजी गुजर यांनी

महाबळेश्वरचे तीर्थपुरोहित लिंगणभट यांना लिहिलेले पत्र उपलब्ध असून या पत्रात लिंगणभटाचे तीर्थपुरोहितपण देवाचा नित्य अभिषेक चालवू असा मजकूर आहे. प्रतापरावांच्या मृत्युनंतर हे पत्र लिहिलेले आहे.[११८] प्रतापरावांच्या मृत्युनंतर त्यांचे मोठे पुत्र या नात्याने वडिलांच्या काळातील सर्व रीतीरिवाज चालविले जातील असे आश्वासन नागोजींनी लिंगणभटांना दिले आहे.

प्रतापरावांची कन्या जानकीबाईला छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली सून करून घेतले. खंडेराव व जगजीवन हे प्रतापरावांच्या मृत्युनंतर छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात सातारा जिल्ह्यातील परळी येथे देशमुखी वतनावर कार्य करीत होते. इ. स. १६९७ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी या दोन्ही बंधूंना त्यांच्या सेवेबद्दल परळी तालुक्यातील मौजे नित्रळ हे गाव देशमुखी वतनास वंशपरंपरा इनाम म्हणून दिले.[११९]

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर इ. स. १७०० मध्ये औरंगजेब बादशहा सातारा व परळी हे किल्ले जिंकण्यासाठी स्वत: या परिसरात आला. याकाळात खंडेराव व जगजीवन हे मुघलांच्या कैदेत असलेले दिसतात. २७ मे १७०० रोजी लिहिलेल्या मुघल दरबाराच्या बातमीपत्रात असा उल्लेख आढळतो की, ''बादशहा मुखलिसखानाला म्हणाले, इस्लामपुरी (ब्रह्मपुरी)चा किल्लेदार बशारतखान याला पुढीलप्रमाणे लिहावे; नरकवासी रामा (राजाराम) याचे मेहुणे हे मुसलमान होण्याची इच्छा करतील तर त्यांना शहजादा बेदरबख्त याजपाशी पाठवावे नाहीतर त्यांना कैदेत ठेवावे.''[१२०]

याचा अर्थ औरंगजेबाने त्यांच्यासमोर धर्मांतराचा प्रस्ताव ठेवला होता. अर्थात हा प्रस्ताव कैदेतून मुक्त होण्यासाठी होता की अन्य कोणत्या कारणासाठी होता हे स्पष्ट होत नाही. मल्हार रामराव चिटणीसाने लिहिलेल्या छत्रपती राजाराम महाराज यांच्या चरित्रात शाहू राजांच्या तोंडी अशी वाक्य घातली आहेत की, ''पादशहा आम्हास मुसलमान करितो, अशी गोष्ट एक दोन वेळ जाहली असता, प्रतापजी गुजर यांचे चिरंजीव खंडेराव, राजाराम साहेब यांचा मेहुणा, आमचा मामा आम्हाबद्दल मुसलमान जहाला. आम्हासही करणार परंतु बेगम यांनी वाचविले.''[१२१]

चिटणीस बखरीनुसार मुघलांच्या छावणीत असताना युवराज शाहूराजांनी इस्लामची दीक्षा घेवून मुसलमान धर्म स्वीकारावा असा औरंगजेबाचा आग्रह होता. पण त्याची मुलगी झिनतुन्निसा बेगम हिने त्याला विरोध केला. यावेळी शाहूराजांच्या बदल्यात प्रतापराव गुजरांचा मुलगा खंडेराव हा मुसलमान झाल्यामुळे शाहूराजांवरील संकट टळले. प्रत्यक्षात मात्र प्रतापरावांची दोन्ही मुले खंडेराव व जगजीवन यांनी मुस्लिम धर्म स्वीकारल्याचा उल्लेख मोगल दरबाराच्या अखबारात आढळतो.

१३ जुलै १७०० रोजीच्या मोगल दरबाराच्या अखबारात पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो,

''नरकवासी रामा (राजाराम) याचे मेहुणे (बायकोचा भाऊ) खंडूराव व जगन्नाथ हे शहजादा बेदारबख्त याच्या हुजूरात मुसलमान झाले. ते यावेळी इनायतुल्लाखानाच्या मध्यस्थीने बादशहाच्या हुजूरात आले. बादशहांनी खिलतची वस्त्रे देवून त्याला अब्दुर्रहीम व अब्दुर्रहमान ही नावे दिली.''[१२२]

अखबारातील वृत्तांतानुसार हे धर्मांतर २७ मे १७०० ते १३ जुलै १७०० या दरम्यानच्या काळात झाले असावे. पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या काळात खंडेराव (अब्दुर्रहिम) याला परत स्वधर्मात घेण्यासाठी छत्रपती शाहू व इतर मंडळीही तयार होती. परंतु खंडेरावाने आपल्या मुस्लिम पत्नीलाही हिंदू करून घेण्याचा आग्रह धरला. खंडेरावाचा हा आग्रह मान्य करण्याइतकी तत्त्कालीन समाजाची मानसिकता नव्हती. बाटलेल्या हिंदूला शुद्ध करून पुन्हा हिंदूधर्मात घेण्याचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केला होता. बाटून मुसलमान झालेल्या नेताजी पालकरांना त्यांनी पुन्हा हिंदूधर्मात घेतले होते. त्यामुळे खंडेरावाला हिंदूधर्मात घेण्यास ही मंडळी तयार होती. परंतु जन्माने मुस्लिम असलेल्या त्यांच्या पत्नीला हिंदू करून घेण्यास ती तयार नव्हती. त्यामुळे खंडेरावाला स्वधर्मात घेण्याची गोष्ट तशीच राहिली. मात्र जगजीवन यांची वंशावळ पुणे पुरालेखागारातून मला मिळाली असून त्यामध्ये त्यांच्या वंशजांची नावे हिंदू लोकांप्रमाणेच ठेवलेली दिसतात.[१२३] त्यावरून जगजीवन याला हिंदू करून घेतले असावे असे दिसते. ही वंशावळ जगजीवन याचे पणतू राजजी आपाजी गुजर यांनी इनाम कमिशनला ४ ऑगस्ट १८५५ रोजी लिहून दिलेल्या कैफियतीला

जोडलेली आहे व त्यामध्ये सरनौबत प्रतापराव गुजर यांचे वडील अर्जोजीराव यांच्यापासून सुरूवात असून प्रतापरावांचा मुलगा जगजीवन याच्या वंशजांची नावे दिली आहेत. यामुळे गुजर घराण्याच्या एका शाखेचीच माहिती यामध्ये मिळू शकते.

## ६:१० प्रतापरावांची कन्या जानकीबाई शिवछत्रपतींची सून :

सरनौबत प्रतापराव गुजर यांनी आयुष्यभर एकनिष्ठेने केलेली स्वराज्याची सेवा आणि स्वराज्यासाठी केलेले आत्मसमर्पण महाराज विसरले नव्हते. प्रतापरावांच्या ऋणातून अंशत: का होईना मुक्त होण्यासाठी त्यांच्या मृत्युनंतर त्यांची कन्या जानकीबाई हिचा विवाह राजारामाशी करून महाराजांनी तिला सून म्हणून आपल्या घरी आणले. सेनापतीची मुलगी छत्रपतींची सून झाली.

१३ जानेवारी १६८० रोजी पन्हाळा किल्ल्यावर शंभूराजांची भेट घेवून महाराज रायगडावर परतले. यानंतर लवकरच म्हणजे फाल्गुन वद्य द्वितीयेला (७ मार्च १६८०) राजारामाची मुंज झाली व लगेच दशमीला म्हणजे १५ मार्च १६८० रोजी राजारामांचा जानकीबाईशी विवाह संपन्न झाला.[१२४] या विवाहानिमित्त रायगडावर मोठा महोत्सव साजरा करण्यात आला.

या विवाहानंतर केवळ १८ दिवसांनी दि. ३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे देहावसान झाले. त्यामुळे जानकीबाईंना महाराजांचा सहवास लाभला नाही. जानकीबाई ही खरोखरच एक दुर्देवी आणि उपेक्षित स्त्री ठरली. आजपर्यंतच्या इतिहासात लग्नानंतर काही दिवसात जानकीबाईचा मृत्यू झाला असे मानले जात होते. परंतु प्रत्यक्षात ती किमान १७१८-१९ पर्यंत तरी जिवंत होती आणि मुघलांच्या कैदेत राणी येसूबाई हिच्याबरोबर तुरुंगवास भोगीत होती. हे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी पुराव्यानिशी दाखवून दिले आहे. १६८९ मध्ये रायगडचा पाडाव झाला त्यावेळी राणी येसूबाई, शाहूराजे व राजपरिवारातील इतर मंडळींबरोबर जानकीबाईलाही कैद करून बादशाही छावणीत नेण्यात आले.[१२५] पुढे १७१८ पर्यंत छत्रपती शाहूंचे पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनी सर्व राजबंद्यांची मुघल कैदेतून सुटका करेपर्यंत जानकीबाई मोगलांच्या कैदेतच राहिली

होती.[१२६] ३० वर्षे कैदेत राहिलेल्या दुर्देवी जानकीबाईचा मृत्यू केव्हा झाला याविषयी मात्र इतिहासात कुठेच उल्लेख सापडत नाही.

## ६:११ मुद्रा :

सरनौबत प्रतापराव गुजर यांच्या दोन मुद्रा उपलब्ध झाल्या आहेत. (मुद्रा म्हणजे नावाचे शिक्के) या दोन्ही मुद्रा चौकोनी आहेत. ३ नोव्हेंबर १६७२ रोजी प्रतापरावांनी पंढरपूर जवळील कासेगाव कर्यातीचे देशमुख गोदजी देशमुख यांना पाठविलेल्या पत्रावर एक मुद्रा आढळते. ही मुद्रा पुढीलप्रमाणे आहे –

'श्रीशिव सेनानेर्तु र्मुद्रा जयति प्रतापरायश्य'[१२७]

| |
|---|
| श्रीशिवसे /नाने |
| र्तुर्मु / द्रा जयति |
| प्रतापरायश्य |

दुसरी मुद्रा प्रतापराव गुजरांच्या निधनानंतर झालेल्या एका महजरावर सापडली आहे. तत्कालीन कराड परगण्यातील खंडोबाची पाली (सध्याचा सातारा जिल्हा) येथील खराडे व काळभोर यांच्यात गावच्या पाटीलकीचा वाद होता. त्याचा निवाडा १ फेब्रुवारी १६७६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या उपस्थितीत खंडोबाची पाली येथे होवून महजर झाला. हा महजर खराडे व काळभोर यांच्यातील वादाचे निवाडापत्र असून त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अष्टकोनी शिक्का आहे. या महजरातील हजीर मजालसीत नागोजी गुजर हा हजर असून त्याच्या नावाखाली प्रतापरावांची ही मुद्रा उठविलेली आहे. ही मुद्रा पुढीलप्रमाणे आहे –

'श्री शिव सेनाधिप मुद्रा
जयति सुभद्रा प्रतापरायश्य'[१२८]

| |
|---|
| श्री शिवसेना |
| धिपमुद्रा / ज |
| यति सुभद्रा प्रतापरायश्य |

वरील महजर १६७६ मधील असून यावेळी प्रतापराव गुजर हयात नव्हते. त्यांच्या पश्चात नागोजी गुजरने हा शिक्का निवाडापत्रावर उमटवलेला आहे. नागोजी गुजर हा प्रतापरावांचा मुलगा होता.

प्रतापराव गुजरांचे मोर्तबही दोन प्रकारचे आढळतात. मोर्तब म्हणजे मर्यादा मुद्रा किंवा समाप्ती मुद्रा होय. एक मोर्तब चौकोनी असून दुसरा षटकोनी आहे. वर उल्लेखलेल्या ३ नोव्हेंबर १६७२ च्या प्रतापरावांच्या पत्राच्या शेवटी




असा चौकोनी मोर्तब आहे. २४ एप्रिल १६६८ रोजी शिरवळ येथील केदारेश्वर मंदिरात प्रतापरावांच्या मुख्य उपस्थितीत गोतसभा भरली होती. या सभेत पुणे परगण्यातील नीरथडी तर्फेतील ६ गावाच्या ज्योतिष  कुलकर्णी विषयी वादाचा निवाडा झाला. या निवाड्याचा पूर्ण महजर मिळाला नाही. त्याचे फक्त ४ बंद मिळाले आहेत. त्यातही पहिला बंद मिळाला नाही. तो मिळाला असता तर त्यावर प्रतापरावांची मुद्रा मिळाली असती. या महजरात ठिकठिकाणी व शेवटी




असे षटकोनी मोर्तब उमटविलेले आहे. ते प्रतापरावांचेच असावेत कारण या महजरात प्रतापरावांना सभानायक असा उल्लेख केलेला आहे.[१२९]

## ६:१२ समारोप :

सरनौबत प्रतापराव गुजर हे छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनापती अत्यंत शूर, पराक्रमी, धाडसी तितकेच दिलदार आणि स्वराज्यासाठी प्राणार्पण करायलाही तयार असणारा स्वामिनिष्ठ सेवक. प्रतापरावांच्या अंगी असलेले हे गुण पाहूनच महाराजांनी त्यांची सरनौबतपदी नियुक्ती केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी सामान्य माणसांमधून अनेक रणझुंझार योद्धे निर्माण केले. यापैकीच प्रतापराव गुजर हे एक होत. महाराजांच्या प्रेरणेने

आणि आपल्या पराक्रमाने सामान्य कुटूंबात जन्मलेले प्रतापराव स्वराज्याच्या लष्करातील सरनौबत या सर्वोच्च पदी विराजमान झाले.

इ. स. १६६६ ते १६७४ हा प्रतापरावांचा सरनौबतपदाचा कालखंड होय. या ८ वर्षाच्या काळात अनेक युद्धाचे नेतृत्व करून त्यांनी आपल्या तळपत्या तलवारीच्या तेजाचे दर्शन घडविले. इ. स. १६६६ मध्ये आग्राहून आल्यानंतर महाराजांना शांतता हवी होती म्हणून त्यांनी मुघलांशी शांतता तह केला. याकाळात महाराजांचे धोरण बचावात्मक असल्यामुळे युद्धाचे प्रसंग फारसे आले नाहीत. १६६९ च्या उत्तरार्धात मुघलांशी झालेला तह संपुष्टात आला आणि महाराजांच्या आदेशानुसार प्रतापरावांनी मुघल प्रदेशात आक्रमण करून लुटालूट करायला सुरूवात केली. प्रतापरावांची धडक एवढी जबरदस्त होती की, त्यांच्या झंझावातामुळे मुघल अधिकाऱ्यांची अक्षरशा दुर्दशा झाली.

आपल्या सेनापतीपदाच्या काळात प्रतापरावांनी अनेक लढाया दिल्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली सुरतेची लूट घेवून जाताना मुघलांशी झालेल्या कांचनबारीच्या लढाईत (वणी – दिंडोरी) सरनौबत प्रतापरावांनी आपल्या पराक्रमाचे दर्शन घडविले आणि मराठ्यांना विजयी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रत्यक्ष सहभाग असलेल्या या संग्रामात प्रतापरावांचे युद्धकौशल्य पाहून महाराजांना निश्चितच कौतुक वाटले असावे. आणि आपल्या या निधड्या छातीच्या सेनापतीचा अभिमानही वाटला असावा. कांचनबारीची लढाई ही मुघलांशी समोरासमोर लढली गेलेली पहिली लढाई होती. यात मराठे विजयी झाले असले तरी प्रतापरावांनी पुढीलकाळात गनिमी कावा युद्धतंत्राचा वापर करून यश मिळविले आहे. साल्हेरीचा रणसंग्राम हे प्रतापरावांच्या गनिमी कावा युद्धतंत्राच्या वापराचे उत्कृष्ट उदाहरण आहे. साल्हेरीच्या किल्ल्याला वेढा देवून बसलेल्या मुघल सैन्याला त्यांनी वेढा उठवून आपला पाठलाग करण्यास भाग पाडले आणि विस्कळीत झालेल्या मुघल सैन्यावर अचानक उलटून हल्ला चढविला. प्रतापरावांचा हा कावा लक्षात येईलपर्यंत मुघल सैन्य पराभूत झाले होते. याबाबतीत त्यांनी आपल्या धन्याच्या म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्याच युद्धतंत्राचे अनुकरण केलेले दिसते.

सैन्याच्या जलद हालचाली हे महाराजांप्रमाणे प्रतापरावांच्याही यशाचे गमक होते. मुघली प्रदेशात लुटालूट करायला गेलेले प्रतापराव असोत किंवा आदिलशाही सरदार बहलोलखानाला कोंडीत पकडण्यासाठी गेलेले प्रतापराव असोत त्यांच्या सैन्याच्या हालचाली या नेहमीच गुप्त आणि जलदगतीने झालेल्या दिसतात. बहलोलखानाला काही कळण्याच्या अगोदरच प्रतापरावांनी जलद हालचाली करून आपले लष्करी पाश त्याच्या गळ्याभोवती घट्ट आवळले होते. हे पाश इतके घट्ट होते की, यातून सुटण्यासाठी बहलोलखानाला प्रतापरावांना शरण जावे लागले.

रणांगणावर शत्रूसाठी साक्षात काळ भासणारा हा महापराक्रमी सेनापती मनाने मात्र अतिशय दिलदार असावा. नाहीतर पूर्णपणे कोंडीत सापडलेल्या बहलोलखानाला त्यांनी सोडून दिलेच नसते. तेही धन्याची आज्ञा नसताना. महाराजांची परवानगी न घेता प्रतापरावांनी बहलोलला सोडून देण्याचा निर्णय का घेतला असावा? कदाचित साल्हेरीचे उदाहरण त्यांच्या डोळ्यासमोर असावे. साल्हेरीच्या युद्धात पराभूत होवून पकडल्या गेलेल्या इखलासखान मियाना, मुहकमसिंग इत्यादी सरदारांना महाराजांनी नंतर सन्मानाने सोडून दिले होते. त्यामुळेच आदिलशाही सैन्याला मराठी तलवारीचे पाणी पाजले ते पुष्कळ झाले असे वाटून त्यांनी बहलोलखानाला सोडले असावे. कारण काहीही असो याठिकाणी प्रतापराव चुकले हे निश्चित. प्रतापराव स्वराज्याचे सेनापती होते. बहलोलखानाला कैदेत ठेवायचे की सोडून द्यायचे हे ठरविण्याचा अधिकार छत्रपतींचा होता. त्यानुसार प्रतापरावांनी बहलोलला शिवाजी महाराजांसमोर हजर करायला हवे होते. परंतु तसे नकरता त्यांनी परस्परच बहलोलखानाला सोडून दिला आणि उमराणीच्या रणांगणावर पराक्रम गाजवून कौतुकाचे धनी होण्याऐवजी ते महाराजांच्या रोषाचे धनी ठरले.

कोष (खजिना) व सेना ही कोणत्याही राज्याची प्रमुख बलकेंद्रे असतात. भारतीय राज्यशास्त्राचे प्रणेते कौटिल्य यांनी सेनेपेक्षाही कोषाला अधिक महत्त्व दिले आहे. कोष नसला तर एकनिष्ठ सैन्यही विरोधक बनून राजसत्ता उलथून टाकण्यास तयार होते. राजनीतीच्या या सुत्राला अनुसरून छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला कोष नेहमी समृद्ध असला पाहिजे

याकडे कटाक्षाने लक्ष दिलेले दिसते. यासाठी त्यांनी शत्रूप्रदेशातून महत्त्वाची नगरे लुटण्यावर भर दिलेला दिसतो. प्रतापराव गुजर सरनौबत झाल्यानंतर शत्रूप्रदेशात घुसून खंडणीगोळा करून किंवा नगरे लुटून स्वराज्याचा कोष समृद्ध ठेवण्याची कामगिरी त्यांनी उत्कृष्टपणे बजावलेली दिसते. महाराजांच्या नेतृत्वाखाली सुरत, कारंजा यासारखी मुघलांची नगरे लुटून त्यांनी प्रचंड संपत्ती स्वराज्यात आणली. आदिलशाही राज्यातील हुबळी, अथणी इत्यादी समृद्ध शहरे त्यांनी लूटली. याशिवाय शत्रूच्या प्रदेशातून चौथाई किंवा खंडणी वसूल करण्यासाठी शत्रूच्या प्रदेशात घुसून मिळालेली लूट सुरक्षितपणे आणण्याचे तंत्र त्यांनी चांगलेच अवगत केलेले दिसते. चौथाई वसूल केलेल्या प्रदेशाला पुन्हा त्रास दिला जावू नये म्हणून प्रतापरावांनी पावती देण्याची पद्धत सुरू केली. स्वराज्य रक्षणासाठी शत्रूप्रदेशाची लूट करणे अपरिहार्य असले तरी प्रतापरावांनी महाराजांनी घालून दिलेल्या नियमांच्या चौकटीत राहूनच ही कामगिरी उत्तम रीतीने पार पाडली.

आपल्या धन्याविषयी अपरांपार श्रद्धा हा स्वामिनिष्ठ प्रतापरावांचा आणखी एक गुणविशेष होय. महाराजांवरील या श्रद्धेमुळेच बहलोलखानाला सोडून दिल्याबद्दल महाराज आपल्यावर चिडलेत हे समजताच प्रतापरावांना त्यांच्यापुढे जाण्याचे धाडस झाले नाही. शत्रूप्रदेशात धडक मारून त्यांनी आपली चूक सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु या मोहिमेत दुर्दैवाने त्यांना म्हणावे तितके यश आले नाही आणि अखेर या चुकीचे परिमार्जन करण्याच्या प्रयत्नांतच नेसरीच्या युद्धात त्यांना आपले प्राण गमवावे लागले.

प्रतापरावांच्या शेवटच्या नेसरीच्या रणसंग्रामाविषयीचे गूढ मात्र आजही पुरेशा पुराव्याअभावी  कायम आहे. महाराजांचे बोल मनाला लावून प्रतापरावांनी अविचाराने केवळ सहा सहकाऱ्यानिशी बहलोलखानावर नेसरीच्या खिंडीत हल्ला चढविला आणि शत्रूसैन्याशी झालेल्या चकमकीत आपल्या सहा सहकाऱ्यांसह मारले गेले असे मानले जाते. या प्रसंगाला अनुसरून 'वेडात दौडले वीर मराठे सात' ही कविताही प्रसिद्ध आहे. परंतु हे मत तितकेसे बरोबर वाटत नाही. प्रतापरावांनी खरोखरच अविचाराने केवळ सहा सहकाऱ्यांसह हल्ला केला होता का? या लढाईविषयी ४ एप्रिल १६७४ रोजी इंग्रजांचा वकील नारायण शेणवी याने

पाचाड येथून मुंबईच्या डे. गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रात उल्लेख आढळतो. हे पत्र प्रतापरावांच्या मृत्युनंतर साधारण ४० दिवसांनी लिहिलेले आहे. त्यात नारायण शेणवी लिहितो,

''शिवाजी राजे कुडाळला आपल्या सैन्याला सूचना देण्यासाठी आणि घोडदळावर प्रतापरावाच्या जागी नवा सेनापती नेमण्यासाठी जाणार आहे. शिवाजीचे सैन्य आणि बहलोलखान यांची दोन डोंगराच्या मध्ये अरुंद जागेत गाठ पडून चकमक उडाली. या चकमकीत बाकीच्या सैन्याची अडचणीच्या वेळी मदत न आल्यामुळे प्रतापराव सहा घोडेस्वारासह पडला. बहलुलखानाचा विजय झाला.''

नारायण शेणवीच्या वरील पत्रावरून स्पष्ट होते की, शिवाजीच्या सैन्याची व बहलोलखानाची दोन डोंगराच्या मध्ये अरुंद जागेत चकमक उडाली आणि या अडचणीच्या वेळी बाकीच्या सैन्याची मदत न मिळाल्याने प्रतापराव सहा घोडेस्वारासह पडले. या पत्रात शिवाजीचे सैन्य आणि बहलोलखाना यांची चकमक उडाली असे स्पष्ट म्हटले आहे. याचा अर्थ प्रतापरावांच्या बरोबर केवळ सहा सहकारी नाहीत तर सैन्यही बरोबर आहे. ही सैन्य संख्या कदाचित खानापेक्षा पुष्कळच कमी असू शकेल. परंतु केवळ प्रतापरावासहित सातजण तर निश्चित नाहीत. शिवाय या पत्रात कुठेही प्रतापरावांनी सहा सहकाऱ्यांनिशी हल्ला चढविला असा उल्लेख नाही. त्याऐवजी दोन्ही सैन्याची गाठ पडून चकमक उडाली असे म्हटले आहे. सभासद बखरीत नेसरीवर नबाब आला. त्याने गाठिले, मोठे युद्ध झाले, रक्ताच्या नद्या वाहिल्या असे वर्णन आढळते. सभासदाने नेसरी येथे आलेल्या बहलोलखानाने प्रतापरावांना गाठले असे म्हटले आहे. प्रतापराव चालून गेले असे म्हटलेले नाही. शिवाय त्याने मोठे युद्ध झाल्याचे सांगितले आहे. प्रतापराव जर सहा सहकाऱ्यानिशी चालून गेले असतील तर मोठे युद्ध होण्याचा आणि रक्ताच्या नद्या वाहण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. हजारोंच्या संख्येने असलेल्या बहलोलखानाच्या सैन्यापुढे या सातजणांचा किती वेळ निभाव लागणार होता?

शेणवीचे पत्र हा नेसरीच्या युद्धासंबंधीचा समकालीन विश्वसनीय पुरावा आहे. घटनेनंतर थोडेच दिवसात तो मराठ्यांची राजधानी रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड या गावी मुक्कामाला आहे. घटना नुकतीच घडलेली असल्यामुळे त्याविषयीची मराठा

सरदाराकडून कळालेली माहिती त्याने  इंग्रजांना कळविली आहे. त्यामुळे या पत्रातील माहिती विश्वसनीय मानावयास काहीच हरकत नाही. यावरून निश्चितपणे असे म्हणता येईल की, बहलोलखानाशी प्रतापरावांचा झालेला संघर्ष म्हणजे महाराजांचे बोल मनाला लावून अविचाराने केलेले कृत्य नाही. प्रतापरावासारखा कसलेला आणि अनेक युद्धाचे अनुभव गाठीशी असलेला सेनापती केवळ सहाजणांसह चालून जाण्याचा वेडेपणा करेल ही गोष्ट अशक्य वाटते.

मात्र नेसरीच्या युद्धात प्रतापरावांचे सर्व सैन्य त्यांच्याबरोबर नव्हते हे ही तितकेच खरे आहे. बाकीचे सैन्य खिंडीत येण्यापूर्वीच या संघर्षाला सुरूवात झाली. याची कारणे अनेक असू शकतात. एकतर शत्रूनेच अचानकपणे हल्ला चढविला असावा किंवा खान हातातून निसटतोय असे वाटल्यावरून प्रतापरावांनी बाकीचे सैन्य पाठीमागून येतय तोपर्यंत खानाला रोखून धरावा या उद्देशाने संघर्षाला सुरूवात केली असावी. कारण काहीही असो. प्रतापरावांनी आपल्याबरोबरच्या सैन्यानिशी युद्धाला सुरूवात केली. परंतु बाकीचे सैन्य मात्र या अडचणीच्यावेळी तेथे पोहोचू शकले नाही. परिणामी सरनौबत प्रतापराव गुजर पराक्रमाची शर्थ करूनही नेसरीच्या या रणसंग्रामात धारातीर्थी पडले. आणि बहलोलखानाचा नि:पात करून किंवा त्याला कैद करून महाराजांसमोर हजर करून आपल्या चुकीचे परिमार्जन करण्याची त्यांची इच्छा अपूर्णच राहिली. यावेळी रायगडावर शिवराज्याभिषेकाची तयारी सुरू होती. आपली कामगिरी फत्ते करून या महन्मंगल समारंभासाठी रायगडावर जाण्याचे वेध प्रतापरावांना लागले होते. आपला धनी छत्रपती झाल्याचे कौतुक त्यांना डोळे भरून पहायचे होते आणि स्वराज्याचा पराक्रमी सेनापती म्हणून ताठ मानेने समारंभात मिरवायचे होते. परंतु दुर्देवाने प्रतापरावांचे हे स्वप्नही पूर्ण होवू शकले नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांना आपल्या या रणझुंझार सेनापतीच्या मृत्यूने अतिशय दु:ख झाले. सभासदाने वर्णिल्याप्रमाणे 'आज एक बाजू पडली' ही भावना महाराजांच्या मनामध्ये निश्चितच असणार. स्वराज्याचे हे शिवधनुष्य पेलण्याच्या कामी स्वामिनिष्ठ प्रतापरावांनी दिलेल्या सहकार्याचे मोल महाराजांइतके कोण जाणणार होते. म्हणूनच प्रतापरावांच्या ऋणातून

अंशत: का होईना मुक्त होण्यासाठी महाराजांनी प्रतापरावांच्या मृत्यूनंतर त्यांची कन्या जानकीबाई हिला आपली सून बनविली. महाराजांचे इतर दोन सेनापती प्रतापरावांच्या अगोदरचे नेताजी पालकर व त्यांच्या नंतरचे हंबीरराव हे दोघेही महाराजांचे नातलग होते. प्रतापरावांना महाराजांनी त्यांच्या मृत्युनंतर आपला आप्त बनवले.

**संदर्भ :**


१. पुणे पुरालेखागार पुणे, सातारा जमाव ७८३.
भोसरे येथील गुजर पाटील (अप्रकाशित)

२. मेहेंदळे गजानन भास्कर, श्रीराजा शिवछत्रपती, खंड – १, भाग – १, प्रकाशक ग. भा. मेहेंदळे, पुणे १९९६, पृ. ४७०.

३. पुणे पुरालेखागार, ईनाम कमिशन रुमाल ३०७, कैफियत राजाजी बिन आपाजी गुजर, (अप्रकाशित.)

४. रायगड गॅझेटियर, १९९३ आवृत्ती, पृ. ९७२.

५. मुलाखत श्री. विजय जाधव, भोसरे, दि. १/०५/२०१२.

६. सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१० (पुनर्मुद्रण), पृ. २४५.

७. तत्रैव, पृ. २००.

८. दिवेकर स. म. (संपा.), कवींद्र परमानंदकृत श्री शिवभारत, प्रकाशक स. म. दिवेकर, मुंबई, १९२७, अध्याय २१, श्लोक ७०, पृ. २०९.

९. आपटे द. वि., स. म. दिवेकर, शिवचरित्र प्रदीप, भा. इ. स. मंडळ, पुणे, १९२५, पृ.२०५.

१०. राजवाडे वि. का., समग्र राजवाडे साहित्य खंड ११, (श्री शिवछत्रपतींची बखर), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९९८, पृ. २६५.

११. हेरवाडकर र. वि. (संपा.), सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र, व्हिनस प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण २०००, पृ. ७२.

१२. हेरवाडकर र. वि. (संपा.), शिवछत्रपतींचे सात प्रकरणात्मक चरित्र, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९६७, पृ. ९५.

१३. कुलकर्णी अनुराधा, अजित पटवर्धन (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड १५, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१२, पृ. १७६–१८४.

१४. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण २००९, ले. १४४१, पृ. ४०७.

१५. हेरवाडकर र. वि. (संपा.), सभासदविरचित शिवछत्रपतींचे चरित्र, उपरोक्त, पृ. ५५.

१६. गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, ज्ञान विज्ञान विकास मंडळ, पुणे, १९७१, पृ. ३४.

१७. पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन, कोल्हापूर, २००३, पृ. १४४.

१८. बेंद्रे वा. सी., राणा जयसिंग आणि शिवाजी, इतिहास संशोधन मंडळ ग्रंथमाला, दादर, मुंबई, १९६५, पृ. १२०.

19. Sarkar Jadunath, Shivaji and his times, Orient Balckswan Private Limited, Reprint 2010, P. 126.

२०. खरे ग. ह.(संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे १९७३, ले. ५३, पृ. ३१.

२१. तत्रैव, ले. ९९, पृ. ५८.

२२. आपटे द. वि., स. म. दिवेकर, शिवचरित्र प्रदीप (शिवापूर दप्तरातील यादी), उपरोक्त, पृ. ५१–५२

व

देशमुख विजय, शककर्ते शिवराय (उत्तरार्ध), सन पब्लिकेशन्स, पुणे, १९८६, पृ.७१३.

२३. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतू माधवराव पगडी, खंड ३ (मोगल आणि मराठे – तारीखे दिल्कुशाचा अनुवाद), मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०, पृ. २२४

व

कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली करीना,डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

२४. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ७१३.

२५. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ५७.

२६. शेजवलकर म्य. श., श्री शिवछत्रपती संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९६४, पृ. १२५.

२७. हेरवाडकर र. वि. (संपा.), सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र, उपरोक्त, पृ.७५.

२८. तत्रैव, पृ. ७५.

२९. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंड ३, उपरोक्त, पृ. २२४.

३०. हेरवाडकर र. वि. (संपा.), सभासदविरचित शिवछत्रपतींचे चरित्र, उपरोक्त, पृ. ७६.

३१. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंउ ३, उपरोक्त, पृ. २२४.

३२. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ७६.

३३. तत्रैव, पृ. ७६.

३४. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, उपरोक्त, ले. १२९३, पृ. ३६१.

३५. भावे विनायक लक्ष्मण (संपा.), श्रीमंत महाराज भोसले यांची बखर, मराठी दफ्तर, ठाणे, १९१७, पृ. ६२.

३६. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ११२, पृ. ६५.

३७. तत्रैव, ले. १२०, पृ. ७२.

३८. तत्रैव, ले. १२५, पृ. ७६.

३९. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड १, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. २०३.

४०. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंड ३, (मोगल–मराठा संघर्ष, फतुहाते आलमगिरीचा अनुवाद), उपरोक्त, पृ. १२.

४१. तत्रैव, पृ. १२.

४२. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. १३५७, पृ.३८१.

४३. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ६, उपरोक्त, ले. ११४, पृ. ६७.

४४. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंड ३, (तारीखे दिल्कुशा) उपरोक्त, पृ. २३०–३१.

४५. तत्रैव, पृ. २३०.

४६. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंड २ (छत्रपती नि त्यांची प्रभावळ), उपरोक्त, पृ. ६४२.

४७. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ७९.

४८. सरकार जदुनाथ, औरंगजेब, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६, पृ. २२३.

४९. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंड ३ (मोगल आणि मराठे – तारीखे दिल्कुशाचा अनुवाद), उपरोक्त, पृ. २३१.

५०. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ५९.

५१. तत्रैव, पृ. ६१.

५२. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंड ३, उपरोक्त, पृ. २३३.

५३. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. १३७०, पृ. ३८५.

५४. तत्रैव, ले. १३७१, पृ. ३८६.

५५. केळुसकर कृष्णराव अर्जुन, क्षत्रियकुलावंतस छ. शिवाजी महाराज यांचे चरित्र, र. दा. यंदे, पुणे १९६५, पृ. ३८५.

५६. सरदेसाई गो. स., मराठी रियासत खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण २०११, पृ. २७६.

५७. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त

५८. कुलकर्णी अनुराधा, अजित पटवर्धन (संपा.), उपरोक्त, ले. १०१, पृ. १५३.

59. Sarkar Jadunath, Op. – Cit, P. 140.

६०. खरे ग. ह., उपरोक्त, पृ. ६८.

६१. देशपांडे प्र. न. (संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, २००२ (नविन आवृत्ती), ले. १८, पृ. १२.

६२. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंड ३, उपरोक्त, पृ. २१६ ते २३८

६३. तत्रैव, पृ. २३८.

६४. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. ४३९ व १४४१, पृ. ४०७.

६५. शेजवलकर त्र्यं. श., उपरोक्त, पृ. ४२४.

६६. केळूसकर कृष्णराव अर्जुन, उपरोक्त, पृ. ३७०.

67. Sarkar Jadunath, Op. – Cit, P. 144.

६८. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतू माधवराव पगडी, खंड ३, उपरोक्त, पृ. १३.

६९. तत्रैव, पृ. २३८.

७०. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ९३.

71. Bal Krishna, SHIVAJI THE GREAT, Modern Publishers, Delhi, 1985, P. 289.

७२. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे (संपा.), उपरोक्त, पृ. २०६.

७३. दिवेकर स. म. (संपा.), जयरामकवि विरचित पणालेपर्वतग्रहणाख्यान

७४. पगडी सेतुमाधवराव, समग्र सेतूमाधवराव पगडी, खंड ३, (खुतूते शिवाजी), उपरोक्त, पृ. ३९.

७५. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले.१४६३, पृ. ४१५.

७६. सरदेसाई गो. स., मराठी रियासत खंड १, उपरोक्त, पृ. २८०.

७७. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. १४७७, पृ. ४१९.

७८. तत्रैव, ले. १४९६, पृ. ४२४.

७९. शिवचरित्र साहित्य खंड ११, त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५७, ले. ४४, पृ. २६.

८०. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड २ (बसातीनुस्सलातीन), भारत इतिहास संशोधन मंडळ स्वीय ग्रंथमाला, पुणे, १९३९, पृ. ९२.

८१. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे (संपा.), उपरोक्त, पृ. १६५.

८२. दिवेकर स. मा. (संपा.), पर्णालपर्वतग्रहणाख्यान, उपरोक्त, अध्याय ३, श्लोक १० ते १५.

८३. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ७९१.

८४. दिवेकर स. मा. (संपा.), पर्णालपर्वतग्रहणाख्यान, उपरोक्त, अध्याय ५, श्लोक ४८.

८५. तत्रैव, अध्याय ५, श्लोक १ ते ३.

८६. शेजवलकर त्र्य. श. उपरोक्त, पृ. ४२६.

८७. दिवेकर स. मा. (संपा.), पर्णालपर्वतग्रहणाख्यान, उपरोक्त, अध्याय ५, श्लोक ३९ ते ४४.

८८. तत्रैव, अध्याय ५, श्लोक ४७ ते ५१.

८९. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह खंड २, उपरोक्त, पृ. ३३.

९०. दिवेकर स. म. (संपा.), पर्णालपर्वतग्रहणाख्यान, उपरोक्त, अ. ५., श्लोक ५३.

९१. देवीसिंग चौहान (संपा.), मुल्ला नुस्त्रतीकृत – तारीखे इस्कंदरी, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे १९६९, टिपण्णियॉ, पृ. १०.

९२. दिवेकर स. म. (संपा.), पर्णालपर्वतग्रहणाख्यान,उपरोक्त, अ. ५.

९३. देवीसिंग चौहान (संपा.), उपरोक्त, अध्याय ४, पृ. ४१.

९४. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह खंड २, उपरोक्त, पृ. ९३.

९५. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ९६.

९६. दिवेकर स. म.,पर्णालपर्वतग्रहणाख्यान, उपरोक्त, अ. ५, श्लोक १०५.

९७. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ९६.

९८. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह खंड २, उपरोक्त, पृ. ९६.

९९. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. १५४३ व १५४४, पृ. ४४४, ४४५.

१००. तत्रैव.

१०१. तत्रैव, पृ. १५४४.

१०२. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ७९६.

१०३. आपटे द. वि., स. म. दिवेकर (संपा.), शिवचरित्रप्रदिप (शिवापूर दप्तरातील यादी), उपरोक्त, पृ. ५२.

१०४. वत्सजोशी शंकर नारायण (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड ८, (हुकेरी परगण्याचे देशपांडे), भा. इ. स. मंडळ, पुणे, १९४२, पृ.३.

१०५. तत्रैव, पृ. १९.

106. Sarkar Jadunath – Op. Cit, P. 187.

१०७. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. १५४३, पृ. ४४४.

१०८. हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. ३६.

१०९. भावे वि. ल. (संपा.), श्रीमंत महाराज भोसले यांची बखर, चिटणीस, मराठी दफ्तर संस्था, ठाणे, १९१७, पृ. ७९.

११०. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ८०१.

१११. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले.१६२५, पृ. ४७७.

११२. केळुसकर कृष्णराव अर्जुन, उपरोक्त, पृ. ३९२.

११३. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त, पृ. ७३.

११४. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. १६२५, पृ. ४७७.

११५. कुलकर्णी अ. रा. (संपा.), उपरोक्त.

११६. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त., ले. १६२५, पृ. ४७७.

११७. कुलकर्णी अनुराधा गोविंद (संपा.), शिवछत्रपतींची पत्रे खंड १, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०११, पृ. २५८.

११८. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड ६, भा. इ. स. मंडळ, पुणे, १९३७, ले.१०८, पृ. ७३.

११९. पुणे पुरालेखागार, पुणे, छत्रपती राजाराम महाराजांनी जगजीवन व खंडेराव यांना दिलेल्या इनामपत्राची नक्कल (इ. स. १६९६), इनाम कमिशन रूमाल ३०७ (अप्रकाशित).

१२०. सेतु माधवराव पगडी (संपा.), समग्र सेतू माधवराव पगडी खंड ३ (मोगल दरबाराची बातमीपत्रे), मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०, पृ. ९०२.

१२१. हेरवाड्कर र. वि. (संपा.), मल्हार रामराव विरचित थोरले महाराज यांचे चरित्र, पृ. ६६.

१२२. सेतु माधवराव पगडी (संपा.), उपरोक्त, पृ. ९१७.

१२३. पुणे पुरालेखागार, पुणे, गुजर घराण्याची वंशावळ (इ. स. १८५५), ईनाम कमिशन रूमाल ३०७, (अप्रकाशित)

१२४. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त, पृ. ९७.

१२५. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, मंजूश्री प्रकाशन, कोल्हापूर, १९९३, पृ.१५५.

१२६. राजवाडे वि. का., राजवाडे लेखसंग्रह भाग १, ऐतिहासिक प्रस्तावना, श. ना. जोशी, पुणे, १९२८, पृ. ३६.

१२७. शिवचरित्र साहित्य खंड ११, उपरोक्त, ले. ४४, पृ. २६.

१२८. कुलकर्णी अनुराधा गोविंद (संपा.), उपरोक्त, पृ. २५८.

१२९. कुलकर्णी अनुराधा, अजित पटवर्धन (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – १५, उपरोक्त, पृ. १७६–८४.

---

## प्रकरण सातवे

# सेनापती हंबीरराव मोहिते


| | |
|---|---|
| **७:१** | **प्रास्ताविक** |
| **७:२** | **हंबीरराव मोहिते – पूर्ववृत्त** |
| ७:२:१ | मोहिते घराणे |
| ७:२:२ | संभाजी मोहिते |
| ७:२:३ | हंबीरराव मोहिते |
| **७:३** | **सेनापतीपदी नियुक्ती** |
| **७:४** | **शिवराज्याभिषेकप्रसंगी सेनापती हंबीररावांचा सन्मान** |
| **७:५** | **सेनापती हंबीररावांची कामगिरी** |
| ७:५:१ | छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील हंबीररावांची कामगिरी |
| ७:५:१:१ | हंबीररावांच्या मुघल प्रदेशातील हालचाली |
| ७:५:१:२ | हंबीररावांनी लासूर लुटले |
| ७:५:१:३ | कर्नाटक मोहिमेतील सेनापती हंबीररावांचे योगदान |
| ७:५:१:३:१ | हुसेनखान मियाणाचा पाडाव |
| ७:५:१:३:२ | कुतूबशहाशी भेट |
| ७:५:१:३:३ | शिवाजी महाराजांना सहाय्य |
| ७:५:१:३:४ | व्यंकोजीराजांवर विजय |
| ७:५:१:३:५ | वेलोरचा कोट काबीज |
| ७:५:१:४ | जालना मोहिमेतील सहभाग |
| ७:५:१:५ | छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन |
| ७:५:१:६ | संभाजीराजांचे राज्यारोहण – हंबीररावांची निर्णायक भूमिका |
| ७:५:२ | छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातील सेनापती हंबीररावांची कामगिरी |
| ७:५:२:१ | हंबीररावांनी बुऱ्हाणपूर लुटले |
| ७:५:२:२ | छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतरच्या हालचाली |
| ७:५:२:३ | औरंगजेबाचे दक्षिणेत आगमन |
| ७:५:२:४ | छत्रपती संभाजीकालीन मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील हंबीररावांची कामगिरी |
| ७:५:२:४:१ | शहजादा आझमशहा – हंबीरराव संघर्ष |
| ७:५:२:४:२ | कुलिचखानाशी सामना |
| ७:५:२:४:३ | आझमशहा हंबीरराव संघर्ष |
| ७:५:२:४:३:१ | हंबीररावांनी शहजादा आझमला कोल्हापूर– पन्हाळा परिसरातून पिटाळून लावले |
| ७:५:२:४:४ | कल्याण भिवंडी परिसरात रणमस्तखानाशी संघर्ष |
| ७:५:२:४:५ | रूहुल्लाखानाचा दारूण पराभव |
| ७:५:२:४:६ | रायगड परिसरात गाजीउद्दीनखानाशी संघर्ष |
| ७:५:२:४:७ | विजापूरच्या आदिलशहाला मदत |
| ७:५:२:४:८ | मुघल प्रदेशात धामधूम |
| ७:५:२:४:९ | आदिलशाहीच्या नाशानंतर मुघल सैन्याला प्रतिकार |
| **७:६** | **हंबीरराव धारातीर्थी** |
| **७.७** | **मुद्रा** |
| **७.८** | **समारोप** |

## प्रकरण सातवे

# सेनापती हंबीरराव मोहिते

### ७:१ प्रास्ताविक :

सेनापती हंबीरराव मोहिते हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या महापराक्रमी सेनापतींच्या मालिकेतील शेवटचे आणि छत्रपती संभाजी महाराजांचे पहिले सेनापती होत.सन १६७४ मध्ये सरनौबत प्रतापराव गुजरांच्या मृत्युनंतर महाराजांनी हंबीररावांची सेनापतीपदी नियुक्ती केली. त्यावेळेपासून आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत हंबीरराव स्वराज्याचे सेनापती होते. या काळात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज या दोन्ही छत्रपतींच्या कारकीर्दीत सेनापतीपद भूषविले.

सेनापतीपदावर नियुक्ती झाल्यानंतर झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक समारंभात अभिषिक्त छत्रपतींचे पहिले सेनापती होण्याचा मान हंबीररावांना मिळाला. राज्याभिषेक समारंभानंतर महाराजांच्या आदेशानुसार हंबीरराव मोगली मुलूखात मोहिमेवर गेले. खानदेश, बागलाण, बऱ्हाणपूर, वऱ्हाड इत्यादी मुघलांच्या प्रदेशातील अगणित लूट त्यांनी स्वराज्यात आणली. इ. स. १६७६ मध्ये मुघलांची लासूर पेठ त्यांनी लुटली. यावेळी झालेल्या संघर्षात त्यांनी मुघल सुभेदार बहाद्दूरखानाचा दणदणीत पराभव केला. इ. स. १६७७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज कर्नाटक़ मोहिमेवर निघाले. मोहिमेवर निघण्यापूर्वी कृष्णा व तुंगभद्रा नद्यामधील प्रदेश व त्यातील कोप्पल किल्ला जिंकण्याच्या मोहिमेवर महाराजांनी हंबीररावांना रवाना केले. हुसेनखान मियानासारख्या जबरदस्त आदिलशाही सरदाराचा पराभव करून हंबीररावांनी त्याला कैद केले व कोप्पलचा किल्ला जिंकून घेतला. तेथे योग्य व्यवस्था लावून हंबीरराव कर्नाटक मोहिमेवर निघालेल्या महाराजांना सामील झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील सर्वात मोठी अशी कर्नाटक मोहिम यशस्वी करण्यात हंबीररावांचेही मौलिक योगदान आहे. पूर्ण मोहिमेत त्यांनी महाराजांना सहाय्य केलेच

शिवाय महाराज स्वराज्यात परतल्यानंतर व्यंकोजीराजांचा बंदोबस्त करण्याचे राहिलेले कार्य त्यांनी अत्यंत कौशल्याने पूर्ण केले.

कर्नाटक मोहिमेवरून परत आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या विरुद्ध मोहिम सुरू केली व मुघल मुलूखातील जालना पेठ ४ दिवस यथेच्छ लुटली. या मोहिमेत हंबीररावही त्यांच्यासोबत होते. लुट घेवून माघारी येत असताना मुघलांनी मराठ्यांना गाठले. यावेळी झालेल्या संघर्षात सेनापती हंबीरराव जखमी झाले. जालना मोहिम ही शिवाजी महाराजांच्या जीवनातील शेवटची मोहिम ठरली. यानंतर लवकरच ४ एप्रिल १६८० रोजी महाराजांचा मृत्यु झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपतीपदाचा वारस ठरविताना झालेल्या संघर्षात हंबीररावांची भूमिका महत्त्वाची ठरली. सोयराबाई व मोरोपंतादि मंत्र्यांनी संभाजीला डावलून राजारामाला मंचकारोहण करविले. याप्रसंगी हंबीररावांच्या स्वामीनिष्ठेची परीक्षाच होती. संभाजीराजे व रायगडावरील मंत्री या दोघांकडूनही हंबीररावांना आपल्याला सामील होण्याविषयीची संदेशपत्रे आली होती. हंबीररावांचा या प्रसंगीचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा होता. हंबीररावांनी सर्व परिस्थितीचा साकल्याने विचार करून स्वत:च्या सख्ख्या भाच्याचा म्हणजेच राजारामाचा पक्ष घेण्याचे नाकारले आणि स्वराज्यहिताच्या दृष्टिकोनातून मुघलांना समर्थपणे तोंड देवू शकतील अशा संभाजीराजांच्या पाठीमागे स्वराज्याचे सैन्यबळ उभे केले. हंबीररावांच्या या निर्णयामुळे स्वराज्यातील यादवी युद्धाचा प्रसंग टळला.

नवे छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकीर्दीतही सेनापतीपदाची जबाबदारी हंबीररावांनी समर्थपणे पेलली. या काळात मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करावयास आलेल्या मुघल सम्राट औरंगजेबाच्या बलाढ्य सेनेला टक्कर देवून मराठ्यांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यात छत्रपती संभाजी महाराजांबरोबर सेनापती हंबीररावांचेही मोठे योगदान होते. चारी बाजूंनी स्वराज्यात घुसू पाहणाऱ्या मुघलांना थोपवून धरण्यासाठी हंबीररावांनी जीवाचे रान केले. या प्रयत्नातच इ. स. १६८७ मध्ये वाईजवळ सर्जाखानाबरोबर झालेल्या युद्धात तोफेचा गोळा लागून हंबीरराव धारातीर्थी पडले. आपल्या शौर्याने व स्वामीभक्तीने मराठ्यांच्या इतिहासात

अजरामर झालेल्या या पराक्रमी सेनापतीच्या कार्याचा चिकित्सक आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

## ७:२ हंबीरराव मोहिते – पूर्ववृत्त :

### ७:२:१ मोहिते घराणे :

शिवशाहीच्या उदयापूर्वी महाराष्ट्रात अनेक क्षत्रिय मराठा घराण्यांनी आपल्या पराक्रमाने निजामशाही, आदिलशाही व मुघल दरबारात नावलौकिक मिळविला होता. त्यापैकीच मोहिते घराणे, हे निजामशाहीत लष्करी सेवा करून प्रसिद्धीस आले होते. याच मोहिते घराण्यात हंबीररावांचा जन्म झाला. हंबीररावांच्या आजोबांनी कऱ्हाडजवळील तळबीडची पाटीलकी मिळविल्यामुळे १७ व्या शतकात हे घराणे तळबीडचे मोहिते म्हणून ओळखले जावू लागले. परंतु या घराण्याचे मूळ गाव कुठले याविषयी इतिहासकारामध्ये मतभेद आहेत. इतिहासकार ग. ह. खरे यांच्या मते हे घराणे मूळ बागलाणकडचे (जि. नाशिक) असावे. बागलाणात मोहिते घराण्याची एक शाखा आढळते.[१] तर डॉ. प्रभाकर ताकवले यांनी आपल्या 'शिवशाहीतील अष्टप्रधान' या ग्रंथात मोहिते घराण्याचे मूळ गाव बीड परगण्यात आहे असे म्हटले आहे.[२] इ. स. १७१६ नंतरची सेनापतीपदाची यादी उपलब्ध असून त्यामध्ये हंबीररावांचा उल्लेख 'हंसाजीराव मोहिते हंबीरराव बीडकर' असा केलेला आहे.[३] त्यामुळे मोहिते घराणे बीड परगण्यातील असावे किंवा तळबीड या गावावरूनही त्यांच्या नावापुढे बीडकर असे म्हटले गेले असावे असे वाटते.

हंबीररावांचे पणजोबा रतोजी मोहिते हे अहमदनगरच्या निजामशाहीत लष्करी सेवा बजावीत होते. इ. स. १५८४ साली निजामशाहीत उद्‌भवलेली बंडाळी त्यांनी मोडून काढली. त्याबद्दल निजामशहाने त्यांना 'बाजी' हा किताब बहाल करून त्यांचा मोठा सन्मान केला. तेव्हापासून त्यांचे वंशज स्वत:ला 'बाजी' हा किताब लावू लागले. रतोजी पुत्र तुकोजी मोहिते यांनी कऱ्हाडजवळ वसंतगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या तळबीड या गावची पाटीलकी मिळविली तेव्हापासून मोहिते मंडळी तळबीडचे रहिवासी बनले. तुकोजी मोहित्यांना संभाजी व धारोजी हे दोन पुत्र व कन्या तुकाबाई अशी तीन अपत्ये होती. यापैकी संभाजीचे लग्न घाटगे

घराण्यातील गंगाबाई हिच्याशी तर धारोजीचे लग्न घोरपडे घराण्यातील सूनाबाई हिच्याशी झाले होते. त्यांनी आपल्या जावयांना आदिलशाही दरबारात रूजू केले.[४]

संभाजी व धारोजी मोहिते हे दोघे बंधू आदिलशहाच्या पदरी नोकरी करीत असतानाच इ. स. १६२४ मध्ये निजामशाही दरबारातील पराक्रमी सरदार शहाजीराजे भोसले त्या शाहीवर नाराज होवून आदिलशाही दरबाराकडे आले. आदिलशहाने त्यांचा मोठा सन्मान करून त्यांना 'सरलष्कर' ही पदवी व आपल्या वतीने पुणे प्रांताची जहागिरी बहाल केली. शहाजीराजे पुणे प्रांतावर आपला अंमल बसवू लागले तेव्हा निजामशहाचा वजीर मलिक अंबरने साबाजी अनंत या सरदाराला शहाजीराजांवर पाठविले. साबाजी अनंतने शहाजीराजांना सालप्याच्या घाटात कोंडून धरले. अशा कठीण प्रसंगी संभाजी व धारोजी या मोहिते बंधूंनी मोठा पराक्रम करून निजामशाही सैन्याची कोंडी फोडून शहाजीराजांना मोलाचे सहाय्य केले.[५] त्यामुळे शहाजीराजांची मोहिते बंधूंवर मर्जी बसली. शहाजीराजांनी आदिलशहाला मोहिते बंधूंवर कृपा करून त्यांना कर्यात तळबीड व बालघाट येथील देशमुखी देण्यात यावी अशी विनंती केली. या विनंतीला मान देवून आदिलशहाने १० जानेवारी १६२६ च्या फर्मानानुसार ही देशमुखी संभाजी व धारोजी मोहिते यांना बहाल केली.[६] इ. स. १६२६ च्या सुमारासच मोहिते बंधूंनी आपली बहिण तुकाबाई ही शहाजीराजांना दिली. त्यामुळे ते शहाजीराजांचे मेहुणे बनले.

संभाजी व धारोजी हे दोघेही मोहिते बंधू मोठे पराक्रमी होते. अनेक आदिलशाही फर्मानातून त्यांचे कौतुक केलेले दिसते. विशेषत: धारोजी मोहिते यांनी आपल्या पराक्रमाने व निष्ठेने आदिलशहाची मर्जी संपादन केली होती. धारोजीने केलेल्या पराक्रमावर खूश होवून आदिलशहाने त्यांचा उंची पोषाख देवून गौरव केल्याचे आदिलशाही पत्रावरून स्पष्ट होते.[७]

### ७:२:२ संभाजी मोहिते :

संभाजी व धारोजी या पराक्रमी मोहिते बंधूपैकी संभाजी मोहिते हे शिवाजी महाराजांचे सेनापती हंबीररावांचे पिता होत. संभाजी मोहिते यांना हरिपराय, हंबीरराव व शंकराजी अशी तीन मुले व अणूबाई आणि सोयराबाई या दोन मुली होत्या. यापैकी सोयराबाईचा विवाह

छत्रपती शिवाजी महाराजांशी व अणूबाईचा विवाह शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू व्यंकोजीराजांशी झाला होता.[८]

सन १६५२ मध्ये शहाजीराजांनी आपल्या जहागिरीतील सुपे परगण्यावर सरहवालदार म्हणून संभाजीची नेमणूक केली. त्यांनी १६५२ ते १६५६ या काळात सुपे परगण्याचा कारभार पाहिला. परंतु या काळातील त्यांचे वर्तन ताठ्याचे होते. त्यांच्या जुलमी व अन्यायी कारभाराविषयी शहाजीराजांकडे तक्रारी जावू लागल्या.[९] दरम्यान पुणे प्रांती छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे कार्य सुरू केले होते. संभाजी मोहिते शिवाजीराजांनाही जुमानीत नव्हते, असा उल्लेख शिवदिग्विजय बखरीत आला आहे. तेव्हा जावळी विजयानंतर २४ सप्टेंबर १६५६ रोजी शिवाजीराजांनी सुप्याला जावून आपल्या सावत्र मामाला (संभाजी मोहिते) कैद केले व सुपे प्रांत हस्तगत केला. याविषयी सभासद बखरीत म्हटले आहे की, ''पुढे शिवाजीराजे आपणच कारभार करित चालले. मग सुपे महाल येथे कोणे एके जागा संभाजी मोहिता म्हणून सावत्र आईचा भाऊ, मामा होता. तो महाराजांनी महालावरी ठविला होता. त्याचे भेटीस शिमग्याचे सणाचे पोस्त मागावयास म्हणून गेले. मामास कैद करून ठविले. त्याचे तीनशे घोडे पागेचे होते व द्रव्यही बहुत होते. वस्तभाव, कापड हस्तगत करून सुपे देश साधिला.''[१०]

सुपे हस्तगत करताना शिवाजीराजांनी संभाजीला कैद केल्याचा उल्लेख सापडतो. परंतु त्यानंतर संभाजीचे पुढे काय झाले किंवा या प्रसंगाबाबत शहाजीराजांची काय प्रतिक्रिया होती, इत्यादी प्रश्नांची उत्तरे उपलब्ध साधनांमधून मिळत नाहीत. संभाजी मोहिते बहुधा कर्नाटकात गेले असावेत. परंतु पुढील काळात शिवाजी महाराज व सावत्र मामा संभाजी यांचे संबंध सुरळित झाले असावेत. संभाजी मोहित्यांच्या सोयराबाई या कन्येशी शिवाजी महाराजांचा विवाह झाला होता. हा विवाह नेमका कधी झाला याविषयी उपलब्ध साधनांमधून माहिती मिळत नाही. परंतु ज्या अर्थी सभासदाने सुपे काबीज करण्याच्या प्रसंगात संभाजी मोहिते याचा 'महाराजांचे सावत्र मामा' असा उल्लेख केला आहे, त्याअर्थी या वेळेपर्यंत हा

विवाह बहुधा झालेला नसावा. अन्यथा सभासद बखरीत किंवा अन्य कोणत्यातरी साधनात महाराजांनी आपल्या सासऱ्यांना कैद करून सुपे काबीज केले असा उल्लेख आला असता.

कसबे तळबीडची पाटीलकी व देशमुखी संभाजी व धारोजी या दोघा बंधूंना मिळाली होती. इ. स. १६५१ मध्ये त्याची वाटणी संभाजीचा मोठा मुलगा हरिपराय व धारोजीचा मोठा मुलगा दिपाजी यांच्यात झाली होती.[११] संभाजी व धारोजी हे दोघेही बंधू इ. स. १६६२ पूर्वी मरण पावले. त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या मुलांमध्ये या वाटणीवरून वाद सुरू झाला. त्याचा निवाडा १३ जानेवारी १६६२ रोजी होवून वतनाची वाटणी करण्यात येवून महजर झाला. त्यानुसार कर्यात तळबीड व वांगीची देशमुखी व पाटीलकी यांची संभाजी व धारोजी यांच्या मुलांमध्ये समान वाटणी करण्यात आली. याशिवाय संभाजी वडील बंधू असल्यामुळे हिंगणगादे या इनामी गावातील दोन हिस्से त्यांचा मुलगा शंकराजी याला तर एक हिस्सा धारोजीच्या नेताजी व दिपाजी या मुलांना देण्यात आला. तळबीडच्या पाटीलकीचा हक्क हरीपरायाला मिळाला.[१२] या महजरात हंबीररावांना काही हक्क दिल्याचा उल्लेख नाही.

**७:२:३ हंबीरराव मोहिते :**

हंबीरराव हे संभाजी मोहिते यांचे द्वितीय पुत्र होत. वडील वाटणीच्या महजरात त्यांच्या 'हंबीरराव' या नावाचा स्पष्ट उल्लेख आढळतो. अनेक बखरकारांनी त्यांचे नाव हंसाजी असून 'हंबीरराव' हा त्यांना मिळालेला किताब होता असे म्हटले आहे. परंतु ते चूक आहे. बागलाणात मोहिते घराण्याची एक शाखा आढळते. या घराण्यातील भिकुजी मोहिते याने मुघल बादशहा शहाजहानच्या काळात इ. स. १६३० मध्ये वऱ्हाड सुभ्यातील धारगीरबारची देशमुखी मिळविली होती. पुढे बागलाण परगणा जिंकण्याठी शहाजहान बादशहाने औरंगजेबाला पाठविले होते. या कामात भिकुजीने त्याला मदत केली. त्यानंतर भिकुजीला मुघलांकडून 'हंबीरराव' हा किताब मिळाला होता. बागलाणातील भिकुजीचे वंशज हा किताब स्वत:ला लावीत असत. [१३] त्यामुळे मोहिते घराण्याला 'हंबीरराव'हा किताब मिळाला होता अशी समजूत सर्वत्र प्रचलित झाली असावी. परंतु बागलाणचे मोहिते आणि हंबीररराव मोहित्यांचे घराणे या दोन्ही वेगवेगळ्या शाखा होत्या. बागलाणचे मोहिते ज्या

काळात मुघल दरबाराची चाकरी करत होते त्याचकाळात इकडे आदिलशाही दरबारात संभाजी व धारोजी मोहित्यांनी आपल्या पराक्रमाने नावलौकिक मिळविला होता. संभाजी मोहित्यांनी आपल्या पुत्राचे नाव 'हंबीरराव' असे ठेवले होते. हे इ. स. १६६२ च्या मोहिते घराण्याच्या वाटणीच्या महजरावरून स्पष्टपणे निदर्शनास येते. म्हणजेच हंबीरराव हे व्यक्तिनाम आहे, किताब नव्हे.

हंबीररावाचा जन्म कधी झाला, त्याचे लग्न कधी झाले, त्यांची पत्नी कोणत्या घराण्यातील होती या संदर्भात अजून तरी साधने उपलब्ध झाली नाहीत. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी सेनापतीपदावर त्यांची नियुक्ती करण्यापूर्वीचा त्यांचा इतिहासही फारसा उपलब्ध नाही. परंतु सेनापतीपदावर नेमणूक झाल्यानंतर त्यांनी गाजविलेल्या अनेक लढाया, त्यांचा पराक्रम याविषयी मात्र अनेक संदर्भ साधने उपलब्ध आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्नुषा आणि छत्रपती राजारामाची पत्नी महाराणी ताराबाई या हंबीररावांच्या कन्या होत. छत्रपतींच्या भोसले घराण्याशी मोहिते घराण्याचे तीन पिढ्यांचे नातेसंबंध होते. हंबीररावांची आत्या तुकाबाई या शहाजी राजांना दिल्या होत्या. हंबीररावांची अणूबाई ही बहिण व्यंकोजीराजांना तर सोयराबाई ही बहिण शिवाजी महाराजांना दिली होती. आणि पुढे हंबीररावांनी आपली कन्या ताराबाई ही राजाराम महाराजांना दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत त्यांच्याच पुढाकाराने इ. स. १६८४ च्या सुमारास राजाराम व ताराबाई यांचा विवाह झाला.[१४]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर संभाजी राजांच्या विरोधकांनी त्यांच्याविरुद्ध दोन कट केले. पहिला कट एप्रिल १६८० मध्ये राजाराम महाराजांना छत्रपती करून संभाजी महाराजांना कैद करण्याचा आणि दुसरा ऑगस्ट १६८१ मध्ये संभाजी महाराजांना ठार करून राजाराम महाराजांना गादी देण्याचा. संभाजी महाराजांनी पहिल्या कटाच्यावेळी कटवाल्यांना सौम्य शिक्षा दिल्या. परंतु दुसरा कट उघडकीस आल्यावर मात्र दोषी मंत्र्यांना देहदंड दिला तर सोयराबाई व राजाराम महाराजांवर नजरकैद बसविली. परंतु पुढे सोयराबाईच्या मृत्युनंतर राजारामाकडे पाहण्याचा छत्रपती संभाजीराजांचा दृष्टिकोन

मवाळ झालेला दिसतो. त्यामुळे राजाराम महाराजांना फार काळ नजरकैदेत रहावे लागले नसावे. पुढे तर स्वराज्याचे प्रबळ सेनापती हंबीरराव यांच्या मुलीशी राजारामाचा विवाह झाला. अर्थात हंबीररावांनी कैदेतील राजारामांना तर आपली मुलगी नक्कीच दिली नसावी. याचा अर्थ या काळात राजाराम महाराजांना संचाराचे स्वातंत्र्य असावे असे वाटते.

प. श. जोशी आपल्या 'छत्रपती राजाराम – स्वातंत्र्य संग्राम' या लेखात म्हणतात, ''छत्रपती संभाजी व त्यांच्या पत्नी येसूबाई यांनी राजकुमार राजाराम यांना ममतेने व प्रेमळपणे वागविले. इतकेच नव्हे तर नोव्हेंबर १६८१ मध्ये औरंगजेब बादशहाविरुद्ध युद्ध सुरू करण्याआधी छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यातील किल्ल्यांच्या देखरेखीचे काम राजकुमार राजारामावर सोपविले होते. छत्रपती संभाजी महाराजांनी त्यांचे लग्न इ. स. १६८३ किंवा १६८४ मध्ये सरसेनापती हंबीररावांच्या ताराबाई नावाच्या मुलीशी घडवून आणले. .... सेनापती हंबीरराव यांचा मृत्यु १६८७ साली वाई येथील लढाईत होईपर्यंत, त्यांच्या बरोबरच्या लष्करी स्वाऱ्यांमध्ये राजकुमार राजाराम भाग घेत असल्याचे ऐतिहासिक पुरावे दर्शवितात.''[१५] सेनापती हंबीररावांनी आपल्या या जावयाला लष्करी शिक्षण मिळावे या हेतूने लष्करी मोहिमांमध्ये आपल्याबरोबर नेले असावे. इ. स. १६८७ मध्ये हंबीररावांचा मृत्यू झाल्यानंतर थोड्याच काळात छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने पकडल्यानंतर इ. स. १६८९ मध्ये राजाराम महाराज स्वराज्याचे छत्रपती बनले. पुढे इ. स. १७०० मध्ये राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर हंबीररावांच्या कन्या ताराबाई यांनी मराठी सत्तेची सूत्रे आपल्या हाती घेतली. पित्याच्या शौर्याचा वारसा लाभलेल्या महाराणी ताराबाईंनी पुढील काळात आपल्या पराक्रमाने व कर्तबगारीने मराठ्यांचा वैभवशाली इतिहास घडविला.

## ७:३ सेनापतीपदी नियुक्ती :

स्वराज्याचे सरनौबत प्रतापराव गुजर २४ फेब्रुवारी १६७४ रोजी आदिलशाही सरदार बहलोलखानाशी नेसरी येथे झालेल्या युद्धात ठार झाले. ही बातमी महाराजांना समजताच त्यांना अतिशय दु:ख झाले. आपण प्रतापरावांना 'फत्ते न करिता तोंड दाखवू नये' असे लिहिले आणि प्रतापरावांनी फत्ते करण्याच्या प्रयत्नात आपला जीव गमावून आपले शब्द

शब्दश: खरे केले याचे महाराजांना खूप वाईट वाटले. याचवेळी लष्कराची व्यवस्था कशी करावी? कुणाला सरनोबत नेमावे? असा प्रश्न महाराजांना पडला. प्रतापरावांचा मृत्यु झाला त्यावेळी त्यांच्याबरोबर असलेले त्यांचे सहकारी आनंदराव मकाजी यांनी महाराजांना पत्र पाठवून दिलासा दिला. तेव्हा महाराजांनी सैन्याचे अधिपत्य तात्पुरते त्यांच्याकडे देवून शत्रूचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. आनंदरावांनी ती उत्तम रीतीने पार पाडली. याच दरम्यान १६ मार्च १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्नी काशीबाई यांचे रायगडावर निधन झाले. काशीबाईंच्या मृत्युनंतरचे सर्व विधी होईपर्यंत महाराज रायगडावरच होते.[१६] रायगडावर राज्याभिषेक विधीची पूर्वतयारी सुरू असतानाच सरनौबत प्रतापराव व पाठोपाठ काशीबाई यांच्या मृत्युचे आघात महाराजांवर झाले होते. तरीही राज्याभिषेकाची तयारी मात्र चालूच होती. राज्याभिषेक विधीपूर्वी नवीन सेनापतीची नियुक्ती करून लष्कराची व्यवस्था लावणे गरजेचे होते. त्यामुळे सुतक संपताच ५ एप्रिलनंतर महाराज कोकणातील चिपळूण जवळील श्रीक्षेत्र परशुराम येथे आले.[१७] त्यानंतर लष्कराची पहाणी करून महाराजांनी ८ एप्रिल १६७४ रोजी हंबीरराव मोहिते यांची सरनौबतपदी नियुक्ती केली. जेधे शकावलीत नोंद आहे की, ''पुरवणी शके १५९६ आनंद संवछरे चैत्र शुध १३ चिपोळणात लश्करची पाहाणी केली आणि राजश्री हंबीरराव मोहिते यासी सरनौबती दिल्ही.''[१८]

सरनौबतपदी नियुक्ती झाली त्यावेळी हंबीरराव मोहिते महाराजांच्या लष्करात जुमलेदार (१२५ स्वारांवरील अधिकारी) या पदावर कार्य करीत होते. जुमलेदार असलेल्या हंबीररावांचीच सरनौबतपदी नियुक्ती का केली गेली याविषयी सभासद बखरीत म्हटले आहे की, ''. . . . . मग लष्कराची पाहाणी करून लहान थोर लष्करास व पायदळ लोकास खजीना फोडून वाटणी केली, आणि सरनोबतीस माणूस पाहाता हंसाजी मोहिते म्हणून पागेमध्ये जुमला होता; बरा शाहाणा, मर्दाना, सबुरीचा, चौकस मोठा धारकरी पाहून त्यास 'हंबीरराव' नाव किताबती देऊन सरनोबती सांगितली. कुल लष्कराचा गाहा (एकीकरण) करून हंबीरराव याचे ताबीज दिधले.''[१९]

यावरून स्पष्ट होते की, चिपळूणजवळील श्री क्षेत्र परशुराम येथे लष्करातील प्रमुख अधिकाऱ्यांना बोलावून महाराजांनी त्यांच्यामधून आपल्या कसोटीला उतरलेल्या सेनानी हंबीरराव मोहित्यांची सरनौबतीपदी नियुक्ती केली. हंबीरराव मोहिते पराक्रमी, हुशार व चतुर होते. याशिवाय ते सबुरीचे म्हणजेच संयमीही होते. हंबीररावांच या गुणांमुळेच त्यांची सरनौबतपदी नियुक्ती झाली होती.

## ७:४ शिवराज्याभिषेकप्रसंगी सेनापती हंबीररावांचा सन्मान :

दि. ८ एप्रिल १६७४ रोजी हंबीरराव मोहिते यांची सरनौबतपदी नियुक्ती झाली आणि यानंतर दोनच महिन्यांनी ६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा संपन्न होवून महाराज अभिषिक्त राजे बनले. मराठ्यांच्या इतिहासातील हा महन्मंगल क्षण. या मंगलक्षणी महाराजांच्या स्वतंत्र राज्याचे पहिले सेनापती होण्याचे भाग्य हंबीरराव मोहिते यांना प्राप्त झाले. रायगडावरील या सोहळ्यात अष्टप्रधान मंडळातील एक प्रधान या नात्याने हंबीरराव मोहिते यांचाही सन्मान झाला.

राज्याभिषेक विधी प्रथम राज्याभिषेक, नंतर सिंहासनारोहण व अखेरीस राजदर्शन या तीन टप्प्यात पूर्ण झाला. शुक्रवार दि. ५ जूनला सायंकाळी विधीला सुरूवात होवून तो शनिवार दि. ६ जूनला संपला.[२०] अभिषेक विधीप्रसंगी महाराजांच्या मस्तकावर अभिषेकधारा धरण्यासाठी महाराजांचे सर्व अधिकारी उपस्थित होते. पट्टराणी सोयराबाईसाहेब व युवराज शंभूराजे हे महाराजांच्या बाजूला सुवर्ण सिंहासनावर बसलेले होते. अष्टदिशांना अष्टप्रधान कलश धारण करून उभे होते. पूर्वेला मुख्य प्रधान मोरोपंत तुपाने भरलेला सोन्याचा कलश घेवून, तर दक्षिणेस सेनापती हंबीरराव मोहिते दूधाने भरलेला चांदीचा कलश घेवून उभे होते. पश्चिमेला रामचंद्र पंत अमात्य दह्याने भरलेला कलश घेवून, तर उत्तरेस मोरेश्वर पंडितराव मधुपूर्ण सुवर्णकलश घेवून उभे होते. आग्नेयेस अनाजी पंत सचिव छत्र घेवून, नैऋत्येस त्र्यंबक पंत सुमंत व्यंजन (पंखा) धारण करून आणि वायव्येस दत्ताजीपंत मंत्री व ईशान्येस निराजीपंत न्यायाधीश मोर्चेल घेवून उभे होते. या सर्वांनी वेदमंत्राच्या घोषात महाराज, पट्टराणी व युवराज यांच्यावर अभिषेक केला.[२१]

अभिषेक विधीनंतर सिंहासनारोहण विधी झाला. यासाठी महाराजांनी ३२ मण सोन्याचे सिंहासन तयार करून कोशातील मौल्यवान रत्ने त्यावर जडवली होती. सिंहासनारोहण विधी शनिवार दि. ६ जून रोजी सुर्योदयापूर्वी म्हणजे पहाटे ५ च्या सुमारास झाला. यावेळी अष्टप्रधान अष्ट दिशांना उभे राहिले होते. या प्रसंगी उपस्थित सर्वांनी महाराजांवर लाह्या व सुवर्णपुष्पे उधळली.[२२] सिंहासन रोहणानंतर राज्याचे प्रधान व इतरांचा सत्कार करण्यात आला. चिटणीस लिहितो, ''मुख्य प्रधान व सेनापती यांना बादली वस्त्रे, पाच सनगे (उंची वस्त्रे), शिरपेच, मोत्याचे तुरे, कंठ्या, चौकडे, जगा, शिके–कटार, ढाल–तरवार, चौघडे–नौबती, जरीपटके, हत्ती, घोडे व सोन्याच्या दांडीच्या चवऱ्या याप्रमाणे देऊन पदे करारपत्रे करून दिली.''[२३]

शनिवार दि. ६ जून रोजी सकाळी ७ – ८ वाजण्याच्या सुमारास शिवाजी महाराजांनी पहिला दरबार भरवून सर्वांस दर्शन दिले.[२४] यावेळी उपस्थितांनी महाराजांना नजराणे अर्पण केले. इंग्रज वकील ऑक्झिडेन याने नारायण शेणवी याच्याबरोबर येवून नजराणा दिला. यावेळी पाहिलेले दृश्य ऑक्झिडेनने आपल्या डायरीत नोंदवून ठेवले आहे. तो लिहितो, ''त्यावेळी राजा भव्य सिंहासनावर आरूढ झालेला व मौल्यवान पोशाख केलेल्या प्रधानांनी वेष्टिलेला दिसला. संभाजी राजे, पेशवा मोरोपंत आणि एक श्रेष्ठ ब्राह्मण हे सिंहासनाखाली पायरीवर अगर ओट्यावर बसले होते. राहिलेले सेनाध्यक्ष व इतर अंमलदार बाजूला आदराने उभे होते.[२५]

यानंतर महाराजांची स्वारी अश्वारूढ होवून देवदेवतांचे दर्शन घ्यावयास निघाली.काही अंतर गेल्यावर महाराज सुवर्णालंकारांनी सजविलेल्या गजराजावर आरूढ झाले. या हत्तीवर माहुताच्या जागी हंबीरराव बसले होते. आणि अंबारीत मागे मोरोपंतांनी मोर्चेल धरले होते. देवदर्शनानंतर राजसभेत परत येवून महाराजांनी कुलदैवत, मातुश्री यांना वंदन केले.[२६] यानंतर राज्याभिषेकाचा सोहळा संपला.

महाराजांचा हा राज्याभिषेक सोहळा वैदिक पद्धतीने संपन्न झाला. प्रत्यक्ष राज्याभिषेकापूर्वी महाराजांचा उपनयन संस्कार, राण्यांशी समंत्रक विवाह इत्यादी अनेक विधि

पार पडले. त्यापैकीच एक विधी पट्टबंधन हा विधी होय. राज्याभिषेकात राजा, वडील मुलगा, मुख्य प्रधान व सेनाध्यक्ष यांनाच पटबंधन व्हावयाचे होते. त्यानुसार बाकी सर्वांचा पटबंधन विधी केला गेला मात्र सेनापती हंबीररावांचा हा विधी होवू शकला नाही. कारण हा विधी होण्यापूर्वी मुंज होणे गरजेचे असते. परंतु हंबीररावांची मुंज झालेली नसल्यामुळे त्यांचा पटबंधन विधी होवू शकला नाही.[२७]

एकूणच राज्याभिषेक सोहळ्याच्या या संपूर्ण विधी व इतर कार्यक्रमात अष्टप्रधान मंडळातील मुख्य प्रधान व सेनापती यांना महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. राज्यारोहणप्रसंगी अष्ट दिशांना अष्टप्रधान उभे होते. यावेळची सभासदाने जी यादी दिली आहे तिच्यात सेनापतीस मुख्य प्रधानांच्या बरोबरीने दर्जा दिलेला दिसतो. राज्याभिषेक प्रसंगी महाराजांनी आपल्या अष्टप्रधान मंडळाची विधिवत स्थापना केली. प्रधानपदांची पूर्वीची फारशी नावे बदलून त्यांना मराठी नावे देण्यात आली. त्यानुसार पेशवे आता 'मुख्यप्रधान' बनले तर सरनौबत आता 'सेनापती' झाले.

## ७:५ सेनापती हंबीररावांची कामगिरी :

सन १६७४ मध्ये सेनापतीपदावर नियुक्ती झाल्यापासून ते आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत जवळजवळ १४ वर्षे हंबीररावांनी स्वराज्याच्या सेनापतीपदाची जबाबदारी पार पाडली. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज या दोघा छत्रपतींच्या नेतृत्वाखाली त्यांनी कार्य केले. या दृष्टीने त्यांच्या सेनापतीपदाच्या कालखंडाचे दोन भाग पडतात.

१. छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड – इ. स. १६७४ ते इ. स. १६८० मधील शिवाजी महाराजांच्या मृत्युपर्यंत.

२. छत्रपती संभाजी महाराजांचा कालखंड – इ. स. १६८० ते डिसेंबर १६८७ मधील हंबीररावांच्या मृत्युपर्यंत.

### ७:५:१ छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील हंबीररावांची कामगिरी :

६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या मंगल प्रसंगानंतर महाराजांना केवळ ११ दिवसातच मातृवियोगाचे दु:ख सहन करावे लागले. १७ जून १६७४ रोजी राजमाता जिजाबाईंचे देहावसन झाले. मातेच्या मृत्युमुळे महाराज उदास झाले असले तरी सुतक संपताच महाराजांनी मोगलांवर मोहिम काढली.

राज्याभिषेक समारंभासाठी प्रचंड खर्च झाला होता. तो भरून काढण्यासाठी महाराजांनी मोगल सुभेदार बहादूरखानाच्या छावणीवर हल्ला करण्याची योजना आखली. पुण्याच्या पूर्वेस ४८ मैलावर पेडगाव येथे बहादूरखानाची छावणी होती. तिच्यावर हल्ला करण्यासाठी महाराजांनी आपल्या सैन्याचे दोन भाग केले. २००० घोडेस्वारांच्या एका तुकडीने बहादूरखानाच्या छावणीवर हल्ला चढविला. तो परतवून लावून खानाने त्यांचा २०–३० कोसापर्यंत पाठलाग केला. ही संधी साधून दुसऱ्या ७००० सैन्याने खानाच्या संरक्षण नसलेल्या छावणीवर हल्ला करून ती सावकाशपणे लुटली. या लुटीत बादशहाकरिता जमविलेले २०० जातिवंत घोडे व सुमारे एक कोटीचा खजिना मराठ्यांच्या हाती पडला.[२८] बहादूरखानाच्या छावणीवरील या हल्ल्याच्यावेळी महाराजांचे कोणकोणते सेनानी सहभागी झाले होते याचे उल्लेख समकालीन साधनात नसले तरी रायगडावर राज्याभिषेकासाठी आलेले सेनापती हंबीरराव या मोहिमेत सहभागी असावेत.

### ७:५:१:१ हंबीररावांच्या मुघल प्रदेशातील हालचाली (१६७४–७६) :

राज्याभिषेकानंतर दसऱ्याच्या मुहूर्तावर मराठी लष्कर मुलूखगिरीसाठी बाहेर पडले. ६ ऑक्टोबर १६७४ रोजी मुंबईकर इंग्रजांनी सुरतेला लिहिलेल्या पत्रात, महाराज मोठ्या सैन्यासह कल्याणला आले आहेत व बहादूरखानावर किंवा सुरतेवर चालून जाणार आहेत अशी बोलवा आहे असे कळविले आहे.[२९] त्याप्रमाणे मराठी सैन्याने सुरतकडे जाण्याचा प्रयत्न केला. परंतु रामनगरच्या खिंडीत ३–४ हजार भिल्लांनी सैन्याला अडवून धरले. तेथून जावू देण्यासाठी महाराजांनी १ लक्ष रुपये देण्याचे आमिष दाखवूनही त्याचा उपयोग झाला नाही.[३०] तेव्हा मराठे सैन्य त्यांचा नाद सोडून औरंगाबादकडे वळले.

सेनापती हंबीरराव मोहिते औरंगाबादकडील मोगली मुलूखात घुसले व त्यांनी औरंगाबादजवळील अनेक शहरे लुटली. औरंगाबाद परिसरात मराठे लूटालूट करत असलले पाहून मोगल सेनापती कुतूबखान चालून आला. मराठ्यांनी कुतुबखानाचा पराभव करून त्याचे ३०० सैनिक कापून काढले.[३०] त्यानंतर मराठ्यांनी बागलाण आणि खानदेश या प्रदेशावर हल्ले चढवून तेथे १ महिन्यापेक्षा जास्त काळ लूटालूट केली. यावेळी हंबीररावांनी बुऱ्हाणपूरापर्यंत धडक मारली व तो प्रदेश लूटला.

१ जानेवारी १६७५ रोजी हंबीररावांनी धरणगाव (Dungom) हे शहर व तेथील इंग्रजांची वखार लूटली. या लूटीविषयी सुरतकरांनी मुंबईकर इंग्रजांना २० जानेवारी १६७५ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, Mr. Samuel Austen and Thomas Haggerston are returned to us, their factory of Dungom being destroyed by Sevajees forces the 1'st of this month. Our ware house, with what goods there in, the General ordered to be burnt, not with standing they declared themselves English, that we had peace with Sevajee and had settled factory in Rajapore.[३२]

मराठे वखारीत आले त्यावेळी इतरांनी मराठ्यांच्या सेनापतींना नुकत्याच झालेल्या इंग्रज–मराठा शांतता तहाची आठवण करून दिली. परंतु सेनापतींनी त्याकडे दुर्लक्ष करून वखार लुटली. वखारीचे अधिकारी सॅम्युअल ऑस्टिन व हॅगरस्टन यांना कैद करण्यात आले. परंतु नंतर सोडून दिले. या वखारीतून मराठ्यांना ३०–४० कापडाची ठाणे आणि १० हजार रुपयांची लूट मिळाली. मराठ्यांनी धरणगाव व तेथील इंग्रजांची वखार या दोहोंचीही लूट करून जाळून फस्त केले. सेनापती हंबीरराव मोगली प्रदेशात असे धुमाकूळ घालत असतानासुद्धा मुघल सेनापतींनी त्यांना विरोध केला नाही. मुघल सेनापतींनी दुर्लक्ष केल्यामुळेच शिवाजीच्या सैन्याने थेट बुऱ्हाणपूरच्या तटापर्यंत जावून सर्व मुलूख लूटला आणि आमची वखारही लुटली गेली असा तक्रारीचा सूर २४ मार्च १६७५ रोजी मुंबईहून इंग्लंडला पाठविलेल्या इंग्रजांच्या पत्रात आढळतो.[३३] या लुटीची नुकसान भरपाई मिळविण्याचा इंग्रजांनी प्रयत्न केला. १५ सप्टेंबर १६७५ रोजी इंग्रजांचा धरणगाव वखारीचा अधिकारी ऑस्टिन रायगडावर महाराजांना भेटला. परंतु महाराजांनी ''आपल्याकडे अजून काहीच कळले नाही.

फक्त काही चांदीची भांडी मिळाल्याचा दाखला आहे. अगदी हलक्या सैन्याने सहज लुटावे अशी बिनतटबंदीची वखार कोणीही बाजारी लोकांनी लुटली असल्यास तो गुन्हा आमच्या सेनापतीच्या अंगी चिकटवणे अन्यायाचे असल्याने आपण भरपाई करून देण्यास बांधलो नाही.'' अशा शब्दात लुटीची व नुकसान भरपाईची जबाबदारी नाकारली. त्यावर ऑस्टिनने, ''मला धरून कैदी म्हणून सेनापतीने नेले, तेव्हा त्याच्या माहितीशिवाय ही गोष्ट झाली नाही. समोरासमोर त्याला आणा. तो नाही म्हणून दे.'' अशा शब्दात आपले म्हणणे पटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु महाराजांनी त्याकडे विशेष लक्ष दिले नाही.[३४]

अशा प्रकारे सेनापती हंबीरराव मोहिते मुघल प्रदेशात लूटालूट करून पावसाळ्यात स्वराज्यात परतले. ऑक्टोबर १६७४ मध्ये महाराजांबरोबरच ते मोहिमेवर बाहेर पडले होते. जानेवारी १६७५ मध्ये महाराज रायगडावर परत आलेले दिसतात. १८ जानेवारी १६७५ रोजी महाराजांनी प्रभावळीचा सुभेदार जिवाजी विनायक याला पाठविलेल्या पत्रावरून[३५] महाराज या काळात स्वराज्यात असावेत. याचवेळी जानेवारी महिन्यात हंबीररावांनी धरणगावची इंग्रज वखार लुटून मुघलांच्या बुऱ्हाणपूरपर्यंत धडक मारलेली दिसते.

**७:५:१:२ हंबीररावांनी लासूर लुटले (सन १६७६) :**

सेनापती हंबीरराव मोहिते तिकडे मुघल प्रदेशात धुमाकूळ घालत असताना इकडे आदिलशाही प्रदेशातही मराठ्यांची धामधूम चालूच होती. दत्ताजीपंतांनी कोल्हापूर काबीज केले होते. तर अण्णाजी दत्तो फोंड्याच्या किल्ल्याला वेढा देवून बसले होते. शिवाजी महाराजांना फोंडा किल्ला व गोव्याच्या दक्षिणेचा कारवारपर्यंतचा मुलूख जिंकून घ्यावयाचा होता. या मोहिमेमध्ये मुघलांनी अडथळा आणू नये म्हणून महाराजांनी एक राजकारणी डाव टाकला. त्यासाठी त्यांनी मुघल सुभेदार बहादूरखानाशी मैत्रीच्या कराराचे बोलणे लावले. मार्च १६७५ पासून पुढे ३-४ महिने करारासंबंधी वाटाघाटी सुरू होत्या. एवढ्या वेळात महाराजांनी फोंडा किल्ला जिंकून कारवारपर्यंतच्या आदिलशाही मुलूखावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. आपला इच्छित कार्यभाग पार पडल्यानंतर महाराजांनी तहाच्या वाटाघाटीस आलेल्या मुघल वकिलांना हाकलून दिले.[३६]

शिवाजीराजांनी बहादूरखानास वाटाघाटीच्या फंदात अडकावून शेवटी फसविले. या घटनेमुळे बहादूरखानाची इज्जत पार धुळीस मिळाली होती. त्यामुळे महाराजांचा पक्का सूड घेण्यासाठी तो टपून बसला होता. इकडे कारवारपर्यंतचा आदिलशाही मुलूख महाराजांनी जिंकल्यामुळे आदिलशाही दरबाराचा वजीर खवासखानही महाराजांचा काटा काढण्यास उत्सुक होता. महाराजांचे हे दोन्ही शत्रू एक होवून त्यांच्यात तह होवून महाराजांवर चढाई करण्याचे ठरले. दोघांतील संबंध दृढ करण्यासाठी खवासखानाची मुलगी बहादूरखानाच्या मुलाला देण्याचे ठरले.[३७]

खवासखान व बहादूरखान यांच्यातील या तहामुळे स्वराज्यावर संकट निर्माण होणार हे महाराजांनी ओळखले आणि मोगली प्रदेशातच रणक्षेत्र उघडण्यासाठी सेनापती हंबीरराव मोहिते यांना मुघल प्रदेशात हल्ला चढविण्यास सांगितले. वाई–पुण्याच्या परिसरात असलेले हंबीरराव महाराजांच्या आदेशाप्रमाणे मुघल प्रदेशात घुसले आणि औरंगाबादपासून १४ कोसावर असलेल्या लासूर पेठेवर हल्ला चढवून त्यांनी ती लूटली. हंबीररावांचा मोड करण्यासाठी बहादूरगडावर असलेला बहादूरखान तातडीने त्यांच्यावर चालून आला. लासूर येथे उभय सैन्यात घनघोर लढाई झाली. दोन्ही बाजूचे बरेच सैन्य ठार झाले. अखेरीस हंबीररावाने बहादूरखानाचा धुव्वा उडविला. या घटनेचे वर्णन करताना खुद्द शिवाजी महाराज व्यंकोजी राजांना सन १६७६ मध्ये लिहिलेल्या पत्रात म्हणतात, ''आमचे घोडा राऊत सुभेदार हंबीरराऊ वाई पुण्याहून धाविला. तो दौलताबादेजवळ लासूर पेठ आहे. तिथे कितेक पेठेचा माल आमचे लोकी लूटिला. इतुकियामध्ये बहादूरखान तडका छावणी करून लासूरास गेला. तेथे त्यामध्ये व आमचे लस्करात झगडा झाला. खस्त फार जाहाली. त्याचे लोक पडिले व आपले पडिले. आपले लोकी इतकी आधिकाई केली की, बहादूरखानाचे चार हत्ती पाडाव केले ते मोहोरे (पुढे) घालोन बहादूरखानाशी थोपून बलेच राखोन मजील दरमजील आपले मुलूकात कोकणात आले.[३८]

महाराजांच्या या पत्रावरून या युद्धाची स्पष्ट कल्पना येते. लासूर येथील या संघर्षात हंबीररावांनी खानाचे चार हत्ती पाडाव केले व बहादूरखानाला थोपवून धरून हे हत्ती व

लासूरमधील लूट सुरक्षितपणे स्वराज्यात आणली. यावेळी खानाशी झगडत वेळ घालवण्यापेक्षा मिळालेली लूट सुरक्षितपणे घेवून येणे हे हंबीररावांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे होते. त्याप्रमाणे त्यांनी माघार घेतलेली दिसते. त्यामुळेच या युद्धात हजर असलेला भीमसेन सक्सेना मात्र या युद्धाचे वर्णन करताना 'मराठ्यांच्याने दम धरवला नाही. त्यांचा पराभव झाला' असे लिहितो.[३९] परंतु ते तितकेसे खरे नाही.

अशा प्रकारे इ. स. १६७४ ते ७६ या कालखंडात हंबीररावांनी मुघल प्रदेशात घुसून भरपूर लूट स्वराज्यात आणली. या काळातील हंबीररावांच्या कामगिरीचे वर्णन करताना सभासद बखरीत म्हटले आहे की, ''राजियांनी आपले लष्करास हुकूम करून हंबीरराव सरनौबत फौज घेवून मोगलाईत शिरले. खानदेश, बागलाण, गुजराथ, अमदाबाद, बऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहूर वरकड देश नर्मदापावेतो, देखील–जालनापूर, या देशात स्वारी करून मुलूख मारून, खंडणी करून जप्त केला. मालमत्ता अगणित जमा करून चालिले. तो बहादूरखान यांनी कुल जमाव घेऊन हंबीररायाचे पाठीवर चालून आले. राजियांची फौज तोलदार गाठली. मोगल बहुत धास्तीने घाबिरा होवून सात आठ गावाचे अंतराने चालिला. दिलेलखान उतावळ होवून फौजेशी गाठ घातली. हंबीरराव यांनी दिलेलखान नजरेत धरिला नाही. तोलदारीने मत्ता घेवून आपले देशास आले. मालमत्ता राजियास दिली.''[४०]

अशा प्रकारे राज्याभिषेकानंतरच्या दोन वर्षात महाराजांचा मुघल, आदिलशहा व सिद्धी यांच्याबरोबरच एकाच वेळी संघर्ष सुरू होता. याकाळात मुघल प्रदेशातील मोहिमेची जबाबदारी सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यावर सोपविलेले दिसते. ही कामगिरी हंबीररावांनी उत्तमरित्या पार पाडली.

**७:५:१:३ कर्नाटक मोहिमेतील सेनापती हंबीररावांचे योगदान :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६७७–७८ मध्ये काढलेली कर्नाटक मोहीम ही त्यांच्या जीवनातील सर्वात मोठी व फलदायी मोहिम मानली जाते. या मोहिमेत अगदी अल्पकाळात महाराष्ट्रामध्ये निर्माण केलेल्या स्वराज्याएवढेच मोठे राज्य त्यांनी कर्नाटकात स्थापन केले. त्यामुळे हिंदवी स्वराज्याचा झेंडा अमराठी भागावरही फडकू लागला. छत्रपती

शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण अशा या मोहिमेत सेनापती हंबीरराव मोहिते यांनीही मोलाचे योगदान दिल्याचे दिसते.

सन १६७५ च्या उत्तरार्धात छत्रपती शिवाजी महाराज काही काळ गंभीर आजारी होते. या काळात ते सातारा येथे होते. या आजारपणातही महाराजांची भावी योजनेची विचारचक्रे थांबली नव्हती. साताऱ्यात व नंतर पन्हाळ्यावर विश्रांती घेत असतानाच कर्नाटकात मोहीम काढण्याचे विचार त्यांच्या मनात घोळत होते. यापूर्वीच महाराजांनी आपले सावत्र भाऊ व्यंकोजीराजे यांना एक पत्र पाठवून आदिलशाही वर्चस्व झुगारून देवून आजूबाजूचा प्रदेश ताब्यात घ्यावा असा सल्ला दिला होता.[४१] परंतु व्यंकोजींनी तंजावर ताब्यात घेण्याव्यतिरिक्त काही केले नाही. तेव्हा स्वत:च कर्नाटक मोहिमेवर जाण्याचे महाराजांनी ठरविले.

यावेळी देशातील एकंदर राजकीय परिस्थिती मोहिम काढण्याच्या दृष्टीने अनुकूल होती. मोगलांचा दक्षिणेचा सुभेदार बहादूरखान याने आदिलशहाविरुद्ध मोहिम हाती घेतली होती. आदिलशाहीवर मुघलांची स्वारी झाली असतानाच दरबारात पठाण पक्ष व दक्षिणी मुसलमान पक्ष यांच्यात यादवी चालू होती. अशा परिस्थितीत विजापूर दरबाराकडून महाराजांना फारसा प्रतिकार होणार नव्हता. महाराजांनी बहादूरखानाला मोठी लाच देवून आपल्याला अनुकूल करून घेतले. याशिवाय कुतूबशहाशीही वाटाघाटी करून कर्नाटक मोहिमेस त्याचा पाठिंबा मिळविला. कुतूबशहाने त्यांना मोहिमेवर जाण्यापूर्वी आपल्या दरबारात येण्याचे निमंत्रण पाठविले.

**७:५:१:३:१ हुसेनखान मियाणाचा पाडाव (जानेवारी १६७७) :**

छत्रपती शिवाजी महाराज डिसेंबर १६७६ मध्ये कर्नाटक मोहिमेवर निघाले. प्रथम ते कुतूबशहाच्या भेटीसाठी कुतूबशाही राजधानी भागानगरला जाणार होते. त्यावेळी त्यांच्या बरोबर पायदळाचे सरनौबत येसाजी कंक. सुर्याजी मालूसरे, रघुनाथ व जनार्दन पंडीत, मानाजी मोरे, आनंदराव मोरे, सोनाजी नाईक, बाबाजी ढमढेरे, सेखोजी गायकवाड इत्यादी सरदार व जवळजवळ ४० ते ५० हजार सैन्य होते.[४२] यावेळी हंबीरराव मोहिते त्यांच्याबरोबर

नव्हते. महाराजांनी त्यांना वेगळ्याच मोहिमेवर पाठविले होते. ते काम पूर्ण करून हंबीरराव महाराजांना सामील होणार होते.

कर्नाटक मोहिमेला निघण्यापूर्वी महाराजांनी कृष्णा व तुंगभद्रा या नद्यामधील प्रदेश व त्यातील कोप्पल किल्ला जिंकण्याचे ठरविले. दख्खनचा दरवाजा म्हणून विख्यात असलेला हा किल्ला ताब्यात असणे कर्नाटकात शिरणाऱ्या महाराजांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे हे ओळखून महाराजांनी सेनापती हंबीररावांना या कामगिरीवर पाठविण्याचे ठरविले. कोप्पल येथे आदिलशाही पठाण सरदार हुसेनखान मियाना व अब्दुर्रहिमखान मियाना हे दोन बंधू कारभार पाहात होते. त्यांच्या जुलमी कारभारामुळे तेथील हिंदू लोक भरडले जात होते. त्यांच्या जाचातून आपणास मुक्त करावे म्हणून तेथील लोकांनी महाराजांकडे मदत मागितली होती.[४३] त्यास प्रतिसाद देवून महाराजांनी हंबीररावांना खानाचा समाचार घेण्यास पाठविले. नोव्हेंबर १६७६ मध्ये हंबीररावांचा तळ नाशिक येथे होता.[४४] महाराजांच्या आदेशाप्रमाणे हंबीरराव संपगावच्या मार्गे कोप्पलला जाण्यास निघाले. यावेळी त्यांच्याबरोबर धनाजी जाधव, सर्जेराव जेधे, नागोजी सर्जेराव जेधे इत्यादी सरदार होते.[४५] कर्नाटकातील येलबुर्ग जवळ हुसेनखान हंबीररावांवर चालून आला. मराठ्यांच्या तुलनेत हुसेनखानाचे सैन्य जास्त होते. दोन्ही सैन्यात युद्धाची धुमश्चक्री उडाली. यात हंबीररावांनी पराक्रमाची शर्थ केली. हंबीररावासमोर हुसेनखान टिकाव धरू शकला नाही.

या युद्धात हंबीररावांनी केलेल्या पराक्रमाचे वर्णन सर जदुनाथ सरकार यांनी मिळविलेल्या एका फारशी कागदपत्रात आढळते. त्यातील संदर्भ फारच बोलका आहे. त्याचे संक्षिप्त वृत्त असे, ''मियाना शरीरेकरून जबर, कजाखही विशेष, हंबीररावाजवळ सरंजाम थोडा. मायण्याची जमियात मोठी. असे असता हंबीररावाने वीज चकाकता अंधकार दूर होवून शुद्ध उदकधारा नजरेस येते. तद्वत सैन्यात हलकल्लोळ होवून, खानाचे लोकांनी रस्ता देवून, जसे वेणीचे केस दुभाग करून रती वेणी घालते, तशा रीतीने हंबीररावाने हत्यार चालविताच, फळी फुटोन दुभांग केले. शेकडो मनुष्य जाता येता मारिले. खान नामोहरम होवून पळू लागले. त्यास धरून आणिले. सरंजाम सुद्धा सर्व लष्कर पाडाव करून आणिले. हंबीररावांकडील

फक्त पाचपन्नास लोक जखमी झाले. हे वर्तमान विजापूरी गेल्यावर तिकडून मियानास सोडविण्यास आणखी फौज चालून आली. हे वर्तमान ऐकून धनाजी जाधव हंबीररावाच्या मदतीस धावून आला. मग चहूकडून लांडगेतोड करून बेजार करून दिले . . . . आईस लेकरू लेकरास आई ओळखीना. आपला जीव वाचला तरी सर्व काही मिळेल. परंतु पळावे असेच मनास वाटावे, पुन: मराठ्यांचे लढाईची गाठ ईश्वरा घालू नकोस असे अंत:करणास म्हणावे. असे पराक्रम करून विजापूरी फौजास घालवून देवून व मियाना बंधूस कैद करून धनाजी व हंबीरराव गोवळकोंडा येथे शिवाजीस सामील झाले.''[४६]

या युद्धप्रसंगी हंबीररावांपुढे आपला टिकाव लागत नाही हे पाहून हुसेनखान आपला हत्ती माघारी वळवून पळून जावू लागला. हे पाहताच नागोजी जेधे याने आपला घोडा हुसेनखानाच्या हत्तीसमोर नेवून तलवारीने हत्तीचे सोंड कापून हत्ती रणांगणाकडे वळविला. त्यामुळे चिडलेल्या हुसेनखानाने नागोजीच्या मस्तकावर तीर मारला. तो नागोजीची हनुवटी फोडून बाहेर आला. दरम्यान मराठ्यांनी हुसेनखानास पकडले होते. नागोजीचा रूतलेला तीर बाहेर काढताच तो मृत्यु पावला.[४७] नागोजीच्या पराक्रमामुळे मराठ्यांना हुसेनखानास पकडता आले. नागोजीप्रमाणेच या युद्धात दोन्ही पक्षाचे अनेक सैनिक ठार झाले होते. हुसेनखान मियाणासारख्या जबरदस्त सरदाराचा पराभव करून हंबीररावांनी त्याला कैद केले. या संघर्षात मराठ्यांना भरपूर लूट प्राप्त झाली.

जेधे शकावलीत पुढीलप्रमाणे नोंद आहे, ''शके १५९८ नळनाम संवछरे, पौश मासी (२५ डिसेंबर १६७६ ते २३ जानेवारी १६७७) हुसेनखान माईणा यासी व राजश्री हंबीरराव यासी गदग प्रांते यालगेदलाजवळ पाडाव केला. दोन हजार घोडे व हाती पाडाव झाले.''[४८]

या नोंदीवरून हंबीररावांनी सन १६७६ च्या शेवटी किंवा जानेवारी १६७७ मध्ये हुसेनखानाचा पराभव केला असे दिसते. यानंतर हंबीरराव महाराजांना सामील होण्यासाठी रायचूर दुआबातून भागानगरच्या दिशेने निघाले व मार्च १६७७ मध्ये महाराजांना सामील झाले.

**७:५:१:३:२ कुतूबशहाशी भेट :**

महाराज ससैन्य कुतूबशहाची राजधानी भागानगरला (हैद्राबाद) पोहोचताच त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. कुतूबशहाचा वजीर मादण्णाने भागानगरच्या बाहेर महाराजांचे स्वागत केले. त्यानंतर महाराजांच्या स्वारीने दिमाखाने शहरात प्रवेश केला. शहरातील तमाम नागरिक महाराजांची अपूर्व स्वारी पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहिले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपण सार्वभौम राजे आहोत याचे प्रदर्शन करण्याचे मुद्दाम ठरविले होते. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक सरदाराच्या अंगावर तत्कालीन प्रघाताप्रमाणे सोन्या–चांदीचे व मोत्या–रत्नांचे अलंकार, माळा, तुरे होते. सैन्याचे पोशाख जरीचे उंची बनविले होते. शस्त्रास्त्रेही शोभिवंत, नवी दिसणारी केली होती. महाराजांच्या मागे सर्व अधिकारी व सैन्यभार चालला होता. रस्त्याने खैरात, द्रव्य, वस्त्रे वाटत महाराजांची स्वारी कुतूबशहाच्या भेटीसाठी गोवळकोंड्याच्या किल्ल्याखाली येऊन पोहोचली.[४९]

महाराज व कुतूबशहा यांची भेट किल्ल्यावरील बालेकिल्ल्यातील महालात झाली. किल्ल्याजवळ येताच महाराजांनी सेनापती हंबीरराव मोहिते, रघुनाथपंत व इतर सरदारांना लष्करासहित किल्ल्याबाहेर थांबवले व ते स्वत: वकील प्रल्हाद निराजी, कारभारी जनार्दन पंत व दोघे अंगरक्षक सोनाजी नाईक व बाळाजी ढमढेरे या चौघासह भेटीसाठी बालेकिल्ल्यात गेले.[५०] महाराज व कुतूबशहा यांची भेट एक प्रहर म्हणजे जवळजवळ तीन तासापर्यंत स्नेहपूर्ण वातावरणात पार पडली. यानंतर जवळजवळ १ महिना महाराजांचा मुक्काम भागानगरला होता. या काळात कुतूबशहाशी त्यांचा तह झाला. हा तह घाटत असताना इतर पाहुणचार व सत्कार चालूच होते. कुतूबशहाने सर्व मराठी फौजेची पाहणी करून सलामी घेतली. महाराज व कुतूबशहा दोघांनीही एकत्र बसून नावनिशीवार सरदार, मानकऱ्यांचे मुजरे घेतले. शहाने मराठा सरदारांना दर्जानुसार वस्त्रे, अलंकार, हत्ती, घोडे देवून त्यांचा गौरव केला. यावेळी सेनापती हंबीरराव मोहिते यांचाही सन्मान करण्यात आला.[५१]

**७:५:१:३:३ शिवाजी महाराजांना सहाय्य :**

कुतूबशहाची भेट घेवून महाराज एप्रिल १६७७ च्या पहिल्या सप्ताहात आपल्या पन्नास हजार फौजेसह कर्नाटक विजयास निघाले. कुतूबशहाचा सरलष्कर मिर्झा मुहम्मद अमीन एक हजार स्वार, ४ हजार पायदळ व तोफखान्यासह या मोहिमेत सामील झाला होता. महाराजांच्या नेतृत्वाखाली रस्त्याने ठिकठिकाणी खंडण्या वसूल करीत हे सैन्य कर्नूल, श्रीशैल्य, कडाप्पा या स्थानावरून मद्रास किनारपट्टीवर आले. तेथे त्यांनी जिंजीचा प्रसिद्ध किल्ला आदिलशाही अंमलदार नासिर महंमदखान याच्याकडून जिंकून घेतला. त्यानंतर त्यांनी वेलोर किल्ल्याला वेढा दिला. तिथल्या किल्लेदाराने प्रखर प्रतिकार केल्याने महाराजांनी नरहर रूद्र या अधिकाऱ्यास ७ हजार सैन्यासह किल्ल्याला वेढा देण्यास सांगितले व ते स्वत: वलिगंडपूरच्या शेरखान या आदिलशाही सरदाराशी लढण्यासाठी दक्षिणेत निघून गेले. शेरखानाचा पराभव करून महाराजांनी मद्रास कर्नाटकात आपले राज्य निर्माण केले.[५२] या सर्व मोहिमेत सेनापती हंबीरराव मोहिते यांनी महाराजांच्या नेतृत्वाखाली कार्य केले.

**७:५:१:३:४ व्यंकोजीराजांवर विजय :**

कर्नाटक मोहीम चालू असतानाच शहाजीराजांच्या जहागिरीचा अर्धा वाटा आपणास मिळावा म्हणून महाराजांनी व्यंकोजीराजांशी बोलणे लावले होते. उभयबंधूत गृहकलह न होता सामोपचाराच्या मार्गाने वाद मिटावा म्हणून महाराजांनी व्यंकोजीराजांना भेटीस बोलविले. जुलै १६७७ मध्ये तिरूवाडी येथील छावणीत उभयतांची भेट झाली. यावेळी महाराजांनी वाटणीचा प्रश्न काढला. परंतु व्यंकोजीराजे वाटणी देण्यास तयार नव्हते. शेवटी महाराज आपल्याला कैद करतील अशी भीती वाटून व्यंकोजीराजे तंजावरला पळून गेले.[५३] अखेर कठोर होवून महाराजांनी व्यंकोजीचा मुलूख काबीज करण्याची आज्ञा सेनादलाला दिली. त्यानुसार महाराजांचे सैन्य व्यंकोजीराजांच्या ताब्यात असलेल्या जगदेवगड, चिदंबर व वृद्धाचलम इत्यादी भागात शिरले व अल्पावधीत त्यांनी हा मुलूख जिंकून घेतला.[५४] २ ऑगस्ट १६७७ रोजी येलावनसोर हा किल्ला महाराजांच्या सैन्याने जिंकून घेतला. यावेळी महाराज स्वत: वृद्धाचलम येथे देवदर्शनासाठी गेले होते.[५५] अशा प्रकारे ऑगस्ट १६७७ पर्यंत

महाराजांच्या सैन्याने व्यंकोजीराजाच्या ताब्यात असलेली कावेरीच्या उत्तर तीरावरील सर्व जहागीर जिंकली.

महाराजांची कर्नाटक मोहित चालू असताना इकडे उत्तरेत मुघल व आदिलशहा यांनी कुतूबशहाशी युद्ध सुरू केले. या युद्धाच्या वार्ता ऐकून महाराजांनी कर्नाटक मोहिम आटोपती घेवून रायगडाकडे परत फिरण्याचा निर्णय घेतला. माघारी जाण्यापूर्वी महाराजांनी कर्नाटकातील जिंकलेल्या प्रदेशाच्या व्यवस्थेसाठी रघुनाथ नारायण हणमंते व व्यंकोजीच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी हंबीरराव मोहिते यांची नेमणूक कली व हंबीररावांच्या मदतीसाठी संताजी भोसले यांना ठेवले. पूर्वी व्यंकोजीराजांकडे असलेले संताजी भोसले (शहाजीराजांचे रक्षापुत्र) महाराजांना सामील झाले होते. महाराजांनी त्यांना एक हजार स्वाराची मनसब दिली होती.[५६] अशा प्रकारे कर्नाटकातील व्यवस्था करून महाराज परतीच्या प्रवासास निघाले. या प्रवासात महाराजांनी म्हैसूर कर्नाटकातील शहाजीराजांच्या जहागिरीची अनेक ठिकाणे जिंकून घेतली.

आपला मुलूख महाराजांनी जिंकल्यामुळे व्यंकोजीराजे चिडले होते. महाराजांची पाठ फिरताच मदुरेचा नायक व अन्य पाळेगार यांची मदत मिळवून त्यांनी आपला मुलूख परत मिळविण्याचे ठरविले व ते ४ हजार स्वार व १० हजार पायदळ जमवून हंबीररावांवर चालून आले. यावेळी हंबीरराव व संताजी भोसले ६ हजार स्वार व ६ हजार पायदळासह वालगंडपूरम येथे होते.[५७] दोन्ही सैन्ये समोरासमोर आली तरी लढाईस तोंड लागेना. कारण व्यंकोजीराजांच्या तळावरून गिधाडे फिरत असल्यामुळे हा अपशकून मानून व्यंकोजी युद्ध टाळीत होते. शेवटी १६ नोव्हेंबर १६७७ रोजी युद्धाला सुरूवात झाली. दिवसभर तुंबळ युद्ध होवून महाराजांच्या सैन्याला माघार घ्यावी लागली. व्यंकोजीराजांच्या सैन्याने काही अंतर त्यांचा पाठलाग केला व नंतर ते माघारी फिरले.[५८]

रात्री छावणीत परतल्यानंतर या पराभवाचे शल्य संताजीराजे, हंबीररावासह सर्वच मराठे सरदारांना बोचू लागले. सर्वांनी एकत्र येवून या पराभवाच्या परिणामाविषयी व त्यामुळे होणाऱ्या बदनामीविषयी चर्चा केली व लगेचच पुन्हा शत्रूवर हल्ला चढविण्याचा निर्णय घेतला.

इकडे फत्ते झाल्याच्या आनंदात व्यंकोजीराजांचे सैन्य विश्रांती घेत असतानाच अचानक महाराजांच्या सैन्याने मध्यरात्री त्यांच्यावर हल्ला चढविला. व्यंकोजीराजांचे सैन्य बेसावध असल्यामुळे त्यांची दाणादाण उडाली. अनेक सैनिक मारले गेले. व्यंकोजीराजांचे २–३ सेनापती कैद झाले. त्यांचे हत्ती, घोडे व इतर सामान महाराजांच्या सैन्याच्या हाती लागले. बाकीचे लोक कसाबसा जीव वाचवून तंजावरास पळाले.[५९]

व्यंकोजीराजे व सेनापती हंबीरराव यांच्यामध्ये झालेल्या या युद्धाची हकीकत सांगणारी दोन समकालीन पत्रे उपलब्ध आहेत. मद्रासकर इंग्रजांनी फोर्ट सेंट जॉर्ज येथून सुरतकरांना २० व २९ नोव्हेंबर १६७७ रोजी पाठविलेल्या पत्रात या युद्धाचा सविस्तर वृत्तांत कळविला आहे. तर दुसरे पत्र खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांनी या घटनेनंतर काही दिवसातच (नोव्हेंबर १६७७) व्यंकोजीराजांना पाठविले आहे. विशेष म्हणजे या दोन्हीही पत्रात या युद्धाच्या प्रसंगी स्वत: व्यंकोजीराजे उपस्थित असल्याचे किंवा पराभवानंतर पळून गेल्याचे उल्लेख सापडत नाहीत. यासंदर्भात शिवाजी महाराजांच्या पत्रातील मजकूर विचार करण्यासारखा आहे. महाराज व्यंकोजीराजांना लिहितात, ''. . . . चिरंजीव संताजी राजे व राजश्री रघुनाथपंत व राजश्री हंबीरराऊ यैसे ते प्रांते ठेउनु आम्ही स्वार होऊन मजल दरमजल करीत तोरगल प्रांतास आलो येथे यैसी खबर आइकिली की, तुम्ही तुरूक लोकांच्या बुधीस लागोन आमच्या लोकासी झगडा करावा यैसे मनी धरून आपली सारी जमेत येकवट करून आमच्या लोकावरी पाठऊन दिल्हेत. ते वालंगोडपुरास आले. तुमचे लोक चालून आल्यावरील तुमच्या आमच्या लोकात थोर झगडा जाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे, भिवजी राजे व शिवाजी दबीर यैसे तिघे धरिले व कित्तीयेक लोक मारिले कितीयेक लोक पलोन दाणादाण होऊन गेले यैसा समाचार आइकिला.''[६०]

महाराजांनी लिहिलेल्या या पत्रात स्पष्टपणे 'आपली सारी जमेत येकवट करून आमच्या लोकावरी पाठऊन दिल्हेत' असे म्हटले आहे. आपली सारी जमेत येकवट करून आमच्या लोकावरी चालून आलात असे म्हटले नाही. यावरून व्यंकोजी राजे स्वत: या युद्धात सहभागी नसावेत असे वाटते. इंग्रजांनी लिहिलेल्या पत्रातही युद्धाचा सविस्तर वृत्तांत दिला

आहे. ''युद्धात १००० घोडे, ३ सेनापती व सर्व तंबू वगैरे सामान महाराजांच्या सैन्याच्या हाती पडले ..... बाकीचे एकोजीचे लोक कावेरी पलीकडे तंजावरास पळाले.'' इतका बारकाईने तपशील नोंदवलेल्या या पत्रात व्यंकोजीराजांविषयी मात्र काहीच माहिती दिलेली नाही. त्यामुळे या युद्धाचे नेतृत्व स्वत: व्यंकोजीराजांनी केले का? याविषयी शंका निर्माण होते. उत्तरकालीन चिटणीस बखरीत मात्र, या युद्धाच्या वेळी व्यंकोजीराजे ही कैद होणारच परंतु शिवाजीराजांच्या बंधूसच कैद कैसे करावे अशी 'मर्यादा' हंबीररावांवर पडल्याने त्यांना सुखरूपपणे शे-दोनशे स्वारानिशी रणांगणातून जावू दिले, असे म्हटले आहे. सभासद बखरीतही व्यंकोजीराजे हंबीररावांवर चालून आले असे म्हटले आहे.

वर उल्लेखिलेल्या इंग्रजांच्या पत्रातील आणखी एक विशेष म्हणजे त्यांनी महाराजांच्या सैन्याचा प्रमुख म्हणून हंबीरराव यांच्याऐवजी संताजी राजे यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. संताजीराजे पूर्वी व्यंकोजी राजाच्या दरबारी असल्यामुळे इंग्रजांना परिचित होते. कदाचित त्यामुळेच इंग्रजांनी त्यांच्या नावाचा उल्लेख केला असावा. मात्र जेधे शकावली व सभासद बखर या दोन्ही साधनात या मोहिमेचे नेतृत्व हंबीररावांनी केल्याचे म्हटले आहे.

सभासद म्हणतात, ''त्याउपरि, कर्नाटकात हंबीरराव फौजेनिशी व रघुनाथ नारायण ठेविले होते हे वर्तमान व्यंकाजी राजे यास कळोन राजियांनी आपली फौज व पाळेगारांची फौज मिळविली, आणि हंबीरराव यावरी चालून आले. ते समयी हंबीरराव याचे चौगुणी घोडा राऊत हशम अगणित व्यंकाजी राजे यांचे होत. मग यास त्यास युद्ध जाले. मग राजियाचा पुण्यप्रभाव अधिक आणि भाग्योदय, हंबीरराव यांनी व्यंकाजी राजियाची फौज मोडली. मोठे युद्ध जाहाले. अगणित रण पडले आणि व्यंकाजी राजियाचे चार हजार घोडे पाडाव केले व हत्ती जड-जहवाहीर बाजे सरदार भिवजीराजे व प्रतापजीराजे वरकडही नामांकित लोक पाडाव केले. अशी फत्ते केली.''[६१]

सेनापती हंबीरराव व संताजीराजे यांनी व्यंकोजीराजांवर विजय मिळविल्याची बातमी महाराष्ट्राकडे निघालेल्या शिवाजी महाराजांना रस्त्याच समजली. त्यावेळी ते तोरगळ प्रांतात

होते. गृहकलहाने असे वळण घेतलले पाहून महाराज अस्वस्थ झाले. त्यांनी लगेच एक पत्र व्यंकोजीराजांकडे रवाना केले. या पत्रातून महाभारतातील कौरव–पांडव युद्धाचा दाखला देवून अशा गृहकलहाने दोघांचाही फायदा होणार नाही, ही गोष्ट व्यंकोजीराजांना परोपरीने पटवून देण्याचा महाराजांनी प्रयत्न केलेला दिसतो. याबरोबरच व्यंकोजीराजांना त्यांनी उपदेश केला की, ''याउपरि तन्ही आमचा आपला संधि व्हावा यैयी बुधि मनी धरून वाटियाचा वेव्हार निर्गमून टाकणे (निपटून टाकणे) आणि सुखे असणे. गृहकलह बरा नव्हे.''[६२]

दरम्यान सेनापती हंबीरराव मोहिते यांनी प्रत्यक्ष तंजावरवर चालून जाण्याची तयारी सुरू केली होती. मग मात्र व्यंकोजीराजे हादरले. व्यंकोजीराजांच्या पत्नी दिपाबाई यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पतीला महाराजांशी तह करण्याचा सल्ला दिला. हा सल्ला मानून व्यंकोजीराजांनी चांगल्या मध्यस्थाच्यामार्फत तहाचा प्रस्ताव हंबीरराव व रघुनाथपंत यांच्याकडे पाठविला. त्यांनी हा सारा वृत्तांत महाराजांना कळविला तेव्हा महराजांनी उभयतांना सबुरीचा हुकूम धाडला की, ''व्यंकोजीराजे आपले धाकटे बंधू आहेत. मूलबुद्धी केली. त्यास तोही आपला भाऊ, त्यास रक्षणे, त्याचे राज्य बुडवू नका.''[६३] महाराजांच्या हुकूमाप्रमाणे हंबीरराव व रघुनाथपंतांनी व्यंकोजीराजांशी तह केला. त्यानुसार तंजावरचा मुलूख व्यंकोजी राजांकडेच ठेवण्यात आला. कोलेरून नदीच्या दक्षिणेचे राज्य व नदीच्या उत्तरेकडील काही किल्ले व्यंकोजीराजांना देण्यात आले. त्यांनी ६ लाख रुपये खंडणी द्यावी. जिंजी प्रांत व म्हैसूर प्रांतातील शहाजी राजांच्या जहागिरीतील महाराजांनी जिंकून घेतलेले प्रदेश महाराजां–कडे असावेत असे ठरले.[६४] अशा प्रकारे हा तह होवून दोन्ही बंधूमधील गृहकलह मिटला.

व्यंकोजीराजांशी झालेला संघर्ष हा हंबीररावांच्या जीवनातील एक कसोटीचा आणि त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचा कस पाहणारा प्रसंग होता. शिवाजी महाराजांप्रमाणेच व्यंकोजीराजेही हंबीररावांचे मेहुणे होते. हंबीररावांची एक बहीण सोयराबाई ही शिवाजी महाराजांची पत्नी होती तर दुसरी बहीण अणूबाई ही व्यंकोजीराजांची पत्नी होती. याशिवाय व्यंकोजीराजे हे हंबीररावांची आत्या तुकाबाई यांचे चिरंजीव होते. म्हणजे ते नात्याने हंबीररावांचे आतेभाऊ होते. अशा प्रकारे व्यंकोजीराजांशी हंबीररावांचे नातेसंबंध होते आणि महाराजांचे सेनापती या

नात्याने व्यंकोजीराजांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली होती. हंबीररावांनी मात्र नातेसंबंधाच्याही पुढे जावून कर्तव्यपूर्ती श्रेष्ठ मानली आणि महाराजांच्या आदेशाप्रमाणे व्यंकोजी राजांवर विजय मिळवून त्यांचा बंदोबस्त केला. यानंतर दोन्ही बंधूत तह होवून गृहकलह मिटला, याचा हंबीररावांनाच जास्त आनंद झाला असेल.

**७:५:१:३:५ वेलोरचा कोट काबीज :**

व्यंकोजीराजांशी तह झाल्यानंतर हंबीरराव व रघुनाथपंत वेलोरच्या वेढ्यात सहभागी होण्यासाठी तिकडे गेले.[६५] वेलोरच्या सुप्रसिद्ध आदिलशाही किल्ल्यास शिवाजी महाराजांनी कर्नाटकात असतानाच वेढा दिला होता. अब्दुल्लाखान नावाचा जिद्दी आदिलशाही सरदार किल्ला लढवीत होता. जिंकण्यास कठीण असा हा भक्कम भुईकोट किल्ला वेढा देवून एक वर्ष झाले तरी मराठ्यांना दाद देत नव्हता. हंबीरराव, रघुनाथपंत, आनंदराव मकाजी हे तिघे सेनानी वेढ्याच्या ठिकाणी आल्यानंतर वेढा जोमाने सुरू केला. किल्ल्याची पक्की नाकेबंदी झाल्याने शिबंदीची उपासमार होवू लागली. अब्दुल्लाखान जेर झाला आणि शेवटी त्याला मराठ्यांच्या हाती किल्ला सोपवावा लागला. २२ जुलै १६७८ रोजी कर्नाटकातील हा अत्यंत महत्त्वाचा किल्ला स्वराज्यात सामील झाला.[६६] दरम्यान स्वराज्यावर आदिलशाही फौजा चालून येण्याची दाट शक्यता निर्माण झाल्याने महाराजांनी हंबीररावांना कर्नाटकातून बोलावून घेतले. स्वराज्यात आल्यानंतर महाराजांची व हंबीररावांची भेट झाली. महाराज कर्नाटकातून आल्यानंतर तेथे राहिलेल्या हंबीररावांनी आपली कामगिरी चोख बजावली होती. त्यावर खूष होवून महाराजांनी त्यांचा सन्मान केला व बक्षिस दिले.[६७]

**७:५:१:४ जालना मोहिमेतील सहभाग :**

सेनापती हंबीरराव मोहिते कर्नाटकातून स्वराज्यात दाखल झाले आणि लवकरच स्वराज्याचे वारसदार संभाजीराजे आपल्या पित्यावर रूसून मोगलांना जावून मिळाले. युवराज संभाजीने मुघलांना जावून मिळणे ही घटना म्हणजे महाराजांच्यावर फार मोठा आघात होता. परंतु महाराजांनी आपला संयम सोडला नाही. संभाजीराजांचे मन वळवून त्यांना स्वराज्यात माघारी आणण्याचे प्रयत्न सुरू होते. याचवेळी महाराजांचा मुघलांबरोबरील संघर्ष सुरूच होता.

दरम्यान मुघल सुभेदार दिलेरखानाने विजापूरकरांविरुद्ध मोहीम सुरू केली होती. त्यामुळे विजापूरी सरदार मसूदखानाने शिवाजी महाराजांकडे मदतीची याचना केली. महाराजांनी विजापूर शहरात संरक्षणासाठी १० हजार घोडेस्वारांचे सैन्य तसेच धान्याची रसद पाठवली. त्याचबरोबर दिलेरखानाचा विजापूरचा वेढा उठवावा यासाठी त्यांनी मुघल प्रदेशात मोहिम काढण्याचे ठरविले.[६८] छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील ही शेवटचीच मोहीम ठरली. या मोहिमेत सेनापती हंबीररावही त्यांच्याबरोबर होते.[६९] नोव्हेंबर १६७९ मध्ये महाराज थेट जालन्यास पोहोचले. औरंगाबादला मुघल सुभेदार शहजादा मुअज्जम उपस्थित असूनही तेथून केवळ ६४ कि. मी. अंतरावर असलेल्या जालना पेठेवर महाराजांनी हल्ला चढविला आणि सतत ४ दिवस ही पेठ लुटली. या पेठेत महाराजांना अगणित लूट सापडली. सर्व लुटीसह महाराज माघारी फिरत असताना रणमस्तखान, आसफखान, जाबीतखान इत्यादी सरदार ८–१० हजार फौजेसह महाराजांवर चालून आले. यावेळी झालेल्या लढाईत महाराजांचे पंचहजारी सरदार शिदोजी निंबाळकर ठार झाले. तर सेनापती हंबीरराव मोहिते जखमी झाले.[७०] एवढ्यात मोगलांच्या सहाय्यास मोठी फौज येत असल्याची बातमी महाराजांना समजली. या कठीण प्रसंगी बहिर्जीने आडवाटेने महाराजांना सुखरूप पट्टागडावर पोहोचविले.

**७:५:१:५ छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन :**

जालना मोहिमेवरून परत येत असतानाच संभाजीराजे मोगली गोटातून निसटून स्वराज्यात आल्याची वार्ता महाराजांना समजली. महाराजांनी पन्हाळगडावर त्यांची भेट घेवून समजूत घातली व उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या. यानंतर महाराज रायगडावर आले. रायगडावर आल्यानंतर ७ मार्च १६८० रोजी महाराजांनी राजाराम महाराजांची मुंज केली व १५ मार्च १६८० रोजी सेनापती प्रतापराव गुजर यांनी कन्या जानकीबाई हिच्याशी त्यांचा विवाह सोहळाही साजरा केला. सेनापती हंबीरराव मोहिते हे राजाराम महाराजांचे मामा होते. त्यामुळे या मुंजीसाठी व विवाहासाठी ते रायगडावर उपस्थित असावेत. या विवाह सोहळ्यानंतर थोड्याच दिवसात महाराज आजारी पडले आणि ३ एप्रिल १६८० रोजी

रायगडावर महाराजांचे आकस्मिक निधान झाले. महाराजांच्या मृत्युसमयी सोयराबाईसाहेब, पुतळाबाईसाहेब, धाकटे पुत्र राजाराम, रायगडचे कारभारी राहुली सोमनाथ, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य, हिरोजी फर्जद, बाळाजी आवजी इत्यादी मोजकीच मंडळी रायगडावर उपस्थित होती. महाराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे पन्हाळ्यावर होते. त्यांना महाराजांच्या मृत्युची बातमी कळू नये अशी दक्षता घेवून धाकटे पुत्र राजाराम महाराज यांच्या हस्ते महाराजांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराजांच्या मृत्युसमयी प्रमुख प्रधान मंडळी रायगडावर उपस्थित नव्हती. मोरोपंत पेशवे नाशिक भागात तर अण्णाजी दत्तो चौल भागात मोहिमेवर गेले होते. सेनापती हंबीरराव मोहिते कऱ्हाड परिसरात छावणी करून होते.[७१]

**६:५:१:६ संभाजीराजांचे राज्यारोहण – हंबीररावांची निर्णायक भूमिका :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर युवराज संभाजी हे महाराजांचे ज्येष्ठ पुत्र असल्यामुळे मराठ्यांच्या गादीवर त्यांचाच हक्क होता. असे असूनही महाराजांच्या मृत्युनंतर रायगडावर राजारामाचा गट आणि पन्हाळ्यावर संभाजीराजांचा गट यांच्यात गादीसंबंधी कलह निर्माण झाला. दोन्हीही पक्ष आपापल्या परीने गादी मिळविण्यासाठी खटपट करू लागले. वास्तविक पाहता छत्रपती शिवाजी महाराजांच्या हयातीतच त्यांच्यानंतर राजपद कोणाला मिळावे याविषयी चर्चा सुरू झाली होती. महाराजांच्या राज्याभिषेकप्रसंगी युवराज पदाचा मान संभाजी राजांना मिळाला असला तरी नंतरच्या काळात राजांचा हक्क डावलून आपला मुलगा राजाराम याला गादी मिळावी अशी सोयराबाईची खटपट सुरू होती. त्यातच प्रधान मंडळातील काही ज्येष्ठ प्रधानांशी संभाजीराजांचे संबंध चांगले राहिले नव्हते. संभाजीराजे इ. स. १६७८ मध्ये मुघलांना जावून मिळाल्यानंतर अष्टप्रधान मंडळात त्यांच्याविषयी अविश्वास आणि कटुता निर्माण झाली होती. त्यामुळे प्रधानमंडळातील काही प्रधानांचा कल राजाराम महाराजांच्या बाजूने झुकला होता. अशा परिस्थितीत वारसा प्रश्नाबाबत काही निश्चित भूमिका घेण्यापूर्वीच छत्रपती शिवाजी महाराजांचे आकस्मिक निधन झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराज हे सिंहासनाधिष्ठित अभिषिक्त राजे असल्याने त्यांचा अंत्यसंस्कार होण्यापूर्वी किंवा उत्तरीय क्रियाकर्मानंतर सहा दिवसाचे आत सिंहासनावर

वारसाची विधियुक्त स्थापना होणे शास्त्रानुसार गरजेचे आहे. परंतु महाराजांच्या मृत्युसमयी प्रमुख प्रधान रायगडावर उपस्थित नसल्याने ते येईपर्यंत हा निर्णय लांबणीवर टाकण्यात आला. मुख्यप्रधान मोरोपंत, सचिव आण्णाजी दत्तो रायगडावर पोहोचल्यानंतर या विषयावर निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्तो, प्रल्हाद निराजी, बाळाजी आवजी इत्यादी मंडळींनी सोयराबाईच्या नेतृत्वाखाली राजाराम महाराजांना राज्याधिकारी करण्याचे आणि संभाजीराजांना कैद करण्याचे कारस्थान रचले गेले. पुढे २१ एप्रिल रोजी म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर १८/१९ दिवसांनी प्रधानांनी संभाजीराजांचा हक्क डावलून राजाराम महाराजांचे मंचकारोहण केले. जेधे शकावलीत नोंद आहे की, ''शके १६०२ रौद्र संवछरे वैशाख शुध ३ मितीयेस राजारामास आनाजीपंत सुरनीस यांनी मंचकी बैसविले. संभाजी राजे यास कैद करून यैसा तह करून मोरोपंत व आपण पनलीया वर चालोन गेले.''[७२]

इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांच्या मतानुसार या कारस्थानात सचिव अण्णाजी दत्तो हे प्रमुख होते. त्यांनीच सोयराबाईंना ''आम्ही तुझ्या पुत्राला राज्याभिषेक करून तुलाच वीरराज्ञी करून व आम्ही राज्यकारभार हाकू'' असे सांगून त्यांनाही या कटात सहभागी करून घेतले. मोरोपंतांचा कल सुरूवातीला संभाजीराजांच्या बाजूने होता. परंतु नंतर तेही या कटात ओढले गेले. सेनापती हंबीरराव हे सोयराबाईचे बंधू असल्याने ते आपल्याच बाजूला येतील असा विश्वास त्यांना वाटत असावा.[७३]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युची बातमी बाहेर फूटू नये याची दक्षता घेण्यात आली होती. तरीही ही बातमी जास्त काळ दाबून ठेवणे अशक्यच होते. पन्हाळगडावर असलेल्या संभाजीराजांना ही बातमी महाराजांच्या मृत्युनंतर काही दिवसातच कळाली होती. महाराजांच्या मृत्युनंतर केवळ १५ दिवसांनी म्हणजे १९ एप्रिल १६८० रोजी राजापूरच्या इंग्रजांनी सुरतेला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, ''शिवाजी मरण पावला . . . संभाजी राजाने पन्हाळ्याला आपले ठाणे केले असून, त्याच्याकडे असंख्य सैन्य जावून मिळत आहे. त्याने राजापूरास माणसे पाठवून तेथे असलेले सर्व धान्य अटकवून किल्ल्यावर

पाठविण्याबद्दल हुकूम दिले आहेत.''[७४] तर २७ एप्रिल १८६० च्या पत्रात ते लिहितात, ''संभाजी राजाने कारभार आपल्या हाती घेवून राजपदवीही घेतली आहे. सुभेदार, हवालदार इत्यादी सर्व अधिकारी लोकांना त्याने आपल्याकडे बोलाविले आहे. कित्येकांना त्याने कैद केले व कित्येकांना कामावरून दूर केले. त्याचा नवा सुभेदार येथे आला.''[७५]

वरील दोन्ही पत्रावरून स्पष्टपणे लक्षात येते की, महाराजांच्या मृत्युची बातमी संभाजीराजांना लगेचच कळाली होती आणि त्यानंतर अत्यंत वेगाने हालचाली करून त्यांनी स्वत:चे राजपद घोषित केले. पन्हाळ्यावर धान्य वगैरे भरून किल्ल्याचा बंदोबस्त केला होता. तसेच त्यांनी राज्यातील किल्लेदारांना व अधिकाऱ्यांना आपल्या पायाशी रूजू होण्याचे हुकूम सोडले होते. कित्येक ठिकाणी आपल्या माणसांच्या नव्या नेमणूकाही केल्या होत्या. थोडक्यात म्हणजे रायगडावरील कारस्थानाची बातमी समजल्यामुळे त्याला तोंड देवून राजपद मिळविण्याच्या दृष्टीने संभाजी राजांनी पावले टाकावयास सुरूवात केली होती. याचदरम्यान राज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते यांनाही त्यांचे आज्ञापत्र आलेले दिसते.[७६]

इकडे रायगडावरून प्रधानांचीही हंबीररावांना 'आम्हास मिळून राजारामाचा कार्यभाग साधावा' अशी जासूदामार्फत पत्रे आली होती. हंबीररावांनी आपल्या मनाचा थांग लागू न देता त्या जासूदाकडूनच प्रधानाकडे निरोप पाठविला की, ''जेथे जेथे तुम्ही जाल तेथे तेथे मी येईन. तुमच्या प्रवासात मीही एक सोबती होईन. तुम्हाला सोडून जायला मला दुसरा रस्ता आहे कोणता?'' हंबीररावांचा हा निरोप संदिग्ध होता.[७७] सेनापती हंबीररावांचा हा निरोप ऐकून ते आपल्या बाजूला आहेत असा समज करून घेवून, प्रधान पन्हाळा घेवून संभाजीराजांना कैद करण्यास निघाले. यावेळी प्रल्हाद निराजी यांनी हंबीररावाच्या निरोपातील मतितार्थ ओळखून मोरोपंत व अण्णाजी दत्तो यांना संभाजीला विरोध न करता त्यांच्याशी संधी करा असा सल्ला दिला. परंतु तो न पटून ते पन्हाळ्याकडे जावयास निघाले.[७८] रस्त्यात कऱ्हाडजवळ असणारे हंबीरराव आपल्याला सहकार्य देतीलच असा त्यांना विश्वास होता.

राजसिंहासनासाठी होणाऱ्या या संघर्षात लष्कराचे प्रमुख सेनापती या नात्याने आपली भूमिका किती महत्त्वाची आहे याची जाणीव हंबीररावांना होती. एका बाजूला आपली

बहीण व तिचा लहान मुलगा राजाराम तर दुसऱ्या बाजूला युवराज संभाजीराजे. यांच्यापैकी कुणाची बाजू घ्यावयाची हा गहन प्रश्न हंबीररावांच्या पुढे होता. या प्रश्नाच्या उत्तरावरच बऱ्याच अंशी स्वराज्याचा वारस नेमके कोण होणार हे ठरणार होते. हंबीररावांचा निर्णय मनात झाला होता. परंतु प्रधान त्यांच्याजवळ येईपर्यंत त्यांनी तो स्पष्ट केला नव्हता. मात्र प्रधान कऱ्हाड परिसरातील त्यांच्या छावणीजवळ येताच हंबीररावाने त्यांची तीव्र शब्दात निर्भत्सना करून त्यांना कैद केले आणि ससैन्य पन्हाळ्यावर जावून संभाजी राजांच्या पायाशी रूजू होवून हे राजकैदी त्यांच्या हवाली केले.[७९] स्वराज्याचे सेनापतीच संभाजीराजांना मिळाल्यामुळे संभाजीराजांचे पारडे जड झाले.

मराठी राज्य यादवीच्या उंबरठ्यावर उभे असताना हंबीररावांनी योग्य निर्णय घेवून संभाजीराजांच्या बाजूने कौल दिला आणि आपण हिंदवी स्वराज्याचे सच्चे सेवक आहोत हेच सिद्ध केले. हंबीररावांना संभाजीराजांची बाजू न्यायाची वाटत होती. राज्याभिषेक समारंभात राज्याचे भावी वारस म्हणून युवराजपदाचा मान संभाजीराजांना मिळाला होता. त्यामुळे संभाजीराजांचा राजपदावरील हक्क डावलणे हंबीररावांना अन्यायाचे वाटत होते. दुसरी गोष्ट म्हणजे हंबीररावांना संभाजीराजांच्या शौर्य व पराक्रमाची कल्पना होती. संभाजी राजांमध्ये सैन्याला आवडणारे अनेक गुण असल्यामुळे ते सैन्यात प्रिय होते. महाराजांच्या मृत्युनंतर अनेक सैनिक संभाजीराजांना जावून मिळत होते. सैन्याप्रमाणेच अनेक सुभेदार, अधिकारी संभाजीराजांना सामील होत होते. पन्हाळ्यावरील या घडामोडींची वित्तंबातमी जवळच कऱ्हाड परिसरात असणाऱ्या हंबीररावांना निश्चितपणे मिळाली असावी. अशा परिस्थितीत आपण जर राजाराम महाराजांचा पक्ष उचलून धरला तर स्वराज्याला यादवीच्या खाईत लोटण्यासारखे होईल. कारण राजाराम महाराजांना राजपद मिळाल्यास संभाजी राजे गप्प बसणार नव्हते. ते राजपद मिळविण्याचे शर्थीचे प्रयत्न करणार हे उघड होते. त्यामुळे दोन्ही पक्षात संघर्ष होवून स्वराज्य दुबळे होण्याचा धोका होता आणि त्याचा फायदा स्वराज्याच्या शत्रूंना मिळाला असता. औरंगजेब बादशहा स्वराज्याचा नाश करण्यासाठी जंगजंग पछाडत होता. अशा परिस्थितीत १० वर्षाच्या आपल्या भाच्याला पाठींबा देण्याऐवजी संभाजीराजांसारख्या समर्थ

युवराजाला पाठींबा देवून स्वराज्याची स्थिती भक्कम करणे गरजेचे होते. या सर्व बाबींचा सारासार बुद्धीने विचार करून हंबीररावांनी संभाजी महाराजांना पाठींबा देण्याचा स्वराज्य हिताचा निर्णय घेतला असावा.

राजकैद्यांना बरोबर घेवून हंबीररावांनी आनंदराव निंबाळकरासह पन्हाळ्यावर जावून संभाजीराजांची भेट घेतली. प्रधानांना कैदेत ठेवून संभाजीराजांनी रायगडी प्रस्थान केले. बरोबर हंबीररावही होते. रायगडावर कोणीही कसलाही प्रतिकार केला नाही. संभाजीराजांनी रायगडचा हवालदार कान्होजी भांडवलकर यास कैद केले. राजारामाला नजरकैदेत ठेवले आणि १८ जून १६८० पासून रायगडावरून प्रत्यक्ष कारभारास सुरूवात केली. यानंतर लवकरच संभाजी महाराजांनी दि. २९ जुलै १६८० या दिवशी स्वत:चा मंचकारोहण समारंभ घडवून आणला. जेधे शकावलीत म्हटले आहे की, ''शके १६०२, रैद्र संवछर आशाड शुध २, शुक्रवारी संभाजीराजे रायेगडास आले. राज्य करू लागले. राजाराम कैदेत ठेवले. श्रावण शुध ५ पंचमी संभाजीराजे मंचकारोहाण जाले. आधीन वेदी मोरोपंती देह ठेविला. रायेगडी नेले. त्यांचे पुत्र निळोपंत सोडिले. पेशवाई दिल्ही. आनाजी पंतासही सोडिले मजमू दिल्ही.''[८०]

राजसूत्रे हातात आल्यानंतर संभाजी महाराजांचा लगेचच राज्याभिषेक होवू शकला नाही. अष्टप्रधानांच्या नेमणूकाही झालेल्या नव्हत्या. थोडी स्थिरता प्राप्त झाल्यानंतर प्रधानांच्या नेमणूका झाल्या. सेनापतीपदावर हंबीरराव कायमच होते. पेशवे मोरोपंतांना हंबीररावांनी धरले होते. यानंतर लवकरच महिन्या दीड महिन्यात त्यांचा मृत्यू झाला. मोरोपंताच्या मृत्युनंतर संभाजीराजांनी त्यांचे पुत्र निळोपंत व अण्णाजी दत्तो यांना कैदेतून सोडून निळोपंतांना पेशवेपद तर आण्णाजी दत्तोंना अमात्यपद दिले.

### ७:५:२ छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातील सेनापती हंबीररावांची कामगिरी (१६८०-१६८७) :

छत्रपती संभाजी महाराजांनी मंचकारोहण विधी होताच स्वराज्याचा बंदोबस्त करण्यासाठी विद्युत गतीने हालचाली सुरू केल्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन,

प्रधानांचे राजारामांना गादीवर बसविण्याचे कारस्थान आणि हे कारस्थान मोडून काढून संभाजीराजांनी मिळविलेली सत्ता इत्यादी घटना स्वराज्यात घडत असताना स्वराज्याच्या सीमेवर शत्रूच्या हालचाली चालूच होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन झाले त्यावेळी पेशवे मोरोपंत पिंगळे नाशिक–त्र्यंबकेश्वर भागातील आघाडीवर होते. महाराजांच्या मृत्युची बातमी समजताच ते रायगडावर आले व नंतर झालेल्या घडामोडीत कैदेत पडले होते. सत्तासूत्रे ग्रहण करताना छत्रपती संभाजीराजांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांना २० हजार सैन्यासह नाशिक–त्र्यंबकेश्वरच्या आघाडीवर रवाना केले.[८१] मोरोपंत पेशव्यांच्या धरपकडीनंतर त्यांच्या या भागात असलेल्या सैन्याने पूर्ण सहकार्य केले नाही तर त्यांना नियंत्रणात आणून स्वराज्यातील ती आघाडी सांभाळण्याची जबाबदारी आता हंबीररावांवर सोपविण्यात आली होती.

**७:५:२:१ हंबीररावांनी बऱ्हाणपूर लुटले (१६८०) :**

छत्रपती संभाजी महाराजांच्या आदेशाप्रमाणे हंबीररावांनी खानदेशच्या या आघाडीवर जावून ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी आपल्या हालचाली सुरू केल्या. त्यामुळे या परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. चोपडे येथील इंग्रज १० नोव्हेंबर १६८० ला लिहितात, ''२ तारखेपासून शिवाजीचे सैन्य बाहेर पडल्याच्या बातम्या येवून इकडे घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. येथे बोलतात की, स्वार व पायदळाची एक तुकडी सुरतेवर जाणार, दुसरी बुऱ्हाणपूरावर व तिसरी बहादूरखानास हुलकावणी देत गुंतवून ठेवणार. बहादूरखान सध्या मोगली हद्द ओलांडून दक्षिणेकडे गेला आहे.''[८२] इंग्रजांच्या या पत्रावरून स्पष्ट होते की, मुघल सुभेदार बहादूरखान दक्षिणेकडे गेला होता आणि त्याचाच फायदा घेवून हंबीररावांनी मुघलांचे खानदेशातील प्रतिष्ठित नगर बुऱ्हाणपूर लुटण्याची योजना आखली होती. या योजनेनुसार हंबीररावांनी आपल्या सैन्याचे लहान–लहान विभाग करून वेगवेगळ्या मार्गांनी पाठवून त्यांना बुऱ्हाणपूर येथे एकत्र जमविले.

सन १६८० च्या नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात हंबीररावांनी बुऱ्हाणपूरवर अचानक हल्ला चढवून ते शहर लुटले. जेधे शकावली व औरंगजेबाच्या दरबारी अखबारात बुऱ्हाणपूरच्या

लुटीचे उल्लेख आहेत. तर मुघल इतिहासकार खाफीखानाने या लुटीचे सविस्तर वर्णन केले आहे. या वर्णनात खाफीखानाने ही लूट संभाजीराजांनी केली असे म्हटले असले तरी जेधे शकावलीतील नोंदीनुसार ही कामगिरी हंबीररावांनीच केली होती.

खाफीखान लिहितो, ''त्यावेळी बुऱ्हाणपूरचा सुभेदार खानजमान हा होता. त्याचा नायब काकरखान अफगाण हा जिझिया कराच्या वसुलीच्या कामावर होता. बुऱ्हाणपुरात यावेळी तोच हजर होता. त्याच्यापाशी दोन–तीनशेपेक्षा अधिक स्वार नव्हते. सुमारे वीस हजार स्वारानिशी तो दुष्ट संभाजी वऱ्हाडात उच्छाद घालत फिरत होता. बुऱ्हाणपूरापासून वऱ्हाडचा मुलूख पस्तीस कोसावर आहे. तो मुलूख उध्वस्त करून तो पस्तीस कोसांची मजल मारून एकाएकी बुऱ्हाणपूरावर चालून आला. काफरांची फौज कुठल्याही दिशेने बुऱ्हाणपूरावर येईल अशी मुळीच कल्पना नव्हती. तशी बातमी ही पसरली नव्हती. बुऱ्हाणपूरापासून दीड कोसावर बहादूरपूरा म्हणून एक पूरा आहे तो अतिशय संपन्न होता. लक्षाधीश असे सराफ सावकार तेथे राहात. देशोदेशींची जिन्नस, जडजवाहीर, सोने, नाणे, रत्ने असा लक्षावधी रुपयांचा माल तेथील दुकानातून साठविला होता. तो सर्व मराठ्यांनी लुटला. मराठे अगदी अनपेक्षितपणे आले. शहराच्या तटबंदीच्या बाहेर बहादूरपूरा आणि इतर सतरा पूरे होते. त्यांना मराठ्यांनी घेरले. विशेषत: बहादूरपुऱ्यावर ते इतके अनपेक्षितपणे तुटून पडले की, त्या पुऱ्यातून एक माणूस किंवा एक पैसा लोकांना हलविता आला नाही. पुऱ्यात लावलेल्या आगीचा धूर आकाशापर्यंत पोहोचला. तेव्हा कुठे बुऱ्हाणपूरचा नायब आणि शहरातील इतर लोक यांना मराठे आल्याची खबर कळली. काकरखानाला मराठ्यांचा प्रतिकार करण्याची शक्ती नव्हती. त्याने शहराचे दरवाजे बंद केले आणि तट, बुरूज, वेशी इत्यादीचा बंदोबस्त करू लागला. हसनपूरा, शाहगंज, शहाजहानपूरा, खुर्रमपूरा, नबाबपूरा इत्यादी सतरा पूरे शहराच्या तटाला लागून होते. ती जणू काही शहराची केंद्रे होती. मराठ्यांनी ते सर्व पूरे ताब्यात घेतले. त्यांची लूट करून त्यांना आगी लावून दिल्या. काही अब्रुदार माणसांनी आपल्या बायकांना ठार मारले आणि ते स्वत: लढत लढत मारले गेले. शहराच्या तटाला लागून असलेले अनेक लोक आपल्या बायकापोरांना घेवून त्या भयंकर संकटातून मोठ्या

कष्टाने निघून शहराच्या आत पोहोचले. तीन दिवसापर्यंत मराठे नि:शंकपणे पूरे लुटीत होते. त्यांना मुबलक लूट मिळाली. अनेक वर्षाची जमिनीखाली पुरलेली संपत्ती त्यांच्या हाती सापडली. या संपत्तीचा घरमालकांनाही पत्ता नव्हता. ती मराठ्यांनी शोधून काढून हस्तगत केली.

मराठ्यांनी शिड्या लावून तटावर चढण्याचा प्रयत्न केला. शहरातील सर्व मनसबदारांनी मोर्चे बांधून मराठ्यांचा प्रतिकार केला. त्यामुळे ते शहरात दाखल होवू शकले नाहीत. मराठ्यांनी सोने, चांदी, जड–जवाहीर आणि मूल्यवान सामान घेतले. इतर जिनसांची त्यांनी पर्वा केली नाही. ते गेल्यावर रस्त्यात जळलेल्या आणि इतर वस्तूंचा इतका सडा पडला होती की, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.''[८३]

खाफीखानाच्या वृत्तांतावरून हंबीररावांनी बुऱ्हाणपूरच्या केलेल्या दुर्दशेची पूर्ण कल्पना येते. बुऱ्हाणपूर परिसरात मराठे गेल्याची बातमी हेरांच्याकडून औरंगाबादेस सुभेदार खानजहान बहादूर कोकल्ताश याला समजताच तो मराठ्यांना अडविण्यासाठी वेगाने निघाला. परंतु हंबीररावांनी जलद हालचाली करून लूट सुरक्षितपणे साल्हेर किल्ल्यावर पोहोच केली. याबाबतीत बहादूरशहाने मराठ्यांकडून लाच घेवून हंबीररावांना अडविण्यात मुद्दाम दिरंगाई केले असा प्रवाद त्यावेळी सगळीकडे पसरलेला दिसतो.[८४]

बुऱ्हाणपूरच्या लूटीची बातमी १९ फेब्रुवारी १६८१ रोजी औरंगजेब बादशहाला समजली. ही बातमी समजल्यावर औरंगजेबाने १० हजार रुपयांची मदत (खैरात) बुऱ्हाणपूरातील ज्यांची मालमत्ता लुटली गेली होती त्यांना वाटण्यासाठी पाठविले.[८५] परंतु या लुटीमुळे औरंगजेब बहादूरखानावर अतिशय चिडला. बहादूरखानाच्या मनसबीत वाढ झाली होती बादशहाने ती वहिवाटीविरुद्ध नामंजूर केली.

बुऱ्हाणपूरच्या मोहिमेवरून परत येताना हंबीररावांनी बुऱ्हाणपूरपासून नाशिकपर्यंतचा मुलूख लुटून जाळून टाकला असे पंतप्रतिनिधींच्या बखरीत म्हटले आहे. याच दरम्यान हंबीररावांनी धरणगाव येथील इंग्रजांची वखार लुटली असावी. धरणगावच्या वखारीतील इंग्रज ११ फेब्रुवारी १६८१ च्या पत्रात लिहितात की, ''संभाजीच्या सैन्याने धरणगाव लुटले व

वखारीची बरीच नुकसानी झाली.''[८६] एकूणच सत्तासूत्रे ग्रहण करताच छत्रपती संभाजीराजांनी आपल्या सेनापतींना खानदेशच्या मोहिमेवर रवाना केले होते. आणि हंबीररावांनी बुऱ्हाणपूरची लूट करून मुघलांची प्रतिष्ठा धुळीला मिळविली होती.

**७:५:२:२ छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकेकानंतरच्या हालचाली (१६८१) :**

छत्रपती संभाजी महाराजांचा विधियुक्त राज्याभिषेक सोहळा शके १६०२ माघ शुद्ध सप्तमीला म्हणजेच दि. १६ जानेवारी १६८१ रोजी रायगडावर संपन्न झाला. या राज्याभिषेकाचे वर्णन बखरीत आणि अनुपुराणात केलेले आहे. परंतु त्यासंबंधीची तत्कालीन कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे या राज्याभिषेक समारंभ प्रसंगी सेनापती हंबीरराव रायगडावर उपस्थित होते का? याविषयी निश्चित माहिती मिळू शकत नाही. राज्याभिषेकाच्यावेळी अष्टप्रधानांच्या रीतसर नेमणूका झाल्या. पण त्यापूर्वीच ही मंडळी आपापल्या हुद्याची कामे करू लागली होती.

३ जानेवारी १६८१ मधील छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर त्या संपूर्ण वर्षभरात मराठ्यांनी मुघल प्रदेशात कसा धुमाकूळ घातला होता याचे अनेक उल्लेख मुघल दरबाराच्या अखबारामध्ये सापडतात. बुऱ्हाणपूरच्या लुटीनंतर हंबीरराव मुघलांच्या वऱ्हाड प्रांतात मोहिमेवर गेले होते.[८७] इ. स. १६८१ च्या डिसेंबरात हंबीररावांच्या सैन्याने अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील कारंजा येथे लूटमार केली. ईरजखानाने त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. पण त्यात तो अयशस्वी झाला.[८८]

**७:५:२:३ औरंगजेबाचे दक्षिणेत आगमन :**

हंबीररावांनी केलेल्या बुऱ्हाणपूरच्या लुटीनंतर तेथील प्रतिष्ठित नागरिक, मौलवी, विद्वान, इत्यादींनी बादशहाकडे एक अर्जी पाठविली. काफरांचा जोर झाला. आमची अब्रू आणि संपत्ती नष्ट झाली. यापुढे शुक्रवारची नमाज बंद पडेल असे अर्जीत लिहिले होते. यावर बादशहाने खानजहानला चिडून पत्र लिहून कळविले की, दक्षिणेच्या काफरांचा बीमोड करण्यासाठी मी स्वत: येत आहे.[८९] याचदरम्यान एक विलक्षण घटना घडली. औरंगजेबाचा तृतीय पुत्र शहजादा अकबर याने राजपूतांच्या सहाय्याने आपल्या बापाविरुद्ध बंड पुकारले.

परंतु या बंडात त्याला यश न मिळाल्यामुळे तो छत्रपती संभाजी महाराजांच्या आश्रयाला आला. मराठ्यांनी अकबराचे स्वागत करून (१ जून १६८१) त्याची कोकणात पाली या ठिकाणी राहण्याची व्यवस्था केली. अकबराला संभाजीने आश्रय दिला हे ऐकून औरंगजेबाला संकटाची जाणीव झाली आणि संभाजी व अकबर यांचा नाश करण्यासाठी त्याने दक्षिणेकडे जाण्याचे ठरविले. मुघल इतिहासकार खाफीखान म्हणतो, ''दक्षिणेकडील मराठ्यांचा हा उच्छाद व अकबराचे पलायन या दोन्ही गोष्टींचा विचार करून बादशहाने दक्षिणेच्या मोहिमेवर स्वत: जाण्याचे ठरविले.'' त्याप्रमाणे प्रचंड सेनासंभार व अनेक अनुभवी सेनानीसह बादशहाने तातडीने अजमीरहून कूच केले व १३ नोव्हेंबर १६८१ रोजी तो बुऱ्हाणपूरास पोहोचला.[९०]

**७:५:२:४ छत्रपती संभाजीकालीन मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील हंबीररावांची कामगिरी :**

सन १६८२ मध्ये औरंगजेब बादशहा महाराष्ट्रात आला. या वेळेपासून ते त्याच्या इ. स. १७०७ मधील मृत्युपर्यंत त्याचा मराठ्यांशी संघर्ष सुरू होता. हा कालखंड (१६८२–१७०७) इतिहासात 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध' म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्ययुद्धाच्या या पहिल्या कालखंडात बलाढ्य मोगली सेनेचे आक्रमण प्राणपणाने परतवून लावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य छत्रपती संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली त्यांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांनी केले.

महाराष्ट्रात येण्यापूर्वीच औरंगजेबाने शहजादा आझम, बहादूरखान, किलिचखान, हसनअलीखान या सरदारांना स्वराज्याच्या सरहद्दीवर चढाई करण्यासाठी रवाना केले होते. वेगवेगळ्या दिशांनी हे सरदार स्वराज्यात घुसू पहात होते. बलाढ्य मुघल सेनेचे हे आक्रमण परतवून लावण्याच्या कामी सेनापती हंबीरराव हे छत्रपती संभाजी महाराजांचे प्रमुख सहाय्यक होते.

**७:५:२:४:१ शहजादा आझमशहा – हंबीरराव संघर्ष :**

औरंगजेब बादशहाने दक्षिणेत येण्यापूर्वीच आपला द्वितीय पुत्र शहजादा आझमशहा याची दक्षिणेच्या मोहिमेवर नियुक्ती केली होती. ११ नोव्हेंबर १६८१ रोजी आझमशहा औरंगाबादला येवून दाखल झाला होता. औरंगजेब बुऱ्हाणपूराहून औरंगाबादला येत असताना रस्त्यात कनौरी येथे १९ मार्च १६८२ रोजी त्याने बादशहाची भेट घेतली.[९१] औरंगजेबाने

त्याला आदिलशाही व मराठी राज्य यांच्या सरहद्दीवरील प्रदेशात आक्रमणासाठी जाण्यास सांगितले. विजापूरकरांनी छत्रपती संभाजी राजांना मदत करू नये आणि मराठ्यांना धाक बसावा यासाठी त्याला विजापूर आणि मराठी राज्य यांच्या सरहद्दीवर पाठविण्यात आले होते. त्यानुसार १४ जून १६८२ रोजी तो अहमदनगरहून रवाना झाला आणि आदिलशहाचा धारवाडचा किल्ला घेवून मराठ्यांच्या प्रदेशात घुसला.[९२]

मुघलांच्या या आक्रमणाला प्रतिकार करण्यासाठी छत्रपती संभाजी राजांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांना पाठविले. १८ हजार सैन्यानिशी हंबीरराव मुघलांवर चालून गेले. परंतु मुघलाबरोबरच्या या संघर्षात हंबीररावांची मोठी हानी झाली. त्यांचे २ हजार लोक मारले गेल्याने त्यांना आश्रयासाठी परत साताऱ्यास जावे लागले असे कारवारकर इंग्रज जुलै १६८२ च्या पत्रात लिहितात. परंतु या संघर्षात हंबीररावांची एवढी मोठी हानी झाली नसावी. हंबीरराव मोगली सैन्यास काढून लावल्यानंतर हानी झाली म्हणून नव्हे तर निवाऱ्यासाठी साताऱ्यास गेले असावे असे इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांचे मत आहे.[९३] या संघर्षाचा उल्लेख कारवारकरांच्या जुलैच्या पत्रात आहे. याचा अर्थ पावसाळ्याच्या सुरूवातीला हा संघर्ष झाला असावा व नंतर पावसाळ्यात निवाऱ्यासाठी हंबीरराव साताऱ्याला आले असावेत.

**७:५:२:४:२ कुलिचखानाशी सामना (सप्टेंबर–ऑक्टोबर १६८२) :**

पावसाळा संपताच दसऱ्यानंतर हंबीररावांनी २० हजार फौजेसह भीमा नदीच्या परिसरतील मोगली मुलूखात स्वारी केली. विठोजी चव्हाण हा शूर सेनानी त्यांच्याबरोबर होता. यावेळी शहजादा आझमशहा आपले जड सामान परिंड्यांच्या किल्ल्यात सोडून स्वराज्यात मोहिमेवर निघाला होता. त्याचा मुक्काम टेंभूर्णी येथे होता. व त्याच्याबरोबरील कुलिचखान (निजामउल्मुल्कचा आजोबा) व सरफराजखान हा सरदार भीमा नदी ओलांडून नदीपासून ४० कोस चालून आले होते.[९४] हंबीरराव व विठोजी चव्हाण त्यांच्यावर चालून गेले. दोन्ही सैन्यात जबरदस्त संघर्ष घडून आला. हंबीररावाच्या सैन्यापुढे कुलीचखानाची दाणादाण उडून त्याला माघार घ्यावी लागली होती. परंतु बादशहाला लिहिलेल्या पत्रात मात्र त्याने फुशारकी मारलेली दिसते. या युद्धाचे वर्णन करताना तो लिहितो, ''मी भीमेपासून ४० कोस

शत्रूच्या मुलूखात पोहोचलो तेव्हा संभाकडील २० हजार स्वार व प्यादे यासह हंबीरराव व विठोजी सामना करण्याकरिता आले. मी सराफ्राझखान, यलबर्शखान, कमालुधीनखान व किशोरसिंग हाडा वगैरेंना सात हजार स्वारासह फौजेच्या  हारावलीस नेमून स्वारी केली. शत्रूच्या लोकांशी लढाई झाली. बादशाही सुदैवाने शत्रूच्या तीन–चारशे लोकांना यमसदनास पाठविले व पुष्कळांना जखमी केले. बादशाही फत्ते झाली. पाच कोसपर्यंत शत्रूचा पाठलाग केला. तो पळून जावून पहाडामध्ये लपला. बादशाही लोकांच्या हातून उत्तम कष्ट घडले आहेत. आशा करतो की, याचा परिणाम चांगला होईल.''[९५]

कुलीचखानाचे हे पत्र औरंगजेबाच्या दरबारात ३ नोव्हेंबर १६८२ रोजी पोहोचले. याचा अर्थ ऑक्टोबर महिन्याच्या मध्यास हा संघर्ष घडून आला असावा. कुलीचखानाने हंबीररावांशी दिलेल्या या लढ्याचे वर्णन फुगवून सांगून आणि आपल्या पराक्रमाची (न केलेल्या) तरफदारी आपण करून पत्रात शेवटी बादशाही कृपेची अपेक्षा व्यक्त केली होती. शिवाय सय्यिद ओघलान यालाही पत्र लिहून त्याने बादशहापुढे आपली तरफदारी करावी अशी विनंती केली असावी. त्याप्रमाणे सय्यिद ओघलानने बादशहापुढे कुलीचखानाने हंबीररावांविरुद्ध मोठाच विजय मिळविला आहे अशी मखलाशी सुरू केली. परंतु अनुभवी औरंगजेबाचा या घटनेवर विश्वास बसला नाही. २० हजार सैन्यासह असलेल्या हंबीररावाचा पराभव करणे कुलीचखानाच्या शक्तीपलीकडची गोष्ट आहे हे बादशहा चांगलेच ओळखून होता. त्यामुळेच त्याने भर दरबारात, ''माझा विश्वास बसत नाही. शत्रूच्या लोकांना जर मारले तर बादशाही लोक कामास कसे आले? शिवाय तो (कुलीचखान) मुहम्मद आझमशहाकडे माघारी कसा आला? असा सवाल सय्यिद ओघलानला केला.[९६]

हंबीररावांबरोबर कुलीचखानाच्या संघर्षाची बातमी यापूर्वीच बादशहाच्या खास हेरांनी बादशहाला दिली असावी. त्यामुळे कुलीचखानाने आपल्या पत्रात युद्धात मेलेल्या मुघल सैनिकांची संख्या दिलेली नसतानासुद्धा युद्धात शत्रूपेक्षा आपलेच लोक जास्त मारले गेलेत आणि शत्रूला घाबरून किलिचखान माघारी आझमशहाच्या फौजेत आल्याची बित्तंबातमी बादशहास अगोदरच लागली असावी. त्यामुळे कुलीचखानाच्या पत्रातील मजकूराप्रमाणे

शहनिशा करण्याचा त्याने हुकूम दिला. संशयी आणि स्वत:च्या मुलांवरही सहजासहजी विश्वास न ठेवणाऱ्या औरंगजेबाने स्वत:ही याबाबत चौकशी सुरू केली आणि लवकरच आझमशहाच्या छावणीत नुकताच जावून आलेला बादशहाचा नोकर बहादूरअली खुशमंझिल याच्याकडून सत्य परिस्थिती बादशहाला समजली. ११ नोव्हेंबर १६८२ रोजीच्या औरंगजेबाच्या दरबारी अखबारात यासंबंधी पुढीलप्रमाणे नोंद आहे. ''बहादूरअली खुशमंझिल यास बादशहाचा हुकूम झाला की, तू तेथे (आझमशहाच्या छावणीत) असताना कुलीचखान शहजादापाशी आला होता का नाही? अर्ज केला की (उत्तर दिले), त्याने (कुलीचखानाने) येवून भेट घेतली तेव्हा शहजाद्याने त्यास विचारले, ''तू घाईने गनिमाचा मुकाबला करण्याठी कोणाच्या हुकूमाने पुढे गेला होतास?'' त्याने अर्ज केला, ''बादशहाच्या हुकूमाने.'' नंतर शहजाद्याने विचारले, 'मग शत्रूशी सामना करण्याच्या आगेदरच परत का निघून आलास?' त्याने अर्ज केला की, ''शत्रूचे लोक जास्ती होते आणि बादशाही लोक थोडे असून बरोबर बुणगे होते. म्हणून परत आलो.'' या संभाषणाने खान (कुलीचखान) दु:खी होवून स्वत:च्या घरी गेला.''[१७]

कुलीचखान व हंबीरराव यांच्यातील लढ्याचे खरे वास्तव अशा प्रकारे औरंगजेब बादशहापुढे उघड झाले होते. वास्तविक पाहता या लढ्याविषयी माहिती देणारी मराठ्यांच्या बाजूची कागदपत्रे उपलब्ध नाहीत. परंतु औरंगजेबाच्या दरबारी वृत्तांतावरून हंबीररावांनीच या संघर्षात बाजी मारली व कुलिचखानाला माघारी पिटाळून लावले ही गोष्ट अगदी स्पष्टपणे निदर्शनास येते.

**७:५:२:४:३ आझमशहा – हंबीरराव संघर्ष (खवासपूर) :**

हंबीरराव–कुलिचखान संघर्षानंतर थोड्याच दिवसात दोन्ही सैन्यात पुन्हा एकदा खवासपूरच्या परिसरात लढाई झालेली दिसते. मराठ्यांचे २० हजार सैन्य खवासपूरच्या परिसरात तळ देवून आहे अशी बातमी समजताच कुलिचखानाच्या फजितीचा वचपा काढण्यासाठी शहजादा आझमशहाने त्यांच्यावर हल्ला चढविला. यावेळी कुलीचखान, हसनअलीखान इत्यादी सरदारही त्याच्याबरोबर होते. याही लढाईचा वृत्तांत बादशहाला

कळविताना कुलीचखानाने आम्हास मोठा विजय प्राप्त झाला आहे. शत्रूचे घोडे व हत्यारे हाती आले असा कळविला आहे. त्याचबरोबर 'बहुतेक बादशाही लोक कामास आले' अशी पुस्तीही त्यास जोडली आहे.[९८]

**६:५:२:४:३:१ हंबीररावांनी शहजादा आझमला कोल्हापूर–पन्हाळा परिसरातून पिटाळून लावले :**

सेनापती हंबीररावांच्या फौजेला तोंड देत शहजादा आझम कोल्हापूर–पन्हाळा परिसरात दाखल झाला. पाठोपाठ हंबीररावही आपल्या २० हजार फौजेसह या परिसरात पोहोचले. आझमशहा पन्हाळ्याच्या अलीकडे ६ कोसावर असतानाच त्याला हेरांनी बातमी दिली होती की, हंबीररावाने त्याच्या सैन्याच्या पिछाडीवर हल्ला करण्याचा बेत केला आहे. तेव्हा आझमशहाने फिरुझखान व राव अनुपसिंह या दोन सेनानींना आपल्या सैन्याच्या पिछाडीचे संरक्षण करण्यासाठी ठेवले व तो स्वत: हंबीररावाशी सामना करावयास निघाला.[९९]

हंबीररावांनी आपल्या सैन्यातील पाच हजार स्वारासह आझमशहावर चाल केली. १५ डिसेंबरच्या सुमारास दोन्ही सैन्याची गाठ पडून घनघोर लढाई झाली. दोन्ही पक्षाकडील अनेक लोक मारले गेले व जखमी झाले. फिरुझखान व त्याची मुले युद्धात जखमी झाली.[१००] नेहमीप्रमाणेच बादशाही सैन्याची फत्ते झाल्याची वार्ता बादशहाला कळविण्यात आली. परंतु ती ऐकूनही बादशहा खूष होण्याऐवजी गप्प बसला. याचा अर्थ युद्धातील आपल्या पुत्राच्या यशाबद्दल औरंगजेबाला शंकाच असावी. त्यामुळेच त्याने या विजयवार्तेवर कोणतीही प्रतिक्रिया न देता गप्प राहणे पसंत केले.

दरम्यान २५ डिसेंबरच्या सुमारास पुन्हा एकदा हंबीरराव व आझमशहा यांच्यात आणखी एक लढाई कोल्हापूर परिसरात घडून आली. या लढाईचा वृत्तांत खुद्द आझमशहाने बादशहाला पुढीलप्रमाणे कळविला आहे. तो लिहितो, ''संभाचे हंबीरराव वगैरे नोकर १५००० स्वारासह लढाईसाठी आले होते. म्हणून मी कुलीचखान, हसनअलीखान, राव अनुपसिंग, अनिरुद्धसिंग हाडा व सराफ्रराझखान वगैरेंना हरावलीस आणि उजव्या–डाव्या बाजूस नेमून स्वारी केली. शत्रूशी ढाल, तलवार, खंजीर वगैरे हत्यारांनी लढाई केली. बादशाही सुदैवाने शत्रूच्या आठशे लोकांना मारले व जखमी केले आणि सातशे लोकांना जिवंत पकडले. त्यांची

छत्री, निशाण, बंदुका, वगैरे हत्यारे हाती आली. तसेच बहुतेक बादशाही लोक कामास आले व जखमी झाले. कुलीचखानास बंदुकीची जखम झाली. मोठा विजय प्राप्त झाला. बादशाही लोकांनी अत्यंत कष्ट घेतले. तपशील दिला आहे. विचार व्हावा.''

बादशहाने हा वृत्तांत समजल्यानंतर दरबारातील अधिकारी बक्षी रूहुल्लाखान यास हुकूम केला की, शहजाद्याच्या फौजेतील ज्या लोकांनी पराक्रम केला त्याची हकीकत स्वतंत्रपणे लिहून द्यावी आणि शहजाद्यास बक्षीस म्हणून एक लाख रुपये वेगळे काढून ठेवावेत.[१०१] याचा अर्थ बादशहाचा या वृत्तांतावर विश्वास बसला नव्हता. आपली मुले व इतर सरदार केवळ आपल्याला खूष करण्यासाठी आणि बक्षिसाच्या आशेने लढाईची वर्णने फुगवून सांगतात, याची औरंगजेबाला चांगलीच जाणीव असावी. त्यामुळे शहजाद्याने कळविलेल्या हकीकतीची शहनिशा झाल्यानंतरच युद्धातील विजयी वीरांवर बादशाही कृपा केली जाणार होती आणि खुद्द शहजाद्यालाही त्याच्या पराक्रमाची सत्यता कळाल्यानंतरच वेगळे काढून ठेवलेले १ लक्ष रुपयांचे बक्षीस मिळणार होते.

अशा प्रकारे कोल्हापूर–पन्हाळा भागात शहजादा आझमशहा व हंबीरराव यांच्यात जबरदस्त संघर्ष सुरू होता. परंतु निर्णायक विजय कोणालाही मिळत नव्हता. हंबीरराव मुघल सेनेला कोल्हापूर–पन्हाळा परिसरातून पिटाळून लावण्यासाठी जीवाचे रान करीत होते. तरीही त्यांना यश मिळत नव्हते. परंतु लवकरच हंबीरराव आपल्या प्रयत्नात यशस्वी झाले. जानेवारी–फेब्रुवारी १६८३ मध्ये झालेल्या आणखी एका लढाईत हंबीररावांनी आझमशहाला पराभूत करून स्वराज्यातून पिटाळून लावले. औरंगजेबाच्या दरबारी अखबारात याविषयी कोणतीही नोंद आढळत नाही. परंतु जेधे–शकावलीत याविषयी नोंद केली गेली आहे. त्यात म्हटले आहे की, ''माघ मासी (जानेवारी–फेब्रुवारी १६८३) आझमशहा येवून कोल्हापूर पावेतो धाविला त्यास हंबीररायांनी फिराऊन भवरेपलिकडे (भीमा नदी पलीकडे) लाविले.''[१०२]

शहजादा आझमशहाला पळवून लावून हंबीररावांनी मुघलांची दक्षिण भागातील ही आघाडी उध्वस्त केली. त्यामुळे वेगवेगळ्या आघाड्या उघडून स्वराज्यात घुसण्याच्या

औरंगजेबाच्या प्रयत्नांना खीळ बसली. मुघलांच्या या दक्षिण आघाडीतून स्वराज्यात घुसण्यासाठी आझमशहा दक्षिणेत आल्यापासून झटत होता. परंतु हंबीररावांनी त्याला या प्रयत्नात यश मिळू दिले नाही. आझमशहाचे हंबीररावांशी अनेक युद्धप्रसंग झाले. काही वेळा हंबीररावांना माघार घ्यावी लागली. पण अशा प्रकारची मराठ्यांची माघार म्हणजे त्यांचा दणदणीत पराभव व आपला मोठा विजय अशी समजूत मोगल सरदार करून घेत असत. परंतु शत्रूवर अचानक हल्ला करून शत्रूची शक्य तितकी हानी करून सुरक्षित माघार घेणे हा शिवछत्रपतींच्या तालमीत तयार झालेल्या हंबीररावांचा गनिमी कावा मुघलांना कधीच उमगला नाही. परंतु या गनिमी काव्याच्या लढाया करूनच हंबीररावांनी आझमशहाला स्वराज्यातून पिटाळून लावण्यात यश मिळविलेले दिसते.

**७:५:२:४:४ कल्याण–भिवंडी परिसरात रणमस्तखानाशी संघर्ष :**

शहजादा आझमशहाला कोल्हापूर परिसरतून पिटाळून लावल्यानंतर सेनापती हंबीरराव कल्याण–भिवंडी परिसरात गेलेले दिसतात. औरंगजेब बादशहा दक्षिणेत आल्यापासून कल्याण–भिवंडी परिसरात मुघल व मराठे यांच्यात संघर्ष सुरू होता. मुघल सरदार हसनअलीखान जानेवारी १६८२ मध्ये कल्याण–भिवंडी परिसरात उतरला होता. परंतु या मोहिमेत रसदेच्या कमतरतेमुळे व मराठ्यांच्या प्रतिकारामुळे त्याला फारसे काही साध्य न करता माघार घ्यावी लागली होती. तेव्हा औरंगजेबाने रणमस्तखान पन्नी (याला 'बहादूरखान' हा किताब देण्यात आला होता) याला इ. स. १६८२ च्या उत्तरार्धात कल्याण भिवंडी परिसरात पाठविले. जेधे शकावलीत म्हटले आहे की, ''शके १६०४, मार्गशीर्ष मासी (नोव्हेंबर १६८२) रणमस्तखान येथून कल्याणी बैसले. त्यावर रूपाजी भोसले व केसोपंत व निळोपंत पेशवे रवाना केले.''[१०३]

कल्याणला ठाण मांडून बसलेल्या रणमस्तखानाला प्रतिकार करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी रूपाजी भोसले, केसोपंत व निळोपंत पेशवे यांना पाठविले होते. त्यांचा रणमस्तखानाशी संघर्ष सुरू होता. मराठ्यांनी कल्याण येथे त्याला पेचात पकडले होते. रणमस्तखानाची अवघड परिस्थिती पाहून औरंगजेबाने नाशिक परिसरात मोहिमेवर असलेला

आपला बक्षी रूहुल्लाखान यास २३ फेब्रुवारी १६८३ रोजी त्याच्या मदतीसाठी जाण्याचा हुकूम दिला.[१०४] परंतु तो मदतीला येण्यापूर्वीच सेनापती हंबीररावांनी २७ फेब्रुवारी १६८३ रोजी रणमस्तखानावर हल्ला चढविला. या लढाईचा वृत्तांत रणमस्तखानाने औरंगजेबाला पुढीलप्रमाणे कळविला आहे. ''संभाचा नोकर हंबीरराव जमेतीसह आला म्हणून मी चालू महिन्याच्या १० तारखेला कल्याण–भिवंडी येथून स्वारी करून शत्रूच्या लोकांशी सामना दिला. लढाई झाली. शत्रूचे अनेक लोक मारले गेले व हंबीररावांस बाण लागून जखम झाली. तसेच त्याच्या बायकोचा भाऊ व इतर तीन सरदार मारले गेले. त्यांचा पराजय झाला. आम्ही काही कोस पाठलाग केला. बरेच बादशाही लोक कामास आले व जखमी झाले.''[१०५]

रणमस्तखानाने औरंगजेबाला कळविलेल्या या वृत्तांतानुसर हंबीररावांचे मेहुणे (बायकोचा भाऊ) व इतर तीन सरदार मारले गेले व स्वत: हंबीररावही जखमी झाले असे म्हटले आहे. याबरोबरच बादशाही लोकही युद्धात मारले गेले आहेत. यावरून हंबीररावांनी खानावर हल्ला करून त्याचे जास्तीत जास्त नुकसान करून माघार घेतली असावी. हंबीररावांची जखमही फारशी मोठी नसावी. कारण थोड्याच दिवसात हंबीरराव पुन्हा जय्यत तयारीनिशी मुघल सेनेच्या समाचाराला आलेले दिसतात.

**७:५:२:४:५ रूहुल्लाखानाचा दारुण पराभव :**

१५ मार्च १६८३ रोजी औरंगजेबाने रणमस्तखानाच्या मदतीला पाठविलेला बक्षी रूहुल्लाखान कल्याण भिवंडीच्या परिसरात येवून दाखल झाला.[१०६] सय्यिद इझ्झतखान व रावकर्णचा मुलगा पद्मसिंगही येवून त्याला सामील झाले.[१०७] औरंगजेब जसा आपले एक–एक अधिकारी रवाना करत होता त्याचप्रमाणे संभाजीराजेही कल्याण–भिवंडीच्या आघाडीवर आपल्या लढाऊ व शूर सेनापतीबरोंबर कुमक पाठवत होते. छत्रपती संभाजी राजांच्या आज्ञेप्रमाणे सेनापती हंबीरराव, रूपाजी भोसले, मानाजी मोरे इत्यादी सरदार १० हजार घोडदळ व १० हजार पायदळ घेवून कल्याण भिवंडी परिसरात पोहोचले होते. मार्च महिन्यात कल्याणच्या ईशान्येस सव्वाचार मैलावर असलेल्या टिटवाळा येथे हंबीररावांनी रूपाजी भोसलेसह रूहुल्लाखानाच्या पिछाडीवर हल्ला चढविला.[१०८] उभय सैन्यात जबरदस्त संघर्ष

घडून आला. मुघलांकडील प्रसिद्ध सरदार पद्मसिंह हाडा व इतर अनेक सरदार या युद्धात मारले गेले. या युद्धाचे वर्णन खुद्द रूहुल्लाखानाने बादशहाला पुढीलप्रमाणे कळविले आहे. तो लिहितो, ''संभाचा सरदार हंबीरराव वीस हजार स्वार व दहा हजार पायदळ यासह कल्याण–भिवंडीच्या जवळ आला होता म्हणून पद्मसिंग वगैरे पिछाडीच्या लोकांनी लढाई करून बादशाही सुदैवाने शत्रूचे दोन सरदार व २०० लोक मारले. हंबीरराव जखमी होवून पळाला. पद्मसिंग हा १५०० जात व १००० स्वार असा मनसबदार होता. त्यास ३५ जखमा झाल्या. भगवतसिंग वलद माणकोजी दखनी हा ५०० जात व ४०० स्वार असा मनसबदार होता. तो कामास आला. रामसिंग वलद रतन राठोड, १५०० जात व १३०० स्वार. हा आजारी होता. त्याने पद्मसिंगाच्या मृत्युनंतर चिलखत घालून शत्रूस तंबी देण्यासाठी स्वारी करण्याची इच्छा प्रगट केली. पण तो अशक्त होता. तो उष्णते (तापा) मुळे मरण पावला. हरिसिंग वलद, पुरणसिंग बुंदेला जखमी होवून लढाईच्या मैदानावर पडला होता. शत्रूच्या लोकांनी त्यास नेले. रघुनाथसिंग वलद पदमसिंग, भानगडचा जमीनदार काबुलीसिंग, माधोराम सिसोदिया व तुकोजी वगैरे बादशाही लोक जखमी झाले.[१०९]

हंबीररावांनी मुघल सेनेवर केलेल्या या हल्ल्यात रूहुल्लाखानाचा दारुण पराभव झाला होता. याविषयी पोर्तुगीज अहवालात म्हटले आहे की, ''२ एप्रिल १६८३ रोजी ... जे मोगली सैन्य कल्याणला बंदोबस्ताने तळ देवून बसले होते त्या सैन्यावर संभाजीने पिछाडीवरून हल्ला चढविला व बरेच लोक मारले व पुष्कळ घोडी पाडाव करून घेतली.''[११०] औरंगजेबाच्या दरबारी अखबारात या युद्धात मेलेल्यांची भलीमोठी यादी पहावयास मिळते. मराठ्यांच्या गनिमी कावा युद्ध पद्धतीची फारशी ओळख नसलेला रूहुल्लाखान हंबीररावांच्या युद्धकौशल्याने युद्धाच्यावेळी पुरता गडबडला होता. तरीही त्याचे कौतुक करताना औरंगजेब बादशहा म्हणतो, ''रूहुल्लाखानास दक्षिणी लोकांच्या लढाईची पद्धत माहिती नव्हती. तशाही परिस्थितीत तो टिकून राहिला. त्याने सरदारकीच्या कामामध्ये ढिलाई केलेली नाही.''[१११] रूहुल्लाखान हा औरंगजेबाचा मावसभाऊ असल्यामुळे त्याने त्याच्या पराभवाचे समर्थन केलेले दिसते. रूहुल्लाखानाऐवजी दुसरा एखादा सरदार असता तर कदाचित औरंगजेबाची

प्रतिक्रिया वेगळीच झाली असती. युद्धातील पराभवाची बातमी समजल्यानंतर औरंगजेबाने आठच दिवसात फर्मान पाठवून रूहुल्लाखानाला माघारी बोलाविले.[११२] त्याप्रमाणे मुघल सैन्य कष्टाने कसेबसे निसटून कोकणातून घाटावर आले. हंबीरराव जखमी होवून पळाले. शत्रूचे दोन सरदार मारले. अशी बढाई मारणाऱ्या रूहुल्लाखानालाच आपला गाशा गुंडाळून कल्याण–भिवंडी परिसरातून माघार घ्यावी लागली. रूपाजी भोसले व मानाजी मोरे हे दोन सरदार युद्धात मारले गेल्याचे त्याने बादशहाला कळविले होते. परंतु प्रत्यक्षात ते दोघेही जिवंत होते.

कल्याण–भिवंडीच्या या आघाडीवर खुद्द छत्रपती संभाजीराजेही स्वत: जावून लक्ष ठेवीत होते. त्यांच्याच नेतृत्वाखाली हंबीरराव, रूपाजी भोसले, मानाजी मोरे, केसो त्रिमल, इत्यादी सेनानींनी कल्याण–भिवंडी परिसरात शत्रूशी जबर संघर्ष करून त्यांचे आक्रमण परतवून लावले. एप्रिल १६८३ मध्ये बादशहाला आपल्या फौजा या प्रदेशातून माघारी बोलवाव्या लागल्या. त्यानंतर संभाजी महाराजांच्या मृत्युपर्यंत मोगल कल्याण–भिवंडी प्रांतात उतरू शकले नाहीत.

**७:५:२:४:६ रायगड परिसरात गाजिउद्दीनखानाशी संघर्ष (१६८४–८५) :**

औरंगजेबाने कोकणात पाठविलेल्या अनेक मोहिमा अयशस्वी झाल्या होत्या. इ. स. १६८३ मध्ये कल्याण–भिवंडी परिसरातून मुघल फौजा माघारी बोलविण्यात आल्या होत्या. तर १६८४ च्या मे महिन्यात शहजादा मुअज्जम दक्षिण कोकणच्या स्वारीवरून फजित होवून परत आला होता. याचवेळी रायगड परिसरात मोहिमेवर पाठविलेला शहाबुद्दीन मात्र या परिसरातील निजामपूर आणि आसपासची खेडी लुटून आला होता. त्याच्या या पराक्रमावर खूष होवून औरंगजेब बादशहाने त्याला 'महंमद गाजिउद्दीन खान बहाद्दूर' हा किताब बहाल केला होता.[११३] इ. स. १६८४ च्या उत्तरार्धात औरंगजेबाने त्याला पुन्हा एकदा रायगडच्या मोहिमेवर पाठविले. २१ सप्टेंबर १६८४ रोजी गाजीउद्दीन खान रायगडच्या मोहिमेवर रवाना झाला. त्याला खिलतीची वस्त्रे आणि पाच घोडे या वस्तू देण्यात आल्या.[११४] इ. स. १६८४

च्या अखेरीस तो पुण्यास पोहोचला. त्यानंतर बोरघाटमार्गे तो कोकणात उतरला. रायगड परिसरातील निजामपूरसह तीन ठिकाणे त्याने जावून जमीनदोस्त केली.[११५]

गाजीउद्दीन खान रायगड परिसरात जाळपोळ करीत होता. त्यावेळी छत्रपती संभाजी महाराज व सेनापती हंबीरराव मोहिते रायगडावर होते. खानाने रायगडच्या पायथ्याची पाचोरीवाडी व इतर खेडी जाळून किल्ल्यापासून ४ मैलावर तळ ठोकला. ही बातमी समजताच छत्रपती संभाजी महाराजांनी हंबीरराव व रूपाजी भोसले यांना १५ हजार स्वारासह त्याच्यावर पाठविले. दोन्ही सैन्यात तुंबळ युद्ध घडून आले. गाजीउद्दीनखान बादशहाला कळवितो, ''मी मौजे पाचोरीवाडी किल्ले राहिरी वगैरेवर हल्ले करून त्या किल्ल्यापासून दोन कोस अंतरावर डेरा दिला होता. तेव्हा संभाने हंबीरराव व रूपा भोसले यांना पंधरा हजार फौजेसह पाठविले. बाण व बंदुका यांची लढाई झाली. आम्ही चारी बाजूंनी शत्रूशी छोट्या हत्यारांनी लढाई केल्यामुळे त्यास निभावणे अशक्य होवून त्याने पळ काढला. आम्ही सात कोसपर्यंत पाठलाग केला. त्यांचे अनेक लोक मारले व जखमी केले आणि बादशाही फत्ते झाली. आम्ही परत डेऱ्यास येवून मुक्काम केला. तेथे सुबत्ता होती तिची लूट केली. एक महिन्याची तरतूद होती ती खर्च झाली तेव्हा कूच केले व मिफ्ताहुलफुतूह (कोथळागड) दरीच्या परिसरात गेलो. या महिन्याच्या दि. २९ ला घाटावर पोहोचू.''[११६]

हंबीरराव व गाजीउद्दीन खान यांच्यातील ही लढाई १२ जानेवारी १६८५ च्या सुमारास झाली असावी. खानाच्या विजयाची वार्ता ऐकून बादशहा अतिशय खूष झाला. त्याने खानाला 'फिरोझजंग' हा किताब बहाल केला.[११७] हंबीररावांच्या खानाशी झालेल्या या लढाईविषयी मराठ्यांकडील कागदपत्रे उपलब्ध नसल्याने मुघलांकडील एकतर्फी माहितीवर भरवसा ठेवावा लागतो. खानाने बादशहाला आपली फत्ते झाल्याचे कळविले आहे. परंतु विजयी झालेला खान या परिसरातून लगेचच निघून गेलेला दिसतो. प्रत्यक्ष रायगडावर हल्ला करण्याची हिंमत त्याला झाली नाही. त्यामुळे त्याचा खरोखरच विजय झाला होता का? याविषयी शंका निर्माण होते. खानाची माघार सुरू होताच छत्रपती संभाजीराजांनी कवि

कलशाच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा आपली  फौज खानावर पाठविली. कलशाने खानावर हल्ला चढवून त्यास तळकोकणातून हुसकावून घाटावर पिटाळले.[११८]

गाजीउद्दीनखानाबरोबरच्या या संघर्षाचे स्वरूप पाहता असे वाटते की, मराठ्यांच्या राजधानीवर हल्ला करण्यासाठी आलेल्या खानाला हाकलून लावण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी आखलेली ही कुशल युद्धयोजना असावी. या योजनेनुसार त्यांनी प्रथम हंबीररावांना पाठवून खानावर हल्ला चढविला. हंबीररावांनी खानाचे जास्तीत जास्त नुकसान करून माघार घेतली आणि मग खच्चीकरण झालेल्या व दमलेल्या या शत्रूवर कवी कलशाला पाठवून खानाला पिटाळून लावण्यात यश मिळविलेले दिसते.

रायगड परिसरातून घाटावर गेल्यावर गाजीउद्दीनखानाचा पुन्हा एकदा हंबीररावांशी संघर्ष झालेला दिसतो. इ. स. १६८५ च्या मे महिन्यात हंबीरराव साताऱ्याच्या परिसरात आले होते. ही बातमी गाजीउद्दीनखानास समजताच त्याने आपला सरदार मुजाहिद याला हंबीररावांवर पाठविले. परंतु यावेळी हंबबीरावांच्या जवळ पुरेसे सैन्यबळ नसल्याने शत्रू सैन्य साताऱ्याकडे येत आहे ही बातमी समजताच त्यांनी वाईकडे माघार घेतली.[११९]

सेनापती म्हणून आपली जबाबदारी पार पाडत असताना काही न्याय निवड्याच्या प्रसंगीही हंबीरराव उपस्थित असल्याचे काही पत्रावरून स्पष्ट होते. महादजी जगदाळा व संताजी घाटगा यांच्या शेतातील अनेक वस्तू सितोजी व त्याचा भाऊ सखोजी भोसले यांनी चोरल्या होत्या. या चोरी प्रकरणाचा न्याय निवाडा जानेवार १६८५ मध्ये रायगडावर झाला. या प्रसंगी हाजीर मजालसीत छत्रपती संभाजीराजांबरोबर सेनापती हंबीररावही सहभागी झाले होते. या गुन्ह्याच्या ३१ जानेवारी १६८५ च्या निकालपत्रावर प्रधान, न्यायाधीश यांच्याबरोबर हंबीररावांचाही शिक्का आहे.[१२०]

### ७:५:२:४:७  विजापूरच्या आदिलशाहीला मदत (१६८५–८६) :

छत्रपती संभाजीराजांबरोबरच्या युद्धात औरंगजेबाला यश आले नाही. तेव्हा त्याने विजापूरची आदिलशाही जिंकून घेण्याकडे आपले लक्ष वळविले. १६८५ च्या मे महिन्यात तो सोलापूर येथे पोहोचला. यापूर्वीच शहजादा आझम याने विजापूरला वेढा घातला होता.

आदिलशाहीवरील मुघलांचे आक्रमण हे एकट्या आदिलशाहीवरील संकट नसून हे संकट सर्व दक्षिणेवरील आहे असे समजून गोवळकोंड्याचा सुलतान व छत्रपती संभाजीराजे वागत होते. दोघांनीही आदिलशाहीला वाचविण्यासाठी मदत पाठविली.

छत्रपती संभाजी महाराजांनी जून–जुलै १६८५ मध्ये आदिलशाहीला मदत करण्यासाठी आपल्या खास विश्वासातील छंदोगामात्य कविकलश यास पाठविले. त्याने पन्हाळ्याला जावून तेथून फौजा रवाना केला. इ. स. १६८५ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस नागोजी बल्लाळ हा मराठा सरदार ७ हजाराची फौज घेवून विजापूरकराच्या मदतीसाठी निघाला होता. गाजीउद्दीनखानाने त्याचा पाठलाग केला. दोघांच्यात लढाई होवून त्यात बरेच मराठे मृत्युमुखी पडले, त्यामुळे नागोजी बल्लाळ माघारी फिरला.[१२१] तेव्हा डिसेंबर महिन्यात हंबीरराव विजापूरकरांच्या मदतीस निघाले. १० डिसेंबर १६८५ रोजी हंबीरराव ससैन्य विजापूरच्या परिसरात दाखल झाले व विजापूरला वेढा घालून बसलेल्या मोगल फौजेवर त्यांनी हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. परंतु या हल्ल्यांनी फारसे काही साध्य झाले नसावे. कारण लवकरच हंबीरराव मोगली मुलूख लुटण्यासाठी रवाना झाले अशी नोंद बुसातिन–उस–सलातीन या आदिलशाहीच्या इतिहास ग्रंथात पहावयास मिळते.[१२२] विजापूरवरील मुघल सैन्याचा दबाब कमी करण्यासाठी तसेच मुघल सैन्याचे लक्ष विचलित करण्याच्या उद्देशाने हंबीररावांनी ही मोहिम हाती घेतली असावी.

**७:५:२:४:८ मुघल प्रदेशात धामधूम :**

मुघल सैन्याचा विजापूरवरील दबाव कमी करण्याचा एक मार्ग म्हणून छत्रपती संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली सेनापती हंबीरराव मुघल प्रदेशात घुसले व मुघलांच्या ताब्यातील वऱ्हाड, खानदेश आणि बागलाण प्रांतातून त्यांनी धामधूम उडवून दिली. याविषयी औरंगजेब बादशहाचा चरित्रकार ईश्वरदास नागर लिहितो की, ''बादशहा विजापूरास होता. तेव्हा त्याला वऱ्हाड, खानदेश आणि बागलाण प्रांतातून पुढीलप्रमाणे बातम्या कळविण्यात आल्या – संभाजी आणि हंबीरराव हे आपल्या सैन्यासहित बादशाही मुलूखात पसरले. त्यांनी गावेच्या गावे उध्वस्त केली. विशेषत: त्यांनी मुसलमानातील सय्यद, शेख, विद्वान मुल्लामौलवी यांची

फारच दुर्दशा केली. पुष्कळ प्रतिष्ठित माणसे कोकणात जावून राहिली होती. त्यांचा छळ करण्यात आला. मोगल अधिकारी हे त्यांच्याशी लढले. पण त्यापैकी कित्येकांना पकडण्यात आले. रस्ते बंद करण्यात येवून, अनेकांना कैद करून त्यांना किल्ल्यात नेवून छळण्यात आले.''[१२३]

अशा प्रकारे संभाजी महाराजांची फौज विजापूरचा वेढा चालू असताना मोगली सैन्याला हरप्रकारे सतावीत होती. परंतु बलाढ्य मुघल सेनेपुढे आदिलशहा–मराठे यांची युती विजापूर वाचवू शकली नाही. १२ सप्टेंबर १६८६ रोजी विजापूर मुघलांच्या हाती पडले. आदिलशाही समाप्त झाली.

**७:५:२:४:९ आदिलशाहीच्या नाशानंतर मुघल सैन्याला प्रतिकार (१६८६) :**

आदिलशाहीच्या नाशानंतर विजापूर हा बलाढ्य मुघल साम्राज्यातील एक सुभा बनला. औरंगजेबाने या सुभ्यावर सुभेदार म्हणून रूहुल्लाखान याची नेमणूक केली. यानंतर ३० ऑक्टोबर १६८६ रोजी औरंगजेब विजापूरहून गोवळकोंड्याच्या मोहिमेवर रवाना झाला. औरंगजेब निघून गेल्यानंतर विजापूरचा सुभेदार रूहुल्लाखान याने आदिलशाही प्रदेशातील शेतसारा वसुलीसाठी आणि किल्ल्यांचा ताबा घेण्यासाठी मोहिम सुरू केली. परंतु त्यास मराठ्यांनी व विजापूरचे काही जुने सरदार यांनी मिळून प्रतिकार सुरू केला. मराठी राज्याच्या पूर्व व दक्षिण सरहद्दीवर सेनापती हंबीरराव मोहिते, रूपाजी भोसले, संताजी जगताप इत्यादी सरदार मुघलांना निकराने प्रतिकार करत होते.

मुघल सरदार रूहुल्लाखान रणमस्तखानासह कोल्हापूर–पन्हाळा भागात चालून आला. तेव्हा हंबीररावांनी त्यांना सामोरे जावून त्यांचा जबर पराभव केला. पराभूत झालेले हे दोन्ही खान बेळगावच्या दिशेने निघाले. आदिलशाहीतील महत्त्वाचा असा हा बेळगावचा किल्ला ताब्यात घेण्याचा त्यांचा विचार होता. बेळगावचा आदिलशाही किल्लेदार मुरादखान किल्ला त्यांच्या ताब्यात देण्यास तयार होता. ही बातमी समजताच हंबीररावांनी तातडीने रूहुल्लाखान व रणमस्तखानाचा पाठलाग सुरू केला. व मुरादखानास बजावले की, कोणत्याही परिस्थितीत किल्ला मुघलांच्या ताब्यात देवू नकोस. याचवेळी हुकेरी परगण्याच्या

देसाईलाही पत्र पाठवून हंबीररावांनी बेळगावला जाणाऱ्या मुघल सैन्याला मदत न करण्याची सूचना दिली आणि मराठे या प्रदेशात असताना मुघल सैन्याला घाबरण्याचे कारण नाही असा दिलासाही दिला.

२० डिसेंबर १६८६ रोजी पाठविलेल्या या पत्रात हंबीरराव म्हणतात, ''राजश्री अलगौडा देसाई परगणे हुकेरी गोसावी यासी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री हंबीरराऊ मोहिते सेनापती जोहार विनंती उपरी येथील क्षेम जाणवून स्वकीये कुशल लेखन करावयास अज्ञा केली पाहिजे. विशश गनीम रोहिलाखान व रणमस्तखान ऐसे मिरजेहून पनालापावेतो आला होता. अमचे फौजेसी व गनिमासी बरा मुकाबला होवून भांडण जाले. ते जागा गनिमाची बहुत खस्ता जाली. गनीम खटा होवून कोल्हापुरावरून बेळगावचे रोखे जात आहे. आम्ही सेनेसमुदायेनसी गनिमाचे पाठीवर अहो. गनिमाचा हिसाब धरत नाही. येक विजापूर जाले तरी काय झाले. विजापूर हा जागा आमचाच आहे. त्याची मदत हरबाबेने आम्हास करणे लागते. असदखान किलेदार मिरजेचा याने उतावली करून गनिमास मिरज दिधली (जेधे शकावली शके १६०८ चैत्रमासी (मार्च १५ ते एप्रिल १२, १६८६) मीरज मोगली घेतली.) त्याकरिता गनिमास रहावयास जागा होऊन पैस मांडिला आहे. हल्ली बेलगावकराने कोट देऊ केला म्हणून तिकडे गनिम जातो त्यास अम्ही खानेअजम मुरादखान यास कागद पाठविले आहेत की, गनिमास आसरा न देणे तुम्ही अम्ही येके जागा होऊन गनिमास सजा पावितो ऐसे लिहून पाठविले आहे. पहिले या मुलूकात राजश्री गोपाळराऊ होते ते लस्करास सामील जाले आहेत. यानी तुमचे विशई कितेक रदबदल केली की, आपणासी येक खुशीने चालत आहेत तरी हे गोस्टी बहुतच उत्तम आहे. गनीम वाटेने जात आहे. तुम्हास कागदपत्र पाठवील तरी एकंदर गनिमास न भेटणे, आसिरा न देणे. अम्ही लस्करानिसी या प्रांते असता तुम्हास कोण्हे गोस्टीचे काही भये नाही राजश्री रूपाजी भोसले व राजश्री संताजी जगताप यासिही बोलाविले आहे येके जागा होऊन गनिम गर्देस मेलवीतच अहो. तुम्ही आपले वर्तमान साकळ्ये लिहून पाठविणे. बहुत काय लिहिणे र।। छ. १४ सफर.''[१२४]

हंबीररावांनी हुकेरीच्या देसायांना पाठविलेले हे पत्र अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. या पत्रातून औरंगजेब दक्षिणेत आल्यावर आदिलशाही व शिवशाहीचे संबंध कसे होते यावर जसा प्रकाश पडतो त्याप्रमाणेच हे पत्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेल्या सेनापती हंबीररावांची ध्येय धोरणेही स्पष्ट करते. विजापूरचा पाडाव झाला असतानासुद्धा त्यांचा प्रदेश व किल्ले मुघलांच्या ताब्यात जावू नयेत यासाठी हंबीररावांची चाललेली धडपड, शत्रूशी लढण्याची जिद्द आणि अशा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचा 'गनिमास गर्देस मेळविणे'चा जबर आत्मविश्वास, इत्यादी अनेक गोष्टी या पत्रातून प्रतिबिंबीत होतात. आदिलशाहीच्या पाडावानंतर मुघल–मराठे हे दोघेही प्रतिस्पर्धी आदिलशाही मुलूखातील वतनदार देसायांना आपल्या पक्षात ओढण्याचा प्रयत्न करत होते. याच उद्देशाने हंबीररावांनी हुकेरीच्या देसायांना हे पत्र पाठविले आहे. या पत्रामुळे हुकेरीचे देसाई हंबीररावांना सामील झाले किंवा नाही याविषयी निश्चित माहिती मिळत नसली तरी हंबीररावांनी बेळगावच्या किल्लेदाराला केलेल्या आवाहनाचा मात्र अनुकूल परिणाम घडून आलेला दिसतो. मुरादाखानाने त्यावेळी तरी बेळगावचा किल्ला मुघलांच्या ताब्यात दिला नाही. पुढे एक–दीड वर्षांनी शहजादा आझमने हा किल्ला जिंकून घेतलेला दिसतो.

## ७:६ हंबीरराव धारातीर्थी (डिसेंबर १६८७) :

मुघलांनी विजापूर जिंकले तरी मराठे मुघलांना निकराने प्रतिकार करत होते. स्वराज्याच्या पूर्व व दक्षिण सरहद्दीवर हंबीररावांनी मुघलांना थोपवून धरले होते. स्वराज्यात घुसू पाहणाऱ्या मुघलांना थोपवून धरण्याच्या प्रयत्नातच डिसेंबर १६८७ मध्ये वाईजवळ मुघल सरदार सर्जाखानाशी झालेल्या युद्धात सेनापती हंबीरराव धारातीर्थी पडले.

विजापूरचा किल्ला मुघलांच्या ताब्यात देताना आदिलशाही सरदार सर्जाखान व इतरांनी आदिलशहाच्या नावे औरंगजेबाला एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी छत्रपती संभाजी राजांचा नाश करण्यासाठी आपण सर्व तऱ्हेने मदत करू असे आश्वासन दिले होते. विजापूरच्या पाडावानंतर आदिलशाही दरबारातील नामांकित व प्रमुख सरदार असलेला हा सर्जाखान मुघलांना सामील झाला. औरंगजेबाने त्यास 'रुस्तुमखान' ही पदवी दिली.

त्याबरोबरच सहा हजारी मनसब, वस्त्रे, तलवार, रत्नजडित कट्यार, घोडा, हत्ती या वस्तू त्याला देण्यात आल्या व हैद्राबाद प्रांतातील इब्राहिमगड घेण्याच्या कामगिरीवर फिरोजजंगाबरोबर त्याला पाठविण्यात आले.[१२५] सप्टेंबर १६८७ मध्ये औरंगजेबाने गोवळकोंड्याचा किल्ला जिंकून कुतूबशाहीचाही शेवट केला. दरम्यान औरंगजेबाने सर्जाखानाला स्वराज्यात मोहिमेवर पाठविले होते. सर्जाखानाने ऑक्टोबर १६८७ मध्ये वाईपर्यंत धडक मारली. वाईचा परिसर सर्जाखानाला परिचित होता. अफजलखान वधानंतर काही काळ त्याने वाईचा सुभेदार म्हणून काम पाहिले होते. सर्जाखान चालून येत आहे, ही बातमी समजताच छत्रपती संभाजी महाराजांनी सेनापती हंबीररावांना त्यांच्यावर पाठविले. हंबीरराव चालून गेले. उभय सैन्यात वाईजवळ लढाई होवून त्यात सर्जाखानाच्या फौजेची दाणादाण उडाली. मराठ्यांना बरीच लूटही मिळाली. परंतु दुर्दैवाने निकराची झुंज देताना स्वत: हंबीरराव तोफेचा गोळा लागून मृत्यूमुखी पडले.[१२६] शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत हिंदवी स्वराज्याशी एकनिष्ठ राहिलेले स्वराज्याचे सेनापती धारातीर्थी पडले. छत्रपती संभाजी महाराजांची एक खंबीर बाजू उघडी पडली. त्यामुळे मराठ्यांच्या प्रतिकाराला जबरदस्त धक्का बसला.

## ७:७ मुद्रा :

.सेनापती हंबीरराव मोहिते यांची मुद्रा वाटोळी असून त्यात श्री मच्छिव महानुभाव सेनाधीश हंबीरराव असे शब्द आहेत.[१२७]




## ७.८ समारोप :

हंबीरी म्हणजे शौर्य. शौर्य गाजविणारा तो हंबीरराव. या अर्थाने हंबीररावाचे नाव त्याच्या पराक्रमी व्यक्तिमत्त्वाला साजेसेच होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य

स्थापनेच्या कार्यात ज्या अनेक मराठी व्यक्ती आपल्या शौर्याने व स्वामीभक्तीने मराठी इतिहासात अजरामर झाल्या, त्यामध्ये हंबीरराव मोहित्यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. इ. स. १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हंबीररावांची सेनापतीपदी नियुक्ती केली. त्यावेळेपासून पुढील १४ वर्षे ते या पदावर होते. याकाळात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज या दोन्हीही छत्रपतींच्या काळात त्यांनी निष्ठेने स्वराज्याची सेवा केली.

हंबीरराव मोहिते हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्नी सोयराबाईंचे बंधू होते. या नातेसंबंधामुळे महाराजांनी हंबीररावांची सेनापतीपदी नियुक्ती केली असावी असे वाटण्याची शक्यता आहे. परंतु महाराजांचा संपूर्ण इतिहास पाहता असे दिसून येते की, आपल्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करताना महाराजांनी नेहमीच व्यक्तीची कार्यक्षमता पाहिली. अधिकाऱ्यांच्या निवडीत नातेसंबंधाचा अडथळा कधीही येवू दिला नाही. सभासदाने ''बरा शहाणा, मर्दाना, सबुरीचा, चौकस शिपाई मोठा धारकरी'' अशा शब्दात त्यांचे वर्णन केले आहे. पराक्रमाबरोबरच त्यांचा सबुरीचा (संयमी) स्वभाव पाहूनच महाराजांनी त्यांची या पदी नेमणूक केली असावी. नियुक्ती झाली त्यावेळी हंबीरराव लष्करात जुमलेदार होते असे सभासदाने म्हटले आहे. याचप्रमाणे ते मोठे धारकरी होते असेही म्हटले आहे. शिवकालीन लष्करामध्ये १२५ सैन्यावरील अधिकाऱ्यास जुमलेदार असे म्हणत. १२५ सैन्यावरील अधिकाऱ्याला मोठा धारकरी म्हणणे हा सभासदाच्या लिखाणातील विरोधाभास वाटतो. शिवाय हंबीरराव हे महाराजांचे मेहुणेच असल्याने लष्करात ते किमान हजारी किंवा पंचहजारी तरी असावेत असे वाटते. १२५ सैन्यावरील अधिकाऱ्याला महाराज एकदम सेनापती करतील हे संभवनीय वाटत नाही.

सेनापतीपदावर नियुक्ती झाल्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युपर्यंत (१६७४–१६८०) जवळजवळ ६ वर्षाच्या काळात हंबीररावांनी शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली कार्य केले. या काळापर्यंत स्वराज्याचा विस्तार वाढलेला होता आणि स्वराज्याला स्थिरताही प्राप्त झाली होती. राज्याभिषेक समारंभानंतर महाराजांनी आक्रमक

धोरण स्वीकारून मुघली व आदिलशाही प्रदेशात अनेक मोहिमा काढल्या. हंबीररावांनी मुघल प्रदेशात घुसून खानदेश, बागलाण, गुजराथ, अहमदाबाद, बुऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहूर, जालना इत्यादी ठिकाणाहून खंडण्या वसूल केल्या. मुघलांची प्रसिद्ध लासूर ही व्यापारी पेठ लूटली आणि चालून आलेल्या बहादूरखानाचा धुव्वा उडवून सर्व मालमत्ता सुरक्षितपणे स्वराज्यात आणून महाराजांच्या स्वाधीन केली.

कर्नाटक मोहीमेपूर्वी हंबीररावांनी हुसेनखान भियाणाचा केलेला पाडाव या घटनेने हंबीररावांच्या यशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. या युद्धात हंबीररावांनी केलेल्या अतुलनीय पराक्रमाचे वर्णन फारसी कागदपत्रामधूनही पहावयास मिळते. सभासदानेही 'मोठे झूंज करून फत्ते केली' अशा शब्दात हंबीररावाचे कौतुक केलेले दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील सर्वात मोठी आणि महत्त्वाकांक्षी अशी कर्नाटक मोहीत यशस्वी करण्यात हंबीररावांनी मौलिक योगदान दिले. परंतु कर्नाटक मोहीमेतील हंबीररावांचे महत्त्वाचे कार्य महाराज कर्नाटकातून परतल्यानंतरच सुरू झाले. दीर्घकाळ चाललेल्या या मोहीमेत महाराज स्वराज्यात परतल्यानंतरही कर्नाटकातील राहिलेले राजकारण महाराजांच्या आज्ञेबरहुकूम पूर्ण करून मोहिमेच्या यशाला द्विगुणीत करण्याचे काम हंबीररावांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी कर्नाटकातून माघारी फिरताना व्यंकोजी राजांवरील मोहीमेची जबाबदारी हंबीररावांवर सोपविली होती. याप्रसंगी हंबीररावांची अवस्था महाभारतातील अर्जुनासारखीच झाली असावी. परंतु कर्तव्यनिष्ठ हंबीररावांनी नातेसंबंधातील हा संघर्ष अत्यंत नजाकतीने हाताळला.

शिवाजी महाराजांच्या काळातील लष्करातील कडक शिस्तीचे फारसी इतिहासकारांनीही कौतुक केले आहे. सेनापती हंबीरराव महाराजांच्या कडक शिस्तीत वाढलेले आणि ही शिस्त अंगी बाणवलेले सेनापती होते. लष्करातील मोहिमेचे दंडक ते कसोशीने पाळीत असत. शिवछत्रपतींच्या गनिमी कावा युद्धपद्धतीचा वारसा त्यांनी पुढे चालविला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या वारसासंदर्भात त्यांनी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी राजे यांची बाजू घेतली. मराठी राज्य यादवीच्या उंबरठ्यावर

उभे असताना हंबीररावांनी योग्य निर्णय घेवून संभाजी राजांच्या बाजूने कौल दिला आणि आपण हिंदवी स्वराज्याचे सच्चे सेवक आहोत हेच सिद्ध केले. आपल्या भाच्याला राजपद मिळवून देण्याच्या लोभाला बळी न पडता त्यांनी स्वराज्याच्या कायदेशीर वारसाला मान्यता दिली आणि वैयक्तिक स्वार्थापेक्षा स्वराज्याचे हित आपल्या दृष्टीने मोठे आहे हे दाखवून दिले. मुघली आक्रमणाचे भले मोठे संकट स्वराज्यावर घिरट्या घालत असताना राजारामांना गादीवर बसवून अंतर्गत संघर्षात गुंतून राहणे किती धोक्याचे आहे याची शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेल्या हंबीररावांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच यवनांशी सामना देण्यास समर्थ असलेल्या संभाजी राजांना पाठिंबा देवून हंबीररावांनी स्वराज्याचे भवितव्य सुरक्षित केले.

अष्टप्रधान मंडळातील काही प्रधान संभाजी राजांविरुद्ध कटकारस्थाने करत असताना राज्याच्या सेनापतीने संभाजीराजांना दिलेले सहकार्य मोलाचे ठरले. त्याप्रमाणेच औरंगजेबाच्या स्वारीच्या रूपाने स्वराज्यावर आलेल्या मोठ्या संकटाचा सामना देताना हंबीरराव संभाजी राजांचे प्रमुख आधारस्तंभ ठरले. औरंगजेब दक्षिणेत आल्यावर त्याने प्रथम स्वराज्यावर चढाई केली. मराठ्यांचे राज्य प्रथम जिंकून घेवून नंतर आदिलशाही व कुतूबशाहीचा समाचार घेण्याचा त्याचा विचार होता. परंतु सतत ४–५ वर्षे संषर्घ करून सुद्धा त्याला स्वराज्य जिंकता आले नाही. याकाळात स्वराज्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यात संभाजी राजांबरोबरच सेनापती हंबीररावांचे मोठे योगदान होते. स्वराज्याच्या पूर्व व दक्षिण आघाडीवर हंबीररावांनी मुघलांना यश मिळू दिले नाही. याबरोबरच इतर आघाड्यावरसुद्धा हंबीरराव मुघल फौजेशी सामना करताना दिसतात. फेब्रुवारीच्या पूर्वार्धात कोल्हापूर परिसरात आझमशहाशी लढा देवून त्याला पिटाळून लावणाऱ्या हंबीररावांनी त्याच महिन्यात २७ फेब्रुवारीला कल्याण भिवंडी परिसरात रणमस्तखानावर हल्ला चढविलेला दिसतो. याकाळात स्वराज्याच्या अनेक आघाड्यांवर हंबीररावांची तलवार तळपताना दिसते. छत्रपती संभाजी महाराज पोर्तुगीज, सिद्दी यांच्याशी लढण्यात गुंतलेले असताना स्वराज्यावरील मुघल आक्रमणे परतवून लावण्याचे काम हंबीररावांनी केले.

मुघलांशी लढताना हंबीररावांनी शिवछत्रपतींच्या गनिमी कावा युद्धपद्धतीचा उत्कृष्ट वापर केलेला दिसतो. प्रत्येक लढाई प्रतिष्ठेची करून आपल्या सैन्याची प्राणहानी करण्यापेक्षा वेळप्रसंग पाहून यशस्वी माघार घेण्याचे तंत्र हंबीररावांनी अवलंबिलेले दिसते. गनिमी कावा व चपळ हालचाली करून त्यांनी औरंगजेबाचा मुलगा आझमशहा तसेच कुलीचखान, रणमस्तखान, रूहुल्लाखान, गाजिउद्दीनखान इत्यादी सरदारांना सळो की पळो करून सोडले. मराठ्यांचे स्वराज्य अल्पावधीत नष्ट करून टाकू अशी घमेंड मारणाऱ्या बादशहाच्या डोळ्यावरील सामर्थ्याची धुंदी त्यांनी उडवून लावली. शेवटी स्वराज्य जिंकण्याचे कार्य तूर्तास बाजूला ठेवून औरंगजेबाने विजापूर जिंकण्याची मोहिम हाती घेतली. औरंगजेब विजापूर मोहिमेत गुंतला असताना हंबीररावांनी मोगली मुलूखात स्वारी करून धामधूम उडवून दिली.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही आपला आत्मविश्वास ढळू न देता शत्रूस गर्देस मेळवण्याची  हंबीररावांची जिद्द वाखाणण्यासारखीच आहे. विजापूरच्या पाडावानंतर त्याचा प्रदेश व वतनदार मंडळींना स्वराज्यात सामील करून घेण्याचा त्यांचा चाललेला आटापीटा त्यांनी हुकेरीच्या देसायांना पाठविलेल्या पत्रातून स्पष्ट दिसून येतो. विजापूर जिंकण्यात यशस्वी झालेल्या विजयी मुघल सेनेशी सामना करून विजापूरचा प्रदेश स्वराज्यात सामील करून घेण्याची महत्त्वकांक्षा हंबीरराव बाळगीत होते.

आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत हंबीररावांनी रणांगण सोडले नाही. ज्यावेळेला हंबीररावांच्या समर्थ पराक्रमाची स्वराज्याला फार गरज होती. तेव्हाच त्याच्यावर काळाने झडप घातली. ही गोष्ट हिंदवी स्वराज्याच्या दृष्टीने दुर्दैवी ठरली.

**संदर्भ :**


१. शिवकालीन पत्रसारसंग्रह – खंड ३, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण, ऑगस्ट २००९, ले. २४६५, पृ. १४.

२. ताकवले प्रभाकर, शिवशाहीतील अष्टप्रधान, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज, जळगाव, १९९६, पृ. २५.

३. बेंद्रे वा. सी., छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७५, पृ. ३३८.

४. पवार जयसिंगराव, महाराणी ताराबाई, ताराराणी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९७५, पृ. ४.

५. तत्रैव.

६. पवार आप्पासाहेब (संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड १, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७०, पत्र क्र. ५, पृ. २२.

७. तत्रैव, पृ. २६–३४.

८. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, मंजूश्री प्रकाशन, कोल्हापूर, १९९३,पृ.४९.

९. मेहेंदळे गजानन, राजा शिवछत्रपती, खंड १, भाग २, प्रकाशक ग. भा. मेहेंदळे, पुणे, १९९६, पृ. १०८८.

१०. पठाण यू. म. (संपा.), कृष्णाजी अनंत सभासद विरचित सभासद बखर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००७, पृ. ३६.

११. पवार आप्पासाहेब (संपा.), उपरोक्त, ले. २२, पृ. ३८.

१२. पवार आप्पासाहेब (संपा.), उपरोक्त, ले. २६, पृ. ४४.

१३. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड २, प्रकाशक – चिटणीस, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे १८५९, पृ. ४ (तळटीप).

१४. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ. १९.

१५. कुलकर्णी अ. रा. व ग. ह. खरे (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड १ ला, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ४१३.

१६. बेंद्रे वा. सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र (उत्तरार्ध), प्रकाशक वा. सी. बेंद्रे, १९७२, पृ. ७४३.

१७. पठाण यू. म., (संपा.), उपरोक्त, पृ. ९५.

१८. आपटे द. वि., स. म. दिवेकर (संपा.), शिवचरित्रप्रदीप (जेधे शकावली), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२५, पृ. २७.

१९. पठाण यू. म., (संपा.), उपरोक्त, पृ. ९६.

२०. बेंद्रे वा. सी., उपरोक्त, पृ. ७४९.

२१. हेरवाडकर र. वि. (संपा.), शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र (चिटणीस बखर), व्हिनस प्रकाशन, पुणे, १९६७, पृ. २२०.

२२. देशमुख विजय, शककर्ते शिवराय (उत्तरार्ध), सन पब्लिकेशन्स, पुणे, १९८६, पृ. ८३५.

२३. हेरवाडकर र. वि. (संपा.), चिटणीस बखर, उपरोक्त, पृ. २२३.

२४. बेंद्रे वा. सी., उपरोक्त, पृ. ७५२.

२५. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण २००९, ले. १६४३, पृ. ४८८

२६. पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन्स,कोल्हापूर, २००३, पृ. १६२.

२७. बेंद्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, पार्श्व पब्लिकेशनस्, कोल्हापूर, चतुर्थ आवृत्ती, २०१३, पृ. ८८.

२८. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. १६६४, पृ. ४९८.

२९. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. १६८६, पृ. ५०५.

३०. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. १६९१, पृ. ५०६.

३१. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. १७१६, पृ. ५१२.

३२. English Records on Shivaji, Vol. II, Shiv Charitra Karyalaya, Poona, 1931, Letter No. 56, P. 26.

३३. Ibid, Letter No. 77, P. 40.

३४. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. १७७६, पृ. ५३०.

३५. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. १७१८, पृ. ५१३.

३६. हरदास बाळशास्त्री, पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी, भाग ३, यशवंत छापखाना, पुणे, १९६०, पृ. ३२५.

३७. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड ३, (तारीखे दिल्कुशा), मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०, पृ. २५०.

३८. आवळसकर शा. वि. (संपा.), ऐतिहासिक साधने, ऐतिहासिक प्रकाशन ग्रंथमाला, क्र. २ (महाराष्ट्र शासन), मुंबई, १९६३, ले. १८, पृ. १९.

३९. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड ३, उपरोक्त, पृ. २५२२.

४०. पठाण यू. म., (संपा.), उपरोक्त, पृ. ९७.

४१. आवळसकर शा. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. २१.

४२. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ८९५.

४३. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, उपरोक्त, पृ. ५०.

४४. पोतदार दत्तो वामन, ग. ना. मुजूमदार (संपा.), ऐतिहासिक संकिर्ण साहित्य, खंड ३, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४१, ले. १२४, पृ. २०१.

४५. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली – करीना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ. ८३.

४६. ताकवले प्रभाकर, उपरोक्त, पृ. १४०.

४७. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली–करीना, उपरोक्त, पृ. ८३.

४८. तत्रैव.

४९. शेजवलकर त्र्यं. श., श्री शिवछत्रपती – संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९६४, पृ. १७३.

५०. पठाण यू. म. (संपा.), उपरोक्त, पृ. १०३.

५१. तत्रैव.

५२. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, उपरोक्त, पृ. ५१.

५३. जोशी द. म., उषा जोशी (संपा.), समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड २ (शिवचरित्र), मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०, पृ. ५२८.

५४. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली – करीना, उपरोक्त, पृ. ८७.

५५. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. १९६४, पृ. ५८६.

५६. पठाण यू. म. (संपा.), उपरोक्त, पृ. ९२०.

५७. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २, उपरोक्त, ले. १९९५, पृ. ५९७.

५८. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ९२०.

५९. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. १९९५, पृ. ५९७.

६०. कुलकर्णी अ. रा., म. रा. कुलकर्णी व मा. रा. कंटक, (संपा.), मराठ्यांचा इतिहास : साधन परिचय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८, पृ. ९४.

६१. पठाण यू. म. (संपा.), उपरोक्त, पृ. १०६.

६२. कुलकर्णी अ. रा., म. रा. कुलकर्णी व मा. रा. कंटक (संपा.), उपरोक्त, पृ. ९४.

६३. पठाण यू. म., (संपा.), उपरोक्त, पृ. १०६.

६४. पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, उपरोक्त, पृ. १८१,

व

शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. २०४०, पृ. ६११.

६५. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. २०६५, पृ. ६१८.

६६. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली – करीना, उपरोक्त, पृ. ९३.

६७. पठाण यू. म. (संपा.), उपरोक्त, पृ. १०७.

६८. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले. २२३६, पृ. ६८२.

६९. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, उपरोक्त, पृ. ५३.

७०. शेजवलकर त्र्यं. श., उपरोक्त, पृ. ४२३.

७१. देशमुख विजय, उपरोक्त, पृ. ९६७.

७२. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली, उपरोक्त, पृ. ९९.

७३. बेंद्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज, उपरोक्त, पृ. १८१.

७४. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले.२२४३, पृ. ६८८.

७५. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २, उपरोक्त, ले.२२५१, पृ. ६८८.

७६. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, उपरोक्त, पृ. ५४.

७७. तत्रैव.

७८. बेंद्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज, उपरोक्त, पृ. १८७.

७९. कुलकर्णी अ. रा., जेधे शकावली – करीना, उपरोक्त, पृ. २६२.

८०. तत्रैव.

८१. बेंद्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज, उपरोक्त, पृ. २६२.

८२. तत्रैव, पृ. २६९.

८३. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड २, (मोगल व मराठे – मुन्त–खबुल–लुबाब), उपरोक्त, पृ. १०१.

८४. तत्रैव, पृ. १०३.

८५. खरे ग. ह., ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, ले. १८०, पृ. १०३.

८६. बेंद्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज, उपरोक्त, पृ. २६९.

८७. गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, ज्ञान विज्ञान विकास मंडळ, पुणे, १९७६, पृ. २४४.

८८. पवार जयसिंगराव (संपा.), छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, मंजूश्री प्रकाशन, कोल्हापूर, १९९०, पृ. ३५६.

८९. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र पगडी सेतूमाधवराव, खंड ३ (मुन्त–खबुल–लुबाब), उपरोक्त, पृ. १०३.

९०. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र पगडी सेतूमाधवराव, खंड ३ (मासिरे आलमगिरी), उपरोक्त, पृ. ३८७.

९१. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतूमाधवराव पगडी, खंड ३ (मासिरे–आलमगिरी), उपरोक्त, पृ. ३८८.

९२. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतूमाधवराव पगडी, खंड २ (हिंदवी स्वराज्य आणि मोगल), उपरोक्त, पृ. १०५७.

९३. बेंद्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज, उपरोक्त, पृ. २७८.

९४. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ३२३, पृ. १९०.

९५. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ३५४, पृ. २०७.

९६. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ३५८, पृ. २०९.

९७. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ३६२, पृ. २१२.

९८. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ३६८, पृ. २१८.

९९. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ३९२, पृ. २३९.

१००. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, उपरोक्त, पृ. ५६.

१०१. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ३९७, पृ. २४३.

१०२. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली – करीना, उपरोक्त, पृ. १११.

१०३. तत्रैव.

१०४. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ४३५, पृ. २७१.

१०५. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ४४८, पृ. २७९.

१०६. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ४६१, पृ. २९१.

१०७. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ४५३, पृ. २८४.

१०८. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली, करीना, उपरोक्त, पृ. ११३.

१०९. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ४६२, पृ. २९२.

११०. बेंद्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज, उपरोक्त, पृ. २८२.

१११. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ४६६, पृ. २९८.

११२. तत्रैव.

११३. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतूमाधवराव पगडी, खंड ३ (मासिरे आलमगिरी) उपरोक्त, पृ. ३९१.

११४. तत्रैव, पृ. ३९२.

११५. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ५५४, पृ. ३६०.

११६. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, उपरोक्त, ले. ५५६, पृ. ३६२.

११७. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, उपरोक्त, पृ. ५८.

११८. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली करीना, उपरोक्त, पृ. ११९

११९. पवार जयसिंगराव (संपा.), छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ. २५४.

१२०. गोखले कमल, उपरोक्त, पृ. ४०९.

१२१. पवार जयसिंगराव, छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ. ३५८.

१२२. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, उपरोक्त, पृ. ५९.

१२३. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतूमाधवराव पगडी, खंड २, (फुतुहाते आलमगिरी), उपरोक्त, पृ. २१.

१२४. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड १२, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९६४, ले, ७.

१२५. जोशी द. प., उषा जोशी (संपा.), समग्र सेतूमाधवराव पगडी, खंड ३,(मराठे व औरंगजेब), उपरोक्त, पृ.३९६.

१२६. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, उपरोक्त, पृ. ६१.

१२७. भावे वासुदेव कृष्ण, शिवराज्य व शिवकाल, प्रकाशक नारायण वासुदेव भावे, पुणे, १९५७, पृ. ६९.

---

## प्रकरण आठवे

# मूल्यमापन

छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्य स्थापना व पुढील काळात विस्तार पावलेले मराठ्यांचे राज्य ही घटना महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना आहे. कारण या घटनेने या देशातील राजकिय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक समीकरणे बदलली गेली. संपूर्ण हिंदुस्थान इस्लामी सत्तेच्या वर्चस्वाखाली गेलेला होता. उत्तरेत मुघल सत्ता तर दक्षिणेत आदिलशाही, निजामशाही व कुतूबशाही इत्यादी सत्तांचा अंमल सुरू होता. सर्व हिंदु – सरदार – जहागिरदार या इस्लामी सत्तांच्या सेवेत सामील झाले होते. या देशात कुणालाही हिंदवी स्वराज्याची कल्पना सुचली नाही किंवा ते स्वराज्य उभे करण्याची ऐपत कुणाकडेच नव्हती. परंतु ते आव्हान छत्रपती शिवाजी महाराजांनी लहान वयातच स्विकारले. लहानपणापासूनच आपले स्वतंत्र राज्य असावे असे महाराजांना वाटत होते.

मुस्लीम राज्यकर्त्यांकडून येथील प्रजेवर होणारे अन्याय, अत्याचार स्वत: जिजाबाईंनी पाहिले होते. किंबहुना ते अनुभवलेही होते. स्त्रियांच्यावर अत्याचार होत होते. प्रजेची आर्थिक पिळवणुक होत होती व अनेकांना बाटवले जात होते. परंतु त्याविरुद्ध कुणीही आवाज उठवू शकत नव्हते. एतद्देशीय सरदार, जहागिरदार, देशमुख, वतनदार ही मंडळी आपल्या जहागिऱ्या – वतने सांभाळण्यात मशगूल झाली होती. प्रजेला कोणी वाली राहीला नव्हता. अशा प्रतिकूल परिस्थितीत काय करावे? याचे उत्तर कोणालाच सापडत नव्हते. त्याचे उत्तर फक्त जिजाबाईंना व छत्रपती शिवाजी राजांना माहीत होते. ते म्हणजे 'स्वराज्य' हे होय. त्यादृष्टीने जिजाबाईंनी लहानपणापासुनच शिवाजी महाराजांच्यावर संस्कार केले होते. त्यामुळे मुळातच चतुर, धाडसी व पराक्रमी वृत्तीच्या शिवाजी महाराजांनी आपल्या मातेचे स्वराज्याचे स्वप्न पूर्णत्वास नेले व या स्वराज्याचे ते छत्रपती झाले.

शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे हे त्या काळातील एक नामवंत सरदार होते. त्यांनी निजामशाही व आदिलशाहीत सेवा करून पुणे प्रांतात व कर्नाटकात जहागिरी मिळवली होती. शहाजीचे पुत्र या नात्याने शिवाजीराजे त्यांचे वारसदार होते. त्यामुळे एक जहागिरदार किंवा पुढील आयुष्यात सरदार म्हणून कोणाच्या तरी सेवेत राहणे अशी भूमिका छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतली असती तर त्यांना कुणाचाही विरोध झाला नसता. परंतु छत्रपती शिवाजींनी ज्यावेळी जहागिरदार किंवा सरदार ही भूमिका सोडून स्वराज्य स्थापनेच्या कार्यास सुरूवात केली त्यावेळी त्यांना मुघल, आदिलशहा इत्यादी राज्यकर्त्यांबरोबरच स्वकिय जहागिरदार– वतनदारांचाही काही प्रमाणात विरोध झाला व हा स्वकियांचा विरोध ८–१० वर्षे सुरूच होता. बांदल, खोपडे, मोरे इत्यादींना शिवाजी भोसले हे आपल्याप्रमाणे जहागिरदार आहेत असेच वाटत होते. त्यांना वाटल्यास त्यांनी जहागिरीत वाढ करावी. परंतु 'स्वत:चे वेगळे राज्य व त्याचे छत्रपती शिवाजी महाराज प्रमुख' ही संकल्पनाच तत्कालिन जहागिरदार व मुघल, आदिलशाहासारख्या सत्ताधिशांना मान्य होत नव्हती. त्यामुळे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला प्रथमपासूनच विरोध केला. महाराजांचे राज्य व राज्य विस्तार त्यांच्याच प्रदेशात होणार होता. त्यामुळे या राज्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा मोड करण्यासाठी जोराचे प्रयत्न केले. एका जहागिरदाराचा मुलगा आपला राजा कसा होवू शकेल? शिवाय १५–१६ वर्षाची उमर असलेले शिवाजी आपल्यापेक्षा किती तरी लहान आहेत. तरी वयाने – अधिकाराने ज्येष्ठ असलेल्या आम्ही त्यास राजा का मानावे? अशी संभ्रमावस्था मावळ खोऱ्यातील अनेक देशमुखांची झाली होती. ते छत्रपती शिवाजींना राजा मानावयास तयार नव्हते. म्हणूनच जावळीच्या मोरेसारखे जहागिरदार छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या अधिपत्याखाली यावे असे सुचवतातच ''तुम्ही काल राजे जहाला. तुम्हांस राज्य कोणी दिधले? आपल्या घरी आपणास फुकटचे राजे म्हणून घेतले तर ते कोण मानील?'' अशा प्रकारे प्रतिउत्तर देवून त्यांनी छत्रपती शिवाजींच्या राजेपणालाच विरोध केला होता. परंतु कारीच्या कान्होजी जेधेसारखे देशमुख महाराजांच्या पक्षाला मिळाल्यानंतर त्याचा परिणाम मावळ खोऱ्यातील सर्व देशमुख व वतनदारावर झाला. त्यांची संभ्रमावस्था कमी झाली. शिवाय छत्रपती शिवाजी महाराजांनी या वतनदारांना आपल्या झेंड्याखाली यावे

म्हणून त्यांचे मन वळविण्याची कामगिरी जेधेंच्यावर टाकली होती. ती कान्होजींनी व्यवस्थित पार पाडली. त्यामुळे अनेक देशमुख वतनदार मंडळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पक्षास मिळाली व महाराजांचा पक्ष दिवसेंदिवस बळकट होत गेला. कान्होजींप्रमाणेच त्यांच्या मुलांनीही छत्रपतींना साथ दिली. विशेषत: बाजी जेधे हे छत्रपती शिवाजी महाराजांचे समवयस्कच होते. बाजीने फत्तेखानाविरुद्धची मोहिम, शाहिस्तेखानावरील छापा, खवासखानाबरोबर झालेल्या युद्धात पराक्रम गाजविला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी व छत्रपती राजाराम महाराजांनाही त्यांनी साथ दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळ खोऱ्यातील मावळ्यांच्या मनामध्ये स्वराज्याबद्दल जागृती करून या युवा सवंगड्यांना आपल्या कार्यात सहभागी करून घेतले. त्याचप्रमाणे शहाजी महाराजांच्या पुणे जहागिरीत पूर्वीपासून सेवेत असलेल्या जेधे, बांदल, सिलीमकर इत्यादी घराण्यातील पराक्रमी व्यक्तींनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य उभारणीच्या कार्यात सहकार्य केले. कान्होजी जेधे, बाजी जेधे, सुर्यराव काकडे, बाजी पासलकर, दादाजी नरस प्रभू, बाजीप्रभु देशपांडे, बापूजी मुदगल व त्यांची मुले, हैबतराव सिलीमकर, कावजी मल्हार, कावजी कोंढाळकर, संभाजी कावजी, येसाजी कंक, जीवा महाले, तानाजी मालुसरे, इत्यादी सहकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य उभारण्याच्या कामी प्रारंभी व नंतरच्याही काळात मोलाचे सहकार्य केले.

मुसे खोऱ्याचे देशमुख बाजी पासलकर (कान्होजी जेधेचे सासरे) हे तर छत्रपती शिवाजींपेक्षा ४० वर्षांनी मोठे होते. परंतु त्यांना छत्रपती शिवाजी महाराजाची स्वराज्य स्थापना ही संकल्पना आवडून त्यांनी एखाद्या नवयुवकांप्रमाणे शिवाजीराजांना साथ दिली व मावळ खोऱ्यातील अनेक वतनदारांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाजूस वळविले. फत्तेखानाविरुद्ध जी बेलसरची लढाई १६४८ मध्ये झाली, त्या मोहिमेत बाजी पासलकर त्वेषाने लढले व त्या लढाईत ठार झाले.

नरसप्रभु गुप्ते व त्यांचे दत्तक पुत्र दादोजी हे रोहिड खोऱ्याचे कारभारी होते. नरसप्रभु शहाजी महाराजांचे निष्ठावान सेवक होते. या बापलेकांनी प्रारंभापासून छत्रपती

शिवाजी महाराजांना प्रशासन पाहण्यास मदत केली. त्याचप्रमाणे दादाजी लोहकरे यांनी शहाजीराजे व छत्रपती शिवाजी महाराजांना भक्कमपणे साथ दिली.

हिरडस मावळचे देशमुख बाजी बांदल व त्यांची आई दिपाई तसेच कारभारी बाजीप्रभु देशपांडे यांनी स्वराज्य उभारणीत मोलाची साथ दिलेली आहे. पन्हाळगडाला सिद्दी जोहरने वेढा दिला त्यावेळी सुटकेसाठी छत्रपती शिवाजी महाराज रात्री पन्हाळगडाहून विशाळगडाकडे निघाले. त्यावेळी शत्रुपक्षाने पाठलाग केल्यावर महाराज वेळेत विशाळगडावर पोहचणे शक्य नव्हते. अशा वेळी बाजीप्रभू देशपांडे याने गजापूरच्या खिंडीत शत्रुला अडवून धरले. यावेळी लढता लढता बाजीप्रभु ठार झाले.

बापूजी मुदगल व त्यांची चिमणाजी, बाबाजी व नारो ही तीन मुले प्रारंभीपासूनच स्वराज्य कार्यात सहभागी झाली होती. यापैकी नारो बापूजीने अफजलखान वधाच्या वेळी एका पायदळाच्या तुकडीचे नेतृत्व करून आदिलशाही फौजेचा पाठलाग केला होता. ते नारो सुरतेची लूट करून माघारी येताना शत्रुपक्षाशी लढताना ठार झाले. शाहिस्तेखानावरील छाप्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर चिमणाजी व बाबाजी मुदगल होते. हे दोघेही बंधु चांगले तलवारपट्टू व शूर होते.

येसाजी कंक, कावजी कोंढाळकर, तानाजी मालुसरे, संभाजी कावजी, जीवा महाले इत्यादी शूर वीर शिवकाळातच आपल्या पराक्रमाने पुढे आले व त्यांनी महाराजांच्या 'स्वराज्य' निर्मितीच्या कार्यास अखेरपर्यंत सहकार्य केले. दादोजी कोंडदेव, बाळकृष्णपंत हणमंते इत्यादींनी प्रशासन क्षेत्रात सहकार्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांना सहकार्य करणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेलेली दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या ठायी चातुर्य, शौर्य व धाडस या गुणांबरोबरच संघटन चातुर्य असल्याचे दिसून येते. त्यांनी स्वराज्याची संकल्पना व तिचे महत्त्व पटवून दिले व आपल्या जीवाला जीव देणारी माणसे निर्माण केली. त्यासाठी सर्व जाती जमातीच्या लोकांचा उपयोग करून घेतला. त्यामुळेच स्वराज्य उभे राहिले.

स्वराज्याची वाढ होत गेल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना काही पदाधिकारी नेमणे गरजेचे वाटू लागले. त्याप्रमाणे त्यांनी पेशवे, सेनापती, सचिव, सबनीस इत्यादी पदे आवश्यकतेनुसार नेमली आहेत. आपणास या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील सेनापतींच्या कार्याचे मुल्यमापन करावयाचे आहे. महाराजांच्या कालखंडातील पहिजे सरनौबत म्हणून तुकोजी चोर यांचा उल्लेख सभासद व चित्रगुप्ताची बखरीत आलेला आहे. परंतु अन्य कोणत्याही कागदपत्रात तुकोजी चोर यांच्या नांवाचा अगर ते एखाद्या मोहिमेवर गेले त्याची माहिती आढळत नाही. त्यामुळे मराठ्यांचे पहिले सरनौबत म्हणून माणकोजी दहातोंडे यांचे नांव घ्यावे लागेल. प्रारंभीच्या काळात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना मोलाची साथ दिलेली आहे. १०–१२ वर्षे त्यांनी महाराजांच्या लष्करात इमाने इतबारे सेवा केलेली दिसते. विसापूरची लढाई, जावळीचे मोरे प्रकरण इत्यादी अनेक लढायामध्ये त्यांनी पराक्रम गाजवलेला दिसतो. वयोवृद्ध झाल्याने त्यांना जुलै १६५८ मध्ये सरनौबत पदावरून निवृत्त करण्यात आले व त्यांच्या जागी पुरंदर किल्ल्याचे किल्लेदार नेताजी पालकर यांची सरनौबत म्हणून नेमणूक करण्यात आली.

सरनौबत पदाला खऱ्या अर्थाने महत्त्व प्राप्त झाले ते नेताजी पालकर यांच्या काळातच होय. स्वराज्य स्थापनेच्या सुरूवातीच्या काळापासून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना सहकार्य केल्याचे दिसते. पराक्रम, शौर्य व गनिमी कावा युद्ध पद्धतीतील कौशल्य याच्या जोरावरच ते सरनौबत पदापर्यंत पोहचले. छत्रपती शिवाजी महाराजांव्यतिरिक्त गनिमी कावा युद्ध पद्धतीत त्यांच्या इतका कुशल सेनानी त्या काळात कोणीही नव्हता. त्यामुळे काही वेळा त्यांचा 'प्रति शिवाजी' म्हणूनही उल्लेख केला जातो. तत्कालीन सर्वच कागदपत्रांमध्ये त्यांच्या पराक्रमाच्या नोंदी आहेत.

नेताजींचे जीवन म्हणजे पराक्रम व करूणा यांचे मिश्रण आहे. आपल्या आयुष्याच्या पूर्वार्धात यांनी स्वराज्य उभारणीत साथ दिली. इ.स. १६६६ पर्यंतचा हा कालखंड होता. या काळात अनेक अद्वितीय पराक्रम नेताजींनी केलेले आहेत. अफजलखान स्वराज्यात ठाण मांडून बसला होता. त्यावेळी त्याचे लक्ष विचलीत करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या

परवानगीने नेताजीने आदिलशाही प्रदेशात धामधूम उडविली होती. अफजलखानाच्या वधानंतर उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी त्यांनी महाराजांबरोबर आपली फौज घेवून वाई, कोरेगांव, मायणी ते कराड, सुपे कामेरी ते कोल्हापूर पर्यंतचा विस्तृत प्रदेश स्वराज्यात आणला होता व पन्हाळा किल्लाही जिंकून घेतला. केवळ ५८ दिवसात छत्रपती शिवाजी महाराज व नेताजी पालकर यांनी सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्याचा बहुतांश भाग स्वराज्यात समाविष्ट केला. स्वराज्याचा विस्तार दुपटीने वाढला.

शाहिस्तेखान स्वराज्यात आल्यानंतर त्याने जी स्वराज्याची नुकसानी चालविली होती. ती रोखण्याठी महाराजांच्या आज्ञेवरून नेताजी पालकरने मुघल प्रदेशात धुमाकूळ घातला होता. त्यात एक–दोन वेळा नेताजीचा पराभवही झाला. परंतु एवढ्या मोठ्या मुघल सत्तेला रोखून धरण्याचे अवघड काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. त्यास नेताजींचे मोलाचे सहाय्य झाले. सुरतेवरील हल्ल्यातही महाराजांबरोबर सरनौबत नेताजी, नारो बापूजी, चिमणाजी बापूजी, परसोजी महाडिक इत्यादी नामवंत वीर मंडळी होती. शाहिस्तेखानावरील छापा, सुरत लुट यानंतर औरंगजेबाने दक्षिणेवर मिर्झा राजा जयसिंगाला पाठवले. मिर्झा राजा जयसिंगाच्या स्वारीनंतर (१६६५) मात्र छत्रपती शिवाजी महाराजांची हळूहळू कोंडी होत गेली. जयसिंगाने महाराजांची चोहोबाजूंनी नाकेबंदी केल्यामुळेच छत्रपतींना मानहानीकारक पुरंदरचा तह (१४ जून १६६५) स्विकारावा लागला. त्यामुळे दोन तृतीयांश स्वराज्य आपोआपच मुघलांच्या पदरात पडले. या ठिकाणी सरनौबत नेताजी किंवा इतर मराठी वीर काहीही करू शकले नाहीत. या तहाचे दूरगामी परिणाम मराठी सत्तेवर घडून आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज मुघलांचे अंकीत बनले. ते व नेताजी पालकर मुघलांना सहाय्य करण्यासाठी आदिलशाहीवर चालून गेले. परंतु जयसिंगाला आदिलशाहीविरुद्ध फारसे यश आले नाही. उलट मुघल छावणीत महाराजांना दिलेरखानापासून धोका होता. म्हणून ते आदिलशाहीच्या ताब्यातील पन्हाळा घेतो म्हणून मुघल छावणीतून बाहेर पडले व जयसिंगानेही त्यास अनुमती दिली. याच वेळी नेताजी पालकर व महाराज यांच्यात दुरावा निर्माण होवून नेताजी पालकर जानेवारी १६६६ मध्ये आदिलशाहीला जावून मिळाले. नेताजी

पालकर छत्रपती शिवाजी महाराजांचा पक्ष सोडून आदिलशाहीकडे जाणे ही घटना धक्कादायक होती. नेताजी पालकर महाराजांना सोडून का गेले? याची वेगवेगळी कारणे सांगीतली जातात. तरी या ठिकाणी असे नमूद करावे वाटते की, नेताजी पालकरला काही मोहिमात आलेले अपयश व छत्रपती शिवाजी महाराजांनी चालविलेल्या मोहिमेत ते वेळेवर मदत करू शकले नाहीत. म्हणून महाराजांनी त्यांना दोष दिला. याचे नेताजींना वाईट वाटले. आपण इतके पराक्रम केले. स्वराज्यात आपले स्थान इतरांहून श्रेष्ठ असताना व आपण सरदार म्हणून कोठेही काम करून नावारूपाला येवू शकतो अशी कळत नकळत अहंकाराची भावना नेताजींची झाली होती. त्यातच मिर्झा राजा जयसिंगाने घडवून आणलेल्या पुरंदर तहाने (१६६५) छत्रपती शिवाजी महाराजांची खूपच पिछेहाट झाली होती. या तहाने ते पुर्णपणे बांधले जावून मुघलांचे अंकित झाले होते. (छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या बचावासाठी ही तात्पुरती तडजोड केली होती. तरी जगाच्या दृष्टीने ती स्वराज्याची पिछेहाट होती.) त्यामुळे आपल्यात व छत्रपतीत आता काय फरक आहे. अशी भावना नेताजीची झाली असावी. थोडक्यात म्हणजे स्वराज्य निर्मितीच्या प्रारंभीपासून छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल नेताजींच्या मनात असलेल्या अढळ श्रद्धेला तडे गेले. त्यातच महाराजांनी कामाच्या दिरंगाई–बद्दल दोष दिल्याचे निमित्त झाले व आपण आता दुसऱ्या सत्तेकडे जावून सरदार म्हणून नांव काढावे असे वाटून ते छत्रपती शिवाजी महाराजांचा पक्ष सोडून आदिलशाहीकडे गेले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पक्ष सोडून जाणे ही नेताजी पालकरांची फार मोठी चूक होती. हे पुढे काळाने सिद्ध केले आहे. छत्रपती हे स्वराज्याचे प्रमुख होते. त्यामुळे एखाद्या चुकीबद्दल हाताखालील सरदाराला किंवा सेवकाला जाब विचारणे यात काही गैर नाही. परंतु तेवढ्यावरून वर्षानुवर्षे एकत्र काम केलेले असून व स्वत: स्वराज्याचा एक भाग बनलेला असताना या सर्व श्रद्धा ठोकरून शत्रुपक्षाकडे जाणे ही नेताजींची फार मोठी चूक होती व त्याचे प्रायश्चित्त त्यांना भोगावे लागले. नेताजींच्या जीवनाचा दुसरा टप्पा स्वराज्याच्या त्यागापासून सुरू होतो. नेताजी पालकर आदिलशाहीकडे जाणे मिर्झा राजा जयसिंगाला धोकादायक वाटले. नेताजींप्रमाणे जर छत्रपती शिवाजी महाराज आदिलशहाला मिळाले तर

दक्षिणेतील सत्तांचा मुघलांविरुद्ध गट तयार होईल व तो मुघलांना धोकादायक होईल म्हणून जयसिंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचे बादशहाच्या भेटीला जाण्यासाठी मन वळविले. तर नेताजीला आपल्या पक्षात येण्यासाठी पंचहजारी मनसबदारी व एलिचपूर (विदर्भ) जवळ जहागिरी दिली. त्यामुळे नेताजी मुघलशाहीकडे २० मार्च १६६६ मध्ये गेले. त्याअगोदरच ५ मार्च १६६६ ला महाराज औरंगजेब बादशहाच्या भेटीला निघाले होते.

पुढील काळात छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा भेट, त्यांना कैद व त्यांची आग्राहून सुटका या घटना घडून आल्या. महाराज आग्राहून निसटल्यानंतर संतापलेल्या औरंगजेबाने नेताजीस कैद करून खूपच हाल केले. त्यांचे सक्तीने धर्मांतर करून महंमद कुलीखान असे नांव ठेवण्यात येवून त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. त्या अवस्थेत त्यांना निरनिराळ्या मोहिमांवरही पाठवण्यात आले. परंतु अन्य दुसरा सरदार त्यांच्यावर पाळत ठेवून असे. नेताजींच्या वाट्याला आलेले हे जीवन एखाद्या कैद्यापेक्षाही वाईट होते. नेताजीला आपणाकडून झालेल्या चुकीचा खूपच पश्चाताप झाला. त्यांना पुन्हा महाराजांना भेटण्याची ओढ लागली. त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. परंतु त्यात त्यांना यश येत नव्हते. शेवटी ९ वर्षांनी म्हणजे सन १६७६ ला बादशहाने पुन्हा दिलेरखानाची दक्षिणेच्या मोहिमेवर नेमणूक केली. त्यावेळी दक्षिणेची माहिती असलेला व आता मुसलमान म्हणून रूळलेला महंमद कुलीखान (नेताजी पालकर) यास त्याच्याबरोबर पाठविण्यात आले. ही मुघल फौज महाराष्ट्राच्या भूमित येताच नेताजी पालकर या फौजेतून निसटले व ८ जून १६७६ मध्ये रायगडावर येवून दाखल झाले. त्यावेळी महाराज गडावरच होते. पश्चातापद्ग्ध झालेल्या नेताजींच्या डोळ्यातून महाराजांची भेट होताच आनंदाश्रू वाहू लागले. तर नेताजी पुन्हा माघारी आल्याचे पाहून छत्रपती शिवाजी महाराजांनाही फार आनंद झाला. त्यांनी नेताजीला शास्त्रविधी करून १९ जून १६७६ रोजी पुन्हा हिंदु धर्मात घेतले व महंमद कुलीखानाचे पुन्हा 'राजश्री नेताजी पालकर' बनले.

नेताजींचे मुघलशाहीकडे जाणे हा त्यांच्या जीवनातील नियतीने घडवलेला फार मोठा अपघात होता. पुरोगामी विचाराच्या छत्रपती शिवाजी महाराजांनी नेताजींचे सर्व अपराध माफ

करून त्याला आपल्या स्वराज्याच्या सेवेत घेतले. त्याच्या इच्छेनुसार पुन्हा हिंदु धर्मात घेतले. साडेतिनशे वर्षापूर्वी असे पाऊल उचलणारे छत्रपती शिवाजी महाराज हे किती पुरोगामी विचाराचे व परिवर्तनवादी होते, हे दिसून येते. त्या काळात त्यांचे हे कृत्य आधुनिक समाजसुधारकाला लाजवेल असेच आहे. पुढील काळात नेताजींनी आयुष्याच्या अखेरपर्यंत म्हणजे १६९० पर्यंत स्वराज्यातच सेवा केली. सरनौबत नेताजी पालकर यांचे मराठ्यांच्या इतिहासातील स्थान अतिशय महत्त्वाचे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे तिसरे सरनौबत म्हणजे कुडतोजी गुजर उर्फ प्रतापराव गुजर होय. नेताजी पालकर हे इ. स. १६६६ मध्ये आदिलशाहीकडे निघून गेल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी राजगड किल्ल्याचे किल्लेदार कुडतोजी यांची सरनौबतपदी नियुक्ती केली. त्यांनी आजपर्यंत केलेल्या पराक्रमामुळे महाराजांनी त्यांना 'प्रतापराव' ही पदवी दिली. व त्याच नांवाने ते पुढे ओळखले जावू लागले.

प्रतापराज गुजर हे एका सामान्य कुटुंबात जन्माला येवून स्वकर्तबगारीने पुढे आले होते. ते मुघलशाही किंवा आदिलशाहीच्या सेवेत न जाता नुकत्याच उदयास आलेल्या स्वराज्यात म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेवेत रूजू झाले. त्यांनी प्रारंभीच्या काळात सिद्दी जोहारने पन्हाळ्याला वेढा दिला त्यावेळी शत्रुपक्षाला हैराण केले. तसेच एके काळचा पराक्रमी वीर संभाजी कावजी शाहिस्तेखानाला फितूर झाल्यानंतर छत्रपतींच्या आज्ञेवरून प्रतापरावांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यास ठार केले. असे अनेक पराक्रम केल्यामुळे त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी सरनौबत केले. सन १६६६ ते १६७४ पर्यंत एकूण आठ वर्षे प्रतापराव सरनौबतपदी होते. या काळातही त्यांनी अनेक पराक्रम करून स्वराज्य विस्ताराला हातभार लावला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अत्यंत अडचणीच्या काळात प्रतापराव गुजर हे सेनापती झाले होते. मिर्झा राजा जयसिंगाशी झालेला 'पुरंदरचा तह' व त्यामुळे महाराजांची झालेली पिछेहाट, सेनापती नेताजी पालकरशी झालेले मतभेद व त्यामुळे नेताजी स्वराज्य सोडून गेले होते. त्यातच जयसिंगाने महाराजांवर दबाव आणून औरंगजेबाच्या भेटीचे घडवून

आणलेले राजकारण व त्यातच आदिलशाही सरदारांचा उपद्रव या सर्व संकटामुळे छत्रपतींची चोहोंकडून कोंडी झाली होती. या पार्श्वभूमीवर प्रतापराव हे सेनापती झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज औरंगजेबाच्या भेटीसाठी आग्र्याला गेल्यानंतर त्यांच्या अनुपस्थितीत मातोश्री जिजाबाईंच्या मार्गदर्शनाखाली प्रतापरावांनी स्वराज्याची चांगल्या प्रकारे व्यवस्था ठेवली.

छत्रपती शिवाजी महाराजांना आग्रा भेटीत औरंगजेबाने कैद केल्यानंतर स्वराज्यात अतिशय काळजीचे वातावरण निर्माण होवून जिजाबाईंसह सर्वांच्या मनात अस्वस्थता निर्माण झाली होती. ५ मार्च १६६६ रोजी आग्रा भेटीसाठी महाराजांनी राजगड सोडला. त्यावेळेपासून राजगडावर माघारी येइपर्यंतचा जो सहा महिन्याचा कालखंड गेला तो अतिशय संवेदनक्षम असाच होता. अशा परिस्थितीत प्रतापराव गुजर व प्रशासनातील अन्य सहकाऱ्यांनी स्वराज्याचे जे रक्षण केले त्यास इतिहासात तोडच नाही.

आग्र्याहून सुटका झाल्यानंतर काही काळ स्वराज्याची घडी बसविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघल सत्तेशी तडजोडीची भूमिका स्विकारली. त्यावेळी शंभूराजांना मुघलांची पंचहजारी मनसबदारी देण्यात आली होती. त्यावेळी शंभूराजे १० वर्षाचे होते. त्यामुळे त्यांचे प्रतिनिधी म्हणून प्रतापराव व वकिल म्हणून निराजीपंत १ वर्ष ५ महिने औरंगाबादला राहिले. त्यावेळी शहाजादा मुअज्जम हा औरंगजेबाचा मुलगा दक्षिणेचा सुभेदार होता. या काळात त्यांनी मुअज्जमशी मैत्रीचे संबंध निर्माण केले. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना शांतता मिळून स्वराज्याची घडी बसवता आली. औरंगजेबाचे व छत्रपती शिवाजी महाराजांचे संबंध काही काळानंतर बिघडत गेले व १६६९ च्या उत्तरार्धात मुघल–मराठे तह संपुष्टात येवून पुन्हा मुघल–मराठे संघर्ष सुरू झाला. तेव्हा महाराजांनी पुरंदर तहाद्वारे मुघलांच्या ताब्यात गेलेले स्वराज्य व किल्ले परत घेण्यास सुरूवात केली. यावेळी मोरोपंत पेशवे, निळोपंत मुजूमदार, आबाजीपंत सुरनिस इत्यादी मंडळींबरोबर लष्कराचा प्रमुख या नात्याने प्रतापरावांनी फार मोठी जबाबदारी पार पाडली. या काळात फौजेने वेगाने अल्पकाळातच गेलेले किल्ले परत मिळविले. छत्रपती शिवाजी महाराजांचा एक किल्ला

घेण्यास मुघलांना २–४ महिने लागत असत. तर छत्रपतींच्या फौजेने ४–६ महिन्यात गेलेले सर्व किल्ले परत घेण्यात यश मिळविले. या पराक्रमात प्रतापरावांचा सिंहाचा वाटा होता. पुढील काळात मुघलांशी झालेल्या संघर्षात प्रतापरावांनी अनेक पराक्रम गाजविले आहेत. दुसरी सुरत लूट (१६७०), कांचनबारीची लढाई (वणी–दिंडोरीचे युद्ध), खानदेश व वऱ्हाडातील मुघल प्रदेशाची लूट, कारंजा शहराची लूट, मुघल प्रदेशात चौथाईची अंमल बजावणी, खंडणी वसूली इत्यादी सर्वच कामात प्रतापरावांनी उल्लेखनीय काम केलेले दिसते. सन १६७२ मध्ये मुघल–मराठे यांच्यात साल्हेरचे जोरदार युद्ध घडून आले. या युद्धात मोंगलांचा पुर्ण पराभव होवून इखलासखान व बेलोलखान यांचा पाडाव झाला. मुघलांचे तीस मोठे अंमलदार कैद झाले.

साल्हेरच्या युद्धात मराठ्यांचा प्रचंड विजय झाला व या विजयाला एक वेगळे महत्त्व होते. कारण मोगल व मराठे यांच्यात उघड्या मैदानावर व समोरासमोर एवढी प्रचंड लढाई यापूर्वी कधीच झाली नव्हती. आणि दुसरे वैशिष्ट्य म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत प्रतापराव गुजर व पेशवे मोरोपंत यांनी हा विजय मिळवला होता. लगेच मुल्हेरचा किल्लाही प्रतापरावांनी जिंकून घेतला. मुघलांवर मिळविलेल्या या विजयामुळे मराठी फौजांचा आत्मविश्वास वाढला. महाराजांकडे एक जहांगिरदार, बंडखोर म्हणून तुच्छ भावनेने पाहणारे शत्रुदेखील हादरून गेले. लहान स्वरूपात उदयास आलेले स्वराज्य आता बलशाली राज्य बनू लागले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या कर्तबगारीत त्यांच्या सहकाऱ्यांचाही मोलाचा वाटा होता.

मुघलांशी ज्याप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांचा संघर्ष चालू होता, तशा प्रकारचा संघर्ष आदिलशाही सत्तेशीही चालू होता. अली आदिलशाहाचा मृत्यू (सन १६७२ ला) झाल्यानंतर हा संघर्ष वाढीस लागला. खवासखानाने आक्रमक भूमिका घेतल्याने महाराजांनीही जशास तसे उत्तर दिल्याचे दिसते. त्यामुळे खवासखानाने छत्रपतींचा बंदोबस्त करण्याचे काम बहलोलखानाकडे सोपविले. तो स्वराज्यातील पन्हाळगडावर चालून येणार आहे. ही बातमी महाराजांना समजताच त्यांनी प्रतापरावांना बोलावून शत्रुसैन्य एकवटण्या–

पूर्वीच बहलोलखानावर हल्ला करण्याचा सल्ला दिला. प्रतापरावांनी आपल्या आनंदराव, विठोजी शिंदे इत्यादी सहकाऱ्यांना बरोबर घेवून वेगवान हालचाली करून उमराणी येथे बहलोलखान यास गाठले. तेथे घनघोर युद्ध झाले. उभय बाजूची जबर हानी झाली होती. परंतु बहलोलखानाची अगदी बिकट अवस्था होवून तो प्रतापरावांना शरण गेला. व त्याने वकिलामार्फत प्रतापरावांकडे क्षमायाचना केली. प्रतापराव गुजराचे मन विरघळले. त्यांनी बहलेलखानाला दया दाखवली व सोडून दिले. बहलोलखान सैन्यासह आपल्या तिकोटा या स्थळावर माघारी गेला. शत्रुला जीवदान मिळाले. मात्र प्रतापरावांकडून ऐतिहासिक चूक झाली. (एप्रिल १६७३) जो आपला कट्टर शत्रु आहे. आपल्या राज्याचा नाश करण्यासाठी जो आलेला आहे. स्वराज्याचा जो कडवा विरोधक आहे. त्या बहलोलखानाला सोडून प्रतापराव गुजरांनी फार मोठी चूक केली. कधीही दुरुस्त न होण्यासारखी ही चूक ठरली.

छत्रपती शिवाजी महाराजांना जेव्हा पूर्ण कोंडीत सापडलेल्या बहलोलखानाला प्रतापरावांनी दया दाखवून सोडून दिले ही बातमी समजली. तेव्हा त्यांना खूप राग आला व त्यांनी प्रतापरावांना खूपच दोष दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ''सला काय निमित्य केला?'' या बोलण्याने प्रतापराव बेचैन झाले. पन्हाळ्यावर महाराजांच्या भेटीस जाण्याचे त्यांना धैर्य झाले नाही. ते हुबळी धारवाडकडे गेले. त्यांनी हुबळी व इंग्रजांची वखार लुटली. तर इकडे दया दाखवलेला बहलोलखान पुन्हा मराठ्यांच्या विरोधी सक्रिय झाला. बहलोलखान व मुघल सरदार दिलेरखान एक होण्याची शक्यता होती. त्यामुळे प्रतापराव गुजर पुन्हा बहलोलखानावर चालून गेले. महाराजांनी लावलेले बोल व बहलोलखानाचा कृतघ्नपणा यामुळे अस्वस्थ झालेल्या प्रतापराव गुजरांनी अल्प सैन्यानिशी नेसरी येथे बहलोलखानास गाठले. बाकीचे सैन्य पाठीमागून येत होते. तोपर्यंत खानाला रोखून धरण्यासाठी प्रतापरावांनी आपल्याबरोबरच्या अल्प सैन्यानिशी युद्धाला सुरूवात केली. जोरदार चकमक झाली. परंतु बाकीचे सैन्य वेळेवर पोहचू शकले नाही. प्रतापराव धारातिर्थी पडले. (२४ फेब्रुवारी १६७४) एका पराक्रमी व झुंजार व्यक्तिमत्त्वाचा अंत झाला. पौर्णिमेच्या चंद्राच्या कलेप्रमाणे ज्याचे पराक्रम दिवसेंदिवस वाढत गेले. त्याच चंद्राला कृतघ्न बहलोलखानाचे ग्रहण लागले व त्यातच

त्या वीराचा दुर्दैवी अंत झाला. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य उभे करताना जे सेनापती लाभले त्यातील एक पराक्रमी व धाडसी पर्व संपले. प्रतापरावांचा मृत्यू मराठ्यांच्या इतिहास अभ्यासकांना चटका लावून जातो.

छत्रपती शिवाजी महाराजांचे चौथे सेनापती म्हणजे हंबीरराव मोहिते होय. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात महाराजांना ज्या अनेक पराक्रमी व्यक्तींनी साथ दिली व आपल्या पराक्रमाने व शौर्याने ज्या मराठी इतिहासात अजरामर झाल्या त्यामध्ये हंबीरराव मोहित्यांचे नांव घेतले पाहिजे. शहाजी राजांच्या काळापासून मोहिते घराण्यातील व्यक्तींचे भोसल्यांशी संबंध होते. पराक्रमाच्या जोरावरच हंबीरराव स्वराज्यामध्ये नावारूपाला आले होते. प्रतापराव गुजरांच्या मृत्यूनंतर आता सेनापती कोणाला करावे असा प्रश्न ज्यावेळी महाराजांसमोर उभा राहिला त्यावेळी त्यांच्यापुढे एकच नांव आले ते म्हणजे हंबीरराव मोहिते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ८ एप्रिल १६७४ रोजी हंबीरराव मोहिते यांची सरनौबतपदी निवड केली. त्यावेळी हंबीरराव लष्करात जुमलेदार या पदावर कार्य करीत होते. महाराजांनी चिपळूण जवळील श्रीक्षेत्र परशुराम येथे आपल्या लष्करी छावणीत प्रमुख अधिकाऱ्यांशी चर्चा करून व आपल्या कसोटीला उतरलेल्या हंबीररावांची सरनौबतपदी नियुक्ती केली. ते पराक्रमी, धाडसी, चतुर व संयमी स्वभावाचे होते. हंबीररावांची सरनौबतपदी निवड झाल्यानंतर दोनच महिन्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक (६ जून १६७४) झाला. या मंगल प्रसंगी घटनात्मकदृष्ट्या स्वतंत्र राज्याचे पहिले सेनापती व अष्टप्रधान मंडळातील एक प्रधान असा दुहेरी सन्मान त्यांना लाभला.

हंबीररावांनी सन १६७४ ते १६८० अशी ६ वर्षे शिवाजी महाराजांच्या काळात सेनापती म्हणून काम केले व त्यानंतर छत्रपती संभाजीच्या काळात १६८० ते १६८७ म्हणजे आपल्या मृत्यूपर्यंत असे ८ वर्षे सेनापती म्हणून कार्य केले. हंबीररावांनी एकूण १४ वर्षे हे पद भूषविले. शिवकाळात स्वराज्याचा विस्तार केला तर छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात औरंगजेबापासून स्वराज्याचे रक्षण केले.

राज्याभिषेक समारंभानंतर मोगली प्रदेशात खंडण्या वसूल करणे व सधन शहर लुटण्याची जबाबदारी हंबीररावांवर सोपविण्यात आली. त्यांनी खानदेश, बागलाण, गुजराथ, अहमदाबाद, बऱ्हाणपूर, वऱ्हाड इत्यादी प्रदेशातून खंडण्या वसूल केल्या व मुघलांची लासूर ही बाजारपेठ लुटून अमाप संपत्ती स्वराज्यात आणून महाराजांच्या स्वाधीन केली. नर्मदापार मुघल प्रदेशात घुसून हा प्रदेश लुटण्याचे धाडसी काम हंबीररावासारखे वीरच करू शकतात. या स्वारीबद्दल ग्रँट डफनेही मार्मिक टिपणी केली आहे. तो म्हणतो ''हंबीररावांनी सुरतेकडे जाणाऱ्या घाट रस्त्यानी जावून मराठी सैन्यासह पहिल्या वेळी नर्मदा पार केली. .... मुघल प्रदेशात जावून बऱ्हाणपूर व धरणगांव लुटून औंरगजेबास जबर धडा दिला.'' एकेकाळी मुघल सत्तेशी बचावात्मक धोरण स्विकारून (पुरंदर तह वगैरे) स्वराज्य रक्षणारे छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे सेनापती हंबीरराव मोहितेंनी राज्याभिषेकानंतर आक्रमक धोरण स्विकारून राज्यविस्तार तर केलाच, परंतु आता मुघल सरदारांना अनेक वेळा बचावात्मक भूमिका घ्यावी लागत होती हे विशेष होय.

आदिलशाही विरुद्धही छत्रपतींच्या आज्ञेने हंबीररावांनी आक्रमक धोरण स्विकारून हुसेनखान मियाणासारख्या सरदारांचा पराभव करून कोप्पलचा किल्ला घेतला व मराठी सत्तेचा दबदबा निर्माण केला. महाराजांनी दक्षिण दिग्विजय म्हणून कर्नाटक मोहिम हाती घेतली. ती यशस्वी करण्यात हंबीररावांनी मौलिक योगदान दिलेले आहे. दिर्घकाळ चाललेल्या या मोहिमेहून महाराज परतल्यानंतरही कर्नाटकातील राहिलेले राजकारण महाराजांच्या आज्ञेबरहुकूम त्यांनी पूर्ण केले. व्यंकोजी राजांवरील मोहिमेची जबाबदारी त्यांनी कौशल्याने पार पाडली. कारण हंबीररावांची एक बहिण सोयराबाई छत्रपती शिवाजी महाराजांची पत्नी होती तर दुसरी बहिण अणुबाई ही व्यंकोजी राजांची पत्नी होती. असे नाते असताना हंबीररावांनी छत्रपती शिवाजी महाराज व व्यंकोजी राजांमधील संघर्ष कौशल्याने हाताळला. महाराजांचे सेनापती म्हणून कर्तव्य पार पाडीत असताना व्यंकोजी राजेही अपमानित होवू नयेत याची दक्षता त्यांनी घेतलेली होती. हंबीररावांच्या या कामगिरीची छत्रपती शिवाजी महाराजांनीही दखल घेवून त्यांना बक्षिस देवून कौतुक केले. हंबीररावांनी महाराजांना त्यांच्या

निधनापर्यंत एखाद्या बंधुप्रमाणे साथ दिली. त्यांच्या काळात स्वराज्याचा खूप मोठा विस्तार झाला. पुढील काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करातील सैन्यसंख्या वाढली तरी सैन्यात कडक शिस्त ठेवण्याचे काम त्यांनी केले. त्याबद्दल फारसी इतिहासकारांनीही कौतुक केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या मनासारखी साथ देणारा, लष्करात कडक शिस्त ठेवणारा हा सेनापती आपल्या राजाप्रमाणेच पराक्रमी, धाडसी, चतुर व संयमी होता. 'जैसा राजा वैसा सेनापती' हे समीकरण या दोघांबाबत चांगले जुळलेले होते.

हंबीररावांच्या कारकिर्दीचा दुसरा टप्पा छत्रपती संभाजी महाराजांच्या काळापासून सुरू होतो. छत्रपती शिवाजी महाराज वारल्यानंतर जेष्ठ पुत्र या नात्याने छत्रपती म्हणून राज्याभिषेक होण्याचा हक्क युवराज संभाजी राजांचा असताना त्यांना डावलून अष्टप्रधान मंडळातील पेशवे मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्तो, प्रल्हाद निराजी, बाळाजी आवजी इत्यादी मान्यवरांनी सोयराबाईंची बाजू घेवून १० वर्षाच्या धाकट्या राजारामाला छत्रपतींच्या गादीवर बसवले व संभाजी राजांना कैद करण्याचे कारस्थान रचले. त्यामुळे साहजिकच छत्रपती पदासाठी संघर्ष सुरू झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूची बातमी युवराज संभाजी राजांना पन्हाळ्यावर समजताच त्यांनी स्वत:ला 'राजे' म्हणून घोषित केले व स्वराज्यातील अधिकाऱ्यांना व किल्लेदारांना आपल्या सेवेज रूजू होण्यास सांगीतले. सेनापती या नात्याने हंबीररावांनाही युवराज संभाजी राजे यांचे पत्र होते. त्याचप्रमाणे अष्टप्रधान मंडळातील सदस्यांचेही 'आम्हाला येवून मिळावे' असे जासूदामार्फत पत्र आले होते.

राजसिंहासनासाठी होणाऱ्या या संघर्षात लष्कराचे प्रमुख सेनापती या नात्याने आपली भूमिका किती महत्त्वाची आहे याची जाणीव हंबीररावांना आली होती. एका बाजूला बहिण सोयराबाई व तिचा लहान मुलगा राजाराम आणि तिला पाठिंबा देणारे कटाचे सूत्रधार मोरोपंत, आण्णाजी दत्तो, वगैरे तर दुसऱ्या बाजूला युवराज संभाजी हे छत्रपती शिवाजी महाराजांचे थोरले पुत्र – धार्मिक व नैतिकदृष्ट्या राजसिंहासनाचे खरे व योग्य वारसदार होते. या ठिकाणी बहिण, भाचा यांचा मोह, प्रेम बाजूला ठेवून हंबीररावांनी न्याय्य भूमिका घेवून ते युवराज संभाजी राजांच्या सेवेत रूजू झाले. त्यामुळे युवराज संभाजी राजांची बाजू

बलवान होत गेली. हंबीररावांच्या ठिकाणी स्वराज्य व छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल असणारी तत्त्वनिष्ठा, राज्यनिष्ठा व न्याय भूमिका यामुळेच हंबीररावांनी युवराज संभाजी राजांना पाठिंबा दिला. त्यामुळे स्वराज्यातील यादवी टळली व पुढील काळात औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रुला तोंड देण्यास मराठी सत्ता सिद्ध झाली. छत्रपती संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली औरंगजेबाला टक्कर देण्यासाठी मराठी फौज तयार झाली.

औरंगजेबाच्या स्वारीच्या रूपाने स्वराज्यावर आलेल्या संकटाशी सामना करताना छत्रपती संभाजी महाराजांना हंबीररावांनी मोलाची साथ दिली. मराठ्यांचे राज्य प्रथम जिंकून नंतर आदिलशाही व कुतूबशाही संपवायची असा विचार करून दक्षिणेत आलेल्या औरंगजेबाला अखेरपर्यंत मराठ्यांचे राज्य जिंकता आले नाही. त्याने आदिलशाही, कुतूबशाही संपवली परंतु मराठ्यांचे राज्य अबाधित राहिले. या काळात स्वराज्याचे रक्षण करण्यात छत्रपती संभाजी महाराजांबरोबरच सेनापती हंबीरराव मोहित्यांचे योगदान मोठे आहे. असा हा थोर वीर मुघलांशी संघर्ष चालू असतानांच वाईजवळ सर्जाखानाशी झालेल्या युद्धात लढता लढता धारातिर्थी पडला. अशा तऱ्हेने दोन छत्रपतींना साथ देणारे, सद्‌विवेक व न्याय्यबुद्धीने वागणारे पराक्रमी सेनापती स्वराज्याचे रक्षण करता करता आपले हौतात्म्य देवून गेले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील या सेनापतींची ऐतिहासिक कारकिर्द पहात असताना 'एकसे बढकर एक' (एका पेक्षा श्रेष्ठ एक) अशीच असल्याचे दिसते. स्वराज्याच्या प्रारंभीच्या काळात माणकोजी दहातोंडे हे सरनौबत होते. त्यांचा सेनापती म्हणून कालखंड अल्प आहे. तरी त्यांनी मोहिमात यश मिळवून जुना व जाणता माणूस या भूमिकेतून साथ दिली. आपल्या पराक्रमाच्या जोरावर सेनापतीपदाला खरे महत्त्व प्राप्त करून दिले ते नेताजी पालकर यांच्या कारकिर्दीपासूनच होय. नेताजी पालकर, प्रतापराव गुजर व हंबीरराव मोहिते या तिघांचीही कारकिर्द तेजोमय आहे. या तिघांनीही मुघल सरदारांप्रमाणे बचावात्मक पराक्रम केले नाहीत तर स्वराज्यासाठी ते तळहातावर शीर ठेवून लढले. त्यापैकी प्रतापराव गुजर व हंबीररावांना तर लढता लढताच रणांगणावर वीर गती प्राप्त झाली. छत्रपती शिवाजी

महाराजांबद्दल ज्याप्रमाणे अनेक इतिहासकार 'ऐसा राजा होणे नाही' असे उद्‌गार काढतात तद्वत या तिघांबद्दल ऐसे सेनापती दुर्लभ: असेच म्हणावे लागेल.

## निष्कर्ष

१. सेनापतीपदावर वंशपरंपरेने कुणाचीही निवड झालेली नाही. अष्टप्रधानांपैकी अनेक प्रधानांच्या नियुक्त्या वंशपरंपरेने झालेल्या दिसतात. उदा. शामराज मतिमंत नंतर त्यांचा मुलगा महादेव मतिमंत पेशवा झाला. मोरोपंत पेशव्यानंतर त्यांचा मुलगा निळकंठ मोरेश्वर पेशवा झाला. सोनोपंत डबीर नंतर त्यांचा मुलगा त्रिंबकजी सोनदेव डबीर झाला. तर त्यानंतर त्यांचा मुलगा रामचंद्रपंत त्रिंबक सुमंत (डबीर) पदी नियुक्त झाला. निराजी रावजी नंतर त्यांचा मुलगा प्रल्हाद निराजी याची प्रधानमंडळात नेमणूक झाली होती. मात्र सेनापतींच्या सर्व नेमणूका गुणवत्तेवर झालेल्या आहेत.

२. स्वराज्यस्थापनेच्या सुरूवातीच्या कालखंडात मावळ प्रांतातील अनेक देशमुख व त्यांचे सैन्य याचा शिवाजी महाराजांना खूपच उपयोग झाला. सन १६४८ च्या फत्तेखानाच्या स्वारीला तोंड देताना जेधे, बांदल, सिलिंबकर, पासलकर, झुंजारराव मरळ, इत्यादी मावळातील देशमुखांचे व त्यांच्या सैन्याचे मोलाचे सहाय्य मिळाले.

३. मावळातील देशमुखांना आपलेसे करून घेण्याच्या कामी कान्होजी जेध्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. शहाजी राजांनी विश्वासाचे कर्तबगार माणूस म्हणून कान्होजी जेधे यांना शिवाजी राजांकडे पाठविले होते. कान्होजीसारखे मातब्बर देशमुख महाराजांना सामील झाल्यामुळे इतरही देशमुख महाराजांकडे रूजू होवू लागले.

४. तुकोजी चोर स्वराज्याचे सरनौबत असल्याचा सभासद बखरीत उल्लेख आहे. बखरी सोडल्यास इतर कोणत्याही विश्वसनीय साधनात सरनौबत तुकोजी चोर यांचा उल्लेख सापडत नाही.

५. मुघल अखबारात सेनापती नेताजी पालकरांचा नेहमीच 'सीवाचा जवळचा नातलग' असा उल्लेख आढळतो. आज पुराव्या अभावी सिद्ध करता येत नसले तरी शिवाजी महाराज व नेताजी यांच्यात घनिष्ठ नातेसंबंध असावेत. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्नी पुतळाबाई ही नेताजींची चुलतबहीण असावी. कारण नेताजींचा अनेक ठिकाणी 'काका' असा उल्लेख केलेला आढळतो. तसेच शिवाजी महाराजांची दुसरी पत्नी सकवारबाईची कमळजाबाई नावाची मुलगी जानोजी पालकरांना दिली होती. या

जानोजीचे नेताजींशी नेमके कोणते नाते हे स्पष्ट करणारा पुरावा उपलब्ध नाही. परंतु जानोजी नेताजींचे एकतर पुत्र किंवा पुतणे असावेत.

६. परमानंद, कॉस्मी दि–ग्वार्द सारख्या समकालीन लेखकांनी तसेच मुघल इतिहासकारांनी नेताजी पालकरांच्या पराक्रमाचे तोंड भरून कौतुक केले आहे. परंतु उत्तरकालीन बखरीतून मात्र त्यांच्याविषयी नाराजीचा सूर दिसून येतो.

७. उमराणीच्या युद्धात विजय मिळविल्यानंतर शरण आलेल्या बहलोलखानाला छत्रपती शिवाजी महाराजांची परवानगी न घेता सोडून देणे हे सरनौबत प्रतापरावांचे कृत्य चुकीचे होते.

८. सरनौबत प्रतापराव व बहलोलखान यांची नेसरीच्या अरूंद खिंडीत गाठ पडून चकमक उडाली. यावेळी प्रतापरावांबरोबर थोडे सैन्य होते. परंतु बाकीच्या सैन्याची मदत वेळेवर न मिळाल्याने प्रतापराव या युद्धात धारातीर्थी पडले. महाराजांचे बोल मनाला लावून प्रतापरावांनी अविचाराने केवळ सहा सहकाऱ्यांनिशी बहलोलखानावर हल्ला केला नव्हता.

९. प्रतापरावांच्या वडीलांचे नांव अर्जोजीराव गुजर असे असून उपलब्ध पुराव्यानुसार प्रतापरावांना नागोजी, खंडेराव, जगजीवन व जानकीबाई अशी चार अपत्ये होती. त्यांची कन्या जानकीबाई किमान १७१९ पर्यंत जिवंत होती.

१०. सन १६९७ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी प्रतापरावांचे पुत्र खंडेराव व जगजीवन यांना सातारा जिल्ह्यातील परळीजवळील नित्रळ या गावचे देशमुखी वतन दिले होते.

११. 'हंबीरराव' हा हंबीरराव मोहित्यांचा किताब नाही. ते त्यांचे व्यक्तिनाम आहे.

१२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकप्रसंगी अष्टप्रधान मंडळातील मुख्य प्रधानाच्या बरोबरीने सेनापतीलाही महत्त्वाचे स्थान दिले गेले.

१३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर निर्माण झालेल्या वारसा प्रश्नात सेनापती हंबीररावांच्या निर्णायक भूमिकेमुळे स्वराज्यातील यादवी टळली. छत्रपती संभाजी महाराजांची बाजू घेताना त्यांनी स्वराज्याचे हितच पाहिले.

# संदर्भ ग्रंथ सूची

**अ) प्राथमिक साधने :**

**१) अप्रकाशित कार्यालयीन कागदपत्रे :**


१. पुणे पुराभिलेखागार पुणे, इनाम कमिशन रूमाल ३०७, कैफियत राजाजी बिन आपाजी गुजर.

२. पुणे पुराभिलेखागार पुणे, इनाम कमिशन रूमाल ३०७, गुजर घराण्याची वंशावळ.

३. पुणे पुराभिलेखागार पुणे, इनाम कमिशन रूमाल, ३०७, छत्रपती राजाराम महाराजांनी प्रतापराव गुजरांचे पुत्र जगजीवन व खंडेराव यांना सन १६९७ मध्ये दिलेले इनामपत्र.

४. पुणे पुराभिलेखागार पुणे, सातारा जमाव ७८३, भोसरे येथील गुजर पाटील.


**२) प्रकाशित साधने :**


१. आवळसकर शा. वि. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – १०, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५३.

२. कुलकर्णी अनुराधा गोविंद (संपा.), शिवछत्रपतींची पत्रे, खंड १ व २, परममित्र पब्लिकेशन्स्, ठाणे, २०११.

३. कुलकर्णी अनुराधा गोविंद, पटवर्धन अजित (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड–१५, डायमंड पब्लिकेशन्स, २०१२.

४. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – ६, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३७.

५. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – १२, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९६४.

६. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड – ६, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९७३.

७. जोशी श. ना. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – ८, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९४२.

८. जोशी श. ना., ग. ह. खरे, शिवचरित्र साहित्य, खंड – ३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३०.

९. दिवेकर स. म. (संपा.), कविंन्द्र परमानंदकृत शिवभारत, प्रकाशक स. म. दिवेकर, मुंबई, १९२७.

१०. दिवेकर स. म.(संपा.), जयराम कवि विरचित पर्णालपर्वतग्रहणाख्यानमः, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

११. देशपांडे प्र. न. (संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने (राजवाडे वि. का. संपादित), खंड – २, सुधारित आवृत्ती, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, २००३.

१२. पवार आप्पासाहेब (संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड – १, प्रकाशक – कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७०.

१३. पुरंदरे कृष्णाजी वासूदेव (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – १, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२६.

१४. पुरंदरे कृ. वा. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – ७, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३८.

१५. पोतदार द. वा., ग. ना. मुजूमदार (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – २, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३०.

१६. पोतदार द. वा., ग. ना. मुजूमदार (संपा.), ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड – ३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९४१.

१७. मुजूमदार रा. ना. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड – ५, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३४.

१८. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १, २, ३, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण, २००९.

१९. शिवचरित्र साहित्य, खंड ११, त्रैमसिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५७.

**ब) दुय्यम साधने :**

**१) प्रकाशित साधने**

**अ) मराठी पुस्तके :**

१. आपटे द. वि., स. म. दिवेकर (संपा.), शिवचरित्र प्रदिप, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२५.

२. आवळसकर शा. वि. (संपा.), ऐतिहासिक साधने – ऐतिहासिक ग्रंथमाला क्रमांक २, (महाराष्ट्र शासन), मुंबई, १९६३.

३. काळे दि. वी., छत्रपती शिवाजी महाराज, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, १९७१.

४. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली – करिना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

५. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड – १, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४.

६. कुलकर्णी अ. रा., म. रा. कुलकर्णी, मा. रा. कंटक (संपा.), मराठ्यांचा इतिहास साधन परिचय, डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे, २००८.

७. कुलकर्णी म. रा., महाराष्ट्रातील प्रसिद्ध सरदार घराणी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९.

८. केळूसकर कृष्णराव अर्जुन, क्षत्रिय कुलावंतस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, प्रकाशक – र. दा. यंदे, पुणे, १९६५.

९. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड – २, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५९.

१०. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्रवृत्त संग्रह, खंड – २ (अली नामा), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३९.

११. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्रवृत्त संग्रह, खंड – ३ (आलमगिरनामा), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९४१.

१२. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्रवृत्त संग्रह, खंड – ३ (मुन्तखबुल – लुबाव), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९४१.

१३. गर्गे स. म. (संपा.), गो. स. सरदेसाई कृत मराठी रियासत, खंड – १ (शककर्ता शिवाजी), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण, २०११.

१४. गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, ज्ञान विज्ञान विकास मंडळ, पुणे, १९७६.

१५. चित्राव सिध्देश्वर शास्त्री, भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश, प्रकाशक – सिध्देश्वर शास्त्री चित्राव, पुणे, १९३७.

१६. चौबळ ज. स. (अनु.), असे होते मोगल, निकोलाओ मानुची कृत Storia-Do-Mogor चा अनुवाद, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९८२.

१७. जोशी द. प., जोशी उषा (संपा.), समग्र सेतूमाधवराव पगडी, खंड – ३, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०.

१८. जोशी द. प., जोशी उषा (संपा.), समग्र सेतूमाधवराव पगडी, खंड – २, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, २०१०.

१९. ताकवले प्रभाकर, शिवशाहीतील अष्टप्रधान, जळगाव जिल्हा मराठी विद्या प्रसारक सहकारी समाज, जळगाव, १९९६.

२०. देवीसिंग चौहान (संपा.), मुल्ला नुस्त्रतीकृत तारिखे इस्कंदरी, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, १९६९.

२१. देशमुख विजय, शककर्ते शिवराय, (उत्तरार्ध), सन पब्लिकेशन्स्, दुसरी आवृत्ती, पुणे, १९८६.

२२. देशमुख विजय, शककर्ते शिवराय, (पूर्वार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर, १९८०.

२३. पठाण यु. म. (संपा.), कृष्णाजी अनंत सभासद विरचित सभासद बखर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००७.

२४. पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन्स्, पुणे, २००७.

२५. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा, मंजूश्री प्रकाशन, कोल्हापूर, १९७५.

२६. पवार जयसिंगराव, महाराणी ताराबाई, ताराराणी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९७५.

२७. पवार जयसिंगराव (संपा.), छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, मंजूश्री प्रकाशन, कोल्हापूर, १९९०.

२८. फाटक न. र., वि. गो. खोबरेकर (संपा.), भारतीय इतिहास आणि संस्कृती, इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन, मुंबई, १९७६.

२९. बनहट्टी श्री. ना. (संपा.), आज्ञापत्र अर्थात शिवाजी राजांची राजनीती, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, द्वितीय आवृत्ती, १९६५.

३०. बेन्द्रे वा. सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र (पूर्वार्ध), वा. सी. बेन्द्रे, १९७२.

३१. बेन्द्रे वा. सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र (उत्तरार्ध), प्रकाशक – वा. सी. बेन्द्रे, १९७२.

३२. बेन्द्रे वा. सी., छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९७५.

३३. बेन्द्रे वा. सी., राणा जयसिंग आणि शिवाजी, इतिहास संशोधक मंडळ, मुंबई, १९६५.

३४. बेन्द्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, पार्श्व पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, चतुर्थ आवृत्ती, २०१३.

३५. बेन्द्रे वा. सी., महाराष्ट्रेतिहासाची साधने, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६६.

३६. भावे वा. कृ., शिवकालीन महाराष्ट्र, वर्धा प्रकाशन, पुणे, १९९८.

३७. भावे वा. कृ., शिवराज्य व शिवकाल, प्रकाशक ना. वा. भावे, पुणे, १९५७.

३८. भावे विनायक लक्ष्मण (संपा.), श्रीमंत महाराज भोसले याची बखर, मराठी दफ्तर, ठाणे, १९१७.

३९. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, खंड – १, भाग – १, प्रकाशक ग. भा. मेहेंदळे, पुणे, १९९६.

४०. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, खंड – १, भाग – २, प्रकाशक ग. भा. मेहेंदळे, पुणे, १९९९.

४१. राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड – ३, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, २००२.

४२. राजवाडे वि. का., राजवाडे लेखसंग्रह, भाग – १, ऐतिहासिक प्रस्तावना, प्रकाशक श. ना. जोशी, पुणे, १९२८.

४३. राजवाडे वि. का., समग्र राजवाडे साहित्य, खंड – ११ (शिवछत्रपतीची बखर), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९९८.

४४. शेजवलकर त्र्यं. श., श्री शिवछत्रपती, संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मराठा मंदीर प्रकाशन, मुंबई, १९६४.

४५. सरकार जदुनाथ, (अनु. श. गो. कोलारकर), औरंगजेब, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६.

४६. सासवडकर प्र. ल., छत्रपती शिवाजी महाराज (लेखसंग्रह), सेवा प्रकाशन, अमरावती, १९८१.

४७. सोवनी अविनाश (संपा.), ऐतिहासिक शकावल्या, शब्दवेध प्रकाशन, पुणे, १९९८.

४८. हरदास बाळशास्त्री, पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी, खंड – ३, यशवंत छापखाना, पुणे, १९६०.

४९. हरदास बाळशास्त्री, पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी, खंड – ४, प्रकाशक श. रा. दाते, पुणे, १९६०.

५०. हेरवाडकर र. वि., सभासदविरचित शिवछत्रपतींचे चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९८६.

५१. हेरवाडकर र. वि. (संपा.), शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६७.

**ब) इंग्रजी पुस्तके :**

1. Balkrishna, Shivaji the great (Appendix – II), Modern Publishers, Delhi, 1985.
2. English Records on Shivaji, Vol. II, Shiv Charitra Karyalaya, Poona, 1931.
3. Sarkar Jadunath, House of Shivaji,
4. Sarkar Jadunath, Shivaji and his times, Orient Blaks Wan Private Limited, New Delhi, Reprint, 2011.
5. Surendranath Sen, Siva Chhatrapati, K. P. Bagghi and Company, Calcutta, Reprint, 1977.


**क) इतर :**


१. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, रायगड जिल्हा, १९९३.

२. शिवकथाकार विजयराव देशमुख कार्यगौरव समिती (संपा.), शिवविजय, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९२.

परिशिष्ट क्र. १

# सेनापती प्रतापराव गुजर यांच्या घराण्याची वंशावळ








महाराष्ट्र शासन

सहाय्यक संचालक
पुणे पुरालेखागार, पुणे
पुणे - १

शासन प्रमाणित
अनिल विष्णूसा पवार
मोडी भाषांतर करणारा
मो.:९३२६९९१६५४, ९०११२...

# छत्रपती राजाराम महाराज यांनी सेनापती प्रतापराव गुजर यांची मुले जगजीवन व खंडेराव यांना दिलेले नित्रळ गावचे ईनामपत्र



पान १८

ईनामपत्र

नकल

श्री

U o
श्री धर्म प्र
ो ति ता शे ष
व णी दा श र थे
रि व रा जा रा म
रू प मु द्रे य पु ढे स
म ज त ना ही

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २३ धातृनाम सवत्सरे माघ

शुध व्दितीया गुरूवासरे क्षत्रीये कुलावंतस श्री राजाराम छ

त्रपती याणी राार (राजश्री) जगजिवन प्रतापराऊ व खडेराऊ प्रताप

श्री राजा राम
न र प ति ह र्ष नि दा
न मो रे श्व र सु त
नि ळ कं ठ मु ख्य
प्र धा न

॥श्री॥
रा जा रा म प्र
ति नि धे ल क्ष्मी का
त प्र सा द त स्प ति
मा जि र घु ना थ सं प
मु द्रा प ढे स म
ज त ना ही


राऊ गुजर देसमुख ताा (तालुका) परली

प्रांत सातारा –

यांसि दिल्हे ईनामपत्र यैसजे तुमचेविशी राजेश्री रामोजीराजे सिरके

याणी चंदीचे मुकामी स्वामी सनिध विदीत केलीकी माार (मशार) निले

शासन प्रमाणित
अनिल विष्णूसा पवार
मोडी भाषांतर करणार
मो.: ९३२६९९१६५४, ९०११२८८०५४







चे बाप राजेश्री प्रतापराऊ गुजर याणी स्वामीची सेवा येक निष्ठतेने

करीत आसता ते स्वामी कार्यावरी चिज जाहाले त्याचे पुत्र उभयेता

आहेत याणीही स्वामीची सेवा केली तरी याच्या देशमुखीच्या

वतनास नुतन ईनाम गाव येक देविला पाहीजे म्हणोन विनंती केली त्या

वरून तुमचे चालवणे स्वामीस आगत्य यास्तव तुम्हा उभयेता

वरी स्वामी कृपाळु होऊन तुमचे देशमुखीचे वतनास नुतन

ईनाम मौजें नित्रल ताा (तालुका) परली प्रांत मजकुर देहे १ येक प्रस कुलबाब


कुलकानु देखील हलीपटी व पेस्तरपटी झाड झाडोरा पडीले पान

सहीत खेरीज हकदार व ईनामदार करून ईनाम गाव दिल्हा आसे तरी

मौजे मजकुर आपले श्वाधीन करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रा

दी वंश परंपरेने आनभऊन देशमुखीच्या वतनाची सेवा क

शासन प्रमाणित
अनिल विष्णूसा पवार
मोडी भाषांतर करणार
मो.: ९३२६९९१६५४, ९०११२८८०५३



पान २०

रून सुखरूप आसणे निदश समक्ष

मर्यादे विराज त

समत रूजु

मत्री

तेरीख ३०

जमादिलाखर सुा (सुहुर) सबा तिसैन अलफै
७+९०+९०००=९०९७+६००=९६९७

बार सुद्र सुरू सुद्र बार समस्त सुद्र बार

ही सनद साता (सातारा) येथील हुजूर दफ्तरात

नोंदणी बुकास १२ नबरास नोदली आसे

तारीख १५ आप्रेल सन १८५४ ईसंवी

विनायक परशराम नायब दफ्तरदार

निळो वासुदेव कारकुन दफ्तर

सही ईग्रजी XXX

नकल करणार सयाजी गोविद कारकुन ताा (तारीख) ६ माहे आगष्ट सन १८५५ ईसवी

सहाय्यक संचालक
पुणे पुरालेखागार, पुणे
पणे – १

प्रत प्रमाणित
अनिल विष्णूसा पवार
मोडी भाषांतर करणार
मो.: ९३२६९९१६५४, ९०११२८८०५३

## परिशिष्ट क्र. ३

इंग्रज वकील नारायण शेणवी याने रायगडावरून मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरला पाठविलेले पत्र – या पत्रामध्ये प्रतापराव धारातीर्थी पडले त्या नेसरी येथील युद्धाबद्दल माहिती मिळते.



( 451 )

F. R. Surat Vol. 88, pp. 78-83 } NARANSINAY TO DEPUTY GOVERNOR OF BOMBAY { Dated Rairy 4 April 1674

I arrived at Rairy on Tewsday of the last w eke, which was the **24th March**, and on the same day I w t to Banchar [ Pachad ] to visitt Naragy Punditt [ Niraji Pand ], which place is at the mountaines foot, and enquireing for hi I encountred with his eldest sonne **Pariad Pundett** [ Prall ād Pandit ], who advised me that his Father Naragy Punditt was at the mountaines head, and made me waite the Rajah Seva ys order to goe up, upon which I sent one of my servants up o give the Rajah notice of my arrivall, who returned the same day with order from Neragy Punditt that I should remaine in his house untill the time of mourning was over for the **death of the Rajah Sevajes wife**, which I did, resting these five dayes without operating any thing. In the interim came Naragy Punditt to his habitation to celebrate the Jentues New Yeares Day [ Varsh Pratipadā 28th March], and the next day carried me up the ill with him, and enordered me a good entertainement in a large house where I remained five days more.

Yesterday at noone, being the **third of Aprill**, Naragy Punditt accompanied me up to the Rajahs Court and brought mee before him, who received me with much courtesy and gave me a seat very neare him, enquiring of your Honours good health, of which I gave him an account and reciprocally returned his complement, at which setting I entered on the Raja- re bussiness, and **Naragy Pundett, according to his accustomed ur in our behalfe**, demonstrated the matter better than I

[ 327

expected to his master the Rajah, on which Savajee presently enordered his Scrivans to passe orders concerning this affaire, vizt. to pay the **Rajapore money at three payments**, to witt 2500 Pagodas out of the Rajapore Customes, 2500 to be paid the first monsoone commencing the first of September next, and 5000 to be paid in two yeares space, to make which writings and orders 3 or foure dayes will be requisite, which being effected I will send them to Your Honor by Adall the Moody, who is now with me, who arriving in safety to Your Honor will acquaint you more clearly of all passages here. I intended to have sent Sevagys writings and orders by this bearer, but seeing it would cost some time before they were finished, and Your Honor enordering me to send you a dayly express, is the reason I so suddenly dispatcht this man, and the reason I wrote Your Honor not before is because Naragy Punditt desired me not to write untill I had spoke with Sevajee, for which fault I desire Your Honors pardon. I cannot advise your Honor particuarly of what newse here stirring having not sufficient time, but it seemes unreasonable I should totally decline it.

**Sevajee is makeing a throne** very magnificent, on which he spends much gold and jewells, intending to be crowned in June next, being the beginning of the new yeare[?]. To this Coronation he hath invited many learned Bramines, and will liberally bestow on them many ellephants, horses and money, but **it is not knowne whether he will be crowned in person** or some other Prince, for it is reported he hath a Prince of the Nisamshay [ Nizamshāhi ] race in his custody.

By other conveighances your Honour will have received news of the proceedings of Sevajees army. Nevertheless I cannot be excused without giving you some account. **Bhadur Caun** did desire to descend into Concan, but understanding that the Rajah Savajee hath stopt the passages by breaking the wayes and advances twixt the hills and keeping a constant guard there where the passages was most difficult, he returned from whence he came.

The Rajah Sevajee intended to proceed for **Currall** to give new orders to his army and to create a new Generall of his horse in the roome of **Pertab Roy** [ Pratap Rāy] who fell in the encounter of Sevajees army with Bullool Ckaun in a narrow passage betwixt two hills who with six horsemen more were slaine, being not succored by the rest of the army, so that Bullo Ckaun remain victorious, but **Amand Roy** [Anandarao] L

nant sent Sevajee word that he should not resent his Generalls death, he remayning in his stead, on which Savajee enordered Amand Roy to succeed him in quallity and pay, and not to returne alive without being victorious against his enemys. And Anond Roy [*sic*] being a valiant person, on his masters order mooved with the whole body of his horse farr into the enemys country in search of Bullooll Ckaun. But it happened that Dilleel Ckaun understanding of Parrap Rajas [ Pratāp Rāy's ] death, fell in with his army to succour **Bullooll Ckaun**, makeing great hast to fight with Anand Roy, but he seeing two such valiant enemyes before him durst not fight them, and thereupon tooke his way towards Cannara, journeying 15 leagues per diem, he before and the two nobles following him; but after many days march, not dareing to effect any thing but only to march after him, they both returned. Dilleel Ckaun went under **Panalla** to besiege it, but stayd there but five days and returned to his former station, and Bullooll Ckaun went to Collapore. Anand Roy passing much inland, robbed a Citty called **Pench**, eight leagues from **Bancapore**, which Citty belongs to Bullooll Ckaun[s] Jagheere, from whence he returned well laden with 3000 oxen laden with goods, which Bullooll Ckaun and Quider Ckaun understanding, they intended to intercept him with their whole army, encountring neare Bancapore, where happened a desperate battell; but **Anand Roy gott the victory.** In said battell fell a brother of Quider Cans, Cousen of Bullooll Ckauns, and Anand Roy robbed the whole army and brought 500 horse and two ellephants and other things, Bullooll Ckaun and Quider Ckaun flying away. Anand Ray on his returne leaving his booty with Savagee, is gone againe to Ballagatte to robbe more townes.

I have discoursed with Narragy Punditt concerning the peace you desired might be concluded with the Sidy Foote [Fatte] Ckaun. He answered with many comparisons shewing that **Sevagee had no inclination thereunto,** whereupon I never talkt more about that affaire, of which Naragy Punditt will himselfe write you.

I shall give your Honour what news I have heard of Siddy Sambole in a few words. He engaged with Doulett Ckaunes navy in Satouly [ Sātawly ( Rajapur ) ] river, where there was slaine above one hundred men of the Siddys and 44 of Doulett Cauns who gaines the victory but is wounded with an arrow, and tis reported that Siddy Sambole is likewise wounded and his hands burnt. He not meeting with good success in

the aforesaid river is gone to Haresser neare Vessing [?]. This news Sevajee told me himselfe. Now I desire your Honour not to licence the Siddy to enter into your port, nor his men to come on shoare, for if you should not thinke convenient to refuse him, it would cause great differrences to arrise betwixt us and Sevajee, for soe much he declared to me at first meeteing.

Now I desire your Honour to send **Mr. Henry Oxinden** imediately with a good present because I cannot stay long here by reason of the unholesome waters of the hill. Concerning the present, Naragy Punditt enquired of me and I answered him that Mr. Henry Oxinden would bring **an Arrabb Horse** with him of considerable vallue, who desired me to write to your Honour not to send any, because the Rajah had told him he had not occasion of any, but that in liew thereof you would please to send him some pretious stones, either pearles or dimonds, which may be worth his wearing at his coronation, wherefore I desire your Honour to send him some rings of pretious stones or pearles, or some chaines of pearles, which the Jentues wear on their shashes, because these people thinke that the English cannot want pearles and other jewells, being merchants that trade in shipping. Naragy Punditt enorderes me to write your Honour that if you should send a horse the Rajah would never ride on him, but give him some of his servants or souldiers, because he hath many horses, as well Arabbs as Turkish, which considering, your Honours may please to doe as to you it seemes best. Your Honour hath already wrote to Naragy Punditt that you would send an English man of your Councill, which he hath made known to the Rajah, wherefore it is convenient that Mr. H. O. Comes with a considerable present in conformity to his quallity, which may be about 1000 or 1200 Rups. It is also reasonable that you present the Rajah with something at the time of **his coronation**, but this present you now send will serve for all. I likewise advertise your Honour to mind Girder Das to send 35 ordinary thurmas to Naragy Punditt, for which he often persecutes me, and Girder promised to send them just after my departure. God preserve your Honour is tha prayers off,

Rairy 4th Aprill 1674. Your humble Servant
NARANSINAY

Translated out of the
Portuguese originall.

330 ]

## परिशिष्ट क्र. ४

## नकाशा क्र. १


## छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य इ. स. १६८०




बालभारती इ. ४ थी च्या पुस्तकामधून

## नकाशा क्र. २

## अफजलखान वधानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली सेनापती नेताजी पालकरांनी ताब्यात घेतलेला प्रदेश (नोव्हेंबर १६५९ ते मार्च १६६०)




गजानन मेहेंदळे यांच्या श्री राजा शिवछत्रपती खंड १, भाग १ या ग्रंथातील नकाशा क्र. १२ वरून.(पान नं. ९४४ च्या समोर)

## नकाशा क्र. ३

## सेनापती प्रतापराव व बहलोलखान यांच्यात झालेले उमराणीचे युध्द (इ. स. १६७२)





प्रतापरावांचा मार्ग  बहलोलखानाचा मार्ग

डॉ. सदाशिव स. शिवदे यांच्या 'ज्वलज्ज्वतनतेजस संभाजीराजा' या पुस्तकातून पान क्र. २९२ च्या समोर

## नकाशा क्र. ४

## छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातील सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या पराक्रमाची ठिकाणे (सन १६८१ ते १६८७)




सेनापती हंबीरराव मोहिते या डॉ. सदाशिव शिवदे यांच्या पुस्तकातून पान क्र. ५८

## परिशिष्ट क्र. ५
## छायाचित्रे



सरनौबत प्रतापराव गुजर यांच्या भोसरे येथील वाड्याचे अवशेष



सरनौबत प्रतापराव गुजर यांचे भोसरे येथील त्यांच्या वाड्यातील स्मारक




प्रतापराव गुजर यांच्या नावाचे भोसरे येथील प्रवेशद्वार






समर्थ रामदास स्वामी यांचे शिष्य उद्धव स्वामी यांनी
भोसरे येथे स्थापन केलेले हनुमानाचे मंदिर




तळबीड जिल्हा सातारा येथील सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या समाधीचे प्रवेशद्वार



तळबीड जिल्हा सातारा येथील सेनापती हंबीरराव मोहिते यांची समाधी




तळबीड जिल्हा सातारा येथील सेनापती हंबीरराव मोहिते यांचे स्मारक



तळबीड जिल्हा सातारा येथील सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या घराण्याविषयीचा शिलालेख